लोकलेखा समिती

(२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या
सन २००८-२००९ च्या नागरी अहवालामधील
सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.२.१, ३.३.१),
ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.२.३)
ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.२.४)
गृह विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.५, ३.४.३), जलसंपदा विभागाशी
संबंधित (परिच्छेद क्र. ३.२.४, ३.२.५) गृहनिर्माण विभागाशी संबंधित
(परिच्छेद क्र. ३.३.१, ३.४.४), सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित
(परिच्छेद क्र. ३.३.३, ३.३.४), उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद
क्र. ३.४.१), कृषी व पदुम (मत्सव्यवसाय) विभागाशी संबंधित
(परिच्छेद क्र. ४.१) यावरील

सतरावा अहवाल

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक फेब्रुवारी, २०१४ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
फेब्रुवारी, २०१४

लोकलेखा समिती

२०१२-२०१३

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या
सन २००८-२००९ च्या नागरी अहवालामधील
सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.२.१, ३.३.१),
ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.२.३)
ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.२.४)
गृह विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.५, ३.४.३), जलसंपदा विभागाशी
संबंधित (परिच्छेद क्र. ३.२.४, ३.२.५) गृहनिर्माण विभागाशी संबंधित
(परिच्छेद क्र. ३.३.१, ३.४.४), सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित
(परिच्छेद क्र. ३.३.३, ३.३.४), उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद
क्र. ३.४.१), कृषी व पदुम (मत्सव्यवसाय) विभागाशी संबंधित
(परिच्छेद क्र. ४.१) यावरील

सतरावा अहवाल

लोकलेखा समिती
२०१२-२०१३

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री.मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.

(३) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

(४) श्री.सुनिल केदार, वि.स.स.

(५) श्री.बसवराज पाटील, वि.स.स.

(६) श्री.विनायक निम्हण, वि.स.स.

* (७) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स. (दिनांक २७ जानेवारी, २०१३ रोजीपर्यंत)

(७अ) श्री.राहुल बोंद्रे, वि.स.स. (दिनांक ११ जुलै, २०१३ रोजीपासून)

(८) श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स.

** (९) श्री.संजय सावकारे, वि.स.स. (दिनांक १० जून, २०१३ रोजीपर्यंत)

*** (१०) श्री.दिलीप सोपल, वि.स.स. (दिनांक १० जून, २०१३ रोजीपर्यंत)

(११) श्री.ए.टी.पवार, वि.स.स. (दिनांक ५ जानेवारी, २०१३ रोजीपर्यंत)

**** (११अ) श्री.लक्ष्मण जगताप, वि.स.स. (दिनांक ७ जानेवारी, २०१३ रोजीपासून)

(१२) श्री.विक्रमसिंह पाटणकर, वि.स.स.

(१३) श्री.बदामराव पंडित, वि.स.स.

(१४) प्रा.राम शिंदे, वि.स.स.

(१५) श्री.गिरीष महाजन, वि.स.स.

(१६) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.

(१७) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.

(१८) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.

(१९) श्री.विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.

(२०) श्री.नितीन सरदेसाई, वि.स.स.

(२१) श्री.जयप्रकाश छाजेड, वि.प.स.

(२२) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.

(२३) श्री.विनायक मेटे, वि.प.स.

***** (२४) श्री.विजयसिंह मोहिते-पाटील, वि.प.स. (दिनांक ६ फेब्रुवारी, २०१४ रोजीपर्यंत)

(२४अ) श्री.राजेंद्र जैन, वि.प.स. (दिनांक ७ फेब्रुवारी, २०१४ रोजीपासून)

(२५) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

(२६) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.(दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजीपर्यंत)

****** (२६अ) श्री.विनायक राऊत, वि.प.स. (दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ रोजीपासून)

(२७) श्री. मनिष जैन, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक ३१ मे, २०१२ रोजी विधानसभा व दिनांक १ जून, २०१२ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधामंडळ सचिवालय,

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री.उ.की.चव्हाण, अतिरिक्त सचिव.
(३) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(४) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.
(५) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
(६) श्री.दिलीप येवला, अवर सचिव (समिती).
(७) श्री.सोमनाथ न. सानप, कक्ष अधिकारी.
(८) श्री.कैलास पाझारे, कक्ष अधिकारी.

*** श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स. यांचे दिनांक २७ जानेवारी, २०१३ रोजी निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री.राहुल बोंद्रे , वि.स.स. यांची मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक ११ जुलै, २०१३ रोजी नामनियुक्ती केली आहे.**

**** श्री.संजय सावकारे, वि.स.स. यांचा दिनांक ११ जून, २०१३ रोजी राज्यमंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाल्याने सदर जागा रिक्त आहे.**

***** श्री.दिलीप सोपल, वि.स.स. यांचा दिनांक ११ जून, २०१३ रोजी मंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाल्याने सदर जागा रिक्त आहे.**

****** श्री.ए.टी.पवार, वि.स.स. यांचे जागी मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी श्री.लक्ष्मण जगताप, वि.स.स. यांची समिती सदस्य म्हणून दिनांक ७ जानेवारी, २०१३ रोजी नामनियुक्ती केली.**

******* श्री.विजयसिंह मोहिते-पाटील, वि.प.स. यांचे जागी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी श्री.राजेंद्र जैन, वि.प.स. यांची समिती सदस्य म्हणून दिनांक ६ फेब्रुवारी, २०१४ रोजी नामनियुक्ती केली.**

******** श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांचे जागी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी श्री.विनायक राऊत, वि.प.स. यांची निमंत्रित म्हणून दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ नामनियुक्ती केली.**

( )

प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००८-२००९ च्या नागरी अहवालामधील सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.२.१, ३.३.१), ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.२.३), ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.२.४), गृह विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.५, ३.४.३), जलसंपदा विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.२.४, ३.२.५), गृहनिर्माण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.३.१, ३.४.४), सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.३.३, ३.३.४), उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.४.१), कृषी व पदुम (मत्सव्यवसाय) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.१) यावर विचार करून लोकलेखा समितीचा सतरावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक १४, १५, २१, २२, २८, व २९ मे, २०१३, दिनांक ५, ११, १२, १८ व १९ जून, २०१३, दिनांक ३ जुलै, २०१३, दिनांक १४ ऑगस्ट, २०१३ व दिनांक ५ फेब्रुवारी, २०१४ रोजी अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग व गृह विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास), ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण), जलसंपदा, गृहनिर्माण तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच सचिव सार्वजनिक बांधकाम तसेच कृषी व पदुम (मत्सव्यवसाय) विभाग यांची साक्ष विधान भवन, मुंबई येथे घेतली. तसेच दिनांक १९ जून, २०१३ रोजी हाय माऊंट स्टेट गेस्ट हाऊस व प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंधेरी मुंबई येथे भेट व बैठक आणि दिनांक ३ जुलै, २०१३ रोजी महाराष्ट्र सदन, दिल्ली येथे भेट व बैठक.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांची देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट "ब" मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक फेब्रुवारी, २०१४ रोजी झालेल्या बैठकीत हा अहवाल विचारात घेतला व त्यास काही फेरफारासंह मान्यता दिली.

विधान भवन,
मुंबई .
दिनांक : फेब्रुवारी, २०१४

गिरीश बापट,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती

( )

अनुक्रमणिका

अ.क्र. (१)	विभाग व तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	प्रस्तावना	
(१)	**सार्वजनिक आरोग्य विभाग**	
	(परिच्छेद क्र. २.१, ३.३.१)	
(२)	**ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभाग**	
	(परिच्छेद क्र. २.३)	
(३)	**ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभाग**	
	(परिच्छेद क्र. २.४)	
(४)	**गृह विभाग**	
	(परिच्छेद क्र. २.५, ३.४.३)	
(५)	**जलसंपदा विभाग**	
	(परिच्छेद क्र. ३.२.४, ३.२.५)	
(६)	**गृहनिर्माण विभाग**	
	(परिच्छेद क्र. ३.३.१, ३.४.४)	
(७)	**सार्वजनिक बांधकाम विभाग**	
	(परिच्छेद क्र. ३.३.३, ३.३.४)	७
(८)	**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**	
	(परिच्छेद क्र. ३.४.१)	
(९)	**कृषी व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभाग**	
	(परिच्छेद क्र. ४.१)	
(१०)	**परिशिष्ट "अ"**	
(११)	**परिशिष्ट "ब"**	

सार्वजनिक आरोग्य विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००८-२००९ च्या अहवालामधील (१) परिच्छेद क्र. २.१ "राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान" (२) परिच्छेद क्र. ३.१.१ "वैद्यकीय प्रतिपुर्तीचे लबाडीचे प्रदान" यासंदर्भात खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान

राज्य PIP आणि जिल्हा आरोग्य कार्यवाही योजना सादर करणे.

NRHM च्या रचनेनुसार दरवर्षी SHS ने राज्याकरीता प्रकल्प कार्यान्वयन योजना (PIP) प्रत्येक जिल्ह्याची वार्षिक DHAP विचारात घेऊन करावयाची होती. पीआयपी भारत सरकारला मागिल आर्थिक वर्षाच्या १५ मार्च पर्यंत सादर करावयाची होती. तथापि, असे दिसून आले की, २००५-०६ या वर्षाकरीता PIP तयारच केली गेली नव्हती आणि तक्ता १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे PIP च्या अंतिम सादरीकरणात विलंब होता.

तक्ता १ : राज्य PIP व DHAP चे सादरीकरण

वर्ष	राज्य शासनाने अंतिम PIP सादर करण्यासाठी विहित तारीख	प्रत्यक्ष सादर करण्याची तारीख	विलंब (दिवसांमध्ये)
२००६-०७	१५ मार्च २००६	जुलै २००६	१३७
२००७-०८	१५ मार्च २००७	१५ जुलै २००७	१२०
२००८-०९	१५ मार्च २००८	२५ मार्च २००८	१०

SHS ने अंतिम PIP विलंबाने सादर केल्यामुळे भारत सरकारी उशीराने मंजूरी व विलंबाने निधी वितरण याचा परिणाम अभियानाच्या कार्यान्वयनातील विलंबावर झाला.

असे दिसून आले की, २००६-०७ आणि २००७-०८ या वर्षाकरीता राज्य PIP या जिल्हा, गट आणि गावे यांच्या गरजाचा विचार न करता केल्या होत्या. २००६-०७ या वर्षी DHAPs तयार केल्या नव्हत्या, २००७-०८ या वर्षी DHAPs या गट आणि गावे यांच्या गरजांचा विचार न करता तयार करण्यात आल्या होत्या. तथापि, २००८-०९ या वर्षाकरीता वार्षिक योजना सर्व स्तरावर तयार विकेंद्रित नियोजनाचे ध्येय अपूर्ण राहिले.

शासनाने नमूद केले (सप्टेंबर २००९) की, २००५-०६ या वर्षाकरीता PIP भारत सरकारला १६ मार्च २००५ ला सादर केली होती. २००६-०७ मध्ये जिल्हा PIPs विचारात घेण्याची अपेक्षा नव्हती आणि २००७-०८ या वर्षाकरीता राज्य PIP तयार करण्यासाठी जिल्हा यथार्थ दर्शन योजनेचा विचार केला गेला.

हे उत्तर मान्य करण्यासारखे नव्हते कारण २००५-०६ या वर्षाकरीता राज्य PIP १६ मार्च २००५ ला सादर केल्याचे नमूद केले गेले होते म्हणजेच NRHM च्या कार्यान्वयनापूर्वी आणि जिल्हा, गट व गाव स्तराच्या योजनांचा विचार केल्या विना राज्य PIP तयार करण्याचा उद्देश नव्हता.

NRHM च्या रचनेनुसार प्रत्येक गावात २००८ पर्यंत, ग्राम, आरोग्य आणि आणि सफाई समिती (VHSC) ग्राम सभेच्या एकूण रचनेअंतर्गत स्थापना करावयाची होती. ही VHSC ग्राम स्तरावरील आरोग्य नियोजन आणि संनियंत्रण यासाठी जबाबदार राहणार होती. मार्च २००९ पर्यंत, ४०,९१० गावांपैकी ३९,३९२ गांवात (९६ टक्के) VHSCs स्थापन झाल्या. चाचणी तपासणी केलेल्या जिल्ह्यात १२,२०७ गांवापैकी ११,९४७ गावात (९८ टक्के) VHSCs स्थापन झाल्या होत्या.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला.

सन २००६-०७ चा प्रकल्प आराखडा (पीआयपी) केंद्र शासनास पाठविण्यात विलंब झाला हे खरे आहे. परंतु जिल्ह्यांनी तयार करावयाचा प्रकल्प आराखडा सादर करण्याबाबत केंद्र शासनाकडून मार्गदर्शनपर सुचना ऑगस्ट २००६ मध्ये प्राप्त झाल्या. केंद्र शासनाकडून मार्गदर्शक पुस्तिका प्राप्त झाल्यानंतर सन २००७ ते २०१२ या कालावधीमधील प्रकल्प आराखडा (पीआयपी) सर्व जिल्ह्यांनी तयार केलेला आहे.

सन २००७-०८ व २००८-०९ या वर्षाचा प्रकल्प आराखडा (पीआयपी) केंद्र शासनास १५ मार्च पूर्वी सादर करण्यात आला होता. सन २००५-०६ चा प्रकल्प आराखडा (पीआयपी) दि. १६.०३.२००५ रोजी पाठविण्यात आला होता.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत केंद्र शासनामार्फत प्रकाशित टाईम लाईन नुसार जिल्हास्तरीय कृती आराखडा सन २००७ मध्ये ५० टक्के आकृतीबध्द होणे व सन २००८ मध्ये १०० टक्के अभिप्रेत होते. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांस अनुसरुन विहित केलेल्या

कालावधीमध्ये ५० टक्के जिल्ह्यांनी २००७ पर्यंत जिल्हा आरोग्य कृती आराखडा सादर केलेला होता. सन २००८ मध्ये १०० टक्के जिल्ह्यांनी "जिल्हा आरोग्य कृती आराखडा" सादर केलेला होता. केंद्र शासनाने निश्चित केलेल्या विहित कालावधीचे पालन राज्यांनी केलेले आहे. सन २००७ ते २०१२ या कालावधीमधील जिल्हा यथार्थदर्शन योजनेचा (Perspective Plans) विचार करुन सन २००७-०८ चा राज्याचा कृती आराखडा तयार करण्यात आला होता. जिल्ह्याचा यथार्थदर्शन योजनेचा आराखडा गाव व गटांच्या आराखड्यावरुन तयार करण्यात आला होता.

कौटुंबिक सर्वेक्षण :

ग्रामीण जनतेच्या आरोग्य देखरेख गरजा समजून घेण्याच्या हेतूने साधनसंपत्तीचा तपशील समजण्यासाठी आणि पिण्याचे पाणी साफसफाई, शौचकूप, रोजगार आणि इतर गरजांची पोच असे घटक कुटुंबाच्या आरोग्याला कसे प्रभावित करतात याचे निर्धारण करण्यासाठी कौटुंबिक सर्वेक्षण राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात (डिसेंबर २००७ पर्यंत ५० टक्के आणि डिसेंबर २००८ पर्यंत १०० टक्के) करावयाचे होते.

राज्य शासनाने दिलेल्या माहिती नुसार (मार्च २००९), २००६-०७ मध्ये २० जिल्ह्यांतील २३,९६५ गावांमध्ये कौटुंबिक सर्वेक्षण केले गेले आणि १३ जिल्ह्यातील १९,९११ गावे (४५ टक्के) कुठल्याही सर्वेक्षणाविना राहिली. चाचणी तपासणी केलेल्या आठ जिल्ह्यांपैकी नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यांत कौटुंबिक सर्वेक्षण केले गेले नाही. सर्वेक्षणाची आधारसामग्री PRI सभासदांकडून पडताळून घेतली गेली नाही. शिवाय, कौटुंबिक सर्वेक्षणाची डाटाबेस SHS आणि DHS या स्तरावर तयार केली गेली नाही. शासनाने नमूद केले (सप्टेंबर, २००९) की, कौटुंबिक सर्वेक्षण २००८ मध्ये पूर्ण झाले. तथापि, चाचणी तपासणी केलेल्या जिल्ह्यात व निवडलेल्या उपकेंद्रात लेखापरीक्षणाला असे दिसून आले की, कौटुंबिक सर्वेक्षणाच्या सामुग्रीचे (data) आधार सामुग्रीचे एकत्रीकरण नव्हते. DHS च्या सभासद सचिवांनीही नमूद केले होते (मे २००८) की, कौटुंबिक डाटाबेस तयार केला नव्हता. शिवाय, २००७-०८ वर्षाकरीता गाव पातळीवर आरोग्य कार्यवाही योजना तयार केल्या नव्हत्या, अशाप्रकारे, कौटुंबिक सर्वेक्षण करण्यातील कमतरतेमुळे आणि डाटाबेस तयार न केल्यामुळे आरोग्य देखरेख गरजांचे निर्धारण करण्याची उद्दिष्ट्ये पूर्णपणे साध्य होऊ शकली नाहीत.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला.

कौटुंबिक सर्वेक्षण हा जिल्हा आरोग्य कृती आराखड्याचा एक भाग आहे. जिल्हा कृती आराखड्याची तयारी गावपातळीवरील आराखड्यावरुन केली जाते. गावपातळीवरील आराखडा कौटुंबिक सर्वेक्षणावरुनच केला जातो. प्राथमिक आरोग्य केंद्राचा कृती आराखडा तयार करताना कौटुंबिक सर्वेक्षणामधून प्राप्त झालेल्या माहितीचा वापर केला जातो. तालुक्याचा आराखडा तयार करत असताना याच माहितीचा उपयोग केला जातो. जिल्ह्याचा कृती आराखडा हा तालुक्याच्या कृती आराखड्यावरुन केला जातो. अशा प्रकारे कौटुंबिक सर्वेक्षणाची माहिती उपलब्ध आहे. त्याचा वापर करुन प्राथमिक आरोग्य केंद्राचा कृती आराखडा तयार केला जातो. सन २००७-०८ व २००८-०९ या वर्षामध्ये सर्व जिल्ह्यांना कौटुंबिक सर्वेक्षण करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार सन २००८-०९ या वर्षामध्ये ९० टक्के गावपातळीवरील कौटुंबिक सर्वेक्षण पुर्ण करण्यात आले आहे.

सुविधा सर्वेक्षण :

सेवेच्या गुणवत्तेची स्थिरचिन्हे मांडण्यासाठी आणि निर्दिष्ट गरजा ओळखण्यासाठी CHSs, PHCs व SCs च्या प्रत्येक सुविधेत डिसेंबर २००८ पर्यंत शंभर टक्के सुविधा सर्वेक्षण करावयाचे होते हे सर्वेक्षण देखरेख साधनसामग्री आणि मानवी साधनसंपत्तीतील त्रुटी यांच्यासंबंधी समीक्षणात्मक माहिती पुरविणार होती जी नियोजन प्रक्रियेद्वारे संबोधित करण्याची गरज होती.

विभागाने १०५ CHCs मध्ये NGOs द्वारा सुविधा सर्वेक्षण केले आणि बाकीची सर्वेक्षणे विभागाने केले असे दिसून आले की, मार्च २००९ पर्यंत २३४ CHCs मध्ये (५० टक्के), १,३६६ PHCs मध्ये (७५ टक्के) आणि ९,९२६ SCs मध्ये (९४ टक्के) सुविधा सर्वेक्षण केले गेले नव्हते.

चाचणी तपासणी केलेल्या CHSs, PHCs आणि SCs मध्ये सर्वेक्षण अनुक्रमे ६३ टक्के, ६९ टक्के आणि ९४ टक्के कमतरता होती.

शासनाने नमूद केले (सप्टेंबर २००९) की, नोव्हेंबर, २००९ पर्यंत सुविधा सर्वेक्षण पूर्ण केले जातील तथापि, वस्तुस्थिती ही आहे की, शासनाला ठरविलेली वेळ पाळता आली नाही. अपर्याप्त सुविधा सर्वेक्षणामुळे, संपूर्ण आरोग्य देखरेख केंद्रातील सुविधांमधील त्रुटी समजू शकल्या नाहीत. शिवाय उपकेंद्र असलेल्या गावांची आरोग्य देखरेखेची सुविधा अत्यल्प असल्यामुळे त्यांच्याकडे जास्त लक्ष देण्याची आवश्यकता आहे. अशा ठिकाणी देखरेख साधन

सामुग्री गरजांचे सर्वेक्षण फक्त ६.१५ टक्के होते. या मूलभूत आधार सामुग्रीच्या अभावी नियोजन वास्तवादी होऊ शकले नाहीत.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला.

बाह्य सुविधा सर्वेक्षण ही प्रक्रिया आयपीएचएस अंतर्गत नविन नियुक्त केलेल्या आरोग्य संस्थामधील उणीवा निश्चित करण्यासाठी राबविली जाते.

बाह्यसुविधा सर्वेक्षण सद्य:स्थिती

अ.क्र	आरोग्य संस्थंचा प्रकार	आयपीएचएस अंतर्गत समाविष्ट आरोग्य संस्था	बाह्यसुविधा सर्वेक्षण पूर्ण झालेल्या आरोग्य संस्था	मागील वर्षाप्रमाणे संस्थानिहाय खर्च	एकूण खर्च
१.	उपकेंद्र	३०७३	२६५२	५०००	२१.०५
२.	प्रा.आ.केंद्र	१०८१	८७०	९०००	१८.९९
३.	ग्रामीण रुग्णालय	१०५	७८	१२०००	३.२४
४.	उपजिल्हा रुग्णालय	७८	६०	१५०००	२.७
५.	जिल्हा रुग्णालय	२३	२३	२५०००	०
६.	स्त्री रुग्णालय	७	७	२००००	०
७.	सामान्य रुग्णालय	३	०	२५००	०.७५
	एकूण	**४३७०**	**३६९०**		**४६.७३**

प्रारंभी आरोग्य संस्थांचे बळकटीकरण हे संस्थेच्या बाह्यसुविधा सर्वेक्षणानुसार करावयाचे निश्चित करण्यात आले होते. दरम्यान प्राप्त मार्गदर्शन सूचनानुसार २०११-१२ पासून ४२१ उपकेंद्र २११ प्रा.आ. के. २७ ग्रामीण रुग्णालय, १८ उपजिल्हा रुग्णालय व ३ सार्वजनिक रुग्णालय यांचेमार्फत सुविधा सर्वेक्षण करण्यात येते.

सामुहिक सहभाग

रुग्णालय व्यवस्थापनासाठी रुग्ण कल्याण समिती (RKS)

NRHM च्या मार्गदर्शक तत्वानुसार बाह्य रुग्ण विभाग (OPD) आणि आंतररुग्ण विभाग (IPD) सेवांचा आढावा आणि रुग्णालय आणि पोचण्यास दूर अशा कामावरील सेवांचा

आढावा घेण्यासाठी PHC, CHC आणि DH स्तरावर पंचायत राज रचनेअंतर्गत रुग्णालयासाठी रुग्ण कल्याण समिती (RKS) स्थापन करुन सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० अंतर्गत तीची नोंदणी करावयाची असते. RKS ला लाभार्थीच्या तक्रारी दूर करावयाच्या असतात आणि दर्जेदार आरोग्य देखरेख सेवेची सुविधा असल्याची निश्चिती करावयाची असते. प्रत्येक RKS ला एक नियामक मंडळ (GB) धोरणात्मक निर्णयासाठी आणि संनियंत्रणासाठी निर्णयांच्या निष्पादनासाठी एक कार्यकारी समिती (EC) असते.

राज्यात बनवावयाचा एकूण २,२९० RKS पैकी (जिल्हा रुग्णालयात २३, CHCs मध्ये ४५१ व PHCs मध्ये १८१६), २,२४८ RKS (९८ टक्के) २००८-०९ पर्यंत बनविण्यात आल्या. चाचणी तपासणी केलेल्या आठ जिल्ह्यात बनवावयाच्या एकूण ६१८ RKS पैकी २००८-०९ पर्यंत ६१५ RKS (९९ टक्के) बनविण्यात आल्या. चाचणी तपासणी केलेल्या ६१५ पैकी ७९ RKS मध्ये असे दिसून आले की, जरी GBs आणि ECs बनविण्यात आल्या तरी त्यांनी खर्च मंजूर करण्याव्यतिरिक्त रुग्णालयातील सेवेचा आढावा घेण्याची व पोहचण्यास दूर इ. कामाची मुख्य जबाबदारी पार पाडली नाही. या प्रकारे RKS बनविण्याचा हेतु बहूतांशी साध्य केला गेला नाही.

शासनाने वस्तुस्थिती मान्य करतांना (सप्टेंबर २००९) नमूद केले की, RKS च्या क्षमता वाढविण्याकरीता उपाय केले गेले होते.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला.

शासन निर्णय क्र. राग्राआअ -२००८/सीआर-९०/पीएच-७अ दिनांक १ जुलै, २००८ नुसार रुग्ण कल्याण समितीची पहिली नियामक सभा जूनमध्ये व दुसरी सभा जानेवारीमध्ये घेण्याच्या सूचना आहेत. नियामक सभामध्ये वार्षिक निधीचे नियोजन करुन त्याबाबत धोरणात्मक निर्णय घेतले जातात. सन २०११-१२ या वर्षात आरोग्य संस्थामध्ये ३८९० नियामक सभा झाल्या आहेत.

उपरोक्त शासन निर्णयानुसार आरकेएस सभा घेण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार प्रत्येक आरकेएस सभा ही आरोग्य संस्थेमध्येच घेतली जावी. सभा सुरु होण्यापूर्वी समिती सदस्याने रुग्णालयास भेट देणे अपेक्षित आहे. रुग्णालयीन रचनेचा अभ्यास करणे, रुग्णांना भेट देणे, रुग्णांना देण्यात येणाऱ्या सेवा साहित्याचा वापर चांगल्या प्रकारचा

आहे हे तपासावे. इ. या पध्दतीने सभेला सुरुवात करताना संस्थंची माहिती होते व आवश्यकतेनुसार रुग्णांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी निर्णय घेण्यास मदत होते. प्रत्येक आरोग्य संस्थेमध्ये सूचना पेटी ठेवण्यात येत असून सभा सुरु होण्यापूर्वी त्यातील सूचना वाचून रुग्णांचाही सहभाग होत असतो व रुग्णालयाच्या गरजा प्राधान्याप्रमाणे सोडविण्यास मदत होते. या प्रक्रियेमुळे आरकेएस निधी नियोजनानुसार खर्च करण्यात मदत होते. परंतु ऑडिट मुद्यानुसार या सर्व बाबी सभेच्या इतिवृत्तात नमूद नसतात. रुग्णालयांच्या गरजांना प्राधान्य देवून निधी खर्चाचे नियोजन करता येते. तरी संस्थांना सभेसाठी उपस्थित असल्यापासून सर्व बाबी इतिवृत्तामध्ये नमूद करण्याच्या सूचना देण्यात येतील.

रुग्ण कल्याण समितीच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा होण्यासाठी राज्य आरोग्य सोसायटी खालील पध्दतीचा अवलंब केला आहे.

१. रुग्ण कल्याण समितीस मार्गदर्शक तत्वे पाठविण्यात आली आहे.

२. अशासकीय सदस्यासाठी प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षणाचे मॉडेल तयार केले आहे. तसेच प्रशिक्षणाचा कार्यक्रम आखण्यात आला आहे. सदस्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

३. वित्तीय व प्रशासकीय अधिकार रुग्ण कल्याण समितीना देण्यात आली आहे.

४. रुग्ण कल्याण समितीचे एकत्रित मार्गदर्शक पुस्तिका प्रत्येक जिल्ह्यांना देण्यात आली आहे. त्यामुळे रुग्ण कल्याण समितीच्या कार्यवाहीमध्ये सुधारणा होईल.

RKS करीता निधीची उपलब्धता

NRHM च्या मार्गदर्शक तत्वानुसार, RKS च्या कार्यासाठी SHS नी वेळेवर निधी वितरीत केला पाहिजे. मार्गदर्शक तत्वानुसार २००७-०८ पासून निकाय निधीत वेगवेगळ्या दरांनी प्रस्तावित वाटा RKS च्या DH, CHC व PHC स्तरावर राज्याने (२० टक्के) अंतर्गत साधन संपत्ती म्हणजे उपरोक्त विषयास अनुसरुन उपयोगकर्ता प्रभार आणि देणग्या (२० टक्के) आणि केंद्र (६० टक्के) यांनी द्यावयाचा होता. तसेच राज्य आरोग्य समितीने (डिसेंबर २००७) RKS ला आकारणी, वसुली आणि उपभोक्ता प्रभार बॅंक खात्यात जमा करणे या करीता शक्ती प्रदान केली. तथापि, असे दिसून आले की, चाचणी तपासणी केलेल्या घटकांमध्ये RKS ने असे उपभोक्ता प्रभार वसुल केले नव्हते आणि त्यांची संपूर्ण वित्तव्यवस्था केंद्र शासनाच्या अनुदानाने

झाली. यामुळे RKS द्वारा आरोग्य केंद्राची दीर्घ मुदतीची सामुहिक मालकीचा ध्येयाची जीवनक्षमता बाधित झाली.

शासनाने वस्तुस्थितीचा स्वीकार करतांना नमूद केले (सप्टेंबर २००९) की, RKS च्या खात्यात उपभोक्ता प्रभार जमा करण्याचे प्रयत्न केले जात होते.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला.

राज्य शासनाच्या User Fees आरकेएस खात्यात जमा करणे संदर्भात शासन निर्णय तयार करण्यात येत आहे. याबाबतचा मागोवा शासनस्तरावर घेण्यात येत नाही.

RKS च्या निधीतून अग्राह्य खर्च

चाचणी तपासणी केलेल्या ७९ पैकी २८ RKS मध्ये असे निदर्शनास आले की, वितरीत केलेल्या एकूण रु. २९ लाख अनुदानापैकी रु. १८.३१ लाख खर्च रुग्ण कल्याण समितीच्या निधीतून कार्यालयीन वापरासाठी संगणक खरेदी, खुर्च्या, मजुरीचे प्रदान करणे, इत्यादिंवर केला गेला जो NRHM च्या अंतर्गत ग्राह्य नव्हता.

शासनाने नमूद केले (सप्टेंबर २००९) की, CHCs आणि जिल्हा रुग्णालये ही ISO च्या प्रमाणकाकरीता तयार करावयाची होती म्हणून तो खर्च केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे केला. हे उत्तर मान्य करण्यासारखे नव्हते कारण तो खर्च RKS नी २००७-०८ मध्ये PHCs मध्ये केला होता जो अग्राह्य होता.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला.

अभियानाच्या सुरुवातीला आरोग्य संस्थेमध्ये प्राथमिक सोईसुविधा उपलब्ध करणे गरजेचे होते. त्यामुळे भौतिक व आर्थिक अहवाल ठेवणे व औषधांची यादी तयार करणे अथवा त्यांची मुदत संपणे हे पाहण्यासाठी संगणक आवश्यक होते. त्यामुळे सदर निधीमधून रुग्णांच्या आजाराचे रेकॉर्ड ठेवण्यासाठी संगणक खरेदी करण्यात आले होते. संस्थामध्ये रुग्णांसाठी सदर निधीमधून रुग्णांच्या आजाराचे रेकॉर्ड ठेवण्यासाठी संगणक खरेदी करण्यात आले होते. संस्थांमध्ये रुग्णांसाठी, नातेवाईकांसाठी व डॉक्टरांसाठी बसण्याची व्यवस्था करणे आवश्यक असल्याने सदर निधीमधून खुर्च्या खरेदी करण्यात आल्या आहेत. वाहक हे रोजंदारीने नेमण्यात आले आहे त्यांच्यामुळे वाहक सेवा तातडीने देणे शक्य होते तसेच गावामध्ये रुग्णांना

आवश्यक मदत करणे शक्य आहे. या कारणामुळेच रुग्ण कल्याण समितीच्या निधीमधून संगणक, खुर्च्या व मंजूरी देण्यात आली आहे.

वित्तीय व्यवस्थापन :

अभियानाच्या कार्याकरीता निधीची प्राप्ती व विनियोग

केंद्र शासनाने, २००५-०६ आणि २००६-०७ (१० व्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी) या वर्षाकरीता १०० टक्के अनुदान दिले. केंद्र शासनाशी जानेवारी २००६ मध्ये निष्पादित केलेल्या सलोखा ज्ञापनाच्या अटीनुसार २००७-०८ पासून राज्य शासनाने NRHM करीता १५ टक्के अंशदान द्यावे लागते. SHS ने दिलेल्या माहितीनुसार २००५-०९ या कालावधीत प्राप्त रक्कम, केलेला एकूण खर्च आणि अखेरीची शिल्लक तक्ता २ मध्ये दाखविल्याप्रमाणे

तक्ता २: निधीची प्राप्ती व खर्च **(रुपये कोटीमध्ये)**

वर्ष	वाटप	प्रारंभिक शिल्लक	केंद्र शासनाकडून मिळालेले अनुदान	इतर प्राप्ती/व्याज इत्यादी	एकूण प्राप्ती	केलेला खर्च	खर्च न केलेली शिल्लक	एकूण प्राप्तीशी खर्च न केलेल्या शिल्लकेची टक्केवारी
२००५-०६	२३४.४४	९.५७	१२१.८२	०.५९	१३१.९८	५१.८७	८०.११	६०.७०
२००६-०७	३५८.१२	८०.११	३१४.७१	०.६८	३९५.५१	१०६.३०	२८९.२१	७३.१२
२००७-०८	४४६.८९	२८९.२१	४३९.५५	०.७३	७२९.४९	३००.१९	४२९.३०	५८.८५
२००८-०९	४५५.७४	४२९.३०	३८६.२२	१२१.६१	९३७.१३	६७१.३२	२६५.८१	२८.३७
एकूण	**१४९५.१९**		**१२६२.३१**	**१२३.६१**	**१३९५.४९**	**११२९.६८**	**२६५.८१**	

(रु. १२०.९० कोटी राज्याचा हिस्सा धरुन)

वरील तक्त्यावरुन असे दिसून येईल की, २००५-०९ या दरम्यान, SHS स्तरावर रु. २६५.८१ कोटीची खर्च न केलेली मोठी शिल्लक होती.

या व्यतिरिक्त केंद्र शासनाची अनुदाने ही राज्याच्या अर्थसंकल्पामार्फत संचालन व प्रशासन, ग्रामिण कुटुंब कल्याण सेवा, नागरी कुटुंब कल्याण सेवा, राज्य प्रशिक्षण संस्थासाठी अनुदान व आरोग्य पदासाठी दिली गेली. राज्य शासनाला २००५-०९ दरम्यान वाटपाच्या रु. ७७६.६२ कोटींच्या ऐवजी रु. ५३८.३४ कोटी प्राप्त झालेत आणि एकूण खर्च रु. ७९५.९१

कोटी केला. राज्य शासनाने या घटकांवरील रु. २५७.५७ कोटीचा जास्तीचा खर्च त्याच्या स्वत:च्या साधनसंपत्तीतून केला. जास्तीचा खर्च मुख्यत्वेकरुन २००६-०७ मध्ये (रु.२१०.२२ कोटी) झाला जेव्हा की, या घटकांकरीता केंद्र शासनाचे अनुदान प्राप्त झाले नव्हते.

NRHM अंतर्गत प्राप्त आणि खर्च झालेल्या निधीच्या घटक निहाय तपशील देण्यात आलेला आहे. २००८-०९ या वर्षात राज्य शासनाने रु. १०५ कोटी या नियत हिश्याच्या जागी रु. १२०.९० कोटींचे अंशदान केले. शासनाने असे नमूद केले (सप्टेंबर २००९) की २००८-०९ मध्ये अंशदान केलेले रु. १२०.९० कोटी, २००७-०८ करीता असलेले रु. १५.९० कोटी धरुन होते.

जानेवारी २००६ मध्ये सही केलेल्या सलोखा ज्ञापनानुसार, राज्य आरोग्य क्षेत्रावरील खर्च राज्य शासनाने दरवर्षी १० टक्क्यांनी वाढवावयाचा होता असे दिसून आले की, राज्य आरोग्य क्षेत्रावरील खर्चातील वाढ २००५-०६ व २००६-०७ या कालावधीत अनुक्रमे ८.४६ टक्के आणि ६.१५ टक्के होती तर २००७-०८ व २००८-०९ या कालावधीत ती अनुक्रमे १५.७५ टक्के आणि १९.५३ टक्के होती. २००८-०९ साठीच्या रकमा ह्या लेखापरिक्षणाशिवाय/तात्पुरत्या होत्या त्यामुळे केंद्र सरकारने दिलेल्या रकमांमध्ये तफावत दिसून येते. रु. ९.५७+ कोटी रु.१२३.६१ कोटी = रु. १,३९५.४९ कोटी

वर्ष	**वाटप**	**अनुदान प्राप्त**	**खर्च**
२००५-०६	१५१.६१	११३.७०	१४४.२३
२००६-०७	१५४.८३	निरंक	२१०.२२
२००७-०८	२२४.२५	२२४.४७	१९०.८९
२००८-०९	२४५.९३	२००.१७	२५०.५७
एकूण	**७७६.६२**	**५३८.३४**	**७९५.९१**

SHS ने असे कळविले की, २००८-०९ च्या शेवटी DHS पातळीवर रु. १६६.२० कोटी अखर्चीत राहिलेत. NRHM च्या मोठ्या घटकांवर असे RCH & II प्रतिक्षमता आणि NRHM अतिरिक्तता वापरामुळे NRHM चे कार्यान्वयन बाधित झाले.

आणखी असे दिसून आले की, राज्य शासनाने २००७-०८ या वर्षात राज्याच्या रु. ११५.९० कोटींच्या हिश्याचे अंशदान केले नाही. २००८-०९ या वर्षात राज्य शासनाने रु. १०५ कोटी या नियत हिश्याच्या जागी रु. १२०.९० कोटींचे अंशदान केले.

शासनाने असे नमूद केले (सप्टेंबर २००९) की, २००८-०९ मध्ये अंशदान केलेले रु. १२०.९० कोटी, २००७-०८ करीता असलेले रु. १५.९० कोटी धरुन होते.

जानेवारी २००६ मध्ये सही केलेल्या सलोखा ज्ञानानुसार राज्य आरोग्य क्षेत्रावरील खर्च राज्य शासनाने दरवर्षी १० टक्क्यांनी वाढवावयाचा होता असे दिसून आले की, राज्य आरोग्य क्षेत्रावरील खर्चातील वाढ २००५-०६ व २००६-०७ या कालावधीत अनुक्रमे ८.४६ टक्के आणि ६.१५ टक्के होती तर २००७-०८ व २००८-०९ या कालावधीत ती अनुक्रमे १५.७५ टक्के आणि १९.५३ टक्के होती.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला.

लेखा परिच्छेदामध्ये देण्यात आलेल्या तक्त्यामध्ये सन २००८-०९ या वर्षासाठी उपलब्ध असणारा निधी रु. ९३७.१३ कोटी उपलब्ध होता हे स्पष्ट दिसते. त्या वर्षामध्ये रु. ६७१.३२ इतका खर्च झालेला आहे. सन २००८-०९ या वर्षामध्ये झालेल्या विनियोजनाचे उपलब्ध अनुदानाशी ७२ टक्के इतके प्रमाण आहे.

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या पहिल्या टप्प्यासाठी (पाच वर्षासाठी) केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीच्या १५ टक्के रक्कम राज्य शासनाकडून प्राप्त होणे आवश्यक आहे. पहिल्या टप्प्यातील राज्य शासनाची प्रलंबित रक्कम मार्च २०१२ पर्यंत रु. १३३.७५ कोटी इतकी होती. परंतु राज्य शासनाने जुलै, २०१२ मध्ये शासन निर्णय क्र. एनआरएचएम /२०१२/सीआर/१५७/डेस्क-७/दि. २७.०७.२०१२ अन्वये प्रलंबित असणारी रक्कम रु. १३३.७५ कोटी राज्य आरोग्य सोसायटीस वितरीत केली आहे. राज्य शासनाकडून पहिल्या टप्प्यासाठी प्राप्त झालेल्या रकमेचे विवरण पत्र प्रलंबित रकमेसह, शासन निर्णयाच्या प्रतीसह संदर्भासाठी सोबत जोडण्यात आले आहे.

सन २००८-०९ या वित्तीय वर्षामधील शेवटच्या तिमाहीमध्ये केंद्र शासनाकडून व राज्यशासनाकडून निधी प्राप्त झाल्यामुळे सन २००८-०९ या वित्तीय वर्षाच्या शेवटी मोठ्या प्रमाणात अखर्चित रक्कम शिल्लक दिसून येते.

महाराष्ट्र शासनाने रु. ११८.९१ कोटी, रु. १.९८ कोटी अनुक्रमे फेब्रुवारी, २००९ व मार्च २००९ मध्ये वितरित केले आहेत. तसेच केंद्र शासनाने रु. ८२.९५ कोटी व रु.६८.५१ कोटी मार्च २००९ मध्ये वितरित केले आहे.

खालील विवरण पत्रामध्ये केंद्र शासन व राज्य शासनाकडून शेवटच्या तिमाहीमध्ये राज्य आरोग्य सोसायटीस प्राप्त झालेल्या निधीचा तपशील खालील प्रमाणे आहे.

(रुपये कोटीत)

अ.क्र.	निधी कोणाकडून प्राप्त झाला	निधी प्राप्त झाल्याचा दिनांक	रक्कम
१	महाराष्ट्र शासन	०६.०२.२००९	११८.९१
		३०.०३.२००९	१.९८
२	केंद्र शासन आरसीएच II	०४.०३.२००९	८२.९५
३	केंद्र शासन	०४.०३.२००९	६८.५१
एकुण			**२७२.३५**

याशिवाय महाराष्ट्रामध्ये दिनांक ०२ मार्च २००९ ते दिनांक ३० एप्रिल २००९ या कालावधीमध्ये केंद्र शासनाच्या निवडणूका असल्याने आचार संहिता जाहिर करण्यात आली होती. त्यामुळे प्रकल्प राबविण्यामध्ये काही बंधने आलेली होती. जरी निधी प्राप्त झाल्यानंतर तो तात्काळ जिल्ह्यांना वितरित केला असला तरी ही ज्या ठिकाणी त्याचा विनियोग करण्यात येणार होता अशा ठिकाणी मार्च महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यामध्ये निधी प्राप्त झाला.

निधीचे हस्तांतरण करण्यातील विलंब

कुठल्याही कार्यक्रमाच्या परिणामकारक कार्यान्वयनासाठी, कार्यान्वयन यंत्रणेला विनाविलंब निधी हस्तांतरीत केला पाहिजे. तथापि, असे दिसून आले की, SHS कडून DHS कडे आणि DHS कडून CHS, PHC आणि उपकेंद्र यांचेकडे निधी हस्तांतरीत करण्यात अनुक्रमे १७ ते २९० दिवस आणि ४८ ते २३५ दिवस विलंब झाला ज्याचा तपशील देण्यात आलेला आहे. SHS ने नमूद केले की, जिल्ह्यांजवळ उपलब्ध असलेली शिल्लक जाणून घेण्यासाठी लागलेल्या वेळामुळे विलंब झाला.

वस्तुस्थिती स्वीकारतांना शासनाने नमूद केले (सप्टेंबर २००९) की, निधी जिल्ह्यांना वितरीत होऊ शकला नाही कारण त्यांचेजवळ पुरेशी खर्च न झालेली शिल्लक उपलब्ध होती.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला.

मुळ परिच्छेद आयपीएचएस, उपकेंद्राचे बळकटिकरण, जिल्हा आरोग्य कृती आराखडा, मिशन प-लेझिपुल, एसएनआयडी या लेख्याशिर्षाखालील सन २००५-०६ ते २००८-

०९ या कालावधीत प्राप्त झालेला निधी राज्य आरोग्य सोसायटी मार्फत जिल्हा आरोग्य सोसायटीस वर्ग करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबतचा आहे.

सन २००५-०६

१. आयपीएचएस १३६ दिवस - आयपीएचएस निधी वितरीत करण्यापूर्वी आवश्यक असणाऱ्या संस्थांची निवड करावी लागते. त्यासाठी सुविधा सर्वेक्षण करण्याची गरज असते. सुविधा सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर संस्थेस निधी वर्ग केला जातो. या पध्दतीमुळे निधी वर्ग करण्यासाठी काही कालावधी लागतो.

२. उपकेंद्राचे बळकटीकरण ११६ दिवस - केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार उपकेंद्राचे बळकटीकरणासाठी निधी वितरित करण्यापूर्वी उपकेंद्राची समिती गठित करणे आवश्यक आहे. उपकेंद्राची समिती गठित केल्याशिवाय तसेच बँकेमध्ये खाते उघडण्यात आल्याशिवाय निधी वितरित करता येत नाही. याबाबी पूर्ण करण्यासाठी काही वेळ लागतो तसेच समिती गठित झाल्यानंतर अध्यक्ष यांच्या स्वाक्षरीने बँकेत खाते उघडावे लागते. बँकेचा खाते क्रमांक प्राप्त झाल्यानंतर निधी त्या खात्यावर वितरित केला जातो. निधी वितरित करण्यासाठी या सर्व कारणामुळे विलंब लागतो.

सन २००६-०७

१. जिल्हा आरोग्य कृती आराखडा (डीएचपी)- २९० दिवस - जिल्हा कृती आराखडा तयार करण्यासाठी निधी प्राप्त होतो जिल्हा कृती आराखडा तयार करण्याचे काम डिसेंबर मध्ये सुरु होणे अभिप्रते असल्याने माहे नोव्हेंबर पर्यंत निधी वर्ग करण्याची गरज नाही. परिणामी काम सुरु होण्यापूर्वी निधी वितरित करण्यात आला आहे.

२. आयपीएचएस १३७ दिवस - आयपीएचएस निधी वितरित करण्यापूर्वी आवश्यक असणाऱ्या संस्थांची निवड करावी लागते. त्यानंतर सुविधा सर्वेक्षण करण्याची गरज असते. सुविधा सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर संस्थेस निधी वर्ग केला जातो. या पध्दतीमुळे निधी वर्ग करण्यासाठी काही कालावधी लागतो.

सन २००७-०८

१. मिशन प-लेझिपुल इ १४९ दिवस व ५५ दिवस- राज्य आरोग्य सोसायटीस जरी एप्रिल मध्ये निधी प्राप्त झाला असला तरी ही जिल्ह्यांना तात्काळ निधी वितरित केला जात नाही. कारण जिल्हा आरोग्य सोसायटीकडे पुरेसा अखर्चित निधी उपलब्ध असतो. जिल्हा आरोग्य

संस्थेकडून लेखापरिक्षणापुर्वीचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर जिल्हा आरोग्य सोसायटीच्या मागणीनुसार निधी वितरित केला जातो.

२. आयपीएचएच - १४० दिवस - आयपीएचएस निधी वितरित करण्यापूर्वी आवश्यक असणाऱ्या संस्थांची निवड करावी लागते. त्यानंतर सुविधा सर्वेक्षण करण्याची गरज असते. सुविधा सर्वेक्षण पूण झाल्यानंतर संस्थेस निधी वर्ग केला जातो. या पध्दतीमुळे निधी वर्ग करण्यासाठी काही कालावधी लागतो.

सन २००८-०९

१. एसएनआयडी - १७१ दिवस - एसएनआयडी वेळपत्रकानुसार पोलिओ लसिकरणाची फेरी सप्टेंबर २००८ पासून सुरु होणार असल्याने तसेच केंद्र शासनाने मार्च २००९ पर्यंत वेळापत्रकामध्ये बदल केलेला असल्याने नविन वेळापत्रकानुसार निधी वितरित केलेला आहे.

क्षमता निर्मिती - नवीन देखरेख सामुग्रीची निर्मिती -

पातळी	एप्रिल २००५ ला अस्तित्वात असलेली संख्या	यथार्थदर्शन योजनेप्रमाणे २००५-१२ या कालावधीमध्ये आवश्यक निर्मितीची संस्था	यथार्थदर्शन योजनेप्रमाणे २००८-०९ पर्यंत आवश्यक निर्मितीची संस्था	२००५-०९ मध्ये देखरेख सामग्री निर्मिती	नविन देखरेख सामग्री निर्मितीतील तुट	वारीत्रुटीची
उपकेंद्र	१०,५३५	२,६२७	१,९७०	१६१	१८०९	९२
प्रा.आ.केंद्र	१,८१८	३९४	१३८	०	१३८	१००
सामुहिक आरोग्य केंद्र (RH)	३८६	९५	३४	०	३४	१०००

NRHM रचनेच्या लक्ष्याप्रमाणे ५,००० लोकसंख्येकरीता एक उपकेंद्र (जनजाती क्षेत्रामध्ये ३,०००), ३०,००० लोकसंख्येकरीता एक प्राथमिक आरोग्य केंद्र (जनजाती क्षेत्र/वाळवंटी क्षेत्रात २०,०००) आणि १,००,००० लोकसंख्येकरीता एक प्राथमिक आरोगय केंद्र लोकसंख्येकरीता एक सामुहिक आरोग्य केंद्र (जनजाती क्षेत्र/वाळवंटी क्षेत्रात ८०,०००) अशी तरतूद आहे. राज्याच्या डिसेंबर २००६ मध्ये मंजूर झालेल्या यथार्थदर्शन, योजनेप्रमाणे अभियानाच्या सात वर्षाच्या कालावधीत (२००५-२०१२) अतिरिक्त २६२७ उपकेंद्र, ३९४ PHCs आणि ९५ CHCs उभारण्याची

गरज होती. चवथ्या वर्षाच्या शेवटी म्हणजे २००८-०९ मध्ये आवश्यकतेच्या तुलनेत नवीन देखरेख सामग्री उभारण्याची परिस्थिती तक्ता ३ मध्ये तपशीलवार दर्शविली आहे.

तक्ता ३: देखरेख सामुग्रीची निर्मिती

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, २००८-०९ पर्यंत एकही नवे PHC आणि CHC उभारले गेले नव्हते. यामुळे, आरोग्य देखरेख सामग्रीचा विकास हा ग्रामीण जनतेच्या गरजांपेक्षा फारच कमी होता. तपासणीत असेही उघडकीस आले की, २००८-०९ मध्ये, SHS ने ३३ DHSs ना CHCs आणि SCs बांधण्यासाठी रु. ९६.७२ कोटी वितरित केले. ३३ DHS पैकी सहांनी जमीन उपलब्ध नसणे, स्थानातील बदल, अभियंत्यांच्या अनुपलब्धता इत्यादीमुळे रु. ६.०२ कोटी वापरले नव्हते. त्यामुळे लाभार्थींना आरोग्य देखरेख सेवा देणे बाधित झाले. असे न करण्यात आले (मे २००९) की, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत, आंगणवाडी किंवा शाळा यांना जागेवर तात्पुरती व्यवस्था करुन आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

लोकसंख्येच्या प्रमाणकाप्रमाणे आवश्यक असलेल्या देखरेख सामग्री न उभारण्याचा परिणाम ग्रामीण क्षेत्रात आरोग्य सुविधांच्या सुगमतेमध्ये सुधारणा करण्याच्या प्राथमिक उद्दिष्टांच्या कमी संपादनुकीत झाला.

शासनाने वस्तुस्थिती स्विकारतांना नमूद केले (सप्टेंबर २००९) की, नागरी बांधकामाच्या पीआयपी आकाराच्या २५ टक्के निर्बंध होता. शिवाय DSR २.५ पटीनी वाढले. हे उत्तर मान्य करण्यासारखे नव्हते कारण नवीन बांधकामावर केलेला खर्च हा २५ टक्क्याहूनही कमी होता आणि किंमतीतील वाढ ही बांधकामातील विलंबामुळे होती.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला.

पायाभूत सुविधा विकास कक्षाची स्थापना सन २००७-०८ च्या अखेरीस झाली. त्या कारणाने सन २००७-०८ व २००८-०९ मध्ये तांत्रिक मनुष्यबळ अभावी व अन्य कारणाने (योजनेची सुरुवात असल्याने) मूलभूत लक्ष्य गाठता आले नाही.

सद्यस्थितीत पायाभूत सुविधा विकास कक्ष हे पूर्ण क्षमतेने कार्यरत असल्यामुळे सन २०११-१२ च्या अखेरीस (म्हणजेच ३१.०३.२०१२ पर्यंत) खालीलप्रमाणे आरोग्य केंद्राचे नविन बांधकाम करण्यात आले आहे.

अ.क्र.	प्रकार	मंजूर कामाची संख्या	पूर्ण झालेली कामे	शेरा
१	CHC	१०	६	PWD
२	PHC	५८	३०	IDW
३	SC	६९५	५५१	IDW

उपरोक्त तक्त्यातील माहिती पाहता आरोग्य केंद्राचे नविन इमारत बांधकामाबाबत भरीव प्रगती सन २००९ ते २०१२ या काळात झालेली आहे.

तसेच निदर्शनास आणून देण्यात येते की, आरोग्य केंद्राच्या नविन इमारती बांधणेकरीता मुख्यत्वे करुन राज्य शासनाच्या अर्थसंकल्पामधून निधी उपलब्ध होतो त्या व्यतिरिक्त DODC (जिल्हा नियोजन व विकास माहिती) TSP (आदिवासी उपाययोजना) इत्यादी योजने अंतर्गत देखील निधी प्राप्त होतो. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य योजना ही एक पुरक योजना आहे. या योजनेमध्ये एकूण मंजूर निधीच्या फक्त २५ टक्के निधी हा बांधकामाकरिता (त्यात दुरुस्ती कामांचासुध्दा समावेश आहे) वापरण्याचे बंधन आहे.

तथापि राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानअंतर्गत प्राप्त निधी नविन आरोग्य केंद्राचे बांधकामासाठी वापरण्याचे अधिकांश प्रयत्न करण्यात येत आहेत.

नवीन बांधकाम मंदगतीने

चाचणी तपासणी केलेल्या आठ जिल्ह्यांमध्ये, २००५-०८ या कालावधीत न बांधकामाकरीता रु. १८ कोटी आणि परीक्षा या दुरुस्ती (MR) या कामांकरीता रु. ७० लाख अनुदान DHS कडून मिळाले होते. तथापि, MR कामावर रु. ७० लाख प्राप्त झाले. रु. ३.४४ कोटींचा खर्च नवीन बांधकामासाठी असलेला निधी वळवून केला गेला. याप्रमाणे मार्च २००८ च्या शेवटी रु. १५.२५ कोटीची अखर्चीत शिल्लक राहिली. उत्तरात असे नमूद करण्यात आले की, परिरक्षा व दुरुस्ती खर्च हा मंडळ संचालक, NRHM, मुंबई यांचा निर्देशानुसार करण्यात आला. २००८-०९ कामाकरीता रु. २.६७ कोटींचे अनुदान प्राप्त झाले होते, ज्यापैकी रु. ११.१९ कोटींचा खर्च निधीचे हस्तांतरण करण्यातील विलंब आणि देखरेख सामग्री विकास शाखा (IDW) स्थापन करण्यातील विलंब (ऑगस्ट २००७) यामुळे झाला व मार्च २००९ च्या शेवटी रु. १०.५५ कोटीची अखर्चीत शिल्लक राहिली.

यांच्या परिणामी लोकसंख्या प्रमाणकाप्रमाणे आवश्यक असलेले नवीन देखरेख सामग्री निर्मिती मंदगतीने वंचित राहिले.

लोक आवश्यक वैद्यकिय सुविधांपासून वंचित राहिले. शासनाने वस्तुस्थिती स्वीकारतांना नमूद केले (सप्टेंबर २००९) की, अस्तित्वातील संस्थांची दुरुस्तीची कामे ही नवीन देखरेख सामग्री निर्मिती करण्याऐवजी या संस्थांच्या इष्टतम उपयोगासाठी घेतली गेली.

ज्ञापन :

उपस्थित केलेल्या मुद्यांमध्ये मुख्यत्वेकरुन कमी खर्च (बजेट मधील एकूण तरतूदी पेक्षा) आणि दुरुस्ती व परिरक्षणाचे बाबींवर (बजेट मधील एकूण तरतूदी पेक्षा) जास्त खर्च केला असल्याचे म्हटले आहे. या आधीच्या परिच्छेदाचे उत्तर दिल्याप्रमाणे नविन इमारती बांधण्यापेक्षा अस्तित्वातील इमारतीमध्ये सुधारणा करुन जास्तीत जास्त चांगला उपयोग करणेकरीता खर्च केला गेला आहे.

मागील चार वर्षात म्हणजे २००८-०९ ते २०११-१२ या दरम्यान पायाभूत सुविधा विकास कक्षाकडे प्राप्त निधी व याबाबतची आकडेवारी खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	वर्ष	मंजूर निधी (रु.कोटी)	प्रत्यक्षात झालेला खर्च (रु.कोटी)
१	२००८-०९	७५.००	७४.३४
२	२००९-१०	७७.२७	७५.५९
३	२०१०-११	९६.४८	७३.७६
४	२०११-१२	७०.९५	६४.४४

उपरोक्त तक्त्यावरुन स्पष्ट होते की वर्षनिहाय मंजूर झालेला निधी त्या त्या वर्षात जवळपास पूर्णपणे खर्च झालेला आहे.

केंद्र शासनाकडून मंजूर नविन बांधकामे व दुरुस्ती/परिरक्षणासाठी स्वतंत्र निधी प्राप्त होतो व तो त्या त्या बाबीवरच खर्च केला जातो.

परिचर्या शाळांचे बळकटीकरण

चाचणी तपासणी केलेल्या तीन जिल्ह्यात परिचर्या शाळांच्या बळकटीकरणासाठी SHS ने २००७-०८ मध्ये रु. १.१५ कोटींची अनुदाने वितरित केली. यापैकी २००७-०८ आणि २००८-०९ मध्ये फक्त रु. ६.६४ लाखाचा खर्च केला गेला आणि तक्ता ४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे रु. १.०८ कोटी शिल्लक राहिले.

तक्ता ४ : परिचर्या शाळाचे बळकटीकरण

जिल्हा	२००७-०८ मध्ये	केलेला खर्च	अखर्चीत	अभिप्राय

	मिळालेले अनुदान	२००७-०८ मध्ये	२००८-०९ मध्ये	शिल्लक	
गोंदिया	४५.००			४५.००	काहीही खर्च केला नाही.
पुणे	२२.५०		२.००	२०.५०	परिचर्या शाळांचा बांधकामासाठी pwd ला रक्कम प्रदान केली.
यवतमाळ	४७.५०	२.९५	१.६९	४२.८६	२००८-०९ मध्ये परिचारिकांना विद्यावेतन प्रदान केले.
एकूण	११५.००	२.९५	३.६९	१०८.३६	

त्याचप्रमाणे, असे दिसून आले की, २००७-०८ मध्ये नाशिक, उस्मानाबाद, अहमदनगर, नागपूर व ठाणे जिल्ह्यात प्रत्येकी एक परिचर्या शाळांच्या देखरेख सामुग्रीच्या बळकटीकरणासाठी प्रत्यक्ष गरज जाणून न घेता रु. १.९९ कोटी वितरीत केल्या गेलेत. त्याचा परिणाम, DHS जवळ रु. ८१.८१ लाखांचा निधी तक्ता ५ मधील तपशीलाप्रमाणे अडकून राहिला.

तक्ता ५ : परिचर्या शाळाकरीता मिळालेल्या निधीचा कमी वापर

जिल्हा	मिळालेली अनुदाने	झालेला खर्च		अखर्चीत शिल्लक
		२००७-०८	२००८-०९	
नाशिक	२५.००	१४.७५	माहिती नाही	१०.२५
उस्मानाबाद	४७.५०	१६.७९	१६.९४	१३.७७
अहमदनगर	४७.५०	...	१९.५६	२७.९४
नागपूर	३१.३७	...	१४.४७	१६.९०
ठाणे	४७.५०	१३.२८	२१.२७	१२.९५
एकूण	**१९८.८७**	**४४.८२**	**७२.२४**	**८१.८१**

DHS ने नमुद केले की, परिचर्या शाळांच्या सुधारणेला जास्त वाव नव्हता. लेखापरिक्षणामध्ये असे आढळून आले की, परिच्छेद २.१.९.८ मध्ये सांगितल्याप्रमाणे परिचारिकांचा (८६४) तुटवडा होता. वस्तुस्थिती स्विकारतांना शासनाने नमूद केले (सप्टेंबर, २००९) की, परिचारिकांच्या अति तुटवडयामुळे जिल्ह्यांना नवीन बांधकाम आणि देखरेख सामग्रीच्या बळकटीकरणासाठी अनुदाने दिली गेली. तथापि, प्रत्यक्ष आवश्यकता जाणून न घेता अनुदाने वितरीत केली गेली ही वस्तुस्थिती आहेच.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला.

परिचारिकांची सेवा मजबूत करणे ही राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाचा महत्वाचा उपक्रम आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाची आरोग्य सेवा बळकट करण्याच्या दृष्टीने ग्रामीण रुग्णालयामध्ये उपलब्ध असलेल्या बेडच्या संख्येनुसार अतिरिक्त परिचारिका नेमण्यात आले आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र २७X७ मध्ये २ परिचारीका व उपकेंद्रामध्ये प्रत्येकी अतिरिक्त १ परीचारीका नेमण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

राज्यामध्ये परिचारीकांची इतक्या मोठ्या प्रमाणात आवश्यकता असल्याने परिचारीकांच्या महाविद्यालयामध्ये मान्य असलेल्या संख्येपेक्षा एक विशेष बाब म्हणून महाविद्यालयामधील परिचारीकांची संख्या दुप्पट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच जिल्हास्तरावर ज्या ठिकाणी परिचारीकांचे महाविद्यालय सुरु करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या निर्णयानुसार सार्वजनिक आरोग्य विभागाने गोंदिया व पुणे या जिल्ह्यामध्ये परिचारीका महाविद्यालय सुरु केले आहे.

परिचारीका महाविद्यालयास महाराष्ट्र परिचारक मंडळास फी भरावी लागते. तसेच या महाविद्यालयासाठी इमारत आवश्यक ते साहित्य महाराष्ट्र परिचारीका मंडळाच्या मार्गदर्शक तत्वानुसार आवश्यक असणारा कर्मचारी वर्ग यासाठी लागणारी तरतूद राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान या निधीमधून करण्यात आली आहे.

जिल्ह्याच्या मंजूर आराखड्यामधून शिल्लक असणारी रक्कम परिचारीकांच्या महाविद्यालयाचे बळकटीकरण करण्यासाठी वापरण्यात आली आहे. तसेच जिल्ह्याचा मंजूर आराखड्यामधून अखर्चीत असणारी रक्कम या महत्वाच्या कामासाठी वापरण्यात आली आहे.

उपलब्ध असणाऱ्या निधीमधून संगणक, पुरक कर्मचाऱ्यांना मंजूरी तसेच परिचारीका महाविद्यालयामधील विविध कार्यक्रमांचे बळकटीकरण करण्यासाठी खर्च करण्यात आला आहे. जिल्ह्यांचा मासिक आराखड्यामध्ये केंद्र शासनाची मान्यता घेवून परिचारीका महाविद्यालयातील विविध बाबींवर खर्च करण्यात आला आहे.

भारतीय सार्वजनिक आरोग्य मानक (IPH) अनुसार आरोग्य केंद्राची श्रेणी वाढ :-

अभियानाचे वर्ष २०१० पर्यंत जिल्हा रुग्णालये (DHS), CHCs, PHCs व उपकेंद्रे यांच्या पातळीवर हमखास सेवा उपलब्ध करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. या संदर्भात भारतीय सार्वजनिक आरोग्य मानक यांची संकल्पना मंत्रालयाने आरोग्य केंद्राच्या प्रत्येक स्तराप्रमाणे

सुविधांच्या उपलब्धतेची निश्चिती करण्यासाठी आणली आहे. NRHM अंतर्गत आरोग्य केंद्राची (HCs) श्रेणी वाढ IPHS नुसार करावयाची होती.

SHS च्या अभिलेखांच्या छाननीत असे उघडकीस आले की, २००८-०९ पर्यंत PHCs व उपकेंद्र यांच्या बाबतीत फारच कमी लक्ष्ये निश्चित केली होती. तथापि, रु. ९५.५२ कोटी केल्यानंतरसुध्दा तक्ता ६ मध्ये दाखविल्याप्रमाणे संपादनुकीत तुट होती.

तक्ता ६ : आरोग्य केंद्राची श्रेणी वाढ

HCs चे नाव	अस्तित्वातील HCs ची संख्या	आरोग्य केंद्राची श्रेणी वाढ		२००८-०९ पर्यंत वितरीत केलेली अनुदाने	कळविलेला खर्च	IPHS श्रेणी
		३१ मार्च, २००९ पर्यंत दिलेले लक्ष्य	२००८-०९ पर्यंत IPHS करीता निवडलेली HCs			
जिल्हा रुग्णालये	२३	१०	२३	२३.००	९५.५२	२३
CHCS (SDH/RH/WH/CH)	४६४	२०९	२३०	६८.८५		९८
PHCs	१८१६	८१७	४५०	२२.५०		१०४
उपकेंद्रे	१०५७६	४७४१	६५०	६.५०		३३
एकूण	**१२८७९**	**५७७७**	**१३५३**	**१२०.८५**	**९५.५२**	**२५८**

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, CHCs ची संपादणूक ही लक्ष्याच्या अर्ध्यापेक्षा कमी होती, जेव्हा की PHCs आणि उपकेंद्रे यांची श्रेणी वाढ फक्त अनुक्रमे २३ टक्के आणि ५ टक्के होती. यावरुन असे निदर्शनास येते की, ग्रामीण क्षेत्रातील लोक पर्याप्त आरोग्य सुविधापासून वंचित राहिले.

जरी केंद्र शासनाला सादर केलेल्या अहवालात २५८ आरोग्य केंद्राची श्रेणीवाढ ही IPHS मानकानुसार केल्याचे दर्शविले असले तरी SHS ने लेखापरिक्षेच्या एका विचारणेला सांगितले की, एक सुध्दा रुग्णालय IPHS साध्य करु शकले नाही कारण बऱ्याच रुग्णालयात/केंद्रात विशेषज्ञांचा तुटवडा होता.

DHS आणि CHCs यांच्या तुलनेत PHCs आणि SCs यांची श्रेणीवाढ अत्यल्प होती. या प्रकारे प्रथम स्तरावरील आरोग्य केंद्रावर लक्ष केंद्रीत करण्यात आले नव्हते.

वस्तुस्थिती स्विकारताना शासनाने नमूद केले (सप्टेंबर, २००९) की परिचारीक आणि डॉक्टर्स यांच्या अती तुटवड्यामुळे वास्तववादी लक्ष्ये निश्चित केल्या गेली होती.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला.

सन २००८-०९ पर्यंत प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी तसेच उपकेंद्रासाठी कमी प्रमाणात उद्दिष्टे ठरविण्यात आली होती. रु. ९५.५२ कोटी खर्च करण्यात आल्यानंतर सुध्दा उद्दिष्टांचे प्रमाण गाठता आले नाही. हे खालील तक्त्यावरुन दिसून येते.

तक्ता ६ : आरोग्य केंद्राची श्रेणी वाढ

HCs चे नाव	अस्तित्वातील HCs ची संख्या	आरोग्य केंद्राची श्रेणी वाढ		२००८-०९ पर्यंत वितरीत केलेली अनुदाने	कळविलेला खर्च	IPHS श्रेणी
		३१ मार्च, २००९ पर्यंत दिलेले लक्ष्य	२००८-०९ पर्यंत IPHS करीता निवडलेली HCs			
जिल्हा रुग्णालये	२३	१०	२३	२३.००	९५.५२	२३
CHCS (SDH/RH/WH/CH)	४६४	२०९	२३०	६८.८५		९८
PHCs	१८१६	८१७	४५०	२२.५०		१०४
उपकेंद्रे	१०५७६	४७४१	६५०	६.५०		३३
एकूण	१२८७९	५७७७	१३५३	१२०.८५	९५.५२	२५८

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, जिल्हा रुग्णालयांनी दिलेली उद्दिष्टे साध्य केले आहे. परंतु सीएचसीना दिलेली उद्दिष्टे पूर्ण झाली नाहीत त्यांनी ५० टक्के उद्दिष्टे गाठली आहेत. आयपीएचएस अंतर्गत २५८ आरोग्य संस्थांचा दर्जा वाढ करण्यात आला आहे. राज्य आरोग्य सोसायटीने आयपीएचएस अंतर्गत रुग्णालयाचे रुपांतर मोठ्या प्रमाणात विशेष तज्ञांची रिक्त जागा असल्याने आयपीएचएस अंतर्गत संस्थांची निवड करण्यात आली नाही.

आयपीएचएसमध्ये निवड करण्यापूर्वी आरोग्य संस्थांमध्ये निश्चित ठरवून दिलेल्या परिचारीका, विशेष तज्ञ औषधी, वैद्यकीय उपकरणे व साहित्य व त्यासाठी मानांकनानुसार

आवश्यक असणारी जागा उपलब्ध असणे आवश्यक आहे. परिचारीकांची उपलब्धता नसणे व विशेष तज्ञांची उपलब्धता नसल्याने निश्चित उद्दिष्ट गाठता येत नाही. त्यामुळेच केंद्र शासनाने निश्चित केलेल्या उद्दिष्टापेक्षा कमी उद्दिष्ट निश्चित केले आहे.

जिल्हास्तरावरील जिल्हा रुग्णालय यांना आवश्यक असणारी साधनसामुग्री निश्चित कालावधीत उपलब्ध करुन देण्यात आली. त्यामुळे जिल्हास्तरावर उद्दिष्ट गाठता आले. प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे येथे पडताळणी करण्यामध्ये विलंब लागलेला असल्याने तसेच त्यांच्या मध्ये निश्चित असलेल्या उणिवा, साहित्य साधनसामुग्री, औषधे व आवश्यक असणारे मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यास विलंब झाला आहे. त्यामुळे उद्दिष्टांची पूर्तता होवू शकली नव्हती.

रुग्णालयांची निवड झाल्यानंतर उपलब्ध असणाऱ्या सुविधांची, मनुष्यबळाची, औषधांची, साधनसामुग्रीची, वैद्यकीय उपकरणे व इमारतीबाबत पडताळणी करणे आवश्यक असते. यामधून निश्चित स्वरुपात निदर्शनास आलेल्या बाबींची पूर्तता व त्याचा आराखडा आयपीएचएस फंडामधून करण्यात येतो. आराखडा मंजूर झाल्यानंतर असणाऱ्या उणिवा पूर्ण करण्यासाठी कार्यवाही केली जाते. आयपीएचएस मध्ये रुग्णालयाची निवड झाल्यानंतर सर्वेक्षण सुविधा, परिचारीकांची व वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्याची कार्यवाही सुरु होते.

या शिवाय प्राथमिक आरोग्य केंद्रांना परिचारीका व वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होवू शकत नाही तरीही उपलब्ध असलेल्या रुग्णालयांचा वापर करुन महाराष्ट्रामध्ये बाह्यरुग्ण विभाग, आंतररुग्ण विभाग, नैसर्गिक प्रसृती, शस्त्रक्रिया प्रसृती व मोठ्या शस्त्रक्रिया केल्या जातात.

तरीही २५८ रुग्णालये आयपीएचएसमध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत. भारतीय आरोग्य मानांकनानुसार आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, जिल्हा रुग्णालये येथे इमारती मनुष्यबळ, साधनसामुग्री, औषधे, वैशिष्टपूर्ण आरोग्य सुविधा खालील आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

आयपीएचएस मानांकनानुसार असणाऱ्या आरोग्य संस्थांची सद्यस्थिती

अ.क्र.	आरोग्य संस्थांचा प्रकार	राज्यातील एकूण संस्था	आयपीएच अंतर्गत निवडण्यात आलेल्या	एफआयआरयु २४X७ बळकटीकरण झालेल्या	बळकटीकरणाची टक्केवारी	सन १२-१३ मध्ये निवडण्यात आलेली

			आरोग्य संस्था	आरोग्य संस्था (मार्चपर्यंत)		संस्था
१	उपकेंद्रे	१०५७९	२९९७	-	-	१५२१
२	प्रा.आ.के.	१८१६	१०६७	६८७	६४.३८	६५८
३	ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालय	५४४	१९४	१२८	६५.९७	१८७
४	जिल्हा रुग्णालय/ग्रामीण रुग्णालय	२३	२३	२३	१००	२३
५	स्त्री रुग्णालय/सार्वजनिक आरोग्य	१२	१२	१०	८३.३३	१३
एकूण		**१२८८५**	**४२९३**	**८४८**		**२३९९**

आरोग्य संस्थांमध्ये गुणवत्ता पूर्ण सेवा देण्याकरीता भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकानुसार उपकेंद्र, प्रा.आ.कें, ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालये, जिल्हा रुग्णालये, स्त्री/सामान्य रुग्णालयांच्या खाटांच्या संख्येनुसार मनुष्यबळ, औषध, साहित्य व यंत्रसामुग्री सेवा इत्यादीकरीता उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

आरोग्य केंद्रामध्ये अपर्याप्त देखरेख सामुग्री

तपासणीत असे दिसून आले की, तपशिलाप्रमाणे चाचणी व तपासणी केलेल्या अनेक आरोग्य केंद्रामध्ये शस्त्रक्रियागार, वातानुकूलित यंत्र, विद्युतजनित्र, प्रसूतीकक्ष, दूरध्वनी, इत्याइी मूलभूत सुविधा उपलब्ध नव्हत्या. चाचणी तपासणी केलेल्या एकूण २४ CHCs, ४८ PHCs व ९६ SCs पैकी, तीन CHCs, सहा PHCs व २९ SCs त्यांच्या स्वतःच्या इमारतीत स्थापन केली नव्हती. ३२ उपकेंद्रामध्ये सहाय्यकारी परिचर्या प्रसाविका (ANMs) यांना निवासी सुविधा नव्हत्या.

यावरुन असे दिसून येते की, ग्रामीण क्षेत्रातील लोक पर्याप्त आरोग्य सुविधा पासून वंचित राहिलेत.

शासनाने वस्तुस्थिती मान्य करताना नमूद केले (सप्टेंबर, २००९) की PIPs च्या आकाराच्या २५ टक्कयापर्यंत नागरी बांधकामांना निर्बंध होता त्यामुळे कमी इमारतींची तरतूद NRHM अंतर्गत करता येऊ शकली.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला.

राज्याच्या आराखड्यानुसार २६२४ अतिरिक्त आरोग्य उपकेंद्राची आवश्यकता आहे. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यामध्ये सन २००५-१२ या कालावधीमध्ये ३९४ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ९५ सीएचसी सुरु करण्याचे धोरण निश्चित केले होते. ४ थ्या वर्षानंतर सन २००८-०९ मध्ये खालीलप्रमाणे वैद्यकीय संस्थांची सद्यस्थिती होती.

पातळी	सन २००५-१२ या कालावधीत आराखडया नुसार आवश्यक असणा-या संस्था	२००८-०९ पर्यंतचे संस्था निर्माण करावयाचे उद्दिष्ट	२००८-०९ पर्यंत उपलब्ध करून दिलेल्या सुविधा	तुट	तुटीचे टक्केवारी
उपकेंद्रे	२६२७	१९७०	१६१	१८०९	९५
प्रा.आ.के.	३९४	१३८	०	१३८	१००
सीएचसी (आरएचएसडीएच)	९५	३४	०	३४	१००

सन २००८-०९ पर्यंत नविन प्राथमिक आरोग्य केंद्र व कमयुनिटी आरोग्य केंद्रे यांचे बांधकाम करण्यात आले नव्हते.

आराखडयानुसार नविन आरोग्य संस्थांचे बांधकाम घेण्यात आलेले नव्हते. बांधकाम सुरु न करण्याची कारणे खालील प्रमाणे आहेत.

१) केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्याचा समावेश Non-EAG या मध्ये केलेला आहे. त्यामुळे बांधकामावरील खर्चास २५ टक्के पर्यंतच मंजुर पीआयपीनुसार मान्यता आहे.

२) बांधकामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या डीएसआर नुसार बनविण्यात आले आहे. परंतु बांधकामाचे निश्चितीकरण केल्यापासुन प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात करण्याच्या कालावधीमध्ये डीएसआरचे दर दुप्पट ते अडीचपट झाले आहेत. उदा. उपकेंद्राचे बांधकामाचे अंदाज रू.५.५ लक्ष असताना प्रत्यक्ष बांधकामाचे वेळी त्यांचे दर १२ लक्ष झालेले आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकामाचा खर्च रू.४०.०० लाखावरून ८०-१०० लाखापर्यंत गेलेला आहे. ग्रामीण रूग्णालयाचा खर्च १०० लाखावरून ३०० लाखापर्यंत गेलेला आहे.

३) जिल्हानिहाय नियोजनाच्या वेळी असे दिसून आले की ब-याच आरोग्य संस्था पुर्णपणे कार्यन्वित झालेल्या आहेत कमीत कमी जास्तीत जास्त संस्थांचा त्याच इमारतीमध्ये व्यवस्थितरित्या तात्काळ कार्यान्वित झालेल्या आहेत दुरूस्तीस प्राधान्य दिल्यामुळे नविन बांधकामास विलंब झालेला आहे.

४) आरोग्य संस्थांना जागा उपलब्ध होण्याचा मुद्दा बऱ्याच ठिकाणी वादातीत झालेला असून त्यामुळे बांधकामे सुरू होत नाही. तसेच आवश्यकतेनुसार जागा उपलब्ध न झाल्यामुळे नविन कामे घेता आले नाही. मार्च २००९ पर्यंत राष्ट्रीय ग्रामिण आरोग्य अभियानांतर्गत नविन घेण्यात आलेली कामे व दुरुस्तीची घेण्यात आलेली कामे याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

संस्था	नविन बांधकामे		दुरूस्तीची कामे	
	पूर्ण कामे	अपूर्ण कामे	पूर्ण कामे	अपूर्ण कामे
उपकेंद्रे	१६१	२१०	७६५	५७१
प्रा.आ.के.	०	७८	८८८	४४६
सीएचसी (आरएच/एसडीएच)	०	४	१४८	५६

आरोग्य केंद्रामध्ये सुविधांचा अभाव

शस्त्रक्रियागर (OT)

IPHS च्या प्रमाणकांप्रमाणे, शस्त्रक्रियागार पूर्णपणे उपयोगात आणण्याकरिता १४ मोठया साधनसामग्रीची गरज असते. चाचणी तपासणी केलेल्या २४ CHCs पैकी चार CHCs मध्ये OTs नव्हते तर तीन CHCs मध्ये OTs एकतर कार्यरत नव्हती किंवा मनुष्यबळ, विद्युतजनित्र आणि वातानुकूलित यंत्राच्या अनुपलब्धतेमुळे कार्यरत नव्हती. उर्वरित १७ CHCs जरी काम करीत होती तरी OTs मध्ये आधार देण्यारी साधनसामग्री नव्हती.

रोगनिदान सेवा

PHCs आणि CHCs मध्ये अत्यावश्यक प्रयोगशाळा सेवांची तरतूद अभियान करते. PHC तील सेवेमध्ये, नित्याच्या मूत्र, मल व रक्त तपासण्या, रक्तगट, साकळण्याची वेळ, RTI/STD यांचे रोगनिदान क्षयरोगासाठी थुंकीची तपासणी/हिवतापासाठी रक्तपरीक्षा, गरोदरपणा/ मलेरीया करीता शीघ्र तपासण्या आणि Syphils/YAWS करीता RPR चाचणी यांच्यासाठी प्रयोगशाळा असावयास पाहीजेत. चाचणी तपासणीत असे उघडकीस आले की, ४८ PHCs पैकी २० मध्ये प्रयोगशाळा सेवांची सुविधा नव्हती.

CHCs मध्ये, वर नमूद केलेल्या प्रयोगशाळा सुविधा बरोबरच क्षयरोगाकरीता सूक्ष्मदर्शकीय सुविधा, मलेरीया, डेंगु व Japanes encephalitis सारख्या गुंतागुंतीच्या रूग्ण प्रकरणांकरीता रोगनिदान सुविधा, कुष्ठरोगाकरीता रोगनिदान सुविधा, इत्यादींची तरतूद

करावयाची होती. चाचणी तपासणी केलेल्या २४ CHCs पैकी १८ मध्ये सर्व रोगनिदान सेवा अस्तित्वात होत्या आणि तीन मध्ये आंशिक सुविधा असल्याने CHCs ची परिस्थिती तुलनेने चांगली होती. २२ PHCs मध्ये प्रयोगशाळा तंत्रज्ञ नव्हते. PHCs मध्ये न्यूनतम रोगनिदान सेवांच्या अभावी, ग्रामीण जनतेला या सुविधांपासून वंचित रहावे लागले.

Radiological/X-Ray सेवा

CHCs मध्ये X-Ray सेवा प्रदान करण्याची तरतूद अभियानात आहे. चाचणी तपासणी केलेल्या २४ CHCs पैकी १९ CHCs मध्ये X-Ray सेवा सुविधा उपलब्ध होत्या. या १९ CHCs पैकी फक्त पांच केंद्रात Radiographer उपलब्ध होता. तंत्रज्ञांच्या अभावामुळे X-Ray सुविधा CHCs मध्ये वापरली जाऊ शकली नाही.

रक्तसाठा सुविधा

CHCs मध्ये रक्तसाठा सुविधा असण्याची NRHM मध्ये तरतूद केलेली आहे. तथापि, चाचणी तपासणीत असे उघडकीस आले की, २४ CHCs पैकी फक्त पांच CHCs मध्ये रक्तसाठा सुविधा उपलब्ध होत्या. १९ CHCs मध्ये रक्तसाठा विभाग न ठेवल्याने गरजू ग्रामीण रूग्ण या सेवेपासून वंचित राहिले.

आकस्मिक सेवा

NRHM प्रमाणकाप्रमाणे, २४ तास आकस्मिक सेवा देणा-या PHCs मध्ये तीन परिचारिका असल्याच पाहिजे. चाचणी तपासणी केलेल्या एकाही PHCs मध्ये परिचारिकांची पूर्ण संख्या नव्हती. आकस्मिक सेवा देणा-या ४८ PHCs पैकी १३ PHCs मध्ये २ परिचारिका होत्या तर १५ PHCs मध्ये फक्त एकच परिचारिका होती आणि २० PHCs मध्ये परिचारिका नव्हत्या. CHCs आणि PHCs मधिल विहीत रोगनिदान, Radiological, रक्तसाठा सुविधा, इत्यादिंच्या अभावी ग्रामिण क्षेत्रात परवडेल अशा किंमतीत विश्वसनीय आरोग्य देखरेख सेवा देण्याचे ध्येय फलद्रूप झाले नाही.

वस्तूस्थिती स्वीकारता शासनाने नमूद केले (सप्टेंबर २००९) की, ही मंद गती अपर्याप्त निधीमुळे आणि NRHM सुरू झाल्यानंतर IPHS चा निधी श्रेणीवाढ पूर्ण करण्यासाठी वापरल्या जात होता. उत्तर मान्य होण्यासारखे नव्हते कारण आरोग्य केंद्राच्या श्रेणी वाढीचा संपादणूकसुध्दा मंद होती.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला. सन २०११-१२ मध्ये आयपीएचएस अंतर्गत ११६ ग्रामीण रूग्णालयांच्या समावेश होता. त्यापैकी १०९ ग्रामीण रूग्णालयांमध्ये शस्त्रक्रिया गृह कार्यान्वित आहे. १०६७ प्रा.आ.केंद्रापैकी ९५० प्रा.आ.केंद्रामध्ये शस्त्रक्रिया गृह कार्यान्वित आहे. उपलब्ध निधीतुन शस्त्रक्रिया गृहाचे बळकटिकरण करण्यात येते.

उपलब्ध असणारे बांधकाम	**प्राआके**	**सीएचसी**
प्रसुतीगृह	९५६	११०
नवजात काळजी कक्ष	८७५	८३
प्रयोगशाळा	९२३	१०८
दुरध्वनी कक्ष	८९३	११७

सेवा उपलब्ध नसलेल्या सेवा	सीएचसी संख्या (उपलब्ध नाही)
इएमओसी	२१
एनबासी	२
एसएनसीयु	३
कुटुंब नियोजन	९
सुरक्षित गर्भपात सेवा	७
आरटीआय/एसटीआय औषधोपचार	५
बीएसयु	४१
रेफरल सेवा	३
प्रयोगशाळा चिकित्सा	२
२४ तास प्रसुती सेवा	२
एक्स-रे सेवा	१०
ईसीजी सेवा	४

उपकेंद्राचा तपशील	सद्यस्थिती
उपकेंद्राची स्वत:ची इमारत	२७९०
एएनएम निवास स्थान	२७२७

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य विभागाने २४ तास तात्काळ सेवा सुरू केली आहे. जखमी तसेच अपघाती रूग्णासाठी प्राथमिक उपचार तसेच कुत्रा/साप/विंचु दंश झालेल्या रूग्णांना तात्काळ सेवा उपलब्ध करून देण्यासाठी तरतुद करण्यात आली आहे. यासाठी ३ वरिष्ठ परिचारीकांची नेमणूक प्राथमिक आरोग्य स्तरावर करण्यात आली आहे. प्राथमिक तपासणी तसेच तात्काळ वैद्यकीय सेवा ४८ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सुरु करण्यात आली आहे.

प्रस्तावित केलेली तपासणी रेडीओलॉजिकल आणि इतर सेवा ग्रामिण, उपजिल्हा रूग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्र ही प्रथम आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणारी ग्रामिण भागातील केंद्रे

आहेत. ग्रामीण भागातील लोकांना कमी खर्चामध्ये प्रसुतीसारख्यासेवा व शस्त्रक्रिया या आरोग्य सेवामध्ये उपलब्ध करून देण्यात येतात.

प्रसुती खोली/वैद्यकीय चिकित्सा सेवा/एक्स-रे सेवा/रक्तपेढी/अत्यावश्यक सेवा याबाबतची माहिती मुळ परिच्छेद ९.४ मध्ये सादर करण्यात आलेली आहे. वरील सेवा राज्य शासनाच्या आरोग्य विभागाच्या तरतुदीमधून रूग्णालयांना उपलब्ध करून देण्यात येतात. परंतू निधीची कमतरता असल्याने या सर्व सुविधा सर्वच रूग्णालयामध्ये उपलब्ध होत नाहीत.

यासाठीच राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान या निधीमधून राज्य आरोग्य सोसायटीने आयपीएचएस या रूग्णालयाशी संलग्न केलेली आहे आयपीएचएस निधीमधून अशा सेवांचे बळकटिकरण करण्यात येत आहे. परंतु असे बळकटिकरण पुर्ण करण्यासाठी काही कालावधी लागणार आहे.

मनुष्यबळ व्यवस्थापन

वेगवेगळया आरोग्य केंद्रांत पर्याप्त वैद्यकिय आणि इतर संबंधित मनुष्यबळाची तरतूद करण्याचे NHRM अंतर्गत आवश्यक मंजूर मनुष्यबळापेक्षा जास्त कर्मचारी कंत्राटी पध्दतीने लावले पाहिजेत परंतू मंजूर मनुष्यबळाच्या बदली लावावयाचे नाहीत. तथापि, असे दिसून आले की, खाली नमूद केल्याप्रमाणे डॉक्टर आणि परिचारिकांचा अतिशय तुटवडा होता.

३१ मार्च २००९ ला वैद्यकिय आणि निम्न वैद्यकिय कर्मचा-यांच्या (नियमित आणि कंत्राटीपध्दती) मंजूर जागा आणि असलेले कर्मचारी यांची स्थिती तक्ता ७ मध्ये दर्शविली आहे.

तक्ता ७ मनुष्यबळातील तुटवडा नियमित

पदाचे नाव	मंजूर मनुष्यबळ	असलेल्या व्यक्ती	तुट	तुटीची टक्केवारी
श्रेणी I वैद्यकिय अधिकारी (विशेषज्ञ)	५१९	१६५	३५४	६८
वैद्यकिय अधिक्षक एस डी SDH (श्रेणी I)	४३८	१३६	३०२	६९
श्रेणी वैद्यकिय अधिकारी	७२८१	६७०७	५७४	८
परिचारिका	६९३८	६०७४	८६४	१२
महिला आरोग्य अभ्यागत	२२६६	२०३०	२३६	१०
सहाय्यकारी परिचर्या प्रसाविका	१२५४३	१२००४	५३९	४

संविदात्मक

निम्न वैद्यकिय कर्मचा-यांचा प्रकार	२०१२ पर्यंत आवश्यक संख्या	मार्च २००९ पर्यंत आवश्यक संख्या	मार्च२००९ पर्यंत भरलेली संख्या	तुट	तुटीची टक्केवारी
अतिरीक्त ANM प्रत्येक उप आरोग्य केंद्राकरिता	१०५७९	५०७८	४१९१	८८७	१७
प्रत्येक PHC करीता तीन परिचारिका	५४४८	२६१५	६७५	१९४०	७४
प्रत्येक PHC करीता एक LHV	१८१६	१८१६	११५२	६६४	३७
प्रत्येक CHC करिता नऊ परिचारिका	३९४२	१७३४	माहिती अप्राप्त		

२४ नमुना CHCs मध्ये वैद्यकिय कर्मचारी जसे सामान्य शल्यचिकित्सक, औषधतज्ञ आणि इतर विशेषतज्ञ यांच्यातील तुटीची टक्केवारी ७१ आणि ८८ च्या दरम्यान होती. ही तूट निम्न वैद्यकिय कर्मचा-यांच्या बाबतीत जास्त होती जसे सार्वजनिक आरोग्य परिचारिका (PHN) (९६ टक्के), Radiographer (७९ टक्के) आणि Dressers (९२ टकके), चाचणी तपासणी केलेल्या ४८PHCs मध्ये परिचारिकांचा तुटवडा ७२ टक्के होता आणि आरोग्य शिक्षण देणा-यांच्या तुटवडा ८१ टक्के होता. चाचणी तपासणी केलेल्या ९६ SCs पैकी ६६ SCs मध्ये NRHM अंतर्गत आवश्यक असलेल्या दोन ANMs नेमल्या गेल्या नव्हत्या. अशाप्रकारे, वैद्यकिय आणि निम्न वैद्यकिय कर्मचा-यांच्या तुटीमुळे, दर्जेदार आरोग्य देखरेख सेवांची तरतूद करण्याला तीव्रतेने बाधा होईल. वस्तूस्थिती स्वीकारतांना शासनाने नमूद केले

(सप्टेंबर २००९) की, शासकीय क्षेत्रातील डॉक्टस आणि परिचारिकांची मागणी आणि उपलब्धता यातील अवाढव्य फरकामुळे आरोग्य केंद्रांमध्ये फरक होतो.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला.

वैद्यकीय अधिकारी व परिचारिका यांची आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी आवश्यकता असते. शासनाची व खाजगी क्षेत्रातील एकत्रित अशी मागणी विचारात घेतली असता, सद्या अस्तित्वात असलेली वैद्यकीय महाविद्यालयाची मान्य संख्या व परिचारिका महाविद्यालयाची मंजूर संख्या विचारात घेता आवश्यक मनुष्यबळाची कमतरता भासते. अशा पध्दतीने आवश्यक असणारी मागणी व उपलब्ध असणारे वैद्यकीय अधिकारी व परिचारिका यामध्ये मोठी तफावत आहे. प्रत्येक वर्षी जितके वैद्यकीय अधिकारी व परिचारीका उपलब्ध होतात त्यामधील बरेच वैद्यकीय अधिकारी व परिचारीका त्यांना मिळणा-या खाजगी क्षेत्रातील चांगल्या संधीच्या क्षेत्रामध्ये जातात.

विशिष्ट शहरामध्ये त्यांना चांगले वेतन मिळत असल्याने ते त्या संधीचा फायदा घेतात. त्यामुळे यामधून अत्यंत कमी प्रमाणात वैद्यकीय अधिकारी व परिचारीका आरोग्य क्षेत्रासाठी उपलब्ध होतात. ग्रामीण भागातील वैद्यकीय अधिकारी व परिचारीकांची स्थिती अत्यंत गंभीर आहे. सार्वजनिक क्षेत्रामध्ये जे वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होतात त्यांचा ओढा शहरी विभागाकडे असतो ग्रामीण भागातील नेमणूक केल्यास सदरचे वैद्यकीय अधिकारी रूजू होत नाही.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान या वैद्यकीय अधिका-यांना व परिचारीकांना ग्रामीण भागात आकर्षीत करण्यासाठी विविध योजना आयोजित करतात. यामधील काही योजनांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

१) ग्रामीण भागातील करारपध्दतीवरील कर्मचा-यांचे मानधन रू.१००० वाढविण्यात आले आहे. तसेच रु.२००० आदिवासी भागासाठी व रू.२५०० नक्षलग्रस्त भागातील कर्मचा-यांना वाढवून देण्यात आली आहे.

२) अत्यंत ग्रामीण भागामध्ये राहणा-या वैद्यकीय अधिकारी व परिचारीका यांना विशेष मोबदला देण्यात येतो.

३) नेमणूकीचे अधिकारांचे विकेंद्रीकरण तालूका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिक्षक यांचेपर्यंत केले आहे. आठवडयातून एकदा वैद्यकीय अधिकारी व परिचारीका यांचा थेट मुलाखती घेतल्या जातात.

४) महाविद्यालय आवारामध्ये थेट मुलाखती घेतल्या जातात.

याशिवाय खालील बाबींचा अवलंब मनुष्यबळामध्ये वाढ करण्यासाठी करण्यात आला आहे.

१) प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये २ वैद्यकीय अधिका-याची पदे निर्माण केली आहे.

२) उपसंचालक व विभागीय आयुक्त यांना नेमणूकीचे अधिकार देण्यात आले आहे.

३) वैद्यकीय अधिकारी, आयुर्वेदीक यांच्या नेमणूक करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले आहे.

४) उपजिल्हा रूग्णालय व ग्रामीण रूग्णालय यामध्ये २०५४ विशेष तज्ञांची नेमणूक करण्यात आली आहे.

५) प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये तसेच उपजिल्हा रूग्णालयामध्ये व ग्रामीण रूग्णालयामध्ये ४५७६ परिचारीका आणि ७८९ अधिपरिचारिका नेमण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

आयपीएचएस अंतर्गत मनुष्यबळाची सद्यस्थिती

क्र.	**पदाचे नाव**	**आरोग्य संख्या**					
		प्रा.आ.के	**ग्रामीण रूग्णालये**	**उपजिल्हा रूग्णालये**	**स्त्री रुग्णालये**	**सामान्य रूग्णालये**	**जिल्हा रूग्णालये**
१	डीईओ कम अकाउटंट	४७३	२४	१२	२	१	३
२	वैद्यकीय अधिकारी	३	१	१	१	०	०
३	स्टाफ नर्स	५२	३	६	१	०	१
४	एल एच व्ही	१	०	०	०	०	०
५	ए एन एम	०	०	१	०	०	०
	एकुण	**५२९**	**२८**	**२०**	**४**	**१**	**४**

अधिस्वीकृत सामाजिक आरोग्य क्रियाशील (ASHA) या कामावर लावणे

NRHM अंतर्गत, राज्यातील प्रत्येक गावात १००० लोकसंख्येला किंवा कमी संस्थेच्या वेगळया वस्तीकरीता एक या गुणोत्तराप्रमाणे अधिस्वीकृत सामाजिक आरोग्य क्रियाशील (ASHA) म्हणून ओळखल्या जाणारी एक प्रशिक्षित स्त्री सामुहिक आरोग्य कार्यकर्त्यांची तरतूद

केली होती. या ASHA ने समाज आणि सार्वजनिक आरोग्य पध्दती यांच्यातील दुवा म्हणून कार्य करावे अशी अपेक्षा होती.

ASHA ची नियुक्ती व प्रशिक्षण यांची स्थिती तक्ता ८ मध्ये दर्शविली आहे.

	२००८-०९ पर्यंत नियुक्त केलेला ASHAs ची संख्या			**प्रशिक्षणाची तरतुद केलेल्या ASHAs ची संख्या**				
	लक्ष्य	**संपादणूक**	**तुट**	**प्रथम**	**व्दितीय**	**तृतीय**	**चतुर्थ**	**पाचवे**
जनजाती क्षेत्राकरीता	**९०००**	**८६५७**	**३४३**	**८२४२**	**७७५३**	**६९४४**	**१६९४**	**निरंक**
बिगर जनजाती क्षेत्राकरीता (सप्टेंबर २००८ पासून)	५१७४१	१६०४५	३५६९६	नियुक्ती पासून सात दिवसांच्या आत मूलभूत प्रशिक्षणाची सोय करावयाची होती तरीही प्रशिक्षण दिले गेले नव्हते				
एकूण	६०७४१	२४०७२	३६०३९					

वरील माहितीवरून हे उघड होते की, **ASHA** ची निवड आणि प्रशिक्षण यांच्या संपादणूकीत तुट होती ज्यामुळे प्रकल्प कार्यान्वयनाला बाधा होईल.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला. महाराष्ट्रामध्ये सुरुवातीस केंद्र शासनाने निर्देशित केलेल्या सन २००७ या वर्षातील मार्गदर्शक सुचनेनुसार आदिवासी भागामध्ये आशा कार्यक्रमाची प्रथम सुरूवात करण्यात आली. त्यानंतर दि.२३.०९.०८ च्या केंद्र शासनाच्या सुचनेनुसार महाराष्ट्रातील उर्वरित भागामध्ये आशा कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. त्यानुसार आशांची नेमणुक ग्रामसभेने करावयाची असल्याने आशाच्या नेमणुका होण्यास विलंब लागला.

प्रशिक्षणच्या बाबतीत मोडयूल एकचे प्रशिक्षण पूर्ण झाल्याशिवाय मोडयूल दोनचे प्रशिक्षण सुरू करता येत नव्हते.

मोडयूल एकचे निवासी प्रशिक्षण सात दिवसाचे असल्याने प्रकल्पाच्या सुरुवातीच्या कालावधीमध्ये आशांचे पुढील प्रशिक्षणांस विलंब झाला.

केंद्र शासनाने दि.२३.०९.२००८ व राज्य शासनाने दि.०२.०१.२००९ दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार आदिवासी भागाशिवाय इतर भागातील आशाच्या नेमणूका करण्यात आल्या आहेत.

- ३ जुलै २००७ मध्ये आशा योजना १५ आदिवासी जिल्हयातील ७० तालुक्यामध्ये योजना राबविण्यात आली.
- चंद्रपुर, नागपुर, धुळे, नाशिक, नंदुरबार, जळगाव, गोंदिया, यवतमाळ, नांदेड, पुणे येथेही योजना राबविण्यात आली.
- चंद्रपुर, नागपुर, धुळे, नाशिक, नंदुरबार, जळगाव, गोंदिया, यवतमाळ, नांदेड, पुणे, गडचिरोली, अमरावती, अहमदनगर रायगड, ठाणे येथे योजना राबविण्यात आली.
- राज्य आरोग्य सोसायटी मुंबई यांनी दि.१७.११.२००८ रोजी आदिवासी जिल्हयाशिवाय इतर जिल्हयामध्ये आशाची नेमणूक करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहे.
- आदिवासी व बिगर आदिवासी नियुक्त करण्यात आलेल्या आशासाठी प्रशिक्षणाचा घेण्यात आलेल्या कार्यक्रमाचा तपशिल मार्च २०१२ पर्यंत खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	**मार्च २०१२ पर्यंत नियुक्त केलेल्या आशा**			**मार्च २०१२ पर्यंत प्रशिक्षण देण्यात आलेल्या आशांचा तपशील**				
	विभाग	**उद्दिष्ट**	**साध्य**	**भाग १**	**भाग २**	**भाग ३**	**भाग ४**	**भाग ५**
१	आदिवासी भाग	९५२३	९५२३	९५२३	९५०१	९४६९	९७४८	८८३५
२	बिगर आदिवासी	४९८८३	४९७९३	४९४८४	४८४१४	४७२९२	४२५४५	११०८६
	एकूण	५९४०६	५९३१६	५९००७	५७९१५	५६७६१	५१६९३	१९९२१

५ व्या भागाचे प्रशिक्षण २०१२-१३ मध्ये पूर्ण करण्यात येणार आहे. आशांची नेमणूक व त्यांचे प्रशिक्षण याबाबतचा मार्च, २०१२ पर्यंतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

- आदिवासी विभाग :-
- ९५२३ आशांची नेमणूक करण्यात आली आहे.
- १६ जिल्ह्यांमध्ये समुह संघटकांची नेमणूक करण्यात आली आहे.
- ६६ समूह संघटकांची नेमणूक तालुक्यामध्ये करण्यात आली आहे.
- ९२८ गट प्रवर्तकांची नेमणूक करण्यात आली आहे.
- ९५२३ आशा पैकी प्रशिक्षण पूर्ण झालेल्या आशाचा तपशील भाग I ते VII नुसार खालीलप्रमाणे आहेत.

भाग क्रमांक	प्रशिक्षण पूर्ण केलेल्या आशा	टक्केवारी
I	९५२३	१०० टक्के
II	९५०१	९९ टक्के
III	९४६९	९९ टक्के
IV	९७४८	९६ टक्के
V	८८३५	९३ टक्के
VII & VIII (Phase-I)	८३७४	८८ टक्के
VII & VIII (Phase-II)	४३७०	४६ टक्के

बिगर आदिवासी विभाग-

- ४९८८३ आशापैकी ४९७९३ आशांची नियुक्ती केली आहे.
- १६ जिल्ह्यांमध्ये समुह संघटकांची नेमणूक करण्यात आली आहे.
- १४२८ गट प्रवर्तकांची नेमणूक करण्यात आली आहे.
- ४९७९३ आशाना I ते V भाग प्रशिक्षण देण्यात आल्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

भाग क्रमांक	प्रशिक्षण पूर्ण केलेल्या आशा	टक्केवारी
I	४९४८४	९९ टक्के
II	४८४१४	९७ टक्के
III	४७२९२	९५ टक्के
IV	४२५४५	८५ टक्के
V	११०८६	२२ टक्के

वापरण्यात आलेली तरतूद

अ. क्र.	शिर्षक	तरतूद	मार्च २०१२ खर्च	टक्केवारी
१	नेमणूका व प्रशिक्षण	११७२.४८	१३९६.६६	११९ टक्के
२	आशा किट खरेदी	३४१.१६	०.००	० टक्के
३	आशाना प्रोत्साहनपर भत्ता	३८०.६६	८८४.४५	२३२ टक्के
४	आशा व आशाशी संबंधित कर्मचारी	६२.४७	४६.९५	७५ टक्के
५	आशा सपोर्ट व मोनिटरिंग ग्रुप	१८४५.७७	१८२५.८३	९९ टक्के
६	मागील वर्षामध्ये झालेला औषधावरील खर्च	२६१.४८	२६१.४८	१०० टक्के
एकूण		**४०४६.०२**	**४४१५.३७**	**१०९ टक्के**

फिरती वैद्यकीय पथके

ग्रामीण जनतेला घरबसल्या आरोग्य देखरेख उपलब्ध करण्याच्या उद्दिष्टाने केंद्र शासनाने (ऑगस्ट, २००७) ३५ फिरती वैद्यकीय पथके खरेदी करण्यासाठी रु. १५.७९ कोटी मंजूर केले. जरी केंद्र शासनाने वर्ष २००७-०८ मध्ये निधी वितरीत केला तरी SHS ने मे २००९ पर्यंत एकही MMU विकत घेतले नाही कारण MMU च्या वाहनासाठीचे नमूना संकल्पचित्र ठरविलेले नव्हते. जरी राष्ट्रीय कार्यक्रम समन्वय समितीने आदेश दिले होते की MMU चे कार्य त्याच वर्षी म्हणजे २००७-०८ मध्ये सुरु होण्याची निश्चिती करावी तरी SHS ला अद्याप पर्यंत MMU चे कार्य करण्यात अपयश आले आहे.

वस्तुस्थिती स्विकारतांना शासनाने नमूद केले (सप्टेंबर, २००९) की, MMU उभारणाकरीता निर्णय घेण्यास विलंब झाला. तथापि, निधी इतर मान्यता प्राप्त कार्याकरीता वापरला गेला. हे उत्तर समर्थनीय नव्हते कारण NPCC ने MMU करीता निधी मंजूर करताना MMU चे कार्य २००७-०८ मध्ये सुरु करण्याची निश्चिती करावयाचे सुस्पष्ट अनुदेश दिले होते.

MMU चे कार्य सुरु न करण्याने ग्रामीण जनता घरबसल्या मिळणाऱ्या वैद्यकीय सुविधांपासून वंचित राहिली.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला.

मोबाईल मेडिकल युनिट प्रकल्पांतर्गत राज्यातील वंचित आणि अर्धवंचित (Unserved & underserved Area) क्षेत्रातील जनतेला doorstep पर्यंत वैद्यकीय सेवा पुरविण्याकरीता राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या मार्फत सन २००७-०८ मध्ये कृती आराखड्यामध्ये राज्यातील ३३ जिल्ह्यांसाठी प्रत्येकी १ आणि नंदुरबार व गडचिरोली जिल्ह्यांसाठी प्रत्येकी १ युनिट याप्रमाणे ३५ MMU युनिट दिनांक ३०.८.२००७ मध्ये मंजूर करण्यात येऊन यावर्षी एकूण १५७९.२० लाख इतक्या निधीची तरतूद करण्यात आली होती.

सन २००७-०८ मध्ये मोबाईल मेडिकल युनिट वाहन खरेदीच्या अनुषंगाने NGO'S MSRTC Officials आणि वाहनांची बांधणी करणारे ठेकेदार यांची बैठक दिनांक १९.०६.२००८ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये ग्रामीण भागातील रस्ते

विचारात घेऊन MSRTC, Mumbai यांचे सहमतीने स्वराज माझदा किंवा त्या लांबीचे दुसरे वाहन योग्य असल्याचे प्रस्तावित करण्यात आले.

प्रथमत: २० MMU डिस्पेन्सरी वाहने खरेदी करण्यासाठी वाहनांचे विनिर्देश निश्चित करुन त्यानुसार निविदा मागविण्याबाबत उपसंचालक (परिवहन), आरोग्य सेवा, पुणे यांना आदेश देण्यात आले. मोबाईल मेडिकल युनिटची खरेदी करण्यासाठी निविदा अर्जातील अटी व शर्ती ठरविण्यासाठी समिती गठीत करुन त्यामध्ये MSRTC, Mumbai यांचे तंत्रज्ञ यांचा समावेश करण्यात आला.

डिस्पेन्सरी वाहन खरेदी करण्याकरिता उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन) पुणे यांच्यामार्फत निविदा काढण्यात आली. वाहन खरेदीमध्ये डिझाईन, उपलब्ध आवश्यक बाबी याकरिता निविदा काढण्यात आली. वाहन खरेदीमध्ये डिझाईन, उपलब्ध आवश्यक बाबी याकरिता निविदा रद्द करण्यात आल्या. सन २००७-०८ मध्ये निविदा प्रक्रियेत विलब झाल्यामुळे योजना कार्यान्वित झाल्याचे दिसून येत नाही.

सन २००८-०९ मध्ये ५०६.७१ इतक्या निधीची तरतूद करण्यात आली होती.

ARAI, पुणे या संस्थेशी बोलणी करण्यापूर्वी वाहनांच्या तांत्रिक बाबींसाठी MSRTC, Mumbai, उपसंचालक (परिवहन), आरोग्य सेवा, पुणे व स्वयंसेवी संस्थांच्या सल्ल्याने स्वराज माझदा वाहन व त्याचे विनिर्देश करण्यात निश्चित करण्यात आले. तथापि, या प्रक्रियेनंतर निर्गमित केलेली निविदा अयशस्वी ठरली.

सन २००९-१० मध्ये ४० MMU युनिट मंजूर असून १७२७.५६ इतक्या निधीची तरतूद करण्यात आली होती. यावर्षी मोबाईल मेडिकल युनिट प्रकल्पाची सुरुवात झाली. रत्नागिरी व लातूर जिल्ह्यांमध्ये हा प्रकल्प स्वंयसेवी संस्थेमार्फत सुरु होता. मोबाईल मेडिकल युनिट डिस्पेन्सरी वाहनाचे वितरण होईपर्यंत या दोन्ही जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्था, संस्थेच्या मालकीच्या वाहनाचे प्रकल्प राबवित होते.

सन २००९-१० मध्ये मोबाईल मेडिकल युनिट योजनेअंतर्गत खरेदी प्रक्रिया करण्यासाठी दिनांक १६.१२.२००९ रोजी वाहने खरेदी करण्यासाठी जाहीर निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. निविदा अर्ज विक्रीच्या शेवटच्या दिवसापर्यंत फक्त चारच निविदा अर्ज विकण्यात आले असल्यामुळे तसेच काही निविदाधारकांकडून अर्ज सादर करण्यासाठी वाढीव मुदतीची विनंती करण्यात आली असल्यामुळे पुढीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात आली.

१) निविदा अर्ज विक्रीची मुदत ..... दिनांक २९.१२.०९

२) निविदा अर्ज सादर करण्याची मुदत ... दिनांक ३०.१२.०९

३) निविदा अर्ज उघडण्याची तारीख ... दिनांक ३०.१२.०९

या जाहिरातीत दोनवेळा दुरुस्ती निर्गमित करुन निविदेस योग्य प्रतिसाद न मिळाल्यामुळे दिनांक ५.०१.२०१० रोजी मुदतवाढ देण्यात आली होती. निविदाधारकांस अर्ज सादर करण्यासाठी पुढीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात आली.

१) निविदा अर्ज विक्रीची मुदत ..... दिनांक १३.०१.१०

२) निविदा अर्ज सादर करण्याची मुदत ..... दिनांक १४.०१.१०

३) निविदा अर्ज उघडण्याची तारीख .....दिनांक १४.०१.१०

या जाहिर निविदेला अनुसरुन खालील नमूद केलेल्या निविदा धारकांनी निविदा सादर केल्या होत्या.

१) टाटा मोटर्स लि.

२) व्ही.एम.कमर्शिअल लि.

३) स्वराज मझदा लि.

निविदा छाननी समितीने प्राप्त निविदांपैकी कोणीही निकषांनुसार पात्र नसल्यामुळे या निविदांची पुढील प्रक्रीया थांबविण्याचा निर्णय दिनांक १९.०५.२०१० रोजी घेण्यात आला व Earnest Money Deposit (अनामत रक्कम) सदरहू अयशस्वी निविदाधारकांना परत करण्यात आले.

दरम्यानच्या काळात प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीकोनातून केंद्रशासनाशी निगडीत तज्ञ संस्थांना Comprehensive Technical Services उपलब्ध करुन देण्यासाठी प्रस्ताव मागविण्यात आले.

1) The Directoe, Vehicle & Development Establishment Ahmednager (Dept. of Defense)
2) The Director, Automotive Research Association of India (ARAI) (Dept. of Heavy Industries Govt. of India)
3) The Director, Central Institute of Road Transport (CIRT)

उपरोक्त नमूद केलेल्या संस्थांपैकी The Director, Vehicle & Development Establishment Ahmednager (Dept. of Defense) The Director, Central Institute of Road Transport (CIRT) या दोन्ही संस्थांनी अशा प्रकारची सेवा देण्यात असमर्थता दर्शविली.

सन २०१०-११ मध्ये मोबाईल मेडिकल डिस्पेन्सरी वाहनाचे डिझाईन व वाहनांची बांधणी करण्यासाठी टर्न की तत्वावर ARAI पुणे या तज्ञ तांत्रिक संस्थेची सल्लागार म्हणून निवड करण्यात आली. त्यांच्याबरोबर दिनांक ६.९.२०१० रोजी सामंजस्य करार करण्यात आलेला आहे.

ARAI, पुणे या संस्थेने दिनांक ११.१०.२०१० रोजी पुणे येथे झालेल्या बैठकीत TATA/LPT ७१२ EX/३८ (EURO III) ही चेसीस मोबाईल मेडिकल युनिट वाहनांच्या बांधणीसाठी उपयुक्त असल्याने त्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २९.१०.२०१० रोजी छाननी समितीसमोर मान्यतेसाठी ठेवण्यात आला. त्यास मान्यता मिळाल्यानंतर खरेदीची पुढील प्रक्रिया करण्यात आलेली आहे.

मोबाईल मेडिकल डिस्पेन्सरी वाहनाच्या बांधणीसाठी दोन लिफाफा निविदा पध्दतीने निविदाधारकांची निवड करण्यासाठी दिनांक ४.११.२०१० रोजी जाहिरात देण्यात आली होती. त्याअनुषंगाने दिनांक ७.१२.२०१० रोजी तांत्रिक लिफाफा उघडण्यात येऊन दिनांक ११.०१.२०११ रोजी मे.स्टारलाईन मोटर्स इंडस्ट्रीज प्रा.लि. बेळगाव यांची लघुतम निविदाधारक म्हणून निवड करण्यात आली.

त्यानुसार दिनांक २०.०८.२०११ पर्यंत राज्यातील ३३ जिल्ह्यातील एकूण ४० मोबाईल मेडिकल युनिट कार्यान्वित आहेत.

मोबाईल मेडिकल युनिटसाठी मंजूर निधीचा तपशिल खालीलप्रमाणे :

अ.क्र.	आर्थिक वर्ष	मंजूर निधी (लाखात)	खर्च (लाखात)
१	२०१०-११	६६४.१४	५२७.०८
२	२०११-१२	८१९.६८	१०५४.९१

वैद्यकीय आणि निम्नवैद्यकीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

ANM सार्वजनिक आरोग्य परिचारीका(PHN), परिचारिका आणि वैद्यकीय अधिकारी यांना प्रकाशात आणून त्यांच्या गरजेनुसार नियमित प्रशिक्षणाव्दारे तसेच त्यांच्या कौशल्याची श्रेणी वाढ करण्यासाठी सामर्थ्य निर्माण करावयाचे होते. हे NRHM चे एक महत्वाचे

Module होते. SHS कडून मिळविलेल्या आधार सामग्रीच्या विश्लेषणावरुन असे उघडकीस आले की, प्रशिक्षणाच्या लक्ष्याच्या संपादणूकीत फार मोठी तूट होती. २००७-०८ व २००८-०९ मध्ये ANM च्या बाबतीत ही तूट ३० व ७४ टक्के, परिचारिकांच्या बाबतीत ५७ ते ८६ टक्के आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बाबतीत ४४ ते ७८ टक्के यांचे दरम्यान होती. असे नमूद केले गेले की, DHOs नी वैद्यकीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षणासाठी नाम निर्देशित केले नव्हते कारण बऱ्याच PHCs ह्या एकच डॉक्टर असलेल्या होत्या.

वस्तुस्थिती स्विकारतांना शासनाने नमूद केले (सप्टेंबर, २००९) की, प्रशिक्षण सुविधांच्या अभावामुळे गरजांनुसार प्रशिक्षण पूर्ण करता आले नाहीत.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला.

RCH II अंतर्गत राज्यातील आरोग्य अधिकारी कर्मचारी यांचेकरीता त्यांच्या कामकाजाच्या गरजेनुसार कौशल्य वृध्दींगत करण्याकरीता निरनिराळे प्रशिक्षण देण्यात येतात. राज्यामध्ये नागपूर येथे सार्वजनिक आरोग्य संस्था कार्यरत असून, विभागीय ७ आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्रे असून त्यांच्या अंतर्गत ३३ जिल्हा प्रशिक्षण पथके व २३ जिल्हा रुग्णालयीन प्रशिक्षण पथके प्रशिक्षणाचे कामकाज करतात. विभागीय स्तरावर वैद्यकीय अधिकारी व जिल्हा स्तरावर आरोग्य कर्मचारी यांचे प्रशिक्षण सत्रे आयोजित करुन घेण्यात येतात. प्रत्येक प्रशिक्षण केंद्रामध्ये उपलब्ध साधनसामुग्री, प्रशिक्षण व प्रशिक्षणाचे स्थळ यावर वार्षिक प्रशिक्षणाचा भार ठेवण्यात येऊन त्याप्रमाणे जिल्हा आरोग्य अधिकारी यांना प्रशिक्षण भार कळविण्यात येते. केंद्रशासनाच्या प्रशिक्षणाच्या मार्गदर्शक सूचनानुसार प्रशिक्षणाचे वेळापत्रक तयार करुन प्रशिक्षण घेण्यात येते.

सोबत, प्राचार्य, सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर यांचेकडून प्राप्त सन २००७-०८ पासून २०११-१२ पर्यंतचे प्रशिक्षणाचे अहवाल अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहेत.

सन २००७-०८ व २००८-०९ या सुरुवातीच्या दोन वर्षामध्ये आरसीएच अंतर्गत ए.एन.एम., स्टाफ नर्स व वैद्यकीय अधिकारी यांचे विविध प्रकारचे आरसीएच प्रशिक्षणे सुरुवात करण्यात आल्याने व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या स्तरावर प्रशिक्षणास कर्मचारी/अधिकारी यांना पाठविण्यात येणाऱ्या अडचणीमुळे ठरविण्यात आलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यामध्ये अडचणी आल्या होत्या, त्यामुळे प्रशिक्षामध्ये "शॉर्ट फॉल" दिसून आला.

पीएचएन हा संवर्ग रुग्णालये व जिल्हास्तरीय आरोग्य कार्यालय या ठिकाणी कार्यरत आहे. राज्यात एकूण २८८ पदे मंजूर असून त्यापैकी २२८ पदे कार्यरत आहेत. पीएचएन यांच्या प्रशिक्षणामध्ये २००७-०८ व २००८-०९ या दोन वर्षामध्ये कमी उद्दिष्टाने साध्य झालेले आहे. सन २०१२-१३ मध्ये सर्व पीएचएन यांचे सदर प्रशिक्षणे पूर्ण करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. याबाबत प्राचार्य आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र यांना आवश्यक त्या सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

सन २०१२-१३ मध्ये नवनियुक्त स्टाफ नर्स यांच्या "इंडक्शन प्रशिक्षण" व लसीकरण प्रशिक्षणाबाबत नियोजन करण्यात येत आहे.

तथापि, २००९ ते २०११-१२ या कालावधीमध्ये अंतर्गत ए.एन.एम. स्टाफ नर्स व वैद्यकीय अधिकारी यांच्या प्रशिक्षणामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.

आर सी एच कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षणाची संख्या जास्त आहे आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांना उपलब्ध आरोग्य कर्मचारी/अधिकारी यांच्यामधून स्थानिक परिस्थिती उदा. साथरोग याचा विचार करुन कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणासाठी पाठवावे लागते. त्यामुळे प्रत्येक वेळी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणासाठी नियुक्त करणे शक्य नसते.

NRHM अंतर्गत सर्व प्रशिक्षण केंद्राचे उदा. गृह, प्रसूति गृह यांची बळकटी करण्यात आलेली आहे. प्रशिक्षणातील सुविधांच्या अभावामुळे प्रशिक्षण प्रक्रियेत अडचण येत नसून कर्मचारी यांच्या कार्यक्षेत्रातील अडचणीमुळे प्रशिक्षण सत्रे व उद्दिष्टे पूर्ण करण्यास अडचणी येतात. तथापी जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याशी चर्चा करुन प्रशिक्षणाबाबत निर्णय घेण्यात येत आहेत.

निष्पादनाचे दर्शक

पूनरुत्पादन व शिशू आरोग्य देखरेख (RCH), प्रतिक्षमता व विविध रोग नियंत्रण कार्यक्रम

NRHM, अर्भक मृत्यूसंख्या प्रमाण (IMR) मातृ मृत्यूसंख्या प्रमाण (MMR), एकूण जनन क्षमता प्रमाण (TFR) रोगाटपणा अणि मृत्यूसंख्येचे प्रमाण कमी करणे आणि विविध राष्ट्रीय कार्यक्रमांअंतर्गत समावेश झालेले विविध देशज रोग बरे करण्याचे प्रमाण वाढविणे यांकरिता राष्ट्रीय लक्ष्य विहित करते. MMR, IMR व TFR यांचे लक्ष्य व राज्यातील त्यांची फसवणूक ही तक्ता ९ मध्ये दाखविली आहे.

दर्शकांचा तपशील	NRHM प्रमाणे संपादणूक करावयाचे लक्ष्य	राज्याने निश्चित केलेले लक्ष्य	वर्षनिहाय राज्याने निश्चित केलेले लक्ष्य		प्रत्येक वर्षाच्या शेवटी संपादणुक
			वर्ष	लक्ष्य	
IMR	२०१२ पर्यंत ३०/१००० जन्मलेल्यांपैकी जिवंत	२०१० पर्यंत २५/१००० जन्मलेल्यांपैकी जिवंत	२००५	निश्चित केलेले नाही	३६
			२००६	निश्चित केलेले नाही	३५
			२००७	३२	३४

तक्ता ९ : निष्पादनाचे दर्शक

			२००८	३२	३४
MR	२०१२ पर्यंत ३०/१०००० जन्मलेल्यांपैकी जिवंत	२०१० पर्यंत १००/१००००० जन्मलेल्यांपैकी जिवंत	२००५	निश्चित केलेले नाही	१४९
			२००६	निश्चित केलेले नाही	संकलन केलेले नाही
			२००७	१२५	१३०
			२००८	१२५	संकलन केलेले नाही
TFR	२०१२ पर्यंत २.१	२०१२ पर्यंत २.०	२००५	निश्चित केलेले नाही	संकलन केलेले नाही
			२००६	निश्चित केलेले नाही	२.११
			२००७	२.०	संकलन केलेले नाही
			२००८	२.०	संकलन केलेले नाही

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, जेव्हा IMR आणि TFR यांच्या बाबतीत राज्यातील स्थिती अगदी प्रमाणकाबरोबर आहे, MMR च्या बाबतीत राज्याला १०० चे लक्ष्य अजून संपादन करावयाचे आहे.

शासनाने नमूद केले (सप्टेंबर २००९) की, NRHM च्या प्रमाणकानुसार MMR करीता १०० चे लक्ष्य वर्ष २०१२ पर्यंत संपादन केले जाईल.

सर्व गरोदर स्त्रियांची गरोदरपणाचे १२ आठवडे पूर्ण होण्यापूर्वी नोंदणी करणे आणि त्यांच्यासाठी चार प्रसूतीपूर्ण तपासण्या, १०० किंवा जास्त Iron Folic Acid गोळ्या, Tetanus Toxoid (TT)चे दोन क्वेमे आणि सकस आहार व पूरक जीवनसत्व यावरील

सल्ला आणि गुंतागुंतीच्या प्रकरणात त्यांना विशेषीकृत स्त्रीरोगतज्ञांच्या देखरेखसाठी पाठविणे, हे सुरक्षित मातृत्वाचे मुख्य ध्येय आहे.

तक्ता क्र.१० मधील तपशीलाप्रमाणे एकूण नोंदणीकृत गरोदर स्त्रियांच्या तुलनेत गरोदरपणाच्या बारा आठवड्याच्या आत नोंदणी झालेल्या स्त्रियांची संख्या कमी होण्याचा कल दिसून आला.

तक्ता १० : गरोदर स्त्रियांची नोंदणी

वर्ष	आरोग्य केंद्रात नोंदणी झालेल्या एकूण गरोदर स्त्रियांची संख्या	गरोदरपणाच्या १२ आठवड्यात नोंदणी झालेल्या स्त्रीयांची संख्या	तूट	तुटीची टक्केवारी
२००५-०६	२२३५९५०	२०६१७६३	१७४१८७	७.७९
२००६-०७	२२२९४४५	२००७७२९	२२१७१६	९.९४
२००७-०८	२२२६१७४	१९५२०५६	२७४११८	१२.३१
२००८-०९ (फेब्रुवारी २००९ पर्यंत)	२०२८३१४	११५८८८३	८६९४३१	४२.८६५५

त्यावरुन गरोदर स्त्रियांना IFA गोळ्या आणि TT चे Doses देणे त्यातही तक्ता ११ मध्ये दर्शविल्याप्रमाणे संख्या कमी होण्याचा कल दिसून आला.

तक्ता : ११

वर्ष	आरोग्य केंद्रात नोंदणी झालेल्या एकूण गरोदर स्त्रियांची संख्या	१०० दिवसात IFA गोळ्या न मिळणाऱ्या गरोदर स्त्रीयांची टक्केवारी	१०० दिवसात IFA गोळ्या न मिळालेल्या गरोदरस्त्रियांची टक्केवारी	TT चे Doses न दिलेल्या स्त्रीयांची संख्या	TT चे Doses दिलेल्या स्त्रियांची टक्केवारी
२००५-०६	२२३५९५०	९१३२६३	४०.८४	१७४१८७	७.७९
२००६-०७	२२२९४४५	१५२३७६५	६८.३५	२२१७१६	९.९४
२००७-०८	२२२६१७४	१२१८७३३	५४.७५	२७४११८	१२.३१
२००८-०९ (फेब्रुवारी २००९ पर्यंत)	२०२८३१४	संकलन केलेले नाही		३२८७९४	१६.२१

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, IFA गोळ्या घेणाऱ्या गरजू गरोदर स्त्रियांची संख्या कमी होती. यावरुन आवश्यक असलेल्या नोंदणी पूरक लोहाशी कमी पोच होती असे निदर्शनास येते. नोंदणी आणि प्रतिक्षम करणे यातील तफावतीबाबत SHS ने नमूद केले (मे २००९) की. नोंदणी केलेल्या सर्व स्त्रिया प्रतिक्षम करण्यासाठी पुढे येत नाहीत.

शासनाने नमूद केले (सप्टेंबर, २००९) की, १०० व २०० IFA गोळ्या अनुक्रमे रक्तहीन नसलेल्या गरोदर महिलांसाठी विहित केल्या होत्या. संपादणूकीच्या अपेक्षित पातळी (ELA) ५० टक्के होती आणि ती संपादणूक रक्तहीन नसलेल्या स्त्रियांच्या बाबतीत शेवटच्या दोन वर्षात झाली होती. उत्तर मान्य करण्यासारखे नव्हते कारण रक्तहीन स्त्रियांना २०० IFA गोळ्या वितरीत केल्याची कुठलीही आधारसामग्री उपलब्ध नव्हती.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला.

१) माता मृत्यू दराबाबत रजिस्ट्रार जनरल भारत सरकार यांनी केलेल्या नमूना पाहणीव्दारा असे निदर्शनास येते की, १९९६ पासून राज्याने माता मृत्यू दरामध्ये सातत्याने घट साध्य केली आहे. वर्षनिहाय सदरची माहिती खालीलप्रमाणे :

वर्ष	१९९९-२००१	२००१-२००३	२००४-२००६	२००७-२००९	अपेक्षित २०१२-१३	अपेक्षित २०१३-१४
माता मृत्यू प्रमाण	१६९	१४९	१३०	१०४	७६	६३

वरील तक्त्यावरुन असे लक्षात येईल की, गेल्या १० वर्षामध्ये माता मृत्यू प्रमाणामध्ये राज्याने ६५ अंकाने घट साध्य केली आहे. म्हणजेच सरासरी ६.५ अंकाने प्रतिवर्ष घट साध्य झाली आहे. हीच घट गृहित धरल्यास २०१२ अखेर माता मृत्यूचे प्रमाण १९ अंकाने कमी होऊन निश्चितच ८५ झाले असावे. संयुक्त राष्ट्र संघाने माता मृत्यू प्रमाणासंदर्भात ठरवून दिलेले शतकोत्तर विकासाचे उद्दिष्ट जे २०१५ साली १०७ अपेक्षित आहे ते २००९ अखेर साध्य केले आहे.

२) प्रसूतीपूर्व गर्भवती महिलांची १२ आठवड्याच्या आत नोंदणी करण्यासंदर्भात सादर करण्यात येते की, महालेखापालांच्या लेखापरिक्षण अहवालातील तक्ता क्र. १० मध्ये १२ आठवड्याच्या आत नोंदविण्यात आलेल्या गरोदर महिलांची संख्या या रकान्यामध्ये दर्शविण्यात आलेल्या संचया ह्या धनुर्वात प्रतिबंधक लस देण्यात आलेल्या महिलांच्या संख्या आहेत. तथापि सुधारित माहिती खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

रक्तक्षय प्रतिबंधक लोहयुक्त गोळ्यांचे वाटपाबाबत

वर्ष	एकूण नोंदणी करण्यात आलेल्या गरोदर महिलांची संख्या	१०० लोहयुक्त गोळ्या देण्यात आलेल्या गरोदर महिलांची संख्या	२०० लोहयुक्त गोळ्या देण्यात आलेल्या गरोदर महिलांची संख्या

	जिल्हा	मनपा	एकूण	जिल्हा	मनपा	एकूण	जिल्हा	मनपा	एकूण
२००४-०५	१६१२३५२	६६७३०२	२२७९६५४	९३७२२०	४९१३८०	१४२८६००	६५१०४८	२४८४४३	८९९४९१
२००५-०६	१५७५६६३	६५५१७५	२२३०८३८	८८६२९६	४९१४७३	१३७७७६९	६०३८९१	२४७५०६	८५१३९७
२००६-०७	१३१९२७१	४९१९०१	१८१११७२	३९०८१७	२४४५६६	६३५३८३	२२४८७६	४४३८०	२६९२५६
२००७-०८	१५३६८५३	६८९३२१	२२२६१७४	६७४२०३	५३७८१३	१२१२०१६	३८४७१७	२११५२५	५९६२४२
२००८-०९	१५७२३०८	६८२९९०	२२५५२९८	७१७०२२	५४३३९३	१२६०४१५	३७४२२९	२४७६०४	६२१८३३
२००९-१०	१५००१८३	६४३३४७	२१४३५३०	९२५२१०	८७०४७०	१७९५६८०	५०६१९८	२७४९३२	७८११३०
२०१०-११	१४९९०५७	६५८१३०	२१५७१८७	८६३३६६	७७३६३८	१६३७००४	४९७३८८	१९६२६०	६९३६४८
२०११-१२	१५५०२४५	७४६५८७	२२९६८३२	७६७४८७	४४९५३४	१२१७०२१	४२५२१६	२०३५८२	६२८७९८

वरील तक्त्यामध्ये २००४-०५ पासून २०११-१२ पर्यंत ज्या गरोदर महिलांना लोहयुक्त गोळ्यांचे १०० व २०० प्रमाणे वाटप करण्यात आले आहे त्यांची संख्या दर्शविण्यात आली आहे. रक्तक्षय असलेल्या सर्व मातांना २०० लोहयुक्त गोळ्या देण्याबाबत स्थायी आदेश आहेत.

संस्थामधील प्रसूती

RCH-II कार्यक्रमाचा एक महत्वाचा घटक म्हणजे मातांना संस्थांमध्ये प्रसूती करण्याकरिता उत्तेजन देणे हा होता. १० व्या योजनेनुसार २००७ पर्यंत ८० टक्के प्रसुती ही संस्थांमध्ये सुरक्षित, हे ध्येय संपादन करावयाचे होते. शिवाय, २००८-०९ वर्षाच्या RCH करीता राज्याच्या PIP साठी राज्याने संस्थांमध्ये ८० टक्के प्रसुतीचे लक्ष्य साध्य करण्याचे ध्येय ठेवले होते. तथापि, SHS च्या अभिलेखांच्या तपासणीत असे उघडकीस आले की, फेब्रुवारी, २००९ पर्यंत हे ध्येय संपादन झाले नव्हते ज्याचा तपशिल तक्ता १२ मध्ये दर्शविला आहे.

तक्ता १२ : संस्थामधील प्रसूति

वर्ष	एकूण झालेल्या प्रसूति	संस्थामधील एकूण प्रसूतिची संख्या	संस्थांमधील प्रसूतिची टक्केवारी
२००४-०५	१६,४३,०६३	१०,२६,८५६	६२.५
२००५-०६	१६,८२,७६६	११,०३,६८५	६५.५९
२००६-०७	१४,२५,९४०	१०,००,८५३	७०.१९
२००७-०८	१८,०२,८५७	१३,४६,६९३	७४.७
२००८-०९ (फेब्रुवारी २००९ पर्यंत)	१६,१९,५१६	१२,३३,०७४	७६.१३

चाचणी तपासणी केलेल्या आठ जिल्ह्यांत असे दिसून आले की, २००५-०९ या कालावधीत असलेल्या स्थितीमध्ये ३६ टक्के (गोंदिया २००५-०६) अणि ९० टक्के (पुणे २००८-

०९) अशी तफावत होती. वर्ष २००७-०९ मध्ये ठाणे जिल्ह्यांमध्ये व पुणे जिल्ह्यात २००५-०६ आणि २००७-०९ मध्ये ८० टक्कयापेक्षा जास्त प्रसूती संस्थांमध्ये झाल्या. तथापि, गोंदिया सारख्या आदिवासी जिल्ह्याने गेल्या चार वर्षात ३६.०७ ते ६५.३७ टक्के संस्थांमधील प्रसूतीचे नैराश्यपूर्ण चित्र प्रस्तूत केले.

शासनाने वस्तुस्थिती स्विकारताना नमूद केले (सप्टेंबर, २००९) की, NRHM अंतर्गत आणि जनजाती विकास विभागाव्दारे कार्यान्वित केलेल्या योजनांचा संस्थामधील प्रसुतिवर चांगला प्रतिसाद दिसून आला.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला.

संस्थेमध्ये झालेल्या बाळंतपणाबाबतची माहिती जी तक्ता क्र. १२ मध्ये देण्यात आली आहे ती अद्यावत २०११-१२ पर्यंत सादर करण्यात आली आहे.

वर्ष	एकूण बाळंतपणे	कॉलम २ पैकी संस्थेमध्ये झालेल्या बाळंतपणाची संख्या	संस्थेमध्ये झालेल्या बाळंतपणाची टक्केवारी
१	२	३	४
२००४-०५	१६,४३,०६३	१०,२६,८५६	६२.५
२००५-०६	१६,८२,७६६	११,०३,६८५	६५.५९
२००६-०७	१४,२५,९४०	१०,००,८५३	७०.१९
२००७-०८	१८,०२,८५७	१३,४६,६९३	७४.७
२००८-०९	१८,७१,६६४	१५,५६,३४६	८३.१५
२००९-१०	१७,४९,८३६	१५,६७,५७८	९०.०
२०१०-११	१८,३६,६४९	१६,९०,०५०	९२.०
२०११-१२	१७,०६,८५३	१५,९८,१९३	९३.६३

वरील तक्त्यावरुन निदर्शनास येते की राज्यामध्ये संस्थेमध्ये होणाऱ्या बाळंतपणाचे प्रमाण सन २०११-१२ मध्ये ९३.६३ टक्के पर्यंत साध्य झाले आहे. राज्याने २००८-०९ च्या आरसीएच प्रकल्प आराखड्यामध्ये हे उद्दिष्ट ८० टक्के ठरविले होते व ते २००८-०९ या वर्षातच ८३.१५ टक्के असे साध्य करण्यात आले आहे.

गोंदिया जिल्ह्याची गेल्या ३ वर्षात संस्थेमध्ये झालेल्या बाळंतपणाची माहिती खालीलप्रमाणे दर्शविण्यात आली आहे.

वर्ष	एकूण बाळंतपणे	कॉलम २ पैकी	संस्थेमध्ये झालेल्या

		संस्थेमध्ये झालेल्या बाळंतपणाची संख्या	बाळंतपणाची टक्केवारी
१	२	३	४
२००९-१०	१७७२५	१२५७६	४
२०१०-११	१७८१३	१४९६४	७१
२०११-१२	१९९७७	१९२५९	९६

वरील तक्त्यावरुन असे निदर्शनास येईल की गोंदिया जिल्ह्याने राज्याने ठरविलेल्या ८० टक्क्याचे उद्दिष्ट २०१०-११ मध्ये साध्य केले असून २०११-१२ या वर्षात सदरचे उद्दिष्ट ९६ टक्के साध्य करण्यात आले आहे. राज्याने तसेच गोदिया जिल्ह्याने संस्थेमध्ये बाळंतपणाचे प्रमाण ९० टक्क्यापेक्षा जास्त साध्य केले आहे.

प्रतिक्षमता आणि शिशू आरोग्य

शिशुंचे उत्तरजीवित्व सुधारण्यासाठी सेवा बळकट करणे हा RCH-II कार्यक्रमाचा महत्वाचा घटक आहे. हा मुख्यत्वेकरुन प्रतिबंधक बाजूवर लक्ष केंद्रित करतो. याबाबतीत दुय्यम प्रतिक्षमतासाठी ५ ते ६ या वयोगटातील शिशुना DT (Diphtheria आणि Tetanus) चे तीन Dossage आणि Tetanus Toxoid (TT) चे दोन Dosage अनुक्रमे १० आणि १६ व्या वर्षी द्यावयाचे होते. तथापि, अभिलेखांच्या तपासणीत असे उघडकीस आले की दुय्यम प्रतिक्षमतेकरीता असलेल्या लक्ष्याच्या तुलनेत DT करीता ६.५५ ते १९.३० टक्के, TT (१०) करीता ९.७८ ते २४.६३ टक्के आणि TT (१६) करीता १०.६८ ते २५.०३ टक्के तूट होती.

वस्तुस्थिती स्वीकारतांना शासनाने नमूद केले (सप्टेंबर २००९) की कार्यचालनेत सुधारणा झाली आहे.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला.

केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या राष्ट्रीय लसीकरण वेळापत्रकाप्रमाणे इंजे.टीटी १० वर्ष, टीटी १६ वर्षे या लसी विहित वयोगटात देण्यात येतात. सन २००९-१० पासून राज्यात वय ५ ते ६ या वयोगटात डीटी ऐवजी डीपीटी लसीचा सुरु करण्यात आला आहे. वरील निर्देशांकाची वर्षेनिहाय झालेल्या कामाची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

लस	वर्षे	उद्दिष्ट	साध्य	तफावत	% वारी
टीटी	२००५-०६	२३०१४३७	२१५०५७९	१५०८५८	६.५५
	२००६-०७	२४५८५९६	२०९१६९९	३६६८९७	१४.९२
	२००७-०८	२४६७९६८	२०३४२७६	४३३६९२	१७.५७
	२००८-०९	२१५०६८१	१८७८१५९	२७२५२२	१२.६७
डीपीटी	२००९-१०	२१८४६३१	१८१२१९०	३७२४४१	१७.०५
	२०१०-११	१९१४९८०	१६६३६६९	२५१३११	१३.१२
	२०११-१२	१८७८५२०	१५५५६४३	३२२८७७	१७.१९
	२००५-०६	२४९२८३१	२२२६५५७	२६६२७४	१०.६८
	२००६-०७	२४५८५९६	२०४०४८१	४१८११५	१७.०१
	२००७-०८	२४६७९६८	१८८३६२४	५८४३४४	१३.६८
	२००८-०९	२१५०६८१	१९३१११३	२१९५६८	१०.२१
	२००९-१०	२१८४६३१	२०५८१३०	१२६५०१	५.७९
	२०१०-११	२१८४६३१	२०२०७२२	-	-
	२०११-१२	१९९९९९४	१९१६१४०	७६९५८	३.८६
	२००५-०६	१९९३०९८	२०८५७९४	२२६१५३	९.७८
	२००६-०७	२३११९४७	१८७१२३२	३७३५६९	१६.३४
	२००७-०८	२२४४८०१	१६९७८१८	५५५५४३	२४.६५
	२००८-०९	२२५३३६१	१९०६५९०	३७५०६०	१६.४४
	२००९-१०	२२८१६५०	१९८२२३४९	३३४६८८	१४.४४
	२०१०-११	२३१७०३७	१९४९००९	५०९८५	२.५५
	२०११-१२	१९९९९९४	१९०४८२५	१६७९९६	८.१०

उपरोक्त आकडेवारीनुसार इंजे.डीपीटी (५ ते ६ वर्षे) च्या लसीकरणामध्ये सन २००९-१० मध्ये १७.०५ टक्क्यांनी उद्दिष्टापेक्षा काम कमी झाले असे दिसून येते. तसेच इंजे.टीटी (१० वर्षे) या निर्देशांकांचे कामात सन २००९-१० मध्ये ५.७९ टक्के ते सन २०११-१२ या कालावधीत ३.८६ टक्के अशी सुधारणा झाली असे दिसून येते. तसेच इंज टीटी (१६ वर्षे) या निर्देशांकामध्ये सन २००९-१० मध्ये १४.४४ टक्के आणि सन २०११-१२ मध्ये ८.१० टक्के अशी सुधारणा झाल्याचे दिसून येत आहे.

डी.टी./डीपीटी (५ ते ६ वर्षे) धनुर्वात (१० वर्षे, १६ वर्षे) या लसी शाळांमध्ये देण्यात येतात. शाळाबाह्य मुलांना हे लसीकरण मिळत नाही. तसेच भेटीचे वेळी शाळांमध्ये गैरहजर असणाऱ्या मुलांना हे लसीकरण मिळत नाही. शाळाबाह्य मुले तसेच गैरहजर मुलांना नियमित लसीकरण सत्रामध्ये आवश्यक ते लसीकरण करण्याबाबत राज्यस्तरावरुन जा.क्र.राकुककका/लसीकरण/३८३७९-४८९ दिनांक १०/५/२०१२ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच लसीकरण कार्यक्रमास व्यापक प्रमाणात प्रसिध्दी देण्यात येत आहे.

जीवनसत्व "ए" देणे

RCH-II कार्यक्रमाप्रमाणे तीन वर्षापेक्षा कमी वयाच्या सर्व शिशुंकरिता जीवनसत्व ए चे शिशुंना द्रावण देण्यावर जोर दिला होता. जीवनसत्व ए च्या उणीवेमुळे होणाऱ्या शिशुंमधील अंधत्वाला प्रतिबंधक औषध म्हणून ९ महिने वय असताना पहिला Dose गोवरच्या लसीबरोबर आणि दुसरा Dose DPT/OPV बरोबर आणि नंतर सहा महिन्यांच्या अंतराने तीन Doses देण्याची गरज असते. पहिल्या Dose च्या लक्ष्यामध्ये ८.११ टक्के आणि २३.३६ टक्के दरम्यान तुट होती आणि २००५-०६ ते २००८-०९ मध्ये तक्ता १३ मधील तपशीलाप्रमाणे २२.९४ टक्के ते ४५.७२ टक्के तूट होती.

तक्ता १३ : जीवनसत्व "ए" देणे

वर्ष	लक्ष्य	प्रत्यक्ष संपादणुक पहिला Dose	तुट	तुटीची टक्केवारी
२००५-०६	२०,९३,७२१	१९,२३,८९५	१,६९,८२६	८.११
२००६-०७	२०,९८,९०४	१६,०८,६९८	४,९०,२०६	२३.३६
२००७-०८	१९,७४,३७८	१८,०५,६२५	१,६८,७५३	८.५५
२००८-०९	१९,२७,५७५	१५,०५,१०८	४,२२,४६६	२१.९२
दुसरा Dose				
२००५-०६	१७,०३,०८९	१७,५१,४४२	-	-
२००६-०७	२०,१४,७४०	१४,५४,७८७	५,५९,९५३	२७.७९
२००७-०८	२२,५४,४३१	१७,३७,३३१	५,१७,१००	२२.९४
२००८-०९	१९,७४,३७५	१०,७१,६७६	९,०२,६९९	४५.७२

शासनाने नमूद केले (सप्टेंबर, २००९) की, १०० टक्के व्याप्तीचे लक्ष्य प्राप्त करण्यासाठी राज्य सामुदायिक जीवनसत्व "ए" पूरक मोहिम कार्यान्वित करीत होते.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला.

"अ" जीवनसत्वाचा पहिला डोस नऊ महिने वयोगटात गोवर लसीकरणाबरोबर तर दुसरा डोस हा डीपीटी/ओपीव्ही बुस्टर सोबत देण्यात येतो. "अ" जीवनसत्व १ ला २ रा डोस झालेल्या कामाची सुधारित आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

वर्ष	उद्दिष्ट	साध्य	तफावत	तफावतीची टक्केवारी
१ ला डोस				
२००५.०६	२०,९३,७२१	१९,१९,५४९	१,७४,१७२	८,३१
२००६-०७	२०,९८,९०४	१३,४१,६१३	७,५७,२९१	३६.०८
२००७.०८	१९,७४,३७८	१८,०५,६२५	१,६८,७५३	८.५५
२००८.०९	१९,२७,५७४	१७,९८,९१४	१,२८,६६०	६.६७
२००९.१०	१८,८०,७३२	१८,४३,६२५	३७,१०७	१.९७
२०१०.११	१९,२३,३६७	१८,००,०१२	१,२३,३५५	६.४१
२०११.१२	१९,८१,३४६	१७,०१,९३०	२,७९,४१६	१४.१०
२ रा डोस				
२००५.०६	१७,०३,०८९	१७,५१,४४२	-	-
२००६.०७	२०,१४,७४०	१२,१६,८७३	५,५९,९५३	२७.७९
२००७.०८	२२,५४,७४०	१७,३७,३३१	५,१७,१००	२२.९४
२००८.०९	१९,७४,३७५	१८,४६,८९६	१,२७,४७९	६.४५
२००९.१०	१९,२७,५७४	१७,७८,४२९	१,४९,१४५	७.७४
२०१०.११	१९,७३,६३७	१७,८८,४६०	१,८५,१७७	९.३८
२०११.१२	१९,०४,६६०	१६,५८,२७८	२,४६,३८२	१२.९४

सन २००५-०६ ते २०११-१२ मध्ये झालेल्या कामाचे सुधारित आकडेवारीनुसार सन २००५-०६ मध्ये "अ जीवनसत्व पहिला डोस निर्देशांकामध्ये ८.३१ टक्के काम कमी झाले असे दिसून येते. सन २००६-०७ या वर्षात ३६.०८ टक्के काम कमी झाले असे दिसून येते. त्याचप्रमाणे "अ" जीवनसत्व दुसरा डोस निर्देशांकामध्ये सन २००७-०८ मध्ये २२.९४ टक्के आणि सन २००८-०९ या वर्षात ६.४५ टक्के काम कमी झाले असे दिसून येते.

मागील तीन वर्षाचे (२००९-१० ते २०११-१२) कालावधीत "अ" जीवनसत्व १ ला डोसच्या कमी कामाचे प्रमाण १.९७ टक्के १४.१० टक्के असे दिसून येते. तसेच "अ" जीवनसत्व २ रा डोसच्या कमी कामाचे प्रमाण ७.७४ टक्के ते १२.९४ टक्के असे दिसून येते.

यावरुन मागील तीन वर्षाचे कालावधीत या निर्देशकांचे कामामध्ये अंशत: सुधारणा झाल्याचे दिसून येते.

या निर्देशांकांमध्ये वर्षातून दोनवेळा "अ" जीवनसत्वाची मात्रा नऊ महिने ते पाच वर्षे वयोगटातील बालकांना मोहिम स्वरुपात देण्यात येतात. त्याचप्रमाणे कार्यक्रमास व्यापक प्रसिध्दी देण्यात येते. तसेच नियमित लसीकरण कार्यक्रमांतर्गत निमवैद्यकीय कर्मचारी/वैद्यकीय अधिकारी यांचे प्रशिक्षण करण्यात येते.

राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम (NLEP)

११ व्या योजनेच्या शेवटी (२०१२) कुष्ठरोगाचे निर्मूलन करण्याचे ध्येय NLEP मध्ये ठेवले होते. तसेच कुष्ठरोग अभिभावाचे प्रमाण (PR) दर हजारी एक पेक्षा कमी असण्याची निश्चिती करण्याचेही ध्येय ठेवले आहे. राज्यामध्ये २००५-०९ या कालावधीत कुष्ठरोगाच्य नवीन प्रकरणांची एकूण संख्या व PR तक्ता १९ मध्ये दर्शविल्याप्रमाणे होती.

तक्ता १९ : कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम

वर्ष	नवीन प्रकरणे	अभिभावांचे प्रमाण
२००५-०६	१३८४४	०.६४
२००६-०७	१११८९	०.६१
२००७-०८	१२३९७	०.७१
२००८-०९	१४२७४	०.८७

PHC च्या स्तरावरील सगळ्या आरोग्य केंद्रामध्ये कुष्ठरोगाचे निदान आणि उपचार यांची सुविधा NRHM ने करारनिर्विष्ट केली होती. SHS जवळ उपलब्ध असलेल्या माहितीनुसार कुष्ठरोगाच्या निदानाची सुविधा ही सर्व CHCs आणि PHCs मध्ये उपलब्ध होती. कुष्ठरोगाच्या निदानाची सुविधा चाचणी तपासणी केलेल्या सर्व CHCs आणि PHCs मध्ये उपलब्ध होती. कुष्ठरोग अभिभावाचे प्रमाण दर हजारी एकापेक्षा कमी असले तरी २००७-०८ व २००८-०९ मध्ये बाधित झालेल्या लोकांची संख्या वाढलेली आहे. शासनाने वस्तुस्थितीचा स्वीकार केला. (सप्टेंबर, २००९)

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला.

केंद्र शासनाने राज्य कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमाचे प्रमुख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना त्यांचे इंग्रजी अर्ध शासकीय पत्र क्र. ड १२०१४/९/२००७-LEP, (Coordin) दि. ७ नोव्हेंबर, २००७ अन्वये परिपत्र पाठविले आहे. (परिपत्राची प्रत संदर्भासाठी सोबत जोडली आहे) या परिपत्रकांत पृष्ठ क्रमांक ३ व ४ कुष्ठरोग इलिमिनेशनवर भाष्य केले आहे.

कुष्ठरोग इलिमिनेशन :- जागतिक आरोग्य संघटनेने कुष्ठरोगाचे दर दहा हजार लोकसंख्येमागे प्रमाण १ पेक्षा कमी असल्यास कुष्ठरोगाचे इलिमिनेशन झाले आहे, अशी व्याख्या केली आहे. इलिमिनेशनचे संपूर्ण धोरण हे एकदा का रोगाच्या संसर्गाची लागण कमी झाली की, कुष्ठरोगाचे दर दहा हजारी प्रमाण एका मर्यादेपेक्षा कमी येइल. यावर आधारीत होते. पंरतु त्याला विशिष्ट शास्त्रीय आधार नव्हता. कुष्ठरोगाच्या औषधोपचार मात्रेचा कालावधी कमी केल्यावर कुष्ठरोगाचे दर दहा हजार लोकसंख्येमागे प्रमाण खाली येत होते. पंरतु नवीन कुष्ठरोगाची लागण झाल्याचे प्रमाण कमी आले नाही, त्यामुळे कुष्ठरोगाचे दर दहा हजारी प्रमाणही वारंवार इरिलेव्हंट (Irrelevant) ठरत आहे. कुष्ठरोगाचे दर दहा हजारी लोकसंख्येमागे प्रमाण हे संपूर्णपण आरबीटरी (Arbitrary) आहे.

वरील विधानांचा आधार घेता कुष्ठरोगाचे दर दहा हजार लोकसंख्येचे प्रमाण नवीन कुष्ठरोग शोधण्याचा दर यांचा संबंध लावणे संयुक्तीक नाही. केंद्र शासनाने त्यांचे परिपत्रक क्र. ४ वर कुष्ठरोगाची लागण होण्याचे प्रमाणाचा उत्तम दर्शक म्हणजे निसंदेश नवीन कुष्ठरोग शोधण्याचा दर हा आहे. सध्या दडलेले कुष्ठरोग अथवा रोगाची लागण झाल्यापासून त्वरीत नवीन कुष्ठरुग्ण शोधण्यावर भर देण्यात येऊन, त्यांना बहुविध औषधोपचाराखाली त्वरीत आणण्यात येत आहे. याचा परिणाम म्हणजे कुष्ठरोगाच्या संसर्गाची लागण होण्याची साखळी खंडीत होऊन दीर्घकालावधीच्या वाटचालीत नवीन कुष्ठरोग शोधण्याची संख्या व दर निश्चित खाली येईल.

क्रियाशील कुष्ठरुग्णाची संख्या आणि कुष्ठरोगाचे दर दहा हजार लोकसंख्येमागे प्रमाण, नवीन शोधलेले कुष्ठरुग्ण आाणि त्यांचे दर एक लाख लोकसंख्येमागे प्रमाण, नवीन कुष्ठरोग शोधलेली मुले व त्यांचे शेकडा प्रमाण नवीन कुष्ठरुग्णामध्ये सांसर्गिक कुष्ठरुग्णांची संख्या व त्यांचे शेकडा प्रमाण, नविन कुष्ठरुग्णांमध्ये विकृती दर्जा-२ असलेले कुष्ठरुग्ण व त्यांचे शेकडा प्रमाण यांचा वर्ष २००५-०६ ते वर्ष २०११-१२ या कालावधीसाठीचा तक्ता खाली नमूद केला आहे.

अ. क्र.	निर्देशांक	वर्ष						
		२००५-०६	२००६-०७	२००७-०८	२००८-०९	२००९-१०	२०१०-११	२०११-१२
१	क्रियाशील रुग्ण	६८८८	६६५३	७८४४	९८६६	९९८४	१०४३३	१२२५३
२	कुष्ठरुणांचे दर दहा हजार लोकसंख्येमागे प्रमाण	०.६४	०.६१	०.७०	०.८७	०.८६	०.७३	१.०७
३	नवीन शोधलेले कुष्ठरुग्ण	१३८४४	१११८९	१२३९७	१४२७४	१५०७१	१५४९८	१७८९२
४	नवीन शोधलेले कुष्ठरुग्णांचे दर एकलाख लोकसंख्ये मागे प्रमाण	१२.९३	१०.२४	११.१२	१२.५५	१२.९९	१३.७९	१५.६९
५	नवीन शोधलेले कुष्ठरुग्णांमध्ये मुलींची संख्या	१६३९	१३४४	१३७९	१६९५	१७३३	१९१२	२३२८
६	नवीन शोधलेले कुष्ठरुग्णांमध्ये मुलांचे शेकडा प्रमाण	११.८४	१२.०१	११.१२	११.८७	११.५०	१२.३४	१३.०१
७	नवीन शोधलेले कुष्ठरुग्णांमध्ये सांसर्गिक रुग्णांची संख्या	५८५८	५१०८	६१७९	७६७७	८२१७	८३२५	९४८५
८	नवीन शोधलेले कुष्ठरुग्णांमध्ये सांसर्गिक रुग्णांचे शेकडा प्रमाण	४२.३१	४२.६५	४९.८४	५३.७८	५४.२२	५३.७२	५३.०१
९	नवीन शोधलेले कुष्ठरुग्णांमध्ये दर्जा-२ विकृती असलेल्या रुग्णांची संख्या	८५	६८	१०७	१८४	२५०	२८९	३३१
१०	नवीन शोधलेले कुष्ठरुग्णांमध्ये दर्जा-२ विकृती असलेल्यांचे शेकडा प्रमाण	०.६१	०.६१	०.८६	१.२९	१.६६	१.८६	१.८५

वरील तक्त्यावर नजर टाकली असता असे आढळून येते की, कुष्ठरुग्ण मुले, सांसर्गिक कुष्ठरुग्ण, विकृती दर्जा-२ कुष्ठरुग्ण हे घटक नवीन कुष्ठरुग्णांच्य संख्येमध्ये वाढ होण्यासाठी प्रमुख घटक म्हणून कारणीभूत ठरत आहेत. कुष्ठरुग्ण मुलांचे समाजात असलेली संख्या (१२ टक्क्यापेक्षा अधिक) सांसर्गिक कुष्ठरुग्णांची संख्या (५० टक्कयापेक्षा अधिक) असल्यामुळे समाजामध्ये अजूनही कुष्ठरुग्णांची लागण अस्तित्वात असल्याचे आढळून येते. तसेच विकृती दर्जा-२ कुष्ठरुग्णांची संख्याही कुष्ठरुग्ण उशिरा शोधण्यात आली अथवा स्वेच्छा

तपासणीसाठी पुढे आली असे दिसून येते. व त्यांच्यामुळे या रोगाचा अपप्रचार होता. या एकत्रित परिणाम म्हणून वर्ष २००७-०८ पासून नवीन कुष्ठरुग्ण वाढल्याचे सातत्याने आढळते. केंद्र शासनाने माहे जाने.२००५ पासून घरोघर सर्वेक्षण करण्यावर बंदी आणली. सध्या विशेष शोध मोहिम हे फक्त अति कुष्ठरुग्णभार असलेल्या कार्यक्षेत्रातच फक्त केले जाते.

समाजामध्ये रोगाविषयी असलेली घृणा व भेदभावाची भावना कमी करण्यासाठी समाजामध्ये दडलेले नवीन कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधून त्यांना उपचाराखाली आणल्यास रोगाची लागण होण्याची साखळी खंडीत होण्यास वर्ष २००७-०८ पासून खालील विशेष मोहिमा समाजातील कुष्ठरुग्णभार कमी करण्यासाठी राबविण्यात आल्या.

१. दिनांक १५ ऑक्टोबर ते २७ ऑक्टोबर २००७-०८ या वर्षामध्ये तालुका कुष्ठरुग्ण जनजागृती अभियानात १८ जिल्हे आणि २ शहरी विभागात शोध मोहिम राबविण्यात आली होती. त्यांच्यात एकूण २४८१ गांवांचा सर्वेक्षण करुन ४८५ नविन कुष्ठरुग्ण शोधून त्यांना औषधपचाराखाली आणले.

२. रायगड, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, वर्धा, चंद्रपूर आणि यवतमाळ या जिल्ह्यामध्ये कुष्ठरुग्णांचे जास्त प्रमाण असल्यामुळे विशेष कुष्ठरुग्ण शोध मोहिम ८६ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये राबवून १६००२४१ लोकसंख्येमध्ये ३५३६ संशयित रुग्ण शोधले. पैकी ४२९ नवीन रुग्ण शोधून त्यांना औषधोपचाराखाली आणले.

३. सन ऑक्टोबर १० ते नोव्हेंबर २०१० विशेष व्यक्ती संपर्क मोहिम राबवून ११९ तालुक्या अंतर्गत एकूण नोंदणी ९२८८६८० लोकसंख्यापैकी ७८८४१२४ लोकसंख्येची तपासणी केली. त्यामध्ये १६३५८ संशियत रुग्ण आणि १०२५ पैकी संसर्गिक रुग्ण ४०७, असांसर्गिक रुग्ण ६०८ शोधून औषधोपचाराखाली आणले.

४. ॲलर्ट इंडिया मुंबई यांच्या सहाय्याने सिलेक्टीव्ह स्पेशियल ड्राईव्ह सन २०१०-११ मध्ये जास्त पीआर असलेल्या मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रायगड, नाशिक, नंदुरबार, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर व अमरावती या जिल्ह्यात राबविण्यात आला. एकूण १२७ प्राथमिक आरोग्य केंद्रे, २५ नागरी आरोग्य केंद्रे व १५७ झोपडपट्टी विभागात एकूण ३१२९३०६ लोकसंख्या नोदविण्यात आली व २४५५८७८ लोकसंख्येची तपासणी करण्यात आली यात २६३५ संशयित रुग्ण शोधण्यात आले. त्यापैकी ६१३ रुग्ण कुष्ठरुग्ण म्हणून उपचाराखाली आणले.

५. ॲलर्ट इंडिया, मुंबई या संस्थेच्या सहाय्याने ठराविक शहरी विभागात पुणे, नाशिक, नागपूर, मुंबई आणि ठराविक ग्रामीण भागात नंदुरबार, ठाणे, गोंदिया, चंद्रपूर येथे इंपिडेमिओलॅजिकल व्हॉलिडेशन ड्राईव्ह घेण्यात आला यामध्ये २०७९४६ लोकसंख्या नोदविण्यात आली. व सन १७७८६५ लोकसंख्या तपासण्यात आली. त्यात ३८२ संशयित रुग्ण शोधण्यात आले. त्यापैकी १८२ कुष्ठरुग्ण म्हणून उपचाराखाली आणले.

६. ३ ऑक्टोबर ते १० ऑक्टोबर, २०१२ या कालावधीत विशेष कुष्ठरुग्ण शोध मोहिम १७३ तालुक्यात १९ जिल्ह्यात व २४ शहरी विभागात जेथे वार्षिक कुष्ठरुग्ण प्रमाण प्रति लाख १० पेक्षा जास्त आहे अशा ठिकाणी राबविण्यात आली. यात ३२०२३९९६ लोकसंख्या नोदविण्यात आली व २५६४३३५० लोकसंख्या तपासण्यात आली यात ४८२४८ संशयित रुग्ण शोधण्यात आली त्यापैकी २५१५ रुग्ण कुष्ठरुग्ण म्हणून उपचाराखाली आणले.

७. माध्यमिक शाळा जनजागृती मोहिम १५ जिल्ह्यात प्रत्येकी २ तालुक्यात जेथे वार्षिक नवीन कुष्ठरोग प्रमाणे प्रती लाख १० पेक्षा कमी आहे अशा ठिकाणी राबविण्यात आली यात १५१३ हायस्कूल मधील ७५३४३० मुले तपासण्यात आली त्यात ४९४० स्वत: हून तपासणीत आलेल्या संशयित रुगणांची तपासणी केली असता १०६ कुष्ठरुग्णांची नोंद करुन त्यांना उपचाराखाली आणण्यात आले.

८. केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे कुष्ठरोग निवारण दिन व पंधरवडा दिनांक ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी, २०१२ पर्यंत राज्यात राबविण्यात आला. या काळात कुष्ठरोग शोध मोहिम राबविण्यात आली. एकूण १९८६१८३४ लोकसंख्या नोदविण्यात आली व १५११६४५६ लोकसंख्या तपासण्यात आली यात १७३२९ संशयित कष्ठरुग्ण तपासण्यात आली व ७२९ कुष्ठरुगण औषधोपचाराखाली आणली.

वैद्यकीय प्रतिपुर्तीचे लबाडीने प्रदान

ग्रामीण रुग्णालय, परळी वैजनाथ (बीड) येथील वैद्यकीय अधिक्षकाने वैद्यकिय प्रतिपुर्तीची देयके योग्य प्रकारे न तपासता संमत केली परिणामी रु. १२.६० लाखाचे लबाडीने प्रदान करण्यात आले.

मुंबई वित्तीय नियम, १९५९ च्या तरतूदी प्रमाणे आहरण अधिकाऱ्याला कुठल्याही कारणांमुळे जास्त खर्च होणार नाही याची निश्चिती करणे आवश्यक आहे. शिवाय, वित्त

विभागाने, कोषागारे/उपकोषागारे यांना निर्गमित केलेल्या (डिसेंबर २०००) मार्गदर्शक तत्वांप्रमाणे, कोषागारे अधिकाऱ्यांनीही प्रदान करण्यापूर्वी देयकांची छाननी केली पाहिजे.

वैद्यकिय अधिक्षक, ग्रामिण रुग्णालय, परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांच्या अभिलेख्याच्या छाननीत (जून २००७) असे उघडकीस आले की, जून २००२ ते २००७ या कालावधीत १०१ वैद्यकिय प्रतिपुर्ती मागण्या ह्या वैद्यकिय अधिक्षकाने पर्याप्त तपासणी न करता संमत केल्या. लेखापरीक्षणात असे उघडकीस आले की, वित्त विभागाने निर्गमित केलेल्या (मार्च २०००८) मार्गदर्शक तत्वांमध्ये विनिर्दिष्ट केलेली योग्य कागदपत्रे उदाहरणार्थ सक्षम प्राधिकाऱ्याचे मंजूरी आदेश, डॉक्टरने दिलेले औषधपत्र, औषधांच्या खरेदीच्या पुष्टीकरीता Cash Memos इत्यादि देयकांबरोबर जोडलेले नव्हते. इतकेच नव्हे तर वैद्यकिय अधिकाऱ्याने स्वाक्षरी केलेले कोरे मंजूरी आदेश वैद्यकिय प्रतिपुर्ती देयकाबरोबर जोडलेले होते. याप्रकारे, वैद्यकिय अधिक्षकाने संमत केलेली रु. १६.८४ लाखाची १०१ वैद्यकिय देयके बनावट असण्याचा संशय होता.

हे निदर्शनास आणून दिल्यावर (जून २००७), जिल्हा शल्य चिकित्सक, बीड यांनी जून २००२ ते मे २००७ या दरम्यान संमत केलेल्या वैद्यकिय देयकांचे सविस्तर अन्वेषण केले आणि लेखापरीक्षेला कळविले (ऑक्टोबर २००८) की, अन्वेषण केलेल्या १३२ देयकांपैकी रु. १२.६० लाखाची ७६ वैद्यकिय प्रतिपुर्ती देयके बनावट आढळून आली व वसुली पात्र होती. केलेली कार्यवाही आणि केलेली वसुली यांचा तपशील प्रतिक्षित आहे (मार्च २००९). या बाबीची शासनाकडून सर्व जिल्ह्यात तपासणी करण्याची आवश्यकता आहे. ही बाब विभागाच्या प्रधान सचिवांकडे मार्च २००९ मध्ये कळविण्यात आली. उत्तर आलेले नव्हते (ऑक्टोबर २००९).

ज्ञापन :

ग्रामीण रुग्णालय, परळी, जिल्हा बीड येथील उपजिल्हा रुग्णालयाचे महालेखापरल नागपूर यांच्या लेखा परिक्षणात सन २००३-०४ ते २००६-०७ कालावधीत रु. १७.११ लाख वैद्यकिय प्रतिपुर्ती बोगस देयकांचे प्रदान झाल्याचे आढळून आले आहे.

त्या अनुषंगाने जिल्हा शल्य चिकित्सक, बीड यांनी २४ कर्मचाऱ्यांना ज्ञापन देऊन वैद्यकिय प्रतिपुर्तीच्या बोगस देयकांची रक्कम रु. ३,८७,५६३/- भरण्याबाबत कळविले आहे. उर्वरित कर्मचाऱ्यांच्या वैद्यकिय प्रतिपुर्तीच्या बोगस देयकाची रक्कम भरण्याबाबत व पुढील कार्यवाही करण्याबाबत संबंधित कार्यालयास कळविण्यात आले आहे.

महालेखापाल कार्यालयाचे अभिप्राय :-

As per reply of Government no recovery has been made till date and only notices have been issued to 24 employees. Further progress of recovery and action taken for investigation of this matter in all the districts of Maharashtra may be incorporated in Government momorandum.

विभागाचे अभिप्राय

ग्रामीण रुग्णालय, परळी जिल्हा रुग्णालयाचे महालेखापाल, नागपूर यांनी सन २००३-०४ ते २००६-०७ या कालावधीच्या केलेल्या लेखापरिक्षणामध्ये काही वैद्यकीय प्रतिपुर्तीमध्ये बोगस देयकांचे प्रदान झाल्याचे आढळून आले.

महालेखापाल यांच्या अंतिम अहवालानुसार, उपसंचालक आरोग्य सेवा, लातूर मंडळ, लातूर या कार्यालयाकडून समिती नेमण्यात आली असून, समितीने तपासणी करुन एकूण १३२ बिलांची तपासणी करुन वसुलीपात्र रु. १२,४४,५६५/- लाख रक्कमेची ७५ वैद्यकीय देयके बोगस असल्याचे आढळून आले. एकूण ५१ अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून रु. १२,४४,६५६/- ची वसुली करण्यात आली आहे. एकूण बोगस देयकांचे प्रदान झालेल्या १३२ वैद्यकीय प्रतिपुर्तीप्रमाणे पूर्ण रक्कम संबंधिताकडून वसुल करण्यात आलेली आहे.

ग्रामीण रुग्णालय, परळी येथील रुग्णालयातील बनावट ७५ देयके सादर केल्याप्रकरणी जबाबदार एकूण ५१ अधिकारी/कर्मचाऱ्यांमध्ये ३ वैद्यकिय अधिकारी, ३६ वर्ग-३ चे कर्मचारी व १२ वर्ग-४ चे कर्मचारी समाविष्ट आहेत. वैद्यकिय अधिकारी व वर्ग-३ चे ३६ कर्मचाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यासाठी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करिता जिल्हा शल्य चिकित्सक, बीड यांना कळविण्यात आले आहे.

बीड जिल्ह्याप्रमाणे इतर जिल्ह्यात अशी प्रकरणे आहेत किंवा कसे याबाबत तपासणी करण्यात येत असून उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक, कोल्हापूर, पुणे, अकोला, मुंबई मंडळ-ठाणे यांचेकडून अहवाल प्राप्त झाला आहे. जिल्हा हिवताप अधिकारी ठाणे कार्यालयात माहे फेब्रुवारी २०१२ ते मार्च २०१२ या कालावधीत रु. ३,७७,६५८/- एवढ्या रकमेची बनावट वैद्यकीय प्रतिपुर्ती देयके सादर झालेले आणि त्यामध्ये १९ अधिकारी/कर्मचाऱ्यांचा सहभाग दिसून आला आहे. या सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांमधून बनावट

वैद्यकिय प्रतिपुर्ती हडप केलेली रक्कम वसुल करण्यात आलेली असून त्यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात आले होते.

जिल्हा हिवताप अधिकारी, ठाणे यांच्या आदेशानुसार विभागीय चौकशीच्या व निकालाच्या अधिन राहून या सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांचे निलंबन संपुष्टात आणण्यात आले आहे. या सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द म.ना.से. (शिस्त व अपील) नियम ८ खाली विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. तसेच या १९ अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द भा.दं. विधानातील कलम क्र. ४०९, ४२०, ४६५, ४६८, ४७१ व ३४ अन्वये ठाणे नगर पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला असून त्याचा तपास चालू आहे.

जिल्हा हिवताप अधिकारी परभणी यांच्या कार्यालयातील वैद्यकीय प्रतिपुर्ती देयकाची भरारी पथकाकडून तपासणी केली असता रु. ९,९४,४९९/- एवढ्या रक्कमेची देयके संशयास्पद असल्याचे सकृतदर्शनी दिसून आलेले आहे. ज्या रुग्णालयात संबंधित कर्मचाऱ्यांनी औषधोपचार घेतलेला आहे त्या रुग्णालयांना पत्र पाठवून सदर देयकांच्याबाबतीत ताळमेळ करण्यासंदर्भात कळविण्यात आलेले आहे. संबंधित कर्मचाऱ्यांकडून प्रतिपुर्तीच्या रक्कमेची वसुली करण्याबाबत कर्मचाऱ्यांवर नोटीसा बजावण्यात आल्या असून प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत आहे.

जिल्हा हिवताप अधिकारी, परभणी कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडून वसुली करण्यात येत आहे. ग्रामीण रुग्णालय, लाखांदुर, बी.जी.डब्ल्यु. गोंदिया, ग्रामीण रुग्णालय, सिरोंचा, सामान्य रुग्णालय, भंडारा या कार्यालयातील पाच कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपुर्तीचे अतिप्रदान झाले असून क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

साक्ष :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दि.१८ जून, २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सचिवांनी परिच्छेद क्र. २.१ बाबत माहिती देताना सांगितले की, केंद्र सरकारने सन २००५ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान संपूर्ण देशात सुरु केलेले आहे. महाराष्ट्र राज्यात देखील सन २००५ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरु करण्यात आले आहे. ही योजना त्यावेळी प्राथमिक स्टेजमध्ये होती. ही योजना २००७ पासून नियमित कार्यान्वीत करण्यात आली आहे. २००५ ते २००८ या कालावधीत घेण्यात आलेल्या प्रकल्पांची अंमलबजावणी केंद्र व राज्य सरकारच्या स्तरावर समाधानकारक झालेली नाही, ही वस्तुस्थिती

आहे. कारण त्या वर्षी प्रकल्प अंमलबजावणी आराखडा (पीआयपी) तयार करण्यास उशीर झालेला आहे. महालेखाकार यांच्या ऑडीट पॅरामध्ये सन २००६-२००७ या वर्षात १३७ दिवसांचा उशीर झालेला आहे. सन २००७-२००८ या कालावधीत १२० दिवसांचा उशीर झालेला असून सन २००८-२००९ मध्ये १० दिवसांचा उशीर सदर योजनेची अंमलबजावणी करताना झालेला आहे. या योजनेचा प्रकल्प आराखडा गाव पातळीवर तयार करावा लागतो. गाव पातळीवरील आराखड्यास राज्य स्तरीय समितीची मंजुरी घ्यावी लागते. प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, जिल्हा रुग्णालय यांचा आराखडा राज्य सरकारला तीन स्तरावर मंजूर करावा लागतो. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समितीने मंजुरी दिल्यानंतर मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील समिती मंजुरी देते, त्यानंतर केंद्र सरकारकडे प्रकल्प अंमलबजावणी आराखडा पाठविण्यात येतात अशा प्रकारची कार्यवाही योजना सुरु होण्याच्या सुरुवातीच्या कालावधीत उशिरा झालेली आहे. आता प्रकल्पाचा आराखडा पाठविण्यामध्ये महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे. त्यामुळे २००६ ते २००९ या कालावधीत उशीर झाला. प्रकल्प राबविण्यास उशीर झाल्यामुळे रक्कम कमी प्रमाणात मिळाली असून खर्च देखील कमी झाला आहे. सन २००६-२००७ मध्ये एकूण पीआयपीची साईज ५१९ कोटी रुपयांची होती. त्यापैकी ९६ टक्के रक्कम खर्च करण्यात आली आहे. सन २००७-२००८ मध्ये प्रकल्प अंमलबजावणी आराखडा ६३७ कोटी रुपयांचा होता त्यापैकी ७० टक्के रक्कम खर्च करण्यात आली आहे. त्यानंतर सन २००८-२००९ मध्ये पीआयपीची साईज ७६० कोटी रुपये पूर्वीची शिल्लक धरुन ११४ टक्के रक्कम खर्च करण्यात आलेली आहे. गेल्या तीन वर्षात केंद्र शासनाकडून जी रक्कम मिळाली व त्या त्या वर्षात जी रक्कम खर्च झाली नाही ती सर्व रक्कम सन २००८-२००९ मध्ये खर्च करण्यात आली आहे. राज्य शासन ही सर्व रक्कम खर्च करण्यात यशस्वी झाली आहे. या वर्षापासून शहरी भागात नगरपालिका व ५० हजार पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ९९ गावांत ही योजना राबविण्याची सुरुवात करण्यात आली आहे. हे करीत असताना मागचा अनुभव लक्षात घेऊन पीआयपी वेळेवर पाठविण्यात आले आहे. काल याबाबत दिल्ली येथे बैठक झाली असून प्रकल्प आराखड्यास मंजुरी मिळालेली आहे.

एनआरएचएम नव्याने सुरु करीत असताना महाराष्ट्रासाठी ४४४ कोटी रुपयांचा प्रकल्प आराखडा मंजूर केला असून तामिळनाडू राज्यासाठी फक्त ११० कोटी रुपयांचा प्रकल्प आराखडा मंजूर करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य हे इतर राज्यापेक्षा एनआरएचएमचा

निधी खर्च करण्यात पुढे असून त्यामुळे महाराष्ट्राला निधी जास्त मिळाला आहे. सुरुवातीला या अभियानाची अंमलबजावणी करण्यात जो उशीर झाला त्याबाबत चौकशी करण्यात येईल प्रत्येक जिल्ह्यासाठी या अभियानाचा जिल्हा प्लॅन तयार करण्यात आला असून हे अभियान सर्व जिल्ह्यात सुरु करण्यात आले आहे. या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट्ये "ग्रामीण भागात औषधोपचार उपलब्ध करुन देणे, ग्रामीण भागात आरोग्य सुविधेसोबत रुग्णालयातील गरीब रुग्णांना अन्न व पोषण आहार पुरविणे. प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उप जिल्हा रुग्णालय व जिल्हा रुग्णालयांना लागणारी विविध मशीन्स व इतर साहित्याचा पुरवठा करणे. ज्या रुग्णालयांना इमारती नसतील तर नवीन इमारती बांधण्यासाठी सहाय्य करणे. एनआरएचएमचे मुख्य उद्दिष्ट्य माता बाल संगोपन व व नवजात बालकाची काळजी घेणे, माता मृत्यू दर कमी करण्यासाठी निधीचा पुरवठा करणे"ही आहेत. ही योजना सन २००५ मध्ये सुरु झाली असून माता मृत्यु दरात व नवजात बालकाच्या मृत्यु दरात मोठी घट झाली आहे. सन २००१-२००२ मध्ये माता मृत्युदर १६९ होता तो आता सन २०११-२०१२ मध्ये १०४ पर्यत (१००० बाळंतपणा मागे) खाली आलेला आहे. त्याचप्रमाणे सन २००१ मध्ये नवजात बालकाचा मृत्यु दर ४५ होता तो आता सन २०११-२०१२ मध्ये २५ (दर १००० जन्म विचारात घेऊन) वर आलेला आहे.

आता एनआरएचएमची अंमलबजावणी करण्यास उशीर होत नाही काय आणि ? या अभियानाचे टार्गेट पूर्ण करण्यात येते काय ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी "एनआरएचएमची अंमलबजावणी आता दरवर्षी १०० टक्के होत आहे. एनआरएचएमचा मागील वर्षाचा प्रकल्प आराखडा २००० कोटी रुपयांचा होता त्यापैकी ९७ टक्के रक्कम खर्च करण्यात आली आहे. चालू वर्षाचा १८८० कोटी रुपयांचा प्रकल्प आराखडा मंजूर झालेला असून या वर्षी देखील ९० टक्के रक्कम खर्च होणार आहे. केंद्र शासनाकडून या अभियानासाठी ७५ टक्के रक्कम दिली जात असून राज्य शासनाकडून २५ टक्के रक्कम दिली जाते. राज्य शासनाकडून दरवर्षी २५ टक्के रक्कम वेळच्यावेळी उपलब्ध करुन दिली जाते, अनुशेषाची रक्कम देखील राज्य सरकारने दिलेली आहे" अशी माहिती दिली.

यासंदर्भात अधिक माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रत्येक जिल्ह्यात एनआरएचएम राबविण्यात येत आहे, प्रत्येक जिल्ह्याच्या गरजा वेगवेगळ्या असतात. प्रत्येक जिल्ह्यात वेगवेगळ्या गोष्टींसाठी खर्च केला जातो. गरोदर महिलांच्या नावांची नोंदणी

करण्यासाठी 'आशा' वर्कर यांची नेमणूक करण्यात आली आहे. 'आशा' वर्कर गरोदर महिलांना घेऊन येतात व त्यांची नोंदणी संबंधित रुग्णालयाच्या संगणकावर केली जाते. मुल जन्माला आल्यानंतर त्यांची नोंदणी केली जाते. त्यानंतर त्या मुलांना लस दिल्या जातात त्यांची नोंद केली जाते. दुसरी बाब अशी आहे की, ६ ते १८ वयोगाटातील शाळेतील मुलांची आरोग्य तपासणी करण्यात येत होती. आता ० ते १८ वयोगटातील मुलांची आरोग्य तपासणी या अभियानातून करण्यात येते. राज्यातील सर्व शाळांमधील मुलांची आरोग्य तपासणीसाठी प्रत्येक जिल्ह्यात तीन पथके निर्माण करण्यात आली आहेत. प्रत्येक पथकामध्ये एक पुरुष व एक महिला, वैद्यकीय अधिकारी, एक परिचारिका, एक एएनएम व एक ड्रायव्हर असतो. हे पथक प्रत्येक गावात जाऊन शाळेतील मुलांची आरोग्य तपासणी करतात. एनआरएचएमच्या माध्यमातून पालघर येथे तपासणी करण्यात आली आहे. तसेच इतर जिल्ह्यात तपासणी सुरु आहे. राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमातंर्गत २ कोटी मुलांची आरोग्य तपासणी दरवर्षी करण्यात येते. आजपर्यंत या योजनेच्या माध्यमातून ५ हजार बालकांची ह्रदय रोगाची ऑपरेशने करण्यात आली आहेत. इतर प्रकारची ४५ हजार ऑपरेशन्स करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे राजीव गांधी जीवनदायी योजनेतून काही ऑपरेशन करण्यात आली आहेत. राजीव गांधी जीवनदायी योजना यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. आता राजीव गांधी जीवनदायी योजना ८ जिल्ह्यात सुरु करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात टप्प्या टप्प्याने ही योजना राबविण्यात येणार आहे. इतर जिल्ह्यात योजना राबविण्यासाठी एमओयू करण्यात आले आहेत. यासाठी ४०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

पालघर, रत्नागिरी किंवा सिंधुदुर्ग जिल्ह्यात ही योजना ज्याप्रकारे राबविण्यात आली त्या प्रकारे प्रत्येक गावात यांचे पथक पोहचू शकते काय ? पालघर जिल्हयातील सर्व शाळांतील मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे काय ? किती मुलांची आरोग्य तपासणी केली याचे मॉडेल आमच्यासमोर ठेवण्यात यावे असे निदेश समितीने दिले असता विभागीय सचिवांनी माहिती थोड्या वेळात देण्याचे समितीस आश्वासित केले. (अद्याप माहिती अप्राप्त आहे.)

शाळांमधील मुलांची आरोग्य तपासणी कशी काय करण्यात येते याविषयी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, या योजनेच्या माध्यमातून शाळांतील मुलांची आरोग्य तपासणी कशी करावी याचे रोस्टर तयार करण्यात आले आहे. कोणते पथक

कोणत्या शाळेला भेट देणार याचे रोस्टर तयार करण्यात आले असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येते. फेब्रुवारी महिन्यापासून आतापर्यंत साडेचार महिन्यात जवळपास ९५ टक्के गावांतील शाळेच्या मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली असून ५ टक्के टार्गेट फक्त शिल्लक राहिले आहे.

योजना राबविताना ज्या अडचणी येतात त्या अडचणींवर मात करुन रॅन्डम चेकअप होणे आवश्यक आहे. १० ते १५ शाळांतील मुलांची आरोग्य तपासणी केल्यानंतर त्यापैकी एका शाळेतील मुलांची आरोग्य तपासणी नियंत्रक पथकाने केली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी "ज्या विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली जाते त्याला हेल्थ कार्ड दिले जाते. त्या कार्डवर काय तपासणी केली, त्याला कोणता आजार आहे, त्यावर कोणते औषधोपचार घेतले पाहिजेत याची नोंद केलेली असते" अशी माहिती दिली.

प्रत्येक गावात 'आशा' वर्कर नियुक्त करण्यात आल्या आहेत. या 'आशा' वर्कर घरोघरी जाऊन बाळांची तपासणी करतात त्या मुलांकडे हेल्थ कार्ड दिलेले असते त्यावर 'आशा' वर्कर नोंदी करु शकतात. 'आशा' वर्करकडे वेगळे हेल्थ कार्ड असते काय ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी 'आशा' वर्करची नियुक्ती गर्भवती महिलांची नोंदणी करण्यासाठी करण्यात आलेली आहे. त्यांच्याकडे हेल्थ कार्ड नसते ते मुलांची आरोग्य तपासणी करीत नाहीत अशी माहिती दिली.

'आशा' वर्कर गरोदर महिलांना घेऊन रुग्णालयात जातात व त्यांची नोंदणी करतात यासाठी त्यांना किती पैसा दिला जातो. हा त्यांचा पार्ट टाईम जॉब असला तरी त्यांना फुल टाईम त्यासाठी द्यावा लागतो. त्याचप्रमाणे जननी सुरक्षा योजनेच्या माध्यमातून गरोदर महिलांना शेवटच्या तीन महिन्यात चांगला आहार मिळावा यासाठी ७०० रुपये दिले जात होते ही योजना सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येते काय ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी ही "योजना महिला व बाल कल्याण विभागामार्फत राबविण्यात येते. जननी सुरक्षा योजनेमध्ये जेवण मोफत दिले जाते. जननी सुरक्षा योजनेअंतर्गत प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर आदिवासी महिलांना ५०० रुपये व अनुसूचित जातीतील महिलांना ७०० रुपये इन्सेन्टीव्ह दिले जातात" अशी माहिती दिली.

यासंदर्भात 'आशा' वर्करची संख्या आदिवासी विभागात ९००० इतकी आहे. अहवाल वर्षात संपूर्ण महाराष्ट्रात 'आशा' वर्करची संख्या ५१,७४१ पाहिजे होती. आता सन २००८-

२००९ मध्ये ६०,७४१ 'आशा' वर्करची आवश्यकता असताना २४,७०२ इतकेच 'आशा' वर्कर कार्यरत आहेत. ३६,०३९ 'आशा' वर्कर कमी आहेत. हे प्रमाण भरुन काढण्यात आले आहे काय ? अशी विचारणा महालेखाकार नागपूर, यांनी केली असता, विभागीय सचिवांनी "९००० 'आशा' वर्कर आदिवासी भागात कार्यरत आहेत, १००० लोकसंख्येसाठी एक 'आशा' वर्करची आवश्यकता आहे. शहरी भागात १५०० लोकसंख्येसाठी एक 'आशा' वर्करची आवश्यकता आहे. त्यानुसार ५९,४०६ 'आशा' वर्करची आवश्कता आहे. आता प्रत्यक्षात ५९,३१६ 'आशा' वर्कर कार्यरत आहेत. त्यामुळे 'आशा' वर्करचे टार्गेट पूर्ण करण्यात आले आहे" एका 'आशा' वर्करने एक गरोदर महिलेची नोंद केली तर तीला १०० रुपये इन्सेन्टीव्ह दिले जाते. राज्य सरकारकडून पगार दिला जात नाही. गाव पातळीवर आरोग्य सेवकाच्या माध्यमातून त्या काम करीत असतात अशी माहिती दिली. यावर समितीने सदरहू योजना अत्यंत चांगली असून, केंद्र सरकारकडून या योजनेला निधी मिळतो. 'आशा' वर्करांना पूर्ण वेळ काम करावे लागत असल्यामुळे त्यांना महिन्याला कमीत कमी १२०० ते १५०० रुपये तरी मिळाले पाहिजेत असे मत व्यक्त केले.

यासंदर्भात विभागीय सचिवांनी माहिती देताना सांगितले की, काही आशा वर्कर्सना दरमहा ८ हजार रुपये मिळतात. आशा कार्यकर्तींना दरमहा सरासरी तीन ते साडेतीन हजार रुपये मिळतात. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डॉक्टरकडे त्यांची दरमहा बैठक असते. गरोदर महिलांचे रजिस्ट्रेशन बरोबर करतात की नाही याचा आढावा तेथील डॉक्टर घेतात. ही प्रक्रिया संगणकीकृत केलेली आहे त्यामुळे आज किती गरोदर महिलांचे रजिस्ट्रेशन झाले, किती मुले जन्माला आली आणि त्यांना कोणता औषधोपचार पुरविला याची संपूर्ण माहिती त्या त्या दिवशी फोनवर येते.

आशा कार्यकर्तींच्या प्रशिक्षणासंदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, केंद्र शासनाने आखून दिलेल्या मॉड्युल्सप्रमाणे त्यांना प्रशिक्षण दिले जाते. त्यांचे मॉड्यूल्स घेऊन त्याचे मराठीकरण करुन पुस्तके तयार केलेली आहेत. त्यांचे ७ मॉड्यूल्स घेऊन प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर तेथील डॉक्टर, नर्सेस यांच्या मार्फत आशा कार्यकर्तींना प्रशिक्षण दिलेले आहे.

सदरहू योजनेद्वारे गंभीर आजार असलेल्या शाळेतील मुलांवर उपचार केले जातात. परंतु त्यांना दवाखान्यापर्यंत पोहचविण्याची व्यवस्था अपूरी असून मुले उपचाराअभावी दगावतात

तसेच जिल्हा ग्रामीण रुग्णालयातील परिस्थितीबाबत अभिप्राय व्यक्त करतांना बालमृत्युचे प्रमाण वाढत असल्याचे, बाळंतपणासाठी रुग्णालयात जागा अपूरी असल्याचे नमूद करुन योजना चांगली असली तरीही तीची अंमलबजावणी योग्य रीतीने होत नसल्याबाबत समितीने चिंता व्यक्त केली.

शिक्षणाशी संबंधित ज्या गोष्टी आहेत त्या शिक्षण विभाग करतात. हार्टचे ऑपरेशन असेल किंवा इतर गंभीर आजाराचे ऑपरेशन असेल तर ते आमच्या विभागामार्फत केले जाते. सर्व प्रोसीजर आम्ही करतो. विदर्भात काही बॅकलॉग होता. नागपूरला ऑपरेशन्स होऊ शकत नव्हते. त्यांना या ठिकाणी आणून ऑपरेशन्स केले असल्याची विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली.

बालमृत्युचे प्रमाण वाढण्यास हॉस्पीटल्स ओव्हरलोड होणे, प्रशिक्षित डॉक्टर्स पुरेसे नसणे, ह्या बाबी कारणीभूत आहेत हे समितीने निदर्शनास आणले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, बाळंतपणाचे प्रमाण वाढले आहे त्यामुळे पेशन्ट जास्त येतात. सर्व जिल्हा रुग्णालयांमध्ये मदर-चाईल्ड हेल्थ युनिट अपडेट करण्यात येत आहे. सर्व जिल्हा हॉस्पिटल्समध्ये न्यू बॉर्न केयर युनिट स्थापन करावयाचे आहे. त्या ठिकाणी ३० दिवसाच्या आतील मुले दाखल करुन घेण्यात येतात. त्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर इन्फ्रास्ट्रक्चर अपग्रेड केलेले आहे. भंडारा येथे अजून ते झालेले नाही. कारण त्या ठिकाणी सुरुवातीला जागा नव्हती. आता त्या ठिकाणी जागा मिळालेली आहे आणि काम सुरु झालेले आहे. बाकीच्या जिल्हा हॉस्पिटलमध्ये, स्त्री रुग्णालयांमध्ये खाजगी आर्किटक्क्चरच्या दर्जाचे एसएनसीयू केलेले आहे. मृत्यूदर कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. ज्या बालकाचे वजन १५०० ग्रॅमपेक्षा कमी आहे अशा बालकांचे मूत्यू झालेले आहेत. परंतु ॲडिशनल मॅनपावर दिलेले असल्याने हा मृत्यूदर आणखी कमी होईल. तसेच एसएनसीयूसाठी पिडियॉट्रीक लागतात. एमबीबीएस डॉक्टर मिळाले तर त्यांना केईएम हॉस्पिटलमध्ये १६ दिवसांचे प्रशिक्षण देऊन पिडियॉट्रीकचा प्रश्न सोडविला जातो. तसेच स्टाफ नर्सेसना सुध्दा प्रशिक्षण देण्यात येते.

बालमृत्युबाबत अधिक माहिती देतांना विभागीय सचिवांनी सांगितले की, राज्याचा बालमृत्यू दर २००१ मध्ये ४५ होता तो आता २५ झालेला आहे. महाराष्ट्रात रायगड जिल्ह्यामध्ये हा दर १२ आहे. गडचिरोलीमध्ये ३३ आहे, बीडमध्ये ३३ आहे. भंडारा जिल्ह्यातील बालमृत्यू दर २६ आहे. म्हणजे राज्याच्या सरासरीपेक्षा २ ने जास्त आहे. म्हणजे भंडारा

जिल्ह्यामध्ये शून्य ते एक वयोगटातील एक हजार मुलांपैकी २६ मुले मृत्यू पावतात. बुलढाणा जिल्ह्यात बालमृत्यूचे प्रमाण ३१ आहे. ठाणे जिल्ह्यात बालमृत्यूचे प्रमाण २६ आहे.

आपल्या राज्याची तुलना इतर आदिवासी राज्याशी करण्याऐवजी केरळसारख्या राज्याशी करावी. एक हजार मुलांपैकी २६ किंवा ३१ मुलांचा मृत्यू होणे हे भूषणावह नाही. योग्य उपचार न मिळाल्यामुळे १०० पैकी ३-४ मुलांचा मृत्यू होणे ही बाब योग्य नाही. हे जीव आपण वाचवू शकतो ते वाचविण्यामध्ये आपण कमी पडतो असे मत व्यक्त करुन समितीने केरळ राज्याचा बालमृत्यूचा दर किती आहे ? अशी विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी केरळ राज्याचा बालमृत्यूचा दर १३ असल्याचे सांगून सन २०१५ पर्यंत बालमृत्यूचा दर १७ पर्यंत खाली येईल अशा पध्दतीने प्रयत्न चालू असल्याची माहिती दिली.

राज्यात डॉक्टर्स, नर्सेस, एएनएम, तंत्रज्ञ, बालरोग तज्ज्ञ तसेच स्त्री रोग तज्ज्ञांची किती पदे रिक्त आहेत ? बाळंतपणाच्या दृष्टीकोनातून स्त्री रोग तज्ज्ञाची काय व्यवस्था केलेली आहे ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, डॉक्टरांची १५ टक्के पदे रिक्त आहेत. पुण्याला जी शासन पुरस्कृत एमकेसीएल संस्था आहे त्यांच्यामार्फत रिक्रुटमेंटची कार्यवाही मोठ्या प्रमाणात सुरु केली आहे. कॅबिनेटची परवानगी घेऊन एमपीएससीचे अधिकार त्यांना दिलेले आहेत. जे डॉक्टर उमेदवार आदिवासी, नक्षलग्रस्त भागातील असतील त्यांना २० टक्के जास्त गुण देण्यात येतात. जास्त गुण देण्याच्या पध्दतीमुळे सिंधुदुर्ग, रत्नागिरी येथे नियमितपणे डॉक्टर्स उपलब्ध झालेले आहेत. एम.बी.बी.एस.डॉक्टर्सना सेवेत येण्यापूर्वी एक वर्षाचा बॉण्ड द्यावा लागतो. दरवर्षी २५० ते ३०० उमेदवार मिळतात. उप संचालक यांना ॲडव्हॉक पध्दतीने डॉक्टरांची पदे भरण्याचे अधिकार दिले आहेत. त्यांना ११ महिन्याची ऑर्डर दिली जाते. त्यानंतर त्यांची ऑर्डर एक्सटेन्ड केली जाते. वर्ग- क मधील दरवर्षी ३ टक्के पदे भरण्याचे बंधन आता शिथील केले असल्यामुळे वॉर्ड बॉय, नर्सेस, एक्सरे टेक्निशियन ही पदे भरता येतील.

उप प्राथमिक आरोग्य केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, यासाठीच्या निकषासंदर्भात शासनाने महत्वाचा निर्णय घेतला आहे. ३० हजार लोकसंख्येसाठी एक प्राथमिक आरोग्य केंद्र, ५ प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी एक ग्रामीण रुग्णालय उभारण्याबाबत शासनाने महत्वाचा निर्णय घेतला आहे. ३० हजार लोकसंख्या असेल आणि तेथे प्राथमिक आरोग्य केंद्र नसेल तर तेथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्याबाबतचा

निर्णय बृहत्-आराखड्यात घेण्यात आला असून त्याप्रमाणे शासन निर्णय काढला आहे. बृहत् आराखड्यातील मंजूर कामांसाठी यावर्षी राज्याच्या बजेटमध्ये ४०० कोटी दिलेले आहेत. जेथे डोंगराळ प्रदेश असेल, आदिवासी भाग असेल तेथे बृहत आराखड्यानुसार हॉस्पिटल बांधण्याचा उपक्रम सुरु करण्याबाबत राज्य आयोगाने मंजुरी दिली आहे. शासकीय दवाखान्यात ऑपरेशन करण्यासाठी स्पेशॉलिस्ट डॉक्टर्स मिळत नाहीत. स्कीन स्पेशालिस्ट, ॲनेस्थिशिया, गायनॉकॉलॉजीस्ट, पेडियाट्रिक्स अशा विविध फॅकल्टीचे स्पेशॉलिस्ट दुर्देवाने आटोकाट प्रयत्न करुनही मिळत नाहीत म्हणून राज्य शासनामार्फत डॉक्टरांनी शासकीय सेवेत यावेत म्हणून ६ इन्क्रीमेंट नियुक्तीच्यावेळी दिली जातात.

यावर समितीने केंद्र सरकार डॉक्टर्सना जे वेतन देते त्याच्या ४० टक्केही वेतन देण्यत येत नाही त्यामुळे वैद्यकीय अधिकारी म्हणून कोणीही येण्यास तयार नसते. स्पेशॉलिस्ट डॉक्टर्स येत नाहीत त्याला कारण राज्य शासनाकडून देण्यात येणारे कमी वेतन हे आहे. त्यांना प्रोत्साहनपर भत्ता दिला पाहिजे असे मत व्यक्त केले.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, शासन हि योजना ८ जिल्ह्यात लागू केली असून या योजनेतंर्गत ४५ हजार ऑपरेशन्स झालेली आहेत. ज्यांच्याकडे पिवळे, केसरी रेशन कार्ड आहेत त्यांना या योजनेचा लाभ दिला जातो. आता राजीव गांधी जीवनदायी योजना २७ जिल्ह्यात लागू करण्यात येणार आहे. त्यासंबंधीचा (mou) झाला असून या आठवड्यात या प्रस्तावाला मान्यता मिळण्याची शक्यता आहे. हि योजना ऑगस्ट २०१३ पासून सर्व राज्यामध्ये ही योजना लागू करण्यात येईल.

जेथे १०० खाटांचे बेड ठेवले पाहिजे तेथे ३०० बेड ठेवले आहे. औंध हॉस्पिटलमध्ये १०० टक्के स्टाफ ठेवण्याची आवश्यकता नाही. येथील स्टाफ जेथे गरज असेल तिकडे शिफ्ट करावा असे समितीने सूचित केले असता, विभागीय प्रतिनिधींनी औंध हॉस्पीटलमध्ये पुढील आठवड्यात डायलसिस केंद्र सुरु करण्यात येत असल्याचे व वर्ग-३ मधील काही नर्सेसच्या बदल्या केल्या असल्याचे सांगून पुणे मेंटल हॉस्पिटलमधील १४ नर्सेसच्या बदल्या केल्या होत्या, परंतु त्यातील ८ बदल्या रद्द केल्या असल्याची माहिती समितीला दिली.

नर्सेसच्या संदर्भात अधिक माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, दहा हजार नर्सेसची मागणी असून त्यापैकी ७००० नर्सेसची पदे भरलेली असून ३००० नर्सेसची पदे

रिक्त आहेत. आता तीन टक्केची बंदी उठविलेली असल्यामुळे ती पदे लवकरच भरण्यात येतील. राज्यामध्ये मेहतर समाज मोठ्या प्रमाणात आहे. या समाजाचे राज्यभर मेळावे होतात. ते साफसफाईची कामे करतात त्यामुळे त्यांच्याबाबतीत शासनाने कोणते धोरण ठरविले आहे अशी विचारणा केली समितीने असता, विभागीय सचिवांनी "लाडपागे समितीच्या शिफारशी शासनाने मान्य केल्या आहेत. हॉस्पिटलमधील साफसफाई, कचरा आणि दवाखान्यातील इतर कचऱ्याची विल्हेवाट शात्र शुध्द पध्दतीने लावली जाते. हॉस्पिटल्समधील साफसफाई ट्रेनिंग मिळालेल्या लोकांकडून करण्यात येते" अशी माहिती दिली.

औंध हॉस्पिटलमध्ये एवढ्या स्टाफची आवश्यकता नाही त्यामुळे कर्मचारी वर्ग दुसरीकडे शिफ्ट करावा जेणेकरुन तेथील पदांची उणिव भरुन निघण्यास मदत होईल असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, शासनाने नर्सेसच्या बदलीसंबंधी धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. मागील तीन वर्षापासून बदली केलेली नाही. मंचर येथील हॉस्पिटलसाठी काही बदल्या केल्या. नवीन हॉस्पिटल्स सुरु करण्यासाठी काही इमारतींची बांधकामे पूर्ण झाली आहेत. ऑगस्ट महिन्यात औंध आवारात मेडिकल इमर्जन्सी सर्व्हीस सेंटर सुरु करण्यात येणार आहे. जवळपास एक हजार रुग्णवाहिका ठिकठिकाणी उभ्या राहणार असून त्याचे कॉल सेंटर औंध येथे असणार आहे. हा पूर्णतः शासनाचा उपक्रम आहे. या योजनेसाठी केंद्र सरकारकडून काही निधी मिळणार नाही. या रुग्णवाहिकेचे दोन प्रकारच्या सिस्टीम आहेत. पहिल्या प्रकारच्या रुग्णवाहिकेमध्ये बेसिक लाईफ सपोर्ट सिस्टिीम आहे तर दुसऱ्या प्रकारच्या रुग्णवाहिकेमध्ये ॲडव्हान्स लाईफ सपोर्ट सिस्टीम आहे. या रुग्णवाहिकेमध्ये व्हेन्टीलेटरची सोय करण्यात आलेली आहे. प्रत्येक रुग्णवाहिकेमध्ये डॉक्टर असणार आहे. तसेच या रुग्णवाहिका जीपीएस सिस्टीमने जोडल्या जाणार असून त्याचे कॉल सेंटर औंध येथे राहणार आहे. एखाद्या ठिकाणी अपघात झाला आणि तेथून फोन आल्यास त्या जवळच्या भागात कोणती रुग्णवाहिका उभी आहे हे जीपसीएस सिस्टीमद्वारे पाहून त्या रुग्णवाहिकेस अपघात स्थळी तातडीने पाठविता येईल. इर्मजन्सी मेंडिकल सर्व्हीस ही योजना पूर्णतः आऊट सोर्सिंगद्वारे राबविण्यात येणार आहे आणि त्यांच्यामार्फत रुग्णवाहिकेवरील वाहनचालकांची नियुक्ती होणार आहे. तसेच डॉक्टर्सची नियुक्ती आणि त्यांना ट्रेनिंग दिले जाणार आहे. कॉल सेंटर देखील तेच चालविणार आहेत. या योजनेमध्ये शासनाचा कोणताही

हस्तक्षेप असणार नाही. परंतु काही उणिवा वा त्रुटी आढळून आल्यास शासन कंत्राट रद्द करु शकते.

समितीने उक्त कामासाठी एनजीओची निवड कोण करणार आहे अशी विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी या संदर्भातील निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. दिल्ली येथील AIN संस्थेच्या सल्ल्याने ही संपूर्ण प्रक्रिया पार पाडलेली आहे. गुजरात राज्यामध्ये अशी सेवा सुरु असल्याची माहिती दिली.

संचालक, आरोग्य संचालनालयाच्या कार्यालयासमोर अनेक नवीन रुग्णवाहिका पडून असल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, एकूण २०० नवीन रुग्णवाहिका घेतल्या होत्या. या रुग्णवाहिका २५-३० च्या ग्रुपमध्ये येत होत्या. ज्या जिल्ह्यांना रुग्णवाहिकांचे वाटप झालेले आहे त्या जिल्ह्यातील वाहनचालक येऊन त्या रुग्णवाहिका घेऊन जात होते. मग दुसऱ्या ग्रुपमध्ये २०-२५ रुग्णवाहिका आल्यानंतर त्या त्या जिल्ह्यातील वाहनचालक येऊन त्या घेऊन जात होते. अशाप्रकारे सात-आठ ग्रुप आले त्यामुळे त्या ठिकाणी रुग्णवाहिका उभ्या असल्याचे चित्र दिसत होते. परंतु एकही रुग्णवाहिका तीन-चार दिवसांच्यावर राहिली नाही.

यासंदर्भात अधिक माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, एकूण २ हजार २२८ रुग्णवाहिका आहेत. त्यातील आठ ते दहा टक्के रुग्णवाहिका काही ना काही कारणाने दुरुस्तीसाठी बंद असतात. आता एक हजार रुग्णवाहिका मिळणार आहेत त्यामुळे ताण कमी होणार आहे. १५ वर्षापूर्वीच्या रुग्णवाहिका स्क्रॅपमध्ये न काढता त्या रुग्णवाहिकांचा उपयोग महिलांची प्रसुती झाल्यानंतर त्यांना घरपोच सेवा देण्यासाठी करण्यात येणार आहे. त्या रुग्णवाहिकांना चांगला रंग देऊन आतमध्ये टी.व्ही, उद्‌बोधक अशा फिल्म दाखविण्यात येणार असून त्या रुग्णवाहिकेचा सायरन लहान मुलाच्या हसण्याचा आवाजाचा आहे. गावात अशी रुग्णवाहिका आली म्हणजे गावात लहान मूल आले असे समजावे अशी ती संकल्पना आहे.

SHS कडून DHS कडे आणि DHS कडून CHS, PHC आणि उपकेंद्रे यांचेकडे निधी हस्तांतरीत करण्यात अनुक्रमे १७ ते २९० दिवस आणि ४८ ते २३५ दिवस विलंब झाला या विलंबाची कारणमिमांसा समितीने विचारली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, निधीचे हस्तांतरण करण्यास विलंब झालेला आहे ही वस्तुस्थिती असून आयपीएचएस कार्यक्रम अस्तित्वात आल्यानंतर सुरुवातीच्या तीन-चार वर्षात फायनान्स आणि प्रशासकीय यंत्रणा

कार्यान्वीत नव्हती. सन २००९ मध्ये फायनान्स डायरेक्टरची नियुक्ती झाली. सन २०११-२०१२ मध्ये ई-बँकिग सेवा सुरु केली तेव्हापासून रियल टाईम इन्र्मेशन मिळत आहे. सन २००५ ते २००९ या काळात निधीचे हस्तांतरण करण्यात विलंब झाला असला तरी त्याचा खर्चावर काही परिणाम झालेला नाही. सन २००६-२००७ मध्ये ९६ टक्के, सन २००७-२००८ मध्ये ७८ टक्के आणि सन २००८-२००९ मध्ये ११४ टक्के खर्च झालेला आहे.

महालेखापालांनी नमूद केल्यानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र, सीएचसी आणि उप केंद्रांची कामे झालेली नाहीत. त्याबाबत समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी माहिती देताना सांगितले की, १० ग्रामीण रुग्णालये बांधावयाची होती त्यापैकी ९ रुग्णालयांची कामे पूर्ण झालेली आहेत एक शिल्लक आहे. ६५ प्राथमिक आरोग्य केंद्रे बांधावयास घेतली त्यापैकी ४२ पूर्ण झालेली आहेत उर्वरित आरोग्य केंद्राची कामे प्रगतीपथावर आहेत. या वर्ष अखेरपर्यंत ती पूर्ण होतील. ७१३ सब-सेंटर्स बांधावयाची आहेत त्यापैकी ६५५ सब-सेंटर्सची कामे पूर्ण झालेली आहेत. उर्वरित सब सेंटर्सची कामे प्रगतीपथावर आहेत. एनआरएचएम अंतर्गत कार्यरत असलेली १०० इंजिनिअर्स ही सर्व कामे ते करीत आहेत. ग्रामीण रुग्णालयाच्या बांधकामापेक्षा मोठी कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केली जातात.

सन २००७ मध्ये केंद्र शासनाने फिरती वैद्यकीय पथके खरेदी करण्यासाठी निधी वितरित केला असताना सन २००९ पर्यंत एकही फिरती वैद्यकीय पथके विकत घेतली नाही. त्यामुळे जनतेला घर बसल्या वैद्यकीय सुविधा मिळू शकली नाही या आक्षेपाबाबत विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली की, केंद्र शासनाने ४० मोबाईल मेडिकल युनिट मंजूर केली होती. गडचिरोली, नंदूरबार आणि गोंदिया जिल्ह्यासाठी प्रत्येकी तीन युनिटस आणि उर्वरित जिल्ह्यांसाठी प्रत्येकी एक युनिट मंजूर होते. या मोबाईल मेडिकल युनिटसाठी टाटा, ले-लॅन्ड अशा तीन कंपन्यांकडून निविदा आल्या होत्या. छाननी समितीने टाटा कंपनीची निविदा नामंजूर केली. त्यानंतर मुदतवाढ मिळत गेली दरम्यान ते पैसे दुसरीकडे वापरले गेले. त्यानंतर ARAI पुणे या संस्थेची कन्सल्टन्ट म्हणून नियुक्ती करण्यात आली सन २००७-२००८ मध्ये केंद्र सरकारने ४० मोबाईल मेडिकल युनिटचे उद्दिष्ट दिले होते आणि आपण ते एकाच वेळी पूर्ण केलेले आहे.

सन २००५-२००६ मध्ये कुष्ठरोग्यांची असलेली संख्या आणि त्या नंतरच्या काळातील कुष्ठरोग्यांची संख्या पाहिली असता त्यामध्ये वाढ झालेली दिसत आहे. याबाबत समितीने

विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, कुष्ठरोग्यांची संख्या वाढलेली दिसत आहे, ही वस्तुस्थिती आहे. याचे प्रमुख कारण हे आहे की, यापूर्वी कुष्ठरोग्यांचे सर्व्हेक्षण केले जात नव्हते. आता सर्व्हेक्षण केल्यामुळे कुष्ठरोग्यांची नेमकी संख्या समजू शकली. प्राथमिक आरोग्य केंद्रामधून कुष्ठरोग्यांवर औषधोपचार केला जातो. पुणे येथील शासकीय लेप्रसी हॉस्पिटलसह राज्यातील अन्य ३ शासकीय रुग्णालयांमधूनही रुग्णांवर उपचार केला जातो.

अमरावती येथे श्री.शिवाजीराव पटवर्धन किंवा वर्धा येथे श्री.बाबा आमटे यांच्या माध्यमातून कुष्ठरोग्यांचे संगोपन व त्यांच्यावर औषधोपचार केला जातो. अशा प्रकारच्या अशासकीय संस्थांना शासनाने मदत केली तर कुष्ठरोग निवारण व रोग्यांवरील उपचाराचे मोठे काम राज्यात होऊ शकेल. याबाबत आरोग्य विभागाने काही विचार केला आहे का अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी माहिती देताना सांगितले की, राज्य शासनाकडून अशासकीय संस्थांना मदत केली जाते. राज्यात साधारणपणे कुष्ठरोग निवारणासंदर्भात १३ अशासकीय संस्था कार्यरत आहेत. त्यांच्या माध्यमातून एकूण २८६४ बेड्सव्दारे सुविधा दिली जाते. प्रति बेड, प्रति माह रु.११००/- याप्रमाणे शासकीय अनुदान या संस्थांना दिले जात होते. आता मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार प्रति बेड, प्रति माह रु.२२००/- एवढे अनुदान या संस्थांना शासनातर्फे दिले जाणार आहे. सध्या राज्यात खालील अशासकीय संस्थां कार्यरत आहेत.

(१) कुष्ठरोग निवारण समिती, शांतीवन, नेरे, जिल्हा रायगड
(२) अहमदनगर जिल्हा कुष्ठरोग निवारण समिती, अहमदनगर
(३) सोलापूर नगरपालिकेचे लेप्रसी हॉस्पिटल, सोलापूर
(४) रिचर्डसन लेप्रसी हॉस्पिटल, मिरज, जिल्हा सांगली
(५) मराठवाडा लोकसेवा मंडळ, नेरली, जिल्हा नांदेड
(६) कुष्ठरोग निवारण दवाखाना, वडोली, तालुका तलासरी, जिल्हा ठाणे
(७) लेप्रसी मिशन, कोठारा, जिल्हा अमरावती
(८) विदर्भ महारोगी सेवा मंडळ, तपोवन, जिल्हा अमरावती
(९) महारोगी सेवा समिती, आनंदवन, वरोरा, जिल्हा चंद्रपूर
(१०) महारोगी सेवा समिती, मनोहरधाम, दत्तापूर, जिल्हा वर्धा

(११) महात्मा गांधी शिक्षण संस्था, चावडी, जिल्हा बुलढाणा

(१२) एडुलजी फ्रेमली ऑलब्लेस निर्मया निकेतन लेप्रसी हॉस्पिटल, मुंबई

(१३) लेप्रसी रिलिफ ॲण्ड रिहॅबिलिटेशन, निंभोरा, जिल्हा अमरावती

एनआरएचएम योजनेच्या माध्यमातून कुष्ठरोग निवारणा संदर्भात शासनाने काही कार्यक्रम आखला आहे का अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी "पूर्वी काही वर्षे हा कार्यक्रम शासकीय रुग्णालयांमार्फत राबविण्यात येत होता. प्राथमिक आरोग्य केंद्रांना कुष्ठरोगी शोधण्याचे काम देण्यात आले होते. आता एनआरएचएममधून या कार्यक्रमाला विभागाकडून सपोर्ट करीत आहोत. कुष्ठरोग्यांसाठी विशिष्ट प्रकारच्या चपला घेणे, वगैरे मदत एनआरएचएम मधून केली जात" अशी माहिती दिली.

अशासकीय संस्थांमार्फत कुष्ठरोग्यांवर केल्या जाणाऱ्या औषधोपचारासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितली की, अशासकीय संस्थांकडे साधारणपणे २८६४ बेडस्ची क्षमता आहे. ६० टक्के ऑक्युपन्सी धरली तरी १४०० रुग्णांवर औषधोपचार केला जातो. त्याचप्रमाणे राज्यात ४ शासकीय लेप्रसी हॉस्पिटल्स असून तेथे एकूण १२०० बेडस् आहेत. अशा प्रकारे राज्यात एकूण ३००० रुग्णांवर उपचार करण्याची सुविधा उपलब्ध आहे. या व्यतिरिक्त स्थानिक स्तरावर शासकीय व अशासकीय रुग्णांलयांमध्ये ओपीडीच्या माध्यमातूनही कुष्ठरोग्यांवर औषधोपचार केला जातो. शासनामार्फत शालेय आरोग्य कार्यक्रमांअंतर्गत विद्यार्थ्यांची तपासणी केली जाते. या तपासणीमधून ० ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांना झालेल्या कुष्ठरोगाचे निदान केले जाते. लहान वयातच या आजाराचे निदान झाल्यामुळे त्यांच्यावर लवकर उपचार सुरु होतात. हा कार्यक्रम सुरु केल्यामुळे मोठ्या प्रमाणावर कुष्ठरोगी शोधणे शक्य झाले आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून वेगवेगळ्या योजना राबविण्यात येत आहेत. या सर्व योजनांची माहिती, या योजनांच्या संदर्भात केंद्र शासनाकडून मिळणारा निधी, राज्य सरकारकडून वितरित होणारे अनुदान, या विभागाचे एकूण बजेट, योजनेचे स्वरुप व उद्दिष्ट अशी एकत्रित माहिती विभागाने समितीला सादर करावी असे समितीने निदेश दिले. (अद्याप माहिती अप्राप्त आहे.)

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM) (२) ग्राम आरोग्य आणि सफाई समिती (VHSC) (३) जननी सुरक्षा योजना (JSY) (४) पुनरुत्पादन व शिशू आरोग्य देखरेख (RHC) प्रतिक्षमता व रोग नियंत्रण कार्यक्रम (५) अंधत्व नियंत्रणासाठी राष्ट्रीय कार्यक्रम (NPCB)

(६) राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम (RNTCP) (७) राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम (NLEP) या योजनांबाबत निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय व अन्य सर्व माहिती समितीला सादर करावी असे निदेश दिले परंतु माहिती अद्याप अप्राप्त आहे.

सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत सरासरी ९५ टक्के इतकी नवीन थुंकी अस्तिभावदर्शक प्रकरणे निदर्शनास आली असून ती ७० टक्के या विहित लक्ष्यापेक्षा फारच जास्त होती याबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, पॉझिटिव्ह पेशंटच्या माध्यमातून क्षयरोग पसरतो. प्रत्येक पॉझिटिव्ह रुग्णाच्या माध्यमातून क्षयरोग पसरतो, असे नाही. ज्यांच्या थुंकीतून जंतू येतात, अशा रुग्णांमार्फतच हा रोग पसरतो. केंद्र शासनाने असे किमान ७० टक्के रोगी शोधण्याचे लक्षांक दिले होते. राज्याने साधारणपणे ९५ टक्के रुग्ण शोधले आहेत. त्यामुळे दिलेल्या लक्षांकापेक्षा कितीतरी जास्त रुग्ण शोधण्यात आपल्याला यश मिळाले आहे. क्षयरोगाच्या रुग्णांची संख्या वाढली आहे, असे नाही. शोधलेल्या ९५ टक्के पॉझिटिव्ह रुग्णांवर उपचार करुन त्यामधील ८० टक्के रुग्णांमधील रोग दूर करण्यात आला आहे.

भुसावळ, जिल्हा जळगाव येथील शासकीय रुग्णालयात पोस्टमार्टेमची सुविधा आहे. परंतु, त्या ठिकाणी डॉक्टर व अन्य कर्मचारी वर्गाची नियुक्ती केलेली नसल्यामुळे अडचण निर्माण झाली आहे. भुसावळ येथे रेल्वेचे मोठे जंक्शन आहे. त्यामुळे तेथील अपघाताचे प्रमाणही मोठे आहे. ज्या ठिकाणी सुविधा आहे, त्या ठिकाणी डॉक्टर व अन्य कर्मचारी वर्ग उपलब्ध नाही. औंध येथील पोस्टमार्टेम युनिटमध्ये डॉक्टर व अन्य कर्मचारी नाहीत. अमरावती येथील चांदूर रेल्वे पोस्टमार्टेम युनिटमध्ये देखील अशीच अवस्था आहे. त्यामुळे राज्यात एकूण किती ठिकाणी पोस्टमार्टेमची सुविधा उपलब्ध आहे, त्या ठिकाणी डॉक्टर व अन्य कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे का, असल्यास, किती ठिकाणी, नसल्यास, किती कालावधीत नियुक्ती केली जाणार आहे, याबाबत समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी या वर्षी ३२ पोस्ट मार्टेम सेंटरचे अपग्रेडेशन करण्यात येणार आहे. नवीन बांधकाम करण्यात येणार असून नातेवाईकांसाठी शेड व पिण्याच्या पाण्याची सुविधा निर्माण करण्यात येणार आहे अशी माहिती दिली.

रुग्णालयाचे नवीन बांधकाम, नातेवाईकांसाठी शेड, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था यापेक्षा त्या ठिकाणी डॉक्टर व अन्य कर्मचारी उपलब्ध नसणे, ही मोठी समस्या आहे. याबाबतीत

विभाग कोणती कार्यवाही करणार आहे अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी "एमबीबीएस डॉक्टरांकडून पोस्टमार्टेम केले जाते. एमबीबीएस डॉक्टरांची कमतरता लक्षात घेऊन फोरॅन्सिक एक्सपर्टची पदे निर्माण करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून त्याला मंजुरी मिळेल, अशी अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे पोस्टमार्टेम रिलेटेड ट्रेनिंग प्रोग्रॅम आरोग्य विभागामार्फत राबविला जातो. मागील वर्षी राज्यात ९६ ठिकाणी कोल्ड स्टोअरेज उपलब्ध करुन देण्यात आले होते. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी पोस्टमार्टेमची सुविधा आहे" अशी माहिती दिली.

महालेखाकार नागपूर, यांनी परिच्छेद ३.१.१ "वैद्यकीय प्रतिपुर्तीचे लबाडीने प्रदान" या संदर्भात अभिप्राय व्यक्त करताना परळी वैजनाथ, बीड येथील मेडिकल रिएम्बसर्मेंटमध्ये बोगस वैद्यकीय बिले वैद्यकीय अधीक्षक यांनी स्वत: तसेच इतर स्टाफने प्रस्तुत करुन मेडिकल बिलाचे पैसे घेतले. ग्रामीण रुग्णालय, परळी वैजनाथ यांनी जी बोगस बिले सादर केलेली आहेत यामध्ये वैद्यकीय अधीक्षक हे स्वत: जबाबदार आहेत. यामध्ये त्यांची स्वत:चीही बिले असल्यामुळे त्यांची जबाबदारी निश्चितच जास्त येते. त्यामुळे संबधितांवर काय कारवाई केलेली आहे याची समितीला माहिती देण्यात यावी असे नमूद केले.

त्याअनुषंगाने विभागीय सचिवांनी "परळी, वैजनाथ ग्रामीण रुग्णालयामध्ये ७६ बनावट वैद्यकीय प्रतीपुर्ती देयके देण्यात आली होती, यामध्ये ५९ लोकांचा समावेश होता. या प्रकरणाची एकूण किंमत १२.४४ लक्ष रुपये असून यासंदर्भातील सिव्हील सर्जन, बीड यांच्या मार्फत चौकशी करण्यात आली होती. चौकशी अहवालाच्या अनुषंगाने यासंदर्भात संपूर्ण १२.४४ लक्ष रुपये वसूल करण्यात आलेले आहेत. **(परिशिष्ट अ)** या प्रकरणाच्या संदर्भात डीई सुरु करावयाची असून त्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाला कालच प्राप्त झालेला असून या प्रकरणात डीई सुरु केली जाणार आहे हे प्रकरण सन २००८ पूर्वीचे आहे. डीई सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाकडे अगोदर आला नसल्यामुळे या प्रकरणात डीई सुरु करण्यात आली नव्हती. परंतु या संदर्भात आता लवकरच डीई सुरु केली जाणार आहे अशी माहिती दिली.

हे प्रकरण ५ वर्षापूर्वी घडलेले असतांना डीई सुरु करण्याची माहिती शासनाकडे कोणी पाठवली नाही ? सन २००८ मध्ये घडलेल्या प्रकरणाच्या डीईच्या संदर्भातील माहिती शासनाकडे सन २०१३ मध्ये पाठविण्यात आलेली आहे. या डीईचा निकाल १० वर्षाने लागेल आणि तोपर्यंत या प्रकरणातील अधिकारी/कर्मचारी निवृत्त होऊन जातील. या प्रकरणामध्ये जे

कोणी दोषी आहेत त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी या प्रकरणात उशीर झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे. परंतु या प्रकरणातील संबंधित व्यक्तींवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई केली जाणार आहे. एक आठवडयाच्या आत कारवाईला सुरुवात केली जाईल असे समितीस आश्वासित केले.

समितीने, एनआरएचएमचा भ्रष्टाचार एवढया प्रकरणापुरताच झालेला नसून प्रत्येक जिल्हयात तो झालेला आहे. विधानसभेतही यासंदर्भातील अनेक प्रश्न उपस्थित होत असतात. एनआरएचएमच्या माध्यमातून गरीब माणसांसाठी शासनामार्फत करोडो रुपये खर्च होत असतात परंतु तरी सुध्दा ही योजना प्रभावीपणे राबवली जात नाही ही वस्तुस्थिती समितीने निदर्शनास आणली असता विभागीय सचिवांनी एनआरएचमच्या संदर्भातील दोन तीन जिल्हयांमध्ये अनियमितता झाली असल्याची माहिती आली होती त्यामुळे या प्रकरणाच्या खोलात जाऊन संबंधितावर कारवाई करण्यात आलेली आहे. इतर राज्याच्या तुलनेने महाराष्ट्रामध्ये एनआरएचएमचे काम चांगल्या पध्दतीने सुरु आहे असे समितीस विदित केले.

समितीने गडचिरोली येथे एनआरएचएम मध्ये गैरव्यवहार झाल्याची बाब निदर्शनास आणली असता विभागीय सचिवांनी गडचिरोली येथे एनआरएचएम माध्यमातून खरेदीमध्ये अनियमितता झाल्याची बाब मान्य केली. समितीने बोगस वैद्यकीय बिल घेणाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्यात आले यासंदर्भात विचारणा केली असता यासंदर्भात अधिक माहिती देतांना परळीयेथे घटना घडल्यानंतर संपूर्ण राज्यात बोगस वैद्यकीय बिलाच्या संदर्भात चौकशी केली असता ३ ठिकाणी आम्हाला बोगस प्रकरणे दिसून आली. मलेरिया अधिकारी, जिल्हा ठाणे यांच्याकडे १९ कर्मचाऱ्यांच्या संदर्भात ३.७७ लक्ष रुपयांची बिले बोगस पध्दतीने देण्यात आली असल्याचे आम्हाला आढळून आले होते. यासंदर्भात सुध्दा संपूर्ण रक्कम वसूल करण्यात आली असून संबंधितांवर एफआयआर दाखल करण्यात आलेले आहेत. या विषया संदर्भात डीआरएमओ यांना निलंबित करुन त्यांच्यावर डीई सुरु करण्यात आली असून संबंधित १९ कर्मचाऱ्यांना सस्पेंड करुन त्यांच्यावरही डीई सुरु करण्यात आलेली आहे. मे, २०१३ मध्ये परभणी प्रकरण घडले होते. या २९ प्रकरणात ९.९४ लक्ष रुपयांची अनियमितता आढळून आली होती. यासंदर्भात वसुलीची नोटीस देण्यात आली असून डीईची कारवाई सुरु केली जाणार आहे. तसेच नागपूर सर्कलमध्ये ८ प्रकरणे सापडली होती. श्रीगोंदा, लाखांदूर, गोंदिया येथील महिला रुग्णालय आणि भंडारा येथील जनरल हॉस्पिटल या ठिकाणी प्रकरणे आढळून आली.

या ठिकाणच्या ८ प्रकरणामध्ये ७७ हजाराची अनियमितता झाली असून ही सर्व रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. या प्रकरणातही डीई सुरु केली जाणार आहे असे समितीस विदित केले.

पाच वर्षे विलंबाने डीईसाठी प्रस्ताव पाठविण्यामध्ये कोणकोणते अधिकारी जबाबदार आहेत ? त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी डेप्युटी डायरेक्टर हेल्थ सर्व्हीसेस, लातूर यांच्याकडे पेपर्स पडून होते. त्यांनी हे प्रस्ताव डायरेक्टर हेल्थ ऑफिसेसकडे पाठविल्यानंतर हे पेपर विभागाकडे आले. या प्रकरणात पेपर पाठविण्यामध्ये ज्यांनी डिले केलेला आहे त्यांच्यावर विभागाकडून कारवाई करणार असल्याची माहिती दिली. समितीने सदरहू प्रकरण घडल्यापासून ते आजच्या दिवसापर्यंत यासंदर्भातील फाईलचा प्रवास कसा कसा झाला याची लेखी माहिती समितीला सादर करण्याबाबत निदेश दिले असता विभागीय सचिवांनी समितीस माहिती देण्याचे आश्वासित केले. (अद्याप समितीस माहिती अप्राप्त आहे.)

समितीने ठाणे, परभणी, लातूर या ठिकाणी झालेल्या अनियमिततेबाबत त्यावर काय कारवाई केली तसेच यामध्ये डिले करणाऱ्यावर काय कारवाई केली याची माहिती समितीला उपलब्ध करुन देण्याचे निदेश दिले असता विभागीय सचिवांनी माहिती देण्याचे समितीस आश्वासित केले. (सदरहू माहिती समितीस अद्याप अप्राप्त आहे.)

समितीने ग्रामीण रुग्णालय लाखांदूर, गोंदिया, भंडारा, सिरोंचा या ठिकाणच्या प्रकरणाच्या संदर्भात काय कारवाई करण्यात आलेली आहे ? अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी आतापर्यंत जी काही अपहाराची प्रकरणे घडलेली आहेत त्याप्रकरणातील संपूर्ण रक्कमेची रिकव्हरी झालेली असून अहवालललललललल आल्यानंतर कारवाईला सुरुवात केली जाणार असल्याची माहिती दिली.

अभिप्राय व शिफारशी

केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाचा (NHKM) उपक्रम एप्रिल २००५ रोजी पासून सन २००५-१२ या कालावधीसाठी देशात सर्वत्र सुरु केलेला आहे. अभियानाचा उद्देश हा ग्रामीण क्षेत्रात, राष्ट्रीय AIDS नियंत्रण आणि कर्करोग नियंत्रण कार्यक्रमाव्यतिरिक्त आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचा, पृथक राष्ट्रीय रोग नियंत्रण कार्यक्रम केंद्राभिमुख करुन सुगम, परिणामकारक आणि विश्वसनीय आरोग्य देखरेखीची सुविधा प्रदान करणे हा होता.

(NHKM) घटकामध्ये आरोग्य क्षेत्रातील विकेंद्रित नियोजन सुकर करणे, स्त्री व शिशु विकास, पंचायत राज इत्यादी संबंधित सामाजिक क्षेत्र विभागांना एककेंद्राभिमुख करणे यांचा समावेश आहे. महाराष्ट्रात ऑक्टोबर २००५ मध्ये अभियान सुरु झाले व नोव्हेंबर २००५ मध्ये आरोग्य संस्था (SHS) अस्तित्वात आली.

या अभियानाच्या अनेक उद्दिष्टांपैकी एक उद्दीष्ट माता बाल संगोपन व नवजात बालकांची काळजी घेणे हे होते सन २००१-२००२ मध्ये १००० बाळंतपणामागे माता मृत्यूदर १६९ होता तो आता २०११-२०१२ मध्ये १०४ पर्यंत खाली आला. सन २००१-२००२ मध्ये दर १००० बालकामागे बाल मृत्यू दर ४५ होता तो आता सन २०११-२०१२ मध्ये २५ पर्यंत खाली आला असल्याची माहिती साक्षीदरम्यान विभागाकडून समितीस मिळाली. केरळ राज्याचा बालमृत्यू दर १३ आहे त्याप्रमाणे महाराष्ट्रमध्ये सुध्दा प्रगती व्हावी असे समितीचे अभिप्राय आहेत याकरीता **ज्या क्षेत्रामध्ये घरगुती बाळंतपणाचे प्रमाण जास्त आहे त्या क्षेत्रांमध्ये सहाय्यकारी परिचर्या प्रसविका** (ANM) **सहाय्यीत सुरक्षित घरगुती बाळंतपणाकरीता कार्य योजना आखावी तसेच केवळ संस्थात्मक** (institutional) **बाळंतपणावर भर न देता सुरक्षित बाळंतपण व त्यानंतर बालसंगोपन कसे होऊ शकेल यावर जास्त लक्ष केंद्रीत करुन केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी व बाळंतपणातील महिलांचा व बालकांचा मृत्युदर सद्य:स्थितीत किती आहे याची माहिती तीन महिन्यात समितीला देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

गरोदर महिलांची नोंदणी करण्यासाठी "आशा" वर्कर यांची नेमणूक करण्यात आली आहे "आशा" वर्कर ची जबाबदारी गरोदर महिलांना रुग्णालयात घेऊन जाणे, त्यांना मार्गदर्शन करणे व बाळंतपण होईपर्यंत रुग्णालयात राहणे अशी आहे. आदीवासी विभागामध्ये तब्बल ९००० आशा वर्कर कार्यरत असल्याची व सध्या जवळपास ५९,३१६ आशा वर्कर कार्यरत असल्याची माहिती समितीस साक्षीदरम्यान मिळाली. "आशा" वर्करला शासनाकडून एका गरोदर महिलेमागे १०० रु. भत्ता दिला जातो. सदरहू भत्ता अतिशय कमी असून "आशा" वर्कर अर्धवेळ कामगार असल्या तरीही त्यांना पूर्णवेळ काम करावे लागत असल्याने त्यांना महिन्याला निश्चित वेतन मिळणे आवश्यक आहे. **योजनेची अंमलबजावणी यशस्वी रित्या होण्याकरिता व त्यांच्यावर विशिष्टजबाबदारी निश्चित करण्याचा दृष्टीकोनातून त्यांना पूर्ण वेळ कामगाराचा दर्जा देवून निश्चित वेतन देण्यात यावे तसेच अभियांनांतर्गत योजनांचा फायदा**

गरोदर महिलांपर्यंत पोहचविण्यामध्ये आशा वर्करची भुमिका अत्यंत महत्वाची असल्याने प्रत्येक गरोदर स्त्रीसाठी प्रोत्साहनपर भत्ता देण्यात यावा, देण्यात यावा अशीही समितीची शिफारस आहे.

मानवतेच्या दृष्टीकोनातून "आशा" वर्करला सर्व प्रकारच्या महिलांना सहकार्य करावे लागत असल्याने "आशा" वर्करला मानधन देण्यामध्ये दारीद्रय रेषेखाली गरोदर गरोदर स्त्री (BPL) किंवा दारिद्रय रेषेच्या वर असलेली गरोदर स्त्री (APL) असा भेद न करता सर्व स्त्रियांच्या बाळंतपणाकरीता मानधन देण्यात यावे, तसेच **"आशा" वर्करना बाळंतपणाच्या वेळी महिलेसोबत बाळंतपण होईपर्यंत रहावे लागत असल्याने रुग्णालयामध्ये त्यांना थांबण्याकरिता निवासाची व्यवस्था करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

समितीसमोरील साक्षीदरम्यान राज्यात गडचिरोली, नंदुरबार आणि गोंदिया जिल्हयासाठी प्रत्येकी तीन फिरत्या वैद्यकीय पथकाचे युनीट्स व उर्वरित जिल्हयासाठी प्रत्येकी एक युनीट्स असे एकूण ४० युनिट्स असल्याचे समितीस सांगण्यात आले परंतु मंजूर असलेल्या या ४० युनिट्स पैकी सर्व युनिट्स कार्यान्वित नसल्याचे मत समितीने व्यक्त केले. फिरत्या वैद्यकीय पथकाद्वारे गंभीर आजार असलेल्या शाळकरी मुलांवर उपचाराची व्यवस्था करण्यात आली आहे. **राज्यातील विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेता ही व्यवस्था फारच अपुरी आहे. शहरी भागातून फिरत्या वैद्यकीय पथकाची आवश्यकता नाही. ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यी, महिला व इतर यांच्यासाठी फारच आवश्यक आहे. ४० हे फिरत्या वैद्यकीय पथकाचे युनिट्स अपुरे असल्याने रुग्णांना रुग्णालयामध्ये पोहचविण्याची व्यवस्था अपूरी असल्याने उपचार वेळेत मिळत नसल्याने मुले व अन्य रुग्ण उपचाराअभावी दगावतात ही बाब समितीच्या निदर्शनास आली. जिल्हयातील विशेषत: ग्रामिण व आदिवासी भागात फार मोठया प्रमाणात विखुरलेली लोकसंख्या विचारात घेता सदरहू युनिट्स पुरेसे नसल्याचे मत समितीने व्यक्त केले. आदिवासी बहुल पूर्ण जिल्ह्यांसाठी व अन्य जिल्ह्यातील ग्रामीण व आदिवासी भागासाठी संपूर्ण राज्याकरिता जवळपास १०० युनिट्ची व्यवस्था करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

समितीपुढील साक्षी दरम्यान विभागाने सध्या सर्व गट मिळून २४ टक्के पदे रिक्त असून त्यामध्ये डॉक्टरांची १५ टक्के पदे रिक्त असल्याचे समितीच्या निदर्शनास आणले. एम.बी.बी.एस डॉक्टरांना सेवेत येण्यापर्वी एक वर्षाचा बॉन्ड दयावा लागतो त्यामुळे दरवर्षी

२५० ते ३०० उमेदवार मिळतात असेही समितीच्या निदर्शनास आणले गेले. परंतु, ही तात्पूरती व्यवस्था असून बॉन्ड संपल्यानंतर कोणताही उमेदवार ग्रामीण स्तरावर काम करण्यास इच्छूक नसतात असे समितीचे मत आहे. खाजगी रुग्णालये व शासकीय रुग्णालयाची तुलना करतांना शासकीय रुग्णालयात काही ठिकाणी योग्य मुलभूत सोयी सुविधा, प्रशिक्षित डॉक्टर व इतर सुविधा खाजगी रुग्णालयापेक्षा अधिक चांगल्या असताना सुध्दा कार्य क्षमतेतील कमी असलेल्या सोयीसुविधांचा योग्य प्रकारे वापर करण्याचा अभाव यामुळे शासकीय रुग्णालाची अवस्था बिकट होत चालली आहे. याकरिता शासकीय रुग्णालयात काम करणाऱ्या **डॉक्टरांना आर्थिक व इतर सोयी सवलती देण्यात याव्यात व त्याचबरोबर डॉक्टरांच्या सेवेचे मूल्यमापन रुग्णांकडून करुन त्याचा अहवाल शासनास देण्यात यावा व त्याप्रमाणे जिल्हास्तरीय रुग्णालये सशक्त करण्यात यावी तसेच जिल्हा रुग्णालयाचा स्तर वैद्यकीय महाविद्यालयासारखा उंचाविण्याकरीता विशेष कार्ययोजना आखण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.**

कुष्ठरोग निवारणासंदर्भात १३ अशासकीय संस्था कार्यरत असल्याचे विभागाकडून समितीच्या निदर्शनास आणले गेले. त्यांना प्रतिबेड प्रतिमाह २२०० रु. एवढे अनुदान देण्यात येते. अशासकीय संस्थाकडे २८६४ बेड्सची क्षमता आहे. त्याचप्रमाणे राज्यात ४ लेप्रसी हॉस्पिटल असून एकूण १२०० बेड्सची व्यवस्था आहे. त्यामुळे **अशासकीय संस्थाचे सबलीकरण ही काळाची गरज असल्याने सदरहू संस्थांच्या क्षमता वृध्दीसाठी शासन स्तरावरुन विशेष उपाययोजना करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

राज्यात कुष्ठरोग निवारण अभियान पूर्णपणे यशस्वी न होण्यामागे अप्रशिक्षित कर्मचारी वर्ग व प्रशिक्षण सेंटर्सची कमतरता तसेच राष्ट्रीय, राज्य, आणि जिल्हा स्तरीय प्रशिक्षण सेंटर्स मध्ये मेळ नसणे हे असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. **राष्ट्रीय, राज्य व जिल्हास्तरीय प्रशिक्षण सेंटर मध्ये मेळ** (Linkage) **स्थापन करण्यासंदर्भात व प्रशिक्षित कर्मचारी वर्ग नेमण्याबाबत कार्यवाही व्हावी अशीही समितीची शिफारस आहे.**

ग्रामीण रुग्णालय परळी वैजनाथ (बीड) येथील वैद्यकीय प्रतिपुर्तीची रु. १२.६० लाख रुपयाची बोगस बिले प्रदान केली आहेत. तसेच सदरहू बिले योग्य प्रकारे न तपासता संमत केल्याचा ठपका वैद्यकीय अधिक्षकावर ठेवण्यात आला आहे. ७६ बनावट वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या प्रकरणात समावेश असलेल्या ५१ व्यक्तींकडून रु. १२.४४ लक्ष रुपये वसूल करण्यात आले असून दोषी व्यक्तींना निलंबित करण्यात येऊन त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी करण्याचे

प्रस्तावित असल्याचेही समितीस सांगण्यात आले. सदरहू प्रकरण सन २००७ मध्ये उद्‌भवले असतांना विभागीय चौकशी संदर्भातील प्रकरण शासनाकडे सन २०१३ मध्ये पाठविण्यात आले. या विलंबास डेप्युटी डायरेक्टर हेल्थ सर्विसेस, नागपूर हे जबाबदार असून विलंबास कारणीभूत असणाऱ्या विरुध्द कारवाई करण्यात येत असल्याचेही विभागाकडून समितीस सांगण्यात आले. याबाबत सदरहू प्रकरणी एका रुग्णालयातील तब्बल ५१ व्यक्तीचा समावेश असणे व वैद्यकीय अधिक्षकांनी ही देयके व्यवस्थित न तपासता संमत करणे, कोषागार अधिकाऱ्यांनी बिलाची छाननी करतांना त्यांची जबाबदारी योग्यरित्या पार न पाडणे हे सामुहीक भ्रष्टाचाराचे मुर्तीमंत उदाहरण असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. अशा प्रकरणी कनिष्ठ कर्मचारी यांच्यावर कारवाई होत असल्याचे व वरीष्ठ अधिकारी सबबीखाली सहीसलामत सुटतात हे योग्य नसून अशा प्रकरणी पर्यवेक्षण (SUPERVISION) करणाऱ्या वरीष्ठ अधिकाऱ्यांवरही जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

सदरहू प्रकरणी वैद्यकीय अधिक्षकांनी प्रतिपूर्तीची देयके योग्यरित्या न तपासता संमत केली, कोषागार अधिकाऱ्यांनीही सन २००० च्या मार्गदर्शक तत्वानुसार योग्यरित्या बिलाची छाननी न करता बिले प्रदान केली असल्याने त्यांची जबाबदारी निश्चित करुन नियमानुसार कारवाई करावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत द्यावी तसेच विभागीय चौकशी संदर्भातील नस्ती उप संचालक, लातूर यांचेकडे कधी आली त्यांच्याकडून सदरहू नस्ती, संचालक आरोग्य यांच्यकडे कधी आली व ती नस्ती शासनाकडे कधी आली याची इत्यंभूत माहिती विभागाने समितीला आश्वासीत करुनही अद्यापपावेतो दिली नाही ही अतिशय गंभीर बाब असून समितीला आश्वासित माहिती वेळेत न देणाऱ्या संबंधितावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्याच्या आत समितीला द्यावी अशी समितीची शिफारस आहे.

ग्रामविकास विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००८-०९ या वर्षाच्या नागरी अहवालातील (१) परिच्छेद क्र. २.३.६.२ "निधीचा कमी वापर" (२) परिच्छेद क्र. २.३.६.३ "केंद्रिय सहाय्यतेची कमी मिळकत" (३) परिच्छेद क्र. २.३.६.४ "बंद योजनेच्या निधीचे हस्तांतरण" (४) परिच्छद क्र. २.३.६.५ "हरीयाली योजनेअंतर्गत निधी उपलब्धतेत विलंब" (५) परिच्छेद क्र. २.३.७.१ "वार्षिक नियोजनाची तयारी" (६) परिच्छेद क्र. २.३.८.१ "गरीबी रेषेखालील कुटुंबाची निवड" (६) परिच्छेद क्र. २.३.८.२ "गरीबी रेषेखालील यादीचे अद्ययावतीकरण" (७) परिच्छेद क्र. २.३.९.१ "जिल्हा ग्रामीण विकास योजनेच्या नियामक मंडळ/कार्यकारी समितीच्या बैठका" यासंदर्भात महालेखापरिक्षकांनी खालील अभिप्राय दिलेले आहेत.

निधीचा कमी वापर :

२००४-०९ या कालावधीत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांना चार मुख्य योजनांकरीता (स्व.ग्रा.वि.यो.प्रशासन इ.आ.यो. हरियाली आणि जि.ग्रा.वि.यं.प्रशासन) रु. २,७४८.०० कोटी मिळाले होते. सुरुवातीची शिल्लक रु. ७३.८२ कोटीसह एकूण मिळालेल्या रु. २,८२२.२२ कोटी निधीपैकी जि.ग्रा.वि.यंत्रणानी रु. २,७१३.६२ कोटी इतकी रक्कम खर्च करुन रु.१०८.६० कोटी इतकी रक्कम अखर्चित ठेवली.

२००४-०५ ते २००८-०९ या कालावधीत लेखापरीक्षणामध्ये समाविष्ट असलेल्या चार मुख्य योजनांतर्गत संपूर्ण राज्याकरीता म्हणून आणि चाचणी परीक्षा झालेल्या आठ जिल्ह्याकरीता मिळालेल्या, उपलब्ध झालेल्या आणि खर्च झालेल्या निधीचा तपशील अनुक्रमे परिशिष्ट २.२१ आणि परिशिष्ट २.२२ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

परिशिष्टातून असे लक्षात येईल की, स्व.ग्रा.स्व.यो. आणि इ.आ.यो. ह्या अंतर्गत २००४-०५ ते २००८-०९ ह्या कालावधीत झालेल्या निधीच्या विनियोगाचे प्रमाण एकूण उपलब्ध निधीच्या ९३ ते ९८ टक्के ह्या प्रमाणात होते. त्याचप्रमाणे जि.ग्रा.वि.यंत्रणा प्रशासन योजनेअंतर्गत असलेल्या निधीचा विनियोग सुध्दा समाधानकारक होता आणि त्याचे प्रमाण ६५ टक्के आणि ८३ टक्के ह्या दरम्यान होते. तथापि, हरियाली योजनेअंतर्गत निधीचा विनियोग फक्त ४८ टक्के आणि ६२ टक्के ह्या दरम्यान होते. चाचणी परीक्षा झालेल्या जिल्ह्यामधील

अभिलेख्यांची तपासणी केली असतासुध्दा तेच चित्र दिसून येत होते. जि.ग्रा.वि. यंत्रणा प्रशासन ह्या योजनेअंतर्गत असलेल्या निधीच्या कमी विनियोगासाठी मनुष्यशक्तीची कमतरता व त्यामुळे जि.ग्रा.वि. यंत्रणांच्या कार्यावर झालेला वाईट परिणाम ह्या बाबींस जबाबदार धरण्यात आले होते. हरियाली योजनेअंतर्गत उपलब्ध करुन देण्यास झालेला विलंब, जसे की, परिच्छेद २.३.६.५ ह्या मध्ये म्हटले आहे ती बाब जबाबदार होती.

ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला

रायगड - जि.ग्रा.वि.यंत्रणा प्रशासन योजनांतर्गत निधीच्या कमी विनियोगासाठी मनुष्यशक्तीची कमतरता होती. परंतु आता सर्व पदे भरण्यात आली असून निधीचा वापर यथायोग्य करण्यात येतो.

नंदुरबार - इंदिरा आवास योजनांतर्गत सन २००४-०५ ते २००८-०९ निधीचा विनियोग झालेला आहे. तसेच जि.ग्रा.वि.यंत्रणा प्रशासन योजनेंतर्गत विनियोग उपलब्ध मनुष्यबळानुसार पूर्ण होता.

हिंगोली - जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अंतर्गत SGSY, IAY योजनेकरीता सन २००४-२००९ या कालावधीत प्राप्त झालेला निधी गरजूंना उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

यवतमाळ - स्व.ग्रा.स्व.योजना, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रशासन व इंदिरा आवास योजना यांचे सन २००८-०९ या कालावधीतील उपलब्ध निधी व केलेल्या खर्चाचे विवरणपत्र सोबत जोडले आहे.

भंडारा - जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा स्तरावर केंद्रपुरस्कृत त्या त्या योजनांचे मार्गदर्शिका प्रमाणे निधी प्राप्त होत असतो. तसेच १० टक्के निधी अखर्चीत ठेवण्याबाबत नमूद आहे. त्यामुळे प्रत्येक वर्षी त्या त्या योजनेचा खर्च ९० टक्के पेक्षा अधिक झालेला आहे. त्यामुळे निधीचा कमी वापर झालेला नाही.

राज्यातील ग्रामीण विकासाच्या केंद्र पुरस्कृत योजना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत राबविण्यात येतात. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार जि.ग्रा.वि.यंत्रणेसाठी आवश्यक असलेला १२७२ पदांचा आकृतीबंध सन २००४ मध्ये निश्चित करण्यात आलेला असून या आढाव्यामध्ये पदे प्रतिनियुक्तीने किंवा करार पध्दतीने भरण्यास मान्यता दिलेली आहे. या

पदांचा खर्च भागविण्यासाठी केंद्र शासनाकडून ७५ टक्के व राज्य शासनाकडून २५ टक्के निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमधील वर्ग १ व वर्ग २ ची पदे विविध विभागांमधून प्रतिनियुक्तीने भरण्यात येतात. तसेच वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांमधून भरण्यात येतात. तथापि, जिल्हा परिषद तसेच शासनाचे संबंधित विभागामध्ये कर्मचारी/अधिकाऱ्यांची मूळ आस्थापनेवरील पदे रिक्त असल्याने वारंवार मागणी करुनही प्रतिनियुक्तीने कर्मचारी/अधिकारी उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे केंद्र शासनाने दिनांक १ मे २००६ अन्वये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमधील रिक्त पदे करार पध्दतीने भरण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार राज्य शासनाने दिनांक २२.८.२००६, दिनांक ३०.३.२००७ व दिनांक ११.९.२००७ च्या आदेशान्वये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांमधील रिक्त पदे करार पध्दतीने भरण्याच्या सूचना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांना दिलेल्या आहेत. (सोबत संबंधित शासन निर्णयाच्या / परिपत्रकाच्या प्रती जोडल्या आहेत) त्यानुसार शासनाने विशेष मोहीम आखून त्या अंतर्गत विविध जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमधील वर्ग एकची-४ पदे, वर्ग दोनची-४२ पदे, वर्ग तीनची-८८ पदे अशी एकूण १३४ पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात आलेली आहेत. यापुढेही रिक्त होणारी पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात येणार आहेत. सबब, सदर परिच्छेद वगळण्यात यावा.

केंद्रीय सहाय्यतेची कमी मिळकत -

राज्याच्या हिश्याची कमी उपलब्धता असल्यास आणि एकूण वार्षिक वाटप निधीच्या १५ टक्क्याहून जादा निधी विना वापर म्हणून शिल्लक राहिल्यास केंद्र शासन केंद्रीय सहाय्यतेमध्ये कपात करते. आठ चाचणी परीक्षा झालेल्या जिल्ह्यांमध्ये रू.१२.१६ कोटी इतका केंद्रीय सहाय्यता निधी, जादा निधी पुढे ओढणे, राज्य शासनाच्या हिश्याची कमी रक्कम उपलब्ध करून देणे आणि वाहनांच्या खरेदीवरील अमान्य खर्च ह्या बाबीमुळे, ज्याचा तपशील परिशिष्ट २.२३ मध्ये दिला आहे. कमी मिळाला होता. दोन जि.ग्रा.वि.यंत्रणांमध्ये (हिंगोली आणि यवतमाळ) राज्याच्या हिश्याचे रू.१.५२ कोटी २००६-०७ (रू.०.०४ कोटी) आणि २००८-०९ (रू.१.४८ कोटी) ह्या कालावधीमध्ये उपलब्ध करून देण्यात आले नव्हते. जि.ग्रा.वि.वं.ठाणे यांनी जि.ग्रा.वि.वं.प्रशासनांतर्गत निधीच्या कमी वापरास मनुष्य शक्तीच्या तुटवड्यास जबाबदार धरले होते आणि जि.ग्रा.वि.वं. यवतमाळ ह्यांनी वाहन खरेदीवरील अमान्य खर्च स्विकारला

होता. स्व.ग्रा.स्व.यो.आणि इ.आ.यो.ह्या अंतर्गत झालेल्या कमी खर्चाकरिता/जादा निधी पुढे ओढण्याकरिता जि.ग्रा.वि.यंत्रणांनी कोणतीही कारणे दिली नव्हती.

ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला

रायगड :- सन २००५-२००६ मध्ये रक्कम रू.२००००/- जादा सादील खर्च झाल्याने केंद्र शासनाकडून कमी निधी प्राप्त झाला होता. परंतु येणाऱ्या पुढील वर्षात सादील खर्च वेतन व प्रवासाभत्ता यांचे एकूण खर्चाचे ३०% यास अधीन राहून सादील खर्च करण्याची दक्षता घेण्यात आली असून केंद्र शसनाकडून कमी निधी प्राप्त होणार नाही याबाबत दक्षता घेण्यात आली आहे.

ठाणे :-

अ.क्र.	पद	रिक्त पदाचा कालावधी
१	लेखाधिकारी	४.४.२००८ ते १८.५.२०१०
२	तांत्रिक सहाय्यक	१.४.२००५ ते ३०.१०.२००६
३	तांत्रिक सहाय्यक	१.४.२००५ ते ३०.९.२००८
४	लिपिक-टंकलेखक	१.४.२००५ ते ३.४.२००७

वरील प्रमाणे सुमारे ३ वर्षापर्यंत लेखाधिकारी, तांत्रिक सहाय्यक व लिपिक-टंकलेखक ही पदे जवळ जवळ तीन वर्षापर्यंत रिक्त असल्याने प्रशासन अंतर्गत निधीचा कमी वापर झालेला आहे.

अहमदनगर_:-जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अहमदनगर या कार्यालयाचे प्रशासन खर्चामध्ये वाहन खरेदी रक्कम रू.२.६३ लक्षचा समावेश असल्याने सन २००७-०८ पासून केंद्र शासनाचे वाहन खरेदी करण्यास मनाई केली असल्याने वाहन खरेदीची रक्कम रूपये २.६३ लक्ष नाकारण्यात आली असून ती रक्कम सन २००७-०८ या आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या हप्त्याचे मंजूर अनुदानामध्ये कपात करण्यात आली आहे.

नंदुरबार :- सन २००५-०६ व सन २००६-०७ करिता अनुक्रमे रू.०.०६ कोटी व ०.०५ कोटी रक्कम कमी प्राप्त झालेली आहे. कारण या योजनेंतर्गत सन ०४-०५ मधील दुसरा हप्ता हा माहे मार्च २००५ मध्ये प्राप्त झाल्याने सुरूवातीची शिल्लक वाढीव दिसते. तसेच नवीन कार्यालय असल्याने आकस्मिक खर्च झालेला आहे. कर्मचारी संख्या कमी असल्याने त्या

प्रमाणात आकस्मिक निधी जादा खर्च झालेला असल्याने रू.०.०६ कोटी पुढील खर्चाकरिता कमी प्राप्त झाला.

तसेच सन ०७-०८ व सन ०८-०९ करिता इंदिरा आवास योजनेंतर्गत रू.३२२.९१ लक्ष व रू.११३.५८ लक्ष कमी निधी प्राप्त झाला. त्याचे कारण सन ०८-०९ दिनांक १९.३.०८ रोजी रू.४६.३७९ लक्ष, दि.२४.३.०८ रोजी रू.१८.०० लक्ष, दि.१७.३.०८ रोजी रू.४३७.१७ लक्ष अतिरिक्त निधी प्राप्त झाला व कमी प्राप्त झालेला निधी भरून निघाला आहे.

माहे मार्च महिन्याच्या शेवटच्या तारखांना दिलेले धनादेश पुढील वर्षी एप्रिल महिन्यात खर्च पडल्याने अखर्चित (Uncash) धनादेशाची रक्कम अखेरचा शिल्लक निधीत जमा केल्याने सुरूवातीची शिल्लक वाढली व त्या प्रमाणात कमी निधी प्राप्त झाला आहे. सन ०५-०६ मध्ये स्वर्णजयंती ग्रा.यो.रू.६६.७३ लक्ष सुरूवातीच्या शिल्लकेच्या प्रमाणात कमी पैसे प्राप्त झाले त्याचे कारण मार्चच्या शेवटच्या दिवसातील अदा केलेले धनादेश माहे एप्रिल महिन्यात खर्ची पडले व बँक ताळमेळात अखर्चीत दिसल्याने ते सुरूवातीच्या शिलकेत धरण्यात आले.

वरील बाबी या तांत्रिक कारणामुळे घडत आहे. यापुढे धनादेश त्याच महिन्यात खर्ची पडणेबाबत खबरदारी घेण्यात येत आहे.

हिंगोली :- स्वर्ण जयंती ग्राम योजनेची १०० टक्के रक्कम खर्च झालेली आहे. तसेच इंदिरा आवस योजने अंतर्गत सन २००७-०८ मधील शिल्लक रक्कम रूपये ६०.६१ एवढी असून त्यामध्ये रू.५५.३० लक्ष एवढी न वटलेल्या धनादेशाची रक्कम आहे. जे धनादेश दिनांक ३१.३.२००६ ला राज्य शासनाने दिलेल्या निधीचे आहेत ते एप्रिल २००८ मध्ये रोखीकृत झालेले आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष मिळूनही रूपये ५.३० लक्ष एवढी आहे. तसेच सन २००८-२००९ मध्ये रू.५३.३५ लक्ष एवढ्या रक्कमेचे धनादेश दिनांक ३१.३.२००९ ला राज्य शासनाने दिलेल्या निधीच्या वितरणाचे आहेत. जे एप्रिल २००९ मध्ये रोखीकृत झाले आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष शिल्लक ही रूपये १८.२२ लक्ष आहे. त्यानुसार सन २००४-०९ या कालावधीतील तीनही योजनांची शिल्लक केंद्र शासनाच्या निकषानुसार १५ टक्क्यापेक्षा कमी आहे.

यवतमाळ :- जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांकरिता केंद्र व राज्य शासनाकडून निधी प्राप्त होतो. तपासणी कालावधीत केंद्र शासनाकडून योजना निहाय निधी अधिक सादील खर्चामुळे कमी प्राप्त झाला.

भंडारा :- जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेअंतर्गत अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन व भत्ते तसेच ३०% किरकोळ खर्चासह वार्षिक खर्च नमूद आहे. परंतु त्या आर्थिक वर्षात यंत्रणे अंतर्गत प्रकल्प अधिकारी, सहाय्यक प्रकल्प अधिकारी, लेखा अधिकारी यांचे पद रिक्त असल्यामुळे आवश्यक त्या प्रमाणात खर्च न झाल्यामुळे पुढील वर्षातील सुरूवातीची शिल्लक रहिल्यामुळे त्या आर्थिक वर्षात सुरूवातीची शिल्लक अधिक असल्याच्या सबबीवर केंद्र अनुदानात कपात करण्यात आली होती.

इंदिरा आवास योजनेअंतर्गत पंचायत समिती स्तरावर अखर्चीत निधी असल्यामुळे कपात लावण्यात आलेली होती. त्याबाबत केंद्र शासनाकडे आवश्यक पाठपुरावा करण्यात आला आहे.

एप्रिल, १९९९ पासून स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना (एसजीएसवाय) अंमलात आली. त्यापूर्वीचे एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, स्वयंरोजगारासाठी ग्रामीण युवकांना प्रशिक्षण, ग्रामीण क्षेत्रातील महिला व बाल विकास, ग्रामीण कारागिरांना सुधारीत हत्यारसंच पुरविणे, गंगाकल्याण योजना आणि दशलक्ष विहिरी योजना या कार्यक्रमासाठी असलेली दिनांक १ एप्रिल, १९९९ रोजी खर्च न केलेली शिल्लक रक्कम या स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या शिर्षाखाली एकत्रित झाली. सदर रक्कम पूर्वीची शिल्लक म्हणून अधिक असल्याने जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, भंडारा यांना एसजीएसवाय मध्ये रू.१०१.९६ लाख इतकी कपात लावण्यात आली. सुरूवातीची ही शिल्लक इतर अन्य योजनेच्या निधीची असल्यामुळे कपात करण्यात आली आहे.

बंद योजनांच्या निधीचे हस्तांतरण -

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून राबविली जाणारी संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये टप्प्या टप्प्याने २००६-०७ मध्ये विलीन करण्यात आली आणि संपूर्ण ग्रामीण योजनेचा अखर्चित निधी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेकडे हस्तांतरीत होणे आवश्यक होते. छाननीमध्ये असे आढळून आले की, आठ चाचणी परीक्षा झ ालेल्या जि.ग्रा.वि.यंत्रणांपैकी सहा यंत्रणांमध्ये मार्च २००९ अखेरपर्यंत संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना खात्यामध्ये रू.५.३० कोटी इतका अखर्चित निधी पडून होता आणि तो निधी संबंधित जिल्हा/राज्य शासनाच्या जिल्हाधिकाऱ्याकडून राबवल्या जाणाऱ्या महाराष्ट्र ग्रामीण रोजगार

हमी योजनेकडे हस्तांतरीत करण्यात आला नव्हता. जि.ग्रा.वि.यंत्रणा अखर्चित निधी हस्तांतरीत करण्यास तयार झाल्या. (मार्च ते मे २००९)

ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला

सहा. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांनी आक्षेपांची पूर्तता खालीलप्रमाणे केलेली आहे.

अहमदनगर :-_संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या खात्यात रू.७.८४ लाख व त्यावरील व्याज रू.१.३८ लाख याप्रमाणे एकूण रू.९.२२ लाख इतकी अखर्चित रक्कम मार्च २००९ अखेर शिल्लक होती. या रकमेतून रू.५.८२ लाख रकमेची तीन तालुक्यांची प्रलंबित देयके अदा करून उर्वरीत रक्कम रू.३४०३४१/- महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या खात्यात दिनांक ३१.३.२००९ रोजी धनादेशाद्वारे भरणा करण्यात आली आहे.

भंडारा :-_संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामाची रू.९९१५१४/- इतक्या रकमेच्या देयकांची अदायगी प्रलंबित असल्याचे सनदी लेखापालांच्या सन २००६ च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये दर्शविण्यात आलेले आहे. रू.३.९४ लाख ही रक्कम परिच्छेदात नमूद केलेल्या अखर्चित रक्कम रू.३.९४ लाखापेक्षा जास्त आहे. सनदी लेखापालांकडून खातरजमा करून घेतल्यानंतर सदरच्या प्रलंबित देयकांच्या अदायगीसाठी शिल्लक असलेली अखर्चित रक्कम वापरली जाणार आहे. त्यामुळे रू.३.९४ लाख ही रक्कम महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या खात्यात अद्याप हस्तांतरीत करण्यात आलेली नाही.

नंदुरबार :- संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या खात्यात अखर्चित रक्कम रू.२८.३६ लाख व त्यावरील व्याज रू.०.९९ लाख याप्रमाणे एकूण रू.२९.३५ लाख इतकी रक्कम दिनांक १३.५.२०११ रोजी ०५१५ इतर ग्रामीण विकास कार्यक्रम या जमा लेखाशीर्षाखाली चलनाद्वारे भरणा करून सरकार जमा केलेली आहे.

हिंगोली :-_संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या खात्यात अखर्चित रक्कम रू.३.६३ लाख इतकी रक्कम शिल्लक असल्याचे परिच्छेदात नमूद केले आहे. तथापि, प्रत्यक्ष रू.३७३१९९ इतकी रक्कम अखर्चित होती व ती महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना खात्यात दिनांक ३०.३.२००७ रोजी धनादेशाद्वारे भरणा करण्यात आली आहे.

रायगड :- संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या खात्यात मार्च २००९ अखेर रू.८४.८० लाख इतकी अखर्चित रक्कम शिल्लक असल्याचे परिच्छेदात नमूद केले आहे. तथापि, प्रत्यक्षात

दिनांक ४.४.२००९ रोजी खात्यात रू.८६.४४ लाख इतकी रक्कम शिल्लक होती. सदर रकमेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेची अखर्चित रक्कम	**रू.५९.३७ लाख**
SGSY योजनेची RTGSद्वारे जमा झालेली रक्कम	रू.१६.८७ लाख
तालुकास्तरावर परत पाठविलेले धनादेश	रू.०.७७ लाख
धान्य वाहतूक	रू.६.९० लाख
दारिद्र्यरेषेखालील सर्वेक्षण	रू.२.५३ लाख
एकूण	**रू.८६ ४४ लाख**

वरीलपैकी संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेची अखर्चित रक्कम रू.५९.३७ लाख व तालुकास्तरावरील अखर्चित रक्कम अधिक व्याज मिळून एकूण रू.६५.२७ लाख इतकी रक्कम जिल्हाधिकारी यांच्या मंजूरीनुसार संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजना बंद झाल्याच्या दिनांक ३१ मार्च, २००८ अखेरच्या अपूर्ण कामांवर खर्च करण्यासाठी गट पातळीवर वर्ग करण्यात आली आहे. उर्वरीत अखर्चित रक्कम रु. ८.६१ लाख दिनांक २९/११/२०१० रोजी धनादेशाद्वारे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना खात्यात वर्ग करण्यात आली आहे.

SGSY अंतर्गत उचल केलेल्या धान्यांची अनुषंगिक खर्चाची रक्कम रू. ७.२५ लाख अप्पर जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे दिनांक २०.११.२०१० रोजी वर्ग करण्यात आली आहे. दारिद्र्य रेषेखालील सर्वेक्षणाची रक्कम रू.२.५३ लाख खर्च करण्यात आली आहे.

ठाणे :- संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या खात्यात मार्च २००९ अखेर रू.४०१.४३ लाख इतकी अखर्चित रक्कम शिल्लक असल्याचे परिच्छेदात नमूद केले आहे. सदरची रक्कम संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सन २००१-०२ ते २००६-०७ या वित्तीय वर्षातील मंजूर अन्नधान्यांच्या वाहतूक, साठवणूक व वितरण इत्यादी खर्चासाठी राज्य शासनाकडून Non-Plan योजनेतर लेखाशीर्षाखाली प्राप्त झालेली असल्याने महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना खात्यात वर्ग करण्यात आली नव्हती. त्यापैकी रू.३७५.९१ लाख इतकी रक्कम जिल्हा पुरवठा अधिकारी, ठाणे यांचेकडे दिनांक १३.५.२०१० रोजी वर्ग करण्यात आली आहे. उर्वरीत रक्कम अधिक तीवरील व्याज मिळून रू.५६.८० लाख लाख शिल्लक असून ती योग्य त्या लेखाशीर्षाखाली सरकारजमा करणेबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

हरियाली योजनेअंतर्गत निधी उपलब्धतेत विलंब -

स्वर्णजयंती ग्रामीण स्वयंरोजगार योजना किंवा इंदिरा आवास योजना ह्यांमधील लाभधारकांना निधी उपलब्ध होण्यास कोणत्याही प्रकारचा लक्षांत राहील असा विलंब झालेला दिसून आला नव्हता. तथापि, हरियाली योजनेकरीता ठेवलेल्या रोख वह्यांची छाननी केली असता असे आढळून आले कि जरी प्रकल्प राबविणाऱ्या संस्थांना आणि ग्रामपंचायतींना केंद्र शासन व महाराष्ट्र शासन ह्यांचेकडून निधी मिळाल्यपासून १५ दिवसांचे आत निधी उपलब्ध करून द्यावयाचा होता तरी २००४-०९ या कालावधीत एकूण चाचणी परीक्षा झालेल्या आठ जि.ग्रा.वि.यंत्रणांपैकी सहा यंत्रणेमध्ये रू.९.३० कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात तीन ते सत्तेचाळीस महिन्यांइतका विलंब झालेला दिसून आला. जि.ग्रा.वि.यंत्रणांकडून निधी उपलब्ध करून देण्यात आलेल्या विलंबामुळे योजनांच्या अंमलबजावणीवर खूप वाईट परिणाम झाला होता.

ज्ञापन :-

सदर परिच्छेदातील आक्षेपाबाबत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्याकडून प्राप्त झालेले स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहे.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ठाणे.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा ठाणे यांच्याकडून सर्व प्रकल्पाच्या पहिल्या हप्त्याचे निधी वितरण करण्यास विलंब झाला आहे. त्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१. केंद्र शासनाने सर्व प्रकल्पांच्या मंजूरी सोबत पहिला हप्ता निधी वितरीत केला त्यावेळी प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण यांची नियुक्ती झाली नव्हती.
२. तसेच सर्वेक्षण करून प्रकल्प आराखडे तयार केलेले नव्हते.
३. प्रकल्प आराखड्यांना तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी नव्हती. वरील सर्व बाबींची पूर्तता करून कामे चालू होण्यास एक ते दीड वर्षांचा कालावधी गेला. नंतरचे सर्व हप्ते प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण यांना वेळेत वितरीत केले आहेत. ह्या कार्यालयाकडून निधी वितरण करण्यास कोणतेही दिरंगाई झाली नाही. वरील प्रमाणे केलेला खुलासा मान्य करण्यात येऊन परिच्छेद निकाली काढण्यास विनंती आहे.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, रायगड.

भारताचे मुख्य लेखापरिक्षक व नियंत्रक यांनी घेतलेल्या तालुक्यात राबविला जात आहे. या हरियाली प्रकल्पास २४/१०/२००४ रोजी केंद्र शासनाची मान्यता मिळाली व सदर योजनेचा केंद्र हिस्सा पहिला हप्ता रू.४१.२५ लक्ष दिनांक ३/११/२००४ रोजी प्राप्त झाला. त्यानंतर प्राप्त निधीचे वितरण करताना, हप्ता विभागून ३ ते १० महिन्यांच्या उशिराने वितरीत केला गेला. इतर सर्व वेळी वेळेत व पूर्ण निधी संबंधित समित्यांकडे वर्ग करण्यात आलेला आहे.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे प्राप्त निधी १५ दिवसात वर्ग करण्याबाबत मार्गदर्शक सूचना आहेत. तथापि, निधी वर्ग करताना पुढील मुद्यांचा विचार करावा लागतो.

१. कामाचे नियोजन व मागणीपत्र पाणलोट विकास समितीकडून प्रकल्प कार्यान्वयन अभिकरणामार्फत प्राप्त झाले आहे किंवा नाही.
२. पूर्वी वितरीत निधीचे खर्चाचे प्रमाण व उपयोगिता प्रमाणपत्र पाणलोट समितीने सादर केले आहे किंवा नाही.

त्यामुळे रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील हरियाली प्रकल्पाच्या निधी वितरणास झालेला विलंब हा वरील दोन मुद्दयांची खात्री करण्याच्या प्रक्रीयेमुळे झालेला आहे. त्याचप्रमाणे पहिल्या हप्त्याच्या निधी वितरणास झालेल्या उशिरास पुढील कारणे दिसून येतात.

१. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयातील पाणलोटाच्या सर्व योजनांसाठीचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी हे तांत्रिक अधिकाऱ्याचे पद ऑगस्ट २००९ पर्यंत रिक्त होते. त्यामुळे मार्गदर्शक सूचनांचे योग्य तांत्रिक मार्गदर्शन प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण व ग्रामस्तरावर पोहोचू शकले नाही.
२. तसेच मार्गदर्शक सूचनांचे आदेशांचे अन्वयार्थ व्यवस्थित न लागल्याने निधी वितरणास विलंब झाला.

तथापि, दुसऱ्या हप्त्याच्या प्राप्तीनंतर निधी वितरणातील त्रुटी दूर करण्यात आलेल्या आहेत.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, भंडारा.

परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे हरियाली योजनेअंतर्गत प्राप्त झालेले निधी नुसार योजनाअंतर्गत कार्यान्वयन यंत्रणा व ग्राम विकास समिती, संयुक्त वन संरक्षण समिती यांचेकडून त्या अंतर्गत असलेले प्रारूप आराखड्यांतर्गत प्राप्त झालेल्या प्रशासकीय मान्यता व

तांत्रिक मंजुरी नंतर प्रकल्पाअंतर्गत कामे करण्याकरीता मार्गदर्शक सूचनांनुसार पाणलोट व्यवस्थापन पथक (WDT) यांची नियुक्ती झाल्यानंतर आवश्यकतेनुसार आराखड्याअंतर्गत प्रकल्प कार्यान्वयन कामाकरीता, प्रशिक्षण, मानधन, आराखडे तयार करणे, तसेच पाणलोटाच्या अंतर्गत कामाकरिता वेळोवेळी निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा यांना आवश्यकतेनुसार निधी वितरीत करण्यता आलेला आहे. सदर प्रकरणी शासनाकडून उपसंचालक व सहसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग यांना सदर योजनेचे कार्यान्वयन व पर्यवेक्षणांचे कामाकरिता नियुक्त केले आहे. त्यामुळे सामाजिक वनीकरण विभाग यांचेकडून सदर प्रकल्पावरील प्रगतीवर वेळोवेळी कार्यान्वयन/नियोजन न केल्यामुळे प्रकल्पावरील निधी वितरणामध्ये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाकडून विलंब झाला आहे.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, हिंगोली.

सदरच्या आक्षेपानुसार हरियाली योजनेअंतर्गत निधी वितरित करताना संबंधित पाणलोट समिती कडून कामा संदर्भातील प्रस्ताव व आराखडे इत्यादी आवश्यक माहिती वेळीच उपलब्ध न झाल्यामुळे व पूर्वी दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र त्यांचेकडून वेळीच प्राप्त न झाल्यामुळे जिल्हा स्तरावरून निधी वितरीत करण्यास विलंब झालेला आहे. यापुढे याबाबत दक्षता घेण्यात येत आहे.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नंदुरबार.

सदर योजनेत प्राप्त झालेला निधी प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण यांची नेमणूक उशीरा झाल्याने व त्यांच्याकडील तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे ही योजना रखडली गेली व ७ ते ८ महिने प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण यांना निधी उशीरा देण्यात आलेला आहे. सद्यःस्थितीत योजनेला प्राप्त झालेला निधी वेळेवर देण्यात येत आहे.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड.

केद्र पुरस्कृत हरियाली, कार्यक्रमांतर्गत निधी उपलब्धतेच्या विलंबाबाबत सदर योजनेत प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण यांना दिलेल्या निधीचे उपायोजन प्रमाणपत्र, आरंभीची शिल्लक व प्राप्त निधीचा ताळमेळ घेवुन शासनास स्पीडपोष्टद्वारे पाठविणे तसेच केंद्रशासनाच्या सूचनांप्रमाणे दिल्ली येथे जाऊन प्रत्यक्ष त्रुटीची पूर्तता करणे इत्यादी कारणाने निधी प्राप्त होण्यास विलंब होतो, परंतु प्राप्त झालेला निधी मार्गदर्शक तत्वाप्रमाणे विहीत करण्यात जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणामार्फत वितरीत करण्यात येतो.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, यवतमाळ.

हरियाली योजनेअंतर्गत उपचार कामांकरीता पूर्वी वितरीत केलेला निधी खर्ची घालून खर्च केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र, कामाचे मूल्यांकन व निधी मागणी प्रस्ताव संबंधित पाणलोट विकास समितीने प्रकल्प कार्यान्वयन अभिकरणामार्फत सादर करण्यात न आल्यामुळे पुढील निधी वितरीत करण्यात आलेला नाही. जसे जसे निधी मागणी प्रस्ताव कार्यालयास सादर करण्यात आले त्याप्रमाणे निधीचे वितरण करण्यात आले आहे. तरी सदर परिच्छेदाचे अनुपालन मान्य करून परिच्छेद वगळण्यात यावा.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अहमदनगर.

अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम हरियाली योजनेअंतर्गत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा स्तरावरील तांत्रिक सहाय्यक व सहाय्यक प्रकल्प अधिकारी ही पदे रिक्त असले कारणाने निधी प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा यांना वितरीत करण्यास विलंब झाला होता. परंतु, २००८-०९ नंतर प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा यांना अनुदान विहीत मुदतीत वितरीत करण्यात आलेले आहे. कृपया वरील परिस्थिती विचारात घेता सदर मुद्दा वगळणेस विनंती आहे.

लाभधारकांची निवड

गरीबी रेषेखालील कुटूंबाची निवड-

केंद्र शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या गरीबी विरोधातील वेगवेगळ्या कार्यक्रमांत गरीबी रेषेखालील कुटूंबे लाभधारक असल्यामुळे जि.ग्रा.वि.यं.प्रत्येक पंचवार्षिक योजनेच्या सुरूवातीस एक "गरीबी रेषेखालील" जनगणना आयोजित करतात. त्यानुसार गरीबी रेषेखालील जनगणना २००२ जि.ग्रा.वि.यंत्रणेमार्फत २००३-०४ मध्ये आयोजिण्यात आली होती. प्रत्येक कुटुंबाच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा आढावा घेऊन गुणसंख्या आधारित दर्जा दर्शविणारी कार्यपद्धती जनगणनेकरिता स्विकारली होती. ह्याकरिता प्रत्येक दर्शकासाठी शून्य ते चार अशी गुणसंख्या ठेऊन १३ दर्शकांची रचना करण्यात आली होती. गरीबीरेषेखालील जनगणना मार्गदर्शक सूचनांप्रमाणे ह्या दर्शकानुसार उच्चतम मर्यादेपर्यंत गुणसंख्या मिळविलेल्या कुटूंबियाचा समावेश २००२ च्या गरीबीरेषेखालील यादीत करण्यात आला होता. अशा तऱ्हेने जि.ग्रा.वि.यंत्रणांनी तयार केलेली ग.रे.खालील यादीची संगणकीय मूळ माहिती शासनाच्या ग्रामीण विकास आणि पंचायत राज विभागास अंतिम स्वरूप देण्याकरिता आणि मान्यतेकरिता पाठविण्यात आली होती.

गरीबी रेषेखालील यादीत ज्या कुटूंबियांची नावे समाविष्ट करण्यात आली होती. ते जि.ग्रा.वि.यं.आणि इतर संस्थांकडून राबविल्या जाणाऱ्या योजनांसाठी लाभाधिकारी म्हणून पात्र होते. एकूण ४५.०२ लाख कुटूंबियांचा समावेश २००२ ची गरीबी रेषेखालील यादी २००६-०७ या वर्षापासून अंमलात आणली होती. संबंधित अभिलेख्यांचा अभ्यास केला असता खाली नमूद केलेल्या कमतरता लक्षात आल्या.

जनगणना तलाठी आणि ग्रामसेवकांतर्फे करावयाची होती. तथापि त्यांच्या ह्या कामासाठी असलेल्या नाखूष भुमिकेमुळे, सदर कामाची जबाबदारी, जे अशा तऱ्हेच्या कामाशी सुपरिचित नव्हते, त्या हजेरीपट सहकारी, शिक्षा सेवक, अर्धवेळ नोकर आणि निवृत्त कर्मचारी ह्यांचेकडे सोपविण्यात आली होती. असे दिसून आले होते की, ज्या २०.३७ लाख कुटुंबियांचा यादीमध्ये समावेश नव्हता त्यांनी महसूल प्राधिकाऱ्यांकडे अपील केले. त्यापैकी १८.७३ लाख अपीलांवर निर्णय घेऊन ५.१० लाख कुटुंबियांचा गरीबी रेषेखालील म्हणून विचार करण्यात आला होता. तथपि, ह्या कुटुंबियांचा समावेश यादीत करण्यात आला होता आणि त्यांना गरीबी रेषेखालील कुटूंबियांकरिता तयार केलेल्या योजनांपासून कोणतेही फायदे मिळाले नव्हते. ह्यावरून असे दिसून येते की, जनगणना योग्य तऱ्हेने करण्यात आली नव्हती.

तसेच पुढे लेखापरीक्षणानें जि.ग्रा.वि.यंत्रणेबरोबर स्वैरपणे निवडलेल्या ३२ गावांमधील गरीबीरेषेखालील लाभाधिकारी कुटूंबियांचे गरीबीरेषेखालील गनगणनेच्या मूळ माहितीच्या संदर्भात पात्रता निश्चित करण्याकरिता संयुक्त सर्वेक्षण करण्यात आले. गरीबी रेषेखालील जनगणना २००२ नुसार असलेली गरीबीरेषेखालील यादी २००६-०७ पासून प्रस्तुत केल्यानुसार पुरेसा नमुना आकार (सॅम्पल साईज) असण्याच्या दृष्टीने २००६-०७ ते २००८-०९ या कालावधीकरिता निवडलेल्या गावांतील योजनांचे सर्व ७७९ लाभाधिकारी विचारात घेतले होते. ह्यापैकी ४१६ लाभधिकाऱ्यांच्या (५३ टक्के) बाबतीत लेखापरीक्षण आणि विभागीय अधिकाऱ्यांकडून संयुक्त सर्वेक्षण करणे शक्य झाले कारण ३६३ लाभाधिकारी स्थळ भेटीच्य वेळी उपलब्ध झाले नव्हते. ह्या ४१६ लाभाधिकाऱ्यांपैकी ९१ कुटूंबाची कौटुंबिक ओळखपत्रे आणि नावे गरीबी रेषेखालील जनगणना २००२ च्या मूळ माहितीमध्ये न मिळाल्यामुळे उरलेल्या ३२५ लाभाधिकाऱ्यांची (४२ टक्के) लेखापरीक्षणात तपासणी झाली.

अशा तऱ्हेने संयुक्त सर्वेक्षणात मिळविलेली माहिती गरीबी रेषेखालील जनगणना २००२ च्या माहितीशी आणि www.rural.nic.in ह्या वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या माहितीशी

पडताळून पाहिली. गरीबी रेषेखालील जनगणना २००२ मध्ये १३ दर्शकांपैकी वापरात आणलेले नऊ दर्शक तात्पुरत्या स्वरुपाचे होते. आणि त्यामध्ये बदल होण्याची शक्यता असल्यामुळे, फक्त चार दर्शक जसे की जमिनधारणा, साक्षरता, कामगार शक्ती आणि स्थलांतर ज्यांचा दर्जा कायमस्वरूपी असतो आणि पडताळून पाहता येतो त्यांचा पडताळण्यासाठी आणि पृथक्ककरणासाठी विचार केला गेला होता. पृथक्ककरणाचा परिणाम खालीलप्रमाणे होता.

- गरीबी रेषेखालील जनगणना २००२ च्या रचनेच्या भाग "अ" मध्ये कुटुंबाची सर्वसाधारण माहिती असते ज्याला कुटुंबाची रूपरेखा म्हटले जाते. भाग "ब" मध्ये गरीबी रेषेखालील दर्जा ठरविण्यासाठी गुणसंख्या मिळविण्याकरिता १३ दर्शकांचा समावेश होता. काही माहिती भाग "अ" आणि भाग "ब" साठी सारखी होती. आठ निवड केलेल्या जि.ग्रा.वि.यंत्रणेच्या माहितीची छाननी केली असता असे दिसून आले की, जरी भाग "अ" मध्ये "कार्यकारी जमिन धारणा" ह्या दर्शकाबाबत जमिनीचा मालक अशी माहिती दिली होती तरी "ब" मध्ये त्याच कुटूंबाच्या "जमिन दर्जा" काही नाही अशी माहिती २९२ कुटूंबात देण्यात आली होती.
- संयुक्त सर्वेक्षणात असे आढळले की, निवड केलेल्या ३२५ गरीबी रेषेखालील कुटूंबापैकी ७३ कुटूंबे (२२ टक्के) जमीन धारण करत होते तर गरीबी रेषेखालील जनगणना २००२ मध्ये तीच माहिती जमिन नसलेले अशी दर्शविली होती.
- गरीबी रेषेखालील जनगणना २००२ मध्ये सर्वाधिक शिक्षण ३२५ निवड केलेल्या गरीबी रेषेखालील कुटूंबापैकी ९४ कुटुंबाकडे (२९ टक्के) जनगणनेच्या वेळी सुशिक्षित प्रौढ उपस्थित होते तरी ह्याच कुटूंबाचा गरीबी रेषेखालील गनगणना २००२ मध्ये अशिक्षित म्हणून उल्लेख करण्यात आला होता.
- १९७७ मध्ये बंधपत्रीत मजूरी पद्धती (निराय) कायदा १९७६ द्वारा बंधपत्रीत मजूरी नष्ट करण्यात आली. न्यायालयीन आदेश आणि राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचे मार्गदर्शकानुसार केलेल्या सर्वेक्षणानुसार डिसेंबर २००८ मध्ये महाराष्ट्रामध्ये फक्त १,६१८ बंधपत्रीत मजूर दर्शविलेले होते. (गरीबी रेषेखालील यादीत समाविष्ट केलेल्या ५.९७ लाख संख्येसह) लेखापरीक्षेकडून केलेल्या संयुक्त सर्वेक्षणात ३२५ निवड केलेल्या कोणत्याही कुटूंबात बंधपत्रीत मजूर आढळले नव्हते, तसेच ६१ निवड केलेली

गरीबी रेषेखालील कुटूंबे (१९ टक्के) गरीबी रेषेखालील, जनगणना २००२ नुसार बंधपत्रीत मजूर म्हणून दाखविली होती.

- ३२५ कुटूंबापैकी ३३ कुटूंबाच्या बाबतीत मजूर शक्तीचा दर्जा गरीबी रेषेखालील जनगणनेमध्ये, स्त्री आणि बाल मजूरी असा दाखविला होता. तसेच वरील ३३ गरीबी रेषेखालील कुटूंबापैकी १९ कुटूंबामध्ये एक तर चार ते १४ वयोगटातील मुले नव्हती किंवा त्या वयोगटातील मुले जनगणनेच्या वेळी शाळेत जात होती.
- गरीबी रेषेखालील जनगणना २००२ नुसार स्थलांतर दर्जाकरिता उपजिविकेच्या साधनानुसार अनुक्रमे किरकोळ कामे मोसमी कामे आणि इतर प्रकारची कामे याकरिता दिलेली गुणसंख्या शून्य ते दोन ह्या प्रमाणात आहे. असा लक्षात आले की, ३२५ निवड केलेल्या कुटूंबात कोणतेही कुटूंब स्थलांतरीत नव्हते. जरी गरीबीरेषेखालील जनगणना २००२ मध्ये २३२ कुटुंबे (७१ टक्के) उपजिविकेची साधने म्हणून किरकोळ कामे मोसमी कामे आणि इतर प्रकारची कामे ह्या कारणास्तव स्थलांतरीत म्हणून दाखविण्यात आली होती.

वरील परिस्थिती लक्षात घेता, गरीबीरेषेखालील जनगणनेनुसार २७८ प्रकारची वेगवेगळ्या मोजमापानुसार गरीबीरेषेखालील दर्जा ठरविण्याकरिता असलेली गुण संख्या प्रत्यक्ष दिलेल्या गुणसंख्येपेक्षा जादा दिसून येईल. ह्या कुटूंबाच्या बाबतीत असलेली प्रत्यक्ष गुणसंख्या दिलेल्या गुणसंख्येपेक्षा ज्यादा असल्यामुळे जी कुटूंबे एकतर गरीबी रेषेखालील नव्हती किंवा त्यांना गरीबी रेषेखालील कुटूंबाच्या अग्रक्रम यादीमध्ये वरील जागा मिळाली होती. त्यामुळे, २७८ कुटूंबाची (८६ टक्के) पात्रता, ज्यांना वेगवेगळ्या योजनांतर्गत फायदे दिले गेले होते. संशयास्पद होती. पुढे, अत्यंत गरीब कुटूंबे सुद्धा वेगवेगळ्या योजनांतर्गत असलेल्या फायद्यापासून वंचित राहिली होती.

वर चर्चा केलेल्या चार दर्शकाव्यतिरिक्त, गरीबी रेषेखालील जनगणना २००२ आणि राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संघटना २००२ मध्ये दिलेल्या गृह प्रकाराच्या माहितीमध्ये सुद्धा तफावत होती. गरीबी रेषेखालील जनगणना २००२ नुसार ११ टक्क्यापासून अधिक कुटूंबे घराशिवाय होती आणि ३४ टक्के कुटुंबाकडे कच्ची घरे होती. तथापि, राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संघटना अहवाल २००३ मध्ये फक्त नऊ टक्के कुटूंबाकडे कच्ची घरे आणि ९० टक्के कुटूंबाकडे

अर्धपक्की/पक्की घरे असल्याचे आणि कोणतेही कुटूंब घराशिवाय नसल्याचे दाखविले होते. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संघटनेची माहिती विचारात घेता ज्या व्यक्तींकडे अर्धपक्की/पक्की घरे आहेत त्यांना राहती घरे मंजूर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला

रायगड :- रायगड जिल्ह्यात नोव्हेंबर, २००६ मध्ये एकूण १,१४,६५६ दा.रे.खालील कुटूंबाची अंतिम यादी करण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यात एकूण १३,१०४ कुटूंबांनी तहसिलदार यांच्याकडे अपील केली असून पैकी २७७० पात्र व १०३३४ अपात्र ठरविण्यात आली आहेत.

ठाणे :- दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची गणना २००२-२००७ ही केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुनसार करण्यात आलेली आहे.

तसेच राज्यातील विविध जिल्ह्यात प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासन परिपत्रक क्र.दारेन-२००९/प्र.क्र.९५७/योजना-१, दिनांक २२.२.१० तसेच शासन परिपत्रक क्र.दारेग-२००७/प्र.क्र.४२७/यो-१, दिनांक २५ मार्च, १० अन्वये दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची गणना २००२-२००७ यादीतील अपात्र कुटूंबाची नावे वगळणेबाबत व शासन निर्णय क्र.दारेग-२०१०/प्र.क्र.४२७/यो-१, दिनांक २७.८.१० अन्वये खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

१) दारिद्र्य रेषेखालील यादीतील अपात्र कुटूंबांनी आपली नावे स्वत:हून वगळणेसाठी, वर्तमानपत्रात दिनांक ९.३.१० रोजी जाहीरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

२) ज्या अपात्र लाभार्थींनी स्वत:हून नावे वगळली नाहीत, त्यांच्या विरोधात जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात अचानक (Random) तपासणी करणेसाठी शोध मोहिम सुरू आहे.

३) स्वत:हून व अचानक तपासणीमध्ये दारिद्र्य रेषेखालील यादीतील अपात्र कुटुंबाची नावे वगळण्यात आली आहेत व आपलामधील पात्र लाभार्थ्यांचा समावेश करण्याची कार्यवाही सुरू आहे.

अहमदनगर :- सन २००३ मध्ये दारिद्र्य रेषेखालील कुटूंबांची गणना करण्यासाठी शासनाचे मार्गदर्शक सूचनांनुसार व मार्गदर्शनाखाली अहमदनगर जिल्ह्यात गणना सुरू करण्यात आली. शासनाने दिलेल्या कालदर्शिकेनुसार गणना सुरू करण्यात आलेली होती. परंतु सदर गणनेसाठी शासनाने नेमलेले प्राथमिक शिक्षक, ग्रामसेवक यांनी गणनेच्या कामावर बहिष्कार

टाकलेला होता. त्यामुळे शासनाने प्राप्त परिस्थितीत सदरचा सर्वे अंगणवाडी सेविका व काही प्रमाणात सुशिक्षित बेरोजगार यांच्याकडून करून घेण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार अहमदनगर जिल्ह्यात अंगणवाडी सेविका व सुशिक्षित बेरोजगारांकडून सदरचा सर्वे करण्यात आलेला होता. अंगणवाडी सेविका ह्या कामी शिकलेल्या तसेच अनुभव नसल्यामुळे तसेच सुशिक्षित बेरोजगार यांना अनुभव नसल्यामुळे तसेच सुशिक्षित बेरोजगार यांना अनुभव नसल्यामुळे सदरच्या उणिवा राहिल्या असतील.

परंतु मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अपील ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे जी कुटुंबे दारिद्र्य रेषेखाली आहेत, परंतु वंचित आहेत, त्यासाठी अपील प्रक्रिया राबविण्यात येत आहे. तसेच जी कुटूंबे ही छाटणी गुणांकनापेक्षा जास्त गुणाची आहेत अशा अपात्र कुटूंबाची नावे कमी करून अपील पात्र कुटूंबांची नावे समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

अहमदनगर जिल्ह्यात अशी अपात्र १०,८०५ कुटुंबांची नावे कमी करण्यात आलेली असून अपीलपात्र ८९९० कुटुंबाची नावे समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

हिंगोली :-जिल्ह्यामध्ये एकूण दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची संख्या ५९४२२ आहे. सदरील यादी पंचायत समिती निहाय तयार करून त्यांची पुस्तिका तयार केली आहे. तसेच सदरील यादी जिल्ह्यांच्या वेबसाईटवर टाकलेली आहे. सर्वेक्षण करतेवेळी कुटुंब प्रमुखाकडून माहिती घेऊन प्रपत्र व प्रपत्र अ ची माहिती भरण्यात येते. कुटुंब प्रमुखांनी जी माहिती दिली ती माहिती खरी समजून प्रपत्र भरण्यात येते.

यवतमाळ :- गरीबी रेषेखालील जनगणना २००२ ही केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुनसार करण्यात आलेली असून मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कुटूंबाचे सर्वेक्षण करताना परिशिष्ट १ व परिशिष्ट २ अशा दोन प्रपत्रात कुटूबांची माहिती भरण्यात आलेली आहे. भाग मधील बाब (क) मध्ये वापरात असलेल्या जमीन धारणेचा प्रकार अशी बाब नमूद केलेली असून सदर दर्शकांचा अर्थ अशी जमीन की ज्या जमीनीवर घरकुल बांधकाम, व्यवसाय इत्यादीसाठी उपयोगात आणणे असा होत असून भाग ब मध्ये दिलेले दर्शक कसणाऱ्या जमिनीच्या गटाचा प्रकार याच्याशी भाग अ बाब (क) या संबंध येत नाही. कुटूंबाच्या एकुण प्राप्त गुणामध्ये भाग अ बाब (क) चा समावेश करू नये अशा सूचना मार्गदर्शक सूचनांमध्ये आहेत.

अनुपालन

अ.क्र.	जिल्हा	गट	गांव	दा.रे.लाभार्थी एकूण संख्या	दा.रे.खा. केलेला सर्वे
८	यवतमाळ	कळंब	कानोलोई	१२	६
			कात्री	१५	८
		यवतमाळ	कार्ली	३७	१६
			येरद	४४	१६

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कुटुंबाने जी माहिती दिली ती खरी मानून कुटूंबपत्रके भरावयाची होती. तसेच दा.रे.कु.च्या सर्वेक्षणावर तलाठी, ग्रामसेवक व शिक्षक संघटनेने बहिष्कार टाकलेला असल्यामुळे सदर सर्वे अंगणवाडी सेविका, सुशिक्षित बेरोजगार, हजेरी पट सहकारी, अर्धवेळ नोकर इत्यादी कडून करून घेण्यात आलेला असल्यामुळे सर्वेक्षण करतांना त्रुटी असण्याची शक्यता नाकारता येत नाही. पुढील दा.रे.कु.चे सर्वेक्षण करतांना आढळून आलेल्या सदर बाबींची त्रुटी राहणार नाही याची दक्षता घेण्यात येईल याची नोंद घेतलेली आहे.

नांदेड :- केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना नुसार सन २००२-२००७ मधील दा.रे.खालील कुटूंबाचे सर्वेक्षण करण्यासाठी ५२ गुणांकाचा फॉर्म भरण्यात आला होता. ज्यामध्ये जमिनीचे क्षेत्र, घराचा प्रकार, कपडे परिधान, अन्न सुरक्षा, स्वच्छता, उपयोग टिकाऊ वस्तू, मजूर शक्तिचा दर्जा, उपजिविकेचे साधन, ५ ते १४ वयगटातील शैक्षणिक दर्जा कर्ज बाजारीचा प्रकार, घरातून स्थलांतराचे कारण, सहाय्याची पसंती/आवड इ.१३ कॉलम मध्ये कुटूंबाची वैयक्तिक माहिती भरून त्यास गुण देण्यात आले होते. त्या एकूण गुणाची बेरीज ५२ इतकी होती.

सदरील सर्वे हा शासकीय कर्मचाऱ्यांमार्फत न होता अंशकालीन कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात आला आहे. सदर कुटुंब पत्रकात वैयक्तिक माहिती सर्वेक्षणाच्या वेळी कुटुंबप्रमुखाने भरलेली असून त्यावर त्यांची स्वाक्षरी आहे. सादर भरण्यात आलेल्या कुटूंब प्रमुखाच्या फॉर्ममधील माहितीच्या आधारे ज्या कुटूंब प्रमुखास कमी गुण प्राप्त झाले अशा कुटूंब प्रमुखाच्या गुणानुक्रमे दा.रे.ची यादी शासनाने दिलेल्या दा.रे.कुटूंबाच्या संख्येच्या जिल्ह्याच्या संख्येच्या मर्यादेत ठेवण्यात येऊन प्रत्येक गावाची यादी गुणानुक्रमे करण्यात आली व त्यास शासन सूचनानुसार ग्राम सभेची मान्यता घेण्यात आली होती.

सदर दा.रे.खालील यादीमध्ये काही लाभार्थ्यांच्या समावेश झाला नसल्यास त्या लाभार्थीने यादीचे ग्राम सभेत वाचन झाल्याच्या तारखेपासून १ महिन्यात प्रथम अपिल तहसील यांच्याकडून अर्ज करण्यात यावा अशा सूचना होत्या. त्यानुसार नांदेड जिल्ह्यात तशा तक्रारी अर्जाची संख्या १,२५,२४८ एवढी होती. त्यामध्ये तहसिलदार यांनी, प्रथम अपिलामध्ये ४४,१७३ कुटुंबे पात्र ठरली गेली. परंतु सदरची कुटूंबे दा.रे.यादीतील कुटूंब संख्येत वाढ न करण्यात आल्यामुळे तशीच राहून गेली व तसा अहवाल शासनास पाठविण्यात आला.

सदरची कुटूंबे दा.रे.यादीत समाविष्ट करण्याबाबत बऱ्याच प्रमाणात स्थानिक व विभागीय वृत्तपत्रात तसेच जिल्हास्तरावर या कार्यालयात वारंवार विचारणा होत होती.

त्याअनुषंगाने शासन निर्णय दिनांक २८.१.२०१० व दिनांक २२.२.२०१० नुसार दिलेल्या सूचनेप्रमाणे दा.रे.यादीत असलेल्या अपात्र कुटूंबाचा शोध मोहिमेद्वारे ज्यामध्ये स्थानिक वृत्तपत्रात जाहीर प्रगटन, आकाशवाणी नांदेड केंद्रावरून जाहीर प्रगटन, प्रत्येक ग्राम पंचायतीवर जाहीर प्रगटन तसेच पंचायत समिती अंतर्गत अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत रॅन्डम पद्धतीने ५% गावाची तपासणी इत्यादी.

ज्यामध्ये दा.रे.यादीत असलेली अपात्र कुटुंबे वारस नसलेली ३१७, गावाकडून गेलेले ९०७, दुबार नाव असलेली १९७, गुन्हा नोंदविलेली ३७८ आणि स्वत:हून नाव मागे घेतलेली २९०३ असे एकूण ५५०९ कुटूबांची नांवे वगळण्यात आलेली आहेत.

भंडारा :- सन २००२ च्या दारिद्र्य रेषेखालील गणना सर्वेक्षणासाठी १३ सामाजिक व आर्थिक निकषाच्या आधारे Score Based Ranking यावर आधारीत सर्वेक्षण करण्यात आले. सन २००२ च्या सर्वेक्षणाच्या कामास ग्रामसेवक संघटना, तलाठी संघटना, शिक्षक संक्षटना यांनी असहकार केल्याने सदर गणना भंडारा जिल्ह्यात सुशिक्षित बेरोजगार यांची मदत घेऊन सन २००२ चे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले.

भंडारा जिल्ह्याकरिता दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाची कमाल मर्यादा शासनाचे पत्र क्र.दारेग-२००२/प्र.क्र.१६६९/योजना-१, दिनांक२५.४.२००३ अन्वये १,१६,०२५ इतकी बी.पी.एल.कुटूंब निर्धारित करून देण्यात आलेली आहे.

शासन निर्णय क्र.दारेग-२००६/प्र.क्र.८२८/योजना-१, दि.७.११.२००६ अन्वये ग्रामसभेने मान्यता दिलेल्या याद्यांना मान्यता दिली व त्यांना योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली. केंद्र शासनाने दिनांक २३ फेब्रुवारी, २००६ च्या पत्राद्वारे मा.सर्वोच्च

न्यायालयाच्या आदेशानुसार या यादीबाबत ज्या व्यक्तीच्या तक्रारी आहेत त्यांना तहसिलदार/उपजिल्हाधिकारी यांच्याकडे दुसरे अपिल करता येईल अशी तरतूद करण्यात आली त्यानुसार भंडारा जिल्ह्यामधील माहे एप्रिल, २०११ पावेतो एकूण ५९७४२ कुटूंबाचे अपील अर्ज बीपीएल यादीमध्ये नाव समाविष्ट करण्याकरिता प्राप्त झाले असून त्यापैकी ५१२२७ अपील अर्जावर सुनावणी होऊन २४०६५ कुटुंबे अपीलात पात्र ठरले आहेत.

केंद्र शासनाकडून प्राप्त एकूण १३ आर्थिक व सामाजिक निकषांच्या आधारावर राज्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटूंब सन २००२ च सर्वेक्षण पूर्ण करण्यात आलेले आहे. केंद्र शासनाने राज्यासाठी ४५,१९,७९० एवढी कुटूंब संख्या निर्धारीत करून दिली होती. सदरील सर्वेक्षणाबाबत तलाठी, ग्राम सेवक व शिक्षक संघटनेने बहिष्कार टाकल्याने प्राप्त परिस्थितीत सदरील सर्वे अंगणवाडी सेविका व काही प्रमाणात सुशिक्षित बेरोजगारांकडून पूर्ण करण्यात आला होता. या वर्गाकडे पुरेसा अनुभव नसल्यामुळे या सर्वेक्षणामध्ये काही प्रमाणात त्रुटी राहिलेल्या आहेत.

ही बाब विचारात घेऊन दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाच्या यादीपासून वंचित राहिलेल्या कुटूंबाना द्विस्तरीय अपिलाची तरतूद करण्यात आली असून मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशानुसार ही प्रक्रिया निरंतर आहे.

सदर प्रक्रियेनुसार २० लक्ष अपिल प्राप्त झाले असून ५.५० लक्ष कुटूंबे अपिलात पात्र ठरली आहेत.

दरम्यान शासन परिपत्रक क्र.दारेग-२००९/प्र.क्र.९५७/योजना-१, दिनांक २२.२.२०१० अन्वये अप्राप्त व्यक्तींनी स्वत:हून नांवे वगळावीत तसेच खोट्या माहितीच्या आधारे यादीत नांवे वगळावीत तसेच खोट्या माहितीच्या आधारे यादीत नावे समाविष्ट केलेल्या व्यक्तींविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करावेत, यासाठी कालबद्ध मोहिम राबविण्यात यावी अशा सूचना निर्गमित केल्या आहेत. तसेच, शासन परिपत्रक क्रमांक : दारेग-२००७/प्र.क्र.४२७/योजना-१, दिनांक २५.३.२०१० नुसार, वगळणे आवश्यक असलेली कुटूंबे, उदा. वारस नसलेल्या मयत व्यक्ती, दुबार नांवे इ.वगळण्याबाबत सूचना निर्गमित केल्या आहेत. सदर दोन्ही शासन परिपत्रकानुसार जून, २०११ अखेरपर्यंत १०२७७२ इतकी कुटुंबे वगळण्यात आली आहेत.

अपिलात पात्र कुटूंबाचा मूळ यादीत समावेश करण्याबाबत शासन निर्णय क्र.:दारेग-२०१०/प्र.क्र.४२७/योजना-१, दि.२७.८.२०१० अन्वये सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार ८०३९० इतक्या कुटूंबाचा जून, २०११ पर्यंत मूळ यादीत समावेश करण्यात आला आहे.

गरीबी रेषेखालील यादीचे अद्ययावतीकरण -

गरीबी रेषेखालील जनगणना २००२ मार्गदर्शक सूचना नुसार जर कोण्या एका गरीबी रेषेखालील कुटूंबाने प्रमाणस्थापित आधारे मर्यादा गुणसंख्या ओलांडली तर ते कुटुंब गरीबी रेषेखालील यादीतून काढून टाकण्यात यावे. अशा तऱ्हेचे काढून टाकण्याकरीताचे आढावे ग्रामसभेकडून वर्षातून एकदा घेण्यात यावेत. नागरी स्वातंत्र्य लोक संघटना (Peoples Union of civil Liberty) यांचेकडून सर्वोच्च न्यायालयाकडे केलेल्या विनंती अर्जावर झालेल्या निवाड्यानुसार यादी ज्या कालावधीची असेल त्या कालावधीमध्ये सातत्याने नवीन नावे समाविष्ट करणे आणि अपात्र नावे यादीतून काढून टाकणे अशी तरतूद असणे आवश्यक आहे.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून तयार केला गेलेला स्व.ग्रा.स्व.गो. चा (स्व.ग्रा.स्व.यो. मार्च २००९) मासिक प्रगती अहवाल असे दर्शवितो की, महाराष्ट्रात १,८५,३७७ कुटूंबानी (आठ निवड झालेल्या जिल्ह्यांतील ५२,०४७ सह) गरीबी रेषा ओलांडली होती. तथापि, असे लक्षात आले होते की, निवड झालेल्या कोणत्याही जि.ग्रा.वि.यंत्रणांनी गरीबी रेषेखालील कुटूंबाच्या अशा वार्षिक आढाव्यांच्या परिणाम ग्राम पंचायतीकडून संकलनासाठी मिळविला नव्हता आणि शासनाने गरीबी रेषा ओलांडणारी कुटूंबे ओळखण्यासाठी कोणतीही यंत्रणा स्विकारली नव्हती. म्हणून मासिक प्रगती अहवालातील माहितीची विश्वासार्हता लेखापरीक्षणात तपासून पहाता येणे शक्य झाले नव्हते.

ज्ञापन :-

<u>रायगड</u> :- गरीबी रेषेखालील जनगणना २००२ मार्गदर्शक सुचनांनुसार गरीबी रेषेखालील कुटूंबाने प्रमाण स्थापित आधारे मर्यादा गुण संख्या ओलांडली असेल तर ते कुटुंब दा.रे.खालील यादीतून वगळण्यात यावे संबंधित ग्राम सभेने अशा तऱ्हेने वगळण्याविषयीचे पुनर्विलोकन करावे अशा सूचना गटविकास अधिकारी यांना वारंवार करण्यात आल्या आहेत. याबाबत गटपातळीवरून जिल्हा ग्रा.वि.सं.रायगड कार्यालयाचे पत्र क्र.जिप्रापवियं/रायगड/कातद/३०९९, दिनांक १८.१२.२०१० अन्वये माहिती मागविण्यात आली आहे.

ठाणे :- राज्यातील विविध जिल्ह्यांत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासन परिपत्रक क्र.दारेग-२००९/प्र.क्र.९५७/योजना-१, दिनांक २२.२.२०१० तसेच शासन परिपत्रक क्र.दारेग-२००७/प्र.क्र.४२७/योजना-१, दिनांक २५.३.२०१० अन्वये दा.रे.कुटुंबाची गणना सन २००२ ते २००७ यादीतील अपात्र कुटुंबाची नावे वगळण्याबाबत व शासन निर्णय क्रमांक : दारेग-२०१०/प्र.क्र.४२७/योजना-१, दिनांक २७.८.२०१० अन्वये खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

१) दा.रे.खालील यादीतील अपात्र कुटुंबानी आपली नांवे स्वत:हून वगळणेसाठी, वर्तमानपत्रात दिनांक ९.३.२०१० रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

२) ज्या अपात्र लाभार्थीनी स्वत:हून नांवे वगळली नाहीत त्यांच्या विरोधात जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात अचानक तपासणी करणेसाठी शोध मोहिम सुरू आहे.

३) स्वत:हून व अचानक तपासणीमध्ये दा.रे.खालील यादीतील अपात्र कुटुंबाची नांवे वगळण्यात आली आहेत व अपीलामधील पात्र लाभार्थ्यांचा समावेश करण्याची कार्यवाही सुरू आहे. माहे एप्रिल २०११ अखेर नाव वगळलेली व अपिलपात्र कुटूंबाचा यादीत समावेश करण्यात आल्याबाबतची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	नाव	संख्या
१	मोहिमेच्या सुरूवातीस असलेली दा.रे.खालील कुटुंबाची संख्या	२३५,९२२
२	पहिल्या जाहीरातीच्या प्रतिसादाअंती वगळलेल्या कुटूंब संख्या	३,१३१
३	पोलिसात दाखल केलेलया तक्रारीनुसार वगळलेली कुटुंब संख्या	१
४	दुसऱ्या जाहीरातीच्या प्रतिसादाअंती वगळलेली कुटुंब संख्या	१,८६०
५	रॅंडम तपासणी अंती वगळलेली कुटूंब संख्या	१,९६३
६	एकूण वगळलेली कुटूंब संख्या	६,९५५
७	अपिल मधील पात्र कुटूंबाचा समावेश करण्यात आलेली कुटूंब संख्या	२,५२८

अहमदनगर :- अहमदनगर जिल्ह्यात अशी अपात्र १०८०५ कुटूंबाची नांवे कमी करण्यात आलेली आहेत. अपिल पात्र ८९९० कुटूंबाची नावे समाविष्ट करण्यात आलेली असून नवीन यादी तयार केलेली आहे.

यवतमाळ :- गरीबी रेषेखालील जनगणना २००२ मार्गदर्शक सूचनानुसार दा.रे.कुटुंबाने प्रमाण स्थापित आधारे मर्यादा गुणसंख्या ओलांडली तर दा.रे.यादीतून वगळणी व याद्या अद्ययावत करणे याबाबत ग्रामसभेला अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यामुळे दरवर्षी दा.रे.यादी अद्ययावत करण्यासंदर्भात शासनाकडून वेगळ्याने मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या नसल्याने यादी अद्ययावत करण्यात आली नव्हती. सन २०११-१२ मधील दा.रे.सर्वेक्षण करण्याच्या सूचना शासनाकडून प्राप्त झाल्या आहेत. शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार दा.रे.कुटूंबाची नवीन यादी तयार करण्यात येईल.

नांदेड :- स्वर्ण जयंती ग्रामरोजगार अंतर्गत वैयक्तीक स्वयंरोजगारी तसेच स्वंयम सहाय्यकता समुहाना बँकेमार्फत कर्ज व अनुदानाचा लाभ देण्यात येतो. शासनाने दिलेल्या सुचनेनुसार दरवर्षी स्वंयम सहाय्यता समुहाची मत्ता पडताळणी करण्यात येते. तसेच उत्पन्नात भर पडली का, गटातील सदस्यांनी विहित वेळेत कर्ज परतफेड केली का, तसेच गटातील कुटूंबाचे सामाजिक व आर्थिक जीवनमान उंचालवल्याचे आढळून आल्यास त्यांना बीपीएल बाहेरील कुटूंब म्हणजेच अेपीअेल संबोधण्यात येते. दर वर्षी पंचायत समितीस्तरावरून येणाऱ्या वार्षिक अहवालात सदर कुटूंबाची संख्या निश्चित करण्यात येते. विस्तार अधिकारी, गटविकास अधिकारी, ग्रामसेवक यांच्या नेहमीच्या भेटीतून तसेच निरीक्षणामधून वस्तुपडताळणी अहवालतून बीपीएल मधून किती कुटूंबे अेपीएल मध्ये आली हे निश्चित करण्यात येते.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील ग्रामीण भागातील सन २००२ मधील दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे. केंद्र शासनाने राज्यासाठी ४५,१९,७९० एवढी कुटूंब संख्या निर्धारीत करून दिली. सदरील दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाच्या यादीतून अपात्र कुटूंबाची नांवे वगळण्याचा निर्णय शासनाने घेतला. त्यानुसार शासन परिपत्रक क्रमांक दारेग-२००९/प्र.क्र.९५७/योजना-१, दिनांक २२.२.२०१० अन्वये अपात्र व्यक्तींनी स्वत:हून नावे वगळावीत तसेच खोट्या माहितीच्या आधारे यादीत नावे समाविष्ट केलेल्या व्यक्तींविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करावेत, यासाठी कालबद्ध मोहिम राबविण्यात यावी अशा सूचना निर्गमित केल्या आहेत. तसेच, शासन परिपत्रक क्रमांक-दारेग-२००७/प्र.क्र.४२७/ योजना-१, दिनांक २५.३.२०१० नुसार वगळणे आवश्यक असलेली कुटूंबे, उदा. वारस नसलेल्या मयत व्यक्ती, दुबार नांवे इ.वगळण्याबाबत सूचना निर्गमित केल्या आहेत. सदर

दोन्ही शासन परिपत्रकानुसार जून, २०११ अखेरपर्यंत १०२७७२ इतकी कुटुंबे वगळण्यात आली आहेत.

दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाच्या यादीपासून वंचित राहिलेल्या कुटूंबाना द्विस्तरीय अपिलाची तरतूद करण्यात आली असून मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशानुसार ही प्रक्रिया निरंतर आहे. सदर प्रक्रियेनुसार २० लक्ष अपिल प्राप्त झाले असून ५.५० लक्ष कुटुंबे अपिलात पात्र ठरली आहेत. अपिलात पात्र कुटूंबाचा मूळ यादीत समावेश करण्याबाबत शासन निर्णय, क्रमांक : दारेग-२०१०/प्र.क्र.४२७/योजना-१, दिनांक २७.८.२०१० अन्वये सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार ८०३९०/- इतक्या कुटूंबाचा जून, २०११ पर्यंत मूळ यादीत समावेश करण्यात आला आहे.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या नियामक मंडळ/कार्यकारी समितीच्या बैठका -

जि.ग्रा.वि.यंत्रणेचे नियामक मंडळ धोरणात्मक मार्गदर्शन करते, वार्षिक योजना आणि नियोजनबद्ध कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण आणि आढावे सुद्धा घेते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अध्यक्ष म्हणून आणि जि.ग्रा.वि.यंत्रणेचे प्रकल्प अधिकारी सदस्य सचिव असलेल्या कार्यकारी मंडळाकडून जि.ग्रा.वि.यंत्रणेच्या कार्यकारी आणि आर्थिक शक्तीचा वापर केला जातो.

जि.ग्रा.वि.वं.प्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जि.ग्रा.वि.यं.चे नियामक मंडळ तीन महिन्यातून एकदा एकत्र येणे आवश्यक असते. असे लक्षात आले होते की चाचणी परीक्षा झालेल्या आठ जि.ग्रा.वि.यंत्रणेमध्ये २००४-०९ ह्या कालावधीत जि.ग्रा.वि.यंत्रणांच्या नियामक मंडळ आणि कार्यकारी समितीच्या कमी झालेल्या बैठकांचे अनुक्रमे प्रमाण ३५ टक्के व १०० टक्के आणि १८ टक्के व १०० टक्के असे होते (परिशिष्ट २.२४) ही बाब ह्या स्तरावरील योजनांच्या अंमलबजावणीवरील व नियोजनावरील अपुरे नियंत्रण दर्शविते.

ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला

जि.ग्रा.यंत्रणेच्या नियामक मंडळाच्या बैठका तीन महिन्यातून एकदा घेणे आवश्यक आहे. परंतु, विधानमंडळ किंवा संसदीय अधिवेशन या कालावधीत तसेच (ग्रामपंचायत/पं.समिती/जि.प./विधानसभा/लोकसभा ई.) आचारसंहिता कालावधीत बैठक ठेवता येत नाही.

कार्यकारी समितीचे अध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे असून त्यांचे कार्यबाहुल्य विचारात घेऊन बैठकीची तारीख ठरविण्यात येते. परंतु, बैठका जरी झाल्या नसल्या तरी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दरमहा होणाऱ्या मासिक समन्वय बैठकीमध्ये केंद्र पुरस्कृत योजनांचा कामाचा आढावा घेण्यात येतो. सबब, हा खुलासा मान्य व्हावा. व सदर परिच्छेद वगळण्यात यावा.

साक्ष :

उपरोक्त परिच्छेदांच्यासंदर्भात समितीने दिनांक १४ ऑगस्ट, २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीने हरियाली योजना कधी सुरु झाली व ती कधी बंद करावयाची होती, या योजनेस किती वेळा मुदतवाढ देण्यात आली व हरियाली योजनेंतर्गत किती वॉटरशेडचे काम करण्यात आले, त्या करिता किती गावांचा लोक सहभाग घेण्यात आला, निकषानुसार हरियाली योजनेंतर्गत प्रोजेक्ट पूर्ण केले का, जर ते पूर्ण केले नसतील, तर त्याची कारणे काय आहेत अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी समितीस माहिती देताना सांगितले की, हरियाली योजना ३० जून रोजी बंद झाली या अंतर्गत केंद्र शासनाच्या नियमाप्रमाणे तीन प्रकारचे काम सुरु करण्यात आले होते. त्यापैकी पहिले काम दिनांक १-४-१९९५ रोजी सुरु करण्यात आले. ज्यामध्ये केंद्र शासनाचा वाटा ७५ टक्के आणि राज्य शासनाचा वाटा २५ टक्के होता. यात बीडीओ, पंचायत राज संस्था अंमलबजावणी यंत्रणा होती व बीडीओंकडून याबाबतचे काम सुरु केले गेले. जानेवारी, २००३ मध्ये हरियाली योजना सुरु करण्यात आली. यात देखील बीडीओ, पंचायत राज संस्था अंमलबजावणी यंत्रणा होती. त्यानंतर वेस्ट लँड डेव्हलपमेंट प्रोग्राम सुरू करण्यात आला. या योजनांना १-२ वेळा मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु, आता या तिन्ही योजना केंद्र शासनाकडून डिसेंबर, २०१२ मध्ये पूर्णपणे बंद करण्यात आल्या आहेत. आता एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन हा मोठा कार्यक्रम महाराष्ट्रात सुरु करण्यात आला आहे.

हरियाली योजनेसाठी ३४७.२८८७ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. त्यापैकी ३२२.०२३५ कोटी रुपये खर्च झालेले आहेत तसेच या योजनेंतर्गत ७,२३,४१३ हेक्टर क्षेत्रापैकी ५,०३,०५६ हेक्टर क्षेत्रावर ट्रिटमेंट करण्यात आली आहे. हरियाली योजनेंतर्गत गाव निश्चित करुन त्यामध्ये प्रोजेक्ट हाती घेतले असतील. त्या सर्व ठिकाणी ट्रिटमेंट करण्यात आली का ? तसेच, जे प्रोजेक्ट पंचायत समितीकडे हवाली (Handover) केले होते त्यापैकी किती प्रोजेक्ट

पूर्ण झाले, या अंतर्गत पंचायत समिती किंवा गावांना मिळालेल्या निधी पैकी किती निधी खर्च झाला आहे व या अंतर्गत जे स्ट्रक्चर निश्चित केले होते ते पूर्ण केले का अशी विचारणा समितीने केली असता] विभागीय प्रतिनिधींनी जे क्षेत्र निवडले जाते त्यावर १०० टक्के ट्रिटमेंट केली जाते अशी माहिती दिली.

हरियाली योजनेंतर्गत एका गावातील ५०० हेक्टर क्षेत्र निवडले व त्यावर प्रोजेक्ट करण्याचे ठरविले. तेथे कृषी विभागामार्फत केलेल्या कामाबाबत समितीला काही म्हणावयाचे नाही. परंतु, जेथे ग्राम पंचायत, बीडीओ यांना अंमलबजावणी एजन्सी होती, अशा महाराष्ट्रातील किती गावांत ही योजना राबविली गेली व पूर्ण केली गेली या बाबतच्या माहिती बाबत समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी समितीस विदित केले की, या योजनेंतर्गत एकूण १३९५ वॉटरशेडचे काम हाती घेतले गेले. एका वॉटरशेडचा ५०० हेक्टरचा एरिया असतो. त्यामध्ये कृषी विभाग, सोशल फॉरेस्ट्री आणि पंचायत राज अशा तीन एजन्सीज होत्या. यामध्ये जे उद्दिष्ट ठरवून दिले होते, ते साध्य करु शकलो नाही. या तीन योजनांतर्गत एकूण १९ लाख ५७ हजार हेक्टर क्षेत्रावर ट्रिटमेंट करणे अपेक्षित असताना, जवळपास १५ लाख हेक्टर क्षेत्रावर ट्रिटमेंट करण्यात आली. याचा अर्थ हे उद्दिष्ट ७५ टक्के एवढे साध्य झाले आहे. यावर समितीने ॲग्रिकल्चर आणि सोशल फॉरेस्ट्री यांनी केलेल्या कामामुळे ७५ टक्के उद्दिष्ट साध्य झाले असेल. परंतु, ग्रामपंचायतींच्या माध्यमातून जे काम करावयाचे होते ते रेंगाळले व त्याला अनेकदा मुदतवाढ देऊनही ते केवळ २५ टक्केच झाले असे अभिप्राय व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी प्रकल्पाचे स्पष्टीकरण देतांना सांगितले की, काम सुरु होते तेव्हा, मिळालेल्या निधीच्या ८५ टक्के निधी कामावर, १० टक्के निधी प्रशासकीय बाबींवर व ५ टक्के निधी जेथे प्रकल्प सुरु करावयाचा त्या घटनास्थळावरील सुविधांवर खर्च केला जातो. या व्यतिरिक्त काही ठिकाणी लोक सहभागातून काम करावयाचे होते अशा अनेक कारणांमुळे विलंब झालेला आहे.

या अनुषंगाने ग्रामपंचायतीकडे दिलेली कामे का पूर्ण होऊ शकली नाहीत याबाबतची कारणमिमांसा सांगताना समितीने सांगितले की, या कामांना प्रशासकीय मान्यता देताना ॲग्रिकल्चर व सोशल फॉरेस्ट्री व पंचायत समिती अशा तीन एजन्सी होत्या. परंतु, पंचायत समिती या तिसऱ्या एजन्सीला जाणीवपूर्वक सहकार्य न केल्याने त्यांच्याकडे ज्या ज्या प्रोजेक्टचे काम दिले होते, ते काम पूर्ण झाले नाही. या बाबत कधी पैसे खर्च झाले नाही तर, कधी

पहिले सदस्य बदलून दुसरे आले त्यांनी वेगळाच कार्यक्रम सुरु केला इत्यादी कारणे सांगितली गेली. या बाबतची सविस्तर माहिती देण्याबाबतचे निदेश समितीने दिले.

समितीने दिलेल्या निदेशानुसार विभागाने समितीस सादर केलेली माहिती **(परिशिष्ट अ)** मध्ये समाविष्ट आहे.

महालेखाकारांच्या अहवालामधील पृष्ठ क्रमांक २१२ वर परिशिष्ट २.२३ मध्ये ९ लाख रुपये कमी वाटपामुळे मिळालेले नाहीत यासंदर्भात विभागीय सचिवांनी माहिती देताना सांगितले की, अहवालात जी १.५२ कोटी रुपये इतकी रक्कम दर्शविण्यात आलेली आहे ती, यवतमाळ ६३ लाख व हिंगोली ८९ लाख रुपये अशी दोन्ही जिल्हयांची मिळून आहे. हिवाळी अधिवेशनात सप्लिमेंटरी मागणी केली जाते कधी कधी ती मिळण्यास उशीर होतो. सन २००७-२००८ मध्ये शासनाने २९ लाख ८१ हजार रुपये २२ मार्चला रिलिज केले होते. बीडीएस प्रणाली सुरु होण्याचे ते पहिलेच वर्ष होते. त्यावेळी तांत्रिक कारणामुळे ते मिळू शकले नाहीत. तेवढा हिस्सा कपात करण्यात आला. परंतु, सन २००८-२००९ मध्ये राज्य शासनाचा हिस्सा मिळाला. तसेच, मार्च, २००९ मध्ये केंद्र शासनाकडून ७९ लाख रुपये मिळाले. अशा प्रकारे मागच्या वर्षी कपात झाली होती ती रक्कम पुढच्या वर्षी मिळाली. तसेच, राज्य शासनाचा हिस्साही देण्यात आलेला आहे. ज्यावेळेस ऑडिट झाले, त्यावेळेस ही रक्कम दाखविली नसेल त्यामुळे एजींचे निरीक्षण बरोबर आहे.

यावर समितीने इतर जिल्हयांच्या बाबतीतील परिस्थिती काय आहे अशी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी यवतमाळ येथे ६३ लाख रुपयांची आवश्यकता असताना केंद्र शासनाकडून ५९ लाख रुपये २७ मार्च, २००९ रोजी प्राप्त झाले. वेळेवर प्रस्ताव दिला नाही वगैरे त्रुटींमुळे यवतमाळ येथे सन २००६-२००७ मध्ये ४ लाख रुपये मिळाले नाहीत अशी माहिती दिली.

महालेखापालांच्या अहवालातील **परिच्छेद क्र. २.३.६.४** बंद योजनांच्या निधीचे हस्तांतरण याबाबत माहिती देतांना विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००६, २००७ व २००८ या कालावधीमध्ये महात्मा गांधी ग्रामीण रोजगार योजना तीन टप्प्यांत सुरु होती. त्यानंतर केंद्र शासनाने असे आदेश दिले की, प्रत्येक जिल्हयात एसजीआरवाय अंतर्गत योजनांचा शिल्लक निधी नरेगामध्ये ट्रान्सफर करावा. केंद्र शासनाचा निधी जिल्हाधिकाऱ्यांच्या अकाऊंट मध्ये ट्रान्सफर केल्यानंतर काही ठिकाणचे पेमेंट राहिले असल्याची बाब लक्षात

आली. जसे की, धान कुपनचे पेमेंट वगैरे. त्यामुळे ही बाब सेटल करण्यास थोडा वेळ लागला. तसेच, ज्या जिल्हयात काही निधी शिल्लक होता तो कोणत्या अकाऊंटला जमा करायचा या बाबतची शंका विचारली गेली नाही. परंतु, आता तो सरेंडर करण्यात आलेला असून अकाऊंट पूर्णपणे सेटल झालेले आहे.

भंडारा जिल्हयातील एसजीआरवाय अंतर्गत अखर्चित रक्कम किती आहे आणि तो निधी महाराष्ट्र राज्य ग्रामीण रोजगार हमी योजनेकडे का हस्तांतरित करण्यात आला नाही अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, अगोदर अकाऊंटबाबत माहिती नव्हती. ती प्राप्त झाल्यानंतर ७.११ लक्ष रुपयांचा निधी नुकताच जमा केलेला आहे. ३३ जिल्हयांपैकी ८ जिल्हयांच्या संदर्भातील लेखा परीक्षण केले आहे, ज्या बाबतची निरीक्षणे होती त्या बाबतची उत्तरे देण्यात आली आहेत. उर्वरित जिल्हयांच्या परिस्थिती बाबत अहवालात उल्लेख नाही. सन २०११ मध्ये पैसे जमा केल्याबाबतचे प्रमाणपत्र डीआरडीए कडून मागविण्यात आले होते. जो उपक्रम हाती घेतला होता त्यामध्ये १५ जिल्हयांचे प्रमाणपत्र जमा करण्यात आले आहे.

याबाबत एवढा वेळ लागण्याची कारणमिमांसा समितीने विचारली असता, विभागीय सचिवांनी सन २००६, २००७, २००८ या वर्षात फेज १, २, ३ अंतर्गत कामांचे बाकी असलेले वर्क पेमेंट या सर्व बाबींची माहिती घ्यावयाची होती. हे सर्व बंद करण्यास वेळ लागलेला आहे. परंतु, आता प्रमाणपत्र घेण्यात आली आहेत अशी माहिती दिली.

पूर्वी ग्राम पंचायतींना ॲडव्हान्स पैसे दिले जात नसत. ते आता दिले जातात. महालेखापालांनी या संदर्भात असा आक्षेप घेतलेला आहे की, डीआरडीएकडे एवढे पैसे ५ ते ६ वर्षे अखर्चित राहिलेले आहेत. विभागाच्या सन २०११ मध्ये हे पैसै जमा झालेले आहेत. परंतु, अद्यापही अशी परिस्थिती कोठे आहे का अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी तशी परिस्थिती नसल्याचे सांगून आता केंद्र शासनाने डायरेक्ट कॅश ट्रान्सफर सिस्टीम सुरु केली असल्याचे आणि नरेगा अंतर्गतचे पैसे देखील डायरेक्ट जमा करीत असल्याची माहिती दिली.

रायगड, ठाणे, हिंगोली व भंडारा या जिल्हयात आर्थिक सहाय्य वाटपाचे धनादेश काही लाभ धारकांना विलंबाने का देण्यात आले ? काही धनादेशाचे रोखीकरण करण्यात आले. काही धनादेश परत का घेण्यात आले ? रोख वही व बँक पासबुक या मधील समाविष्ट

शिल्लक रकमांचे समायोजन का करण्यात आले नव्हते अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी "जसजशी केस मॅच्युअर होते, त्या प्रमाणे चेक्स दिले जातात. परंतु, कधी कधी असे होते की, लाभार्थी उपलब्ध नसतात, कधी कधी ते चेक्स लाभार्थ्यांना दिल्यानंतर त्यांनी विथ्ड्रॉ न केल्याने ते त्यांच्याकडे पडून असतात. त्या चेक्सची व्हॅलिडीटी रि-इनर्डोस केली जाते" अशी माहिती दिली.

लाभार्थ्यांना चेक उशीरा देण्याची कारणमिमांसा सांगताना विभागीय सचिवांनी समितीला विदित केले की, रायगड जिल्हयामध्ये २५ चेक्स परत घेण्यात आले. सदरहू चेक्स डिसेंबर, २००८ मध्ये काढण्यात आले होते. सदरहू चेक मार्च, २००९ पर्यंत इनकॅश करण्यात आले नव्हते. त्यामुळे ते परत घ्यावे लागले. इश्यू केलेले चेक्स विथ्ड्रॉ केले नव्हते. सन २००९-२०१० मध्ये त्याबाबतची माहिती घेतली. विभागाकडील नोंदी प्रमाणे ते चेक दिलेले असतात. परंतु, ते विथ्ड्रॉ केलेले नसल्याने बँक पासबुकवर त्याची नोंद नसते. रेकॉर्ड पाहून ते चेक्स रिव्हॅलिडेट करुन दिले जातात. राज्य शासनाचा निधी ३१ मार्च रोजी आल्याने काही चेक विलंबाने देण्यात आले. इंदिरा आवास योजनेंतर्गत खर्च केलेल्या निधीच्या धनादेशाबाबत नंदूरबार सारख्या जिल्हयातील स्थानिक पातळीवर लाभार्थ्यांना पहिला हप्ता दिल्यानंतर, ते दिवाळीच्या सुमारास गुजरातमध्ये निघून जातात. जव्हार,मोखाडा या आदिवासी भागातील लोक नोव्हेंबर, डिसेंबर या महिन्यात वीटभट्टीवर काम करण्यासाठी जातात. मागच्या वर्षी रोजगार हमी योजनेवर काम करणारे जे मजूर होते ते यंदा देखील असतील याची खात्री नसते. ते दुसऱ्या गावात कामासाठी जातात. यामुळे त्यांचे पेमेंट देण्यास काही वेळा विलंब होतो. त्यांनी पैसे न घेतल्यास त्यांना पुन्हा चेक इश्यू केले जाते. ठाणे जिल्ह्यातील मजुरांचे ५७ हजार व ३ लाख ७८ हजार रुपये देणे शिल्लक होते. या रकमेचे नंतर वाटप करण्यात आले आहे.

धनादेशाचे रोखीकरण लाभार्थ्यांनी करावयाचे असते. ज्या मजुरांनी ठराविक कालमर्यादेत धनादेशाचे रोखीकरण केले नाही, त्यांना ते पुन्हा इश्यू करण्यात आले आहेत.

समितीने ही प्रक्रिया साधारणपणे किती दिवस सुरु असते अशी विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी "ही प्रक्रिया अविरत सुरु असते. मजूर जसजसे उपलब्ध होतात तसतसे त्यांचे पेमेंट दिले जाते. इंदिरा आवास योजनेतील निधी टप्प्याटप्प्याने दिला जातो. लाभार्थी उपलब्ध नसल्यास त्यांच्या खात्यात ही रक्कम जमा केली जाते. यामुळे आता धनादेशाच्या

रोखीकरणाचा प्रश्न उद्‌भवत नाही. पूर्वी चेक दिला जात होता. त्यावेळी सदर व्यक्ती उपलब्ध नसल्यास अडचण येत होती" अशी माहिती दिली.

किती लाभार्थ्यांना आर्थिक सहाय्याचे वाटप केले, त्यापैकी किती जणांचे धनादेश परत घेण्यात आले व किती धनादेशांचे समायोजन करण्यात आले. इंदिरा आवास योजनेंतर्गत जी घरकुले मंजूर केली जातात, त्यासाठी जी रक्कम दिली जाते, ती पुरेशी आहे की नाही, याचा ग्राम विकास विभागाने रिव्ह्यू घेतला आहे काय ? १५-२० वर्षे होऊन देखील काही घरकुलांचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. संबंधित शाखा अभियंता, उप अभियंता निवृत्त होऊन घरी गेले. मात्र अद्याप घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले नाही. या योजनेचे बजेट साधारणपणे १ हजार कोटी रुपये असल्याचे सांगितले जाते. तरी देखील ही घरकुले पूर्ण का होत नाहीत ? गेल्या ५-७ वर्षात किती घरकुले मंजूर केली व त्यापैकी किती पूर्ण झाली आहेत ? पूर्णत्वाचे दाखले देण्यात आले आहेत काय, घरकुले अपूर्ण असल्यास त्याची कारणे काय आहेत याबाबत समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांना दिली जाणारी ४५ हजार रुपयांची रक्कम १ लाख रुपयांपर्यत वाढवावी अशी मागणी अनेक वर्षापासून केली जात आहे. सुरुवातीला लाभार्थ्यांना ६ हजार रुपये दिले जात होते. योजनेमधून दिल्या जाणाऱ्या रकमेत घराचे काम पूर्ण होऊ शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे. सदर योजेनेंतर्गत घरकुल बांधण्याकरिता डोंगराळ भागात निकष वेगळे आहेत. तेथे ५ हजार रुपये अधिक दिले जातात. तेथील घरकुलांकरिता साधारणपणे ७५ हजार रुपये दिले जातात. काही वेळा पूर्ण पैसे दिल्यानंतर देखील घरकुलाचे काम पूर्ण होत नाही. याच रकमेमध्ये शौचालय देखील बांधावयाचे असते. मनरेगा अंतर्गत शौचालय बांधण्याकरिता निधी दिला जातो. घरकुलाकरिता १०० टक्के निधी दिला जातो. हा निधी ३ टप्प्यात लाभार्थ्यांना दिला जातो. कामाच्या सुरुवातीला लाभार्थ्यांच्या खात्यात २५ टक्के निधी जमा केला जातो. काम पूर्ण करण्याकरिता आता ग्राम सेवक, तालुका पातळीवरील डीआरडीएचे कर्मचारी यांच्याकडून पाठपुरावा केला जातो.

ग्रामीण भागात खरा लाभार्थी योजनेपासून बाजूला राहतो व बोगस लाभार्थ्यांना निधी दिला जातो. या लाभार्थ्यांकडून कमिशन घेतले जाते. ही बाब समितीने निदर्शनास आणली असता, विभागीय सचिवांनी "कोणत्याही योजनेमध्ये गैरप्रकार होत नाही असे नसून मंजूर झालेली घरकुले बांधली नसल्याचे उघडकीस आल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल" असे

विदित केले. वाईट प्रवृत्तीचे लोक सर्व ठिकाणी असतात. त्यांच्यामुळे चांगल्या योजनेला गालबोट लागते असेही नमूद केले.

सध्या मोठया प्रमाणात सदर योजनेतील घरे अपूर्ण आहेत. मागील वर्षी किती घरे पूर्ण झाली याची माहिती देण्याबाबत समितीने सांगितले असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सर्व घरांचे काम पूर्ण झालेले नाही. जव्हार, मोखाडा, नंदूरबार येथे घरकुल बांधण्यासाठी ७० हजार रुपये दिले जातात. आता केंद्र शासनाने १ लाख रुपये मंजूर करावेत अशी मागणी केलेली आहे. ७० हजार किंवा १ लाख रुपये शासनाने दिले तरी देखील त्या रकमेमधून घराचे काम होणार नाही, लाभार्थ्याने स्वतःचे पैसे दिल्याशिवाय काम पूर्ण होऊ शकणार नाही. ज्या ठिकाणी गैरप्रकार होत आहेत, तेथे तक्रार दाखल केल्यानंतर कारवाई केली जाईल. या अनैतिक गोष्टींवर नियंत्रण ठेवावे लागणार आहे.

मागील वर्षी १ लाख ६७ हजार घरकुलांचे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले होते त्यापैकी १ लाख ४६ हजार घरकुले पूर्ण झाली आहेत.

औरंगाबाद जिल्ह्यातील गंगापूर पंचायत समिती अंतर्गत त्या ठिकाणी २०० बोगस घरकुले बांधली असल्याचे व एका घरकुलासाठी ७० हजार रुपये खर्च करणे अपेक्षित असताना त्या ठिकाणी २ लाख ४० हजार रुपये एका घरकुलावर खर्च केलेले आहेत. गंगापुर पंचायत समितीमध्ये दोषी असणाऱ्या ४० लोकांच्या विरोधात गुन्हे दाखल करुन यामधील ३० लोकांना अटक देखील झालेली आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणली असता, विभागीय सचिवांनी प्रत्येक घरकुलासाठी १ लाख २५ हजार रुपये मंजुर करावे असा प्रस्ताव शासनाला दिलेला आहे अशी माहिती समितीला दिली.

महालेखापालांच्या अहवालातील **परिच्छेद क्रमांक २.३.८.१** "गरीबी रेषेखालील कुटुंबाची निवड" यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाच्या मार्फत लवकरच सर्वेक्षणाचे काम पूर्ण केले जाणार आहे. लवकरच लाभार्थ्यांच्या याद्या जाहीर केल्या जाणार आहेत. सन २०११ पासून नवीन दारिद्र्य रेषेखाली कुटुंबाच्या याद्यांचे सर्वेक्षणाचे काम सुरु आहे. यापूर्वी २००२ मध्ये सर्वेक्षणाचे काम केले होते. त्यावेळी या कामात ग्रामसेवक आणि शिक्षक संघटनांनी बहिष्कार टाकला होता. त्यामुळे अंगणवाडी सेविका, सुशिक्षित बेरोजगार लोकांकडून सर्वेक्षण करुन घेतले होते. त्यामुळे यामध्ये अनेक त्रुटी निर्माण झालेल्या होत्या. सुशिक्षित बेरोजगार काम करुन निघून गेले होते.

सर्वेक्षण चुकीच्या पध्दतीने झाल्यामुळे लाभार्थ्यांना लाभ मिळालेला नाही. त्यामुळे आजपर्यंत ही गरीब लोक त्यांच्या न्याय हक्कासाठी भांडत आहेत. दारिद्र्य रेषेखालील अनेक कुटुंबाना लाभ मिळालेला नाही. अजूनपर्यंत त्यांची नावे यादीमध्ये आलेली नाहीत. विभागाकडून १९९७ ते २००२ मधील याद्यानुसार कार्यवाही केली जात आहे काय अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, सन २००२ मध्ये केंद्र शासनाने दारिद्र्य रेषेखाली कुटुंबांचा सर्वेक्षण करण्याचा आदेश दिला होता. यानुसार २००३ मध्ये सर्व्हेक्षणाचे काम पूर्ण झाले होते. सन २००३-२००४ मध्ये १३ क्रायटेरिया दिले होते. यासंदर्भात सामाजिक संस्था आणि पीपल्स ॲक्ट ॲक्शनने कोर्टात धाव घेऊन स्थगिती मिळवली होती. स्थगिती मिळालेली असली तरी विभागाने प्रोसेस पूर्ण केली होती. त्यानंतर २००६ मध्ये स्टे उठविला होता. केंद्र शासनाने ग्रामसभेत मंजुरी मिळवून बीपीएल लाभधारकांची यादी जाहीर करण्याबाबत सांगितले होते. त्यावेळी केंद्र शासनाने ४५ लाख २९ हजार अशी कुटुंबाची मर्यादा निश्चित करुन दिली होती. महाराष्ट्रासाठी जी मर्यादा होती, तीच मर्यादा जिल्ह्यांसाठी देखील होती. यामध्ये हे सर्व मार्किंग सिस्टिमद्वारे निश्चित केले होते. शून्य मार्क ते ५२ मार्कपर्यंत १३ क्रायटेरिया होते यामध्ये प्रत्येक जिल्ह्यांचे वेगवेगळे निकष होते. त्यानंतर तालुक्यात आणि गावातील संख्या निश्चित करण्यात आली होती. सर्वेक्षणानंतर अनेक लोकांच्या तक्रारी येण्यास सुरुवात झाली होती.

सन २००२ आणि सन २००७ मधील याद्यानुसार विभागाने कार्यवाही सुरु केलेली आहे काय नवीन याद्यांची प्रक्रिया कधीपर्यंत अंमलात आणली जाणार आहे अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी "सन २००३ मधील याद्यांचे सर्वेक्षण झाले होते. त्यामुळे आता ही यादी अंमलात आणली जाणार आहे. विभागाकडे भारत इलेक्ट्रॉनिक लिमिटेड नावाची एक यंत्रणा आहे. यामध्ये बऱ्याच अडचणी निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे ते काम लांबले होते. नवीन याद्यांची प्रक्रिया ३१ ऑक्टोबर, २०१३ पर्यंत पूर्ण करण्याचा विभागाचा मानस आहे" अशी माहिती दिली.

दारिद्र्य रेषेखालील अनेक याद्यांमध्ये खूप मोठा घोळ आहे. या विषयाच्या संदर्भात अधिकाऱ्यांनी बीडीओ, ग्रामसेवक आणि सरपंच यांना योग्य त्या सूचना देण्याची गरज आहे. अनेक वेळा दारिद्र्य रेषेखालील याद्यांचे रेक्टिफाय केले जात नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, पूर्वीच्या सर्वेक्षणानुसार दारिद्र्य

रेषेखालील कुटुंबाची संख्या ४५ लाखांच्या आसपास होती. यामध्ये घरकुलासाठी पात्र असणाऱ्या कुटुंबाची संख्या २४ लाख होती. यामध्ये १२ ते १३ लाख कुटुंबाना घरे देण्यात आलेली आहेत. यानंतरची वेट लिस्ट ही ग्रामसभेने निश्चित केलेली आहे. तसेच काही गावांमध्ये वेट लिस्ट देखील प्रसिध्द केलेली आहे. त्यामुळे पुढील वर्षी कोणत्या गावातील कुटुंबांना घरे मिळणार आहेत, याची माहिती आता वेट लिस्टच्या माध्यमातून मिळणार आहे.

यामध्ये रिझर्व्हेशन आणि ओपनसाठी काही जागा निश्चित केलेल्या आहेत. रिझर्व्हेशन कॅटगरिमधील लोकांना घरे मिळाली आहेत. पण ओपनच्या लोकांना घरे मिळत नाही ही परिस्थिती समितीने विभागीय सचिवांना अवगत केली असता, विभागीय सचिवांनी समितीस माहिती देतांना सांगितले की, ६० टक्के घरे एससी आणि एसटी प्रवर्गासाठी निश्चित केलेली आहेत. ४० टक्के घरे जनरल कॅटेगरिसाठी आहेत. यामध्ये १५ टक्के घरे अल्पसंख्याकासाठी निश्चित केलेली आहेत. तसेच यामध्ये ३ टक्के अपंगाचा कोटा देखील निश्चित केलेला आहे. एससी, एसटीचे लोक गावात मिळाले नाही तर त्यांची घरे जनरल कॅटेगरिकडे देण्याची पध्दत होती. यावर्षी केंद्र शासनाने त्यामध्ये काही सुधारणा केलेल्या आहेत. एससी, एसटीचे लोक गावात मिळाले नाही तर त्यांची घरे इतर जिल्ह्यात एससी, एसटीच्या लोकांकडे घरे वर्ग करावीत असे केंद्र शासनाचे निदेश आहेत.

मागील वर्षापर्यंत केंद्र शासन डीआरडीला टार्गेट देत होते. आता राज्य शासनाला टार्गेट दिलेले आहे. ज्या जिल्ह्यामध्ये एससी, एसटीचे लोक मिळतील त्या जिल्ह्यातील लोकांना घरे दिली पाहिजेत. ओपनसाठी २४ हजार घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित केलेले आहे.

महालेखाकारांच्या अहवालातील पृष्ठ क्रमांक २१ वरील परिच्छेदातील "गरीब रेषेखालील जनगणना सन २००२ "नुसार असलेली गरीबीरेषेखालील यादी २००६-२००७ पासून प्रस्तुत केल्यापासून पुरेसा नमुना आकार असण्याच्या दृष्टीने २००६-२००७ ते २००८-२००९ या कालावधीकरिता निवडलेल्या गावातील योजनांचे सर्व ७७९ लाभाधिकारी विचारात घेतले होते. यापैकी ४१६ लाभाधिकाऱ्यांच्या ५३ टक्के बाबतीत लेखापरीक्षण आणि विभागीय अधिकाऱ्यांकडून संयुक्त सर्वेक्षण करणे शक्य झाले कारण ३६३ लाभाधिकारी स्थळ भेटीच्या वेळी उपलब्ध झाले नव्हते. याबाबींकडे लक्ष वेधून ही यादी बोगस असल्याचे समितीने नमूद केले असता, विभागीय सचिवांनी ही तंतोतंत बनविण्यात आलेली अचूक यादी नाही. तसेच, काही लोकांनी यामध्ये गैरफायदा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे" असे समितीस विदित केले.

"बीपीएल याद्या बनविण्याचे काम कोणाला देण्यात आले होते" अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी "बीपीएल याद्या बनविण्याचे काम ग्रामसेवक, शिक्षक, सुशिक्षित बेकार यांना कंत्राटी पध्दतीने देण्यात आले होते" अशी माहिती दिली.

समितीने बीपीएल याद्यासंदर्भातील नव्याने सर्वेक्षण कधीपर्यंत सुरु करण्यात येईल तसेच नव्याने सर्वेक्षण करीत असतांना सर्वेक्षणकर्त्यांना या सर्व बाबींची काळजी घेण्याबाबत सूचना देण्यात याव्यात असे स्पष्ट केले असता विभागीय सचिवांनी बीपीएल यादी बनविण्याकरिता नव्याने सर्वेक्षण करण्याचे काम सुरु करण्यात आलेले असून नोव्हेंबर/डिसेंबर, २०१३ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. तसेच, सर्वेक्षण करणा-या लोकांना या सर्व बाबींची काळजी घेण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत असे समितीस अवगत केले.

यासंदर्भात सर्वेक्षण केल्यानंतर लाभार्थ्यांची यादी तयार करण्याकरिता व्हेरिफिकेशन होत असतांना जिल्हा पातळीवरील कर्मचारी व अधिकारी हजर असतातच परंतु त्यांच्यासमवेत शासनाच्या विभागाचा अधिकारीही हजर असावा या कॅमेरामध्ये लाभार्थी व त्याचे कुटुंबीय यांचे सर्वांचे नावे व चेहरे येऊन त्याचा रेकॉर्ड ठेवणे सोपे होईल. तसेच, ही यादी ड्राफ्ट स्वरुपात असतांना ती विभागीय पातळीवरुन मंत्रालयीन पातळीवर आणली जावी. व्हेरिफिकेशन नंतर या यादीला अंतिम स्वरुप प्राप्त करुन दिले तर ब-याचशा अडचणी दूर होतील असे मत समितीने व्यक्त केले.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या नियामक मंडळ / कार्यकारी समिती, जिल्हास्तरीय दक्षता व संनियंत्रण समिती, जिल्हयाचे मा.खासदार, जिल्हास्तरीय एसजीएसवाय समिती निमंत्रक, जिल्हा अग्रणी बँक शाखेचे अधिकारी व कार्यकारी समिती अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अशा प्रकारे विविध समित्यांचे अध्यक्ष उपलब्ध होवू न शकल्याने समित्यांच्या बैठका होवू शकल्या नाही. परिणामी जिल्हा ग्रामविकास यंत्रणांना योजनांची प्रभावी अंमलबजावणी करता आली नाही. त्यामुळे या समित्यांबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे. योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी कोणती ठोस उपाययोजना केली आहे अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, जिल्हा ग्रामीण विकास मंडळाची कार्यकारी समिती, दक्षता समिती, ब्लॉक डिव्हीजन संनियंत्रण समिती निर्माण केलेली आहे. शासकीय विभागाच्या योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता या समितींची निर्मिती केली गेलेली आहे. या समितीचे सदस्य हे आमदार व खासदार असतात.

जिल्हापरिषदेचे अध्यक्ष, पंचायत समितीचे सभापती, विभागीय प्रमुख यांचाही समावेश या समितींमध्ये सदस्य म्हणून केलेला असतो. या समित्यांच्या बैठका प्रत्येक महिन्याला एक याप्रमाणे सरासरी दरवर्षी १२ बैठका होणे आवश्यक असते. परंतु या समित्यांच्या बैठका वर्षामध्ये एकूण ०८ झालेल्या आहेत. माननीय मंत्री ग्रामविकास विभाग यांनी सर्व जिल्हा दक्षता संनियंत्रण समितीचे अध्यक्ष तथा खासदारांना अर्ध-शासकीय पत्र दिलेले आहे. या पत्रामध्ये त्यांनी जिल्हा ग्रामीण विकास मंडळांच्या समित्यांच्या जास्तीत जास्त बैठका झाल्या पाहिजेत, असे नमूद केलेले आहे. तसेच, या बैठकांमधून शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी होऊन शेवटच्या लाभार्थ्यांपर्यंत शासनाच्या प्रत्येक योजनांचा लाभ होऊन त्याचा विकास होणे आवश्यक आहे, असे सांगितलेले आहे. या संदर्भातील समन्वय समितीमध्ये डीडीओ सीईओ यांचा समावेश असतो.

अभिप्राय व शिफारशी :

जानेवारी २००३ मध्ये केंद्र शासनाने सुरु केलेल्या हरियाली योजनेतील वॉटर शेड प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये गावकऱ्यांचा सहभाग व त्यांच्या कमाईसाठी उत्पन्नाचे टिकाऊ स्त्रोत निर्माण करण्याकरिता मासेमारी, सिंचनासाठी व पिण्याच्या पाण्यासाठी पावसाळी पाणी जमविणे असा हेतू होता. सन २००४ ते २००९ या कालावधीमध्ये भंडारा, हिंगोली, नांदेड, नंदुरबार, ठाणे, यवतमाळ या सहा जिल्ह्यामध्ये हरियाली योजनेंतर्गत निधी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून ५ ते ३४ महीने इतक्या विलंबाने दिला गेल्याने प्रकल्प राबविण्याऱ्या संस्थांना ग्राम पंचायतींना निधीचा विनियोग योग्य पध्दतीने करता आला नाही असे महालेखापरीक्षकांनी अभिप्राय व्यक्त केले आहेत.

हरियाली योजनेंतर्गत एकूण ३४७ कोटी रुपये निधी प्राप्त झाला होता. या योजनेमध्ये गट निवास अधिकारी पंचायत राज संस्था अंमलबजावणी यंत्रणा होती. त्यातुन केवळ ३२२ कोटी रुपये इतका निधी खर्च करण्यात आला आहे व २४ कोटी इतका निधी व्यपगत झाला. मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाल्यानंतर १५ दिवसाच्या आत, योजना प्रत्यक्षात राबविणाऱ्या संबंधित संस्थाना/ ग्रामपंचायतींना निधी देणे बंधनकारक असताना निधी वितरित करण्यात अवास्तव विलंब झाल्याने योजनाच्या अंमलबजावणीवर खूप वाईट परीणाम झाला.

सिंचन क्षमता वाढविणे तसेच पाण्याच्या टंचाईचे निवारण करण्याच्या दृष्टीने पावसाचे पाणी साठवून ते पिण्यासाठी वापरणे याकरीता हरियाली योजनेचा उपयोग होणार होता परंतु

सदर योजनेची पूर्णत्वाने अंमलबजावणी न झाल्याने सहा जिल्हयातील जनतेस योजनेचा संपूर्ण फायदा मिळू शकला नाही. यामध्ये प्रमुख जबाबदारी सबंधित पंचायत समितीच्या गट विकास अधिकाऱ्यांची होती. या काळात कार्यरत असलेल्या उपरोक्त नमूद जिल्हातील गट विकास अधिकाऱ्यांनी योजनेचे कार्यन्वयन योग्यरित्या केले नसल्याचे समितीचे मत आहे. **भंडारा, हिंगोली, नांदेड, नंदुरबार, ठाणे व यवतमाळ या सहा जिल्हयातील तत्कालीन गट विकास अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

सन २००२ मध्ये केंद्रशासनाच्या आदेशानुसार दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यात आले होते. ते काम राज्यात सन २००३ मध्ये पूर्ण करण्यात आले. त्यावेळी अंगणवाडी सेविका, सुशिक्षित बेरोजगार यांच्याकडून सर्वेक्षण करुन घेण्यात आले होते. याचे कारण त्यावेळी ग्रामसेवक व शिक्षक संघटनेचा बहिष्कार असल्याचे समितीस साक्षीदरम्यान सांगितले गेले. सर्वेक्षणात अनेक त्रुटी असल्याने अनेक लोकांनी तक्रारी केल्या होत्य. अनेक ग्रामसभेत यादया फेटाळल्या गेल्या, सामाजिक संस्था/ संघटना न्यायालयात गेल्या. याद्या तयार करतांना ज्या अप्रशिक्षित व्यक्तींकडे काम सोपविले होते त्यांना प्रशिक्षण दिले गेले नाही. यामध्ये मार्गदर्शक तत्वाची त्यांना परिपूर्ण माहिती दिली गेली नाही, शासनाच्या नियंत्रणाचा व नियोजनाचा अभाव असल्याने अद्यापपावेतो दारिद्रय रेषेखालील व्यक्तींच्या नावाची यादी अद्ययावत होऊ न शकल्याने निश्चित लाभार्थ्यांना अनेक कल्याणकारी योजनांच्या फायदापासून वंचीत रहावे लागत असल्याचे समितीचे अभिप्राय आहेत. **दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीमधील लाभार्थ्यांची पडताळणी करतांना जिल्हा परीषदेच्या अधिकाऱ्यांसमवेत जिल्हा पातळीवरील शासनाच्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. यादीच्या प्रारुपास अंतिम मान्यता देण्यापूर्वी यादीची शहनिशा ग्रामीण भागात ग्रामसेवक व सरपंच व शहरी भागात नगरपालिका व महानगरपालिकेचे अधिकारी यांच्याकडून निश्चित केली जावी अशी समितीची शिफारस आहे.**

इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरकुलांसाठी ७० हजार रु. मंजूर आहेत. मागील वर्षी १ लाख ६२ हजार घरकुल बांधण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले होते त्यापैकी १ लाख ४६ हजार घरकुले पूर्ण झाली असल्याची माहिती समितीला साक्षीदरम्यान विभागाकडून निदर्शनास आणली गेली. परंतु या आकडेवारीमध्ये समितीला सत्यता दिसून येत नाही. शासनाकडे

कागदोपत्री आकडेवारी असली तरीही प्रत्यक्षात वस्तुस्थिती वेगळी आहे. आजच्या परीस्थितीत रु. ७०,००० हजार किंवा रु. १ लाख जरी शासनाने मंजूर केले तरीही या रक्कमेतून घराचे काम होणार नाही हे विभागीय सचिवांनी समितीसमोर विदीत केले त्याकरीता लाभार्थ्यांने स्वत:चे पैसे खर्च केल्याशिवाय घर पूर्ण होऊ शकणार नाही अशी पुष्टीही जोडली. प्रत्येक लाभार्थ्यांची आर्थिक परीस्थिती जमेची असतेच असे नाही. त्यामुळे अनेक लाभार्थ्यांची घरे अपूर्णावस्थेत तसेच पडून आहेत ही वस्तुस्थिती आहे. या परिस्थितीत रु ७० हजार ही रक्कम घरकुलासाठी फारच तुटपुंजी असल्याने या रकमेत घर पूर्ण होऊ न शकल्याने अनेक लाभार्थी प्रत्यक्ष या योजनेचा फायदा घेऊ शकत नसल्याचे समितीचे अभिप्राय आहे. समिती समोरील साक्षीदरम्यान विभागीय सचिवांनी घरकुलासाठी रु. १ लाख २५ हजार इतके करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला असल्याचे समितीला अवगत केले. **त्याअनुषंगाने सदरहू प्रस्तावात सुधारणा करण्यात येऊन रु. ७० हजार ऐवजी रु. १ लाख ५० हजार इतकी रक्कम घरकुलासाठी मंजूर करण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी व वाढत्या महागाईचा विचार करुन त्यामध्ये वेळोवेळी वाढ करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

जलसंधारण विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००८-२००९ च्या नागरी अहवालामधील (१) परिच्छेद क्र. २.४ "लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर)" यासंदर्भात खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

वित्तीय व्यवस्थापन :-

२००३-०४ ते २००७-०८ या कालावधीत लघु पाटबंधारे प्रकल्पांकरीता एकूण अर्थसंकल्पीय अनुदान रु. ७४४.०८ कोटी (राज्य क्षेत्र : २७०.४१ कोटी व जिल्हा परिषद रु. ४७३.६७ कोटी) होते. यापैकी झालेला खर्च रु. ६९२.१८ कोटी (राज्य क्षेत्र : रु. २५३.६६ कोटी व जिल्हा परिषद ४३८.५२ कोटी) होता. अर्थसंकल्पीय अनुदान व खर्च यांचे वर्षनिहाय तपशिल परिशिष्ट २.२८ मध्ये दिले आहेत.

असे दिसून आले की, मूळ अर्थसंकल्पीय तरतूद (रु. ४१७.६५ कोटी) एकूण तरतूदीच्या फक्त ५६ टक्के (रु.७४४.०७ कोटी) होती. याचा परिणाम म्हणून एकूण निधीच्या ४४ टक्के (रु. ३२६.४२ कोटी) निधीची तरतूद वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत पूरक अनुदानांद्वारे विनियोजनाद्वारे केल्या गेली, ज्यामुळे लघु पाटबंधारे प्रकल्पाचे सुरळीत कार्यान्वयन बाधित झाले. याशिवाय याच काळात राज्य क्षेत्र विभागांनी ३२ प्रकल्प कार्यान्वित केले ज्यांनी वित्तव्यवस्था अंशत: जर्मन वित्तीय निगम (KFW) मार्फत जर्मन शासनाने दिलेले कर्ज (रु. ४४.२४ कोटी) आणि राज्य शासनाचे अंशदान (रु. १९.११ कोटी) याने झाली होती.

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

सन २००३-०४ ते २००७-०८ या कालावधीत ल. पा. योजनेसाठी मूळ अर्थसंकल्पीय तरतूद रु. ४१७.६५ कोटी इतकी करण्यात आलेली होती. परंतु सदर तरतूद अपुरी असल्यामुळे व प्रत्यक्ष ल.पा योजनांची प्रगती नियोजनानुसार कायम ठेवून पुरवणी मागणीद्वारे अतिरिक्त अनुदानाची मागणी करण्यात येऊन सुधारीत अर्थसंकल्पीय तरतूद रु. ७४४.०८ लक्ष इतकी मंजूर झाली व यापैकी रु. ६९२.१८ कोटी (राज्य क्षेत्र रु. २७.४१ कोटी व जिल्हा परिषद रू. ४७३.६७ कोटी) म्हणजेच ९३ टक्के इतका खर्च झालेला आहे. तसेच याच

कालावधीत जर्मन प्रकल्पांतर्गत २८ योजना प्रगतीपथावर होत्या. प्राप्त रु. ४४.२४ कोटी अनुदानातून २८ योजना पूर्ण झाल्या आहेत.

या कालावधीत ० ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या ३६६४ योजना पूर्ण होऊन १.३९ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. तसेच प्राप्त निधीतून दि. १.४.२००८ रोजी ० ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या ७४५८ योजना प्रगतीपथावर होत्या व त्याद्वारे १.८२ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्याचे प्रस्तावित होते.

राज्याच्या अर्थसंकल्पात करण्यात येणारी तरतूद ही सर्व विभागांची मागणी, प्रगती पथावरील विकास कामे व नव्याने हाती घ्यावयाची कामे विचारात घेवून प्राधान्यक्रमाने विभागनिहाय अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात येते. तथापि वर्षाअखेरीस होणाऱ्या खर्चाचा अंदाज विचारात घेऊन आवश्यक असलेला निधी पुरक मागणीद्वारे मंजूर करण्यात येतो, ही सर्वसाधारण अर्थसंकल्पिय कार्यपध्दती आहे. त्यामुळे विभागामार्फत चालू असलेल्या योजना व प्राधान्य विचारात घेवून नवीन कामांसाठी पुरक मागणीद्वारे निधी प्राप्त करुन घेण्यात आला आहे. अहवाल कालावधीत पूर्ण झालेल्या योजनांची संख्या व निर्माण झालेली सिंचनक्षमता विचारात घेता लघु पाटबंधारे योजनांचे कार्यान्वयन बाधीत झाले आहे, अशी स्थिती नाही.

निधीचे विचलन :-

प्रलंबित लघु कामे पूर्ण करण्याच्या हेतुने मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत आठ जिल्हयातील ३३० अपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्याकरिता शासनाने रु. २४.२४ कोटी मंजूर केले (जानेवारी २००८) छाननीत असे उघडकीस आले की, अधीक्षक अभियंता, औरंगाबाद यांनी कार्यकारी अभियंता, औरंगाबाद (राज्य क्षेत्र) यांना रु. १.२० कोटी याच उद्देशासाठी पण १२ नवीन प्रकल्पांच्या यादीसह वितरित केले. कार्यकारी अभियंत्यांनी ही रक्कम १२ नवीन कामांच्या बांधकामासाठी वापरली. याप्रकारे, अपूर्ण कामे पूर्ण करण्याच्या निधी नवीन कामांकरिता वळविला गेला जो योजनेच्या तरतुदीं विरुध्द होता.

तसेच असेही दिसून आले (मार्च २००९) की, जिल्हा परिषद विभाग, औरंगाबाद मध्ये मार्च २००८ ला १६४ कामे प्रलंबित होती, ज्यासाठी रु. ३२.९० कोटी रकमेची आवश्यकता होती. २००८-०९ मध्ये विभागाकरिता रु. १५.५५ कोटींचे अर्थसंकल्पीय अनुदान केले होते.

छाननीत असे उघडकीस आले की, कार्यकारी अभियंत्यांनी २४ नवीन कामे घेतली आणि विभागाजवळ ९३ प्रलंबित प्रकल्प असतानांही या कामांवर रु. ६.०० कोटी खर्च केले.

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

लघु पाटबंधारे (स्था.स्तर) विभागास शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग लपायो-२००७/प्र. क्र. २६८/जल-४, मंत्रालय, मुंबई, दिनांक ०२/०१/२००८ अन्वये औरंगाबाद (स्था. स्तर) विभागाकडे १२ कामांना रु. १,२०,००,०००/- निधी मंजूर करण्यात आला आहे. तथापि मंजूर करण्यात आलेला निधी प्रस्तूत १२ कामांऐवजी ९ कामांवर खर्च करण्यात आला आहे. ही कामे जवळ पास पूर्ण होण्याच्या स्थितीत होती. तथापि नजिकच्या कालावधीत त्यास अनुदान उपलब्ध होणार नव्हते. सदर कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने निधी वळविण्यात आले असल्याचे कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, औरंगाबाद यांनी स्पष्ट केले आहे. वळविण्यात आलेला निधी त्याच तालुक्यातील कामांसाठी वापरण्यात आला आहे.

लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद यांना जलसंधारण महामंडळाकडून प्राप्त झालेला कामानिहाय निधी त्याच कामासाठी खर्च करण्यात आला आहे. सदर कामाव्यतिरिक्त नवीन कामे हाती घेण्यात आलेली नाही.

विना काटकसरीचे प्रकल्प :-

कार्यान्वित करावयाच्या प्रकल्पांच्या वित्तीय स्वयंपूर्णतेचे मुल्यमापन करण्यासाठी महाराष्ट्र शासन वेळोवेळी आर्थिक मापदंड विहित करते जे प्रति हजार घन मीटर पाणी साठवण्याच्या मुल्यामध्ये मोजल्या जाते. प्रकल्पांच्या वित्तीय स्वयंपूर्णतेची निश्चिती करण्यासाठी प्रकल्पांबद्दलची अंदाजपत्रके या आर्थिक मापदंडाच्या आत असली पाहिजेत. असे दिसून आले (मे २००९) की, राज्य क्षेत्रातील १०० चालू प्रकल्पांपैकी चाचणी तपासणी केलेल्या (चार जिल्ह्यातील) १० प्रकल्पांमध्ये, अपर्याप्त सर्वेक्षण आणि अन्वेषण यामुळे विहित आर्थिक मापदंडाच्या आत प्रकल्पाचे मुल्य अंदाजित केले गेले. प्रकल्पांचे प्रत्यक्ष मूल्य कार्यान्वयनाच्या वेळी कामाच्या परिणामातील वाढ, अयोग्य दगडखाणीचे अभिज्ञान ज्यामुळे अंतरात वाढ झाली आणि सुरु झाल्यानंतर संकल्पचित्रातील बदलामुळे परिशिष्ट २.२९ व २.३० मध्ये दाखविल्याप्रमाणे प्रमाणाबाहेर वाढले. यामुळे कामाच्या कार्यान्वयात विलंब होऊन त्याचा

परिणाम प्रकल्पांची किंमत वाढण्यात झाला. असे दिसून आले की, प्रकल्पावरील प्रति हजार घन मीटरच्या मंजूर मुल्यापेक्षा जास्तीचा केलेला खर्च ४१ टक्के आणि १३८ टक्के या दरम्यान होता. ज्यामुळे प्रकल्पांची वित्तीय स्वयंपूर्णता बाधित झाली. अपर्याप्त सर्वेक्षण आणि अन्वेषण यामुळे हे प्रकल्प चुकीने वित्तीय स्वयंपूर्ण दाखविले गेले.

विभागाने नमूद केले (जानेवारी ते मार्च २००९) की, वरील वाढ ही कार्यान्वयनाच्या वेळी दिसून आलेल्या प्रत्यक्ष स्थळाच्या स्थितीमुळे झाली.

हे उत्तर मान्य करण्यासारखे नव्हते कारण जर महाराष्ट्र लघु पाटबंधारे नियमपुस्तिकेप्रमाणे आवश्यक सर्वेक्षण आणि अन्वेषण केले गेले असते तर किंमतीतील वाढीची कारणे आधीच कळू शकली असती.

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला

स्थानिक स्तरीय योजना या लहान स्वरुपाच्या व विखुरलेल्या व अति डोंगराळ/दुर्गम भागात असतात. सदर योजनामुळे स्थानिक लाभार्थ्यांना पिण्यासाठी, सिंचनासाठी व गुरेढोरांना पिण्यासाठी पाणी उपयुक्त ठरत असल्यामुळे, स्थानिक लोकप्रतिनिधी योजना हाती घेणेबाबत आग्रही असतात. स्थानिक लोकप्रतिनिधी योजना हाती घेणेबाबत आग्रही असतात. स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सदर योजनांबाबत त्वरीत कार्यवाही करणे आवश्यक ठरते. याशिवाय खालील सर्वसाधारण कारणांमुळे योजनांच्या किंमतीत मोठया प्रमाणात वाढ होते.

१) लोकप्रतिनिधींची तीव्र मागणी तसेच सखोल सर्व्हेक्षणासाठी निधीची अनुपलब्धता या अनुषंगाने ढोबळ मानाने प्राथमिक सर्व्हेक्षण करुन योजनांची कामे हाती घ्यावी लागणे,

२) क्षेत्रीय परिस्थितीमुळे प्रत्यक्ष काम करताना सांडवा, जलरोधी खंदक इत्यादी घटकांच्या पाया संकल्पीत तलांकापेक्षा जास्त खोलीवर लागल्यामुळे खर्चात वाढ होते.

३) स्थानिक स्तरीय योजना लहान स्वरुपाच्या असल्यामुळे अंदाजपत्रक तयार करताना ल.पा. मॅन्युअल अथवा जवळपासच्या योजनांच्या काटच्छेद वापरण्यात येतो. परंतु प्रत्यक्ष क्षेत्रीय ठिकाणी उपलब्ध असलेल्या साहित्याच्या गुणधर्मावर माती घरणांचे काटछेद संकल्पीत करणे.

४) ल.पा. योजनांसाठी तांत्रिकदृष्टया योग्य कार्यक्षेत्र उपलब्ध नसल्यामुळे लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार उपलब्ध असलेल्या कार्यक्षेत्रानुसार कामे हाती घ्यावी लागणे,

५) प्रत्यक्ष काम करीत असताना प्रस्तावित ठिकाणी बांधकाम साहित्य उपलब्ध होत नसल्यामुळे जादा अंतरावरुन बांधकाम साहित्य आणावे लागणे,

६) भूसंपादनाच्या किंमतीत मोठया प्रमाणात होत असलेली वाढ, तसेच बुडीत क्षेत्रात मोठया प्रमाणात असलेली झाडे,

७) बांधकामासाठी वेळेवर निधी उपलब्ध न होणे.

८) दरसूचीच्या वाढीच्या प्रमाणात मापदंडात वाढ न होणे.

९) स्वामित्व शुल्काचा समावेश तसेच यामध्ये दुपटीने झालेली वाढ.

१०) स्टील व सिमेंटच्या दरात सातत्याने होणारी वाढ.

उपरोक्त नमूद केलेल्या कारणांमुळे योजनेच्या किंमतीत मोठया प्रमाणात वाढ होऊन खर्चात ४१ ते १३८ टक्के इतकी वाढ झाल्याचे निदर्शनास येते.

वरील कारणांचे अवलोकन केले असता, काही कारणे विभागाच्या नियंत्रणाबाहेरची आहेत, ही वस्तुस्थिती आहे. तथापि महाराष्ट्र लघु पाटबंधारे नियमपुस्तिकेच्या परिच्छेद ४.१.३ मधील तरतुदीचे अनुपालन केल्यास, काही प्रमाणात दक्षता घेतल्यास होणाऱ्या वाढीचे प्रमाण निश्चित कमी राहील. ही बाब विचारात घेवून प्रकल्पाच्या प्रारंभिक अन्वेषण सर्वेक्षण आणि तपशीलवार प्रकल्प अहवाल तयार करतांना प्रचलित कार्यपध्दतीचे कटाक्षाने पालन करण्याबाबत व अनुपालन करण्याबाबत व अनुपालन न झाल्यास संबंधिताविरुध्द जबाबदारी निश्चित करण्यात आल्यानंतर सुधारित प्रशासकिय मान्यतेचे प्रस्ताव विचारात घेण्यात येतील. असे सर्व संबंधिताना कळविण्यात आले आहे.

अयोग्य स्थळाची निवड :

महाराष्ट्र लघु पाटबंधारे नियमपुस्तिकेच्या परिच्छेद ४.३.८ मध्ये अशी तरतूद आहे की माती/स्तर यांच्या वर्गीकरणाकरीता स्थळाचे तपशीलवार अन्वेषण करावयाचे असते म्हणजे प्रकल्पाच्या अपयशाचा वाव कमीत कमी राहील. नियमपुस्तिकेच्या परिच्छेद ७.६ मध्येही असे नमूद केले आहे की. outflanking होण्याच्या धोक्यास प्रतिबंध करण्यासाठी बंधाऱ्याच्या दोन्ही काठांवर भरपूर संरक्षक कामे घेतली पाहिजेत तसेच , लघु पाटबंधारे नियम पुस्तिकेच्या

परिच्छेद ३.११ प्रमाणे पाटबंधारे प्रकल्पाकरिता "लाभ-किंमत (BC) गुणोत्तर" एकापेक्षा जास्त असले पाहिजे. अन्वेषणाच्या अभावी अयोग्य स्थळांच्या निवडीची पुढील उदाहरणे छाननीत उघडकीस आली.

(i) औरंगाबादच्या सिल्लोड तालुक्यात, मोडा २ कोल्हापूरी बंधारा. रु. ४६.१८ लाखांकरिता मंजूर केला गेला (ऑक्टोबर १९९५) जो जिल्हा परिषद विभाग, औरंगाबादने बांधावयाचा होता.

अंदाजपत्रकामध्ये, मोडा १ कोल्हापूरी बंधाऱ्याच्या अनुभवावरुन, स्तर पुन्हा अन्वेषण करण्याचा उपविभागीय अधिकाऱ्याच्या सूचनेकडे दुर्लक्ष करुन कोल्हापूरी बंधाऱ्याच्या पायाचा आधार ४.५ मीटर ते ६ मीटर ठेवण्याची योजना केली गेली. तथापि, कार्यान्वयन करताना पायाची खोली १२ मीटरपर्यंत वाढवावी लागली. बंधाऱ्यासाठी आवश्यक असलेली मार्गदर्शक भिंत, धारक भिंत आणि पाख भिंत यांची ही तरतूद अंदाजपत्रकामध्ये नव्हती. २००६ वर्षीच्या पावसाळयात कोल्हापूरी बंधाऱ्याच्या काठांची धुप झाल्यानंतर, हा कामाचा भाग म्हणून समाविष्ट केला गेला. यामुळे तसेच इतर कारणे जसे पीअर्सच्या बांधकामातील specifications मध्ये बदल, दोन स्वयंचलित द्वाराची उभारणी व स्टीलच्या दरातील वाढ यामुळे कोल्हापूरी बंधाऱ्याचे मुल्य रु. ४.४६ कोटीपर्यंत वाढले (एप्रिल २००७), ज्यामुळे लाभ-किंमत गुणोत्तर एकच्या खाली गेले. मार्च २००९ पर्यत सुधारीत अंदाजपत्रकाला शासनाची मंजूरी मिळालेली नव्हती. म्हणून स्तराच्या अपर्याप्त अन्वेषणाच्या आधारावर प्रकल्प स्थानाचे प्रतिकूल स्थळ ठरविणे आणिं पर्याप्त संरक्षक कामांची तरतूद नसणे यांने प्रकल्प अजीवनक्षम झाला. परिणामी, शेतकरी या कोल्हापूरी बंधाऱ्यापासून लाभ मिळवू शकले नाहीत आणि जानेवारी २००९ पर्यंत केलेला रु. २.६० कोटींचा खर्च विनाउपयोग अडुन राहिला.

(ii) औरंगाबाद जिल्ह्यात kfw ने वित्तव्यवस्था केलेला व १५९ हेक्टर सिंचनाची तरतूद असलेला बोलेगाव कोल्हापूरी बंधारा रु. २.०२ कोटी खर्च करुन पूर्ण करण्यात आला. (ऑक्टोबर, २००५) बंधारा पाणी साठवण्यासाठी अक्षम ठरल्याने kfw च्या तज्ञ प्रतिनिधींचा सल्ला घेण्यात आला. तज्ञाने प्रकल्पाला भेट दिली (नोव्हेंबर २००५) आणि त्याला आढळले की, नदीच्या पात्रातील बऱ्याच जास्त झरणक्षमतेसहित प्रतिकूल मातीमुळे बंधाऱ्याच्या वरच्या बाजूकडे पाण्याचा साठा करणे शक्य नव्हते. त्यांच्या सुचनेप्रमाणे प्रकल्पात अपेक्षित असलेल्या दोन उपसा सिंचन योजनाही वगळण्यात आल्या. या प्रकारे, या कोल्हापूरी बंधाऱ्यापासून

काहीही सिंचन झालेले नाही. हे निदर्शनास आणून दिल्यावर कार्यकारी अभियंत्यांनी उत्तर दिले (मार्च २००९) की बंधाऱ्याच्या जवळ असलेल्या शेतातील विहिरी प्रभारीत केल्या जात होत्या, ज्यामुळे अप्रत्यक्ष सिंचनाचे लाभ दिले जात होते. कार्यकारी अभियंत्यांचे उत्तर समर्थनीय नव्हते, कारण प्रकल्पाचा उद्देश १५९ हेक्टर जमिनीला प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ देण्याचा होता. याप्रकारे अजीवनक्षम प्रकल्पावर केलेला रु. २.०२ कोटीचा खर्च निष्पळ झाला.

(iii) लघु पाटबंधारे नियमपुस्तिकेप्रमाणे जिथे ओढयाला बारमाही प्रवाह आहे किंवा पावसाळयानंतर पुरेसा प्रवाह आहे तिथे कोल्हापूरी बंधाऱ्याचे स्थान ठेवले पाहिजे. जेणेकरुन दुष्काळग्रस्त काळात सिंचन शक्य होईल. प्रत्येक वर्षी कोल्हापूरी बंधाऱ्याच्या लोखंडी फळया १५ ऑक्टोबर पर्यंत जो रब्बी हंगामाचा प्रारंभ आहे, घट्ट बसविल्या पाहिजेत. कार्यकारी अभियंता, MILS विभाग, औरंगाबाद यांच्या अभिलेख्यांच्या छाननीत (जानेवारी ते जून २००९) असे उघडकीस आले की, चाचणी तपासणी केलेल्या १७ प्रकल्पांपैकी सहा कोल्हापूरी बंधाऱ्याच्या बाबतीत २००३-०४ ते २००७-०८ या कालावधीत ओढे/ नदयामध्ये पावसाळयानंतर आवश्यक पाण्याच्या अनुपब्धतेमुळे पाणी साठयाची सरासरी टक्केवारी ०.८३ टक्के ते ३८.०५ टक्के होती. हे अपर्याप्त नियोजन व सर्वेक्षण दर्शविते कारण ज्या ठिकाणी पावसाळयानंतर पाण्याचा प्रवाह नव्हता तिथे कोल्हापूरी बंधारे स्थित होते. रु.५.४९ कोटीचा खर्च केल्यानंतर या कोल्हापूर बंधाऱ्यांनी सुरुवातीपासून पूर्ण क्षमता मिळविली नाही. कार्यकारी अभियंता, MILS विभाग यांनी स्वीकार केले (मार्च २००९) की, पावसाळयानंतर नदी/नाला यात प्रवाह उपलब्ध नसल्यामुळे या कोल्हापूरी बंधाऱ्यात पाण्याचा साठा अपर्याप्त होता.

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला

(अ) मोढा खुर्द को. प.बंधारा क्र. २ ता. सिल्लोड या योजनेचे काम जिल्हा परिषद सिंचन विभागांतर्गत स्विकृत निविदा ब-१/२४ सन १९९९-२००० अन्वये सुरु करण्यात आलेले होते. योजनेचे काम सुरु झाल्यानंतर जि.प. सिंचन विभागामार्फत पायाचे संपूर्ण खोदकाम करण्यात येवून पक्ष भिंत, पार्श्वभिंत व गुंताव भिंत व मुख्य बंधाऱ्याचे जोत्याचे काम नदी पातळी/जमीन पातळी पर्यंत पुर्ण करण्यात आले होते. मध्यंतरीच्या काळामध्ये योजनेची सिंचन क्षमता ९६ हेक्टर वरुन १३७ हेक्टर पर्यत वाढल्यामुळे सदर योजना मुख्य अभियंता (स्था. स्तर) पुणे यांचे आदेशान्वये दिनांक ०१/०१/२००३ रोजी लघु पाटबंधारे (स्था. स्तर) विभागास

वर्ग करण्यात आली. हस्तांतरित करतेवेळी जिल्हा परिषदेकडून जोत्यापर्यंतचे काम करण्यात आले होते. मुळ सर्वेक्षणात विरळ अंतरावर खड्डे घेवून अंदाजपत्रक करण्यात आले होते. तथापि प्रत्यक्ष काम करताना योग्य प्रतीचा खडक न लागल्यामुळे संभाव्य गळती टाळण्यासाठी खोल पाया घेणे अपरिहार्य झाले. मुळ अंदाजपत्रकात संरक्षक कामाची तरतूद नव्हती. तथापि भविष्यकालीन हानी टाळण्यासाठी शासन मान्यतेने संरक्षक कामाचा समावेश मूळ कामात करण्यात येवून आदेश क्र. कोपब-१४०७/प्र.क्र.२२६/जल.१/दिनांक ३०.०६.२००९ अन्वये रु. ४४५८७५००/- इतक्या रकमेस तृतीय प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. योजनेचे काम भौतिक दृष्टया पूर्ण झालेले असून सन २००९-२०१० व सन २०१०-११ च्या रब्बी हंगामामध्ये उपलब्ध पाणीसाठ्यातून सिंचन निर्मिती करण्यात येत आहे. प्रचलित पीक पध्दतीनुसार योजना पुर्ण होण्यापुर्वी व योजना पुर्ण झाल्यानंतरच्या सिंचन पध्दतीचा अभ्यास केल्यानंतर लाभ-किंमत गुणोत्तर १.४९ इतके आहे. योजनेचे भौतिक काम पुर्ण झाले असून नजिकच्या काळात योजनेपासून १०० टक्के सिंचन होईल.

(ब) बोलेगांव को. प. बंधारा ता. गंगापूर जि. औरंगाबाद या प्रकल्पास जर्मन अर्थ सहाय्य अंतर्गत लघू सिंचन कार्यक्रम-महाराष्ट्र या कार्यक्रमांतर्गत असलेल्या सुकाणू समितीचे पत्र जी.ए.पी/१००./फ.न/३१०/जल-९/दि.१५.०१.२००० अन्वये रु. २५५०५०५०/- इतक्या किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. जर्मन प्रकल्पामध्ये लोक सहभाग हे महत्त्वपूर्ण वैशिष्ट असून या कार्यक्रमात प्रकल्पाच्या कार्यान्वयनापासून प्रत्येक टप्प्यावर लाभार्थ्यांच्या सहमतीने निर्णय घेण्यात आले आहेत. बोलेगाव हा जर्मन अर्थसहाय्यित प्रकल्प असुन प्रकल्पाची प्रस्तावित सिंचन क्षमता १५९ हेक्टर इतकी होती. तथापि लाभ क्षेत्रातील पाणी वापर संस्थेचे सदस्य व जर्मन बँकेचे अधिकारी यांच्या सहमतीने पाणी वापर संस्था स्थापन करण्याऐवजी लाभ क्षेत्रातील वैयक्तिक विहिरीद्वारे पाण्याचा लाभ घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सन २००५-२००६ पासून पावसाळयात पाण्याच्या उपलब्धतेनुसार प्रकल्पामध्ये पुर्ण क्षमतेने पाणी साठा निर्माण होत आहे. प्रकल्पांच्या प्रस्तावित लाभक्षेत्रातील विहिरींची निरीक्षणे काम सुरु करण्यापुर्वी घेण्यात आली होती व प्रकल्पामध्ये पाणीसाठा निर्माण झाल्यानंतर विहीरीची निरिक्षणे घेण्यात आली. सदर निरीक्षणातील निष्कर्षानुसार ज्या विहिरी काही वर्षापासून कोरडया होत्या त्या प्रकल्पातील पाणी साठयामुळे प्रभारीत झालेल्या आहेत. तसेच लाभक्षेत्रातील सर्व विहिरींच्या पाणी पातळीमध्ये अत्यंत झपाटयाने लक्षणीय वाढ झालेली आहे.

तसेच संकल्पित लाभक्षेत्राबाहेरील विहिरींना अप्रत्यक्षरित्या सिंचनाद्वारे ओलिताखाली आलेले असून सध्या या प्रकल्पावर २०८ हे अप्रत्यक्ष सिंचन होत आहे, हा या को. प. बंधाऱ्याच्या बांधकामामुळे झालेला बदल आहे. त्यामुळे प्रकल्पावर झालेला खर्च हा निष्पळ झालेला नसून या भागातील लाभधारकांना याचा भरपूर फायदा झालेला आहे. त्यामुळे सदर प्रकल्पावर झालेला खर्च व्यर्थ ठरला आहे. अशी स्थिती नाही.

(क) लघु पाटबंधारे (स्था. स्तर) कडील योजना ५० टक्के अवलंबीत पर्जन्यमानास संकल्पित करण्यात येत असल्यामुळे प्रकल्पात प्रत्येक वर्षी पुर्ण क्षमतेने पाणी साठा निर्माण होणे अपेक्षित नाही. शासनाच्या क्र. लपायो-१०९९/प्र.क्र.३४७/जल-१ दि. ३१/७/२००० च्या शासन निर्णयानुसार शेतकऱ्यांना त्यांच्या सोयीनुसार सिंचनासाठी पाणी उपलब्ध व्हावे यासाठी लाभार्थ्यांच्या पाणी वापर सस्था स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार योजना पुर्ण झाल्यानंतर प्रकल्प पाणी वापर संस्थेकडे हस्तांतरीत करण्यात येतात. अशा प्रकल्पांची देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापन करण्याची जबाबदारी सदर पाणी वापर संस्थेची आहे. परंतू या बाबत पाणी वापर संस्थेकडून वेळीच कार्यवाही होत नसल्याने संकल्पित पाणी साठा निर्माण होऊन शकत नाही.

पाणी वापर संस्थांचा अनुत्साह विचारात घेवून औरंगाबाद विभागात विभागीय आयुक्त यांच्या नेतृत्वाखाली सन २०११ या वर्षात लोक सहभागातून पाटबंधारे योजनांना गेट बसविण्याचा कार्यक्रम राबविण्यात आला आहे. याद्वारे औरंगाबाद महसूल विभागातील प्रकल्पांवर १८१४ एवढे दरवाजे बसविण्यात आले आहेत. सदर गेट बसविल्यामुळे गतवर्षीच्या तुलनेत मोठया प्रमाणात पाणीसाठा झाला आहे. सदर कार्यक्रमास मिळालेले यश विचारात घेवून दि. १२/१०/२०११ च्या शासन निर्णयान्वये दिनांक १७ ऑक्टोबर ते दिनांक ३० नोव्हेंबर २०११ या कालावधीत महात्मा फुले जल व भुमी संधारण अभियांनातंर्गत को. प. बंधाऱ्यांना गेट बसविण्याची धडक मोहिम हाती घेण्यात आली होती. वरील बाबी विचारात घेता पावसाच्या पाण्याचा जास्तीत जास्त साठा करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्यात येत असल्याचे स्पष्ट होत आहे.

जमिनीच्या अनुपलब्धतेमुळे बाधित झालेले प्रकल्प :-

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेच्या परिच्छेद २५१ अनुसार प्रकल्पाला लागणारी जमीन संपादन करण्याआधी कुठलेही काम सुरु करावयाचे नसते. वन संरक्षक

अधिनियम १९८० मध्येही असे करारनिर्दिष्ट केले आहे की, वन जमिनीवर कुठलाही प्रकल्प घेण्याआधी वन विभागाकडून निपटारा आवश्यक आहे.

निवडलेल्या १० जिल्ह्यातील छाननी केलेल्या १६० प्रकल्पापैकी, खाली चर्चिल्याप्रमाणे ११ प्रकल्प जमिनीच्या अनुपलब्धतेमुळे बाधीत झाले.

लेखा परिक्षा आलोचनाचे स्वरुप : वन विभागाकडून निपटारा प्राप्त न करणे

लेखा परिक्षणाचे निष्कर्ष :- कार्यकारी अभियंता, MILS चंद्रपूर यांच्या अभिलेख्यांच्या छाननीत (फेब्रुवारी २००९) असे उघडकीस आले की, विभागीय कार्यालयाचे वन विभागाकडून निपटारा घेतल्याशिवाय केमतुकुम येथे अपवाहन बंधारा प्रकल्पाच्या कार्यान्वयनाचे काम सुरु केले होते (मे १९९१), वन विभागाचा निपटारा न मिळाल्याने रु. १५.८१ लाख खर्च केल्यानंतर काम थांबविण्यात आले (सप्टेंबर १९९६), कार्यकारी अभियंता यांनी स्वीकार केले (फेब्रुवारी २००९) की, वनजमीन ही चुकीने महसूल जमीन समजण्यात आली आणि जून २००६ मध्ये वन विभागाकडून मागितलेला निपटारा अजून प्रतिक्षीत होता.

लेखा परिक्षा आलोचनाचे स्वरुप :- लाभार्थ्यांना गोवल्याशिवाय प्रकल्प हाती घेणे.

लेखापरिक्षणाचे निष्कर्ष :- फेब्रुवारी १९९७ ते एप्रिल २००८ या कालावधीत घेतलेल्या नऊ प्रकल्पांच्या बाबतीत (परिशिष्ट २.३१) असे दिसून आले की, प्रकल्पांना आवश्यक असलेली जमीन देण्याची तयारी नसलेल्या भूधारकांच्या विरोधामुळे फेब्रुवारी /मार्च २००९ पर्यंत एकतर प्रकल्प किंवा कालवे अपूर्ण राहिले. प्रकल्पाची पूर्णता शंकास्पद राहिली.

याप्रकारे रु. ७.४२ कोटीचा केलेला खर्च एक ते दहा वर्षापासून निष्पळ राहिला.

लेखा परिक्षा आलोचनाचे स्वरुप :- अनावश्यक घटकाच्या समावेशामुळे सदोष अंदाजपत्रके

लेखापरिक्षणाचे निष्कर्ष :- १३८ हेक्टर्स सिंचन क्षमतेचे लक्ष्य असलेले बुलढाणा जिल्ह्यातील जुनोना साठवण तलावाचे काम मुख्य अभियंता यांनी तांत्रिकदृष्टया मंजूर केले व काम सुरु झाले (जुलै २००४) खालच्या बाजूकडे पाणी सोडण्यासाठी शिर्ष विमोचकाचा समावेश करण्यात आला. पण १०० मीटर्सच्या आत वनजमीन असल्याने या प्रकल्पामध्ये खालच्या बाजूकडे पाणी सोडण्यास वाव नव्हता. कामामधून शिर्ष विमोचकाला वगळण्याचा प्रस्ताव सप्टेंबर २००४ मध्ये सादर केला होता. जो अंतिमत: फेब्रुवारी २००८ मध्ये मंजूर झाला. या

दरम्यान, शिर्ष् विमोचकाकरिता आवश्यक असलेले नागरी कामाचे बांधकाम आणि दरवाजाची निर्मिती रु. १०.६२ लाख खर्चून आधीच कार्यान्वित झाली होती. याचा परिणाम रु. १०.६२ लाखांचा निरर्थक खर्च होण्यात झाला.

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात खालीलप्रमाणे विभागाने खुलासा केला

केमतुकुम अपवहन बंधारा हा मुळत: जलसंपदा विभागाकडून कार्यान्वित करण्यात येत होता. तथापि या विभागाच्या निर्मितीनंतर सदर योजना स्थानिक स्तर यंत्रणेकडे हस्तांतरित करण्यात आली. प्रकल्प हाती घेण्याच्या वेळी प्रकल्पासाठी आवश्यक असलेली जमीन ही महसूल खात्याची किंवा वन खात्याची याबाबत खातरजमा करण्याची जबाबदारी जलसंपदा विभागाची होती. तथापि याबाबत योग्य ती कार्यवाही न झाल्यामुळे जलसंपदा विभागाने या प्रकरणी जबाबदारी निश्चित करुन करुन संबंधिताविरुध्द कारवाई केली आहे.

कालातंराने सदर जमीन वन विभागाची असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर वन विभागाचा निपटारा करण्यासाठी काम थांबविण्यात आले आहे. वन विभागाकडून वन जमीन प्राप्त करुन घेण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. याचसंदर्भात असेही स्पष्ट करण्यात येते की, वनजमीनीअभावी प्रलंबित असलेले इतर प्रकल्प लवकरात लवकर निकाली काढण्याबाबत अधिक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, नागपूर यांना दि. ३१ ऑक्टोबर, २०११ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

नागरी अहवालाच्या परिशिष्ट २.३१ मध्ये दर्शविलेल्या ९ योजनांपैकी, (अ) कौटाळी व झाडी बोरगाव ल.पा. तलाव व सावरगांव मुंढे या प्रकल्पांसाठी आवश्यक असलेल्या जमीनीचा प्रश्न निकाली निघाला आहे.

(ब) खंडोबाची वाडी व कोंडवाडी, ल.पा. योजनेसाठी आवश्यक असलेल्या जमीनीच्या भुसंपादनासाठी कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

(क) शिवतर ल.पा. योजना, माखजन व ल.पा. योजना, व आंबव ल.पा. तलाव या योजनांसाठी आवश्यक असलेल्या जमीनी भुसंपादनाची कार्यवाही ग्रामस्थांच्या विरोधामुळे झालेली नाही. ६ योजनांसाठी आवश्यक असलेल्या जमीनीचा प्रश्न निकाली निघाला आहे किंवा अंतिम टप्प्यात आहे. तथापि शिवतर ल.पा. योजना, माखजन ल.पा.योजना व आंबव ल.पा. तलाव या योजनांसाठी आवश्यक असलेल्या जमीनीअभावी सदर योजनांचे भवितव्याबाबत शंका

आहे. ही वस्तुस्थिती आहे. प्रकल्पांवर झालेला खर्च व भविष्यात अपेक्षित असलेला खर्च व त्यापासून होणारी उपयोगिता या बाबी विचारात घेवून संभाव्य पर्यायाच्या संदर्भात संबंधित ग्रामस्थांबरोबर चर्चा करुन प्रस्तुत प्रकरणी तातडीने निर्णय घेण्याबाबत अधिक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, ठाणे यांना कळविण्यात आले आहे.

तत्कालीन प्रचलित नियमानुसार योजनांचे अंदाजपत्रक तयार करताना साठवण तलावाच्या कामात शिर्ष विमोचकाचा समावेश करणे आवश्यक होते. त्यानुसार जुनोना साठवण तलावाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देताना त्यामध्ये शिर्ष विमोचकाचा समावेश करण्यात आला होता. त्यानुसार विमोचकाचे काम करण्यात आले. तथापि जलसंपदा विभागाच्या दि. ५/२/२००७ च्या परिपत्रकानुसार साठवण तलावांच्या कामातून शिर्ष विमोचक वगळण्याची तरतूद करण्यात आली. याचदरम्यान मुख्य अभियंता यांनी २००८ मध्ये केलेल्या पहाणीत प्रकल्पाच्या खालच्या बाजूस वनजमीन असल्यामुळे शिर्ष विमोचक वगळण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार शिर्ष विमोचक वगळण्यात आले आहे. यासाठी झालेल्या रु. १०.६२ लक्ष इतकी रक्कम परत मिळविण्यासाठी संबंधित स्थानिक यंत्रणा प्रयत्नरत आहे.

प्रकल्पांचे कार्यान्वयन :-

सिंचन क्षमता निर्मितीतील तूट :-

मुख्य अभियंता, MILS यांनी सिंचनक्षमता निर्मितीसाठी वार्षिक लक्ष्ये निश्चित केली. २००३-०४ ते २००३-०८ या वर्षातील ठेवलेली लक्ष्ये आणि तुलनेने सिंचन क्षमता निर्मिती तक्ता १ मध्ये दिली आहे :-

तक्ता १ : सिंचन क्षमता निर्मितीतील लक्ष्ये व संपादणूक

वर्ष	सिंचनक्षमतेचे लक्ष्य (हेक्टर्समध्ये)	निर्मिलेली सिंचनक्षमता (हेक्टर्समध्ये)	तुटीची टक्केवारी
२००३-०४	६०९७	१४७९	७६
२००४-०५	७८५१	१६९९	७८
२००५-०६	६३८२	०	१००
२००६-०७	६४७०	२३४८	६४
२००७-०८	३३३९६	२७१३७	१९

वरील तक्त्यावरुन असे दिसू शकले की, २००५-०६ मध्ये निर्मिलेली सिंचनक्षमता निरंक होती व २००७-०८ मध्ये सिंचनक्षमतेचे लक्ष्य आणि निर्मिती आधीच्या वर्षीच्या तुलनेत

प्रमाणापेक्षा जास्त होती. या प्रमाणाबाहेर तफावतींची कारणे लेखापरिक्षेत विचारली असता दिली गेली नाहीत (ऑगस्ट २००९).

मुख्य अभियंत्यांनी नमुद केले (जानेवारी २००९) की, वार्षिक लक्ष्यांच्या संपादणुकीतील तुट ही भुधारकांचा विरोध, आवश्यकतेप्रमाणे निधी न मिळणे, सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यातील विलंबामुळे होती.

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला

अ. क्र.	वर्ष	सिंचन क्षमतेचे लक्ष्य (हेक्टरमध्ये)	निर्मित सिंचन क्षमता साध्य (हेक्टरमध्ये)	तूट	
				हेक्टर	टक्केवारी
१	२००३-०४	६०९७	३४७३	२६२४	४३
२	२००४-०५	७८५१	४७८८	३०६३	३९
३	२००५-०६	६३८२	२९७३	३४०९	५३
४	२००६-०७	६४७०	५०९१	१३७९	२१
५	२००७-०८	३३३९६	३४९३५		

सन २००७-०८ मध्ये जलसंधारण विभागामार्फत (जिल्हा परिषद व स्था.स्तर) ० ते १०० सिंचन क्षमतेच्या योजनाद्वारे ३२८७८ हे व १०१-२५० हे सिंचन क्षमतेच्या योजनाद्वारे २०५७ हे. असे एकुण ३४९३५ हे. सिंचन क्षमतेचे उद्दिष्ट साध्य झालेले आहे. सदरील साध्य करण्यात आलेली निर्मित सिंचन क्षमता ही सन २००७-०८ मध्ये साध्य झाल्याचे निर्दशनास येते.

वितरण यंत्रणेचे कार्यान्वियन न करणे :-

लघु पाटबंधारे नियम पुस्तिकेनुसार, पाटबंधारे प्रकल्पांचे घळ भरण्याचे काम लाभक्षेत्राचे ३३ टक्के व्याप्त करेल अशी वितरण यंत्रणा सर्व दृष्टीने पूर्ण झाल्यानंतरच घेतले पाहिजे. उर्वरित वितरण यंत्रणा घळ भरण्याचे काम झाल्यानंतर पुढील दोन वर्षात पूर्ण केली पाहिजे. पुढील प्रकरणांमध्ये वितरण यंत्रणा पूर्ण केली गेली नाही, ज्याचा परिणाम सिंचन क्षमता संपादन न होण्यात झाला.

पश्चिम वाहिनी नद्यांचे शिल्लक पाणी वापरण्याच्या हेतूने पश्चिम वाहिनी नद्यांचे २५३.६२ दशलक्ष घन फूट पाणी नाशिक जिल्ह्याच्या तुटीच्या नदी खोऱ्यांकडे वळविण्यास महाराष्ट्र शासनाने मंजूरी दिली (ऑक्टोबर १९९९). याकरिता मुख्य अभियंता MILS यांनी

नाशिक जिल्ह्यात वेळुंज येथे तलाव -नि अपवाहन बंधारा रु. ५२.७९ लाख या जिल्ह्यात अंदाजित किंमतीला मंजूर केला (मे २००५). अपवाहन कालव्यासहित साठवण तलाव-नि-अपवाहन बंधाऱ्याचे काम रु. ४७.०७ लाख खर्चाने २००६ या वर्षात पूर्ण झाले. अंबोली लघु पाटबंधारे तलावाच्या जलग्रहण क्षेत्रात पाणी सोडविण्याकरिता tail channel चे कार्यान्वयन पूर्ण होऊ शकले नाही. कारण त्यात एक रस्ता ओलांडावा लागत होता. ज्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाची आवश्यक परवानगी मागितली गेली नव्हती. ती परवानगी एप्रिल २००९ मध्ये मागितली गेली.

प्रकारे tail channel च्या पूर्ण न होण्यामुळे रु. ४७.०७ लाखाचा खर्च तीन वर्षाहुन जास्त काळाकरिता निष्फळ राहिला.

रत्नागिरी जिल्ह्यातील १८३ हेक्टर्स सिंचनक्षमता अपेक्षित असलेल्या राजेवाडी लघु पाटबंधारे तलावाची मुख्य कामे सांगली MILS विभागाने रु. ९.०९ कोटी खर्चाने पूर्ण केली, (जून १९९९) तलावाच्या दोन्ही काठांपासून दोन कालव्यांद्वारे सिंचन करावयाचे होते. अवरुध्द पाणी सोडण्याकरिता कालवे यंत्रणा एका सामाईक कालव्याने निर्गम मार्गापासून (०.मी.). ६० मीटर्स पर्यत सुरु करुन तिथे तिची ४.१५ कि. मी. आणि ३ कि. मी. लांबी अपेक्षित असलेल्या अनुक्रमे उजवा कालवा आणि डावा कालवा अशी विभागणी व्हावयाची होती. डावा कालवा हा chainages ६० मी. पासून पुढे आणि १९८५ मीटर्सपर्यत पूर्ण झाला. पण कालव्यात पाणी सोडता आले नाही. कारण सुरुवातीच्या ० मी. ते ६० मी. या टप्प्यातील कालव्याचे खोदकाम, भूसंपादन न झाल्याने केली गेली नव्हती. उजव्या कालव्याचे काम मे २००९ पर्यत घेतले नव्हते. १९९९ मध्ये तलाव पूर्ण झाल्यापासूनच्या सर्व वर्षात तलाव पूर्ण पातळीपर्यत भरल्यानंतरही त्यातून सिंचन होऊ शकले नाही. याप्रकारे ० मी. ते ६० मी. मधील जमिनीच्या उपलब्धतेची निश्चिती केल्याशिवाय ६० मी. नंतरच्या कालव्याचे काम सुरु करण्यात आले.

कार्यकारी अभियंता यांनी उत्तर दिले (जुलै २००९) की, जिथे ० मी. ते ६० मी. कालवा बांधवयाचा होता. तेथील जमीन मालकांनी बांधकामाला प्रतिबंध करणारा न्यायालयाचा आदेश प्राप्त केला होता. तलावामधून सिंचन करण्यासाठी इतर पध्दतीही योजली नाही. ज्यामुळे लघु पाटबंधारे तलाव बांधाचा मुख्य हेतूच विफल झाला.

याप्रकारे, धरणात पूर्णपणे पाणी अवरुध्द करुनही, सिंचन होऊ शकले नाही. याचा परिणाम रु. ९.०१ कोटींचा निष्फळ खर्च होण्यात झाला.

८६ हेक्टर्सची सिंचनक्षमता अपेक्षित असलेल्या बाबूवाडी लघू पाटबंधारे तलावाचे मुख्य काम रु. १.७३ कोटी खर्चाने लघु पाटबंधारे, जि. प. औरंगाबाद ने पूर्ण केले (मे २००६). सिंचन १.५ कि. मी. लांबीच्या कालव्यातून करावयाचे होते ज्याच्या बांधकामाला धरणाच्या सानिध्यातील शेतकऱ्यांनी अडथळा आणला. कारण, त्यांच्या विहिरी पाण्याने प्रभारित केल्या होत्या. त्याचप्रमाणे करबाडा आणि आष्टा क्र.२ (वरोरा) येथील दोन लघु पाटबंधारे तलावांचे मुख्य काम कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे जिप, चंद्रपूर यांनी २००५ मध्ये रु. ६९.६७ लाख खर्चाने पूर्ण केले तथापि, कालव्याचे बांधकाम न झाल्याने सिंचन होऊ शकले नाही.

कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे जिप, औरगाबाद यांनी नमुद केले (जुन २००९) की, शेतकरी अप्रत्यक्ष सिंचनाचे लाभ मिळवितात त्यामुळे कालव्याचे बांधकाम केले नव्हते. कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे जिप, चंद्रपूर यांनी नमूद केले (जूलै २००९) की, कालव्याकरिता भूसंपादनात उशीर झाल्यामुळे व आवश्यक निधी प्राप्त न झाल्यामुळे कालव्याच्या कामाचे कार्यान्वयन करु शकले नाही.

कार्यकारी अभियंत्याची उत्तरे मान्य करण्यासारखी नव्हती कारण लघु पाटबंधारे तलाव हे कालव्याद्वारे प्रत्यक्ष सिंचनाची तरतूद करण्याच्या हेतूने बांधले होते आणि त्यांच्या बांधकामाविना सिंचन लाभ मर्यादित राहतात. याप्रकारे, वितरण यंत्रणा पूर्ण न करण्याचा परिणाम रु. २.४३ कोटीचा खर्च तीन वर्षाकरिता निष्फळ राहण्यात झाला.

निवडलेल्या १० जिल्ह्यांतील २५ लघु पाटबंधारे तलाव प्रकल्पांपैकी बीड जिल्ह्यातील तीन लघु पाटबंधारे तलावात, नाशिक जिल्ह्यातील दोन लघु पाटबंधारे तलावात, रत्नागिरी जिल्ह्यातील नऊ लघु पाटंबधारे तलावात, व सांगली जिल्ह्यातील एका लघु पाटबंधारे तलावात घळ भरण्याचे काम १९९३-२००६ या कालावधीत पूर्ण केले गेले. तथापि, कालवे यंत्रणा पूर्ण न झाल्याने सिंचन झाले नाही. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यातील विलंबामुळे भूसंपादन झाले नाही. ज्याचा संबंध कालवे आणि वितरिका यांच्या पूर्ण न होण्याशी लावला गेला. या १५ प्रकल्पांवरील परिशिष्ट २.३२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे मार्च २००८ पर्यतचा रु. ६५.५७ कोटींचा खर्च तीन ते सोळा वर्ष दरम्यान निष्फळ राहिला.

उत्तरामध्ये का.अ.यांनी नमूद केले (मार्च व मे २००९) की, शेतकरी त्यांची जमीन कालव्याच्या बांधकामाकरिता द्यावयाला नाखूष होते. त्याने संपादनाच्या प्रक्रियेला विलंब लागला.

त्याचप्रमाणे, निवडलेल्या १० जिल्ह्यात kfw ने वित्त व्यवस्था केलेल्या चौदा प्रकल्पांमध्ये, जून २००३ ते जून २००८ या कालावधीत मुख्य कामे पूर्ण केली गेली होती. बुलढाणा जिल्ह्यातील बिंबखेड साठवण तलाव हा एक प्रकल्प सोडून लक्ष्य ठेवलेली ९९६ हेक्टर्सची सिंचनक्षमता फ्रेब्रुवारी-मार्च २००९ पर्यत साध्य होऊ शकली नाही. परिशिष्ट २.३३ मधील तपशिलाप्रमाणे प्रकल्पांनी लक्ष्य सिंचनक्षमता साध्य न करण्याचा संबंध उपसा सिंचन पध्दती क्रियान्वित न होणे व ट्रान्सफॉर्म तरतूद न करणे यांचेशी लावला गेला. याप्रकारे, या पाच प्रकल्पांवरील रु. १२.३५ कोटींचा खर्च बहुतांशी निष्फळ राहिला.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

वळण योजना वेळुंजे ता. त्र्यंबक जि. नासिक योजनेस साईगंगा उपसा सिंचन योजने अंतर्गत शासन निर्णय क्रमांक ग्रामविकास व जलसंधारण विभाग संकिर्ण-१६९८/ प्र. क्र. १० /९८/जल-१, दिनांक ४.१०.९९ अन्वये रु. ५०.०० लक्ष खर्चाच्या योजनेस प्रशायकिय मान्यता प्राप्त असुन सदर योजनेद्वारे २४३.९० दलघफु पाणी गोदावरी खोऱ्यांमध्ये वळविणे प्रस्तावित आहे.

त्यानुसार वळण बंधाऱ्याचे काम अंशत:पूर्ण असुन ९.७२ दलघफु पाणी साठा करणेत आलेला आहे. वळण बंधाऱ्यांवर रु. ४७.०७ लक्ष इतका खर्च झालेला आहे. आता शासन निर्णय क्रमांक ग्राम विकास व जलसंधारण विभाग आहे. आता शासन निर्णय क्रमांक ग्राम विकास व जलसंधारण विभाग उर्सियो/१३०८/६९६/प्र. क्र. २६९/जल-१, दिनांक २५.९.२००९ अन्वये सुधारित प्रशायकिय मान्यतेनुसार वळण योजनेसाठी रु. १९९.०९ लक्ष इतक्या रकमेस प्राप्त आहे. निधी उपलब्ध झालेवर ठेव तत्वावर (Deposit Contribution work) रस्ता पूलास लागणारा निधी सार्वजनिक बांधकाम खात्याकडे वर्ग करण्यांत येईल व रस्ता पूलाचे काम पूर्ण करण्यात येईल. वळण बंधाऱ्यामध्ये ९.७२ दलघफु पाणीसाठा झाल्याने त्याचा फायदा अप्रत्यक्ष सिंचनाद्वारे आदिवासी शेतकऱ्यांना होत आहे. वेळुंज गांवातील लोकांना पिण्याचे पाण्यासाठी

सदर जलसाठ्याचा उपयोग होत आहे. त्यामुळे झालेला खर्च रु. ४७.०७ लक्ष निष्फळ ठरत नाही.

या विभागांतर्गत राजेवाडी ल. पा. योजनेचा सामायिक कालवा सा. क्र. ० ते ६० मी. चे काम सन २००९-१० या आर्थिक वर्षात पूर्ण केले असून डाव्या कालव्यातून सा. क्र. ० ते १९८५ मी. पर्यन्त सिंचनाकरिता पाणी सोडण्यात आले आहे. ल. पा. तलावात पाणीसाठा होत असून डाव्या कालव्याद्वारे पाणी सोडण्यात येत असल्याने काही प्रमाणात सिंचनक्षमता निर्माण झाली आहे. उजव्या तीरावरील कालव्यासाठी आवश्यक असलेल्या जमीनींच्या संपादनास जमीन मालकाने न्यायालयामार्फत प्रतिबंधात्मक आदेश प्राप्त केले असल्याने कामास विलंब झाला आहे. तसेच उजव्या कालव्याचे कामाबाबत कार्यवाही प्रगती पथावर आहे. उजव्या बाजूने होत असलेले प्रत्यक्ष सिंचन तसेच पाणीसाठयामुळे होणारे अप्रत्यक्ष सिंचन विचारात घेता प्रकल्पावर करण्यात आलेला खर्च निष्फळ ठरला आहे.

परिच्छेदात नमुद केलेल्या प्रकल्पांचे मुळ काम पुर्ण होवून कालव्याअभावी प्रवाही पध्दतीने सिंचनक्षमता निर्माण करणे शक्य झाले नाही, ही वस्तूस्थिती आहे. सदर विलंब हा भुसंपादनाअभावी झाला आहे. तथापि सदर प्रकल्पाची मुळ कामे पुर्ण झाली असल्याने त्यात पुर्ण क्षमतेने पाणीसाठा होत आहे. सदर पाणीसाठ्यामुळे भुगर्भातील पाण्याच्या पातळीत झालेली वाढ, जनावरे व मनुष्यांना पिण्याच्या पाण्याची झालेली उपलब्धता विचारात घेता या कामांवर झालेला खर्च व्यर्थ ठरत नाही.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील नियम २५१ नुसार भुसंपादनाशिवाय कामे सुरु करु नये, अशी तरतुद असताना सदर तरतुदीचे अनुपालन न झाल्यामुळे परिच्छेदात नमुद केलेली परिस्थिती उद्‌भवली आहे. ही बाब विचारात घेता प्रचलित तरतुदीचे अनुपालन कसोशीने करण्याबाबत व अनुपालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन कारवाई केल्यानतंर पूर्ण झाले असून यासंबंधीचे सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव विचारात घेण्यात येतील असे निर्देश देण्यात आले आहेत.

१) कोतीज ल. पा. तलाव, सांगली : सदर तलाव जलसंपदा विभागाकडून स्थानिक स्तर यंत्रणेकडून हस्तातंरित करण्यात आला असून १९९४ मध्ये तलाव वर्ग करताना वितरण व्यवस्थेची कामे अपुर्ण होती. यासाठी सुधारित मान्यतेचा प्रस्ताव विचाराधीन आहे. तथापि मुळ

तलावाचे काम पुर्ण क्षमतेने पाणीसाठा होत आहे. सदर तलावापासून १७५ हेक्टर सिंचनक्षमता निर्माण झालेली आहे.

२) बांगरवाडी व कारेगाव ल. पा. तलाव बीड : सदर योजनेवरील कालव्यास लाभार्थ्यांचा विरोध असल्यामुळे जलसंधारण महामंडळाने अनुक्रमे २००५ व २०१० मध्ये साखळी को. प. बंधाऱ्यास मान्यता दिली आहे. तलावामार्फत अप्रत्यक्ष व काही प्रमाणात प्रत्यक्ष सिंचन होत आहे.

३) उकांडा ल. पा. तलाव, बीड : या योजनेवरील कालव्यास शेतकऱ्याचा विरोंध असल्याने कालव्यांऐवजी साठवण तलावात रुपांतर करण्यासाठी सु. प्र. मा. प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. तलावात पुर्णक्षमतेने पाणी साठा होत असून अप्रत्यक्ष व काही प्रमाणात अप्रत्यक्ष सिंचन होत आहे.

४) दुडगाव ल. पा. योजना : सदर योजनेवरील कालव्यांची कामे अपुर्ण असली तरी शेतकऱ्यांकडून पाणी साठा वापरण्यासाठी मागणी नाही. त्यामुळे केवळ कालव्याअभावी सिंचन क्षमता निर्माण झाली नाही, अशी स्थिती नाही.

५) रत्नागिरी विभागातील लेखा परीक्षणात समाविष्ठ असलेल्या ९ योजनांपैकी ३ योजनांवरील कालव्यांची कामे पूर्ण झाली असून ५ योजनांवरील कामे मार्च २०१२ अखेर पूर्ण करण्यात येत आहे. १ योजनेचे काम मार्च २०१३ पर्यंत पूर्ण करण्यात येईल. कालवे व वितरिकाचे काम अपूर्ण असले तरी मुळ प्रकल्पाची कामे पूर्ण झाली असून तलावातील पूर्ण क्षमतेने पाणी साठा होत आहे. सदर पाणी साठ्यामुळे सदर तलावाच्या परिसरात अप्रत्यक्ष सिंचनाद्वारे सिंचनक्षेत्रात वाढ झाली असून या परिसरातील पिण्याच्या पाण्याच्या तसेच रब्बी पिकांचा पाण्याचा प्रश्न कमी झाला आहे. त्यामुळे सदर प्रकल्पांवर झालेला खर्च व्यर्थ ठरत नाही.

के.एफ.डब्ल्यू. ने वित्त व्यवस्था केलेल्या १४ प्रकल्पापैकी बुलढाणा जिल्ह्यातील ५ प्रकल्पांची जून २००३ ते जून २००८ या कालावधीत मुख्य कामे पूर्ण करण्यात आलेली होती. यापैकी बिबखेड साठवण तलाव सोडून ९९६ हेक्टरचे सिंचन क्षमता निर्मितीचे उद्दिष्ट मार्च २००९ पर्यंत साध्य होऊ शकले नाही. मात्र मार्च २०१० पर्यंत २४० हेक्टर (कासारी साठवण तलाव) सिंचन क्षमता निर्मित झालेली आहे. उर्वरीत ७५६ हेक्टर सिंचन क्षमता निर्मित व्हायची राहीली. त्याची कारणे पुढील प्रमाणे आहेत.

उपसा सिंचन योजनांच्या किंमती मध्ये ३७.५० टक्के के.एफ.डब्ल्यू. अनुदान कार्यप्रणाली आहे. परंतु लाभधारकांनी त्यांचा सहभाग विहीत कालावधीत निधी जमा न केल्यामुळे उपसा सिंचन योजनांची कामे विहीत कालावधीत पूर्ण होऊ शकली नाहीत. त्यामुळे प्रत्यक्षात सिंचनाचे उद्दिष्ट विहीत कालावधीत साध्य होऊ शकले नाही. दि. २९/२/२००८ च्या निर्णयामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळालेला असून १०० टक्के के.एफ.डब्ल्यू. बँक जर्मन अर्थसहाय्यातून उपसा सिंचन करीता आवश्यक असलेले पंप व राझींग मेन व त्याला अनुषंगीक बाबीची कामे निविदा कार्यवाहीद्वारे प्रगतीत असून ही सर्व कामे दि. ३०/६/२०११ पर्यंत पूर्ण करण्यात आलेली आहेत. सद्य:स्थितीत काही अशी उपलब्ध पाणी साठ्यातून प्रत्यक्ष सिंचन करण्यात आहे. संपूर्णत: ७५६ हेक्टर सिंचन क्षमता निर्मिती मार्च २०११ पर्यंत साध्य होणार आहे. त्यामुळे मार्च २००९ पर्यंत रु. १२.३५ कोटी झालेला खर्च निष्फळ ठरणार नाही.

प्रकल्पात प्रथम पाणी सन २००८ मध्ये अवरुध्द केले असून शासन निर्णयानुसार लाभार्थ्यांनी ६२.५० टक्के आर्थिक सहभाग जमा करण्याचे निर्धारित होते. परंतु लाभार्थ्यांनी ६२.५० टक्के आर्थिक सहभाग जमा न केल्यामुळे वितरण व्यवस्था पूर्ण झालेली नव्हती. त्यामुळे निर्मित सिंचन क्षमतेचा उपयोग करता आलेला नाही. दिनांक २९/२/२००८ रोजी मंत्रालय मुंबई येथे झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने वितरण व्यवस्थेचा मुख्य कालवा व त्यावरील बांधकामे तसेच उपसा सिंचनाकरीता आवश्यक असलेले पंप व रायझींग मेन व त्याला अनुषंगीक बाबी बाबतचा १०० टक्के खर्च **KFW** बँक जर्मन यांचे मार्फत करावयाचा आहे. त्याव्यतिरिक्त वितरण व्यवस्थेची शिल्लक राहीलेली कामे व त्यावर होणारा खर्च ६२.५० टक्के शेतकऱ्यांनी व ३७.५० टक्के **KFW** बँक जर्मन अशा प्रमाणात करावा लागणार आहे. दिनांक २९/२/२००८ च्या निर्णयामुळें शेतकऱ्यांना दिलासा मिळालेला दिसून १०० टक्के **KFW** बँक अनुदानातून उपसा सिंचनाकरीता आवश्यक पंप व रायझींग मेन व त्याला अनुषंगीक बाबींची कामे निविदा कार्यवाहीद्वारे प्रगतीत असून ही सर्व कामे दिनांक ३१/३/२०११ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहेत सद्य:स्थितीत उपलब्ध पाणी साठयातून काही अंशी प्रत्यक्ष सिंचन करण्यात येत आहे. त्यामुळे झालेला खर्च निष्फळ ठरलेला नाही.

पाणी अवरुध्द केल्यामुळे कोणताही पूल जलमग्न होणार नसून नदी पात्राच्या बुडीत क्षेत्रातून जाणाऱ्या रस्त्यावर पाणीसाठा होणार होता. सर्वेक्षणाच्या वेळी सदर रस्त्यासाठी बुडीत क्षेत्राच्या पेरीफेरीने नदी ओलांडता येईल असे अपेक्षित होते. परंतु संबंधित कास्तकारांच्या

मागणीनुसार शेतीला जाण्यासाठी पुलाचे अंदाजपत्रक तयार करुन जिल्हा नियोजन समितीकडे मंजूरीस्तव पाठविण्यात आलेले आहे. आजतागायत १६ उपसा सिंचन योजनापैकी १० उपसा सिंचन योजनांचे काम झाले आहे. व उर्वरित ६ योजनांचे शेतकरी हे त्यांचा सहभाग भरण्यास तयार नसल्यामुळे या योजनांचे काम झाले नाही. डिसेंबर २००७ मध्ये शेतकरी स्वत:च्या उपलब्ध साधनाद्वारे पाणी उपसा करण्यास तयार असल्यामुळे पाण्याचे अवरुध्दन केले गेले. त्यावरून १० ते ७५ हेक्टर सिंचन झाले व संबंधित शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ झाला. म्हणून झालेला खर्च निष्फळ ठरलेला नाही.

या तलावासाठी उपलब्ध असलेले जलग्रहण क्षेत्र प्रकल्पाची जलनिष्पती काढण्यासाठी घेण्यात आले असून जून २००६ नंतर पुरेसा पाऊस न पडल्यामुळे पाणी साठवण झाले नाही. इ.स. २०१० मध्ये दि. २९/८/२०१० रोजी हा प्रकल्प पूर्ण संचय पातळीपर्यंत (१०३-६०मी.) भरला आणि सांडव्यावरुन ०.६० मी. सिंचन योजनांचे काम पूर्ण करण्यात आलेले असून शेतकऱ्यांनी त्यांचा सहभाग करावयाच्या एका (योजना क्र. ४ आर ३ चे काम) योजनेचे ८० टक्के पूर्ण झालेले आहे. एच.टी.लाईन व ट्रॉन्सफॉर्मर काम पूर्ण झालेले आहे. शेतकऱ्यांनी एल.टी.लाईन चे काम पूर्ण केल्यानुसार सर्व उपसा सिंचन योजनाची काम पूर्ण होऊन अपेक्षित सिंचन क्षमता मे २०११ अखेर निर्माण होणार आहे. म्हणून झालेला खर्च निष्फळ ठरलेला नाही.

प्रकल्पांचे सदोष कार्यान्वयन :-

सदोष कार्यान्वयामुळे पुढील प्रकल्प, खाली दर्शविल्याप्रमाणे, सिंचनाचा लाभ देण्यासाठी वापरता येऊ शकले नाहीत.

(i) उमराणी -II साठवण तलाव :-

या प्रकल्पाचे मुख्य काम रु. १.४४ कोटी खर्चाने पूर्ण केले गेले (मार्च २००४) कार्यान्वयनाचे वेळी खंदरोधीचर (**COT**) लघुपाटबंधारे नियम पुस्तिकेतील परिच्छेद ३.८ च्या तरतुदीप्रमाणे कठोर खडकात Keying न करता मऊ खडकाच्या खाली ०.६ मी. ठेवला गेला. त्यावर्षीच शिर्ष विमोचक आणि मातीच्या धरणाच्या विविध जागांपासूनही गळत्या दिसून आल्या.

वर्ष २००५ मध्ये रु. १२.५९ लाख खर्च करुन केलेल्या दुरुस्तीच्या कामाने समस्येची उकल होऊ शकली नाही. या समस्येमुळे धरण पूर्ण झाल्यापासून सिंचन होऊ शकले नाही.

कार्यवाही अभियंता, **MILS** सांगली यांनी नमूद केले (मे २००९) की, पाण्याचा साठा Sill पातळी पर्यंत किंवा Sill पातळीवर वर होता आणि मान्य केले की, पाणी अवरुध्द करणे साध्य होत नव्हते. रु. १.०५ कोटी अंदाजित किंमत असलेला दुसरा बंधारा तसेच COT धरणाच्या वरच्या बाजूला बांधून दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव मुख्य अभियंता यांना सादर करण्याकरिता तयार केला गेला (मे २००९) याप्रकारे रु. १.५७ कोटीचा खर्च सहा वर्षाहून अधिक कालावधीसाठी निष्फळ राहीला.

(ii) उडानवाडी कोल्हापूरी बंधारा :

२४९ हेक्टर सिंचनक्षमता असलेला हा प्रकल्प सोलापूर जिल्ह्यात रु. १.२५ कोटी खर्चाने बांधला गेला (डिसेंबर २००५) जानेवारी २००६ मध्ये बंधाऱ्यातून गळत्या दिसून आल्या. गळत्या थांबविण्यासाठी दुरुस्ती काम प्रलंबित होते. (मे २००९) याप्रकारे, बंधारा बांधल्यापासून फक्त ३४ हेक्टर्स सिंचन साध्य केले गेले.

(iii) मालेगांव कोल्हापूरी बंधारा :

२४९ हेक्टर अपेक्षित सिंचनक्षमतेचा नाशिक जिल्ह्यातील हा बंधारा रु. १.४४ कोटी खर्चाने २००३ या वर्षात पूर्ण केला गेला. सदोष **Needies** आणि बंधाऱ्याचे निकृष्ट बांधकाम यामुळे बंधाऱ्यात पाणी साठू शकले नाही. साठवणाच्या पहिल्याच वर्षी पाण्याच्या दाबामुळे कमी वजनाच्या **Needles** वाकल्या. बंधाऱ्याच्या बांधणीत गळत्याही दिसून आल्यात. अधीक्षक अभिर्येता, **MILS,** नाशिक यांनी विधानसभेच्या एका प्रश्नाला उत्तर देतांना पुष्टी केली की, दिलेल्या **Needles** हया कमी वजनाच्या होत्या आणि त्यांची पाण्याच्या दाबामुळे हानी झाली, २००४ वर्षापासून या बाबीचे अन्वेषण सुरु होते आणि हा कोल्हापूरी बंधारा मे २००९ पर्यंत नादुरुस्त राहिला. याप्रकारे, निकृष्ट कामामुळे रु. १.४४ कोटीचा खर्च निष्फळ झाला.

(iv) अलजापूर लघु पाटबंधारे तलाव :

सोलापूर जिल्ह्यातील १७० हेक्टर सिंचनक्षमता असलेला हा लघु पाटबंधारे तलाव रु. २.०४ कोटी खर्चाने पूर्ण करण्यात आला (मार्च २००५) परंतु गळतीमुळे २००४-०५ व २००५-०६ या वर्षात अनुक्रमे फक्त ३० हेक्टर्स आणि ४१ हेक्टर्स सिंचनक्षमता वापरली गेली. अधीक्षक अभिर्येता, **MILS,** पुणे यांनी स्थळाला भेट दिली (एप्रिल २००६) आणि टिप्पणी केली की, धरणाच्या **gorge** भागातील गळती थांबविण्यासाठी **grouting** काम केले पाहिजे. **grouting** कामाचा समावेश करुन सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव ग्रामविकास व जलसंधारण

विभागाकडे मान्यतेकरिता सादर केला होता (जून २००७) जो प्रतिक्षित होता. (मे २००९) तलावातील वर्षनिहाय साठवणी संबंधी अभिलेख विभागाकडून दिले जाऊ शकले नाहीत. याप्रकारे हा प्रकल्प उद्देशित लाभ साध्य करुन शकला नाही.

शासनाच्या अनुदेशांना धरुन न राहिल्याने जादा खर्च

महाराष्ट्र शासनाने कार्यकारी अभियंत्यांना प्रकल्पांची अंदाजपत्रके तयार करतांना विशेष काळजी घेण्याचे आदेश दिले (सप्टेंबर २०००, सप्टेंबर, २००१ व नोव्हेंबर २००३) ज्यानुसार अंदाजपत्रकाच्या आधाराकरिता थराचे अचूक वर्गीकरण दगड खाणीपासून साहित्याची वाहतूक करण्याकरिता नेमके अंतर घेतले पाहिजे. साहित्याच्या उपलब्धतेची व पर्याप्ततेची निश्चिती केली पाहिजे आणि जिथे आवश्यकता आहे तिथे **CDO,** नाशिक कडून संकल्पचित्राला मान्यता घेतली पाहिजे. जेणेकरुन कार्यान्वयनाचे वेळी अदांजपत्रकाचे पुनरीक्षण टाळता येईल. महाराष्ट्र शासनाने सर्व पाटबंधारे प्रकल्पांची मुख्य कामे ही **Uncoursed Rubble Masonary (UCR)** मध्ये न घेता **Cement Concrete** मध्ये करण्याचेही निर्देश दिले (जुलै २००२)

निवडलेल्या जिल्ह्यांतील ५४ कोल्हापूरी बंधाऱ्यापैकी १० कोल्हापूर बंधाऱ्यामध्ये (तीन जिल्ह्यात) असे दिसून आले की, बरोबर अदांजपत्रके तयार करण्याकरिता शासनाने दिलेल्या परिशिष्ट २.३४ मध्ये दाखविल्याप्रमाणे, अतिरिक्त काम चालू दराने करण्याकरिता व कंत्राटाच्या खंड ३८ च्या अधिन प्रदान करण्यासाठी टाळता येण्याजोगा रु. ८५.८९ लाखाचा जादा खर्च होण्यात झाला. शिवाय, विहिरीपासून सिंचन वाढविण्याकरिता, भूमिगत पाणी पुरवठा आवर्धित करण्यासाठी पाझर तलाव बांधले जातात. महाराष्ट्र शासनाने, अशा प्रकल्पांचे व्यवस्थापन आणि परिरक्षा करण्यासाठी जी पाणी उपयोगकर्त्यांची संस्था आवश्यक आहे ती स्थापन करण्यास लाभार्थींची संख्या पुरेशी नसल्याने २० हेक्टर्स पेक्षा कमी सिंचन क्षमता असणारे पाझर तलाव घेण्यास प्रतिरोध केला (नोव्हेंबर २००३), सोलापूर जिल्ह्यातील अभिलेखांच्या छाननीत असे उघडकीस आले (मे २००९) की, विभागांनी (**MILS** व जिप) रु. १.१० कोटी खर्च करुन ६ हेक्टर्स ते १८ हेक्टर्स सिंचनक्षमता असलेले ३९ पाझर तलाव प्रमाणकांचे उल्लंघन करुन बांधले.

कार्यकारी अभियंत्याने उत्तर दिले (मे २००९) की, पाझर तलावाचे बांधकाम रोजगार हमी योजनेखाली रोजगार निर्मितीसाठी घेतले गेले. कार्यकारी अभियंत्याचे उत्तर मान्य करण्यासारखे नव्हते कारण काम शासनाच्या प्रमाणकांप्रमाणे कार्यान्वित व्हावयास पाहिजे.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला

सा.त. उमराणी क्रं. २ ता. जत, जि.सांगली या तलावाच्या मुळ अंदाजपत्रकास जर्मन अर्थ सहाय्याअंतर्गत रक्कम रुपये १०१.४८ लक्ष या किंमतीस प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. योजने पासून १३० हेक्टर सिंचनक्षमता प्रस्तावित आहे.

सदरचे काम मे. कृष्णा डेव्हलपर्स, सांगली यांचे मार्फत ब.१ निविदावर (निविदा रक्कम रुपये ८५.६९ लक्ष) जानेवारी २००३ मध्ये सुरु करण्यात आले व सप्टेंबर २००४ मध्ये पूर्ण करण्यात आले.

काम पूर्ण झाल्यानंतर सन २००४-०५ मध्ये तलावाच्या खालील बाजूस विमोचकाच्या गेट मधून व भरावातून गळती आढळून आली याबाबत वरिष्ठ शासकीय अधिकारी, टिम लिडर जर्मन पथक, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक, वॉलचंद इंजिनिअरींग कॉलेज, भूगर्भ शास्त्रज्ञ यांच्या सुचनेप्रमाणे गळतीचे काम हाती घेण्यात आले. यामध्ये विमोचकाच्या दबलेल्या पाईप बदलणे, जलरोधक खंदक खोल करणे, सिमेंट ग्राऊटींग करणे इत्यादी दुरुस्तीची कामे केली गेली. तरी सुद्दा पुढील पावसाळ्यामध्ये गळती आढळून आली. या नंतर सन २००९ मध्ये धरण पूर्ण संचय पातळीपर्यंत भरले असतानाही, गळती आढळून आली. यानंतर टिम लिडर जर्मन पथक यांनी सुचविल्याप्रमाणे **Geological Investigation** करणेच्या सुचना केल्या. यामध्ये जलरोधक खंदकामध्ये कठीण खडकात कोअर घेवून त्याचे **Investigation** करणे, **Water Intake Test** घेणे, गाथा भरावा मधील **U.D.Samples** घेणे इत्यादी कामाचा समावेश होता. सदरचे **Investigation Drilling** ची कामे पूर्ण झाली असून उपलब्ध **U.D.Samples व Core Samples** वरुण **Geologist** चा अहवाल प्राप्त झाला आहे. सदरच्या अहवालांवर वरिष्ठ अधिकारी व शासनस्तरावर पुढील करावयाच्या उपयायोजनेनंतर या कामाची दिशा ठरविली जाईल व त्याप्रमाणे कामाचे नियोजन करता येईल.

को.प. बंधारा उदनवाडी तालुका सांगोला जिल्हा सोलापूर : सन २००९-२०१० मध्ये या बंधाऱ्याची गळती पूर्णपणे थांबलेली आहे. सदर बंधाऱ्यात ३९.३२ द.ल.घ. फु. पाणी उपलब्ध आहे. त्यापैकी प्रत्यक्षात ६०८.०३ सघमी (२१.४७ दलघफु) साठा ऑक्टोबर-२०१० मध्ये झालेला आहे. पाणी साठ्याद्वारे एकूण ५९ हेक्टर सिंचन निर्माण झालेले आहे.

को.प. बंधारा मालेगांव : ही योजना सन २००४-२००५ या वर्षात पूर्ण झालेली असून सदर योजनेचे सिंचन क्षेत्र २४९.०० हेक्टर आहे. सदर योजना पूर्ण झाल्यानंतर चेअरमन बाणाई पाणी वापर सह.संस्था मर्या. चंदनपूरी ता.मालेगांव,जि.नाशिक यांना सन २००४ मध्ये देखभाल, दुरुस्ती व सिंचन कामी पाच वर्ष कालावधीसाठी हस्तांतरीत करण्यात आली होती.

को.प. बंधारा मालेगांव या योजनेवरील निडल्स कमी वजनाच्या असल्याने व पाण्याच्या दाबामुळे काही निडल्स टिकाव धरु शकत नसलेमुळे प्रथमवर्षी पाणसाठा पूर्ण क्षमतेने होऊ शकला नव्हता, ही बाब निदर्शनास आले नंतर तपासणी करुन संबंधित ठेकेदाराकडून निविदा अटी व शर्तीनुसार **Needles** बदलून घेण्यात आल्या व तदनंतर दरवर्षी पूर्ण क्षमतेने पाणीसाठा करण्यात येत **असून अपेक्षित सिंचनक्षमता निर्माण झाली आहे. तथापि पाणी वापर संस्थेने देय असलेली आकारणीचा भरणा न केला नाही. याबाबत** वारंवार सूचना व ताकिद देऊनही संबंधित पाणी वापर संस्थेने, शासनाकडे थकबाकी न भरल्याने व पुढील पाच वर्षासाठी करारनामा करुन देण्यास इच्छुक नसल्याने सदर संस्थेचा करारनामा रद्द करण्यात आलेला आहे.

तदनंतर स्थानिक लोकप्रतिनिधी व महानगरपालिका मालेगाव यांनी केलेल्या मागणीनुसार व शासनाचे निर्देशानुसार सदरची योजना दि. ५/१०/२०१० रोजी संबंधित लाभक्षेत्रातील लाभधारकांचा सिंचनाचा हक्क अबाधित ठेऊन आयुक्त महानगरपालिका मालेगाव यांचेकडे करारनामा अन्वये देखभाल, दुरुस्ती व सिंचनकामी पाच वर्षेकरीता हस्तांतरीत करणेत आलेली आहे. सदर योजनेची सिंचन पाणीपट्टी व बिगर सिंचनासाठी वापरण्यात येणाऱ्या पाण्याची शासकीय नियमानुसार वेळोवेळी होणारी पाणीपट्टी, महानगरपालिकेने शासनाकडे भरण्यास करारनाम्यानुसार सहमती दिलेली आहे.

वरीलप्रमाणे लाभक्षेत्रातील क्षेत्रास पूर्ण क्षमतेने फायदा होत असल्याने सदर योजना यशस्वी झालेली आहे या योजनेमुळे शासनाचा कोणताही खर्च वाया गेलेला नाही.

सिंचन हे प्रत्यक्ष साठलेला पाणी साठा व लाभार्थी शेतकऱ्यांचा मागणीवर अवलंबून आहे. ग्राऊटिंगची तरतुद सुधारित अंदाजपत्रकामध्ये केलेली आहे. प्रत्यक्षात काम करतेवेळी पाण्याचा झिरपा नसलेने ग्राऊटींग करणेत आलेले नाही. कमी सिंचन हे पाणी पाझरामुळे नसून लाभार्थी शेतकऱ्यांचा कमी मागणीमुळे आहे. तसेच स्थानिक स्तरीय योजना या ५० टक्के विश्वासर्हतेला संकल्पीत केलेल्या असल्यामुळे प्रत्येक वर्षी पाझर तलाव भरणे अपेक्षित नाही.

म्हणजेच १०० वर्षातून ५० वेळा भरणे अपेक्षित आहे. त्यामुळे पाणी साठा कमी झाल्यामुळे कमी सिंचनक्षमता निर्माण झाली असे सर्रासपणे म्हणणे योग्य वाटत नाही.

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

योजनेचा प्रकल्प अहवाल तयार करताना क्षेत्रीय ठिकाणचे प्रत्यक्ष चाचणी खड्डे घेऊन त्यानुसार वर्गीकरण करणे तसेच बांधकाम साहीत्याची उपलब्धता तपासून त्यानुसार वहन अंतरे निश्चीत करणे याबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्यांना वेळोवेळी सुचना देण्यात आलेल्या आहेत. परंतु प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरु करणे यामध्ये कालावधी व्यतीत होत असल्यामुळे प्रशासकीय मान्यतेच्या वेळी प्रस्तावित केलेल्या खाणीतील उदा वाळू, दगड, खडी हे साहीत्य इतरत्र वापरले गेले असल्यामुळे सदर वहनात बांधकाम साहीत्य उपलब्ध न झाल्यामुळे प्रकल्पाच्या वहन अंतरात बदल होऊन पर्यायाने खर्चात वाढ होते.

प्रकल्प अहवाल तयार करताना प्रत्यक्ष क्षेत्रिय ठिकाणचे माती व मुरुमाचे नमुने संकल्पीत करुन सदर नमुन्याच्या गुणधर्माची चाचणी क्षेत्रिय तसेच मेरी नाशिक येथून करुन द्यावी लागते सदर चाचणी निष्कर्ष प्राप्त झाल्यानंतर माती धरणाच्या काटछेदाचे संकल्पन सी.डी.ओ. नाशिक यांच्याकडून केले जाते व यास मोठ्या प्रमाणात कालावधी लागतो. परंतु स्थानिक स्तरीय योजना या लहान स्वरुपाच्या असून सदर योजनांबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींची तीव्र मागणी असल्यामुळे योजनेचा प्रकल्प अहवाल तयार करताना सदर प्रकल्पाच्या जवळपासचा मध्यवर्ती संकल्प चित्र नाशिक यांनी संकल्पीत केलेला काटछेद वापरण्यात येतो व प्रत्यक्ष काम करताना १५ मी. पेक्षा जास्त उंची असल्यास मध्यवर्ती संकल्प चित्र नाशिक यांच्याकडून काटछेदाचे संकल्पन आवश्यकतेनुसार करण्यात येते. यामुळे संकल्पनात अंशतः बदल होऊन परिमाणात वाढ होऊन खर्चात अंशतः वाढ होते.

जिल्हा परिषद, सोलापूर यांनी हाती घेतलेले पाझर तलाव रो.ह.यो. अंतर्गत मजुरांना काम उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने हाती घेण्यात आले आहेत.

संपत्तीची परिरक्षा व दुरुस्ती

महाराष्ट्र शासनाने निर्मिलेल्या संपत्तीची परिरक्षा आणि दुरुस्ती यांच्याकरिता निधीची तरतूद करु न शकल्याने लघु पाटबंधारे प्रकल्प खाली चर्चिल्याप्रमाणे विनावापर राहिले.

दुरुस्तीच्या अभावी प्रकल्प विनावापर राहिले

वर्ष २००६ मध्ये पूर आले असतांना औरंगाबाद जिल्ह्यातील MILS विभागाचे १८८ पाझर तलाव व जि.प विभागाच्या १८२ प्रकल्पांची हानी झाली. त्यांच्या दुरुस्तीकरिता रु.११.९८ कोटीची रक्कम मागितली गेली (जानेवारी २००७) तथापि निधीची तरतूद केली गेली नाही. (मार्च २००९). परिणामी, हे प्रकल्प अपेक्षित सिंचन लाभ देऊ शकले नाहीत.

२३० हेक्टर्स सिंचन क्षमता असलेल्या बामणी अपवाहन बंधाऱ्याची मुख्य कामे रु.१४.८६ लाख खर्चुन पूर्ण केली गेली (जून २००६) वर्ष २००८ च्या पावसाळयातील पुराने बंधाऱ्याची हानी झाली. या हानीची दुरुस्ती जून २००९ पर्यंत झाली नव्हती. याप्रमाणे पाणी अवरुध्द करणे शक्य झाले नाही. याप्रकारे हानीची दुरुस्ती न केल्यामुळे रु.१४.८६ लाखाचा खर्च तीन वर्षाहून जास्त कालावधीसाठी निष्फळ राहिला.

कोल्हापूरी बंधाऱ्यांचे न चालणे

उस्मानाबाद जिल्हयातील जि. प. विभागाकडे असलेल्या ९८८ कोल्हापूर बंधाऱ्यांपैकी फक्त १०० बंधाऱ्यांच्या बाबतीत Needles घट्ट बसविल्या व काढल्या जात होत्या. उर्वरित कोल्हापूरी बंधारे कार्यरत नव्हते. मुख्य अभियंत्यांनी नमूद केले की, निधीची तरतूद न केली जाणे हे सुध्दा या कोल्हापूरी बंधाऱ्यातून लक्ष्य ठेवलेली सिंचनक्षमता साध्य न होण्याचे एक कारण होते. त्यांनी पुढे नमूद केले की, Needles घट्ट बसविण्याकरिता / काढण्याकरिता शेतकरी उत्सुक नव्हते. याप्रकारे, कोल्हापूरी बंधाऱ्यापासून होणारा लाभ बऱ्याच अंशी विनावापर राहील.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात खालीलप्रमाणे खुलासा केला

औरंगाबाद जिल्ह्यातील सन २००६ मध्ये आलेल्या पूरात झालेल्या नुकसानीत जिल्हा परिषदेकडील हानी १८१ बंधाऱ्यापैकी ७७ बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्यात आली असून ४२ बंधाऱ्यांची दुरुस्ती **RRR** अंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित ६२ योजनांची दुरुस्ती निधी उपलब्धतेनुसार करण्यात येईल.

स्थानिक स्तर यंत्रणेकडील १८८ पाझर तलाव/गाव तलावांची सन २००६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीत हानी झाली असली तरी साठवण क्षमतेवर काहीही परिणाम झालेला नाही. तथापि संबंधित योजनांची आवश्यकतेनुसार दुरुस्ती करण्यात येत आहे.

औरंगाबाद विभागात विभागीय आयुक्त यांच्या नेतृत्वाखाली सन २०११ या वर्षात लोक सहभागातून पाटबंधारे योजनांना गेट बसविण्याचा कार्यक्रम राबविण्यात आला आहे. याद्वारे औरंगाबाद महसूल विभागातील प्रकल्पांवर १८१४ एवढे दरवाजे बसविण्यात आले आहे. तसेच सदर कार्यक्रमास मिळालेले यश विचारात घेवून दिनांक १२/१०/२०११ च्या शासन निर्णयान्वये १७ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर, २०११ या कालावधीत महात्मा फुले जल व भूमी संधारण अभियानांतर्गत को. प. बंधाऱ्यांना गेट बसविण्याची धडक मोहिम हाती घेण्यात आली होती.

साक्ष :

उपरोक्त परिच्छेदांच्या संदर्भात समितीने दिनांक ४ जून, २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्षी घेतली. साक्षीच्या वेळी लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, औरंगाबाद अंतर्गत सन २००८-२००९, ते सन २०१२-२०१३ या कालावधीतील नवीन व अपूर्ण प्रकल्पांविषयी माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, औरंगाबादमध्ये सन २००८-०९ मध्ये ८ कामे अपूर्ण होती. १८३ नवीन प्रकल्प हाती घेण्यात आली होते. सदर प्रकल्प पूर्ण होण्यास ४ वर्षे लागली. या कालावधीमध्ये १९१ प्रकल्प पूर्ण झाले. तथापि, नवीन व अपूर्ण प्रकल्पांपैकी निश्चित कोणते प्रकल्प पूर्ण केले आहेत याविषयी विभागीय प्रतिनिधींनी योग्य माहिती न दिल्याने यासंदर्भात समितीने तीव्र नापसंती व्यक्त केली.

रत्नागिरी ३, सोलापूर ५, उस्मानाबाद १ व सांगली १ येथील प्रकल्पांवरील प्रति हजार घन मीटरच्या मंजूर मुल्यांपेक्षा जास्तीचा केलेला खर्च ४१ टक्के आणि १३८ टक्के या दरम्यान होता. ज्यामुळे प्रकल्पांची वित्तीय स्वयंपूर्णता बाधित झाली. आपर्याप्त सर्वेक्षण आणि अन्वेषण यामुळे हे प्रकल्प चुकीने वित्तीय स्वयंपूर्ण दाखविले गेले. महाराष्ट्र लघु पाटबंधारे नियम पुस्तिकेप्रमाणे आवश्यक सर्वेक्षण आणि अन्वेषण प्रकल्प सुरु होण्यापूर्वी का केले गेले नाही अशी समितीने विचारणा केली असता महालेखाकार नागपूर यांनी १० टेस्ट चेक प्रोजेक्टकरिता शासनाने प्रती टीसीएम कॉस्ट निश्चित केलेली होती. त्यापेक्षा जास्त खर्च झालेला असल्याचे समितीच्या निदर्शनास आणले.

रत्नागिरी जिल्ह्यातील ३ प्रकल्पांविषयी माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, दापोली तालुक्यात ताडीले लघु पाटबंधारे योजना आहे. या योजनेला ६१९.२३ लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळालेली होती. सुधारित प्रशासकीय मान्यता १८६९ लाख रुपयांची आहे. यामध्ये एकूण २०१ टक्के वाढ झालेली आहे. यामध्ये भूसंपादनामध्ये १६.८९ टक्के वाढ आहे. दरसूची वाढीमुळे ९५ टक्के वाढ आहे. संकल्पचित्र बदलामुळे ८५ टक्के वाढ झालेली आहे. वहन अंतरामुळे ४ टक्के वाढ झालेली आहे. सद्यःस्थितीत हे काम प्रगतिपथावर आहे. प्रत्यक्षात हे काम माहे जानेवारी, २००६ मध्ये सुरु झाले आहे. त्या ठिकाणी राखीव वन असल्यामुळे मंजुरी मिळत नसल्याने कार्यवाहीस विलंब झालेला आहे.

भूसंपादनामुळे १६ टक्के वाढ झाली. डिझाईन बदलामुळे ८५ टक्के वाढ झाली. दरसूचीमुळे ९५ टक्के वाढ झाली तसेच किरकोळ कारणामुळे ४ टक्के वाढ झाली. प्रकल्पाचे डिझाईन कोण तयार करतात ? डिझाईन बदलण्याचे कारण काय ? आणि प्रकल्पाचे काम सुरु करण्याच्या आधी सर्व तपासणी करीत नाही का अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी "सॉईल" कंडीशनप्रमाणे सेक्शन बदलले आहे. प्रकल्पाचे डिझाईन सीडीओ कडून करुन घेतले जाते. आजूबाजूचे सेक्शन घेऊन डिझाईन केले जाते. सॉईलच्या सिच्युएशनप्रमाणे डिझाईन बदलले आहे. जे लघु पाटबंधारे प्रकल्प आहेत त्यांचे अंदाजपत्रक तयार करताना एमआय मॅन्युअल प्रमाणे अंदाजपत्रक तयार करतो किंवा शेजारी जी कामे झाली असतील त्या कामाचे सेक्शन गृहीत धरुन त्याप्रमाणे अंदाजपत्रक तयार करुन प्रशासकीय मान्यता आणि निविदेची कार्यवाही हाती घेण्यात येते. प्रत्यक्ष जेव्हा काम हाती घेण्यात येते त्यावेळी १५ मीटरच्या आतील काम असेल तर तेथील सेक्शन घेऊन ते गृहीत धरले जाते आणि १५ मीटरच्या वरचे सेक्शन सीडीओकडून घ्यावे लागते. आपले जे लघु पाटबंधारे प्रकल्प आहेत त्यांचे डिझाईन सीडीओकडून करुन घ्यावे लागते. तेथील जी उपलब्ध माती आहे त्यातून प्रकल्प पूर्ण करण्यात येतो. त्या मातीची चाचणी, त्याचे पॅरामीटर्स मेरीकडून करण्यात येतात. त्यानंतर सीडीओकडून त्या प्रकल्पाचे डिझाईन केले जाते. त्याप्रमाणे जे सेक्शन येईल ते कार्यवाहीसाठी गृहीत धरले जाते" अशी माहिती दिली.

समितीने प्रकल्पाचे काम सुरु करताना मातीचे परीक्षण करुनच त्याचे अंदाजपत्रक तयार करावयास पाहिजे होते समितीला सांगितलेली उक्त कार्यवाही आधी का केली गेली नाही ? अशी विचारणा केली असता, माती परीक्षण करणे आणि संकल्पचित्र तयार करणे

यामध्ये दीड ते दोन वर्षाचा कालावधी जातो. त्यांच्याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे काम असल्यामुळे हा २ वर्षाचा कालावधी लागत असल्याची विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली.

६ कोटी रुपयांचा प्रकल्प १८ कोटी रुपयांवर जातो म्हणजे १२ कोटी रुपये जास्त खर्च होत आहेत. प्रकल्पाचा एवढा जो खर्च वाढलेला आहे तो परवडणारा नाही. प्रत्यक्ष काम करण्यापूर्वी ही सर्व तपासणी करुनच अंदाजपत्रक तयार केले आणि नंतर त्यामध्ये पाच दहा टक्के वाढ झाली तर ते समजण्यासारखे आहे. यामध्ये ३०० पट वाढ झालेली आहे याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी माहिती देताना समितीला विदित केले की, सुरुवातीला सर्व्हे करुन अंदाजपत्रक तयार करतो त्यावेळी मॅन्युअलप्रमाणे किंवा सीडीओचा मंजूर क्रॉस-सेक्शन असेल तो घेऊन अंदाजपत्रक तयार करुन डिझाईनची प्रक्रिया करण्यात येते. आपल्या धरणाचे जे क्रॉस-सेक्शन आहे त्याचे संकल्पचित्र तयार करण्याचे काम सीडीओ, नाशिक यांच्याकडे असते. संपूर्ण राज्याचे क्रॉस-सेक्शन त्यांच्याकडून डिझाईन केले जाते. कोणकोणते प्रकल्प डिझाईन करावयाचे आहेत याबाबत त्यांच्याकडे वर्षाचा कार्यक्रम असतो. आपला प्रकल्प मंजूर करुन घेण्यासाठी शासनाने अशी अट घातलेली आहे की, २० टक्के जे सॉईल सॅम्पल्स आहेत ते मेरी, नाशिक यांच्याकडून तपासून घ्यावेत आणि ८० टक्के सॅम्पल्स क्वालिटी कंट्रोल डिव्हीजनकडून तपासून घ्यावेत. यामध्ये पहिली अडचण अशी येते की, मेरीकडे महाराष्ट्रातील सर्व भागातील २० टक्के सॅम्पल्स तपासणीसाठी जातात. त्यामुळे हे सॅम्पल्स टेस्ट करण्यासाठी सहा महिने ते एक वर्षाचा कालावधी जातो. त्यांच्याकडे कामाची व्याप्ती मोठी आहे. दुसरी बाब अशी की, डिझाईनसाठी एक वर्षाचा कालावधी जातो. तोपर्यंत थांबावयाचे म्हटले तर प्रकल्पाची किंमत वाढते आणि त्यामध्ये बऱ्याच गोष्टी अंतर्भूत होतात. म्हणून प्रचलित पध्दती प्रमाणे अंदाजपत्रक तयार करताना जे मंजूर मॅन्युअल क्रॉस-सेक्सन आहे ते घेतो किंवा शेजारी केलेल्या कामाचे सीडीओने मंजूर केलेले क्रॉस सेक्शन असेल ते घेऊन अंदाजपत्रक तयार करतो. डिझाईनमध्ये काही ठिकाणी १० ते ५० टक्के फरक पडतो. क्रॉस-सेक्शन हे वाढीचे एक कारण आहे पण वाढीची बरीच कारणे आहेत. त्यामध्ये भूसंपादन सुध्दा आहे.

समितीने दरसूचीमध्ये ८५ टक्के वाढ झालेली असल्याची बाब निदर्शनास आणली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, प्रत्येक वर्षी दरसूचीतील दरामध्ये वाढ होत असते. दरसूचीमध्ये साधारणत: १० टक्केपर्यंत वाढ होते. मापदंड चार-पाच वर्षात वाढतात.

ज्यावेळी अंदाजपत्रक तयार केले जाते तेव्हा ते करंट रेटने करावे लागते आणि मापदंड जुनेच वापरावे लागतात. त्यावेळी सन २००८-२००९ चे दर असतील तर अंदाजपत्रक करताना आताचे म्हणजे सन २०१३-१०१४ च्या दराप्रमाणे करावे लागते. त्यामुळे प्रकल्पाची किंमत वाढते. आपण अंदाजपत्रक केल्यानंतर कंत्राटदाराला भाववाढ द्यावी लागते. जरी टेंडर त्या दराने दिले असले तरी ज्यावेळी प्रत्यक्ष काम केले त्यावेळी सिमेंट आणि स्टीलचे दर वाढलेले असतात त्यामुळे त्यांना करंट डीएसआरप्रमाणे दरवाढ द्यावी लागते. रॉयल्टीचा दर सन २००६ पूर्वी १७.६७ रुपये प्रती घनमीटर होता. दिनांक १५.१२.२००६ ला रॉयल्टीचा दर ३५.३४ रुपये प्रती घनमीटर झाला. दिनांक ११.२.२०१० ला ७०.६७ रुपये दर झाला. सर्व्हे करुन अंदाजपत्रक तयार केल्यानंतर निविदा काढणे आणि काम सुरु करणे यामध्ये एक दोन वर्षाचा कालावधी जातो. अंदाजपत्रक करताना वाळू किंवा खडीच्या बाबतीत जे अंतर गृहीत धरलेले असते त्यामध्ये फरक पडतो.

समितीने मापदंड कोण निश्चित करते यासंदर्भात विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी मापदंड तयार करण्याची प्रक्रिया जलसंधारण विभाग करीत नाही. पॅरेंट डिपार्टमेंटकडून ते केले जाते. जलसंपदा विभागाच्या डोळ्यासमोर मोठे आणि मध्यम प्रकल्प असतात. पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभागाकडे छोटे प्रकल्प असल्याची माहिती दिली

जरी महाराष्ट्र शासनाचे मापदंड असले तरी महाराष्ट्र शासनाने स्पेसिफिक लघु पाटबंधाऱ्यांसाठी जे मापदंड निर्धारित केले आहेत त्याच्याशीच ऑडीटने तुलना केलेली आहे. ऑडीटने जलसंपदा विभागाच्या मापदंडाशी तुलना केलेली नाही ही बाब महालेखाकार, नागपूर यांनी समितीच्या निदर्शनास आणली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, वॉटर कॉन्झर्व्हेशनसाठी वेगळे मापदंड आहेत. जलसंपदा विभागाने निश्चित केलेल्या किंमतीचे मापदंड वापरले जातात. माहे एप्रिल, २०११ मध्ये ते आणखी वाढले. मापदंड निर्धारित करण्यासाठी जलसंपदा विभागाची समिती आहे. आधीचे मापदंड सन २००७-२००८ चे होते. नंतर सन २०११ मध्ये नवीन मापदंड आले. प्रत्येक वेळी चार-पाच वर्षाचा गॅप पडत राहतो. आता अस्तित्वात असलेले मापदंड सन २०११ मधील आहेत.

प्रकल्पाच्या किंमतीत वाढ होण्यास बुडीत क्षेत्रात मोठ्या प्रमाणात झाडांच्या संख्येत वाढ होणे हे कारणीभूत असल्याचे विभागाने नमूद केले असता, समितीने ज्यावेळी सर्वेक्षण केले त्यावेळी तेथे किती झाडे आहेत हे पाहिले नाही का अशी विचारणा केली असता विभागीय

प्रतिनिधींनी जास्त पैसे मिळावेत म्हणून सर्वेक्षण झाल्यानंतर तेथील स्थानिक लोक जास्तीची झाडे लावतात.

यावर समितीने स्थानिक लोक नंतर झाडे लावतात असा आरोप करणे बरोबर नाही. जास्त पैसे मिळतात म्हणून झाडे दाखविताना अधिकारी आणि शेतकरी संगनमताने झाडांची संख्या वाढवितात आणि त्यामुळे प्रकल्पाची किंमत वाढते ही बाब विभागीय प्रतिनिधींच्या निदर्शनास आणली.

सोलापूर जिल्हयातील पाच प्रकल्पाच्या संदर्भातील माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सोलापूर जिल्हयामध्ये १) लघु पाटबंधारे तलाव, दुधनी, ता.अक्कलकोट २) धानेगाव कोल्हापूर पध्दतीचा बंधारा, ता.बार्शी ३) काळेगाव, कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा, ता.बार्शी ४) हातीस, कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा (१), ता.सांगोला ५) लघु पाटबंधारे बंधारा झाडी बोरगाव, ता.बार्शी हे पाच प्रकल्प आहेत.

लघुपाटंबधारे तलाव दुधनी या प्रकल्पाची सिंचन क्षमता १०३ हेक्टर असून रु.१८१ लाखाच्या खर्चास सन २००५ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली होती. सुधारित प्रशासकीय मान्यता रु.३९९ लाख खर्चास सन २००९ मध्ये मिळाली. प्रकल्पाचे काम सन २००७ मध्ये सुरु होऊन सन २०१२ मध्ये पूर्ण झाले. प्रकल्पाच्या किंमतीमध्ये २१८ लाख रुपये म्हणजे १२० टक्के वाढ झाली आहे. दरामुळे ५३ टक्के, भूस्तर वर्गीकरणामुळे ८ टक्के, वन अंतरमानामुळे ३४ टक्के, भूसंपादनामुळे २१ टक्के व इतर ४ टक्के अशी सर्वसाधारणपणे वाढ झालेली आहे.

धानेगाव कोल्हापूर पध्दतीचा बंधारा या प्रकल्पाची सिंचन क्षमता १६१ हेक्टर असून सन २००५ मध्ये रु.८७ लाखास प्रशासकीय मान्यता मिळाली होती. सुधारित प्रशासकीय मान्यता रु.२२१ लाखास २०१० मध्ये मिळाली. प्रकल्पाचे काम २००७ मध्ये सुरु होऊन सन २०१२ मध्ये काम पूर्ण झाले. प्रकल्पाच्या किंमतीमध्ये १३४ लाख रुपये वाढ झाली असून या वाढीचे प्रमाण १६३ टक्के एवढे आहे. दरामुळे ६७ टक्के, परिमाणामुळे २९ टक्के, वन अंतरमानामुळे ६ टक्के, नवीन तरतुदीमुळे ३३ टक्के वाढ झालेली आहे.

काळेगाव कोल्हापूर पध्दतीच्या बंधारा प्रकल्पाची सिंचन क्षमता १६० हेक्टर असून सन २००५ मध्ये रु.८९ लाखास प्रशासकीय मान्यता मिळाली होती. सुधारित प्रशासकीय मान्यता रु.२६७ लाखास सन २०११ मध्ये प्राप्त झाली. प्रकल्पाचे काम सन २००७ मध्ये सुरु होऊन २००९ मध्ये काम पूर्ण झाले. प्रकल्पाच्या किंमतीमध्ये रु.१७७ लाख म्हणजे १९७ टक्के वाढ

झालेली आहे. यात दरामुळे ११३ टक्के, संकल्पचित्रामुळे २८ टक्के, परिमाणामुळे २३ टक्के, भूस्तर वर्गीकरणामुळे ७ टक्के व वन अंतरमानामुळे ४ टक्के वाढ झालेली आहे.

समितीने काळेगाव को.प.बंधारा सन २००५ मध्ये मंजूर झाला होता. कॉन्ट्रॅक्टरने २००५ च्या दरानुसार कॉन्ट्रॅक्ट घेतले असताना सन २०१० मध्ये सुधारित प्रशासकीय मान्यता का देण्यात आली अशी विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी "मूळ प्रशासकीय मान्यता ८९ लाख रुपयांना देण्यात आली होती. १० टक्के कॉन्टिजन्सी एक्स्पेंडिचर लक्षात घेता टेंडरची किंमत ७० ते ७५ लाख रुपये असावी. सन २००६ मध्ये टेंडर मंजूर झालेले होते व सन २००७ मध्ये काम सुरु होऊन सन २००९ मध्ये पूर्ण झाले. काम सुरु झाल्यानंतर सर्व बाबींचा आढावा घेऊन सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्तावित केले जाते. सन २०११ मध्ये सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली" अशी माहिती दिली.

सन २००६ मध्ये टेंडर काढण्यात आले. सन २००७ मध्ये काम सुरु होऊन सन २००९ मध्ये पूर्ण झाले. सन २००९ पर्यंतची दरवाढ मिळाली पाहिजे, परंतु सन २०११ ची दरवाढ कशी मिळाली अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, सन २००७ मध्ये काम सुरु झाले. ज्यावेळी प्रशासकीय मान्यतेच्या किंमतीच्या जवळपास काम येते त्यावेळी अगोदर सुधारित अंदाजपत्रक सादर करण्यात येते. मान्यतेची प्रोसेस पूर्ण होण्यास बराच वेळ लागतो. कॉन्ट्रॅक्टरचे काम पूर्ण झाले असले तरी फायनल बिल देता येत नाही. ८९ लाखाच्या वरील खर्चाचे पेमेंट सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त होत नाही तोपर्यंत देता येत नाही. यामध्ये सन २००९ पर्यंतची दरवाढ अंतर्भूत आहे. फक्त सुधारित मान्यता सन २०११ मध्ये मिळाली.

समितीने औरंगाबाद जिल्हयात बोलेगाव कोल्हापूर पध्दतीचा १५९ हेक्टर क्षमतेचा बंधारा बांधण्यात आला. परंतु पाणी साठवण्यासाठी हा बंधारा अक्षम्य ठरल्यामुळे २.०२ कोटी रुपये खर्च वाया गेला याबाबत महालेखापाल यांचे मत विचारले असता, महालेखापाल नागपूर, यांनी समितीला विदित केले की, अनफेव्हरेबल सॉईल कण्डिशनमुळे के.टी.वेअरमध्ये पाणी साठू शकले नाही यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, बोलेगाव बंधाऱ्याचा स्ट्राटा हा अधिक पाझरतेचा होता. त्यामुळे जर्मन एक्सपर्टनी पाहणी करुन उपसा सिंचन योजना रद्द करुन विहिरीद्वारे सिंचन करण्याचे सुचविले. त्या ठिकाणी सोसायटी स्थापन केली

असून दरवर्षी विहिरीच्या माध्यमातून सिंचन केले जाते. १५९ हेक्टरची सिंचन क्षमता विहिरीच्या माध्यमातून पूर्ण होत आहे.

के.टी. वेअरची जागा निश्चित करण्याकरिता त्या भागात ट्रायल पीट घेत असताना तेथील मुरुम किंवा खडक कोणत्या पध्दतीचा आहे, पाणी शोषून घेणारा आहे की पाणी वाहून जाणारा आहे याची तांत्रिकदृष्ट्या माहिती असते. अन्यथा स्थळ निश्चिती कशी केली जाते? पाणी अडविण्याकरिता २ कोटी रुपये खर्च करण्याचे ठरविले, बंधारा बांधूनही पाणी साठले नाही. पाझरतेमुळे विहिरीचा स्तर वाढला असेल हे मान्य आहे. तलाव बांधून, भिंत बांधून पाण्याचा पाझर झाला तरी चालतो. परंतु हा बंधारा बांधण्याचे कारण काय याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी पाणी साठवणे हा उद्देश होता अशी माहिती दिली.

यावर समितीने प्रत्यक्ष जागेवर पाणी साठले का अशी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी पाणी साठले होते. वरच्या भागात पाणी साठवून त्याचा उपसा करण्यात येणार होता. हा कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा आहे. कोल्हापूरी पध्दतीच्या बंधा-यातून पाणी झिरपत नाही. या बंधा-याच्या वरच्या भागात साठणारे पाणी बाजूच्या सखल भागातून बंधा-याच्या फाउण्डेशनमधून लिकेज होते अशी माहिती दिली.

बंधा-याच्या वरच्या भागामध्ये पाणीसाठा ठेवणे शक्य नव्हते असा सल्ला केएफडब्ल्यूच्या तज्ज्ञांनी दिलेला आहे याविषयी महालेखापाल, नागपूर यांनी माहिती दिली की, के.टी.वेअरच्या जागेची निवड चुकीची झालेली आहे असा मूळ आक्षेप घेण्यात आलेला आहे. यावर हा प्रकल्प जर्मन फंडातून पूर्ण केलेला आहे. जर्मन टीमच्या सल्ल्याने या बंधा-याचे काम केलेले आहे. या बंधा-यामध्ये ऑक्टोबर ते फेब्रुवारीपर्यन्त पाणीसाठा असतो अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

समितीने या कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-याचा हेतू सफल झाला असे आपणास वाटते काय अशी विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी हेतू सफल झाल्याचे समितीच्या निदर्शनास आणले. या बंधाऱ्यांमुळे सन २००९ मध्ये ३० हेक्टर, सन २०१० मध्ये ६५ हेक्टर आणि सन २०११ मध्ये १०० हेक्टर क्षेत्राचा सिंचनाचा लाभ झाला असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

यावर समितीने सिंचन बंधा-यातून झाले की विहिरीतून झाले अशी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, जर्मन सहाय्यातून २८ प्रकल्प घेतले होते.

त्यापैकी हा एक प्रकल्प आहे. जर्मन सहाय्यातून जे प्रकल्प घेतले त्यामध्ये लाभधारकाचा जास्तीत जास्त सहभाग सिंचनामध्ये निर्माण करणे हा उद्देश होता. जर्मन तज्ज्ञ आणि आपले अधिकारी हे दोन-तीन महिन्यातून या प्रकल्पाची पाहणी करुन सूचना देत होते. ३०-३० मीटरचे बोअर घेऊन, फाऊण्डेशन मधून पाण्याची गळती होणार नाही याची खात्री करुन के.टी.वेअर बांधले जातात. या बंधा-याच्या बाबतीत परिस्थिती अशी होती की, अपस्ट्रीमला स्ट्राटा पोरस होता. जर्मन तज्ज्ञांनी या जागेची पाहणी केल्यानंतर त्यांनी स्ट्राटा बुजणारा आहे असे सांगितले. म्हणजे तीन-चार वर्षे पाणी पाझरत राहिल्यानंतर गाळामुळे झिरपणारी छिद्रे बंद होतात आणि पाणी पाझरणे थांबते. पाच-दहा वर्षामध्ये पाण्याचा पाझर थांबेल असे मत जर्मन तज्ज्ञांनी व्यक्त केले. त्याठिकाणी पाणी वापर संस्था स्थापन करण्यात आली. त्या संस्थेचे ५३ सदस्य होते. त्या सदस्यांनी विहिरीवरुन सिंचन करण्याचे ठरविले. हा प्रकल्प पाणी वापर संस्थेकडे हस्तांतरित केलेला आहे. पाणी वापर संस्थेकडून १ हजार रु. रॉयल्टी घेतली जाते. मेण्टेनन्स पाणी वापर संस्थेकडूनच केले जाते.

विहिरीद्वारे सिंचन करताना एखादा सधन शेतकरी ५ हॉर्सपॉवरची मोटर लावून पाण्याचा मोठया प्रमाणावर उपसा करतो, परिणामी आजूबाजूच्या विहिरी कोरड्या पडतात. तेव्हा किती हॉर्सपॉवरची मोटर लावून भूगर्भातील पाण्याचा उपसा केला पाहिजे यावर काही बंधन घातलेले आहे काय ? पाण्याचे समन्यायी वाटप होण्यासाठी ठिबक सिंचनाची अट घातली तर ते अधिक फायदेशीर होईल. या संदर्भात विभागाने काही विचार केलेला आहे काय अशी पृच्छा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, ग्राऊंड वॉटर लेजिस्लेशन ॲक्ट १९९३ यामध्ये दोन विहिरीमध्ये किती अंतर असावे यासंबंधीची मर्यादा आहे. परंतु या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी यंत्रणा उपलब्ध नाही. भूजलचा वापर करताना कोणी किती हॉर्सपॉवर मोटरचा वापर करुन किती पाण्याचा उपसा करावा यासंबंधीचा कायदा नाही.

जेथे पाण्याचा प्रवाह नव्हता तेथे बंधारा बांधण्यात आला असा महालेखापालांचा आक्षेप आहे आणि हा आक्षेप कार्यकारी अभियंत्यानी स्वीकारलेला आहे यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, लघु पाटबंधारे प्रकल्प हे ५० टक्के विश्वासार्हतेवर बांधले जातात. म्हणजे १०० वर्षापैकी ते कमीत कमी ५० वर्षे तरी भरतील असा विश्वास असतो. प्रकल्प करण्याचे निश्चित झाल्यानंतर तेव्हा पासून मागील ३५ वर्षाच्या पर्जन्यमानाची माहिती

घेतली जाते. एखाद्या प्रकल्पाचे आयुष्यमान जर आपण १०० वर्षाचे मानले तर त्यापैकी ५० वर्षच त्या प्रकल्पामध्ये पाणीसाठा होऊन ते पुर्ण भरले जाणे अपेक्षीत धरले जाते, असे जलशास्त्रीय अभ्यासाचे अनुमान आहे. या अनुमानावर आधारित मागील ३५ वर्षातील त्याभागातील पावसाचे प्रमाण, जलस्त्रोत, उद्‌भव यांचा अभ्यास करुन धरण बांधणे निश्चित केले जाते. नवीन धरणाच्या एकूण आयुष्यमानापैकी ५० टक्के अवलंबितत्वेवर धरण बांधण्यात येते. यासंबंधातील डेटा हा जलविज्ञान प्रकल्प, नाशिक यांचे कार्यालयातून उपलब्ध करुन घेता येतो. या ऑडीट पॅराच्या बाबतीत माननीय महालेखाकारांनी फक्त मागील ४ वर्षाचा डेटाच गृहित धरला.

परंतु कोल्हापूर बंधारे हे पाण्याच्या शंभर टक्के उद्‌भववावर बांधतात. मग या बंधा-यामध्ये गेल्या चार वर्षांच्या पावसाळयानंतर पाण्याचा साठा का झाला नाही अशी समितीने विचारणा केली असता महालेखाकार, नागपूर यांनी खुलासा केला की, गेल्या चार वर्षांतील पोस्ट मान्सुन निरीक्षणानुसार सदरहू कोल्हापूर बंधा-यामध्ये पाणी साठलेले नसल्याचे ए.जी.टीमला आढळून आले. प्रकल्पाच्या एकूण आयुष्यमानाच्या ५० टक्के कालावधीमध्ये संबंधित प्रकल्प पाणीसाठा करु शकतो. हे सर्वसामान्य जलशास्त्रीय अनुमान आपण येथे सांगत आहात. परंतु जल उद्‌भवाच्या ठिकाणीच केवळ आपण कोल्हापूर बंधारा बांधू शकतो. असे जर आहे तर गेल्या चार पोस्ट मान्सुन निरीक्षणांमध्ये तेथे जलसाठयाचा अभाव आमच्या टीमला आढळून आलेला आहे.

याअनुषंगाने समितीने या बंधा-याच्या माध्यमातून पाण्याचा साठा झालेला नाही, तसेच लोकांना पाणीही मिळालेले नाही असे मत प्रदर्शित केले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, धरणाच्या किंवा बंधा-याच्या एकूण आयुष्यमानापैकी अर्धी वर्षे पाण्याचा साठा होईलच असे नाही, या जलशास्त्रीय अभ्यासाच्या अनुमानानुसार सुरुवातीची, मधली किंवा शेवटची वर्ष विना पाण्याच्या साठ्याची असू शकतात. धरणाच्या पन्नास वर्षाच्या लाईफ सायकलपैकी उपरोल्लिखित चार वर्षांमध्ये धरणाचे रन-अप् नेमके नसेल. या प्रकल्पाचा मागील हिस्टॉरिकल डेटा पाहता आणि मोठमोठया प्रकल्पांवर आधारित जलविद्युत प्रकल्पांची सविस्तर माहिती पाहता असे आढळून येते की, सदरहू ठिकाणी चार वर्षापूर्वी पाण्याचा उद्‌भव होता. परंतु गेल्या चार वर्षांपासून या ठिकाणी पाण्याचा साठा आढळून आलेला नाही.

मे.कृष्णा डेव्हलपर्स, सांगली यांचे मार्फत निविदा रक्कम रुपये ८.६९ लक्ष चे काम जानेवारी २००३ मध्ये सुरु करण्यात आले व सप्टेंबर २००४ मध्ये पूर्ण करण्यात आलेल्या बंधाऱ्यामध्ये लगेच गळती सुरु होण्याचे कारण काय होते याबाबत जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे का ? गळतीची कारणे काय आहेत याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, मे.कृष्णा डेव्हलपर्स यांचे काम सन २००४ मध्ये पूर्ण झालेले आहे. सन २००४ मध्ये त्याच पावसाळयामध्ये धरणाच्या पाणी साठयाच्या ठिकाणी साठ ते नव्वद टक्के गळती आढळून आली. या गळतीचे ॲनॅलिसिस झालेले होते. तज्ज्ञांनी या ठिकाणच्या आरसीसी पाईपची तपासणी केलेली आहे. तसेच, या गळतीसंदर्भात पाहणी करुन जर्मनचे जलशास्त्रीय तज्ज्ञ तसेच, क्षेत्रीय अधिकारी यांनी देखील पाहणी करुन अचूक सल्ला दिला होता. तज्ज्ञांच्या मते या ठिकाणी पाईप रिप्लेस करुन सिमेंट ग्राऊटिंग करणे योग्य होते. सदरहू काम निविदा काढून ठेकेदाराकडून करुन घेतले होते.

सदरहू काम करण्याकरिता निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले तसेच, निकृष्ट दर्जाचे बांधकाम योग्य तांत्रिक सल्ला न घेतल्यामुळे केलेले आहे. खोल खंदक खणून निकृष्ट दर्जाची पाईपलाईन टाकून सिंमेटने ग्राऊटिंग करण्यात आले होते का ? या बांधकामाचे सुप्रिम इन्स्पेक्शन झालेले नाही का ? याचे क्वालिटी ऑडिट झालेले नव्हते का ? अशी पृच्छा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, सदरहू बांधकामामध्ये गळती सुरु झाल्यानंतर जिऑलॉजिकल इन्स्पेक्शन करुन जिऑलॉजिकल स्ट्राटा ॲनॅलिसिस करण्यात आले होते. तसेच, या धरणाची वॉटर इंट्रेस्ट टेस्टही करण्यात आली होती. धरणामध्ये धरणाच्या क्षमतेप्रमाणे पाणीसाठा झालेला नाही. सदरहू वर्षी पाऊसही अपेक्षेप्रमाणे चांगला पडलेला असतांनाही धरणामध्ये पाण्याचा साठा होऊ शकलेला नाही, याचा अर्थ धरणाच्या निकृष्ट बांधकामामुळे साठा झालेल्या पाण्याची गळती झालेली आहे. जलशास्त्रीय अभ्यासकांनी दिलेल्या सल्ल्याप्रमाणे, जिऑलॉजिकल सर्वे केल्यानंतर उद्‌भवाच्या प्रभावी ठिकाणी सीओटी मध्ये अनडिस्टर्ब सॉईल नमुना घेऊन तपासणी करण्यात आली. त्या संदर्भातील सीओटी गळतीचे मॅपिंग करुन जिऑलॉजिकल स्ट्राटा ॲनॅलाईझ केला होता. याबाबतीमध्ये कराड इंजिनियरिंग कॉलेजच्या तज्ज्ञांचे ओपिनियन घेतले होते. यामध्ये त्यांनी असे ऑब्झर्वेशन दिले होते की, प्रकल्पामध्ये सीओटीच्या बाजूला जॉईंट रॉक आहे. यंदाचे पर्जन्यमानही अपेक्षेपेक्षा कमी होते. धरणाच्या गळतीच्या ठिकाणाचे मॅपिंगही करण्यात आले होते. या संदर्भातील

जिऑलॉजिकल ॲनॅलिसिस डॅम सेफ्टी ऑर्गनायझेशकडे पाठविलेले आहे. या संदर्भातील तज्ञांच्या मत आल्यानंतरच त्या संदर्भात योग्य कारवाई करणे संयुक्तिक होईल.

सोलापूर जिल्हयातील बार्शी येथील अलजापूर प्रकल्पाचे अभिलेख तपासले असता, तेथेही धरणाच्या निकृष्ट बांधकामामुळे गळती झालेली आहे. सोलापूर जिल्हयातील अलजापूर लघु पाटबंधारे तलावातील वर्षनिहाय साठवणीसंबंधी अभिलेख विभागाकडून का दिले जाऊ शकले नाहीत याबाबत समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी अलजापूर धरण हे बार्शी तालुक्यामध्ये आहे. या प्रकल्पाची पाणी साठयाची क्षमता १०२१ टीसीएम इतकी आहे. तसेच, १७० हेक्टर क्षेत्र या प्रकल्पामुळे सिंचित होणे अपेक्षित आहे. १९९७ मध्ये या प्रकल्पाकरिता पहिला सुप्रमा १५० कोटी रुपयांची मिळाली होती. तसेच, सन २००५ मध्ये ३२६ कोटी रुपयांची सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली होती. सन २००५ मध्ये धरण बांधून पूर्ण झाले. सन २००५ मध्ये अतिवृष्टीही झाली होती. या धरणामध्ये सन २००५ ते २०११ पर्यंत पाणीसाठयाची माहिती विभागाकडे असल्याचे समितीस विदित केले.

या धरणाची सिंचित क्षेत्राची क्षमता १७० हेक्टर आहे. तरीही या धरणाच्या सिंचित क्षेत्रापैकी ३० ते ४१ टक्के क्षेत्राचे युटिलायजेशन होत आहे. लिकेजच्या संदर्भात एस.ई., एमआयएलएस, पुणे यांनी प्रकल्पस्थळी भेट दिलेली आहे. या प्रकल्पस्थळी एजी टीम भेट देण्याकरिता गेली असता, स्टोरेज रेकॉर्डबद्दल एजी यांना माहिती देणे स्थानिक अधिका-यांनी टाळले होते. एजी टीमला माहिती देण्यास टाळाटाळ केली जात असल्याची बाब महालेखाकार, नागपूर यांनी समितीच्या निदर्शनास आणली असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, सन २००५ मध्ये ज्यावेळी हे धरण बांधून पूर्ण झाले होते. त्याच वर्षी गळती आढळून आली होती. सिमेंट ग्राऊटिंगकरिता सुधारित अंदाजपत्रक शासनाकडे सादर करण्यात आले होते. सिमेंट ग्राऊटिंग झाल्यानंतर दुस-या वर्षी गळती आढळून आली नाही. दुस-या वर्षी गळती आढळून न आल्यामुळे केलेले नव्हते. पहिल्या वर्षीचे सिमेंट ग्राऊटिंगचे काम तांत्रिकदृष्टया पूर्ण झालेले होते.

सदरहू धरणाच्या पाणीसाठयासंदर्भातील अभिलेखे एजी यांनी मागितले असता. त्यांना सादर केले गेले नाही. यामुळे महालेखाकारांना हा आक्षेप परिच्छेद सादर करावा लागला. ज्या काही प्रशासकीय, नैसर्गिक, तांत्रिक अडचणी व त्यामुळे रखडलेली कामे यांची

कारणमीमांसा महालेखाकारांना सांगितली तर तेही बाब समजून आक्षेप परिच्छेद देणार नाहीत असे मत समितीने प्रदर्शित केले.

कॅनॉल व लिफ्ट इरिगेशन पध्दतीने या धरणामध्ये पाण्याचा साठा वाढविण्याचा प्रयत्न केला गेला होता. तरीही पूर्ण क्षमतेमध्ये धरणामध्ये पाणीसाठा होत नाही. सन २००५ पासून पर्जन्यमान जास्त होते. बार्शीच्या बाजूला असलेले जवळगांव येथील धरणे भरुन वाहिली. पंरतु बार्शी येथील धरणामध्ये पाणीसाठाही पूर्ण क्षमतेने झालेला नाही. तसेच, भसुंपादनाच्या मोबदल्याबाबत माहिती सादर करण्यासंदर्भात समितीने सांगितले असता विभागीय प्रतिनिधींनी अलजापूर धरणाची पाणीसाठयासंदर्भातील सन २००५ पासूनची माहिती खालीलप्रमाणे सादर केली.

वर्ष	पाणीसाठी(सहस्त्र घनमीटर)	सिंचित क्षेत्र (हेक्टर)
२००५	३२१	३८
२००६	४१०	४१
२००७	३९०	४६
२००८	३२३	७५
२००९	२८८	४८
२०१०	३९०	२३
२०११	६१२	२७

धरणाची क्षमता ही १०२१ सहस्त्र घनमीटरची आहे. परंतु येथील पाणीसाठा सरासरी ३०० सहस्त्र घनमीटरच्या पुढे गेलेला नाही. सिंचित क्षेत्रही जास्त नाही. तसेच, शेजारच्या गावातील तलाव, कालवे, बंधारे भरुन वाहिले. परंतु या धरणातील पाणीसाठा मात्र क्षमतेपेक्षा कमीच राहिलेला आहे. धरणाच्या एकूण क्षमतेपेक्षा १/३ही पाणी साठा या धरणामध्ये झालेला नाही. ही बाब निश्चितच आक्षेपार्ह आहे. धरणाच्या बांधकामामध्ये निश्चितपणे काही तरी चूक किंवा कुचराई झालेली आहे ही बाब या अनुषंगाने समितीने निदर्शनास आणली असता विभागीय प्रतिनिधींनी धरणाच्या पाणीसाठयाची आकडेवारी वस्तुस्थिती म्हणून मांडलेली असल्याचे समितीला विदित केले.

अलजापूर या धरणाचे काम सन १९९९ साली सुरु झाले आणि सन २००५ साली पूर्ण झाले अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली असता सन २००५ साली धरणाचे काम पूर्ण झाल्यानंतरही शेतकऱ्यांना अजून मोबदला मिळालेला नाही ही बाब समितीने निदर्शनास आणली असता मोबदल्याचा निधी मिळालेला आहे खाजगी वाटाघाटीने मोबदला देण्याच्या

प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आणि संबंधित शेतकऱ्यांना एक महिन्याच्या आत शेतकऱ्यांना मोबदला दिला जाईल अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

पश्चिम वाहिनी नद्यांचे शिल्लक पाणी वापरण्याच्या हेतूने पश्चिम वाहिनी नद्यांचे २५३.६२ दशलक्ष घन फूट पाणी नाशिक जिल्ह्याच्या तुटीच्या नदी खोऱ्यांकडे वळविण्यास महाराष्ट्र शासनाने माहे ऑक्टोबर, १९९९ मध्ये मंजुरी दिली होती. या प्रकल्पाची सद्य:स्थिती काय आहे ? या धरणाच्या कामामध्ये रस्ता आला होता ही बाब निदर्शनास आणून सर्वेक्षणाच्या वेळी हा रस्ता दिसला नव्हता काय अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी माहिती देताना समितीला विदित केले की, ही वळण योजना आहे. या योजनेचे काम पूर्ण झालेले आहे. परंतु ॲप्रोच चॅनेलद्वारे पश्चिमेकडे वाहून जाणारे पाणी गोदावरी नदीमध्ये आणून सोडण्याचे नियोजन केलेले आहे. या वळण बंधाऱ्याचे काम अंशत: पूर्ण झाले असून त्याची साठवण क्षमता ९.७२ दशलक्ष घन फूट इतकी आहे. वळण योजनेनुसार २४३ दशलक्ष घन फूट पाणी गोदावरी खोऱ्यांमध्ये वळविण्याचे प्रस्तावित केले आहे. धरणाचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. वळण ॲप्रोच चॅनलचे काम जून, २०१४ पर्यंत पूर्ण केले जाणार आहे.

ॲप्रोच चॅनेलसाठी रस्ता ओलांडावा लागतो. परंतु त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची परवानगी घेण्यात आली नव्हती परवानगी न घेण्याची कारणमिमांसा काय याबाबत समितीने विचारली असता, विभागीय प्रतिनिधींनी या धरणाच्या टेल चॅनेलचे काम पूर्ण झालेले नाही. सीडी वर्क रोड क्रॉसिंगचे काम बाकी आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून परवानगी घ्यावी लागते. या संदर्भात मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची दिनांक ५.५.२००५ रोजी मान्यता मिळालेली असून त्यासाठी लागणाऱ्या भूसंपादनाचे कार्य प्रगतीपथावर आहे व हे काम माहे जून, २०१४ पर्यंत होणार आहे अशी माहिती दिली.

अमरावती विभागातील प्रकल्पाच्या सद्य:स्थितीबाबत माहिती देतांना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सन २०१२ पर्यंत २,३८७ प्रकल्पांची कामे पूर्ण झालेली आहेत. त्यामुळे १,०१,३४३ हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. या प्रकल्पांचा एकूण पाणी साठा ५,१९,००० स.घ.मी.इतका आहे. अमरावती मंडळातंर्गत ३६५ योजना प्रगतीपथावर आहेत. सन २०१३-१४ साठी १५३ योजनांचे नियोजन केलेले आहे. अमरावती जिल्ह्यासाठी १८४ आणि बुलढाणा जिल्ह्यासाठी २८९ कामांचा डीपीआर मंजूर आहे. अमरावती व बुलढाणा

या दोन जिल्ह्यांसाठी महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ व विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमातंर्गत निधी प्राप्त आहे. सन २०१३-१४ या वषार्साठी ५ जिल्ह्यासाठी व्हीआयआयडीपी अंतर्गत १२० कोटी व महाराष्ट्र जलसंधारण महामंडळामार्फत १७८ कोटी रुपये उपलब्ध झाले आहेत.

महात्मा ज्योतिबा फुले जल-भूमी संधारण अभियानातंर्गत शासनाने विदर्भातील कोणकोणत्या जिल्ह्यांना किती निधी दिला आहे व त्या निधीतून कोठे कामे सुरु आहेत, यासंदर्भात समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी १३ जिल्ह्यांमध्ये साखळी बंधारे घेण्यात आलेले असून त्यामध्ये बुलढाणा जिल्ह्याचा समावेश आहे अशी माहिती दिली.

दिनांक ४ जून, २०१३ रोजी घेतलेल्या साक्षीच्या वेळी विभागीय प्रतिनिधींनी दिलेल्या माहितीने समितीचे समाधान न झाल्यामुळे समितीने पुन्हा दिनांक १२ जून, २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

उक्त बैठकीत समितीने सोलापूर येथील प्रकल्पावर मंजूर मुल्यापेक्षा जास्त खर्च झाला आहे, याविषयी समितीला सविस्तर माहिती देण्याबाबत सांगितले असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, जिल्ह्यातील विना काटकसरीच्या ५ प्रकल्पासंबंधी समितीला मागील बैठकीच्या वेळी सविस्तर माहिती दिल्याचे नमूद केले. त्यात अकोला तालुक्यातील पाटबंधारे तलाव दुधनीचे सिंचन क्षेत्र १०३ हेक्टर आहे. सन २००५ मध्ये सदर प्रकल्पाला १८१ कोटी रुपयांची मान्यता मिळाली होती. त्यानंतर सन २००९ मध्ये ३९९ लक्ष रुपयांची सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली होती. प्रकल्पाचे काम सन २००७ मध्ये सुरु झाले व सन २०१२ मध्ये पूर्ण झाले. या प्रकल्पासाठी २१८ लक्ष रुपयांची म्हणजे १२० टक्के वाढ झाली. पुढील कारणांमुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली. दरामुळे ५३.५८ टक्के, भूस्तर वर्गीकरणामुळे ३.०६ टक्के, वहन अंतरामुळे ३४.८३ टक्के, भूसंपादन दरातील वाढीमुळे २१.२७ टक्के आणि नवीन तरतुदीमुळे ४.६१ टक्के वाढ झाली. त्याच प्रमाणे बार्शी तालुक्यातील कोल्हापुरी टाईप बंधारा, घाणेगाव याचे सिंचन क्षेत्र १६१ हेक्टर आहे. सन २००५ मध्ये सदर प्रकल्पाला १६१ कोटी रुपयांची मान्यता मिळाली होती.

मागील काही वर्षात गाळ न काढल्यामुळे प्रत्यक्षात असलेल्या सिंचन क्षमतेनुसार पाण्याचा साठा होत नाही. त्यासाठी देखभाल व दुरुस्ती करणे गरजेचे आहे. अन्यथा सिंचन क्षमता व प्रत्यक्षात असलेली पाण्याची साठवणूक क्षमता यात तफावत येऊ शकते. गाळ

काढण्यासाठी योजना केल्या पाहिजेत. सन १९७२ च्या दुष्काळानंतर सन २०१३ मध्ये पडलेल्या दुष्काळात गाळ काढला. परंतु त्या मधील काळात दुर्देवाने कोणताही विचार केला नसल्यास भविष्यकाळात विचार होणे अत्यावश्यक आहे असे मत समितीने प्रदर्शित केले.

महात्मा फुले जलभूमी संधारण अभियानाची माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, या अभियानातंर्गत डिझेल, वीज, पाणी अशा विविध यंत्रणांसाठी खर्च उपलब्ध करुन दिला जातो. ही कामे कृषी विभागाच्या मृदू व जलसंधारण विभागामार्फत होतात. कृषी विभाग ही यंत्रणा को-ऑर्डीनेट करते. सिंचन विभाग कृषी विभागाद्वारे आणि केटीवेअर बंधारे, सिमेंट नाले बंधारे ही कामे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत केली जातात. मागील वर्षी महात्मा फुले जलभूमी संधारण अभियानातंर्गत ७० कोटी रुपये खर्च केले आहेत. या व्यतिरिक्त नरेगा योजना सर्व ठिकाणी उपलब्ध आहे. शिरपूर पॅटर्न याचा नेहमी उल्लेख केला जातो. त्या अनुषंगाने खोलीकरण आणि रुंदीकरण या संबंधी शासन निर्णय काढला आहे.

महात्मा फुले जलभूमी संधारण अभियानातंर्गत राष्ट्रीय कृषी विकास योजनेतंर्गत माहे मार्च-२०१२ अखेरचा भौतिक प्रगतीचा अहवाल दिला आहे. त्यानुसार रत्नागिरी जिल्हयासाठी ५१.०२ लक्ष रुपये वितरित करण्यात आले. त्यापैकी प्रचार व प्रसिध्दीसाठी ४.५० लक्ष रुपये, इंधन व इतर बाबीसाठी ४६.५२ लक्ष रुपये खर्च दाखविला आहे. परंतु गाळ काढण्याची संख्या शून्य दाखविली आहे. परंतु त्या पुढील कॉलममध्ये दुरुस्ती संख्या ४१ दर्शविली आहे.

साधारणपणे दुरुस्तीसाठी एक ते दीड लक्ष रुपये खर्च होऊ शकतो. कोणकोणत्या ४१ बंधाऱ्यांची दुरुस्ती केली आहे. ही सर्व कामे जिल्हा स्तरावर केली जातात. त्यांची पाहणी व्हीजिलन्स विभाग, डिपार्टमेंट किंवा त्रयस्त संस्थेमार्फत केली जाते का ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी माहिती देताना सांगितले की, कोणता कार्यक्रम प्राधान्याने घ्यावयाचा यासंबंधी स्थानिक यंत्रणांना अधिकार दिलेले आहेत. जलसंपदा विभागात व्हिजिलन्स सेक्शन आहे तसा विभाग जलसंधारण विभागामध्ये नाही. यासंदर्भात स्वतंत्ररित्या संनियंत्रण व मूल्यमापन करण्यासाठी केडर निर्माण करण्याचा प्रस्ताव सादर केला असून त्याला लवकर मंजुरी मिळण्याची अपेक्षा आहे. यासाठी मूल्यमापन निधीची तरतूद करण्यात येणार आहे. यावर समितीने त्रयस्थ संस्थेकडून पाहणी झाल्यास चांगली कार्यवाही होईल असे मत व्यक्त केले.

महालेखाकार, नागपूर यांनी राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत संपूर्ण महाराष्ट्राकरिता २६८४.८१ कोटी रुपये महात्मा ज्योतीबा फुले जलभूमी संधारण अभियान कार्यक्रमाकरिता दिले. हा निधी कोणत्या योजनांकरिता वापरला याबाबत विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी "महात्मा फुले जलभूमी संधारण अभियान ही एक मोहीम आहे. या मोहीमेकरिता विशिष्ट निधी दिला जात नाही. तर या अभियानाखालील कार्यक्रम करताना वेगवेगळा निधी वापरला जातो. त्यानुसार हे कार्यक्रम करताना राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत प्राप्त झालेला निधी वापरलेला आहे" अशी माहिती दिली.

यासंदर्भात अधिक माहिती देतांना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, महात्मा फुले जल अभियान हा दुष्काळ नियोजन व्यवस्थापनाचा कार्यक्रम आहे. या मोहिमेखाली कोणतेही नवीन काम केले जात नाही तर गाळ काढणे वगैरे प्रकारची कामे केली जातात. महात्मा फुले जल अभियानाकरिता कोणतेही बजेट नसते. या अभियानाखालील कामे करण्याकरिता राष्ट्रीय कृषी विकास योजनेचा निधी वापरला आहे.

ही सर्व कामे कृषी अधिकारी करतात आणि जलसंधारण विभाग पैसे रिलिज करते. कृषी विभागाने केलेल्या कामाची किमान ५ टक्के तरी पाहणी जलसंधारण विभागाकडून केले जाते काय ? जलसंधारण विभाग केलेल्या कामांची केवळ देयके मंजूर करते की, खरोखरच खर्च झाला आहे की नाही याची पाहणीही करते ? तसेच, अशा प्रकारे पाहणी करुन अहवाल तयार केला जातो का याविषयी समितीने विचारणा केली असता, आतापर्यंत अशाप्रकारे स्वतंत्र चेकिंग केले गेलेले नाही. कारण, त्या करिता आवश्यक असलेली यंत्रणा नाही. परंतु, सन २०१३-२०१४ या वर्षापासून सनियंत्रण व मूल्यमापन या नवीन हेडखाली त्रयस्थ संस्थेमार्फत चेकिंग करण्यास सुरुवात केली जाणार आहे. या प्रस्तावास मंत्रीमंडळाने मान्यता दिलेली असून त्या करिता २ कोटी ३० लाख रुपये इतका निधी देखील उपलब्ध करुन दिलेला आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

समितीने प्रचार व प्रसिध्दी या कामांवर इतका खर्च करण्याचा नेमका उद्देश काय आहे, यावर कोणत्या आधारावर खर्च केला जातो अशी विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी "महात्मा फुले अभियानांतर्गत महात्मा फुले यांच्या जयंतीपासून कार्यक्रम सुरु केले जातात. महात्मा फुले जल अभियानांतर्गत केलेल्या वेगवेगळया जिल्हयांत केलेल्या छोटयाछोटया कामांवरील खर्चाची ती बेरीज आहे. हे कार्यक्रम लोक सहभागातून करावयाचे असल्याने

जास्तीत जास्त लोकांनी यामध्ये सहभागी व्हावे याकरिता त्यांना अपील करण्यासाठी खर्च केला जातो" अशी माहिती दिली. या प्रसिध्दी व प्रचाराच्या कामावर संपूर्ण महाराष्ट्राकरिता जवळपास ३५६ कोटी रुपये इतका खर्च दर्शविण्यात आलेला आहे ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, सदरहू खर्च सन २०११-२०१२ व सन २०१२-२०१३ या कालावधीतील कामाबाबतचा आहे. सन २०१३-२०१४ मध्ये अशा प्रकारे प्रचार व प्रसिध्दीवर कुठल्याही प्रकारचा खर्च केलेला नाही. सन २०१३-२०१४ मध्ये शिवकालीन, निजामकालीन जलस्त्रोताची दुरुस्ती व बळकटीकरण या कामांकरिता १३ जिल्हयांकरिता २ कोटी रुपये इतका निधी दिलेला आहे. त्यामुळे या वर्षी हा निधी प्रत्यक्ष कामावर खर्च केला जाणार आहे. तसेच, कोणत्या जलस्त्रोताची दुरुस्ती करायची याबाबतचा निर्णय मंत्रालय स्तरावर होत नाही तर हा निर्णय स्थानिक पातळीवर होतो. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती हा निर्णय घेते. सन २०११-२०१२ व सन २०१२-२०१३ या कालावधीत कदाचित गाळ काढण्याचे काम केले गेले नसले तरी दुरुस्तीचे काम केलेले आहे. आता सन २०१३-२०१४ मध्ये एक मोहिम घेऊन हे काम केले जाणार आहे. त्या करिता १३ जिल्हयांकरिता २ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आलेला आहे. तसेच, राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत निधी अद्याप वितरित केलेला नाही.

काही जुने प्रोजेक्ट आहेत त्यांच्या डीएसआरमध्ये २०० ते ३०० टक्क्यांनी वाढ झालेली आहे याचे कारण म्हणजे मेरी या संस्थेकडे पाठविलेले नमुने अद्याप तपासून परत आलेले नाहीत. जोपर्यंत मेरीकडून नमुने तपासून येत नाहीत तोपर्यंत काम सुरु करता येत नाही. नमुना तपासणीकरिता २ वर्षे इतका कालावधी लागायला लागला तर दरम्यानच्या काळात कामाच्या खर्चात दुपटीने वाढ होते. त्यामुळे मेरीकडे कामाचा किती लोड आहे ? याविषयी समितीने विचारणा केली असता, सध्या मेरीकडे ८७ प्रकल्पांच्या ७४३ नमुना तपासणीचा लोड आहे. उपलब्ध असणारे मनुष्यबळ आणि मशिन्सच्या क्षमतेनुसार वर्षातून जास्तीत जास्त ४०० नमुन्यांची तपासणी केली जाऊ शकते. मेरीकडे अजून ७४३ नमुने असून त्याची तपासणी करण्यासाठी अजून तरी दोन वर्षाचा कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येणार नाही. जर एखादे नमुना अर्जंट असेल तर ते संबंधित सीईला कळविले तर ते त्यांना महिन्याभरात उपलब्ध करुन देण्यात येते असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

एखादा प्रोजेक्ट सुरु करण्यापूर्वी त्याचा सर्व्हे करावा लागतो. जमीन किती जाते, माती कशी आहे, काम केल्यानंतर ती खचेल किंवा कसे याकरिता मातीचे सॅम्पल लागते. मेरीकडून नमुन्यांची तपासणी झाल्याशिवाय ते काम करता येत नाही. वर्क ऑर्डर दिली जात नाही. परंतु, दुसरीकडे मात्र टेंडर काढण्याची घाई मात्र केली जाते. मेरीकडून वेळेवर नमुना न मिळाल्यामुळे १ कोटी रुपयांच्या प्रोजेक्टची किंमत ३ कोटी रुपयांपर्यंत जाते. २ कोटी रुपयांचा निष्कारण खर्च वाढतो. वेळ वाया जातो, किंमत वाढते. याअनुषंगाने समितीने मेरीची राज्यात एकूण किती ऑफिसेस आहेत अशी विचारणा केली असता, मेरीचे एकच ऑफिस असून ते नाशिकला असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली. याअनुषंगाने कमीत कमी ६ जिल्ह्यात तरी मेरीची कार्यालये असणे आवश्यक असल्याचे अभिप्राय समितीने व्यक्त केले.

समितीने दिलेल्या निदेशानुसार विभागाने (१) महात्मा ज्योतिबा फुले जलभूमी संधारण अभियान अंतर्गत काढण्यात आलेल्या गाळाची माहिती (२) औरंगाबाद मंडळांतर्गत पूर्ण व प्रगतीपथावरील प्रकल्पाची माहिती (३) मराठवाडा विकास कार्यक्रमातंर्गतची माहिती (४) रत्नागिरी जिल्ह्यातील योजनांच्या भूसंपादनाची माहिती (५) कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा वोलेगाव ता.गंगापूर, जिल्हा औरंगाबाद, येथील प्रकल्पांतर्गत खोदलेल्या विहिरींची व विहिरींवर झालेल्या अप्रत्यक्ष सिंचनाची माहिती (६) अळजापूर लघु पाटबंधारे तलाव ता.बार्शी, जिल्हा सोलापूर या योजनेची माहिती (७) अमरावती मंडळाकडील योजनांची (तालुकानिहाय) माहिती (८) सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळाच्या अनुषंगाने सिमेंट बंधाऱ्याची माहिती (९) अहमदनगर जिल्ह्यातील ० ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या योजनांवर झालेला खर्च सिंचन क्षमता याबाबत समितीस सादर केलेली माहिती अहवालातील "परिशिष्ट अ" मध्ये समाविष्ट आहे.

अभिप्राय व शिफारशी

समितीसमोरील साक्षीदरम्यान आलेल्या माहितीनुसार विभागाकडे शाखा अभियंत्याची ८८४ पदे मंजूर असून त्यातील २३९ पदे रिक्त असल्याचे तसेच विभागाकडे असलेले ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेचे ६३ हजार प्रकल्प व १२७३ मोठे प्रकल्प विचारात घेता उपलब्ध मनुष्यबळ कमी असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. जलसंधारण विभागाखाली येत असलेले ० ते १०० हेक्टर क्षमतेच्या कामाची जबाबदारी जिल्हापरिषदेकडे, १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या कामाची जबाबदारी विभागाकडे व २५० हेक्टरवरील सिंचन क्षमतेची जबाबदारी

जलसंपदा विभागाकडे असल्याचे आणि औरंगाबाद जलसंधारण महामंडळाकडून ० ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेची कामे केली जात असल्याचे विभागाकडून समितीच्या निदर्शनास आणले गेले.

विभागाने हाती घेतलेले जलसंधारणाचे प्रकल्प यशस्वीपणे कार्यान्वित न होण्यास अपूरे मनुष्यबळ, जलसंधारणाच्या कामाची जबाबदारी अनेक घटकांकडे विभागली गेल्याने एकजिनसीपणाचा तसेच योग्य नियंत्रणाचा अभाव कारणीभूत असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. **विभागाच्या कामाचा आवाका विचारात धेता, शाखा अभियंत्यांची मंजूर असलेली सर्वच्या सर्व पदे कोणत्याही विलंबाविना कार्यरत असने क्रमप्राप्त आहे. परंतु शाखा अभियंत्याची जवळपास २७ टक्के पदे रिक्त ठेवून सिंचनाचे प्रकल्प कार्यरत ठेवणे कठीण गोष्ट आहे. त्यामुळे विभागाकडे शाखा अभियंता तसेच इतर तांत्रिक रिक्त असलेली पदे त्वरित भरण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. तसेच स्वतंत्ररित्या संनियंत्रण व मूल्यमापन करण्यासाठी विभागाकडे स्वतंत्र कॅडर निर्माण करण्यासंदर्भात उपाययोजना करण्यात यावी, स्वतंत्र कॅडर निर्माण होईपर्यंत जिल्हापरिषदेअंतर्गत होणाऱ्या जलसंधारणाच्या कामांचा पदभार असणाऱ्या कार्यकारी अभियंत्यांची पदे जलसंपदा विभागाच्या नियंत्रणात आणली जावी अशी समितीची शिफारस आहे. जलसंपदा विभागाकडे असल्याप्रमाणे जलसंधारण विभागामध्ये दक्षता विभागाची स्वतंत्ररित्या स्थापना करण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.**

कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे २८ सिंचन प्रकल्प जर्मन सहाय्यातून हाती घेण्यात आले होते. जर्मन तज्ञांची उपसा सिंचन योजना रद्द करुन विहिरीद्वारे सिंचन करण्याचे सूचविले. जर्मन सहाय्यातून जे प्रकल्प घेण्यात आले त्यामध्ये लाभधारकाचा जास्तीत जासत सहभाग सिंचनामध्ये करण्याचा उद्देश होता. कोल्हापूरी बंधाऱ्याचा स्तर पाझरणारा असल्याने बंधाऱ्यामुळे साठणारे पाणी झिरपून आजूबाजूच्या विहीरींच्या पाण्याची पातळी वाढली व सिंचनाचे उद्दिष्ट पूर्ण झाल्याचे समितीस अवगत करण्यात आले. परंतु, विहीरीतून पाण्याचा उपसा करण्यावर कोणतेही बंधन घातले गेले नाही असे समितीच्या निदर्शनास आले.

पाण्याचे समन्यायी वाटप व्हावे याकरीता ठिबक सिंचनाची अट घालण्यात यावी. तसेच ग्राऊंड वॉटर लेजिसलेशन ॲक्ट, १९९३ मध्ये दोन विहीरींमध्ये किती अंतर असावे यासंबंधी मर्यादा आहेत परंतु उपसा करण्यासंदर्भात मर्यादा नाही. आजच्या परिस्थितीत जमिनीतील

पाण्याची पातळी खाली जाण्याची भयावह परिस्थिती असताना पाण्याचा उपसा करण्यासंदर्भात बंधणे घालणे हीच काळाची गरज आहे. ज्या विभागामध्ये कोल्हापूरी बंधारे बांधण्यात आले आहेत, किंवा बांधण्यात येत आहेत, त्या क्षेत्रामधील विहीरीतील पाणी उपसा संदर्भात आवश्यक बंधन घालण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.

मे.कृष्णा डेव्हलपर्स, सांगली यांचेमार्फत, ८.६५ लक्ष निविदेचे काम जानेवारी २००३ मध्ये सुरु होऊन ते सप्टेंबर २००४ मध्ये पूर्ण करण्यात आले होते. परंतु सन २००४ च्या पावसाळ्यामध्ये धरणाच्या साठ्याच्या ठिकाणी ६० ते ९० टक्के गळती आढळून आली. तज्ञांचा याप्रकरणी सल्ला घेतला असता, सदरहू काम करण्याकरीता निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले तसेच निकृष्ट दर्जाचे बांधकाम योग्य तांत्रिक सल्ला न घेतल्यामुळे केल्याचे आढळून आले. धरणाच्या गळतीच्या ठिकानाचे मॅपिंग करुन जिओलॉजिकल ॲनॅलिसीस डॅम सेफ्टी ऑर्गनायझेशनकडे मॅपिंग पाठविण्यात आले असून त्याबाबतचा अहवाल अद्याप प्राप्त व्हावयाचा आहे अशी माहिती समितीस प्राप्त झाली. सदर अहवाल त्वरीत पाठविण्याची कार्यवाही करण्यात यावी व अहवालाची माहिती समितीस सादर करण्यात यावी तसेच या अहवालामध्ये मे.कृष्णा डेव्हलपर्स दोषी आढळल्यास **त्यांच्यावर कारवाई करावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

महात्मा फुले जलअभियानांतर्गत दुष्काळ नियोजन व्यवस्थापनाची कामे केली जातात. सदरहू कामे जिल्ह्यातील कृषी अधिकाऱ्यामार्फत केली जातात परंतु दिलेल्या निधीनुसार कामे झाली किंवा नाही याची तपासणी करण्याबाबत यंत्रणा जलसंधारण विभागाकडे अद्याप नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करण्यासंदर्भात मंत्रीमंडळाने मंजूरी दिली असून त्याकरीता २ कोटी ३० लाख रुपये इतका निधी मंजूर असल्याचेही समितीस सांगण्यात आले. **याकरीता कोणत्या संस्थेची नियुक्ती झाली तसेच सदरहू संस्थेने केलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती समितीस देण्यात यावी. संस्थेची नियुक्ती झाली नसल्यास त्यांची कारणे व कधीपर्यंत नियुक्ती केली जाणार आहे व नियुक्ती करण्यास अडचणी काय आहेत याची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

कोणताही प्रकल्प सुरु करण्यापूर्वी जमीनीचा सर्व्हे केला जातो. माती कशी आहे हे जाणून घेण्याकरीता मेरी या संस्थेमार्फत मातीची तपासणी होते. मेरीकडून मातीचा नमुना अहवाल सादर करण्याकरीता दोन ते तीन वर्षाचा अवधी लागत असल्याने प्रकल्पाच्या किंमतीमध्ये दुप्पट ते तिप्पट वाढ होते. प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण होऊ शकत नसल्याने एकूणच जलसंधारण क्षेत्रातील विकासास खीळ बसते असे समितीचे स्पष्ट मत आहे. समितीसमोरील साक्षीदरम्यान मेरीच्या प्रतिनिधींनी मेरीचे नाशिक येथे केवळ एकच कार्यालय असल्याचे सांगितले. **सध्या मेरीकडे ८७ प्रकल्पाचे ७४३ नमुने तपासणीसाठी प्रलंबित असल्याचे तसेच वर्षातून जास्तीत जास्त ४०० नमुन्यांची तपासणी केली जाऊ शकते अशी माहिती समितीस दिली. तातडीचे नमुना अहवाल महिन्याभरात उपलब्ध करुन देण्यात येतो असेही समितीस सांगण्यात आले. राज्यामध्ये फक्त एकाच ठिकाणी मेरीचे कार्यालय असल्यामुळे त्यांच्याकडे असलेले अपुरे मनुष्यबळ यामुळे मातीच्या तपासणीस वेळ लागतो व हा कालावधी प्रकल्पाचा खर्च वाढविण्यास व प्रकलप विहित कालमर्यादेत पूर्ण होण्यास कारणीभूत ठरत आहे. त्यामुळे राज्यातील अन्य जिल्ह्यांमध्ये मेरी या संस्थेची कार्यालये आवश्यक त्या कर्मचाऱ्यांसह सुरु करणे अत्यावश्यक आहे. अत: राज्यातील सहा विभागामध्ये प्रत्येकी एक याप्रमाणे मेरीची कमीत कमी ६ विभागामध्ये कार्यालये स्थापन करणे आवश्यक आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. यास्तव योग्य त्या मनुष्यबळासह ही कार्यालये स्थापित करण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.**

गृह विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००८-२००९ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्रमांक २.५ "पोलीस विभागातील संगणकीकरण" तसेच परिच्छेद क्रमांक ३.४.३ "गस्त नौकेवरील वायफळ खर्च" यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिलेले आहेत.

(अ) "पोलीस विभागातील संगणकीकरण"

CIPA संगणकांचे व्यर्थ पडून राहणे व न्यून वापर :-

राज्यातील सर्व पोलिस स्टेशनाकरिता एकच यंत्रणा नियुक्त करुन हार्डवेअर, सॉफ्टवेअरचा पुरवठा, प्रशिक्षण, हस्त आधार यासहित CIPA प्रकल्प एक संपूर्ण कार्यक्रम असा कार्यान्वयीत केला गेला. त्यानुसार M/s HCL Infosys Ltd., पुदूचेरी यांना हार्डवेअरचा पुरवठा (जानेवारी २००६), प्रशिक्षणाकरिता, हस्त आधाराकरिता (सप्टेंबर २००६), वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक (STA.) व तांत्रिक सहाय्यक (TA) नेमून मनुष्यबळ पुरविणे याकरिता निर्देशित केले गेले.

चाचणी तपासणी केलेल्या पोलिस स्टेशनमध्ये असे दिसून आले की हार्डवेअर जानेवारी ते जुलै २००६ या कालावधीत प्राप्त झाले आणि फेब्रुवारी ते ऑगस्ट २००६ या दरम्यान बसविले गेले. नियुक्त केलेले STA/TAs त्या त्या पोलिस स्टेशनमध्ये जून ते ऑगस्ट २००७ या दरम्यान रुजू झाले आणि CIPA प्रकल्पाचे काम सप्टेंबर २००७ पासून सुरु झाले. या प्रकारे, हे हार्डवेअर जानेवारी २००६ ते ऑगस्ट २००७ म्हणजे २० महिन्यांहून जास्त कालावधीसाठी व्यर्थ पडून होते.

असेही दिसून आले की प्रत्येक पोलिस स्टेशनला CIPA करीता पुरविलेल्या पाच संगणकांपैकी सरासरी फक्त तीनच संगणक CIPA करीता वापरले गेले. उरलेल्यांपैकी एक संगणक इतर कार्यालय कामकाजासाठी व ब्रॉडबॅंड सुविधेचा फायदा घेण्यासाठी वापरले गेले. यांचा परिणाम प्रत्येक पोलिस स्टेशनमध्ये CIPA करीता दोन संगणकांच्या न्यून वापर होण्यात झाला.

सर्व पोलिस स्टेशनांनी वरील वस्तूस्थिती स्वीकार केली.

ज्ञापन:

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला

सिपा प्रकल्पांतर्गत साधन सामुग्रीचा पुरवठा एन.आय.सी. नवी दिल्ली यांनी सर्व ठरविलेल्या पोलीस ठाण्यांना परस्पर करण्यात आला. सर्व पोलीस ठाण्यांमध्ये जागेची तयारी व संगणक सामुग्रीची उभारणी करुन पोलीस अधिकाऱ्यांना प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांना सिपा कार्यप्रणालीचे प्रशिक्षण आयोजित करणे, सिपा प्रकल्पाची सर्व पोलीस ठाण्यांमध्ये व्यवस्थितरित्या अंमलबजावणीसाठी सिनिअर टेक्निकल असिस्टंट व टेक्निकल असिस्टंट यांच्या नेमणुका वेळेवर झाल्या नाहीत. सदरहू कर्मचाऱ्यांच्या नेमणुका करण्याची बाब, राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्र यांचे अधिकारात होते. परिणामी सिपा प्रकल्प सप्टेंबर २००७ पासून सुरु झाला. सिपा कार्यप्रणाली लॅन बेस नेटवर्क बेसवर आधारीत होती. सदर कार्यप्रणाली अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी पुर्णपणे नविन होती. त्याच्या प्रशिक्षणांसाठी संगणक हार्डवेअरचा उपयोग करण्यात आला. पोलीस स्टेशनांना वाटप केलेले संगणक सिपा संबंधीत कामांसाठी वापर करण्यात आले. या कामांमुळे सीपाचे नियमित कामकाजावर कोणताही परिणाम होवू दिला नाही.

"ब्रिज" सॉफ्टवेअरचे कार्य न करणे :-

CCIS सॉफ्टवेअर हे "विंडो" पायाच्या कार्यान्वयन पध्दती वर MS-SQL या बँक एंड सहित विकसित केले गेले व जेव्हा की CIPA डाटा बेस हा Postgre SQL सहित LINUX कार्यान्वयन पध्दतीवर विकसित केला गेला. दोन्ही पध्दतीना मिळते जुळते करण्याकरिता आणि CIPA डाटा CCIS कडे नेणे व आणि त्याचप्रमाणे उलट करण्याकरिता राष्ट्रीय माहिती केंद्राने नंतर "ब्रिज" सॉफ्टवेअर विकसित केले. तथापि, "ब्रिज" सॉफ्टवेअर राज्य गुन्हा अभिलेख केंद्र, पुणे, जिल्हा गुन्हा अभिलेख केंद्र, नागपूर व पुणे येथे यशस्वीरित्या स्थापित होऊ शकला नाही (एप्रिल २००८) व राष्ट्रीय गुन्हा अभिलेख केंद्र व राष्ट्रीय माहिती केंद्र, नवी दिल्ली यांना त्याप्रमाणे डिसेंबर २००८ मध्ये कळविण्यात आले.

दरम्यान राज्य गुन्हा अभिलेख केंद्र, पुणे ने (नोव्हेंबर, २००८) CIPA चे कार्यान्वयन करणाऱ्या १२७ पोलिस स्टेशनांचा अंतर्भाव असणाऱ्या नऊ जिल्हा गुन्हा अभिलेख केंद्रांना सप्टेंबर, २००७ पर्यंतची अपूर्ण डाटा नोंद CCIS मध्ये पूर्ण करण्याचे व ऑक्टोबर २००७

पासून CCIS मध्ये पुढील नोंदी थांबविण्याचे आदेश दिले. तथापि, असे दिसून आले की २६ पोलिस स्टेशनांनी डाटा नोंदी CCIS पध्दतीत करणे डिसेंबर २००८ पर्यंत (७३६२ अभिलेख) चालू ठेवले. या शिवाय तीच डाटा नोंद CIPA मध्येही केली ज्याचा परिणाम मनुष्य आणि यंत्र तासांचा अपव्यय होण्यात झाला.

तसेच, "ब्रिज" सॉफ्टवेअर न चालल्याने, ऑक्टोबर २००७ पासून CIPA चे कार्यान्वयन करणाऱ्या पोलिस स्टेशनामध्ये, डाटा CIPA च्या एकट्या प्रत्येकी एकाच सर्व्हरवर पडून होता व डाटाला CCIS डाटाबेसमध्ये रुपांतरीत करुन राष्ट्रीय सर्व्हरवर हस्तांतरित करता आला नाही. याच परिणाम राष्ट्रीय सर्व्हरवर संपूर्ण व संयुक्त डाटा ऑक्टोबर २००७ पासून उपलब्ध न होण्यात झाला व ऑनलाईन डाटा अन्वेषणासाठी उपलब्ध करण्याचा मुळ हेतूच विफल झाला.

ज्ञापन:

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला

राज्य गुन्हे अभिलेख केंद्र पुणे यांचेमार्फत ९ पोलीस आयुक्तालयांनी त्यांच्या अंतर्गत असणाऱ्या १२७ पोलीस ठाण्यांमध्ये सप्टेंबर २००७ पासून सीपा कार्यान्वित करण्यात आले.सदर घटकांमध्ये सप्टेंबर २००७ पासून पुढील माहिती सीसीआयएस मध्ये न भरता सीपा कार्यप्रणाली भरणेबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. तथापि, सीसीआयएस कार्यप्रणाली सन १९९८ पासून ते सप्टेंबर २००७ पर्यंतची प्रलंबित माहिती परिपूर्ण करण्यासाठी सी.सी.आय.एस. मध्ये भरण्यात येत होती.

सीपा ते सी.सी.आय.एस. व सी.सी.आय.एस. ते सीपा अशी माहिती रुपातंरीत करण्यासाठी ब्रिज सॉफ्टवेअर तयार करण्याबाबत राज्य गुन्हा अन्वेषण केंद्र (SCRB), महाराष्ट्र राज्य, पुणे मार्फत राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्र (NIC), नवी दिल्ली, मुंबई व एन.सी.आर.बी. नवी दिल्ली येथे सातत्याने पाठपुरावा केला. सन २००९ च्या मॉनिटरींग कमिटी मिटींगमध्ये देखील हा मुद्दा बऱ्याच राज्यांनी उपस्थित केला होता. पण राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्र दिल्ली यांच्या मार्फतीने परिपूर्ण असणारी कार्यप्रणाली महाराष्ट्र राज्याला अदयापपावेतो उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य गुन्हा अन्वेषण केंद्र कर्नाटक यांनी सदर ब्रीज सॉफ्टवेअरची चाचणी यशस्वी होवून अदयाप प्राप्त झाले नसल्याचे

पत्र क्र.१/HW/ सिपा/Pcw/२००८-०९, दि.२०.०३.२००९ अन्वये कळविले आहे. सदर सॉफ्टवेअरसाठी वेळोवेळी पाठपुरावा केला गेला आहे.

CIPA सॉफ्टवेअर संकल्पनेतील उणीवा :-

CIPA सॉफ्टवेअरचे विश्लेषण करतांना अनेक उणीवा निदर्शनास आल्यात ज्या खाली दर्शविल्या आहेत.

- सॉफ्टवेअर मध्ये (i) गुन्हेगाराची आणि हरवलेल्या माणसांची छाननी केलेली छायाचित्रे फिरविण्याची ; (ii) गुन्ह्याच्या सर्व स्थानिक शिर्षांची यादी स्वीकारण्याची तरतूद नव्हती ;
- PIT अधिनियमाची ठराविक कलमे, दारुबंदी अधिनियम भारतीय शस्त्र अधिनियम, इत्यादींचा पर्यायाच्या सूचीत समावेश न केल्यामुळे प्रथम माहिती अहवाल वेगळ्याच कलमांच्या खाली नोंदविले गेले किंवा तपशिलाशिवाय नोंदविले गेले ;
- अन्वेषण मॉडूल मध्ये, "अंगुली मुद्रा केंद्राकडे पाठविलेल्या अंगुली मुद्रांच्या" खाली (मुबंईतील व महाराष्ट्रातील) अंगुली मुद्रा केंद्र कार्यालयांची नांवे ड्रॉप डाऊन मेनू मध्ये पुरविलेल्या यादीत समाविष्ट केली गेली नव्हती ;
- "शुन्य" FIR हे शीर्षक चुकीने इतर पोलिस स्टेशनकडे स्थानांतरण केलेले FIR च्या ऐवजी इतर पोलिस स्टेशनमधून स्थानांतरण केलेले FIR असे नमूद गेले ज्याचा परिणाम अशी प्रकरणे डाटामध्ये न दर्शविण्यात झाला ;
- स्टेशन डायरीमधील गुन्हेगारांना अटक, मालमत्तेची जप्ती, नोंदणी या संबंधीच्या नोंदी CIPA च्या "नोंदणी", "अटक", "अभियोग" या मॉडूल करता सुध्दा आवश्यक होत्या. तथापि, CIPA मध्ये हा डाटा स्टेशन डायरीमध्ये शब्द स्वरुपात नोंदविला होता आणि त्यामुळे सर्व मॉडूल्स मध्ये वेगवेगळ्या प्रकारे संकलीत केल्या जाऊ शकला नाही. याचा परिणाम कामाच्या द्विरुक्तीत झाला ज्याने वेळ गेला ;
- "नोंदणी" मॉडूलमध्ये डाटाची नोंद स्टेशन डायरीच्या कालक्रमानुसार क्रमाप्रमाणे करणे आवश्यक होते आणि ऑपरेटरला स्टेशन डायरी क्रमांक व तारखेची नोंद करावयाची होती. तथापि, सिस्टीममध्ये पुढील क्रमांकाच्या डाटाची नोंद आधीच्या क्रमांकाच्या डाटाच्या नोंदी शिवाय शक्य होती आणि उपयोगकर्त्याला पुढील घटनांना

अभिलिखीत करण्याच्या वेळी सुटलेला डायरी क्रमांक असल्यास तो पार्श्वसूचित करत नव्हती. यामुळे जर उपयोगकर्त्यांचा अनुक्रम चुकला असेल तर त्याला उपलब्ध असलेला एकच पर्याय म्हणजे आधीचा बॅकअप पुन्हा लोड करणे आणि संपूर्ण डाटाची मागील बॅकअपच्या तारखेपासून पुन्हा नोंद करणे हा होता कारण गहाळ डाटा समाविष्ट करण्याची सुविधा नव्हती ;

- सॉफ्टवेअरमध्ये एका निश्चित कालावधीनंतर FIR स्वत: गोठविण्याची तरतूद नव्हती जी CCIS सॉफ्टवेअरमध्ये आहे जिथे FIR २४ तासानंतर आपोआप गोठविले जात होते. याने CIPA मध्ये FIR मध्ये अवांछित बदल करता येण्याची शक्यता वाढते.

ज्ञापन:

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला

पोलीस स्टेशनमधील सिपा उपयोगकर्त्यांनी सिपा कार्यप्रणालीमध्ये प्राप्त झालेल्या त्रुटीं व अन्य सुधारणाबाबत वेळोवेळी राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्र, दिल्ली यांना कळविण्यात आले होते. (जवळजवळ १०० हून अधिक मुद्दे) व त्याचा पाठपुरावा केल्यानंतरही प्रकल्प सॉफ्टवेअरमध्ये PITA दारुबंदी अधिनियम, भारतीय शस्त्र अधिनियमामधील काही कलमांचा समावेश NCRB नवी दिल्ली व NIC नवी दिल्ली यांच्या नियंत्रणाखालील विकास संस्थेने केला नाही.

शिक्षित मनुष्यबळाची अपर्याप्तता व निष्प्रभ प्रशिक्षण :-

असे दिसून आले की, पोलिस स्टेशनमध्ये प्रशिक्षित व्यक्तींची उपलब्धता फार कमी होती, CIPA चे काम फक्त पोलिस शिपायांकडूनच केले जात होते आणि वरच्या श्रेणीच्या अधिकाऱ्यांस सामिल करुन घेण्यात आले नव्हते. प्रशिक्षित पोलिसांना सुध्दा इतर पोलीस कर्तव्ये दिली जात होती. परिणामी डाटा नोंदविण्याच्या कामाला उशीर होत होता आणि डाटा नोंदविण्याचा अनुशेष परिच्छेद २.५.९.७ मध्ये भाष्य केल्याप्रमाणे पूर्ण होऊ शकला नाही.

जरी HCL कंपनीकडून प्रत्येक आयुक्तालयात रु.१८७०० प्रति व्यक्ती प्रति मास प्रमाणे एक STA एक वर्षाकरिता आणि प्रत्येक पोलिस स्टेशनकरिता रु.१३२०० प्रति व्यक्ती प्रति मास प्रमाणे एक TA सहा महिन्यांकरिता, प्रमाण कार्यालय स्वयंचलित सॉफ्टवेअर वर व CIPA सॉफ्टवेअर व प्रत्यक्ष काम करण्याचे प्रशिक्षण देण्याकरिता लावला होता. तरी असे

आढळून आले की, पोलिस स्टेशनचे अधिकारी तांत्रिक आधाराशिवाय CIPA हाताळू शकत नव्हते कारण STA/TA यांनी एकतर प्रशिक्षण दिले नव्हते किंवा अपूर्ण प्रशिक्षण दिले होते.

विभागाला सेवेचा वापर करण्यात अपयश आले आणि चाचणी तपासणी केलेल्या सहा (मुंबई रेल्वे, नागपूर, नाशिक, नवी मुंबई, पुणे व ठाणे) आयुक्तालयांत व ३१ पोलिस स्टेशनमध्ये STA/TA यांच्या सेवेचा वापर करण्यासाठी केलेला रु ३८.०२ लाखाचा खर्च बहुतांशी निष्फळ राहिला.

ज्ञापन:

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला

सिपा प्रकल्प अंमलबजावणी झालेल्या सर्व पोलीस ठाण्यांमधील किमान १ अधिकारी व ५ पोलीस कर्मचारी यांना सिपाचे कामकाजासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत सुचना होत्या. सदर पोलीस कर्मचाऱ्यांना सिपा कार्यप्रणालीबाबत प्रशिक्षण देण्यात आले. पोलीस ठाण्यांमधील अपु-या मनुष्यबळामुळे व दैनंदिन महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांमुळे, किमान २ किंवा ३ कर्मचारी सिपासाठी उपलब्ध होते. हस्तलिखित कार्यप्रणाली व अभिलेखाचे संगणकीकरण अस्तित्वात असताना मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ लेखी कार्यासाठी वापरण्यात आले.

वरिष्ठ तांत्रिक सहायकाची पोलीस मुख्यालयात व तांत्रिक सहायकाची प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये नियुक्ती राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्र, नवी दिल्ली मार्फत करण्यात आली. सततच्या होणाऱ्या बदलामुळे कर्मचारी बदलून नविन येणारा प्रशिक्षित होईतोवर सिपा कामावर परिणाम झाला आहे. संगणक कार्यासाठी वेगळा कर्मचारी वर्ग निर्माण करण्यात आलेला नाही.

राज्यात CCIS डाटाचा वापर न होणे :-

राज्य गुन्हा अभिलेख केंद्र, पुणे यांनी सर्व जिल्हा गुन्हा अभिलेख केंद्रांना अन्वेषणाकरिता आणि इतर संबंधित कारणांकरिता CCIS च्या NCRB, वेबसाईट वरील देशव्यापी डाटाची जेंव्हा जेंव्हा आवश्यकता भासेल तेव्हा उपयोग करण्याकरिता कळविले (जानेवारी २००६) आणि प्रत्येक जिल्हा गुन्हा अभिलेख केंद्रांना उपयोगकर्ता आय.डी. आणि पासवर्ड दिला. पोलिस स्टेशन त्या त्या जिल्हा गुन्हा अभिलेख केंद्राकडे देशभरच्या डाटा करिता जाऊ शकत होते.

असे दिसून आले की जानेवारी २००६ ते डिसेंबर २००८ या दरम्यान चाचणी तपासणी केलेल्या जिल्हा गुन्हा अभिलेख केंद्राच्या बाबतीत राष्ट्रीय गुन्हा अभिलेख केंद्राच्या वेब

साईटवर नोंदल्या गेलेल्या हिटस ची संख्या फक्त ५४६ ते ६०६ च्या दरम्यान होती, जी डाटाचा अत्यंत कमी वापर दर्शविते. असेही दिसून आले की, निवडलेल्या जिल्हा गुन्हा अभिलेख केंद्रामध्ये अन्वेषण करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून, इतर कायदा जारी करणाऱ्या प्राधिकाऱ्यांकडून आणि संबंधित संघटनांकडून आलेल्या विनंत्यांचे संनियत्रण करण्यासाठी व त्यावर माहिती पुरविण्यासाठी काहीही नोंदवह्या ठेवल्या नव्हत्या. शिवाय राष्ट्रीय गुन्हा अभिलेख केंद्राच्या सर्व्हरवर परिच्छेद २.५.९.६ मध्ये भाष्य केल्याप्रमाणे परीपूर्ण व चांगल्या प्रतिची माहिती उपलब्ध नव्हती.

जिल्हा गुन्हा अभिलेख केंद्रांनी उत्तर दिले की भविष्यात CCIS डाटा बेस परिणामकारक रीतीने वापरले जाईल.

यावरुन हे स्पष्ट झाले की CCIS डाटा बेस परिणामकारक रित्या वापरला गेला नाही त्यामुळे, ज्या करीता १९९८ पासून डाटा बेस निर्मिती झाली तो हेतूच विफल झाला.

ज्ञापन:

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला

जिल्हास्तरावर CCIS माहितीचा उपयोग गुन्हे उघडकीस आणणेकामी, पारपत्र आणि चारित्र्य पडताळणी, चोरी झालेल्या व प्राप्त झालेल्या वाहनांच्या माहितीसाठी करण्यात आला. औरंगाबाद शहर, नागपूर शहर, कोल्हापूर जिल्हा घटकांमध्ये मोठया प्रमाणावर वापर केला गेला. CCIS ची माहिती परिपुर्ण नसल्याकारणाने तसेच सर्व गुन्हयांची माहिती राष्ट्रीय गुन्हे संशोधन केंद्रात उपलब्ध नसल्यामुळे सदर केंद्रातील माहितीसाठी कमी प्रमाणात संपर्क करण्यात आला. तसेच जिल्हा पोलीस घटकांमध्ये व पोलीस ठाण्यांमध्ये इंटरनेटची जोडणी उपलब्ध केली असून त्यांना युझर आयडी व पासवर्ड देण्यात आला आहे. सर्व तपास अधिकाऱ्यांना सी.सी.आय.आय एस कार्यप्रणालीवरील माहिती वापरण्याबाबत जाणीव करुन देण्यात आली आहे. घटकांना त्यांचे अंतर्गत सर्व पोलीस स्टेशनकडील सिपाचा डाटा एकत्रित करुन ठेवण्याच्या व त्याचा बॅकअप ठेवण्याचे आदेश व सुचना देण्यात आलेल्या आहेत.

CIPA ची नवीनतम आवृत्ती न वापरणे :-

CIPA ची नवीनतम आवृत्ती (१.१६ b) प्रकाशित झाली (डिसेंबर २००८). तथापि, असे दिसून आले की चाचणी तपासणी केलेल्या पोलिस स्टेशन CIPA सॉफ्टवेअर ची जुनी आवृत्ती १.११/१.१४, नवीनतम आवृत्तीतील विविध समस्यांमुळे वापरीत होते (जानेवारी-मार्च २००९).

राष्ट्रीय माहिती केंद्र/विभागाने CIPA सॉफ्टवेअरची आवृत्ती अद्ययावत करताना अपूरी चाचणी आणि स्वीकृती प्रक्रिया वापरली होती, असे यावरुन निदर्शनास येते.

ज्ञापन:

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला

सिपा कार्यप्रणालीची नविन आवृत्ती राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्र, नवी दिल्लीद्वारे प्रसारीत केली जाते. बऱ्याचवेळा जिल्हा घटकांकडून नविन आवृत्तीमध्ये बऱ्याच त्रुटींचे निराकरण झालेले नसल्याचे कळविण्यात येते. नविन आवृत्तीमधील दोष एन.आय.सी.नवी दिल्ली यांना कळविले आहे.

गुन्हेगारांविषयी प्राणभूत माहिती गहाळ :-

CCIS मध्ये गुन्हेगाराची ओळख साठविण्याची तरतूद होती पण छायाचित्रे किंवा अंगुलीमुद्रा ज्या जास्त तंतोतत आणि असाधारण ओळख असतात, त्यांच्या साठवणाची तरतूद नव्हती. जरी CIPA सॉफ्टवेअर छायाचित्रे / अंगुलीमुद्रा साठवण्याच्या तरतूदी सह विकसित केले गेले होते तरीही मुंबई रेल्वे पोलिस स्टेशन वगळता कुठल्याही CIPA चे कार्यान्वयन करणाऱ्या पोलिस स्टेशनने डाटाबेसमध्ये ते संकलीत केले नाही.

ज्ञापन:

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला

मुंबई रेल्वेकडे प्रगत व प्रशिक्षित कर्मचारी वर्ग होते तसे प्रगत प्रशिक्षण असणारे कर्मचारी इतर घटकात उपलब्ध नव्हते. प्रकल्पात इमेजच्या कामांचे प्रगत प्रशिक्षण व्यवस्था नसल्याने घटकात प्रगत कामांचे कर्मचारी उपलब्ध नव्हते.

साक्ष :

सन २००८-२००९ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.२.५ या "पोलीस विभागातील संगणकीकरण"या संदर्भात समिती दिनांक १२ जून,२०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. सदर बैठकीत पोलीस खात्याच्या संगणकीकरणासंदर्भात माहिती देतांना विभागीय सचिवांनी समितीस पुढील माहिती दिली.

राज्यामध्ये एकूण १०५४ पोलीस स्टेशन्स आहेत. १९९० मध्ये केंद्र शासनाने पोलीस स्टेशनचे संगणकीकरण करण्यासंदर्भातील प्रकल्प सुरु केला होता. पोलीस स्टेशनचे संगणकीकरण हा प्रकल्प पूर्णत: केंद्र शासनाचा असून यामध्ये राज्य शासनाचा कोणताही

सहभाग नाही. केंद्र शासनाने अद्यापपावेतो ३५८ पोलीस स्टेशन्सचे संगणकीकरण केलेले आहे उर्वरित पोलीस स्टेशन्सचे संगणकीकरण आता कोअर ॲप्लिकेशन सॉफ्टवेअरच्या माध्यमातून करणे आवश्यक आहे. केंद्र शासनाच्या प्रकल्पाच्या माध्यमातून आतापर्यंत एकूण ३५८ पोलीस स्टेशन्समध्ये ०४ संगणक संच व एक सर्व्हर देण्यात आलेला आहे. हवालदार, एपीआय, पीआय, स्टेशन डायरी मेंटेन करणा-या एस.आय. यांच्या टेबलवर संगणक संच पुरविण्यात आलेला आहे. या संगणकामध्ये अपलोड करण्यात आलेल्या आज्ञाप्रणालीमध्ये असंख्य चुका असल्यामुळे हे संगणक प्रणाली एकूण २० वेळा अपग्रेड करावी लागली होती. संगणकीकरण हे तीन फेजमध्ये करण्यात आले होते. सीसीआयएस, सीआयपीए, सीसीटीएनएस अशा प्रकारची तीन आज्ञाप्रणालीमध्ये पोलीस स्टेशनच्या संगणकीकरणाचे काम करण्यात आले होते. सीसीटीएनएस म्हणजे सेंट्रल क्राईम ट्रॅकिंग ॲण्ड नेटवर्किंग सॉफ्टवेअर होय.

आज्ञाप्रणाली तयार करणारी संस्थेची नेमणूक केंद्र शासनाने करुन राज्यामध्ये पाठविलेली आहे. जिल्हा मुख्यालयामध्येही बराच डेटा आहे हा सर्व डेटा आता नवीन सीसीटीएनएस आज्ञावलीमध्ये एकत्रितपणे अपलोड करण्याचे काम ६० टक्क्यांपर्यंत पूर्ण झालेले असून सर्व्हरमध्ये मिनिमम डेटा स्टेटस दिसेल, अशीही व्यवस्था करण्यात आलेली आहे. प्रत्येक जिल्हयातील संपूर्ण तालुक्यातील एफआयआर स्टेशन डायरी व इतर गुन्हे अन्वेषण विषयक सर्व माहिती एकत्रितपणे एकाच आज्ञावलीमध्ये समाविष्ट करण्यासंदर्भातील प्रकल्पाचे कामही आता साठ टक्क्यांपर्यंत आलेले आहे. ही सर्व माहिती एका साईटवर टाकण्यासंदर्भातील काम ८० टक्के पूर्ण झालेले आहे. या साईट्सचे इन्स्पेक्शनही झालेले आहे. या कामाकरिता ४०० ते ५०० कोटी रुपये खर्च आलेला आहे. ६०० ऑफिसेसकरिता १६५० साईट्सचे काम सुरु करण्यात आलेले आहे. या साईट्सचे काम शेवटच्या टप्प्यात आल्यानंतर ही साईट लॉंच करण्यासंदर्भात आमच्या बीएसएनएलशी वाटाघाटा सुरु आहेत. बीएसएनएल अधिका-यांसमवेत बैठकी घेऊन हे कामही येत्या चार ते सहा महिन्यांमध्ये पूर्ण होईल, अशी आशा आहे.

३५८ पोलीस स्टेशन व्यतिरिक्त ज्या पोलीस स्टेशन्समध्ये संगणकीकरण झालेले नाही. त्या पोलीस स्टेशन्सला व्ही-सेट लावून कोअ्र ॲप्लिकेशन सॉफ्टवेअरच्या माध्यमातून जोडण्यात येणार आहे. तसेच, केंद्र शासनाच्या प्रकल्पातील काही सूचनांच्या अनुषंगाने

निरनिराळया राज्यातील महत्वाची पोलीस स्टेशन्स देखील संगणक साईट व आज्ञावलीच्या माध्यमातून जोडण्याचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. जरी सर्व राज्यातील कायदे हे वेगवेगळे असतात तरीही आयपीसी आणि सीआरपीसी हे सर्व राज्यांमध्ये कॉमनच असतात. असे केल्यांनतर साईट व आज्ञावलीमध्ये सर्व माहिती व कायदे यांची माहिती आवश्यकतेप्रमाणे कस्टमाईज करण्याची सोय असणार आहे. या कोअर ॲप्लिकेशन आज्ञावलीचे काम विप्रो या कंपनीला दिलेले आहे. तसेच, पीडब्ल्यूसी ही कंपनी यावर देखरेख करणार आहे. मागील आज्ञावलींचे काम व त्यांचे नियमन यामध्ये काही चूक होणार नाही, याची काळजी पीडब्ल्यूसी हे स्टेपवाईज घेणार आहे. पीडब्ल्यूसी ही कंपनी अतिशय हळूहळू स्टेपवाईज काम करणार आहे. प्रत्येक आठवडयाला त्यांची एक आढावा बैठक होईल या बैठकीमध्ये आज्ञावलीच्या कामाअंतर्गत काही अडचणी तर नाहीत ना हे पाहण्यात येणार आहे.

या नवीन सीसीटीएनएस या सॉफ्टवेअरमध्ये जुने सीसीआयएस व सीआयपीए यांचा डेटाही फीड करण्यात येणार आहे. पहिल्या दोन आज्ञावलीतील तीन लाख डेटा युनिट्स निरनिराळया जिल्हयातील आता नवीन आज्ञावलीमध्ये स्थलांतरीत करण्यात येणार आहेत. या डेटा स्थलांतरणाचे काम आता ६५ टक्के पूर्ण झालेले आहे.

विभागीय सचिवांनी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने पुढे अशी विचारणा केली की, सीआयपीए ही यंत्रणा संबंधित अधिका-यांनी सांगितल्याप्रमाणे खऱ्या अर्थाने पूर्णत: कार्यान्वित झालेली नाही या यंत्रणेमध्ये अनेक वेळा अपग्रेडेशन करण्यात आलेले आहे. यामुळे सीआयपीए ही यंत्रणा कार्यक्षम नाही. आता यामुळे सीआयपीएची आवश्यकता भासणार नाही, असे म्हणावयाचे आहे का ?यावर खुलासा करताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की,सीआयपीएमध्ये ज्या केसेस, एफआयआर,स्टेशन डायरी नोट फीड केलेल्या आहेत, त्या सर्वप्रथम नवीन आज्ञावलीमध्ये स्थलांतरीत करण्यात येणार आहेत. परंतु तुर्तास काही दिवस सीआयपीए अशासाठी वापरणार आहेत की, ज्या केसेस त्यामध्ये पूर्वीच फीड केलेल्या आहेत, त्या निकाली निघणे आवश्यक आहेत. तसेच, काही गुन्हयांअतर्गत अद्याप पावेतो चार्जशीट दाखल झालेली नाही. केसवाईज आवश्यकतेप्रमाणे कारवाईमध्ये सोयीस्कर प्रगती दिसून आल्यानंतर हाती आलेला डेटा स्थलांतर करणे अधिक सुकर होईल, असे आम्हाला वाटते. सीआयपीए मोडयुलमध्ये काम करण्याकरिता प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये एक डेटा एन्ट्री

ऑपरेटर व गाईड असिस्टंट दिलेला आहे. तसेच, दहा पोलीस स्टेशनला मिळून एक सुपरवायजरी गाईड असिस्टंट नेमलेला आहे.

सिपा ही आज्ञावली जर कार्यक्षम नसेल तर भविष्यामध्ये केंद्र शासनाने या आज्ञावलीला रद्दबातल केले तर योग्य होईल, असे त्यांनी वीस वेळा अपग्रेडेशन केल्यामुळे समितीस वाटत आहे. गुन्हयांचा शोध लावतांना माहितीची आवश्यकता भासल्यास चुकीची माहिती व माहिती कार्यान्वित करण्यामध्ये चुका करीत असलेल्या या आज्ञावलीमुळे पोलिसांना त्रास होऊ शकतो. सिपा ही यंत्रणा परिपूर्ण नसून त्यामध्ये कमतरता आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सीसीआयएस, सीआयपीए,सीसीटीएनएस या तिनही आज्ञावल्या केंद्र शासनाच्या आहेत. पहिल्या दोन आज्ञावल्यांच्या वेळी त्यातील चुका लवकर लक्षात आल्या नव्हत्या अशी माहिती समितीस दिली.

विभागीय सचिवांनी केलेल्या खुलाशानुषंगाने महालेखाकार यांनी असे मत व्यक्त केले की, पूर्वीच्या सीसीआयएस,सीआयपीए या प्रणालीमध्ये लोअर लेव्हल डेटा एन्ट्री स्टाफचा समावेश आहे. सुपरवायजर्सने यामध्ये फारसे लक्ष न घातल्यामुळे चुका होऊन वीस वेळा अपग्रेडेशन करावे लागले होते. यामध्ये झालेल्या चुका या डेटा अनॅलिसिसमध्ये लक्षात आल्या होत्या या चुकांमध्ये माहिती फीड करतांनाही चुका आढळून आलेल्या आहेत. या माध्यमातून आपण चुकीचा डेटा हा मायग्रेट करणार आहात का ? नवीन आज्ञावलीमध्ये चुकीचा डेटा स्थलांतरित होऊ नये, याकरिता आपण कोणत्या प्रकारची काळजी घेतलेली आहे ? पूर्वीचा डेटा मायग्रेट करतांना तो आधी व्हॅलिड करणे आवश्यक आहे. चुकीची आज्ञावलीकरिता मॅनपॉवर व मॅन अवर वाया गेलेले आहेत, याकरिता केंद्र शासनाने काय केलेले आहे. क्वांटमली या मॅनपॉवरचे व मॅनअवरचे पैशात मोजमाप होऊ शकत नाही. स्किल मॅनपॉवर चुकीच्या आज्ञावलीवर काम केल्यामुळे वाया गेलेली आहे. सीसीआयएस आणि सीसीआयपीए या दोन पूर्वीच्या आज्ञावल्यांवर ज्या लोकांनी काम केले, त्यांचे मॅन अवर वाया गेलेले आहे. याकरिता विभाग काय करणार आहे अशीही विचारणा महालेखाकार यांनी विभागाकडे केली.

महालेखाकारांच्या मुद्दयाच्या अनुषंगाने विभागीय सचिवांनी खुलासा करताना सांगितले की, सीसीआयएस आणि सीआयपीए या दोन चुकीच्या आज्ञावल्यांमध्ये त्या त्या वेळेनुसार आवश्यकतेप्रमाणे दुरुस्त्या करुन कामे केलेली आहेत. त्या त्या वेळी त्यामधील दुरुस्तींमुळे कामे पार पडलेली आहेत. त्या आज्ञावल्यांवर काम करणा-या मॅनपॉवरचे व मॅन अवर्सचा

त्यावेळी उपयोग झालाच होता. त्या त्या वेळेची कामे त्याच आज्ञावल्यांनी पार पाडून नेलेली आहेत. ३५८ पोलीस स्टेशन व्यतिरिक्त संगणकीकरण झालेले नाही. त्या ठिकाणी नवीन सुधारित आज्ञावली अपलोड करण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या प्रकल्पाप्रमाणे प्रत्येक राज्यामधील प्रत्येक पोलीस स्टेशनला जोडण्याकरिता कोअर ॲप्लिकेशन सॉफ्टवेअरची मदत होणार आहे. या माध्यमातून प्रत्येक राज्यातील प्रत्येक पोलीस स्टेशन येथे कार्यान्वित असलेल्या आज्ञावल्यांमध्ये दुरुस्त्या करण्यात येणार आहेत. तसेच, पूर्वीच्या आज्ञावलींमध्ये असलेला डेटा हा प्रोसेस व दुरुस्त करुनच नवीन आज्ञावलीमध्ये फीड करण्यात येणार आहे.

याअनुषंगाने अपर मुख्य सचिव यांनी सांगितले की, पूर्वीच्या दोन आज्ञावल्यांवर काम करणा-या मॅनपॉवर व मॅन अवर्सवर पूर्णपणे केंद्र शासनाचे नियंत्रण होते. त्यामध्ये राज्य शासनाचा काहीही संबंध नाही. अंतर्गत सुरक्षेसंदर्भात आंतरराज्य कॉन्फरन्स झाली त्यात महाराष्ट्र राज्याचे कौतुक झाले. परंतु कर्नाटक या राज्यानंतर समाधानकारक प्रगती असलेल्या राज्यांमध्ये प्राधान्याने महाराष्ट्र राज्याचा समावेश आहे. राज्यामध्ये आज्ञावल्या कार्यान्वित करण्याचे काम प्राधान्याने चालू आहे या संदर्भातील पुरावा म्हणून एक प्रत विभागाकडे आहे. सीसीएनटीएस ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर वर्किंग रिझल्टची कॉपी विभागाकडे आहे. या आज्ञावलीच्या कार्याचे दर आठवडयातून एकदा इंटर्नल इव्हॅल्युएशन होते. तसेच, डी.जी. लेव्हलवर दर तीन महिन्यातून एकदा इंटर्नल सिक्युरिटी सॉफ्टवेअर वर्किंग इव्हॅल्युएशन बैठक होते. या बैठकांमध्ये अनेक लुप्सवर चर्चा होऊन सुधारणेची कारवाई करण्यात येते.

या मुद्दयाच्या अनुषंगाने पोलीस महासंचालकांनीही समितीस आणखी अशी माहिती दिली की, सीसीटीएनएस हा एक पायलट प्रोजेक्ट आहे या प्रोजेक्टमध्ये जुन्या आज्ञावलीतील डेटा सुपरवायजरी ऑथॉरिटींच्या सहकार्याने सर्व जुना डेटा व्हॅलिड करुनच स्थलांतरीत (Migrate) अथवा बदली (Transfer) करण्यात येत आहे. जुने सॉफ्टवेअर्सही पूर्णपणे चुकीचे नव्हते, त्यामध्ये काही त्रूटी होत्या,त्यामुळे ते अपग्रेड करावे लागले होते. जर एखादी बाब पूर्णपणे चुकीची असेल तर संपूर्ण आऊटपूटच चुकीचे निघेल परंतु तसे झाले नव्हते. या अंतर्गत सुरक्षेसंदर्भात दर महिन्याला डीजी पातळीवर आढावा घेतला जातो. तसेच, दर तीन महिन्याला शासन स्तरावर आढावा घेतला जातो. नवीन आज्ञावलीचे काम

आता साठ ते ऐंशी टक्क्यांपर्यंत पूर्ण होत आलेले आहे हा पायलट प्रोजेक्ट असून या आज्ञावलीचे काम समाधानकारक आहे.

आंतरराज्य सीएम कॉन्फरन्समध्ये अंतर्गत सुरक्षेबाबत (इंटर्नल सिक्योरिटीबद्दल) कर्नाटक राज्यानंतर समाधानकारक प्रगती असलेल्या राज्यांमध्ये महाराष्ट्र राज्याचे नाव घेतले जाते. महाराष्ट्र राज्याच्या अंतर्गत सुरक्षिततेची समीक्षा ही समाधनकारक व सकारात्मक आहे, हीच बाब विभागाच्या प्रयत्नांची पावती आहे. ज्यावेळी ही सर्व यंत्रणा काम करेल तेव्हा आपल्या राज्याचा प्रगतीचा आलेख निश्चितच उंचावलेला असेल, याची विभागाला खात्री आहे. कर्नाटक राज्याच्या इंटर्नल सिक्युरिटीचा अभ्यास करण्याकरिता आता काही जण अभ्यास दौ-याला जाणार आहेत. कर्नाटक राज्याच्या दौ-यानंतर सुरक्षिततेसंदर्भात महाराष्ट्रामध्येही चांगल्या दर्जाचे सकारात्मक प्रयत्न करण्यात येतील असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

कर्नाटक राज्यामध्ये अद्याप जर कोणीही जाऊन आलेले नसेल तर कृपया सर्व टीमने कर्नाटक राज्यामध्ये जाऊन तेथील सिक्युरिटी व्यवस्थेचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे, असे मत समितीने यावेळी व्यक्त केले.तसेच कर्नाटक येथे किती काम केले आहे याची पहाणी करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची टीम गेली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

याठिकाणी केंद्र शासनाची टीम आल्यानंतर त्यांनी पुणे येथे या संबंधातील कार्यक्रम पाहिला आणि त्याबाबत समाधान व्यक्त केले. पण असे असले तरी सुध्दा आपण अजून मागे आहोत असे वाटते. याबाबतीत कर्नाटक राज्याने ज्या गोष्टी केल्या आहेत, तशा प्रकारे आपण करावयास पाहिजे. पण तत्पूर्वी आपण एक टीम तयार करुन त्यांना तेथे पहाणी करण्यासाठी पाठविले पाहिजे. जेणेकरुन संबंधितांना माहिती मिळू शकेल आणि त्यातून फायदा देखील होईल असे अपर मुख्य सचिव यांनी समितीस सांगितले.

सर्व पोलीस दलाला कॉम्प्युटर देण्याचा प्रोग्रॅम वेगळ्या पध्दतीने अवलंबिण्यात यावयास पाहिजे. पोलीस दलातील हवालदार पासून तेथे काम करणाऱ्या सर्वांना कॉम्प्युटर वापरता आला पाहिजे. सध्या पोलीस स्टेशनमध्ये जाऊन तक्रारी कराव्या लागतात, त्याऐवजी कॉम्प्युटरच्या माध्यमातून पी.आय.,सी.पी. यांच्या पर्यंत तक्रारी पाठविल्या पाहिजेत. मात्र याकरता कॉम्प्युटर कसा ऑपरेट करावयाचा हे समजले पाहिजे. आज कॉम्प्युटरचा वापर करणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे दिवसातील एखादा तास कॉप्युटरचे प्रशिक्षण

घेण्यासाठी ठेवला पाहिजे. तसेच अनेक एन.जी.ओ.असून त्यांचा पोलीस विभागाशी संबंध येत असतो. त्यामुळे त्यांना ट्रेनिंग देण्यासाठी बोलविण्यात यावे किंवा कदाचित ते त्यांच्या इन्स्टीट्युट मध्ये देखील पैसे न घेता ट्रेनिंग देऊ शकतील. पोलीस विभाग या सर्व गोष्टींशी जेवढा समरस होईल, तेवढे काम चांगले होईल. जेणेकरुन लोकांना कॉप्युटरवरुन तक्रार दाखल करता आली पाहिजे. या अनुषंगाने संबंधितांना ट्रेनिंग देण्यासाठी प्रोग्रॅम आखून तेथील स्टाफ अलर्ट आणि एक्सपर्ट व्हावयास पाहिजे. यासाठी विभागाकडून कोणत्या उपाययोजना आखण्यात येणार आहेत याची समितीला माहिती देण्यात यावी असे निदेश समितीने विभागास दिले.तसेच केंद्र शासनाकडून जो निधी उपलब्ध होता त्यातून काही ना काही बजेटेड खर्च केला पाहिजे असेही विभागास सांगितले.

महाराष्ट्र पोलिसांची वेबसाइट आहे काय ? या समितीच्या प्रश्नाला महाराष्ट्र पोलीसांची वेबसाइट असून सदरहू वेबसाइट अपडेट केली जाते. तसेच महाराष्ट्रातील बहुतांश ठिकाणी वेबसाइट आहेत परंतु प्रत्येक ठिकाणी नाही असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर केला.

सर्व ठिकाणी वेबसाईट असली पाहिजे. याबाबतीत सर्व एस.पी.यांना लेखी स्वरुपात कळविण्यात यावे की, सध्या ज्या वेबसाईट आहेत त्यातील माहिती देण्यात यावी आणि जर काही ठिकाणी वेबसाईट नसेल ती सुरु करण्याच्या बाबतीत पाठपुरावा करुन त्याबाबत समितीला माहिती देण्यात यावी असे निदेश देत गुन्हेगारांना सोडणे सुलभ व्हावे यासाठी ते राज्य शासनाच्या माध्यमातून पोलीस विभागाला मिळालेले असतात. महाराष्ट्रापुरता किंवा मुंबईपुरता विचार करावयाचा झाला तर सीपा ही टेक्नॉलॉजी तेवढी वाईट नाही. पण गुन्हेगारांना गुन्ह्यातून सुटण्यासाठी याचा फायदा झाला आहे काय ? तसेच गुन्हेगारांना पकडण्याच्या बाबतीत या टेक्नॉलॉजीमुळे प्रगती झाली आहे काय ? ते पाहिले पाहिजे असेही मत समितीने व्यक्त केले .

समितीने ज्या सूचना केल्या आहेत, त्याबद्दल बोर्ड नक्कीच विचार करील. श्री.संजय वर्मा, आय.जी. हे एक सिनिअर अधिकारी आहेत. त्यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. पूर्वी श्रीमती बोरवणकर होत्या आणि त्या देखील कर्नाटकमध्ये जाऊन आलेल्या आहेत आणि त्यांनी देखील सुधारणा केल्या आहेत. सीसी-टी.व्ही.च्या ट्रेनिंगसाठी महाराष्ट्रातून १५-२० हजार लोकांना ट्रेनिंगसाठी पाठविले पाहिजे. तसेच जिल्ह्याच्या ठिकाणी आणि पुणे

ग्रामीण येथे समिती भेट देऊन पाहू शकते. आता इतर जिल्ह्यांमध्येही कॉम्प्युटर पोहोचत आहेत. पण सॉफ्टवेअर मध्ये काही उणिवा दिसून आल्या असून त्याची दुरुस्ती सुरु आहे. तसेच एन.सी.आर.टी.यांनी जे टारगेट दिले आहे त्यापेक्षा ते पुढे आहेत. पण याचा पुरेपूर उपयोग झालाच नाही. दिनांक १-१-१९९८ ला सीसी-आय चा प्रोजेक्ट सुरु झाला होता तेव्हा त्याची माहिती पूर्णपणे इंग्रजीमध्ये होती. याच्या फेल्युअरचे कारण म्हणजे राज्याचे जे कायदे आहेत, ते त्यामध्ये घालण्यात आले नव्हते. या राज्याचे काम आणि इतर राज्यांचे काम हे तेथील जी बोलीभाषा आहे, त्यानुसार होत असते. त्यामुळे यासाठी डाटा-क्रमांक पाठवावयाचा होता. नंतर २००५ मध्ये त्याचे मराठी भाषांतर करण्यात आले आणि अजूनही ते तसेच सुरु आहे. तसेच आपण सीपा प्रोजेक्ट हा पायलट प्रोजेक्ट म्हणून लाँच केला होता. परंतु त्यामध्येही काही उणीवा राहिल्या होत्या. चार-पाच कॉम्प्युटर मधील जे प्रोग्रॅम आहेत ते सर्व एकत्रित करण्याचा तो प्रयत्न होता. आज सुध्दा संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सी.सी.एस.सुरु आहे आणि त्यामध्ये क्राईमच्या संबंधातील संपूर्ण डाटा घालण्यात येत आहे असा खुलासा अपर पोलीस महासंचालकांनी केला.

क्राईमच्या संबंधातील संपूर्ण माहिती मराठी भाषेमध्ये भरली पाहिजे. तसेच आता गुन्हे करणारे लोक कोणत्या भागातील आहेत यासंबंधातील माहिती जर वेबसाईटवर टाकली तर सर्व जिल्ह्यातील लोकांपर्यंत ती पोहोचते आणि त्यानुसार सदरहू वेबसाईटवर डाटा भरण्यात आला आहे. त्यामुळे याचा काहीच वापर होत नाही असे नाही तर सर्व जिल्ह्यांमध्ये वापर होत आहे अशी माहिती समितीने विभागास दिली.

याबाबतीत जो डाटा तयार केला आहे, त्याचा वापर होतो की नाही असा मुद्दा उपस्थित करण्यात आला. आतापर्यंत कॅरेक्टर व्हेरीफीकेशनसाठी, पासपोर्टच्या व्हेरीफीकेशनसाठी डाटा रन् करतो. जर अशा वेळी एखादा अधिकारी आला तर त्याचे सर्व रेकॉर्ड पाहतो आणि त्यामध्ये जास्त वेळ जात होता पण आता सर्व संगणकीकरण झालेले आहे. पण गुन्हेगाराच्या बाबतीत तसे नाही, त्यांच्या बाबतीत सर्च करुन पाहिले पाहिजे. अशा वेळी स्क्रीप्ट पाठवून त्यांच्या बाबत माहिती घेतो असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या सर्व टेक्नॉलॉजीचा उद्देश असा आहे की, या राज्यातील, देशातील गुन्हेगारी कमी व्हावी किंवा गुन्हेगारांनी गुन्हा केला तर त्यांना तातडीने पकडता यावे पण यापूर्वी दुर्दैवाने

दोन गुन्हे घडले आहेत. गुन्हेगारांना पकडण्यासाठी बेसिक वातावरण निर्माण व्हावे म्हणून मुंबईत सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्यात आले पण मुंबईमध्ये दादर रेल्वे स्टेशनवर आईजवळ झोपलेल्या मुलाला कसे उचलून नेले हे सर्व जगाने पाहिले आहे तसेच कु.प्रिती राठीवर एका मुलाने ॲसिड टाकले. पण पोलिसांना सदरहू गुन्हेगार लागलीच मिळाला नाही. त्यामुळे पोलीस खात्याबद्दल संभ्रम निर्माण झाला आहे.

सीसीआयएस व सिपामध्ये फोटोग्राफ अपलोड करण्याची तरतूद होती. पण ती अयशस्वी झाली. फोटो स्कॅन करण्यासाठी पाठविला होता पण ती प्रक्रिया यशस्वी झाली नाही. पण सी-सी टी.व्ही.मध्ये ती नोंद झाली असेल. विभाग मागील १४-१५ वर्षाचा डेटा वापरत आहोत. एखाद्या माणसाचे नाव गुन्हेगार म्हणून समोर आल्यानंतर त्याचा इतिहास काय आहे, त्या व्यक्तीला दुसऱ्या गुन्ह्यामध्ये अटक झाली होती काय हे पाहिले जाते.त्यानुसार सीसी-टी.व्ही. मध्ये त्याचा फोटो अपलोड करण्यात येतो. तसे झाले तर आम्ही गुन्हेगारांना पकडू शकतो असे स्पष्टीकरण अपर पोलीस महासंचालकांनी समितीस दिले.

पासपोर्ट व्हेरिफिकेशन संदर्भात प्रकरण आले तर त्यासंदर्भातील व्हेरिफिकेशन आठ ते दहा दिवसात करुन ते पुढील प्रक्रियेसाठी गेले पाहिजे. पासपोर्ट व्हेरिफकेशन संदर्भात पोलीस स्टेशन्सना टाईम बाऊन्ड प्रोग्राम ठरवून दिला पाहिजे. संबंधित व्यक्तींचे वेळेवर पासपोर्टचे व्हेरिफिकेशन होत नसल्यामुळे करप्शनमध्ये वाढ होते. सगळया प्रकारची चौकशी होऊनच पासपोर्टचे व्हेरिफिकेशन झाले पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले. पोलीस स्टेशनच्या संगणकांमध्ये गुन्हेगारांचा अद्ययावत डाटा ठेवला जात नाही. सर्व पोलीस स्टेशन्समध्ये गुन्हेगांरांचा अद्ययावत डाटा तयार करुन ठेवला पाहिजे असेही समितीने विभागास सूचित केले.

विभागाकडे पोलीस रेकॉर्ड ठेवण्याची काय पध्दत आहे याकरिता कोणते सॉफ्टवेअर वापरण्यात येते? अशी विचारणा समितीने केली असता त्यावर सॉप्टवेअरमध्ये सी.सी.आय.एस आणि सी.आय.पी.ए अशा दोन प्रकारची सिस्टीम आहे तसेच हे सॉफ्टवेअर NCRB ने उपलब्ध करुन दिले असल्याचेही माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

राज्यात अनेक जेल्स आहेत. त्यात वेगवेगळया गुन्हयांचे कैदी शिक्षा भोगत आहेत. त्या गुन्हेगांराचा डाटा उपलब्ध असतो. गुन्हेगार जेलमध्ये आल्यानंतर त्या गुन्हेगाराचा फोटो काढला जातो, त्याच्याकडून फॉर्म भरुन घेतला जातो, त्याच्या अंगठयाचे ठसे घेतले जातात.

ते गुन्हेगार वर्षानुवर्षे जेलमध्ये राहतात. त्या गुन्हेगारांचा डाटा विभागाकडे उपलब्ध आहे काय ? या समितीच्या प्रश्नावर डाटा ठेवण्याचे काम आता सुरु केले असून हे काम याच वर्षापासून सुरु केले असल्याचे समितीस अवगत करण्यात आले.

युआयडी कार्ड काढतांना प्रत्येक व्यक्तींचे फिंगरप्रिंट घेतले जातात. तसेच इतर सर्व माहिती भरुन घेतली जाते. गुन्हेगारांची पार्श्वभूमी शोधताना युआयडी कार्डचा फायदा होतो काय ?अशी विचारणा समितीने केली असता फेशियल रेक्गनिशन सॉफ्टवेअर अजून प्रोक्यूअर केलेले नाही. मुंबई शहरात सीसीटीव्ही बसविण्यात आले असून देखील फेशियल रेक्गनिशन सॉफ्टवेअर नसल्यामुळे सीसीटीएनएसमध्ये गुन्हेगारांचे चेहरे मॅच करण्यासाठी तरतूद नाही. सीसीटीव्हीतील चेहरे व पोलिसांकडे असलेल्या डाटातील चेहरे मॅच करण्यासाठी फेशियल रेक्गनिशन सॉफ्टवेअरची आवश्यकता आहे असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

सीसीटीएनएस सॉफ्टवेअर वापरण्याच्या पध्दतीची माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सीसीटीएनएस हे लेटेस्ट सॉफ्टवेअर आहे. या राज्यात १ हजार ५४ पोलीस स्टेशन्स आहेत त्या पोलीस स्टेशन्ससाठी साईटस् तयार केलेली आहेत त्यांना बीएसएनएल कनेक्शन देणार आहे. ३७-३८ पोलीस स्टेशन्स अशी आहेत की, तेथे बीएसएनएलचे कनेक्शन जावू शकत नाही. त्या ठिकाणी पर्यायी व्यवस्था करणार आहोत. त्याशिवाय पोलीस विभागात ६५० सिनियर पोलीस अधिकारी आहेत. ॲडिनशल सी.पी.,एस पी.,डेप्युटी एस.पी. इत्यादी अधिकाऱ्यांसाठी साईट प्रिपरेशनचे ८० टक्के काम झालेले आहे सदरहू सॉफ्टवेअर दिल्ली येथून येणार आहे. तसेच या योजनेअंतर्गत सन २००७ साली केंद्र शासनाकडून ४४५.५४ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असून या योजनेवर आतापर्यंत २०२.२५ कोटी रुपयांचा निधी खर्च झालेला आहे. सदरहू निधीत सॉफ्टवेअर संबंधी प्रशिक्षण देण्याचे काम करण्यात येत आहे. तसेच data digitisation, site preparation, data migration तसेच देखरेख इत्यादी कामांवर खर्च केला जात आहे.

सदरहू निधी खर्च करण्याबाबत टाईम बाऊंड प्रोग्राम ठरविण्यात आला आहे काय ? अशी पृच्छा समितीने केली असता, याविषयी माहिती देताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, सॉफ्टवेअर तयार होतात, त्यानंतर ते सॉफ्टवेअर कार्यान्वित करण्यासाठी विभागाकडे येतात. त्यानंतर सॉफ्टवेअर कार्यान्वित करण्याचे कामास सुरुवात होत असते. त्यामुळे सदरहू निधी खर्च करण्यास टाईम बाऊंड प्रोग्राम ठरवून दिलेला नाही. केंद्र शासन स्वत:हून

संगणकाचा पुरवठा करतात. सॉफ्टवेअर तयार करुन देतात. तसेच ते बीएसएनएलला कनेक्शन संदर्भातील पैसे भरतात.

विभागाला केंद्राकडून ४४५ कोटी रुपये या योजनेसाठी प्राप्त झाले असल्यामुळे टाईम बाऊंड प्रोग्राम ठरवून तो निधी खर्च केला पाहिजे. तो निधी पूर्णपणे खर्च केला नाही तर केंद्राकडून या योजनेसाठीचा निधी प्राप्त होणार नाही. सदरहू निधी खर्च करण्याबाबत विभागाकडे काही शेडयूल तयार केलेले आहे काय ?अशी समितीने पृच्छा केली असता तसे शेडयूल तयार केलेले नाही अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

महाराष्ट्र राज्य मराठी माणसांचे असूनही विभागाची वेबसाईट मराठीत नाही. वेबसाईट मराठीत का नाही याचा संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा. असे निदेश समितीने यावेळी दिले असता राज्यामध्ये बऱ्याच वर्षापासून संगणक आलेले आहेत. संगणकासमवेतच त्यास लागणाऱ्या ॲक्सेसरीज असतात. उदाहरण द्यावयाचे झाले तर प्रिंटर्स, स्कॅनर इत्यादी ॲक्सेसरीज मागविल्या जातात. संगणक व ॲक्सेसरीजची देखभाल दुरुस्ती नियमितपणे ठेवावी लागते. नवीन सॉफ्टवेअर आले तर ते सॉफ्टवेअर टाकून देण्यासाठी व ते कार्यान्वित करण्यासाठी नोडल एजन्सी काम करीत असते. खाजगी आय.टी.कंपनीत सॉफ्टवेअर टाकून देण्यापासून ते त्याची देखभाल दुरुस्तीची कामे करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा अस्तित्वात असते. विभागाकडे या कामासाठी स्वतंत्र यंत्रणा नाही. विभागाकडे वायरलेस हा तांत्रिक विभाग आहे. त्यांच्याकडे सदरहू कामाची अतिरिक्त जबाबदारी सोपविलेली आहे. वायरलेस विभागातील तांत्रिक कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येत असून त्यांचे प्रशिक्षण एका महिन्यात संपेल असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

डी.जी.कार्यालयात वेगळा संगणक कक्ष तयार करण्यात आलेला आहे, परंतु तो कक्ष अतिशय लहान असून त्या कक्षेत साधारणतः १० ते १२ संगणक आहेत. तसेच महाराष्ट्र शासनाचे डाटा सेंटर आहे त्या ठिकाणी सर्व्हर ठेवण्यात आला आहे. डी.जी कार्यालयात फक्त आठ तास डाटा एन्टी करु शकत होतो परंतु डाटा सेंटर या ठिकाणी २४ तास डाटा एन्ट्री होत असते. सर्व स्टेट डाटा सेंटरच्या सर्व्हरवर शिफ्ट करण्यात आला असून हे सर्व्हर तीन वर्षापूर्वी घेतले असल्याचेही समितीस अवगत करण्यात आले.

पोलीस विभाग हा अतिशय महत्वाचा आहे. पोलीस विभागाचे ४०० ते ५०० कोटी रुपये खर्च करुन संगणकीकरण करण्यात येत आहे. सर्व्हर स्वत:कडे ठेवण्यासाठी स्वतंत्र कक्ष

असला पाहिजे. पोलीस विभाग हा राज्यभर पसरलेला आहे पोलीस अधिकाऱ्याला प्रत्येक गावाची डे टू डे माहिती प्राप्त झाली पाहिजे. विभागाने पूर्वी जो सर्व्हर घेतला त्याची किंमत किती होती ? तसेच सर्व्हर खरेदी करताना संबंधित कंपनीकडून सर्व्हरच्या देखभाल दुरुस्ती बाबत ॲग्रीमेंट करुन घेतले जात नाही का याबाबत समितीने विचारणा केली असता २६ ते २७ लाख रुपये किंमतीचा एक सर्व्हर असतो.साधारणत: सर्व्हर देखभाल दुरुस्ती संदर्भात संबंधित कंपनी बरोबर तीन वर्षाचा करार केला जातो. परंतु सर्व्हर मेंटनन्स हा फार टेक्निकल भाग आहे. प्रशिक्षित कर्मचारी हे सर्व्हरची २४ तास देखभाल करीत असतात सर्व्हरची देखभाल करण्यासाठी विभागाकडे तांत्रिक कर्मचारी उपलब्ध नाहीत. असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

विभागाकडे सर्व्हरची देखभाल आणि दुरुस्ती करण्यासाठी तांत्रिक कर्मचारी अथवा कंत्राट बेसीसवर तांत्रिक कर्मचारी नेमता येणे शक्य आहे. करोडो रुपये संगणकीकरणावर खर्च करण्यात येत असताना एका सर्व्हरवर देखरेख ठेवण्यासाठी तांत्रिक कर्मचारी नेमला जात नाही हे बरोबर नाही. आय.टी.मधील बरेच उमेदवार सर्व्हरची देखभाल करण्यासाठी आपल्याला उपलब्ध होऊ शकतात. एवढेच नव्हे तर पोलीस विभागात अनेक पोलीस कर्मचाऱ्यांनी संगणकाचे प्रशिक्षण घेतलेले आहे. त्यातील काही कर्मचाऱ्यांना सर्व्हरची देखभाल दुरुस्ती संदर्भात प्रशिक्षण देण्यासाठी एखाद्या संस्थेकडे पाठविण्यात याव यामुळे तांत्रिक कर्मचाऱ्यांचा प्रश्न सहजपणे निकाली निघू शकेल असे मत समितीने व्यक्त केले.

यासंदर्भात आणखी माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, संगणकाच्या माध्यमातून सिपा आणि सीसीआयएस या प्रकल्पांवर मॉनेटरिंगचे काम करण्यात येते. या प्रकल्पाच्या बाबतीत रिपोर्टिंग करण्यात येते. गायडन्स घेऊन या प्रकल्पांची सिस्टीम अद्ययावत ठेवण्याचे काम देखील करण्यात येते. महाराष्ट्र पोलीस यांनी ९ एएस हे सॉफ्टवेअर विकसित केलेले आहे. कामकाजाच्या व्यतिरिक्त गुन्हा व गुन्हेगारविषयी विभागाच्या प्रशासकीय कामात सुलभता येण्याकरिता मे.सीएमसी लि.मुंबई यांच्या माध्यमातून हे सॉफ्टवेअर तयार करण्यात आले आहे. सदर सॉफ्टवेअरचा पायलट प्रोजेक्ट ठाण्यामध्ये सुरु करण्यात आला आहे. सॉफ्टवेअर मधील सर्व मॉडयुल्स यशस्वीपणे वापरता यावेत या दृष्टीने हे सॉफ्टवेअर ठाणे येथे अलॉट केले असून येथे आता सर्व मॉडयुल्स वापरण्यास सुरुवात केलेली आहे.

"या वर्षी आयटी प्लानिंग करिता किती रक्कम खर्च करण्यात आली" अशी पृच्छा समितीने केली असता यंदा रक्कम खर्च करण्यात आली नसून ही सर्व कामे करण्याकरिता एक वेगळा विभाग तयार करणे आवश्यक होते. असेट मेन्टेन करणे त्यांचे वेळोवेळी एएमसी करणे आवश्यक असते. ते काम यापूर्वी केले जात नव्हते. आता ते करण्यास सुरुवात केलेली आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

राज्यामध्ये जवळजवळ ८० ते ९० टक्के लोक मराठी भाषेचा वापर करतात. आपल्या राज्यामधील लोकांकरिता मराठी भाषा युजर फ्रेंडली आहे. पोलीस शिपाई साधारणपणे १० वी -१२ वी शिकलेले आहेत. त्यांना मराठी भाषेतून वेबसाईटवरुन माहिती मिळवणे अधिक सोपे होईल. या सर्व गोष्टींचा विचार केला गेला पाहिजे असे स्पष्ट मत समितीने व्यक्त केले.

माहिती व तंत्रज्ञान (IT) यासाठी आर्थिक व मनुष्य बळ यासाठी काही नियोजन केले आहे काय अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सध्या सीसीटीएनएस हा नवीन प्रकल्प सुरु करण्यात येत असून सदर प्रकल्पाकरिता निधी देण्यात आला असून निधीची कमतरता नसल्याचे नाही नवीन प्रोजेक्ट प्रायोगिक तत्वावर राबवल्यानंतर त्याचे बजेटींग करु शकतो. याकरिता टेक्निकल ॲडव्हायजरी कमिटी नियुक्त केलेली आहे. या कमिटीची बैठक ३ ते ४ महिन्यातून एकदा होते.

संगणकीकरणाच्या संदर्भात पोलीस खात्याने अनेक गोष्टींकडे लक्ष देणे गरजेचे आहे. संगणकीकरणाकरिता तज्ज्ञ कर्मचारी विभागामध्ये असले पाहिजेत. तसेच त्यांच्यामध्ये को-ऑर्डीनेशन असावे. या कामाकरिता आवश्यक निधी दिला पाहिजे. दर ३ महिन्याने किती काम पूर्ण केले गेले याचा नियमित आढावा घेतला गेला पाहिजे. त्यांना काम करण्यामध्ये काही अडचणी येत आहेत काय, याची माहिती घेतली पाहिजे. संबंधित मंत्री महोदयांनी देखील या संदर्भात विभागाला कन्स्ल्ट केले पाहिजे अशी सूचना समितीने विभागीय सचिवांना केली.

एखाद्या व्यक्तीला हॉटेल किंवा दुकान चालवण्याकरिता परवाना हवा असल्यास किंवा त्याचे नुतनीकरण करण्याकरिता विभागाकडे यावे लागते. लोकांना लवकरात लवकर परवाना उपलब्ध करुन देण्याकरिता आपल्या यंत्रणेचे संपूर्णपणे संगणकीकरण झाले पाहिजे. लोकांना परवान्याकरिता किंवा नुतनीकरणा करिता ऑनलाईन अर्ज भरता आले पाहिजेत. आपल्या ऑफीसमध्ये येण्याची त्यांना आवश्यकताच भासू नये. वेबसाईट वापरताना त्यामध्ये सर्व सुविधांचा समावेश असला पाहिजे. कागदपत्रे देखील स्कॅन करुन ऑनलाईन देता येतील अशा

प्रकारे सुसज्ज वेबसाईट असली पाहिजे.कोणत्याही नागरिकाला परवान्याचे नुतनीकरण किंवा इतर कोणत्याही कामाकरिता आपल्या कार्यालयात येण्याची आवश्यकता भासू नये. आपण अशी यंत्रणा विकसित केल्यास नागरिकांचा महत्वाचा वेळ वाचेल व ते १०-१५ रुपये अधिक सेवा चार्ज भरण्यास खुशीने तयार होतील असे मत व्यक्त करत सध्या किती दिवसांनी परवान्याचे नुतनीकरण करावे लागते अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की,

सर्व लायसन्सेसचे संगणकीकरणाचे काम सुरु असून नेटवर्क डेटाबेसचे नवीन सॉफ्टवेअर विकसित केले आहे. पिस्तुल परवान्याचे नुतनीकरण दर २ वर्षाने व रिव्हॉल्व्हरच्या परवान्याचे नुतनीकरण दर ३ वर्षाने करावे लागते.

सीसीआयएस, ९ एएस हे सॉफ्टवेअर्स आता पूर्ण होत आहेत. सॉफ्टवेअरचे काम करीत असताना त्याच्या डेडलाईन्स पाळल्या गेल्या नाहीत. ९ एएस या सॉफ्टवेअरचे काम सन २००७ पासून सुरु आहे. जवळजवळ ६ वर्षाचा कालावधी पूर्ण होऊन देखील या सॉफ्टवेअरचे काम अद्याप झालेले नाही. अजूनही आपण या सॉफ्टवेअरच्या पायलट स्टडीबद्दलच चर्चा करीत आहोत. सीसीआयएस व सिपा हे सॉफ्टवेअर सन २००७ पासून सुरु होते. ९ एएस या सॉफ्टवेअरचे काम मे.सीएमसी या कंपनीला दिले होते. हे काम केंद्र शासनाने दिलेले नव्हते. सॉफ्टवेअर विकसित करण्याकरिता १.६९ कोटी रुपये देण्यात आले. मात्र एवढी रक्कम खर्च करुन देखील काम परिपूर्ण काम झाले आहे, असे म्हणता येत नाही. आय.टी.ऑडीट करीत असताना सीसीआयएस व सिपा मधील डेटामध्ये काही अडचणी असल्याचे लक्षात आले आहे. नवीन सॉफ्टवेअर प्रायोगिक तत्वावर राबवले जाते. या सॉफ्टवेअरमध्ये युजर इन्व्हॉल्व्हमेंट वाढवली पाहिजे. अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने सॉफ्टवेअर तयार केले तर चांगले काम होऊ शकेल असे मत महालेखाकारांनी यावेळी व्यक्त केले.

या सर्व गोष्टी विभागाने गांभीर्याने घेतलेल्या आहेत. सीसीटीएनएस हा नवीन प्रोजेक्ट सुरु केलेला आहे. तसेच ई-गव्हर्नन्स करिता २७ प्रकल्प सुरु केले आहेत. सीसीटीआयएनएसमध्ये आय.टी.चा समावेश आहे. या संदर्भात नियुक्त केलेली मॉनीटरिंग कमिटी ही हायपॉवर कमिटी आहे. या समितीमध्ये मुख्य सचिव, आयटी विभागाचे सचिव व इतर अधिकाऱ्यांचा समावेश आहे. प्राप्त झालेल्या तक्रारींचे निवारण करणे हे एक महत्वाचे कार्य आहे. यासंदर्भात केंद्र शासनाने कायदा देखील तयार केलेला आहे. त्याची अंमलबजावणी

करणे, हे महत्वाचे कार्य आहे असे मत विभागीय सचिवांनी व्यक्त केले.तसेच लोकलेखा समितीने केलेल्या सूचनांची नोंद करुन त्या सूचना हायपॉवर समितीच्या निदर्शनास आणल्या जातील. तसेच ई-गव्हर्नन्सच्या दृष्टीकोनातून पोलीस कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाईल. याकरिता निधीचा मुद्दा महत्वाचा आहे. तसेच महाराष्ट्र राज्य पोलीस ही वेबसाईट मराठी भाषेत असावी हा मुद्दा महत्वाचा असून याबाबत निश्चित विचार केला जाईल. कर्मचाऱ्यांकरिता ट्रेनिंग प्लान्स तयार केले जातील. ई- गव्हर्नन्सकरिता प्लानिंग केले पाहिजे. हाय पॉवर समितीमधील सदस्य, आय.टी.विभागाचे सचिव, डी.जी. व गृह विभाग असे सर्व जण मिळून या गोष्टी करण्याचा निश्चित प्रयत्न करु असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

सायबर क्राईमच्या संदर्भात देखील समितीला माहिती पाठविण्याबाबत तसेच सर्वांना ऑनलाईन परवाना मिळू शकेल अशी यंत्रणा तयार करण्याचे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

अभिप्राय व शिफारशी

केंद्र शासनाच्या "गुन्हा व गुन्हेगारी माहिती पध्दत" (CCIS) या प्रकल्पांतर्गत राज्यामध्ये सर्व पोलिस स्टेशनकरीता हार्डवेअर सॉफ्टवेअरचा पुरवठा, प्रशिक्षण देणे याकरीता CIPA (सामायिक एकात्मीकृत कार्य) या नावाची यंत्रणा राज्यामध्ये कार्यान्वीत झाली. त्या यंत्रणेमार्फत राज्यास प्राप्त झालेले हार्डवेअर जानेवारी, २००६ ते ऑगस्ट, २००७ यादरम्यान तब्बल २० महिन्यांहून जास्त कालावधीकरीता व्यर्थ पडून राहिल्याची नोंद जिल्हा गुन्हा अभिलेख केंद्रांनी CCIS सॉफ्टवेअर व CIPA डाटाबेस दोन्हीमध्ये घेतली नाही. मनुष्य व यंत्र तासांचा अपव्यय, ब्रिज सॉफ्टवेअर ऑक्टोबर २००७ पासून बंद पडल्याने CIPA डाटा CCIS डाटाबेसमध्ये रुपांतरीत होऊ शकला नाही. त्यामुळे राष्ट्रीय सर्व्हरवर संपूर्ण व संयुक्त डाटा ऑक्टोबर २००७ पासून उपलब्ध न झाल्याने अन्वेषणासाठी डाटा उपलब्ध होउ न शकणे, CIPA सॉफ्टवेअर मधील उणिवा, प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता CCIS डाटाचा वापर न होणे, CIPA सॉफ्टवेअरची नवीनतम आवृत्ती न वापरणे इ. बाबी महालेखाकारांनी अभिप्रायात व्यक्त केल्या आहेत.

समितीसमोरील साक्षीदरम्यान विभागीय सचिवांनी माहिती देतांना सांगितले की, राज्यातील १०५४ पोलिस स्टेशनपैकी केवळ ३५८ पोलिस स्टेशनमध्ये संगणकीकरण झाले आहे. केंद्र शासनाच्या प्रकल्पाच्या माध्यमातून एकूण ३५८ पोलिस स्टेशनमध्ये प्रत्येकी ०४

संगणक संच व एक सर्व्हर देण्यात आलेला आहे. सीसी आयएस, सीआयपीए, सीसीटीएस या तीन आज्ञाप्रणालीमध्ये पोलिस स्टेशनचे संगणकीकरण करण्यात आलेले आहे. जिल्हा मुख्यालयातील सर्व डेटा सेंट्रल क्राइम ट्रॅकिंग ॲण्ड नेटवर्कींग (CCTNS) सॉफ्टवेअरमध्ये अपलोड करण्याचे काम ६० टक्के पूर्ण झालेले आहे. ३५८ पोलिस स्टेशन व्यतिरिक्त ज्या पोलिस स्टेशनचे संगणकीकरण झाले नाही. त्याठिकाणी नवीन सुधारित आज्ञावली अपलोड करण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या प्रकल्पाप्रमाणे प्रत्येक राज्यामधील प्रत्येक पोलीस स्टेशन व्ही-सेट लावून कोअर ॲप्लिकेशन सॉफ्टवेअरच्या माध्यमातून जोडण्यात येणार आहे. तसेच या संगणकीकरणाचा प्रकल्प राबविण्यामध्ये पूर्णपणे केंद्र सरकारचा वाटा असल्याचेही समितीच्या निदर्शनास आणले.

या योजनेअंतर्गत २००७ साली केंद्रशासनाकडून ४४५.५४ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असून या योजनेवर २०२.२५ कोटी निधी खर्च झाल्याचे समितीस अवगत करण्यात आले. सदरहू निधीत सॉफ्टवेअर संबंधी प्रशिक्षण देण्याचे काम करण्यात येत असून या निधीतून data digitisation site preparation तसेच देखरेख इत्यादि कामावर खर्च केला जात आहे. महाराष्ट्र पोलिस यांनी ९ एएस सॉफ्टवेअर विकसीत केले असून अद्यापपावेतो त्यावर १.६९ कोटी रु. खर्च झाले असून काम अद्याप पूर्ण न झाल्याची माहिती समितीस दिली गेली.

अंतर्भूत सुरक्षेसंदर्भात समाधानकारक प्रभावी झालेल्या राज्यांमध्ये कर्नाटक या राज्यानंतर महाराष्ट्र राज्याचा समावेश आहे. कर्नाटक राज्याच्या अंतर्गत सुरक्षिततेसंदर्भातील अभ्यास कण्याकरीता गृह विभागाकडून कर्नाटक राज्याचा अभ्यास दौ-यावर जाणार असून या दौऱ्यानंतर महाराष्ट्र राज्याच्या सुरक्षितते संदर्भात चांगल्या दर्जाचे सकारात्मक प्रयत्न करण्यात येतील असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले. अत: कर्नाटक राज्यामध्ये अंतर्गत सुरक्षिततेसंदर्भात केलेल्या कामाची पाहणी करुन महाराष्ट्रातील सुरक्षितते संदर्भातील सखोल अभ्यास करण्यासाठी गृह विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अभ्यास गटाने जावे व यासंदर्भातील अहवाल समितीस ३ महिन्याच्या आत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

पोलिस मनुष्यबळामध्ये कॉन्स्टेबलचा भरणा जवळपास ९० टक्के असून व्यवस्थेतील फार महत्वाचा घटक आहे. परंतु हाच घटक सगळ्यात जास्त दुर्लक्षित आहे. पोलिस व्यवस्थेतील यशापयशसास या घटकाची उपयोगिता जाणण्यामध्ये व त्या घटकाचे संगणक व तंत्रज्ञानाच्या दृष्टीने सक्षमीकरण यावर अवलंबून आहे. राज्यातील सर्व पोलिस स्टेशनचे

संगणकीकरण करण्याचा प्रयत्न हाती घेतला असल्यामुळे यापुढील काळात पोलिसांना संगणक सादर होणे तसेच संगणकाची सुलभपणे हाताळणी करता येणे आवश्यक होणार आहे. त्यामुळे सर्व पोलीस कर्मचारी वर्गास संगणक हाताळणीचे प्रशिक्षण देण्याचा कालबध्द कार्यक्रम शासनाने घ्यावा व याद्वारे नियमितपणे प्रशिक्षण वर्ग घेण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी अशी समिती शिफारस करीत आहे. **प्रत्येक पोलिस स्टेशनमधील कॉन्स्टेबल या घटकामध्ये कॉम्प्युटरची व नवीन तंत्रज्ञानाची जाण व उपयोग करण्याची क्षमता निर्माण करण्यासंदर्भात तातडीने उपाययोजना करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

आजचे युग हे कॉम्प्युटरचे युग असून संगणक क्षेत्रात तसेच माहितीच्या क्षेत्रात क्रांतीकारक प्रगती झाली आहे. परंतु राज्य पोलिस व्यवस्थेमध्ये कॉम्प्युटररायझेशनचा प्रसार फार धिम्या गतीने होत असल्याचे निदर्शनास येते. याचे कारण पोलिस फोर्समध्ये तंत्रज्ञानाच्या युगात प्रवेश करण्याकरीता आवश्यक असलेले प्रोफेशनॅलीझम व तांत्रिक दृष्ट्या असलेली क्षमता याची कमतरता असल्याचे निदर्शनास येते. **संगणकीकरणामुळे जीवनाच्या विविध क्षेत्रात अनेक समस्यांना समोर जात असलेल्या सर्वसामान्य व्यक्तींच्या मदतीस धावून जाणाऱ्या पोलिसांच्या गतीमध्ये फार मोठे स्थित्यंतर होऊ शकते. यासाठी प्रत्येक पोलिस स्टेशनमध्ये संगणकाचा जास्तीत जास्त वापर होण्यास चालना दिली जावी तसेच माहितीची आदानप्रदान होण्याकरीता ऑनलाईन सॅटेलाइट नेटवर्कद्वारे राज्यातील सर्व १०५४ पोलिस स्टेशन जोडली जावी अशीही समितीची शिफारस आहे.**

सीसीआयएस, सीआयपीए व सीसीटीएस या तीन आज्ञाप्रणालीतून राज्यामध्ये पोलिस स्टेशनचे संगणकीकरण केले जात आहे. सदरहू आज्ञाप्रणाली केंद्रशासनाने संगणकीकरणासंदर्भात देशभर राबविलेल्या यंत्रणेचा भाग असून यासाठी केंद्रशासनाने सन २००७ मध्ये ४४५.५४ कोटी इतका निधी राज्याला दिला. परंतु खेदाची बाब अशी की, राज्याचा गृह विभाग अद्यापपावेतो केवळ २०२.२५ कोटी इतकी रक्कमच खर्च करु शकले असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. गृह विभागाने ९ ए एस हे नवीन सॉफ्टवेअर विकसीत करण्याकरीता १.६९ कोटी रु. खर्च केले आहे. परंतु काम अद्यापपावेतो पूर्ण झालेले नाही. पोलिस विभाग संगणकीयदृष्ट्या सक्षम, **तांत्रिकदृष्ट्या प्रगत करण्यामध्ये राज्याच्या गृहविभगाकडे कोणतेही ठोस धोरण, नियोजन याची उणिव असल्याचे हे द्योतक आहे असे समितीचे अभिप्राय आहेत. पोलिस विभाग पूर्णपणे संगणकीकरणयुक्त, प्रोफेशनल, तंत्रज्ञान**

सक्षम बनविण्याकरीता केंद्र शासनासोबत राज्यशासनानेही त्यांच्या बरोबरीने काम करण्याची आवश्यकता आहे. पोलिस व्यवस्था संगणकयुक्त होण्याकरीता व आधुनिक तंत्रज्ञानाने सक्षम होण्याकरीता धोरणात्मक निर्णय घेऊन ठोस उपाययोजना करण्यात याव्यात तसेच केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात प्रत्येक पोलिस स्टेशनमध्ये संगणक प्रणालीचा वापर करण्यात यावा व याबाबतच्या सद्य:स्थितीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(ब) "गस्त नौकेवरील वायफळ खर्च"

दुरुस्ती करण्याकरिता वेळेत व योग्य ती कार्यवाही न केल्यामुळे रु. १.३४ कोटी किंमतीच्या गतिमान नौका विनावापर पडून होत्या आणि त्यावरील खर्च निष्फळ ठरत होता.

पोलीस दलाच्या आधुनिकीकरण योजनेअंतर्गत महाराष्ट्र शासन, गृह विभागाने राज्याच्या किनारपट्टी क्षेत्रावर गस्त घालण्याकरिता रु. २.६८ कोटी किंमतीच्या सहा अतिगतिमान नौका (प्रत्येकी रु. ४४.६१ लाख) मे क्राफ्ट वे इंजिनिअर्स लि. मुंबई (पुरवठादार) यांच्याकडून खरेदी करण्यास मान्यता दिली. (मार्च, २००२) पोलीस महासंचालक यांनी मार्च, २००२ मध्ये पुरवठादाराकडे खरेदीचे आदेश दिले आणि त्यानुसार त्याने ऑक्टोबर, २००२ आणि नोव्हेंबर, २००४ च्या दरम्यान सदर नौका सुपूर्द केल्या.

पोलीस अधिक्षक, रायगड आणि पोलीस अधिक्षक, नवी मुंबई यांचे अभिलेखे तपासले असता (सप्टेंबर आणि डिसेंबर, २००८) असे आढळून आले की, व विशिष्ठ, इंद्रायणी आणि प्राणहिता ह्या गतिमान नौका अनुक्रमे एप्रिल, २००६, मार्च २००६ आणि एप्रिल, २००६ पासून इंजिन आणि गिअर बॉक्स यांची मोठ्या प्रमाणातील दुरुस्ती न झाल्यामुळे विनावापर पडून होत्या.

असेही लक्षात आले की, विभागाने सागरी सिमाशुल्क विभाग आणि दोन संस्थांकडे (नौका बांधणार आणि दुरुस्तीकर) नौकांमधील वारंवार बंद पडण्याची कारणाची चौकशी केली होती. त्यांनी असे मत दिले होते की, (जुलै, ऑगस्ट २००७) मुंबई बंदर आणि त्याभोवती दोघांकडून चालवल्या जाणाऱ्या आऊटबोर्ड गिअर सिस्टिम असलेल्या नौका, तरंगणाऱ्या अर्धवट बुडालेल्या प्लॅस्टिक, लाकूड, नायलॉन दोऱ्या इ. बाबी समाविष्ट असलेल्या कचऱ्यामुळे चालवणे बिलकुल अशक्य असते. त्यांनी खाली दिल्याप्रमाणे सूचना केल्या. (जुलै, २००७)

१) दोघांनी चालवल्या जाणाऱ्या गिअर बॉक्समधील वापरात असलेल्या भागांची बदलाबदल करुन कामी येणाऱ्या गिअर बॉक्समध्ये बसवून ते गिअर बॉक्स सापेक्षतेने प्रदूषित नसलेल्या पाण्यात चालणाऱ्या नौकांमध्ये बसवावेत.

२) मुंबईमध्ये चालविल्या जाणाऱ्या उरलेल्या नौकांचे सांकेतिक गिअर/पुढे ढकलणारे साधन/पुढे ढकलणाऱ्या यंत्रामध्ये (बोर्ड इंजिनमध्ये) उपलब्ध असलेल्या व्होल्व्हो पेन्टा इंजिनचा वापर करुन आणि डी पी ड्राईव्ह (दोघांनी चालविले जाणार) च्या जागी योग्य

ते गिअर रेशिओ बसवुन आणि नौकामध्ये आणि तिच्या सांगाडयामध्ये योग्य ते आधुनिकीकरण करुन परिवर्तन करावे.

ह्यानुसार पोलीस महासंचालक यांनी सदरहू नौकाच्या दुरुस्तीसाठी एक प्रस्ताव शासनाकडे नोव्हेंबर, २००७ मध्ये सादर केला जो सप्टेंबर, २००८ मध्ये मान्य झाला. कामाचे आदेश फेब्रुवारी, २००९ मध्ये प्रस्तृत केले आणि त्याप्रमाणे काम प्रगतीपथावर आहे (जुलै, २००९).

ह्याप्रमाणे विभाग, नौका दुरुस्तीसाठी वेळेत कारवाई करण्यात अपयशी ठरले ह्याचा परिणाम म्हणून सदर नौका तीन वर्षाहून जादा काळाकरिता विनावापर पडून होत्या की, ज्यामुळे त्यावर खर्च झालेली रु. १.३४ कोटीची रक्कम निष्फळ ठरली शिवाय किनारपट्टीच्या क्षेत्रामध्ये गस्तीची उणीव असल्यामुळे सुरक्षिततेवर मोठा परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच ह्या बाबी समुद्रमार्गे दहशतवाद्यांच्या हल्ल्यास जबाबदार राहणार आहेत.

सदर प्रकरण शासनाच्या प्रधान सचिवास मे, २००९ मध्ये सादर करण्यात आले होते. उत्तर आले नव्हते (ऑक्टोबर, २००९).

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद केले आहे की, माहे ऑक्टोबर, २००२ मध्ये रु. ४४.६१ लाख प्रती बोट किंमतीच्या सहा फायबर स्पीड नौका, एम.एल. सावित्री, एम.एल.तापी, एम.एल.वशिष्ठी, एम.एल.कृष्णा, एम.एल.इंद्रायणी, एम.एल.प्राणहिता मेसर्स क्रॉफ्ट वे यांच्याकडून खरेदी करण्यात आल्या होत्या. या सहा नौका ठाणे ग्रामीण, नवी मुंबई, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या पाच सागरी जिल्हयांना वाटप करण्यात आल्या. या सहा नौकापैकी एम.एल.वशिष्ठी, एम.एल.इंद्रायणी, एम.एल. प्राणहिता या तीनही नौका माहे एप्रिल, २००६ पासून ते जानेवारी, २०१० पर्यंत नादुरुस्त राहिल्या. सदरहू नौका विहित कालावधीत दुरुस्त करण्यास पोलीस दलास अपयश आले. यामागील कारणे खालीलप्रमाणे आहेत:-

१) डी.पी.ड्राईव्ह मधील मोठ्या दुरुस्तीकरीता या नौका एप्रिल, २००६ पासून नादुरुस्त राहिल्या.

२) या नौकांना इंजिन व (डी.ओ.प्रोपो) व्होल्वापेन्टा बनावटीचे आहे.

३) डी.पी.ड्राईव्हची मोठी दुरुस्ती/सुट्टे भाग खरेदीकरिता निधी उपलब्ध होणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला.

४) याचवेळी सदर ड्राईव्ह वारंवार बिघाड होत असल्याची कारणे शोधण्याकरिता कस्टम मरीन विभाग व जे.एन.पी.टी. यांचेसह अभ्यास करणेत आला होता. त्यांनी असा सल्ला दिला की, सदर ड्राईव्ह जरी दुरुस्त केले तरी दुषित पाण्यातील वापरामुळे वांरवार बिघडणार यावर उपाय म्हणून सदर नौकांमध्ये दुषित पाण्यात उपयुक्त ठरतील असे इनबोर्ड गेअरबॉक्सचे तांत्रिक बदल (मॉडिफिकेशन) करण्यात यावे.

५) यास अनुसरुन या नौकांमध्ये तांत्रिक बदल (मॉडिफिकेशन) करणेबाबत व त्याकरीता रु.६६ लाख इतका निधी होणेबाबत शासनास माहे नोव्हेंबर २००७ मध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला.

६) सदर प्रस्तावास माहे सप्टेंबर, २००८ मध्ये शासनाच्या निधीसह मंजूरी प्राप्त झाली व त्यास अनुसरुन तांत्रिक बदलाच्या कामाकरीता विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडून निविदा मागविण्यात आली व दुरुस्तीचे काम बाहेरील दुरुस्तीसह माहे फेब्रुवारी, २००९ मध्ये सोपविण्यात आले.

७) संबंधित दुरुस्तीदार मे.दार्वे मरिन सर्व्हिस प्रा.लि. यांचेकडून दुरुस्तीकाम वेळेत पूर्ण करण्यास विलंब लागल्याने वर्क ऑर्डर मधील नियमानुसार प्रती नौका रु. १०९९६९/- अशी एकूण ३,२९,९०७/- इतका विलंब शुल्क त्यांना देय असलेल्या देयकातून वसूल करण्यात आले आहे.

८) माहे जानेवारी, २०१० मध्ये सदर तांत्रिक बदलाचे काम पूर्ण व तीनही नौका सुस्थितीत झाल्या व सध्याही सुस्थितीत कार्यरत आहेत.

९) वारंवार उदभवणारी दुरुस्ती व त्याकरिता व्होल्वापेंन्टा जे अत्यंत महाग आहे त्यावर होणारा खर्च यावर कायमचा तोडगा या तांत्रिक बदलाच्या कामामुळे निघाला. या तांत्रिक बदलावर होणार अंदाजित रक्कम अत्यंत कमी असल्याने हे तांत्रिक बदल फलदायी ठरले आहेत.

या तीनही नौका जास्त दिर्घ कालावधीकरिता बंद राहण्यामागे खालील कारणे आहेत.

१. स्पीड नौका खरेदी करण्याची राज्य पोलीस दलाची पहिलीच वेळ होती. त्यामुळे त्यांच्या वापराबाबत उदभवणाऱ्या अडचणीचा अंदाज बांधता आला नाही.

२. मुद्या क्र.१ च्या स्पष्टीकरणात नमूद केल्याप्रमाणे या नौकाप्रमाणे उद्‌भवलेली दुरुस्ती मोठ्या स्वरुपाची होती व त्याकरीता मंजूर निविदा प्रक्रिया व तांत्रिक बदल पूर्ण

करण्यास बराचसा कालावधी लागला व हा कालावधी ह्या सर्व बाबींच्या प्रक्रियेकरिता लागला.

या नौकांच्या खरेदीवर खर्च झालेले रु. १.३४ कोटी रक्कम वायफळ ठरलेला नाही.

१. या नौका सन २००२ ते २००६ ह्या कालावधीत सुस्थितीत होत्या व जानेवारी २०१० पासून ते अद्यापपर्यंत सुस्थितीत आहेत.

२. रु. १.३४ कोटी ही रक्कम या ३ नौकेची खरेदी किंमत आहे. २०१० मध्ये तांत्रिक बदलाच्या कामावर रु. ६६ लाख खर्च करुन कार्यरत आहे. त्यामुळे हा खर्च वायफळ ठरविणे योग्य होणार नाही.

या ३ नौका जरी काही कालावधीकरिता कार्यरत राहिल्या नाहीत तरी या कालावधीत इतर पोलीस नौका तसेच जॉईन्ट कोस्टल पेट्रोलिंग राज्याच्या सागरी सिमेवर कार्यरत होत्या.

साक्ष :

उपरोक्त परिच्छेदाच्या लेखी माहितीच्या संदर्भात समितीने दिनांक १५, मे २०१३ रोजी अपर मुख्य सचिव,गृह विभाग यांची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी अपर मुख्य सचिव यांनी "गस्त नौकेवरील वायफळ खर्च" या परिच्छेदाबाबत पार्श्वभूमी विषद करताना असे सांगितले की, प्रत्येकी ४४.६१ लाख रुपये किंमतीच्या सहा फायबर स्पीड नौका पोलीस दलासाठी ऑक्टोबर-२००२ मध्ये खरेदी करण्यात आल्या होत्या. खरेदी करण्यात आलेल्या ६ नौकांपैकी ३ नौका एप्रिल-२००६ मध्ये नादुरुस्त झाल्याचा अहवाल आला होता. तद्नंतर आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर जानेवारी-२०१० मध्ये त्या दुरुस्त करण्यात आल्या यावरुन असे निदर्शनास येईल की, एप्रिल-२००६ ते जानेवारी-२०१० म्हणजेच ४५ महिने उक्त ३ नौका नादुरुस्त होत्या. दुसरा मुद्दा असा की, २६ नोव्हेंबर, २००८ रोजी मुंबईवर सागरी मार्गाने दहशतवादी हल्ला झाला होता. त्यामुळे सागरी सुरक्षा महत्त्वाची होती. ४५ महिने बोटी नादुरुस्त होत्या याचे पाच भागांमध्ये विभाजन करणार आहे. त्यातील पहिला भाग म्हणजे सुरुवातीला २० महिने म्हणजेच एप्रिल-२००६ ते जुलै-२००७ या कालावधीत नौका दुरुस्तीचा प्रस्ताव तयार करुन तो पोलीस महासंचालक (पोलीस) यांच्याकडे पाठविण्यात आला. त्या प्रस्तावावर निर्णय घेण्यासाठी पोलीस महासंचालकानी तीन महिन्यांचा कालावधी घेतला. त्यानंतर अंतिम निर्णय घेण्यासाठी मंत्रालयात ११ महिन्यांचा कालावधी लागला. तसेच प्रत्यक्षात निधी मिळण्यात ११ महिन्यांचा काळ गेला.

यासंदर्भात आणखी माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी समितीस असे विदित केले की, माहे ऑक्टोबर-२००२ मध्ये महाराष्ट्र पोलीस दलाने ६ हाय स्पीड बोटी घेण्याची ऑर्डर दिली होती. ज्या सहा बोटी खरेदी करण्यात आल्या होत्या त्यांचा सांगाडा इंडिजिनीअस बनावटीचा होता. त्या सर्व बोटी २००३ ते २००४ च्या दरम्यान प्रत्यक्षात वापरावयास सुरुवात झाली. या ६ बोटी ५ सागरी किनाऱ्यांवर गस्तींसाठी देण्यात आल्या. एप्रिल-२००६ मध्ये ६ पैकी ३ बोटी गिअर बॉक्समध्ये बिघाड होऊन बंद पडल्या. ठाणे (ग्रामीण), रायगड आणि नवी मुंबईच्या समुद्र किनाऱ्यावर त्या बोटी गस्त घालण्यासाठी वापरण्यात येत होत्या. त्या परिसरातील समुद्रात नायलॉन दोऱ्या आणि प्लास्टीकच्या पिशव्या मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे त्या बोटीच्या गिअर बॉक्समध्ये अडकत होत्या. परिणामी, बोटी बंद पडत होत्या. एप्रिल-२००६ पासून या बोटींना लागणारे स्पेअर पार्ट आणि रिपेअर्सच्या बाबतीत बराच पाठपुरावा करण्यात आला. बोटींची दुरुस्ती करणारी बाहेरची दुसरी कंपनी होती बोटींच्या दुरुस्तीसाठी शिपींग कॉर्पोरेशनशी संपर्क साधण्यात आला. परंतु त्या कालावधीत या बोटींच्या दुरुस्तीसाठी ठोस उपाय होऊ शकले नाहीत. जेएनपीटी आणि कस्टम मरीन विभाग यांच्याकडे अशाच प्रकारच्या बोटी होत्या. शिवाय ते या क्षेत्रातील फिल्ड मास्टर असल्यामुळे त्यांच्याशी पत्र व्यवहार करण्यात आला. बोटींमध्ये वारंवार बिघाड होत असल्यामुळे यावर काय उपाययोजना करता येतील या बाबत त्यांच्याकडे विचारणा करण्यात आली.

शासनाची मंजुरी, बोटीसाठी लागणारा निधी आणि ज्या कंपनीचे गिअर बॉक्स बसविण्यात आले होते त्या मे.व्होल्वापेंटा कंपनीचे स्पेअर पार्टस् स्वीडन येथून येत असल्यामुळे त्यात वेळ गेला असता. त्यामुळे जेएनपीटी आणि कस्टम मरीन विभाग यांच्याकडून या बाबतीत अभिप्राय मागविला होता. त्यांनी असे सांगितले की, मे.व्होल्वापेंटा कंपनीने बोटींना आऊटबोर्ड गिअरबॉक्स बसविले आहेत ते इनबोर्ड केले तर वारंवार बिघाड होणार नाही. बोटींना आऊटबोर्ड गिअर बॉक्स बसविलेला असल्यामुळे वारंवार पाण्यातील नायलॉनच्या दोऱ्या आणि प्लास्टीकच्या पिशव्या त्यात अडकून त्या बिघडत राहतील.

महाराष्ट्र पोलीस दलाचा हाय स्पीड बोटी खरेदी करण्याचा हा पहिलाच प्रयत्न होता. या बोटींच्या वापराबाबत उद्‌भवणाऱ्या अडचणींचा विभागाला अंदाज बांधता आला नाही. पूर्वी लाकडी बोटी होत्या त्या बोटी इनबोर्ड इंजिनच्या होत्या. पोलीस दलाला हाय स्पीड बोटींची आवश्यकता असल्यामुळे अधिक चौकशी न करता त्या खरेदी करण्यात आल्या. आऊटबोर्ड

गिअर बॉक्स असल्यामुळे पाण्यातील प्रदूषणामुळे त्या नादुरुस्त होत राहतील हे सुरुवातीला समजले नाही. जेएनपीटी आणि कस्टम मरीन विभागाचे अभिप्राय आल्यानंतर ही बाब विभागाच्या निदर्शनास आली. त्यांनी सुचविले की, ज्या ३ बोटी वारंवार नादुरुस्त होत आहेत त्यांचे गिअर बॉक्स आऊटबोर्ड ऐवजी इनबोर्ड करुन घ्यावे. त्यानुसार २००७ मध्ये गिअर बॉक्समध्ये बदल करण्याबाबत कार्यवाही झाली. या संदर्भात पेपरवर्क झाले व टेंडर प्रक्रिया होऊन त्यास शासनाची संमती मिळाली. उर्वरित ज्या ३ बोटी होत्या त्यांचे गिअर बॉक्स आऊटबोर्डचे असूनही त्या चांगल्या स्थितीत होत्या. त्या बोटी सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगड येथील समुद्र किनाऱ्यावर गस्तीसाठी होत्या. तेथिल पाण्यामध्ये नायलॉन दोऱ्या किंवा प्लॉस्टीकच्या पिशव्या नसल्यामुळे त्यामध्ये बिघाड होत नव्हता. जेएनपीटी आणि कस्टम मरीन विभागाच्या अभिप्रायानुसार तांत्रिक बदल करुन ज्या ३ बोटींमध्ये वारंवार बिघाड होत होते त्यांचे गिअर बॉक्स आऊट बोर्डमधून इन बोर्डमध्ये कन्व्हर्ट केले.

विभागीय प्रतिनिधींनी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने पुढे अशी विचारणा केली की,गिअर बॉक्स इन बोर्डमध्ये कन्व्हर्ट करण्यासाठी किती खर्च आला तसेच एका बोटीची किंमत किती होती ? याबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की तीन बोटींचे गिअर बॉक्स आऊट बोर्डमधून इन बोर्डमध्ये कन्व्हर्ट करण्यासाठी ६६ लाख रुपये खर्च आला असून एका बोटीची किंमत ४४ लाख ६१ हजार रुपये होती व हा दर ऑक्टोबर-२००२ मधील होता.

एका बोटीची किंमत ४४ लाख ६१ हजार रुपये असताना त्या बोटीच्या दुरुस्ती पोटी २२ लाख रुपये खर्च करण्यात आला याबाबतची माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, यासंदर्भात जेएनपीटीचा इन्स्पेक्शन रिपोर्ट दि.१४ ऑगस्ट, २००७ रोजी प्राप्त झाला. त्यांच्या अहवालाच्या आधारे अशा बोटींची खरेदी करण्यात आली होती परंतु त्या बोटींचा वापर योग्य होत नव्हता. त्यांनी आपल्या अहवालात नमूद केले होते की, "As the performance of these launches was poor, we decided to terminate the contract."अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.तसेच आऊट बोर्ड असलेल्या ३ बोटी आणि इन बोर्ड केलेल्या ३ बोटी अशा एकूण ६ बोटी चांगल्या स्थितीत सुरु आहेत.

त्यानंतर नवीन बोटी खरेदी केल्या आहेत काय अशी विचारणा समितीने केली असता, सन २००६ मध्ये केंद्र शासनाने कोस्टल सिक्युरिटी स्कीमखाली १२ नवीन पोलीस

स्टेशनला मान्यता दिली होती. त्यासाठी केंद्र शासनाने २८ नवीन बोटी पुरविल्या आहेत. त्या बोटींचा पेट्रोल आणि डिझेलवरील खर्च केंद्र सरकार करणार आहे. गोवा शिपयार्ड कडून नवीन बोटी घेण्यात आल्या व त्याचे पेमेंट केंद्र सरकारने केले आहे. त्या बोटींच्या देखभाल व दुरुस्तीचे काम गोवा शिपयार्ड कंपनी करणार आहे. २६/११ च्या हल्ल्यानंतर शासनाने तातडीने बोट खरेदीची ऑर्डर काढली होती. त्यानुसार २००९ मध्ये २९ बोटींच्या खरेदीची निविदा प्रक्रिया पार पडली. मरीन फ्रंटीयर्स कंपनीकडून ५३ कोटी रुपये खर्च करुन २२ बोटी खरेदी केल्या. सर्व बोटींना गिअर बॉक्स आऊट बोर्डचे आहे परंतु सर्व बोटींच्या माध्यमातून पेट्रोलिंग करता येत नाही. विभागाकडे बहुतांश बोटी आऊट बोर्ड इंजिनच्या आहेत त्या इन बोर्ड करण्याची प्रक्रिया सुरु आहे असे स्पष्टीकरण अपर पोलीस महासंचालकांनी केले.

आऊट बोर्ड गिअर बॉक्स असलेल्या बोटींमध्ये वारंवार बिघाड होतो हा अनुभव अगोदर आला असतानाही बोटींची पुन्हा खरेदी करताना आऊट बोर्ड इंजिनच्याच बोटी खरेदी करण्याची गरज काय होती, ही खरेदी करण्यापूर्वी आपण केंद्र शासनाला यामध्ये येणाऱ्या अडचणींची माहिती दिली नव्हती काय ? कारण आता आऊट बोर्ड गिअर बॉक्सच्या बोटी इन बोर्डमध्ये रुपांतरित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च येणार आहे याबाबत समितीने पृच्छा केली असता, सन २००९ मध्ये मरीन फ्रंटीयर्स कंपनीकडून बोटी खरेदी केल्या आहेत त्या बोटींमध्ये आऊट बोर्ड इंजिन आहे. This was examined by Coast Guard, Navy and M.T. Section असा खुलासा अपर पोलीस महासंचालकांनी केला.

जेएनपीटी आणि कोस्टल मरीन विभाग आऊट बोर्ड इंजिनच्या बोटी वापरतात की इन बोर्ड इंजिनच्या बोटी वापरतात याविषयीच्या प्रश्नावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की,सन २००७ चा अहवाल आहे त्या वेळी आऊट बोर्ड इंजिनच्या बोटी वापरल्या जात होत्या त्यांचे पत्र सुध्दा आहे. त्यांना आऊट बोर्ड इंजिनच्या बोटींचा अनुभव चांगला आला नाही म्हणून त्यांनी तो करार संपुष्टात आणला.

त्या वेळी कोस्ट गार्डचे मत विचारात घेतले नव्हते काय ?याबाबत समितीने विचारणा केली असता, माहे ऑक्टोबर-२००२ मध्ये ६ बोटी घेतल्या होत्या. त्यांचे इंजिन बोटीच्या आत होते आणि गिअर बॉक्स बोटीच्या बाहेर होते तद्नंतर नवीन टेक्नॉलॉजी आली. आता मरीन फ्रंटीयर्स आणि गोवा शीपयार्डकडून बोटी घेतल्या आहेत.नविन टेक्नॉलॉजीमुळे आता पूर्वी सारखी अडचण येणार नाही अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

यासंदर्भात अधिक माहिती देतांना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, मुंबई जवळच्या किनारपट्टयांवर आज सुध्दा मोठ्या प्रमाणावर नायलॉन दोऱ्या व प्लास्टीक पिशव्या आहेत. त्यामुळे बहुतांश बोटी गिअर बॉक्सच्या रिपेअर्ससाठी येतात. अस्तित्वात असलेल्या बोटींपैकी ३० टक्क्यांपेक्षा जास्त बोटी दुरुस्तीसाठी येतात मरीन फ्रंटीयर्स ही कंपनी यातील विशेषज्ञ कंपनी आहे. या कंपनीच्या टेक्नॉलॉजीनुसार एका बोटीवर २-३ लाख रुपये खर्च केला तर मार्ग निघू शकतो. आजच्या घडीला अस्तित्वात असलेल्या बोटींपैकी ५० टक्क्यांपेक्षा जास्त बोटींच्या माध्यमातून पेट्रोलिंग सुरु आहे. केंद्र सरकार फेज-२ अंतर्गत आणखी १४ बोटी देणार आहे. विभागाची अडचण ही आहे की, तांत्रिक मनुष्यबळ मिळत नाही. विभागाकडे नोकरभरती प्रकरण मोठ्या प्रमाणावर प्रलंबित आहेत. बोट चालविण्यासाठी ११-११ महिन्यांच्या कंत्राटपध्दतीवर कामगार घेतो. आज विभागाकडे ११६ कामगार कंत्राट पध्दतीवर आणि १०० कामगार कायमस्वरुपी सेवेत आहेत असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर केला.

बोटी चालविणाऱ्यांना विभागाचे लोक मार्गदर्शन देतात काय ?अशी विचारणा समितीने केली असता, ज्यांची बोटी चालविण्यासाठी नेमणूक केलेली असते त्यांच्याकडे बोट चालविता येत असल्याचे प्रमाणपत्र असते. शिवाय, त्यांनी प्रशिक्षण घेतलेले असते. या कामी कोस्टल डिपार्टमेंटच्या लोकांना सेवेत घेतो. त्यांना सोबत घेऊन विभागाने तपासणी सुध्दा केली होती असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

बोटी बिघडल्यामुळे समुद्र किनाऱ्यावर १०० टक्के पेट्रोलिंग होत नाही. शिवाय विभागाकडे पुरेसे मनुष्यबळ नाही सध्या गस्तीकरिता किती बोटी आहेत ?याबाबत समितीने पृच्छा केली असता, विभागाकडे एकूण ७२ बोटी आहेत. नवीन ५७ बोटींपैकी कालपर्यंत ३३ बोटी गस्त करीत होत्या. जुन्या बोटी मोठ्या प्रमाणावर देखभाल व दुरुस्तीसाठी असतात. त्या तुलनेत नवीन बोटी दुरुस्तीसाठी कमी असतात. We have to make payment of more than Rs.1 crore to the Repairer. पेमेंट केल्याशिवाय बोटींची देखभाल व दुरुस्ती केली जात नाही. गोवा शीपयार्डकडून रिपेअरींग करुन घ्यावयाची असल्यास केंद्र सरकारकडून परवानगी घ्यावी लागते. या बाबतीत काही अडचणी आहेत. वेळोवेळी सह सचिवांच्या संपर्कात असुन विभागाची अशी अपेक्षा आहे की, ४५ बोटींच्या माध्यमातून गस्त घालता यावी.

बोटींच्या देखभालीकरिता करार केला नव्हता काय तसेच माहे ऑक्टोबर, २००२ मध्ये बोटी खरेदी केलेल्या होत्या त्या खरेदीच्या वेळी तांत्रिक सल्ला कोणाकडून घेण्यात आला होता? कोणत्या बेसवर खरेदी केली गेली? पुन्हा नव्याने बोटी घेत असताना पूर्वीचीच चूक केली गेली. दुसऱ्यांदा निविदा काढताना कोणाचा तांत्रिक सल्ला घेण्यात आला होता तसेच पुरवठादार कंपनीचे नाव काय आहे? यासंदर्भात समितीने विचारणा केली असता, मरिन फ्रंटियर्स ही पुरवठादार कंपनी आहे. दुसऱ्यांदा खरेदी करीत असताना नेव्ही, कोस्ट गार्ड आणि एम.टी.सेक्शन यांचा तांत्रिक सल्ला घेतला होता. पहिल्यांदा जी चूक झाली तशीच चूक दुसऱ्यांदा खरेदी करताना केलेली नाही. टेक्नीकल मनुष्यबळ नाही. We are not technical persons असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला. तसेच माहे ऑक्टोबर २००२ मध्ये बोटी खरेदी करीत असतानाचे तांत्रिक सल्लागार कोण होते याची माहिती पोलीस महासंचालक कार्यालयामार्फत देण्याचे समितीस आश्वासित केले.

आज विभागाकडे ७४ बोटी उपलब्ध असून त्यापैकी केवळ ३३ बोटी वापरात आहेत असे विभागाने सांगितले आहे. विभागाकडे ४ वर्षापूर्वी वापरायोग्य किती बोटी उपलब्ध होत्या? यासंदर्भात चार वर्षापूर्वी खाजगी बोटी भाड्याने घेऊन गस्त घालण्याचे काम विभाग करीत होते असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर केला.

२० महिने पोलीस महासंचालक कार्यालयात व ११ महिने नस्ती मंत्रालयात निर्णयाविना प्रलंबित राहिली या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन समितीला एका महिन्यात अहवाल द्यावा. असे निदेश समितीने विभागाला दिले तसेच या फायबर बोटी खरेदी करीत असताना तांत्रिक सल्ला कोणी दिला, आज गृह विभागाकडे एकूण किती बोटी उपलब्ध आहेत, त्यापैकी किती बोटी बंद आहेत याची चौकशी झाली पाहिजे. काही बाबतीत केंद्र शासनाची मान्यता घ्यावी लागते असे विभागातर्फे सांगण्यात आले परंतु केंद्र शासनाकडून मान्यता मिळविण्यास सहा-सहा महिने लागणार असतील गस्तीचे काम कसे होणार याविषयी समितीने नापसंती व्यक्त केली.

सन २००६-२००७ या वर्षात विनियोजन लेख्यावरील अहवालामध्ये महालेखापालांनी पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाच्या संदर्भात जे अभिप्राय दिले होते त्या अनुषंगाने समितीने गृह विभागाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली होती. त्यावेळी समितीला असे दिसून आले की, या बोटींच्या देखभाल व दुरुस्तीसाठी कोणत्याही प्रकारची तरतूद केलेली नाही. देखभाल व

दुरुस्तीसाठी वार्षिक कंत्राट देखील निधीअभावी न केल्याने या बोटी पडून आहेत, त्यामुळे ज्या एका विशिष्ट हेतूने बोटी खरेदी करण्यात आलेल्या होत्या, तो हेतू साध्य होत नसल्याचे दिसून आले. त्यामुळे बोटींच्या देखभाल व दुरुस्तीसाठी वार्षिक स्तरावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करावी व त्यामध्ये या बोटींसाठी दैनंदिन लागणाऱ्या पेट्रोल व डिझेल या इंधनाचा समावेश करावा अशी समितीने शिफारस केली होती. या शिफारशीबाबत गृह विभागाने कोणती कार्यवाही केली? अशी विचारणा समितीने केली.

यावर खुलासा करताना विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी असे सागितले की, तांत्रिक समितीचे दायित्व होते, त्यांनी खरेदी करण्यापूर्वी कशाप्रकारे कार्यवाही केली, कोणत्या पध्दतीने विचारविनिमय केला आणि अडचणी समजून घेतल्या त्याचे इनपूट तांत्रिक समितीने दिले पाहिजे, त्यावरुन चित्र स्पष्ट होण्यास मदत होईल. आज विभागाकडे एकूण ७४ बोटी उपलब्ध आहेत. त्यापैकी निम्म्या बोटी वापरात आहेत. मंत्रालयात निधी उपलब्ध होण्याबाबत प्रस्ताव आलेला आहे त्या प्रस्तावानुसार डेलिगेशन ऑफ पॉवर मंजूर करु, जेणेकरुन त्यांना मंत्रालय स्तरावर यावे लागणार नाही. पुढील दोन दिवसात या प्रस्तावाला वित्त विभागाची मान्यता मिळेल. रिक्रूटमेंट रुल्समध्ये रिलॅक्सेशन देण्याचा प्रस्ताव शासनाला प्राप्त झाला आहे. त्या प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे अटीमध्ये कशी शिथिलता देता येईल यादृष्टीने विचार सुरु आहे, तो प्रस्ताव मान्य करु. डेलिगेशन ऑफ पॉवर याकरिता ११ महिन्यांचा कालावधी लागला आहे तो प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी आला आहे. रिक्रूटमेंट रुल्समध्ये अपेक्षित शिथिलता देऊन परिस्थिती कशी हाताळता येईल हे पाहिले जाईल आणि तांत्रिक समितीचा अहवाल समितीला सादर करु असे समितीस अश्वासित केले.

सागरी गस्तीबाबत पोलीस विभाग दक्ष असणे आवश्यक आहे निर्णय त्वरित झाले पाहिजेत. जग विज्ञानामध्ये आज खूप पुढे गेले असताना आपण बोटींच्या दुरुस्तीबाबत निर्णय घेण्यासाठी ५-५ वर्षे वेळ घेत आहात. जगाच्या तुलनेत महाराष्ट्राचे पोलीस खाते कुठे आहे? ५ वर्षानंतर दुरुस्तीला मंजुरी देत असताना ती सुध्दा १०० टक्के नाही. पोलीसांनी सिस्टीम डेव्हलप केली पाहिजे २-४ वर्षाच्या काळासाठी कंत्राटदार नेमला पाहिजे पोलीस कर्मचारी बोटी चालवू शकत नाही. सागरी क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या मनुष्यबळाची आवश्यकता आहे. उपलब्ध सर्व बोटी कार्यान्वित असल्याच पाहिजेत. ही गृह विभागाचीच जबाबदारी आहे असे समितीने स्पष्ट केले.

माहे, नोव्हेंबर, २००७ मध्ये प्रस्ताव सादर केला असताना तो फेब्रुवारी, २००९ मध्ये मान्य झाला. एवढा काळ विलंब लागण्याची कारणे काय आहेत?अशी समितीने विचारणा केली असता माहे फेब्रुवारी, २००९ मध्ये वर्कऑर्डर देण्यात आली त्यानंतर निविदा प्रक्रिया सुरु झाली. त्याचा कालावधी चार महिने होता तो कालावधी एका महिन्याने वाढविण्यात आला. वेळेत पूर्तता न केल्याबद्दल दंड लावण्यात आला असून तो वसूल केला असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

विभागाच्या अभिप्रायामध्ये असे नमूद केले आहे की, स्पीड नौका खरेदी करण्याची राज्य पोलीस दलाची पहिलीच वेळ होती. त्यामुळे त्यांच्या वापराबाबत उद्‌भवणाऱ्या अडचणींचा अंदाज बांधता आला नाही तांत्रिक समिती स्थापन केलेली होती. योग्य पध्दतीने खरेदी प्रक्रिया पार पाडली असेल तर ही अडचण का उद्‌भवली? अशी पृच्छा समितीने केली असता ४५ महिन्यांचा कालावधी उलटून गेला, त्याचे पाच भाग होतात. सुरुवातीचे २० महिने प्रस्ताव आला नाही, त्यानंतर ३ महिने पोलीस महासंचालक कार्यालय, ११ महिने मंत्रालयात आणि डिलिव्हरीसाठी ११ महिने, त्यापैकी ५ महिने निविदा प्रक्रिया आणि नंतर पावसाळ्याचा कालावधी सुरु झाला होता असे स्पष्टीकरण अपर मुख्य सचिव यांनी समितीस दिले.

या प्रक्रियेत ज्यांनी ज्यांनी उशिर केला, ते कोणत्याही दर्जाचे अधिकारी असोत, त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करण्यात यावी आणि त्यासंबंधीचा अहवाल एका महिन्यात समितीला सादर करावा असे निदेशही समितीने विभागास दिले.

या बोटीची दुरुस्ती करण्यासाठी २० महिन्यांचा कालावधी का लागला, या बोटीच्या दुरुस्तीची फाईल कोणकोणत्या अधिका-याकडे कोणकोणत्या कारणासाठी किती काळ प्रलंबित राहिली, कोणकोणत्या अधिका-याने या फाईलीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले याची माहिती समितीला द्यावी. या बोटी प्रकरणी आपण चौकशी करुन जे कोणी अधिकारी दोषी असतील त्यांना केवळ माफी मागायला न लावता त्यांच्यावर कडक कारवाई करावी. राज्याच्या सुरक्षिततेच्या बाबतीत समितीच्या काही अपेक्षा आहेत. राज्याला लाभलेल्या समुद्र किना-याच्या सुरक्षिततेचा छोटा विषय असून त्यासंदर्भात कार्यवाही पूर्ण करण्यासाठी ५-५ वर्षे लागत असतील तर ते योग्य नाही. अधिकारी चार-चार महिने फाईल स्वत:कडे ठेवीत असतील तर तेही योग्य नसल्याचे सांगत समितीने नाराजी व्यक्त केली.

याअनुषंगाने विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी या प्रकरणी ज्या ज्या अधिकाऱ्यांनी दिरंगाई केलेली आहे त्यांची चौकशी झाली पाहिजे या प्रकरणी कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही असे समितीस आश्वासित केले.

अभिप्राय व शिफारशी

गृह विभागाने माहे ऑक्टोबर, २००२ मध्ये प्रती (रु. ४४.६) लक्ष याप्रमाणे ६ फायबर स्पीड नौका मे.क्रॉफ्ट वे यांच्याकडून खरेदी केल्या होत्या. या नौकांपैकी वशिष्ठि, इंद्रायणी व प्राणहिता या तीने नौका एप्रिल, २००६ पासून ते जानेवारी, २०१० पर्यंत नादुरुस्त राहिल्या. महाराष्ट्र पोलिस दलाचा हाय स्पीड बोटी खरेदी करण्याचा हा पहिलाच प्रयत्न असल्याने व त्यांना या बोटींच्या वापराची माहिती नसल्याने स्पीड बोटी खरेदी करताना अधिक चौकशी कर करणे याकरीता तांत्रिक सल्लागार, यांची नियुक्ती करुन त्यांचेकडून अहवाल प्राप्त करुन घेणे या प्राथमिक बाबींची किमान दक्षता घेणे आवश्यक होते. परंतु या प्रकरणी अशी दक्षता घेण्यास आली नसल्याचे समितीस प्राप्त झालेल्या माहितीवरुन दिसून आले. तसेच या स्वरुपाच्या बोटी खरेदी केल्यावर त्या वापरात कशा ठेवायच्या, त्याकरिता लागणारे तांत्रिक मनुष्यबळ आपल्याकडे उपलब्ध आहे काय त्यांची देखभाल दुरुस्ती कशी करणार याचा कोणीही सखोल विचार न करता स्पीड बोटींची खरेदी करण्यात आली. यात पोलिस दलाचा व गृह विभागाचा निष्काळजीपणा दिसून येतो. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते व यापुढील काळात तरी आधुनिक तंत्रज्ञानाच्या बोटी व साहित्य खरेदी करताना गृह विभाग व पोलिस दलाने दक्षता घ्यावी अशी समिती शासनास शिफारस करीत आहे.

महाराष्ट्र राज्यास ७२० किमी लांबीचा किनारा लाभला आहे. या किनारपट्टीचे संरक्षण करणे याची जबाबदारी पोलिस दलाची आहे.

गृह विभागाने राज्याच्या सागरी सीमेवरील सुरक्षेसाठी गस्त नौका खरेदी केल्या होत्या. गृह विभागाकडे ७४ बोटी उपलब्ध असून त्यापैकी केवळ ३३ बोटी वापरात आहेत चार वर्षापूर्वी खाजगी बोटी भाड्याने घेऊन गस्त घालण्याचे काम गृह विभाग करीत होते. नवीन बोटी घेणे आवश्यक असताना २० महिने पोलीस महासंचालक कार्यालयात व ११ महिने फाईल मंत्रालयात निर्णयाविना प्रलंबित राहिली या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन चौकशीत दोषी आढळलेल्यांवर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एका महिन्यात देण्याचे निदेश दि.१२ जून, २०१३ रोजी समितीने दिले असताना अद्यापपर्यंत समितीस

अहवाल प्राप्त झाला नसून याबाबत तातडीने कार्यवाही करण्यात यावी. केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

सागरी सीमेवरील सुरक्षेसाठी फायबर बोटी खरेदी करीत असताना तांत्रिक सल्ला कोणी दिला, सद्य:स्थितीत गृह विभागाकडे एकूण किती बोटी उपलब्ध आहेत, त्यापैकी किती बोटी बंद आहेत याची माहिती समितीला देण्यात यावी. तसेच गस्त नौकासंदर्भात केंद्र शासनाची मान्यता घ्यावी लागत असली तरी केंद्र शासनाकडून मान्यता मिळविण्यास सहा-सहा महिने लागणे ही बाब फारच गंभीर आहे. मुंबई शहरावर २६/११ रोजी झालेला अतिरेकी हल्ला हा प्रशासकीय कामातील दिरंगाईचा एक भाग होता. गस्त नौकांच्या बाबी संदर्भात शासनाने तातडीने कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.

गस्ती नौका पोलिसांच्या दैनंदिन वापरात असल्याचे त्यांच्या देखभाल/दुरुस्तीसाठी आवश्यक तो निधी पोलिस महासंचालकास उपलब्ध करुन देणे आवश्यक असताना केवळ किरकोळ खर्चाच्या शक्ती पोलिस महासंचालकास देवून प्रत्येक वेळेस खर्चाच्या बाबींकरीता गृह विभागाकडे प्रस्ताव पाठवावा लागतो. वास्तविक पहाता, पोलिस महासंचालकास आकस्मिक व आवश्यक खर्चासाठी पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी गृह विभागाची आहे. परंतु गृह विभागाचे सर्व वित्तीय अधिकार स्वत:कडे राखून ठेवले आहेत. त्यामुळे प्रत्येक वेळी किरकोळ बाबींच्या खर्चासाठी देखिल गृह विभागाकडे प्रस्ताव सादर करावा लागतो. यात निर्णय घेण्यास बराच कालावधी लागत असल्याने त्या प्रकरणातील गांभीर्य निघून जाते. त्यामुळे पोलिस दलातील वरीष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांना वित्तीय शक्तीचे प्रदान होणे आवश्यक आहे असे समितीचे मत झाले. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टिने व अतिशय महत्वाच्या बाबींसाठी पोलिस खात्यास गृह विभागाकडे यावे लागणार नाही. यादृष्टीने वरीष्ठ दर्जाच्या पालिस अधिकाऱ्यांकडे काही प्रमाणात वित्तीय शक्तींचे प्रदान करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.

पोलिस दलामध्ये कार्यरत असणारे पोलिस यांना नियमित पोलिस गस्तीचा अनुभव आहे व त्यांची शाररिक क्षमताही यथातथाच असते. परंतु सागरी किनारपट्टीवर गस्त करण्यासाठी पोलिसांच्या शाररिक क्षमतेमध्ये फरक असतो. समुद्रात गस्त घालणाऱ्या कर्मचाऱ्यांना सागराचे ज्ञान असणे तसेच त्यांना समुद्रात पोहता येणे आवश्यक आहे व त्यादृष्टीने त्यांची शाररिक क्षमता असणे आवश्यक आहे. **पोलिसांची सेवा भरती नियमांमध्ये**

यास अनुसरुन आवश्यक त्या सुधारणा होणे आवश्यक आहे. या निर्णयाप्रत समिती आली. सागरी सुरक्षा करण्यासाठी पोलिस कर्मचारीवृंद भरती करतेवेळी वरील सर्व बाबींचा साकल्याने विचार करण्यात यावा व सेवाभरती नियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

स्पीड नौका खरेदी करण्याची राज्य पोलीस दलाची पहिलीच वेळ होती. त्यामुळे त्यांच्या वापराबाबत उद्‌भवणाऱ्या अडचणींचा अंदाज बांधता आला नाही तरी त्यासाठी तांत्रिक समिती स्थापन केलेली होती. या तांत्रिक समितीच्या माध्यमातून योग्य पध्दतीने खरेदी प्रक्रिया पार पाडली नाही. स्पीड नौका खरेदी करुन कार्यान्वीत करण्यासाठी ४५ महिन्यांचा कालावधी लागला. सुरुवातीचे २० महिने प्रस्ताव आला नाही, त्यानंतर ३ महिने पोलीस महासंचालक कार्यालयात ११ महिने मंत्रालयात आणि डिलिव्हरीसाठी ११ महिने, त्यापैकी ५ महिने निविदा प्रक्रिया आणि नंतर पावसाळ्याचा कालावधी सुरु झाला होता यावरुन असे दिसून येते की, स्पीड नौका खरेदी प्रकरणास कोणत्याही स्तरावर गांभिर्याने घेतले नाही. **या प्रक्रियेत ज्या अधिकाऱ्यांनी त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करण्यात यावी आणि त्यासंबंधीचा अहवाल एका महिन्यात समितीला सादर करावा असे निदेश समितीने विभागास देवूनसुध्दा अद्याप समितीस अहवाल सादर करण्यात आलेला नाही. अत: सदर अहवाल समितीला तातडीने सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

बोटींची दुरुस्ती करण्यासाठी २० महिन्यांचा कालावधी का लागला, या बोटीच्या दुरुस्तीची फाईल कोणत्या कारणासाठी किती काळ प्रलंबित राहिली, कोणत्या अधिकाऱ्यानी या फाईलीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले याची माहिती समितीला द्यावी. या प्रकरणी चौकशी करुन जे कोणी अधिकारी दोषी असतील त्यांना केवळ माफी मागायला न लावता त्यांच्यावर कडक कारवाई करावी. राज्याला लाभलेल्या समुद्र किना-याच्या सुरक्षिततेचा विषय महत्वाचा आहे. **त्यासंदर्भात कार्यवाही पूर्ण करण्यासाठी ५-५ वर्षे लागत असतील व अधिकारी चार-चार महिने फाईल स्वत:कडे ठेवीत असतील तर तेही योग्य नसल्याचे सांगत समितीने नाराजी व्यक्त केली. या प्रकरणी ज्या ज्या अधिकाऱ्यांनी दिरंगाई केलेली आहे त्यांची चौकशी करुन चौकशीत दोषी आढळून आलेल्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

जलसंपदा विभाग
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ

(अ) परिच्छेद क्र.३.२.४ कंत्राटदाराला गैरवाजवी वित्तीय सहाय्य

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००८-२००९ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ३.२.४ "कंत्राटदाराला गैरवाजवी वित्तीय सहाय्य" यासंदर्भात महालेखापरिक्षकांनी खालील अभिप्राय दिलेले आहेत.

कंत्राटात तरतूद नसताना सुध्दा दोन कंत्राटदारांना रु. ३२.७२ कोटीचे कार्य अग्रीम प्रदान करण्याचा परिणाम त्यांना गैरवाजवी वित्तीय सहाय्य देण्यात झाला.

शासनाने आदेश दिले (मार्च,२०००) की, कंत्राटात सुसज्यता अग्रीम/यंत्रसामग्री अग्रीम देण्यासंबंधात कुठलाही खंड अंतर्भूत नाही. जिगांव पाटबंधारे प्रकल्प, नांदुरा येथे कंत्राटदाराला नियमबाह्य अग्रीम प्रदान करण्याच्या दोन घटना खालील चर्चिल्याप्रमाणे लेखापरीक्षणात दिसून आल्या.

(अ) कार्यकारी अभियंता, मन प्रकल्प विभाग (EE), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ (VIDC) यांनी मातीचे धरण, उत्प्लव मार्ग, विभागणी भिंत, पोच आणि अंत कालवा बांधण्याचे काम एका कंत्राटदाराला रु. २१६.४५ कोटी या अंदाजित किंमतीच्या ३०.४० टक्के जास्त दराने ६० महिन्यात पूर्ण करण्याकरिता दिले (नोव्हेंबर, २००६). वन विभागाकडून आवश्यक जमिनीसाठी (१६५५७ हेक्टर्स), ना हरकत प्रमाणपत्र न घेता हे काम दिले गेले. कंत्राटाच्या अटीप्रमाणे, वन जमिनीचे ना हरकत प्रमाणपत्र मिळाले नाही याबाबतचा कुठलाही दावा विचारात घेतला जाणार नाही.

विभागाच्या अभिलेखांच्या (मार्च व नोव्हेंबर, २००८) तपासणीत असे उघडकीस आले की, कंत्राटदाराला मनुष्यबळ व यंत्रसामुग्रीच्या सुसज्जतेसाठी रु.२८.२२ कोटीचे अग्रीम कंत्राटात कुठल्याही प्रकारचे अग्रीम देण्याची तरतूद नसताना सुध्दा प्रदान केले गेले (नोव्हेंबर, २००६) आणि कंत्राटदाराची अग्रीम देण्याची विनंती आधी बोलीपूर्व बैठकीत नाकारली होती (जून, २००६). हे अग्रीम ४० हप्त्यात ११.९५ टक्के व्याजासह वसूल करावयाचे होते. कंत्राटदाराने रु.३४.०९ कोटीची पहिल्या हप्त्याची तारीख ३० डिसेंबर, २००६ ला परिणामकारक असणारी बँक गॅरंटी दिली आणि मुद्दल व व्याजाचा प्रतिपूर्तीसाठी पुढील तारखा असलेले ४० धनादेश कार्यकारी अभियंत्याला सादर केले.

असे दिसून आले की, कंत्राटदाराच्या खात्यात पुरेशी रक्कम नसल्यामुळे बँकेला सादर केलेले धनादेश (जानेवारी-एप्रिल २००७) नाकारले गेले. तथापि, VIDC ने कंत्राटदाराची हप्त्याच्या पुनर्बांधणीची विनंती वन विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्राच्या अनुपलब्धतेमुळे मान्य केली (जून २००७). अग्रीम आणि व्याजाच्या परतफेडीची पुर्नबांधणी डिसेंबर,२००७ पासून केली गेली. कंत्राटदाराने पुन्हा (जानेवारी, २००८) चालू लेखा बिलातून वसुलीच्या पुनर्बांधणीची विनंती केली. VIDC ने वनजमिन मुक्त झाली नसल्याचा विचार करुन कंत्राटदाराची विंनंती पहिल्या चालू लेखा बिलातून अग्रीमाच्या वसूलीची पुर्नबांधणी करुन मंजूर केली (ऑगस्ट, २००८). प्रस्तावित परतफेड चालू लेखा बिलातून न झाल्यास शिल्लक रकमेवर दोन टक्के दंडनीय व्याज लावावयाचे होते.

वन विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र नोव्हेंबर, २००८ मध्ये प्राप्त झाले. असे दिसून आले की, कंत्राटदाराकडून मुद्दल व व्याजापोटी रु. ९.७५ कोटी वसूल केले गेले आणि व्याजासह उर्वरित रक्कम रु. २७.२८ कोटी मार्च, २००९ पर्यंत वसूल व्हावयाची होती.

(ब) याच प्रकल्पाकरिता Radial gate, Stop-log gate and Hoisting Arrangement तयार करण्याचे रु. ७४.११ कोटी अंदाजित किंमतीचे काम दुसऱ्या कंत्राटदाराला रु. ७७.७९ कोटीला दिले गेले (१ नोव्हेंबर, २००७).

अग्रीम प्रदान करण्याकरिता कंत्राटात तरतुद नसतानाही कामाच्या जागी मनुष्यबळ व यंत्रसामुग्रीच्या सुसज्जतेसाठी कंत्राटदाराने विनंती केली (१२ नोव्हेंबर, २००७). कंत्राटात तशी तरतूद नसल्यामुळे कार्यकारी अभियंत्याने कंत्राटदाराची विनंती नाकारली होती (नोव्हेंबर, २००६). तथापि, अधिक्षक अभियंता आणि मुख्य अभियंता, अमरावती यांच्या प्रस्तावावर महामंडळाने कंत्राटदाराला रु. ७.७८ कोटीचे अग्रीम मंजूर केले (डिसेंबर, २००७) जे चालू लेखा बिलातून प्रचलित Prime Lending Rate आणि थकीत रकमेवर दोन टक्के दंडनीय व्याजाने वसूल करावयाचे होते. मार्च, २००८ मध्ये रु. ५.५० कोटी अग्रीमाचे प्रदान केले गेले, काम चालू होते आणि फेब्रुवारी, २००९ पर्यंत रु. ३.१८ कोटी वसूल केले गेले होते.

अशाप्रकारे शासनाच्या निर्देशांचे आणि कंत्राटातील शर्तीचे उल्लघंन करुन कंत्राटदाराची विनंती मान्य करण्याचा परिणाम कंत्राटदारांना रु. ३३.७२ कोटीचे अवाजवी वित्तीय सहाय्य देण्यात झाला.

कार्यकारी अभियंत्याने नमूद केले (ऑक्टोबर, २००८) की, अग्रीम हे कंत्राटदाराच्या विनंतीप्रमाणे VIDC चे मान्यतेनंतर देण्यात आले. VIDC चे उत्तर प्रतिक्षित होते (ऑगस्ट, २००९).

ही बाब शासनाच्या प्रधान सचिवाकडे मार्च, २००९ मध्ये निर्देशित करण्यात आली. उत्तर आलेले नव्हते (ऑक्टोबर, २००९).

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंपदा विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला.

जिगांव प्रकल्पाचे काम गतीने होण्याकरिता कंत्राटदारास मनुष्यबळ व यंत्रसामुग्री सुसज्ज करुन आवश्यक मुलभूत सोई उपलब्ध होण्याकरीता व्याज आकारणीसह परतफेडीच्या अटीवर विशेष बाब म्हणून अग्रीम मंजूर करण्यात आले आहे. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या अधिनियम, १९९७ मधील परिच्छेद १९ (i) "(आय) ज्या करिता महामंडळाची स्थापना करण्यात आली अशा उद्दीष्टांना चालना देण्यासाठी आवश्यक असतील अशा कोणत्याही बाबीकरीता आवश्यक किंवा हितावह असतील अशा महामंडळाच्या प्रकल्पाची कामे करणाऱ्या कंत्राटदारांना सव्याज रोख कर्ज देण्यासह इतर गोष्टी करणे व अशी सर्व कामे पार पाडणे" अशी तरतूद होती. अग्रीमाची वसुली नियमानुसार करण्यात येत असल्याने तसेच अग्रीमावर व्याज आकारात असल्याने शासनाचे कोणतेही नुकसान होत नाही.

तसेच "जलसंपदा विभागाकडील पाटबंधारे प्रकल्पाच्या कामाच्या निविदामध्ये कंत्राटदारला कोणत्याही प्रकारचे Mobilisation advance व Machinary advance देण्याची तरतूद करण्यात येऊ नये व देण्यात येऊ नये" असा धोरणात्मक निर्णय दिनांक २२.१०.२०१० च्या शासन निर्णयाअन्वये घेण्यात आला आहे.

उपरोक्त अभिप्रायासह महालेखापाल यांनी उपस्थित केलेला आक्षेप खालीलप्रमाणे आहे.

शासनाच्या निर्देशाचा तसेच निविदेतील अटी व शर्तीचा भंग करुन दिलेल्या अग्रीमाबाबतची कारणमिमांसा शासनाच्या ज्ञापनामध्ये अंतर्भूत करण्यात यावी.

नागरी परिच्छेद ३.२.४ मध्ये उल्लेखित उपरोक्त आक्षेपावरील अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

१.००- तापी खोऱ्यातील पूर्णा नदीवर बुलढाणा जिल्ह्याच्या नांदुरा तालुक्यात जिगांव या गावाजवळ जिगांव हा मोठा पाटबंधारे प्रकल्प बांधकामाधीन आहे. या प्रकल्पास शासनाने

जानेवारी, १९९६ मध्ये रु. ६९८.५० कोटी रुपयास नव्याने प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. सदर प्रकल्पास महामंडळाने दिनांक २४.०६.२००९ च्या निर्णयानुसार रु. ४०४४.१३ कोटीस व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. या प्रकल्पामुळे बुलढाणा जिल्ह्याच्या ६ तालुक्यातील २६८ गांवे व अकोला जिल्ह्याच्या २ तालुक्यातील १९ गांवे अशा एकूण २८७ गावांच्या ८४२४० हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

२.००-मे.पी.व्ही.आर.पी.एल. व ए.पी.आर.सि.एल (जेव्ही) पुणे यांना जिगांव प्रकल्प मुख्य धरणाचे काम करारनामा क्र.ब.१/१० डि.एल/२००६-०७ अंतर्गत देण्यात आले आहे. सदर कामाचे आदेश दिनांक ०१.११.२००६ रोजी देण्यात आले असून दिनांक ३०.११.२००८ पासून काम प्रगतीपथावर आहे. तसेच जिगांव प्रकल्पाचे वक्रव्दारांचे काम करताना क्र.ब.१/१८/डिएल/२००७-०८ अंतर्गत कंत्राटदार मे.एस.एस.फॅब्रीकेटर्स ॲन्ड मॅन्युफॅक्चर्स (जेव्ही) नागपूर यांना दिनांक ०१.११.२००७ चे आदेशान्वये देण्यात आले असून दिनांक ३०.११.२००८ पासून काम प्रगतीपथावर आहे.

३.००-विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने वरील नमूद कामास अनुक्रमे २८.२२ कोटी व ५.५० कोटीचे अग्रीम मंजूर केलेले आहे. धरणाच्या कंत्राटदाराच्या निविदा पूर्व परिषदेमध्ये कत्राटदाराने work advance बाबत मागणी केली होती. सदर अग्रीमाची तरतूद निविदेत करणे शक्य नसल्याचे कंत्राटदारास अवगत करण्यात आले होते. करारनाम्यात अग्रीम देण्याबाबतची तरतूद नाही. तथापि, जिगांव प्रकल्पाची कामे गतीमान होण्याकरिता कंत्राटदारास मनुष्यबळ व यंत्रसामुग्री सुसज्ज करुन आवश्यक मूलभूत सोई सुविधा उपलब्ध होण्याकरिता तसेच निधी उपलब्ध असल्याने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळच्या वेगळा करारनामा करुन सुसज्जता अग्रीम देण्यात आले.

जिगांव प्रकल्पाचे काम गतीमान होण्याकरिता कंत्राटदारास मनुष्यबळ व यंत्र सामुग्री सुसज्ज करुन आवश्यक मुलभूत सोयी उपलब्ध होण्याकरिता व्याज आकारणीसह परतफेडीच्या अटीवर अग्रीम विशेष बाब म्हणून मंजूर करण्यात आले आहे. महामंडळाचा अधिनियम, १९९७ मधील १९ (२) आय नुसार महामंडळाच्या उद्दिष्टांना चालना देण्यासाठी, महामंडळाच्या प्रकल्पाची कामे करणाऱ्या कंत्राटदारांना सव्याज रोख कर्ज देण्याची तरतूद आहे.

३.०१- सदर प्रकल्पास वन जमिनीची मान्यता मिळाल्यानंतर लगेच काम सुरु होईल असे अपेक्षित होते. तथापि, वन जमिनीस मान्यता मिळण्यास विलंब झाला व त्यामुळे पुढे काम सुरु होण्यास विलंब झाला. पर्यायाने अग्रीमाचे वसुलीचा पुननिर्धारणाचा निर्णय कंत्राटदाराने न्यायोचित मागणीमुळे महामंडळाच्या सक्षम प्राधिकरणाने मंजूर केला.

३.०२- अग्रीमावर व्याज आकारण्यात येत असल्याने व अग्रीम हे कामास गती देण्याचे उद्दिष्टाने विशेष बाब म्हणून मंजूर करण्यात आलेले असल्याने तसेच अग्रीम भूगतानापूर्वी अग्रीम रक्कम अधिक व्याज परतफेडीच्या कालावधीपर्यंत येणाऱ्या व्याजाची रक्कम, एवढ्या एकूण रकमेची राष्ट्रीयकृत बँकेची विहीत नमून्यातील बँक गॅरंटी कंत्राटदाराकडून घेण्यात येत असल्याने सदर अग्रीमास कंत्राटदारास दिलेली गैरवाजवी वित्तीय सहाय्यतास म्हणणे उचित होणार नाही.

४.००- अग्रीम मंजूरीच्या मूळ अटीनुसार अग्रीम परत फेडीबाबतचे कंत्राटदाराने विभागास सादर केलेल्या ४० पोस्ट डेटेड धनादेशापैकी ८ धनादेश बँकेकडून खात्यावर पैसे शिल्लक नसल्याने परत झाले होते. तथापि, महामडळाचे दिनांक ०२.०८.२००८ च्या पत्रान्वये वसुलीच्या पुननिर्धारीत प्रस्तावास दिलेल्या मंजूरीनुसार सदर वसुली ही काही अटीच्या अधिन राहून कंत्राटदाराच्या चालू देयकातून थेट करावी असे निर्देश दिले.

सदर अटी व निर्देशानुसार विभागाने सदर कंत्राटदाराकडून मूळ मुद्दल व व्याजाची वसुली प्रत्येक चालू देयकातून सुरु केली आहे.

५.०- सद्य:स्थितीत प्रकल्पाचे काम प्रगतीत आहे व सदर अग्रीमाची वसुली कामाचे देयकातून ५० टक्के काम पूर्ण होईपर्यंत करण्यात येणार आहे. वरील कामाचे कंत्राटदाराकडून ०८/२०११ पर्यंत अग्रीम व त्यावरील व्याज याबाबतची वसुली पुढीलप्रमाणे झाली आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अग्रीम वसूली	व्याज वसूली	शिल्लक मुद्दल
१	मुख्य धरणाचे काम (अग्रीम रु.२८.२२ कोटी)	रु.१३.०७ कोटी	रु.१५.८८ कोटी	रु.१५.१५ कोटी
२	सांडव्यावरील वक्रव्दारांचे काम (अग्रीम रु.५.५० कोटी)	रु.२.८२ कोटी	रु.१.२० कोटी	रु.२.६८ कोटी

६.००- अग्रीमाची वसूली नियमानुसार करण्यात येत असल्याने व कंत्राटदारास अग्रीम मंजूरीमुळे शासनाचे कोणतेही नुकसान होत नाही.

याबाबत महालेखापालांनी पुन्हा आक्षेप काढले आहेत.

"शासनाचे निर्देश व निविदा कराराचा भंग करुन अग्रीम देण्यात आल्यामुळे परिच्छेद कायम राहतो"

सदर बाबत शासनाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ मध्ये ज्या करिता महामंडळाची स्थापना करण्यात आली अशा उद्दीष्टांना चालना देण्यासाठी आवश्यक असतील अशा प्रकरणी तसेच प्रकल्पास गती देण्यासाठी कंत्राटदारांना सव्याज कर्जे देण्याची तरतूद आहे. सदर अग्रीमावर व्याज मिळत असल्याने हे कंत्राटदारास मदत ठरत नाही. तसेच यामुळे शासनाचे कोणतेही नुकसान झाले नाही. तरी सदर परिच्छेद वगळण्यात यावा.

साक्ष

उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात विभागाने पुरविलेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहितीसाठी समितीने दिनांक २९ मे, २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्या बैठकीत समितीने विभागीय सचिवांना उक्त परिच्छेदाच्या अनुषंगाने पार्श्वभूमी विशद करण्यास सांगितले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, जिगांव प्रकल्प हा बुलढाणा जिल्ह्यातील प्रकल्प आहे. या प्रकल्पाला मिळालेली मूळ प्रशासकीय मान्यता व्यपगत झाल्यामुळे या प्रकल्पास १९९४-९५ च्या दर सूचीनुसार जानेवारी-१९९६ मध्ये रु.६९८.५० कोटी रुपयांची नव्याने प्रशासकीय मान्यता देण्यात आली. तदनंतर विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने दि.२४ जून, २००९ रोजी या प्रकल्पास रु.४०४३.१४ कोटी रुपयांची द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान केली. या प्रकल्पामध्ये मुख्यत: मातीचे धरण, सांडव्याची कामे आहेत. हा प्रकल्प बुलढाणा जिल्ह्यातील सर्वात मोठा एकमेव प्रकल्प होणार आहे. तापी नदीची उपनदी असलेल्या पूर्णा नदीवर हा प्रकल्प होत आहे. या प्रकल्पाची साठवण क्षमता ७३६ द.ल.घ.मी. आहे. तसेच प्रकल्पाची सिंचन क्षमता १ लाख १ हजार ८८ हेक्टर आहे. या प्रकल्पाचा पाणी वापर मुख्यत: उपसा सिंचनाद्वारे होणार असून या प्रकल्पाला धरणातून कॅनॉलची व्यवस्था नाही. जमीन संपादन करण्यास लोकांचा होत असलेला विरोध आणि वन जमिनीची अडचण या सर्व बाबींमुळे प्रकल्पाचे काम प्रत्यक्षात २००८ मध्ये सुरु झाले. धरण आणि लिफ्टची कामे सुरु आहेत.

जिगांव प्रकल्पाच्या रु.६९८.५० कोटी प्रकल्पास जानेवारी १९९६ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली व त्यानंतर २४ जून, २००९ रोजी रू. ४०४४.१३ कोटी एवढया खर्चाच्या सुधारित प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या १३ वर्षांच्या कालावधीत रू.३३४६ कोटी एवढी खर्चात वाढ होण्याची कारणे काय आहेत? अशी विचारणा समितीने केली असता याबाबतची लेखी माहिती विभागाकडून खालीलप्रमाणे प्राप्त झाली.

प्रकल्पाच्या किमतीतील वाढीबाबत प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१) दरसुचीतील वाढ - रु. १४५७.९४ कोटी

२) भूसंपादन, पुनर्वसन, वन जमिन व एन.पी.व्ही. मुळे - रु. १२०१.७१ कोटी

३) संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली वाढ - रु. २३३.६२ कोटी

४) इतर कारणांमुळे झालेली वाढ - रु. ४५२.३७ कोटी

(इतर कारणांमध्ये प्रामुख्याने आस्थापना खर्च रु. १९७.६८ कोटी, सविस्तर सर्व्हेक्षणामुळे रु. १.८४ कोटी, नविन बाबींच्या समावेशामुळे रु. १९७.२५ कोटी)

सन १९९६ ते सन २००९ या कालावधीत सदर प्रकल्पाबाबत कोणती कार्यवाही विभागाने केली होती ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाकडून प्राप्त झालेले लेखी उत्तर पुढील प्रमाणे आहे.

सन १९९८-९९ मध्ये या प्रकल्पास प्रथमतः आर्थिक तरतूद करण्यात आली त्यानंतर बुडीत क्षेत्राचे, लाभ क्षेत्राचे सविस्तर सर्व्हेक्षणाचे काम हाती घेण्यात आले तसेच धरण बांधकामासाठी आवश्यक भूस्तर वर्गीकरण करुन संकल्पन अंतिम करण्याचे काम हाती घेण्यात आले. दरम्यानच्या कालावधीत प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे प्रकल्पाच्या सर्व्हेक्षणात व इतर कामांमध्ये अडथळा निर्माण झाला. प्रकल्पाला असलेला प्रखर विरोध लक्षात घेता दिनांक ०७/१०/२००३ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न होऊन प्रकल्पाचे पुर्ननियोजन करण्याबाबत निर्देश प्राप्त झाले. त्याअनुषंगाने धरणाची उंची १.५९ मी. कमी करुन तथापि पाणीसाठा कायम ठेऊन सविस्तर अहवालास शासन स्तरावरुन दिनांक १५/१२/२००४ च्या पत्रान्वये तत्वतः मान्यता घेण्यात आली. सदर तत्वतः मान्यतेनुसार दिनांक २०/१०/२००५ अन्वये सुधारीत प्रशासकीय मान्यता घेण्यात आली या मान्यतेनुसार बाधित गावांची संख्या ५६ वरुन ४७ व बुडीत क्षेत्र १८९३७ हे. वरुन १४५६७

हे. असे कमी झाले. त्यानंतर भूसंपादन व पुनर्वसन अधिनियमांतर्गत कलम ११ व कलम १३ अंतर्गत कार्यवाही करण्यांत आली. पर्यावरण विषयक मान्यतेसाठी आवश्यक लोकसुनावणीची प्रक्रीया करुन दिनाक ११/०५/२००७ अन्वये मान्यता प्राप्त करण्यात आली. पुनर्नियोजनानुसार आवश्यक वनजमीनीच्या प्रस्तावात सुधारणा करुन वन प्रस्ताव मान्यतेसाठी पाठपुरावा करण्यात आला. सन २००८-०९ मध्ये बाधीत गावठाण ३१ भूसंपादन प्रस्ताव व १३ नविन गावठाणासाठी आवश्यक भूसंपादन प्रस्ताव सादर करुन पुनर्वसनाबाबत कार्यवाही सुरु करण्यात आली. माहे नोव्हेंबर, २००८ मध्ये वन प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर प्रत्यक्ष धरण बांधकामास सुरुवात करण्यात आली.

या प्रकल्पावर आतापर्यंत किती खर्च झाला आहे व या प्रकल्पाचे काम किती टक्के पूर्ण झाले आहे ? प्रकल्पाच्या खर्चात वाढ प्रस्तावित आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता याबाबतची प्राप्त झालेली लेखी माहिती खालीलप्रमाणे आहे.

"या प्रकल्पावर मार्च २०१३ पर्यंत रु. १३३२.८२ कोटी इतका खर्च झालेला आहे. धरण व उपसा सिंचन योजना मिळून सरासरी ३४ टक्के काम पूर्ण झालेले आहे. द्वितीय सुप्रमा हि सन २००८-०९ च्या दरसुचीवर प्रदान करण्यात आली असून भाववाढीमुळे यामध्ये वाढ होणे अपेक्षित आहे."

या प्रकल्पाच्या दोन कंत्राटदारांना अग्रिम दिल्याबाबतचा हा परिच्छेद आहे. कामाच्या निविदेमध्ये तरतूद नसताना कंत्राटदारांना अग्रिम देण्यात आला असा महालेखापरीक्षकांनी आक्षेप घेतलेला आहे. कंत्राटदारांना अग्रिम दिल्याबाबत विभागाने वेळोवेळी खुलासा केलेला आहे. निविदेमध्ये उल्लेख नसताना अग्रिम दिला ही वस्तुस्थिती आहे. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ हे कायद्याने स्थापन झाले आहे. महामंडळाच्या अधिनियम १९९७ मधील परिच्छेद १९ (i) हे कलम प्रकल्पाचे काम सुरु ठेवण्याबाबत किंवा महामंडळाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कंत्राटदारांना सव्याज रोख कर्ज देण्याबाबतचे आहे. या अनुषंगाने कंत्राटदारांना अग्रिम दिला आहे. एका कामाची अंदाजित निविदा किंमत २८२ कोटी रुपये आहे. पहिल्या कंत्राटदाराला २८.२२ कोटी रुपये अग्रिम दिला आहे. त्यापैकी प्रत्यक्ष वसुली २३.९८ कोटी रुपयांची झाली आहे. अग्रिम म्हणून दिलेली रक्कम व्याजासह वसुल करण्याचे ठरविण्यात आले होते. त्यानुसार दिलेल्या अग्रिमच्या व्याजापोटी १८.३८ कोटी रुपये जमा

झाले आहेत. सध्या अग्रिमची मुद्दल ४ कोटी २४ लाख रुपये वसूल होणे बाकी आहे. दुसरी निविदा सांडव्याच्या दरवाजाच्या कामांबाबतची होती. त्या निविदेची किंमत ८७.७९ कोटी रुपये होती. या कामाच्या कंत्राटदारास ५.५० कोटी रुपये अग्रिम दिला होता. त्यापैकी २.८२ कोटी रुपये वसूल झाले आहेत. तसेच व्याजापोटी १ कोटी २० लाख रुपये वसूल झाले आहेत. आता २ कोटी ६८ लाख रुपये वसूल होणे बाकी आहेत. परंतु नियमात नसताना कंत्राटदारांना अग्रिम दिला गेला निविदेमध्ये अग्रिम देण्याबाबतचा उल्लेख नव्हता ही वस्तुस्थिती आहे. परंतु जिगांव हा प्रकल्प बुलढाणा जिल्ह्यातील एकमेव मोठा प्रकल्प असल्यामुळे तो लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी कंत्राटदारांना अग्रिम दिला होता, प्रकल्पाचे काम ५० टक्के पूर्ण होईपर्यंत संपूर्ण अग्रिम व्याजासह वसूल करण्याचे नियोजन आहे.

कंत्राटात तरतुद नसतांना सुद्धा दोन कंत्राटदारांना जिगांव प्रकल्पासाठी रु.३३.७२ कोटीचे कार्य अग्रीम प्रदान करण्यात आले आहे. कंत्राटदाराची क्षमता विचारात घेऊन काम देण्यात येत असल्याने विभागाने मनुष्यबळ व यंत्र सामुग्रीसाठी तसेच वन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र मिळाले नाही म्हणून कंत्राटदारास अग्रीम दिला आहे हा खुलासा संयुक्तिक नाही. या प्रकरणी जे संबंधित अधिकारी आहे त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे.

"जिगाव प्रकल्प हा मोठा प्रकल्प असून विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यात सिंचन अनुशेष निर्मुलनासाठी एक महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. या भागातील शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळण्यासाठी सक्षम कंत्राटदारांची निवड निविदा बोलावून करण्यात आली होती. या धरणाचे काम मोठे स्वरुपाचे असल्याकारणाने मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ व यंत्रसामुग्रीची गरज भासणार होती. कामाला गती देण्याच्या दृष्टीने व काम जलद गतीने होण्यासाठी मोठ्या प्रमाणावर यंत्र सामुग्री लागत असल्याने कंत्राटदाराने अग्रीमाची मागणी केली होती व त्यास महामंडळाच्या अध्यक्षांच्या मान्यतेने सव्याज सुसज्जता अग्रीम महामंडळास प्रदान केलेल्या अधिकाराच्या महामंडळाच्या कायद्यातील कलम १९ (२) अन्वये मान्य करण्यात आले त्यामुळे कोणत्याही अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही."

प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंत्यांनी कंत्राटदारांना अग्रिम रक्कम देऊ नये अशा प्रकारचे लेखी पत्र देऊन सुध्दा विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर

दबाव आणून अग्रिम देण्यास भाग पाडले. विधीमडळाच्या सभागृहातसुध्दा हा विषय चर्चेला आल्यानंतर विभागाच्या मंत्री महोदयांनी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई न करता कार्यकारी अभियंत्यांना निलंबित केले. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी या संदर्भात सांगितले की, अग्रिम देण्याबाबत मुख्य अभियंत्यांनी महामंडळाच्या कार्यकारी संचालकांकडे शिफारस केली होती. तद्नंतर महामंडळाने त्यांच्या अधिकारात सव्याज अग्रिम मंजूर केला. त्यानुसार कंत्राटदारांना दिलेला अग्रिम व्याजासह वसूल करण्यात येणार आहे.

ज्या अधिकाऱ्यांनी कार्यकारी अभियंत्याचे मत डावलून कंत्राटदारांना अग्रिम दिला त्यांच्यावर कारवाई न करण्याची कारणे काय आहेत ? कंत्राटदारांना अग्रिम देणे ही गंभीर बाब आहे. काम सुरु होण्याच्या दोन वर्षांपूर्वी कंत्राटदारांना अग्रिम देण्यामागचा उद्देश काय होता ? अशी विचारणा समितीने केली असता या संदर्भात विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही.

तसेच या प्रकल्पाच्या कंत्राटदारांना सन २००६ मध्ये अग्रिम दिला होता. प्रत्यक्षात प्रकल्पाचे काम नोव्हेंबर-२००८ मध्ये सुरु झाले. याचाच अर्थ काम सुरु होण्याच्या दोन वर्षांपूर्वी अग्रिम दिला गेला. आताच विभागाच्या सचिवांनी सांगितले की, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या अधिनियमातील तरतुदीनुसार कामाला गती देऊन काम पूर्ण करण्यासाठी अग्रिम देता येतो. परंतु ज्या वेळी अग्रिम दिला होता त्या वेळी प्रकल्पाचे कामच सुरु झाले नव्हते. ही वस्तुस्थिती महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ही घटना सन २००५-०७ च्या काळातील आहे. अग्रिम देण्याबाबत महामंडळाच्या स्तरावरुन निर्णय झाला होता.

प्रकल्पाचे काम गतीने होण्यासाठी अशा प्रकारचा अग्रिम देण्याची तरतूद महामंडळाच्या अधिनियमात आहे. परंतु या प्रकरणी काम सुरु केलेले नसताना अग्रिम देण्यात आला आहे. महामंडळाच्या अधिनियमात कंत्राटदारांना अग्रिम देण्याची तरतूद असेल तर त्या बाबतचा उल्लेख निविदा नोटीसमध्ये का केला जात नाही ? असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, जलसंपदा विभागाच्या प्रकल्पाच्या निविदांमध्ये कंत्राटदाराला कोणत्याही प्रकारचा Mobilisation Advance व Machinary Advance देऊ नये याबाबतचा धोरणात्मक निर्णय शासनाने दि.२२ ऑक्टोबर,

२०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार घेतला आहे. सर्व महामंडळांना सर्व कामांसाठी हा निर्णय बंधनकारक आहे.

कंत्राटदारांना कंत्राटे कशाच्या आधारे देण्यात आली ? या करीता निविदा प्रक्रियेचा अवलंब करण्यात आला होता काय ? असल्यास, किती निविदाकारांनी त्यामध्ये भाग घेतला होता ? अशी विचारणा समितीने केली असता विभागाकडून प्राप्त झालेले लेखी उत्तर खालीलप्रमाणे आहे.

अ) धरण व सांडव्याच्या बांधकामासाठी व्यापक प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. हि जाहिरात शासनाच्या संकेतस्थळावर दिनांक २१/०३/२००६ रोजी प्रसिध्द केली होती, तसेच ५ दैनिक वर्तमानपत्रातसुध्दा सदर निविदेची प्रसिध्दी देण्यात आली होती. (वर्तमान पत्रांची नावे सोबत जोडली आहे. प्रपत्र १) प्रसिध्दीस ११ कंत्राटदारांनी पूर्व अर्हता पात्रतेसाठी अर्ज केले. त्यातील ४ कंत्राटदार पात्र ठरले व या ४ कंत्राटदारांपैकी ३ कंत्राटदारांनी दिनांक ११/०७/२००६ रोजी निविदा सादर केल्या. यामध्ये सर्वात कमी दराची निविदा मे.पी.व्ही.आर.पी.एल ॲण्ड मे.ऐ.पी.आर.सी.एल. (जेव्ही) पुणे यांची ३४ टक्के अधिक दराची निविदा न्युनतम आढळली.

ब) द्वारनिर्मिती व उभारणीच्या कामाकरीता निविदा व्यापक प्रसिध्दीसह बोलाविण्यात आली होती ही जाहिरात शासनाच्या संकेतस्थळावर दिनांक २७/०४/२००७ रोजी प्रसिध्द केली गेली तसेच ४ दैनिक वर्तमान पत्रात दिनांक २५/०५/२००७ रोजी प्रसिध्दी देण्यात आली होती. पुर्व अर्हता पात्रतेसाठी १५ कंत्राटदारांनी अर्ज केले होते त्यापैकी ३ कंत्राटदार पात्र ठरले याच ३ कंत्राटदारांनी दिनांक २५/०६/२००७ रोजी निविदा सादर केल्या. यामध्ये न्यूनतम दर मे.एस.एस.फॅब्रीकेटर ॲण्ड मॅन्यूफॅक्चरर्स (जेव्ही) नागपूर याची २२.७९ टक्के अधिक दराने निविदा न्यूनतम आढळली.

शासनाचे धोरण "आधी पुनर्वसन आणि नंतर धरण" अशा स्वरुपाचे आहे. सद्य:स्थितीत जिगांव प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनीचे भूसंपादन होणे बाकी आहे. सरकारने काही लोकांच्या जमिनी ताब्यात घेतल्या आहेत, परंतु त्यांना जमिनीचा मोबदला मिळाला नाही. एका बाजूला शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला दिला जात नाही आणि दुसऱ्या बाजूला मात्र कंत्राटदारांना अग्रिम देण्याचे काम सुरु आहे. ही बाब गंभीर आहे. जिगांव प्रकल्पामध्ये ६० गावे बाधित होणार आहेत. परंतु अजूनपर्यंत एकाही गावाचे पूर्णपणे

पुनर्वसन झालेले नाही. बहुतांश शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या नाहीत. शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला न देता कंत्राटदारांना अग्रिम देण्याचे कारण काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, जिगांव प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर जमीन लागणार आहे ही वस्तुस्थिती आहे. या प्रकल्पाचे लाभक्षेत्र १ लाख १ हजार हेक्टर आहे. त्यातून ७३६.५१९ द.ल.घ.मी. पाणी साठा होणार आहे. सद्यःस्थितीत बाधित कुटुंबांची संख्या ८ हजार असून, बाधित लोकसंख्या २७,६०० आहे. या प्रकल्पासाठी ११८६ हेक्टर सरकारी जमीन लागणार असून, आजच्या घडीला ७७५ हेक्टर जमीन ताब्यात मिळाली आहे. तसेच १०५६ हेक्टर वन जमीन लागणार असून ती जमीन देण्यास तत्वतः मान्यता मिळाली आहे. खाजगी जमीन १३,५१० हेक्टर लागणार असून, प्रत्यक्षात अद्यापपर्यंत ४७० हेक्टर जमीन ताब्यात आली आहे. रितसर भूसंपादन करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविला आहे. भूसंपादनाबाबत वेगवेगळ्या टप्प्यावर कार्यवाही सुरु आहे. या प्रकल्पामध्ये मोठ्या प्रमाणावर भूसंपादन करावे लागत असल्यामुळे कामास थोडा विलंब लागत आहे.

सन २००८ सालापासून भूसंपादनाचे काम सुरु आहे. आज १३ वर्षे होत आली तरीसुध्दा अजूनही भूसंपादनाची कार्यवाही सुरुच आहे. प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन झाले नाही. तसेच वन विभागाच्या जमिनीला क्लिअरन्स मिळाला नसताना या कामाची निविदा काढून अग्रिम देण्याची काय आवश्यकता होती ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी याबाबत खुलासा करताना सांगितले की, प्रकल्पाचे भूसंपादन, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन आणि प्रकल्पाची महत्त्वाची कामे एकाच वेळी सुरु करण्याची पध्दत पूर्वी राज्यभर वापरली जात होती. या पध्दतीनुसार काही ठिकाणी प्रकल्पाची कामे सुरु झाली आणि काही काळानंतर ती बंद पडली. काही ठिकाणी कामे सुरुच झाली नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. जिगांव प्रकल्पासाठी जमिनी देण्यास तेथील लोकांचा तीव्र विरोध होता. परंतु आता हळूहळू लोक जमिनी देण्यासाठी पुढे येत आहेत.

जिगाव प्रकल्पासाठी जमिनी देण्यासंदर्भात समितीने विभागाच्या निदर्शनास आणले की, या जिगांव प्रकल्पासाठी जमिनी द्याव्यात म्हणून लोकप्रतिनिधी शेतकऱ्यांसोबत वारंवार बैठका घेऊन त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे आता त्या लोकांचा जमिनी देण्यास विरोध नाही. परंतु विभागाने काम सुरु होण्यापूर्वीच कंत्राटदाराला कोट्यवधी रुपयांचा अग्रिम दिला.

पण विभागाने भूसंपादनासाठी आवश्यक ती रक्कम जिल्हाधिकाऱ्यांकडे जमा केली नाही तर भूसंपादन कसे होईल ? भूसंपादनापोटी विभागाने आतापर्यंत किती निधी वितरित केला आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, भूसंपादनाची १२,२७४ हेक्टर जमिनीची २५५ प्रकरणे जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविली आहेत. तसेच संयुक्त मोजणीची ९९ प्रकरणे आहेत. व भूसंपादनासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे ११४ कोटी रुपये जमा केले आहेत. जिगांव प्रकल्पात मोठ्या प्रमाणावर भूसंपादन करावे लागणार असल्यामुळे टप्प्याटप्प्याने भूसंपादन करण्यात येणार आहे. द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार भूसंपादन, वन जमीन आणि पुनर्वसनाच्या कामावर होणारा अंदाजित खर्च १३१० कोटी रुपये आहे.

सन २०१२-१३ मध्ये अर्थसंकल्पामध्ये किती तरतूद केली आहे, मागील वर्षी किती तरतूद होती ? या तरतुदीबाबत बायफर्गेशन प्लॅन तयार केलेला नाही का ? असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यावर्षी या प्रकल्पासाठी १६७ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. तसेच जो निधी उपलब्ध असतो त्यात प्रथम प्राधान्य भूसंपादनासाठी देतो. जिल्हाधिकाऱ्यांकडे ११४ कोटी रुपये भूसंपादनासाठी आगाऊ रक्कम जमा केली आहे. या वर्षीच्या निधीमधून ५० टक्के रक्कम भूसंपादन आणि पुनर्वसनाच्या कामासाठी दिली आहे. निश्चितपणे भूसंपादन आणि पुनर्वसनाच्या कामाला प्राधान्य दिले जाते. जो निधी उपलब्ध आहे त्यातून याच कामासाठी प्राधान्याने निधी देण्याच्या सूचना महामंडळाला दिल्या जातात.

मोबिलायझेशन अग्रिम कशासाठी दिला गेला? काम सुरु होण्यासारखी परिस्थिती नसेल तर मोबिलायझेशन ॲडव्हान्स देण्याचे कारण काय होते? हा विषय फक्त जिगाव प्रकल्पापुरता मर्यादित नसून संपूर्ण राज्याशी निगडित प्रश्न आहे. सन २०१० पूर्वी किती प्रकल्पांच्या कामासाठी मोबिलायझेशन ॲडव्हान्स दिला गेला, त्यापैकी किती प्रकल्पांचे काम अद्याप सुरु झालेले नाही ? या संदर्भातील माहिती महामंडळाकडून प्राप्त करुन ती समितीला सादर करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीला दिले पंरतु अद्यापपर्यंत उक्त माहिती अप्राप्त आहे.

मोबिलायझेशन अग्रिम संदर्भात समितीने पुढे अशी विचारणा केली की, हा अग्रिम देण्याचा उद्देश तातडीने काम सुरु होणे हा असतो. पण तशी परिस्थिती नसताना अग्रिम का

दिला? भूसंपादन झालेले नव्हते, वन विभागाची संमती मिळालेली नव्हती, काम सुरु झाले नाही. सन २०१० पूर्वी अग्रिम देण्याची जी परंपरा सुरु होती त्या अंतर्गत अग्रिम देऊनही किती प्रकल्पाची कामे अद्याप सुरु झालेली नाहीत ? काम सुरु न होता मोबिलायझेशन अग्रिम देण्यात आला याबाबत महालेखापालांनी सुध्दा आक्षेप घेतला आहे. अशा परिस्थितीमध्ये मोबिलायझेशन अग्रिम कंत्राटदाराचा फायदा होण्यासाठी त्याला दिला गेला का? कारण अग्रिम देऊन सुध्दा प्रकल्पाचे काम सुरु झालेले नव्हते. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, अग्रिम दिल्यानंतर काम सुरु झाले. सन २००६ मध्ये वर्कऑर्डर दिली काम सन २००८ मध्ये सुरु झाले. मोबिलायझेशन अग्रिम सन २००६ या वर्षाच्या शेवटी देण्यात आला. काम लवकरात लवकर सुरु व्हावे हा त्यामागील उद्देश होता. पण वन विभागाची परवानगी मिळालेली नाही, त्यामुळे काम सुरु होऊ शकणार नाही याची जाणीव विभागाला असताना अग्रिम का देण्यात आला? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, काम सुरु व्हावे या उद्देशाने अग्रिम दिला गेला. नंतर काम सुरु झाले आहे. जवळजवळ ७००० सहस्त्र घनमीटर माती काम झालेले आहे.

महामंडळाच्या कायद्यामध्ये अग्रिम देण्याची तरतूद आहे असे समितीला सांगण्यात आले. कायद्यामध्ये स्पष्टपणे तरतूद असेल तर निविदेमध्ये त्याबाबत उल्लेख का केला नाही? अशा कारणामुळे फेअर कॉम्पिटीशन होत नाही. एका-एका ठेकेदाराला २०-३० कोटी रुपये अग्रिम दिला जातो. ते बँकांकडून कर्ज घेत नाहीत. सोयीचा कंत्राटदार डोळ्यासमोर ठेवून त्याला काम द्यायचे, त्याला सर्व सुविधा उपलब्ध करुन द्यायच्या हे कितपत योग्य आहे? म्हणून फेअर कॉम्पिटीशन झाली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

सन २०१० पूर्वी सर्वांना याची माहिती होती की, टेंडर भरले आणि ते मिळाले तर अग्रिम मिळणार आहे. काम सुरु होणार असेल तरच अग्रिम देण्याची गरज असते. अग्रिम दिल्यानंतर काम सुरु झाले का? ३ वर्षापूर्वी ॲडव्हान्स घेऊन काम सुरु झाले नाही. मधल्या दोन वर्षाच्या काळात कोणाचे मोबिलायझेशन केले ? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, अग्रिम दिल्यानंतर लगेच काम सुरु झाले नाही ही वस्तुस्थिती आहे. परंतु धरणाचे माती काम मोठया प्रमाणात झालेले आहे. गेटचा पुरवठा आणि फॅब्रिकेशनचे काम झाले आहे. अग्रिम दिल्यानंतर देखील मधल्या काळात भूसंपादन, वन जमिनीचा प्रश्न होता. दोन्ही बाजूकडून प्रयत्न सुरु होते. आता लोकांची मानसिकता बदलली आहे,

सहकार्याची भूमिका दिसून येते. त्यामुळे मधल्या २-३ वर्षाच्या काळात चांगले काम झालेले आहे.

वन जमिनीची मान्यता मिळण्यापूर्वीच या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता कोणत्या आधारे देण्यात आली ? वन जमिनीची मान्यता मिळण्यास विलंब होण्याचे कारण काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागाकडून प्राप्त झालेले लेखी उत्तर खालीलप्रमाणे आहे.

प्रकल्पाच्या प्रशासकीय मान्यतेनंतरच सविस्तर सर्वेक्षण, संकल्पन, भूसंपादन, केंद्रिय जल आयोगाची मान्यता वनजमिन संपादन प्रस्ताव मान्यता इत्यादी कामे करण्यात येतात. या प्रकल्पास एकूण १०५६ हे. इतक्या मोठ्या प्रमाणात वन जमीनीचे संपादन करावयाचे होते तसेच प्रकल्पातील विरोधामुळे प्रकल्पाच्या पुनर्नियोजनास माहे ऑक्टोबर, २००५ मध्ये मान्यता मिळाल्यानंतर वन प्रस्ताव सुधारीत करणे, वनप्रस्तावात वनखात्याकडून उपस्थित मुद्यांची पूर्तता करणे, एन.पी.व्ही. रकमेचा भरणा करणे व पर्यायी वनजमीन हस्तांतरीत करणे यामुळे वन जमीनीची मान्यता मिळण्यास विलंब झाला.

अग्रिमाची रक्कम कशाप्रकारे वसूल केली गेली याची आकडेवारी देण्यात आली आहे. पण ठेकेदाराने जे पोस्ट डेटेड चेक्स दिले होते त्यापैकी काही चेक्स डिसऑनर झाले हे खरे आहे काय? एकूण ४० धनादेशांपैकी ८ धनादेश बँकेकडून खात्यावर पैसे शिल्लक नसताना परत आले. हे ८ धनादेश डिसऑनर झाले त्याबाबत काय कायदेशीर कारवाई केली ? विभागीय सचिवांनी सांगितले की, सुरुवातीला जो अग्रिम दिला होता त्याबाबत निविदेमध्ये उल्लेख नव्हता. वेगळा करारनामा करुन पोस्ट डेटेड चेक्स घेऊन अग्रिम दिला होता. मधल्या काळात काम सुरु न झाल्यामुळे कॉन्ट्रॅक्टरने विनंती केली की, रिशेड्युलिंग करावे. लेखापरीक्षण झाल्यानंतर जो आक्षेप घेण्यात आला त्याबाबत विभागाने उत्तर दिले आहे. रिशेड्युलिंग केल्यानंतर मुद्दल, व्याज आणि दंडनीय व्याज देखील वसूल केले आहे. पहिल्यांदा काही चेक्स डिसऑनर झाले होते ही वस्तुस्थिती आहे. त्यानंतर रिशेड्युलिंग केले. चेक्स डिसऑनर झाल्यानंतर कायदेशीर कारवाई म्हणून रिशेड्युलिंग करुन त्यानुसार ॲडव्हान्सची दंडनीय व्याजासह वसुली सुरु केली. सुरुवातीला पोस्ट डेटेड चेक्स घेतले होते. ५० टक्के काम होईपर्यंत ॲडव्हान्सची वसुली व्हावी अशी तरतूद करारनाम्यात आहे.

गोसीखूर्द आणि इतर अनेक प्रकल्पाच्या अनुषंगाने पुनर्वसन योजना अद्याप पूर्ण झालेल्या नाहीत. कायद्यात सुधारणा होत आहेत. जमीन संपादनाबाबत केंद्र सरकार नवीन

कायदा आणणार आहे. महाराष्ट्र शासनाने गावठाण पुनर्वसनासाठी नवीन १८ सुविधा देऊ केल्या आहेत. त्यामुळे लोकांच्या अपेक्षा वाढत असून त्यांची मागणी योग्य आहे असे मत समितीने व्यक्त केले. जिगाव हा प्रकल्प १९९५-१९९६ मध्ये मंजूर झालेला आहे. १९९५ पासून २० वर्षाचा कालावधी उलटून गेला तरी प्रकल्पाचे काम पूर्ण झालेले नाही. काही विषय किचकट असल्यामुळे धरणाची किंमत तीन पट, चार पटीने वाढते. धरणाचे काम करण्यास कोणी आडकाठी आणलेली नव्हती. धरणाचे काम पूर्ण करण्याकरिता मागील १५ वर्षात अर्थसंकल्पीय तरतूद किती केली गेली आणि कंत्राटदाराने किती कालावधीत काम पूर्ण करावयाचे होते? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, धरणाच्या फ्लॅन्कचे काम सुरु आहे. ११७०० पैकी ७००० सहस्त्र घनमीटर मातीकाम झाले आहे. धरणाचे काम सुरु आहे. धरणाच्या भिंतीचे काम प्रगतीपथावर आहे. बुडिताखाली जाणाऱ्या जमिनीची व्याप्ती आणि त्याच्या अनुषंगाने जमीन संपादन व बाधित गावे आणि त्यांचे पुनर्वसन याची कार्यवाही विविध टप्प्यावर आहे. ती पूर्ण झाली तर पाण्याचा साठा होऊ शकतो. एकाच वेळी सर्व ॲक्टिव्हीटीज सुरु आहेत. त्या पूर्ण झाल्या तरच पाणी साठू शकते, सद्यःस्थितीत नाही. तसेच मार्च, २०१३ अखेर प्रकल्पावर १०४० कोटी रुपये एवढा खर्च झाला आहे. त्यापैकी भिंत, सांडवा यावर १९५ कोटी रुपये, भूसंपादनासाठी २३४ कोटी रुपये, पुनर्वसनासाठी ११.४४ कोटी रुपये आणि उर्वरित लिफ्ट आणि कालवे यावर जवळजवळ ४७३ कोटी रुपये खर्च झालेला आहे. जलाशयावर उपसा सिंचन योजना राबविण्यात येणार आहे.

जिगाव प्रकल्प मुख्य धरणाचे व वक्रद्वाराचे काम याच्या सद्यःस्थितीबाबतची माहिती **विवरण क्र.** मध्ये दर्शविण्यात आली आहे.

धरण पूर्ण झाल्यानंतर लिफ्टचा विचार केला जातो. लिफ्ट व कालवे यावर जवळजवळ ४७३ कोटी रुपये खर्च झालेला आहे. हा खर्च जर पुनर्वसन आणि भूसंपादनाच्या कामावर केला असता तर त्यातून कितीतरी पटीने धरणाचे काम पुढे गेले असते. धरण बांधण्यापूर्वी ४००-५०० कोटी रुपये इतर कामावर खर्च करीत आहात. धरणाचे काम पूर्ण होईपर्यंत उपसा सिंचन योजनेच्या मोटारी गंजून जातील, जॅकवेल चोरीला जाईल, त्यामुळे केलेला खर्च वाया जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून देऊन विभागास विचारणा केली की, प्रत्यक्ष धरणाच्या कामावर आणि लिफ्ट योजनेवर

किती खर्च झाला आहे ? यावर धरण आणि सांडवा या अनुषंगाने १९५ कोटी रुपये आणि लिफ्टवर ४७३ कोटी रुपये खर्च झालेला आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या प्रकल्पावर आधारित लिफ्ट इरिगेशन योजनांची कामे सुरु झाली. त्यासाठी करोडो रुपये अग्रिम देण्यात आला. त्यात भ्रष्टाचार झाल्याचे उघडकीस आल्यानंतर विधीमंडळाच्या सभागृहामध्ये चर्चा झाली. त्यानंतर या प्रकरणाची चौकशी सुरु झाली. १० रुपये किंमतीचे पाईप ३० रुपयांना खरेदी केले गेले. उपसा सिंचन योजनांबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे. यापुढे शासन उपसा सिंचन योजना करणार नाही. कारण या योजनांच्या देखभाल, दुरुस्ती, वीज देयकांचा प्रश्न निर्माण होतो, त्याची जबाबदारी स्वीकारण्यास कोणी पुढे येत नाही. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली व विचारणा केली की, या प्रकल्पावर आधारित प्रस्तावित उपसा सिंचन योजना किती होत्या? अशी विचारणा समितीने केली असता याबाबतची माहिती समितीला नंतर सादर करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले. परंतु सदर माहिती अद्यापपर्यंत अप्राप्त आहे.

हा प्रकल्प हा ४ हजार कोटीचा आहे. या प्रकल्पावर आतापर्यंत १ हजार कोटी रु. खर्च झाले आहेत. या वर्षी या प्रकल्पासाठी १६० कोटी रु.ची तरतूद केलेली आहे. हा प्रकल्प जोपर्यंत केन्द्र शासनाच्या एआयबीपी योजनेमध्ये सामील होत नाही तोपर्यंत हा प्रकल्प पूर्ण होणार नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, हा प्रकल्प सेंट्रल वॉटर कमिशनच्या क्लिअरन्ससाठी सादर केलेला असून त्याची तपासणी चालू आहे. या प्रकल्पाच्या संदर्भातील सर्व तांत्रिक विषय पूर्ण केलेले आहेत. प्रकल्पास मिनिस्ट्री ऑफ ट्रायबल अफेअर्सची परवानगी लागते. तसेच सीडब्ल्यूसीची अंतिम मान्यता लागते. तसेच या प्रकल्पाच्या बाबतीत विभागाकडून दिल्लीला जाऊन पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच मिनीस्ट्री ऑफ ट्रायबल अफेअर्सकडे दोन वर्षापासून पाठपुरावा सुरु आहे. पुढील एक देान आठवड्यामध्ये प्रस्तावास मान्यता मिळेल.

हा प्रकल्प एआयबीपी अंतर्गत मंजूर झाला तरच तो पूर्ण होऊ शकेल. ही वस्तुस्थिती समितीने विभागाला निदर्शनास आणून दिली व विचारणा केली की, या प्रकल्पाअंतर्गत एकूण किती गावे आणि कुटुंबे बाधित झालेली आहेत ? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की,

या प्रकल्पाच्या बुडित क्षेत्रात ३२ पूर्ण आणि १५ अंशतः गावे येतात. एकूण ४७ गावे बाधित होत आहेत. एकूण लोकसंख्या २७६०० असून कुटुंबांची संख्या ७९९० आहे. या लोकांचे ३१ गावामध्ये विविध ठिकाणी पुनर्वसन करावयाचे आहे.

गावठाणे तयार होऊन गावठाणाची कामे सुरु झालेली आहेत काय अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रक्रिया सुरु झालेली आहे. अद्याप फिझिकल शिफ्टिंग झालेले नाही. एका गावचे क्षेत्र ताब्यात मिळालेले आहे. गावठाण आणि लेआऊट निश्चित झाला की नागरी सुविधांची कामे सुरु करता येतात. गावांच्या पुनर्वसनासाठी ७३३ हेक्टर जमीन आवश्यक आहे. १२१ हेक्टर जमीन ताब्यात आलेली आहे.

पुनर्वसन प्रक्रियेसंदर्भात खुलासा करताना मुख्य अभियंता, अमरावती विभाग यांनी समितीला सांगितले की, खरकुंडी गावाचे मूल्यांकन झालेले असून पुनर्वसनाचे काम सुरु आहे. दोन वर्षापासून पुनर्वसन प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. म्हणजेच धरणाचे काम सुरु करण्याचे वर्ष आणि पुनर्वसन प्रक्रिया सुरु करण्याचे वर्ष यामध्ये खूप वर्षाचे अंतर आहे. भूसंपादनाच्या कामास १३-१३ वर्षे लागतात काय ? याबाबत खुलासा करताना मुख्य अभियंता, अमरावती विभाग यांनी सांगितले की, परिस्थिती अशी आहे की, मागील ५ वर्षामध्ये महसूल विभागाकडून भूसंपादनाचे कोणत्याही प्रकारचे काम झालेले नाही. या संदर्भात मुख्य सचिवांनी देखील आढावा घेऊन सर्व संबंधितांना सूचना दिलेल्या आहेत. भूसंपादनाचे रु. ११४ कोटी भरलेले आहेत.

जिगांव प्रकल्पाबाबत विभागाने दिलेल्या उक्त माहिती संदर्भात समितीने असे मत व्यक्त केले की, या प्रकल्पाच्या केवळ लिफ्ट इरिगेशनच्या कामामध्ये आणि ठेकेदारांची बिले देण्यामध्ये विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने स्वारस्य दाखविलेले आहे. भूसंपादन आणि पुनर्वसनाच्या कामाकडे दुर्लक्ष करुन लिफ्ट इरिगेशनच्या कामाला आवश्यकता नसताना प्रॉयारिटी देण्यात आलेली आहे. प्रकल्पाच्या कामामध्ये विविध विभागांचा संबंध येत असला तरी त्या त्या विभागाशी संबंधित कामाच्या बाबतीत समन्वय साधण्याचे काम जलसंपदा विभागाचे आहे. समन्वय अधिका-याने कामे लवकर होण्याच्या दृष्टीने संबंधित विभागांशी पाठपुरावा करावयास पाहिजे. भूसंपादनाच्या कामाकडे १३ वर्षे दुर्लक्ष होणे आणि लिफ्ट इरिगेशनच्या कामासाठी ५०० कोटी रुपये खर्च होणे योग्य नाही. यासंदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, भूसंपादनाच्या प्रक्रियेला गती

देण्यासाठी मुख्य सचिवांच्या स्तरावर आयुक्त, जिल्हाधिकारी, भूसंपादन अधिकारी, क्षेत्रिय अधिकारी, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता या सर्वांची मागील महिन्यामध्ये बैठक झाली होती. आयुक्त स्तरावर दोन महिन्यातून एक आणि जिल्हाधिकारी स्तरावर प्रत्येक महिन्याला एक मिटींग होत असते. विशेष भूसंपादन अधिका-याची सर्व पदे रिक्त आहेत. शासनस्तरावर हा मुद्दा मांडलेला आहे. भूसंपादन अधिकारी खाजगीरित्या नियुक्त करण्यासंबंधीचा ठराव विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने पास केला होता. दोन-तीन वेळा जाहिराती देण्यात आल्या. परंतु जाहिरातींना प्रतिसाद मिळाला नाही.

उपसा सिंचनाचे काम कोणाचे आहे व धरणामध्ये पाणी नसताना लिफ्ट इरिगेशनच्या कामाला सुरुवात का करण्यात आली ? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, लिफ्ट इरिगेशन हा प्रकल्पाचा एक भाग आहे. व भौगोलिक परिस्थिती नुसार खाली कालवे करता येत नाहीत.

या प्रकल्पाचे प्रकल्पाचे डिझाईन कोणी केले? तसेच पुनर्वसनाची, भूसंपादनाची, धरणाची कामे पूर्ण न करता लिफ्ट इरिगेशनच्या कामावर एवढया मोठ्या प्रमाणावर खर्च करण्याची कारणे काय आहेत. कारण धरणाच्या कामावर झालेल्या खर्चापेक्षा लिफ्ट इरिगेशनच्या कामावर दुपटीने पैसा खर्च झालेला आहे ? धरणामध्ये पाणी असते आणि लिफ्ट इरिगेशनचे काम केले असते तर ते एक वेळ समजण्यासारखे होते. परंतु भूसंपादनाच्या आणि पुनर्वसनाच्या कामाकडे दुर्लक्ष करुन लिफ्ट इरिगेशनच्या कामामध्ये स्वारस्य दाखविण्याचे कारण काय ? लिफ्ट इरिगेशनच्या कामावर झालेला खर्च हा शुद्ध हेतूने केलेला आहे असे वाटत नाही. पावणेपाचशे कोटी रुपये कोणकोणत्या कामावर खर्च करण्यात आले ? याबाबतची सविस्तर माहिती समितीला स्वतंत्रपणे सादर करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिली परंतु माहिती अद्याप अप्राप्त आहे.

लिफ्ट इरिगेशनच्या कामाचा निर्णय हा विदर्भ पाटबंधारे महामंडळाने घेतलेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले असता समितीने वित्त सचिवांना विचारणा केली की, धरणाच्या कामावर खर्च न करता लिफ्ट इरिगेशनच्या कामावर अधिकचा पैसा खर्च करण्यात आल्याची बाब वित्त विभागाच्या निदर्शनास येत नाही काय ? निधीची तरतूद करताना कोणकोणत्या बाबींवर निधी खर्च करण्यात आलेला आहे वित्त आणि नियोजन विभागाकडून

कामाचे प्राधान्य तपासून निधी वितरित करणे आवश्यक आहे असे समितीने मत व्यक्त केले. या बाबी वित्त विभागाकडून तपासल्या जात असल्याचे मान्य केले.

यासंदर्भात प्रधान महालेखाकार यांनी समितीस सांगितले की, वर्ष २००२ में प्रायॉरिटी फिक्स की गयी थी कि किस काम को प्रायॉरिटी देनी है. उस समय तय हुआ था कि जिस प्रोजेक्ट का ७५ प्रतिशत काम पूरा हो गया है उस को पूरा करने के लिए प्रायॉरिटी देनी चाहिए तथा सरकार की ओर से उसी हिसाब से फंड रिलीज किया जाना चाहिए.

महालेखाकारांच्या मताशी समितीने सहमती दर्शवून विभागामध्ये अतंर्गत वितरणासंदर्भातील बाबही महत्वाची असते. उपसा सिंचन वा धरणाचे बांधकाम इत्यादी कामांपैकी कोणत्या कामास प्राधान्य द्यावयाचे हे विभागाने पाहणे अत्यावश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

या संदर्भात विधानमंडळाच्या वित्तीय सल्लागारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय देताना सांगितले की, अर्थसंकल्पामध्ये जी तरतूद केली जाते ती नंतर महामंडळाकडे ट्रान्स्फर होते. त्यांनी ती गाईडलाईन्स प्रमाणे खर्च करावयाची असते. तसेच, त्यांनी त्या वर्षाचे जे कॅपिटल बजेट मंजूर करुन घ्यावयाचे असते त्यामध्ये त्यांनी कोणत्या प्रोजेक्ट करिता किती व कसा खर्च करणार याची डिटेल माहिती दिल्यानंतर त्या प्रमाणे निधी मंजूर केला जातो अशी प्रोसिजर असते. परंतु, प्रत्यक्षात त्या प्रमाणे कधीच होत नाही.

महालेखाकारांनी उपस्थित केलेल्या मुद्यासंदर्भात विभागीय सचिवांनी समितीस माहिती देताना सांगितले की, प्रकल्पाचे काम करताना कामांचे प्राधान्य ठरविण्यासंदर्भात प्रधान सचिव, नियोजन विभाग, प्रधान सचिव, वित्त विभाग व प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांची एक समिती नेमलेली आहे प्रकल्पाच्या प्राधान्यक्रमामध्ये पाणी साठा निर्माण करणे, सिंचन क्षमता निर्माण करणे ही कामे करणे आवश्यक असते. तसेच, काही प्रकल्पांचे काम जरी कमी किंवा प्राथमिक स्वरूपात झाले असले तरी, त्यांचे नियोजन करावे लागते. उदाहरणच सांगावयाचे झाले तर, विदर्भातील अकोला, वाशिम, बुलढाणा, अमरावती येथे सन १९९४ चा भौतिक अनुशेष शिल्लक आहे. माननीय राज्यपाल महोदयांनी हा अनुशेष दूर करण्याबाबत निदेश दिलेले आहेत. तेथील प्रकल्पांचे काम जरी प्राथमिक स्वरुपात झाले असले तरी, तेथील प्रकल्पांचे काम पूर्ण करण्यास प्राधान्य असल्याने तेथील प्रकल्पांचे काम करताना विशेषत:

सिंचन क्षमता निर्माण करणे, पाणी साठा निर्माण करणे अशा प्रकारे नियोजन केले जाते. जिगाव हा बुलढाण्यामधील मोठा प्रकल्प आहे. त्यामध्ये मोठया प्रमाणावर पाणी साठा होऊ शकतो.

विभागाने दिलेल्या उक्त माहिती संदर्भात समितीने विचारणा केली की, प्रकल्पाचे काम करताना कोणती कामे प्राधान्याने करावयाची हे निश्चित केले जात नाही का ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रकल्पाचे काम करताना भूसंपादन, पुनर्वसन, सिंचन निर्मिती व धरणाचे काम करणे आवश्यक असते. त्यातही भूसंपादन व पुनर्वसनाच्या कामाला प्राधान्य आहे. येथून पुढे सुध्दा ते निश्चितपणे दिले जाईल.

अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेली १६७ कोटी रुपयांची तरतूद कशा प्रकारे खर्च करण्याचे नियोजन केले आहे त्याबाबतची माहिती समितीला देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, अर्थसंकल्पामध्ये १६७ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. परंतु प्रत्यक्षात नियोजन भूसंपादनाकरिता ५३ कोटी ५० लक्ष रुपये, पुनर्वसनाकरिता १३ कोटी ५० लक्ष रुपये, धरण, भिंत, कालवे या करिता ७८ कोटी रुपये, रस्त्यासाठी २० कोटी रुपये, आस्थापना व इतर कामांसाठी असे एकूण २१४ कोटी रुपयांचे नियोजन केलेले आहे. परंतु बजेटमध्ये आम्हाला १६७ कोटी रुपयांचीच तरतूद उपलब्ध झाली. यामध्ये भूसंपादन व पुनर्वसन व धरणाच्या कामाला मुख्य प्राधान्य देण्यात आलेले आहे.

जिगाव प्रकल्पासंदर्भात समितीला समाधानकारक उत्तर मिळाली नसल्यामुळे समितीचे ह्या प्रकल्पाबाबत माहिती जाणून घेण्यासंदर्भात समाधान झाले नाही. त्यामुळे उपसा सिंचनासंदर्भात ज्या अधिकाऱ्यांनी निर्णय घेतले त्यांच्याकडून लेखी माहिती समितीला सादर करण्यात यावी आणि जर संबंधित अधिकारी निवृत्त झाले असल्यास तरी त्यांच्याकडूनही माहिती घेऊन ती समितीला सादर करावी असे निदेश दिले व ह्या प्रकल्पाची सद्य:स्थितीत किंमत किती आहे व या प्रकल्पाचे काम किती टप्प्यात व कसे पूर्ण केले जाणार आहे याकरीता येणारा खर्च किती आहे याबाबतची माहिती तसेच अशा प्रकारे वन जमिनीची मान्यता मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे आणखी काही प्रकल्पांचे काम रखडले आहे का ? याबाबतची माहिती समितीला सादर करण्यात यावी असे निदेश समितीने विभागास दिले. (तथापि, विभागाकडून अद्याप माहिती समितीला प्राप्त झाली नाही.)

अभिप्राय शिफारशी

जिगांव प्रकल्प हा बुलढाणा जिल्ह्यातील महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. या प्रकल्पाला मिळालेली मूळ प्रशासकीय मान्यता व्यपगत झाल्यामुळे या प्रकल्पास १९९४-९५ च्या दर सूचीनुसार जानेवारी-१९९६ मध्ये रु.६९८.५० कोटी रुपयांची नव्याने प्रशासकीय मान्यता देण्यात आली. तदनंतर विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने दि.२४ जून, २००९ रोजी या प्रकल्पास रु.४०४४.१४ कोटी रुपयांची द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान केली. तापी नदीची उपनदी असलेल्या पूर्णा नदीवर हा प्रकल्प होत आहे. या प्रकल्पाची साठवण क्षमता ७३६ द.ल.घ.मी. आहे. तसेच प्रकल्पाची सिंचन क्षमता १ लाख १ हजार ८८ हेक्टर आहे. या प्रकल्पाचा पाणी वापर मुख्यतः उपसा सिंचनाद्वारे होणार असून या प्रकल्पाला धरणातून कॅनॉलची व्यवस्था नाही. जमीन संपादन करण्यास लोकांचा होत असलेला विरोध आणि वन जमिनीची अडचण या सर्व बाबींमुळे प्रकल्पाचे काम प्रत्यक्षात २००८ मध्ये सुरु झाले.

या प्रकल्पाच्या दोन कंत्राटदारांना अग्रिम दिल्याबाबतचा हा परिच्छेद आहे. कामाच्या निविदेमध्ये तरतूद नसताना कंत्राटदारांना अग्रिम देण्यात आला असा महालेखापरीक्षकांनी आक्षेप घेतलेला आहे. निविदेमध्ये उल्लेख नसताना अग्रिम दिला ही वस्तुस्थिती आहे

कंत्राटात तरतुद नसतांना सुद्धा दोन कंत्राटदारांना जिगांव प्रकल्पासाठी रु.३३.७२ कोटीचे कार्य अग्रीम प्रदान करण्यात आले आहे. कंत्राटदाराची क्षमता विचारात घेऊन काम देण्यात येत असल्याने विभागाने मनुष्यबळ व यंत्र सामुग्रीसाठी तसेच वन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र मिळाले नाही म्हणून कंत्राटदारास अग्रीम दिला आहे हा खुलासा संयुक्तिक नाही.

कामाला गती देण्याच्या दृष्टीने व काम जलद गतीने होण्यासाठी मोठ्या प्रमाणावर यंत्र सामुग्री लागत असल्याने कंत्राटदाराने अग्रीमाची मागणी केली होती व त्यास महामंडळाच्या अध्यक्षांच्या मान्यतेने सव्याज सुसज्जता अग्रीम महामंडळास महामंडळाच्या कायद्यातील कलम १९ (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारान्वये मान्य करण्यात आले. असे असले तरी प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंत्यांनी कंत्राटदारांना अग्रिम रक्कम देऊ नये अशा प्रकारचे लेखी पत्र देऊन सुध्दा विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर दबाव आणून अग्रिम देण्यास भाग पाडले.

ज्या अधिकाऱ्यांनी कार्यकारी अभियंत्याचे मत डावलून कंत्राटदारांना अग्रिम दिला त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. प्रकल्पाचे काम गतीने होण्यासाठी अशा

प्रकारचा अग्रिम देण्याची तरतूद महामंडळाच्या अधिनियमात आहे. परंतु या प्रकरणी काम सुरु केलेले नसताना अग्रिम देण्यात आला आहे. महामंडळाच्या अधिनियमात कंत्राटदारांना अग्रिम देण्याची तरतूद असेल तर त्याबाबतचा उल्लेख निविदा नोटीसमध्ये केला जात नाही.

शासनाचे धोरण "आधी पुनर्वसन आणि नंतर धरण" अशा स्वरुपाचे आहे. सद्य:स्थितीत जिगांव प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनीचे भूसंपादन होणे बाकी आहे. सरकारने काही लोकांच्या जमिनी ताब्यात घेतल्या आहेत, परंतु त्यांना जमिनीचा मोबदला मिळाला नाही. एका बाजूला शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला दिला जात नाही आणि दुसऱ्या बाजूला मात्र कंत्राटदारांना अग्रिम देण्याचे काम सुरु आहे. ही बाब गंभीर आहे.

सन २००८ सालापासून भूसंपादनाचे काम सुरु आहे. आज १३ वर्षे होत आली तरीसुध्दा अजूनही भूसंपादनाची कार्यवाही सुरुच आहे. प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन झाले नाही. तसेच वन विभागाच्या जमिनीला क्लिअरन्स मिळाला नसताना या कामाची निविदा काढून अग्रिम देण्यात आला आहे.

राज्यात जलसंपदा विभागाअंतर्गत अनेक प्रकल्प सुरु असून सदर प्रकल्प वर्षानुवर्षे प्रलंबित असल्यामुळे त्याची किंमत वाढत आहे व शेतीच्या सिंचनाचा प्रश्न निर्माण झाला असून उद्योगांना पाणी पुरवठा केला जात नसल्यामुळे त्यांना प्रोत्साहन मिळत नाही. मोबिलायझेशन अग्रिम प्रकल्पाचे काम जलदगतीने होण्यासाठी दिला जातो. परंतु, तसे होताना दिसून येत नाही. मोबिलायझेशन अग्रिम देवूनही प्रकल्पास विलंब होतो व त्याची रक्कम वाढते. **सन २०१० पूर्वी किती प्रकल्पांच्या कामासाठी मोबिलायझेशन अग्रिम दिला गेला. त्यापैकी किती प्रकल्पाचे काम अद्याप सुरु झालेले नाही यासंदर्भातील माहिती जलसंपदा विभागाअंतर्गत असलेल्या महामंडळाकडून प्राप्त करुन ती समितीला आश्वासित करुनही अद्याप समितीला प्राप्त झाली नसल्याने समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. सदर माहिती समितीला तातडीने देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

अग्रिम देण्याची कार्यवाही हेतूपूरस्सर केली असल्याने याप्रकरणी जे दोषी आहेत त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी व ज्या कंत्राटदारांनी अग्रिम घेवूनही वेळेत काम केले नाही त्यांच्याकडून तातडीने व्याजासह संपूर्ण रक्कम वसुल करण्यात यावी. अग्रिमाची रक्कम परत न करणाऱ्या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्यात यावे व सदर कामाबाबत फेर निविदा काढण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

महामंडळाच्या कायद्यामध्ये अग्रिम देण्याची तरतूद असली तरी निविदेमध्ये त्याबाबत उल्लेख केला जात नाही त्यामुळे फेअर कॉम्पिटीशन होत नाही. एका-एका ठेकेदाराला २०-३० कोटी रुपये अग्रिम दिला जातो. ते बँकांकडून कर्ज घेत नाहीत. सोयीचा कंत्राटदार डोळ्यासमोर ठेवून त्याला काम द्यायचे, त्याला सर्व सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. फेअर कॉम्पिटीशन झाली पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले.

अग्रिमाची रक्कम वसूल करताना ठेकेदाराने जे पोस्ट डेटेड चेक्स दिले होते त्यापैकी काही चेक्स डिसऑनर झाले. **एकूण ४० धनादेशांपैकी ८ धनादेश बँकेकडून खात्यावर पैसे शिल्लक नसताना परत आले. हे ८ धनादेश डिसऑनर झाले त्याबाबत काय कायदेशीर कारवाई केली. सुरुवातीला जो अग्रिम दिला होता त्याबाबत निविदेमध्ये उल्लेख नव्हता. वेगळा करारनामा करुन पोस्ट डेटेड चेक्स घेऊन अग्रिम दिला होता. मधल्या काळात काम सुरु न झाल्यामुळे कॉन्ट्रॅक्टरने विनंती केली की, रिशेड्युलिंग करावे. लेखापरीक्षण झाल्यानंतर जो आक्षेप घेण्यात आला त्यानुसार विभागाने कार्यवाही सुरु केली होती. विभागाने लेखापरिक्षणाच्या आक्षेपापूर्वी कार्यवही सुरु करणे अपेक्षित होते तसे केले नसल्याने विभागाचे/ महामंडळाचे अधिकारी कंत्राटदारांना सहाय्य करत होते. कायद्याला बगल देवून शासनाच्या पैशाचा अपव्यय करत होते. त्यामुळे अशा अधिकाऱ्यांची तातडीने चौकशी करुन जे अधिकारी दोषी आढळून येतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

जिगांव प्रकल्पावर आधारित लिफ्ट इरिगेशन योजनांची कामे सुरु झाली. त्यासाठी करोडो रुपये अग्रिम देण्यात आला. ज्या प्रकल्पासाठी अद्याप जमीनीचे संपादन करण्यात आले नाही. प्रकल्पाचे काम अद्याप निविदा स्तरावर आहे. त्यात भ्रष्टाचार झाल्याचे उघडकीस आल्यानंतर या प्रकरणाची चौकशी सुरु झाली. १० रुपये किंमतीचे पाईप ३० रुपयांना खरेदी केले गेले. या प्रकरणी चौकशी दोषी आढळून आलेल्यावर केलल्या कारवाईची माहिती समितीस देण्यात यावी व उपसा सिंचन योजनांबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे. यापुढे शासन उपसा सिंचन योजना करणार नाही. कारण या योजनांच्या देखभाल, दुरुस्ती, वीज देयकांचा प्रश्न निर्माण होतो, त्याची जबाबदारी स्वीकारण्यास कोणी पुढे येत नाही. त्यामुळे या प्रकल्पावर आधारित प्रस्तावित उपसा सिंचन योजना किती होत्या याची माहितीही समितीस सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

धरणामध्ये पाणी नसताना लिफ्ट इरिगेशनसाठी ४७३ कोटी इतका खर्च का करण्यात आला. भूसंपादन, पुनर्वसन आणि धरण या कामांना प्राधान्य न देता उपसा सिचंनाच्या कामाला प्राधान्य का देण्यात आले ? हा प्रकल्प सेंट्रल वॉटर कमिशनच्या क्लिअरन्ससाठी सादर केलेला असून त्याची तपासणी पूर्ण झाली आहे काय ? या प्रकल्पाच्या संदर्भातील सर्व तांत्रिक विषय पूर्ण केलेले आहेत.

जिगाव प्रकल्पाबाबत विभागाने दिलेल्या उक्त माहिती संदर्भात समितीने असे मत व्यक्त केले की, या प्रकल्पाच्या केवळ लिफ्ट इरिगेशनच्या कामामध्ये आणि ठेकेदारांची बिले देण्यामध्ये विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने स्वारस्य दाखविलेले आहे. भूसंपादन आणि पुनर्वसनाच्या कामाकडे दुर्लक्ष करुन लिफ्ट इरिगेशनच्या कामाला आवश्यकता नसताना प्रॉयारिटी देण्यात आलेली आहे. प्रकल्पाच्या कामामध्ये विविध विभागांचा संबंध येत असला तरी त्या त्या विभागाशी संबंधित कामाच्या बाबतीत समन्वय साधण्याचे काम जलसंपदा विभागाचे आहे. समन्वय अधिका-याने कामे लवकर होण्याच्या दृष्टीने संबंधित विभागांशी पाठपुरावा करावयास पाहिजे. भूसंपादनाच्या कामाकडे १३ वर्षे दुर्लक्ष होणे आणि लिफ्ट इरिगेशनच्या कामासाठी ५०० कोटी रुपये खर्च होणे योग्य नाही.

धरणाच्या कामावर झालेल्या खर्चापेक्षा लिफ्ट इरिगेशनच्या कामावर दुपटीने पैसा खर्च झालेला आहे. धरणामध्ये पाणी असते आणि लिफ्ट इरिगेशनचे काम केले असते तर ते एक वेळ समजण्यासारखे होते. परंतु भूसंपादनाच्या आणि पुनर्वसनाच्या कामाकडे दुर्लक्ष करुन लिफ्ट इरिगेशनच्या कामावर झालेला खर्च हा शुद्ध हेतूने केलेला नाही असे समितीला वाटते. पावणेपाचशे कोटी रुपये कोणकोणत्या कामावर खर्च करण्यात आले याबाबतची सविस्तर माहिती समितीला सादर करण्यात यावी तसेच लिफ्ट इरिगेशनचे काम करण्यासाठी ज्या अधिकाऱ्यांनी शासनाकडे मागणी केली अशा तत्कालिन अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात यावी व चौकशी दोषी आढळून आलेल्या अधिकाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

जिगाव प्रकल्पासंदर्भात समितीला समाधानकारक उत्तर मिळाली नसल्यामुळे समितीचे ह्या प्रकल्पाबाबत माहिती जाणून घेण्यासंदर्भात समाधान झाले नाही. **त्यामुळे उपसा सिंचनासंदर्भात ज्या अधिकाऱ्यांनी निर्णय घेतले त्यांच्याकडून लेखी माहिती समितीला सादर करण्यात यावी आणि जर संबंधित अधिकारी निवृत्त झाले असल्यास त्यांच्याकडूनही**

माहिती घेऊन ती समितीला सादर करावी. ह्या प्रकल्पाची सद्य:स्थितीत किंमत किती आहे व या प्रकल्पाचे काम किती टप्प्यात व कसे पूर्ण केले जाणार आहे याकरीता येणारा खर्च किती आहे याबाबतची माहिती तसेच अशा प्रकारे वन जमिनीची मान्यता मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे आणखी किती प्रकल्पांचे काम रखडले आहे याबाबतची माहिती समितीला सादर करण्यात यावी. अशी समितीची शिफारस आहे.

(ब) परिच्छेद क्र.३.२.५ अतिरिक्त संविदात्मक लाभ

भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांच्या सन २००८-०९ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.३.२.५ "अतिरिक्त संविदात्मक लाभ" या संदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिलेले आहेत.

बंधाऱ्याच्या कामाच्या जादा परिमाणाकरीता कंत्राटाच्या खंड ३८ खाली विनियमन करण्याऐवजी अतिरिक्त बाब दर सूची मंजूर करण्याचा परिणाम कंत्राटदाराला रु. ८.२५ कोटीचा संविदात्मक अतिरिक्त लाभ होण्यात झाला.

सपन नदी प्रकल्प, तालुका अचलपूर, जिल्हा अमरावती करता RD ११० मीटर्स ते १६५ मीटर्स आणि २४० मीटर्स ते १,११० मीटर्स मध्ये मातीच्या धरणोच कामासोबत Gated Spillway, पोच व Tail channel आणि शिर्ष विमोचकाचे काम एका कंत्राटदाराला रु. ४६.५२ कोटी या अंदाजित रकमेच्या २१ टक्के कमी दराने ऑक्टोबर, २००६ पर्यंत पूर्ण करण्यासाठी देण्यात आले (ऑक्टोबर, २०००). निविदेच्या खंड ३८ नुसार कंत्राटदाराला प्रभारी अभियंत्याने लेखी आदेश दिल्यास जादा अतिरिक्त कामे करण्याचे बंधन होते आणि तो निविदेतील परिमाणाच्या १२५ टक्क्याहून जास्त निष्पादित केलेल्या परिमाणाच्या बाबतीत दरांच्या सुधारणेकरिता पात्र होता. यानुसार १२५ टक्क्याहून जास्त परिणामे निविदेच्या कमी व जास्त टक्केवारीने वाढवून किंवाक मी करुन प्रचलित दरसूचीप्रमाणे प्रदान करावयाची होती.

कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती यांच्या अभिलेखाच्या तपासणीत (जानेवारी, २००८) असे उघडकीस आले की, सपन नदी प्रकल्प हा मूलतः ६,३८० हेक्टर जमिनीच्या सिंचनाकरीता २८.९४ दलघमी साठवण क्षमतेचा म्हणून नियोजित (नोव्हेंबर, १९९५) होता. धरणाची उंची ४.५ मीटर्सनी वाढविण्याच्या प्रस्तावाचा परिणाम निविदेतील कामांच्या परिमाणातील वाढीत होईल म्हणून अतिरिक्त काम त्याच कंत्राटदाराकडून करुन घेण्याचे प्रस्तावित केले. (जानेवारी २००५) कारण त्याने अंदाजित रकमेच्या २१ टक्के कमी दर सांगितला होता. चालू कंत्राटातील शर्ती व अटीप्रमाणे अतिरिक्त काम करण्याचे कंत्राटदाराने मान्य केले (जानेवारी, २००५) होते. कंत्राटदाराच्या स्विकृतीचा विचार करुन शासनाने प्रस्ताव मंजूर केला (मे, २००५). काम चालू असताना जून२००८ पर्यंत Harting क्षेत्रातील साहित्याचे परिमाण जवळपास ३.३७ टक्क्याने वाढले तर Casing क्षेत्रातील साहित्याचे परिमाण जून २००८ पर्यंत १२५ टक्क्यापेक्षा जास्त वाढले. तथापि, अधिक्षक अभियंता, अकोला पाटबंधारे

मंडळ, अकोला यांनी अतिरिक्त कामासाठी प्रचलित दर सूचीप्रमाणे अतिरिक्त बाब दर सूची (EIRL) मंजूर केली. त्यानुसार कंत्राटदाराला Hearting क्षेत्रातील जादा कामासाठी रु. ४.३५ कोटी व casting क्षेत्रातील जादा कामासाठी रु. २२.५२ कोटी असे एकूण रु. २६.८७ कोटी प्रदान केले गेले. खंड ३८ प्रमाणे हा दर प्रचलित दरसूचीतून २१ टक्के कमी करुन प्राप्त करावयाचा होता. कंत्राटदाराला जून २००८ मध्ये प्रदान केलेल्या १०८ व्या चालू लेखा बिलावरुन असे दिसून आले की, Hearting क्षेत्रात निष्पादन केलेल्या ५.८० लाख घन मीटर (घमी) परिमाणापैकी (निविदेतील ५.६१ लाख घमी या परिमाणाच्या ऐवजी) ०.२४ लाख घमी परिमाण EIRL दराने प्रदान केले गेले. त्याचप्रमाणे, Casting क्षेत्रात निष्पादित केलेल्या रु. ४६.६८ लाख घमी परिमाणापैकी (निविदेतील २७.२५ लाख घमी या परिमाणाच्या ऐवजी) १३.६२ लाख घमी परिमाण EIRL दराने प्रदान केले गेले.

अशाप्रकारे निविदेतील परिमाणाच्या १२५ टक्कयापेक्षा कमी किंवा जास्त परिमाणाकरिता खंड ३८ अंतर्गत प्रदान न करता EIRL प्रमाणे प्रदान करण्याचा परिणाम कंत्राटदाराला रु. ८.२५ कोटीचा अतिरिक्त लाभ होण्यात झाला (परिशिष्ट ३.३).

शासनाने उत्तरात (नोव्हेंबर, २००९) नमूद केले होते की, मातीच्या धरणाचे आरेखण व संकल्पचित्र यातील बदलामुळे परिमाणे वाढतील व कंत्राटदाराला Hearting व casting साहित्य मिळण्यात अडचण जाणवत होती म्हणून EIRL चे प्रदान करण्यात आले. शासनाने पुन्हा म्हटले की, कामाचे प्रदान हे चालू भाववाढीप्रमाणे केले असता त्याची किंमत रु. ९४.८३ कोटी झाली असती त्याऐवजी रु. ५९.४९ कोटी खर्च केले त्यामुळे रु. ३५.३४ कोटीची बचत झाली. शासनाला झालेल्या फायदयाचा विचार करता कंत्राटदाराला मोबदला प्रदान करण्यात हानी नव्हती. हे उत्तर मान्य करण्याजोगे नव्हते. कारण खंड ३८ चा वापर न करता EIRL मंजूर करणे हे संविदात्मक अटीच्या विरुध्द होते. तसेच रु. ३५.३४ कोटीची बचत ही प्रतिकात्मक होती आणि ते EIRL च्या प्रदानाकरीता योग्य कारण नव्हते. म्हणून अतिरिक्त कामाचे प्रदान हे EIRL ने न करता खंड ३८ चा वापर करुन करावयास हवे होते.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंपदा विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

सपन नदी प्रकल्प, ता.अचलपूर, जि.अमरावती या मध्यम प्रकल्पास शासन निर्णय क्र. एस.पी.एम/१०९१/१०२०/(१४३/९१)/ जसंज दिनांक ३/११/९५ अन्वये १३९.२७ कोटी रुपयास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये प्रकल्पाचा येवा काढतांना लगतच्या शहानुर प्रकल्पाचे पर्जन्य - अपवाह सुत्र (Rainfall - Runoff correlation) विचारात घेवून येवा काढण्यात आला होता. त्यानुसार सपन धरण स्थळी ७५ टक्के विश्वासाहार्य येवा ३८.९५१४ द.ल.घ.मी. व ५० टक्के विश्वासाहार्य येवा ५०.०४ द.ल.घ.मी. इतका येत होता. प्रकल्पाचे नियोजन ७५ टक्के विश्वासार्हतेवर करण्यात येवून त्यानुसार धरणाच्या नियंत्रण पातळ्या खालील प्रमाणे होत्या.

धरण माथा पातळी --५१२.५० मी.

पूर्ण संचय पातळी -- ५१०.०० मी.

एकूण साठा -- २८.९४. द.ल.घ.मी.

सिंचन क्षेत्र -- ४४०० हे..

या धरणाचे कामास प्रत्यक्षात नोव्हेंबर २००० मध्ये सुरुवात करण्यात आली. दि.२१/७/२००४ च्या शासन पत्रानुसार तत्कालीन राज्यमंत्री (पाटबंधारे व पालकमंत्री, (मा.सौ. वसुधा देशमुख) अमरावती यांनी धरणाची क्षमता वाढवून अतिरिक्त सिंचन सोई उपलब्ध करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याचे कळविले होते. त्यांच्या मागणीच्या अनुषंगाने मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना (मा.ध), नाशिक यांचे मार्फत जलशास्त्रीय अभ्यास करण्यात आला असून त्याचा अहवाल अ.अ. (मा.ध.) म.सं.चि.सं., नाशिक यांनी दि. २१ ऑक्टोबर, २००४ नुसार सादर केला होता. त्यानुसार ७५ टक्के यशस्वीता येव्याकरीता धरणाची पूर्ण संचय पातळी पुर्वीच्या ५१०.०० मी. ऐवजी ५१४.५० मी. एवढी ठेवावी लागते. याप्रमाणे धरणाचे उंचीत ४.५० मी. ने वाढ करावी लागेल अशी शिफारस करण्यात आली होती. शासन जलसंपदा विभागाचे पत्र क्र. सपन १००४/४२ (१९१/२००४) म.प्र.३१/५/२००५ नुसार सदर प्रस्तावास मंजूरी दिली आहे. त्यामुळे धरणाचे उंचीत ४.५ मी. वाढ झाल्यामुळे पूर्वीची साठवण क्षमता २८.९४ द.ल.घ.मी. ऐवजी ३९.२६ द.ल.घ.मी. झाल्याने साठ्यात १०.३२ द.ल.घ.मी. ने वाढ झाली आहे. सुधारीत नियंत्रण पातळ्या खालील प्रमाणे आहेत.

धरण माथा पातळी -- ५१७.०० मी.

पूर्ण संचय पातळी -- ५१४.५० मी.

एकूण साठा -- ३९.२६ द.ल.घ.मी.

सिंचन क्षेत्र -- ६१३४ हे. (भूजल विचारात घेवून)

मुख्य धरणाची निविदा किंमत रु. ४६५१ लक्ष सन १९९९-२००० साली निश्चीती झालेली होती. ही निविदा २१ टक्के कमी दराने मे. रवासा कन्स्ट्रक्शन कंपनी यांना देण्यात आले असून ठेकेदारामार्फत काम प्रगतीपथावर होते. मूळ निविदेच्या ५० टक्क्यापेक्षा जास्त काम झालेले असल्यामुळे मुख्य अभियंता ह्यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार कामाची गुणवत्ता व एकसंघता तसेच समन्वय राखण्याच्या दृष्टिकोनातून मूळ ठेकेदाराच्या सध्याच्या निविदेअंतर्गत काम केल्याने शासनाचा फायदा होणार असल्याने ठेकेदाराने दि. १०.१.२००५ रोजी दिलेल्या पत्रान्वये सहमती दिल्यानुसार वाढीव काम व सुधारणा, मुळ अभिकरणाकडून सध्याच्या निविदेअंतर्गत काम पूर्ण करण्याच्या प्रस्तावास दि. ३१.५.२००५ अन्वये मान्यता प्रदान केली आहे. मूळ निविदानुसार धरणाचे आवरण भरावाचे (casing) काम २७,२४,६१८ घ.मी. होते. धरणाची उंची वाढल्याने हे परिमाण ४७,७४,१०० घमी. झाले. या परिमाणात २०,४९,४८२ घमी. वाढ झाली. निविदाप्रमाणे आवरण भरावाचे काम उपलब्ध सामुग्री व बुडीत क्षेत्रातील उद्ग्रहण क्षेत्रातून (Borrow Area From Submergence) प्रस्तावीत होते. आवरण भरावाचे वाढीव परिमाण बुडील क्षेत्रातील खदानीत उपलब्ध होत नसल्याने त्याच खदानीत खोलवर खोदकाम करुन यापूर्वीच आवरण भरावात वापर झालेला असल्याने, खोलवर असणाऱ्या मृदु खडकात खोदकाम करावे लागले. ही बाब चालू निविदा दरात समाविष्ट नसल्याने निविदेतील कलम ३८ लागू होत नाही. त्यामुळे सदरचे वाढीव आवरण भरावाचे परिमाण अतिरिक्त बाब म्हणून करण्याचा प्रस्तावास शासन पत्र क्र. सपन नदी १००७/६४८/(१६३/२००७) मप्र दिनांक २५/७/२००७ नुसार घ.मी. परिमाणास अतिरिक्त बाब व ५.२६ कोटी च्या आधीक्यास मान्यता प्रदान करण्यात आली.

मुळ निविदेमध्ये गाभा भराव (hearting) परिमाण ५,६०,९९७ घ.मी. एवढे होते. धरणाची उंची ४.५० मीटरने वाढल्याने ते ५,८४,३८० घ.मी. एवढे झाले व परिमाणात २३,३८३ घमी. ने वाढ झाली. निविदानुसार गाभा माती ३ कि.मी. अंतरातील उद्ग्रहण क्षेत्रातून (Borrow Area) वापरणे अंतर्भुत होते. या क्षेत्रातून सुमारे ३,३८, ९५७ घ.मी. एवढे परिमाण उपलब्ध झाले. निविदेतील उर्वरीत परिमाण व वाढीव परिमाण असे एकूण २,४५,४२३ घमी. शिल्लक होते. धरणाच्या खालील बाजूस ३ कि.मी. अंतरावरील परिसरात काळ्या मातीचे

(गाभा भराव) आवश्यक परिमाण उपलब्ध झाले नाही. तसेच तेथील आदिवासी कास्तकारांनी जमीन देण्यास विरोध केल्यामुळे गाभा भरावाचे काम करण्याकरीता ८ कि.मी. अंतरावरील जुन्या तलावाच्या क्षेत्रातून आणणे प्रस्तावीत करण्यात आले. आर्द्र स्थितीतील साहीत्य व अतिरिक्त वहनावळीसह गाभा भरावाचे काम करणे निविदेअंतर्गत नसल्याने निविदेतील कलम ३८ मधील तरतूदी लागू होत नाही. त्यामुळे गाभा माती कामासाठी नविन खदान क्षेत्र (Borrow Area) ८ कि.मी. अंतरावरुन तलावातील माती आणून त्यासाठीचे नवीन दरपृथकरण करुन अतिरिक्त बाबीच्या प्रस्तावास शासन जलसंपदा विभाग, पत्र क्र. सपन नदी-२००७/(१६६/२००७)/म.प्र. दिनांक ७/६/२००७ नुसार रु. ४.४३ कोटी किंमतीच्या व अतिरिक्त बाबीच्या प्रस्तावास शासनाची मंजूरी प्रदान करण्यात आली.

धरणाचा मुळसाठा २८.९४ द.ल.घ.मी. ऐवजी ३९.२६ द.ल.घ.मी. झाल्याने कामाच्या व्याप्तीत बदल झाला आहे. धरणाचे वाढीव काम प्रगतीपथावरील कामाशी निगडीत असल्याने व मुळ धरणाचा अविभाज्य भाग असल्याने कामाची गुणवत्ता व एकसंधता तसेच समन्वय राखण्याच्या दृष्टिने त्याच कंत्राटदारामार्फत करणे गरजेचे होते. वाढीव काम अतिरिक्त बाब म्हणून निविदेतील कलम-१४ अंतर्गत करण्यासाठी मंजूरी देण्यात आलेली आहे. वरील विवेचनावरुन या प्रकरणी निविदा मधील अटी व शर्तीनुसार सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेवून कार्यवाही करण्यात आलेली असून कंत्राटदारास कोणताही अतिरिक्त लाभ प्रदान केलेला नाही.

शासनाचे पत्र क्र. डिएपी-२००९/३२४/(८७/२००९) मध्यम प्रकल्प, मंत्रालय मुंबई-०३२ दि.२३/११/२००९ अन्वये सदर प्रारुप परिच्छेदाबाबतचे शासनाचे अभिप्राय महालेखाकार (II) नागपूर यांना कळविण्यात आले आहेत. तथापि हे उत्तर महालेखाकार यांनी मान्य केले नाही. व हा सन २००८-०९ च्या नागरी अहवालात (परिच्छेद क्र. ३.२.५) समाविष्ट करण्यात आला आहे.

प्रकल्पाचे स्थान हे सातपुडा पर्वतरांगाच्या पायथ्याशी असल्याने लगतचे क्षेत्रातील भुस्तरात सर्वसाधारणपणे सुमारे ०.५० मी. खोलीपर्यंत मुरुम १.५० मी. खोलीपर्यंत मऊ खडक व त्याखाली कठीण भुस्तर प्रत्यक्षात लागला. त्यामुळे सदर परिमाण जास्तीत जास्त भुस्तरातील असल्याने त्याची हवारी व दबाईकरीता आधुनिक यंत्र सामुग्रीचे सहाय्याने अतिरिक्त श्रमशक्तीचा वापर करणे भाग पडले. यानुसार प्रत्यक्षात आवरण क्षेत्राचे कामासाठी

केलेली ही बाब निविदा अंदाजपत्रकात गृहीत धरलेल्या बाबीपेक्षा भिन्न झाली व कंत्राटदारास अतिरिक्त खर्च देणे अनिवार्य ठरले.

Ministry of Surface Transport व Indian Road Congress यांचे पध्दतीनुसार दर पृथ:क्करणावर आधारित दर व निर्देशांकातील सरासरी वाढ (किमान २१.९२ टक्के) विचारात घेतल्यास खात्यास रुपये ९४.८३ कोटी किमान खर्च अपेक्षित असता या उलट खात्याने हे काम रुपये ५९.४९ कोटी खर्च करुन केले असून त्याअन्वये रुपये ३५.३४ कोटीची निव्वळ बचत साध्य केली आहे. भारतीय कंत्राट अधिनियम (Indian Contract Act) कलम ७० चा विचार करता उपरोक्त झालेल्या कामाचे पोटी शासनाचा फायदा होत असल्याने न्यायिक पध्दतीने काम करणाऱ्या कंत्रादारास उभारणी द्रुत गतीने होणेस्तव कार्यकारी यंत्रणेची निर्णयात्मक धोरणे व त्याअन्वये होणारी शासन बचत याचा विचार करता कंत्राटदाराचे अडचणीनुसार त्यांचे विनंतीनुसार त्यांना अतिरिक्त बाब दरसुची अन्वये अतिप्रदान झाले असे म्हणणे उचित होणार नाही. याउलट त्याने केलेल्या कामाचा मोबदला मिळण्याचा हक्क नैसर्गिक न्याय तत्वानुसार हिरावून घेता येणार नाही. महाराष्ट्र शासन पत्र क्र. डि.पी. २००९/३२४/(८७/२००९) मध्यम प्रकल्प जलसंपदा विभाग मंत्रालय मुंबई दि. २३.११.२००९ नुसार वरीलप्रमाणे शासनाचे अभिप्राय कळविण्यात आलेले आहेत.

अतिरिक्त बाब मुळ बांधकामाचाच भाग असल्यामुळे व त्यापासून वेगळे करता येत नसल्यामुळे याच करारनाम्याअंतर्गत त्यातील अटी व शर्तीनुसार करुन घेण्याचे प्रस्तावित करण्यात आले. हे वाढीव काम. कंत्राटदाराने निविदा अटी व शर्तीनुसार करण्याची सहमती दिली. करारनामा कलम १४ मधील प्रावधानानुसार अतिरिक्त बाब मंजूर करण्यात आलेली आहे. ती करारनाम्यातील प्रावधानानुसारच आहे. करारनामा कलम १४ मध्ये " जर अतिरिक्त बाबीचा दर निविदेत नमुद केलेला नसेल तर ते काम विभागाच्या दरसुची नुसार करण्यात यावे." असे प्रावधान आहे. त्यानुसारच अतिरिक्त बाब मंजूर केलेली आहे. वर विषद केलेल्या बाबींचा व त्यांचे दराचा अंर्तभाव मंजूर निविदेत नसल्यामुळे या प्रकरणात कलम ३८ लागू करुन त्याचा वापर करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. त्यामुळे कंत्राटदाराला रु. ८.२५ कोटीचा संविदात्मक अतिरिक्त लाभ देण्यात झाला असे म्हणणे संयुक्तीक होणार नाही.

वर विषद केल्याप्रमाणे अतिरिक्त बाबीची मंजुरी ही करारनाम्यातील प्रावधानानुसारच आहे. या प्रकरणात कलम ३८ चा वापर करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यामुळे हा नागरी परिच्छेद वगळण्याबाबत विनंती करण्यात येत आहे.

वरील अभिप्रायास महालेखापाल यांनी पुढीलप्रमाणे आक्षेप घेतलेले आहेत.

शासनाने अनौपचारिक संदर्भाने कळविले आहे की, आवरण क्षेत्राचे कामाकरिता वाढीव परिमाण बुडीत क्षेत्रातील करारपत्रात प्रस्तावित खदानीमध्ये उपलब्ध न झाल्यामुळे वाढीव परिमाण त्याच खदानीमध्ये जास्त खोलवर खोदकाम करुन प्राप्त करण्यात आले. ही बाब निविदेमध्ये अंतर्भूत नसल्यामुळे अतिरिक्त बाब दर सुची मंजूर करण्यात आली.

शासनाने पुढे असेही कळविले आहे की, माती धरणाच्या गाभा क्षेत्राकरीता, आर्द्र स्थितीतील गाभा साहित्य व या साहित्याकरीता वाढीव वहनावळ, हया बाबी मंजूर करारपत्रात समाविष्ट नसल्यामुळे कलम-१४ अंतर्गत मंजूर केले. म्हणून या करीता करारपत्रातील कलम-३८ लागू ठरत नाही.

वाढीव परिमाण कंत्राटातील अटी व शर्तीनुसार करण्याचे कंत्राटदाराने मान्य केले असल्यामुळे शासनाने दिलेले उत्तर मान्य करता येत नाही. अतिरिक्त बाबी मधील मंजूर बाबी हया चालू करारपत्रात समाविष्ठ आहेत. तसेच मंजूर केलेल्या बाबी करारपत्रातील कलम-१४ अंतर्गत असणाऱ्या तरतुदी नुसार नवीन कामासारखा नसून पार पाडण्यात आलेली कामे निविदे-अंतर्गत केलेली असल्याने, कलम-३८ अंतर्गत हया बाबी मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणून मंजूर अतिरिक्त बाब दरसूची ही अनियमितता असल्याबाबतचा हा परिच्छेद आहे.

पुढील उत्तर शासन मेमोरंडम स्वरुपात देण्यात यावे.

या बाबत शासनाने अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

सपन प्रकल्पाचे १७३४ हे. वाढीव सिंचनासाठी व १०.३२ दलघमी अतिरिक्त पाणीसाठा करण्याचे दृष्टीने प्रकल्पाचे धरणाची उंची ४.५० मी.ने वाढविल्यामुळे कामाच्या व्याप्तीत व काम करण्याच्या पध्दतीत बदल झाला. आवरण क्षेत्राचे परिमाण हे जास्तीत जास्त कठीण भूस्तरामधून (उदग्रहण क्षेत्र तथा अनिवार्य खोदकामामधील) उपलब्ध झाल्याने त्याची हवारी व दबाईकरिता आधूनिक यंत्र सामुग्रीचे सहाय्याने अतिरिक्त श्रमशक्तीचा वापर कंत्राटदारास करावा लागला. त्यामुळे प्रत्यक्षात आवरण क्षेत्राचे कामासाठी केलेली बाब निविदा अंदाजपत्रकात गृहीत धरलेल्या बाबीपेक्षा भिन्न झाली.

गाभा साहित्याकरिता आवश्यक असलेले परिमाण निविदा अंतर्गत प्रस्तावित ३ कि.मी. अंतरात उपलब्ध झाले नाही व ते ८ कि.मी. ओलसर स्थितीत उपलब्ध झाले. त्यामुळे कंत्राटदाराला दबाईकरिता व्हायब्रेटरी रोलरचा वापर गाभा भरावाकरिता आवश्यक असलेली घनता प्राप्त करण्याकरिता करावा लागला. कंत्राटदारास नैसर्गिक न्याय तत्वावर अतिरिक्त कामाकरिता अतिरिक्त बाब म्हणून केलेल्या कामाचे भुगतान करणे आवश्यक होते.

नवीन बाबीत खालील प्रमाणे फरक असल्याने त्याची तुलना कलम ३८ अंतर्गत भुगतान करावयाच्या निविदेतील बाबींशी करता येत नाही. १) वहनावळ मध्ये बदल होतो. २) आवरणासाठी वापरण्यात येणारे साहित्याकरिता येणाऱ्या कठीणस्तरामध्ये खोदकाम व गाभासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याकरिता ओल्या स्थितीत खोदकाम अंतर्भूत करण्यात आले. ३) व्हाययब्रेटरी रोलरचा वापर अंतर्भूत करण्यात आला होता. वरील वैध कारणास्तव करारनामा कलम १४ मधील प्रावधानानुसार अतिरिक्त बाब मंजूर करण्यात आली असून अतिरिक्त लाभ कंत्राटदारास देण्यात आलेला नाही. तसेच सदर अतिरिक्त बाब दरसूचीमुळे उद्‌भवणाऱ्या अधिक्यास मंजूरी प्रदान केलेली आहे. त्यानंतर कंत्राटदारास भूगतान करण्यात आलेले आहे.

वरील अभिप्रायास महालेखापाल यांनी पुढीलप्रमाणे फेर आक्षेप घेतलेले आहेत.

शासनाने सादर केलेल्या अनुपालनाचे अनुषंगाने धरणाची उंची ४.५० मी. ने वाढविण्यात आली होती. उंची वाढविण्याचा आदेश देईपर्यंत कंत्राटदाराने ५० टक्के काम पुर्ण केले होते. धरणाचे संकल्पनातील सुधारणेमुळे आवरण भरावाच्या कामाचे परिमाणात २०४९४८२ घमी वाढ झाली. निविदेच्या अटीनुसार आवरण क्षेत्रातील परिमाण हे उपलब्ध अनिवार्य खोदकामातून व बुडीत क्षेत्रातील खदानीतुन करणे आवश्यक होते. तसेच कंत्राटदाराने वाढीव परिमाण कंत्राटातील अटी व शर्तीनुसार करण्याचे मान्य केले आहे. त्यापुढे कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती यांनी सादर केल्याप्रमाणे (४ जुलै २०११) या अतिरिक्त बाबीकरीता मुद्दा उपस्थित केलेला असतांना कंत्राटदाराला भुगतान झालेले दिसून येते.

मंजूर केलेला अतिरिक्त बाब दरसुचीतील बाब, मंजूर निविदेतील बाबी मध्ये समाविष्ठ असल्याने निविदा कलम-१४ मध्ये नमुद तरतुदी नुसार नविन बाब होत नाही. प्रस्तुत काम

निविदे अंतर्गत झालेले असून हा शेरा अद्यापपर्यंत कायम आहे व बाब प्रपत्र ब मध्ये समाविष्ट असल्याने, या बाबीकरीता अतिरिक्त बाब दरसुची मंजूर करणे आवश्यक नाही.

या बाबत शासनाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

या पूर्वी शासनाचे दि. १४/०६/२०११ चे पत्रान्वये विषयांकित प्रकरणावर अभिप्राय देण्यात आले आहे. दि. १५/९/२०११ चे पत्रान्वये कळविण्यात आलेल्या आक्षेपाबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

सपन नदी प्रकल्प, ता. अचलपूर, जि. अमरावती या मध्यम प्रकल्पास शासन निर्णय क्र. एस.पी.एम./१०९१/१०२०/(१४३/९१)/ जसंज दिनांक ३/११/९५ अन्वये १३९.२७ कोटी रुपयास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. प्रशासकीय मान्यता प्रस्तावानुसार सपन धरण स्थळी ७५ टक्के विश्वासाहार्य येवा ३८.९५१४ द.ल.घ.मी. व ५० टक्के विश्वासाहार्य येवा ५०.०४ द.ल.घ.मी. इतका आहे.

धरणाचे कामास नोव्हेंबर २००० मध्ये सुरुवात करण्यात आली. दि. २१/७/२००४ च्या शासन पत्रानुसार धरणाची क्षमता वाढवून अतिरिक्त सिंचन सोई उपलब्ध करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याचे कळविले होते. त्या अनुषंगाने मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना (मा.ध), नाशिक यांचे मार्फत जलशास्त्रीय अभ्यास करण्यात आला त्याचा अहवाल अ.अ. (मा.ध.) म.सं.चि.सं., नाशिक यांनी दि. २१ ऑक्टोबर, २००४ नुसार सादर केला होता. त्यानुसार धरणाची पूर्ण संचय पातळी पुर्वीच्या ५१०.०० मी. ऐवजी ५१४.५० मी. एवढी ठेवण्यात आली. याप्रमाणे धरणाचे उंचीत ४.५० मी. ने वाढ करण्याच्या प्रस्तावास जलसंपदा विभागाचे पत्र क्र. सपन १००४/४२(१९१/२००४) म.प्र.३१/५/२००५ नुसार सदर प्रस्तावास मंजूरी दिली आहे. धरणाचे उंचीत ४.५ मी. वाढ झाल्यामुळे पूर्वीची साठवण क्षमता २८.९४ द.ल.घ.मी. ऐवजी ३९.२६ द.ल.घ.मी. झाल्याने साठ्यात १०.३२.द.ल.घ.मी. ने वाढ झाली आहे.

मुख्य धरणाची निविदा सन १९९९-२००० साली निश्चित झालेली होती व त्यानुसार ठेकेदारामार्फत काम प्रगतीपथावर होते. मूळ निविदेच्या ५० टक्क्यापेक्षा जास्त काम झालेले असल्यामुळे मुख्य अभियंता यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार कामाची गुणवत्ता व एकसंघता तसेच समन्वय राखण्याच्या दृष्टिकोनातून मूळ ठेकेदाराच्या सध्याच्या निविदेअंतर्गत काम केल्याने शासनाचा फायदा होणार असल्याने ठेकेदाराने दि. १०.१.२००५ रोजी दिलेल्या पत्रान्वये सहमती दिल्यानुसार वाढीव काम व सुधारणा, मुळ अभिकरणाकडून सध्याच्या निविदेअंतर्गत

काम पूर्ण करण्याच्या प्रस्तावास दि. ३१.५.२००५ अन्वये शासकीय मान्यता प्रदान केली आहे. मूळ निविदानुसार धरणाचे आवरण भरावाचे (casing) काम २७,२४,६१८ घ.मी. होते. धरणाची उंची वाढल्याने हे परिमाण ४७,७४,१०० घमी. झाले. या परिमाणात २०,४९,४८२ घमी. वाढ झाली. निविदाप्रमाणे आवरण भरावाचे काम उपलब्ध सामुग्री व बुडीत क्षेत्रातील उद्ग्रहण क्षेत्रातून (Borrow Area From Submergence) प्रस्तावीत होते. आवरण भरावाचे वाढीव परिमाण बुडीत क्षेत्रातील खदानीत उपलब्ध होत नसल्याने त्याच खदानीत खोलवर खोदकाम करुन आवरण भरावाचे परिमाण उपलब्ध करुन घ्यावे लागले. खदान क्षेत्रातील वरच्या पातळीवरील मुरुमाचे खोदकाम करुन यापूर्वीच आवरण भरावात वापर झालेला असल्याने, खोलवर असणाऱ्या मृदु खडकात खोदकाम करावे लागले. ही बाब चालु निविदा दरात समाविष्ट नसल्याने निविदेतील कलम ३८ लागु होत नाही. त्यामुळे सदरचे वाढीव आवरण भरावाचे परिमाण अतिरिक्त बाब म्हणून करण्याचा प्रस्तावास शासन पत्र क्र. सपन नदी १००७/६४८/(१८३/२००७)मप्र दिनांक २५/७/२००७ नुसार १४६८६९० घ.मी. परिमाणास अतिरिक्त बाब व ५.२६ कोटी च्या आधीक्यास मान्यता प्रदान करण्यात आली.

मुळ निविदेमध्ये गाभा भराव (hearting) परिमाण ५,६०,९९७ घ.मी. एवढे होते. धरणाची उंची ४.५० मीटरने वाढल्याने ते ५,८४,३८० घ.मी. एवढे झाले व परिमाणात २३,३८३ घमी. ने वाढ झाली. निविदानुसार गाभा माती ३ कि.मी. अंतरातील उद्ग्रहण क्षेत्रातुन (Borrow Area) वापरणे अंतर्भूत होते. या क्षेत्रातून सुमारे ३,३८,९५७ घ.मी. एवढे परिमाण उपलब्ध झाले. निविदेतील उर्वरीत परिमाण व वाढीव परिमाण असे एकूण २,४५,४२३ घमी. शिल्लक होते. धरणाच्या खालील बाजूस ३ कि.मी. अंतरावरील परिसरात काळ्या मातीचे (गाभा भराव) आवश्यक परिमाण उपलब्ध झाले नाही. तेथील जमिनी आदिवासी शेतकऱ्यांच्या होत्या व त्यांनी जमीन देण्यास विरोध केल्यामुळे गाभा भरावाचे काम करण्याकरिता ८ कि.मी. अंतरावरील जुन्या तलावाच्या क्षेत्रातून आणणे प्रस्तावीत करण्यात आले. आर्द्र स्थितीतील साहीत्य व अतिरिक्त वहनावळीसह गाभा भरावाचे काम करणे निविदेअंतर्गत नसल्याने निविदेतील कलम ३८ मधील तरतुदी लागू होत नाही. त्यामुळे गाभा माती कामासाठी नविन खदान क्षेत्र (Borrow Area) ८ कि.मी. अंतरावरुन तलावातील माती आणून त्यासाठीचे नवीन दरपृथकरण करुन अतिरिक्त बाबीच्या प्रस्तावास शासन जलसंपदा विभाग, पत्र क्र. सपन

नदी-२००७ / (१६६/२००७)/म.प्र. दिनांक ७/६/२००७ नुसार रु. ४.४३ कोटी किंमतीच्या व अतिरिक्त बाबीच्या प्रस्तावास शासनाची मंजूरी प्रदान करण्यात आली.

धरणाचा मुळसाठा २८.९४ द.ल.घ.मी. ऐवजी ३९.२६ द.ल.घ.मी. झाल्याने कामाच्या व्याप्तीत बदल झाला आहे. धरणाचे वाढीव काम प्रगतीपथावरील कामाशी निगडीत असल्याने व मुळ धरणाचा अविभाज्य भाग असल्याने कामाची गुणवत्ता व एकसंधता तसेच समन्वय राखण्याच्या दृष्टिने त्याच कंत्राटदारामार्फत करणे गरजेचे होते. वाढीव काम अतिरिक्त बाब म्हणून निविदेतील कलम-१४ अंतर्गत करण्यासाठी मंजूरी देण्यात आलेली आहे. वरील विवेचनावरुन या प्रकरणी निविदा मधील अटी व शर्तीनुसार सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेवून कार्यवाही करण्यात आलेली असून कंत्राटदारास कोणताही अतिरिक्त लाभ प्रदान केलेला नाही.

प्रकल्पाचे स्थान हे सातपुडा पर्वतरांगाच्या पायथ्याशी असल्याने लगतचे क्षेत्रातील भुस्तरात सर्वसाधारणपणे सुमारे ०.५० मी. खोलीपर्यंत मुरुम १.५० मी. खोलीपर्यंत मऊ खडक व त्याखाली कठीण भुस्तर प्रत्यक्षात लागला. त्यामुळे सदर परिमाण जास्तीत जास्त कठीण भुस्तरातील असल्याने त्याची हवारी व दबाईकरीता आधुनिक यंत्र सामुग्रीचे सहाय्याने अतिरिक्त श्रमशक्तीचा वापर करणे भाग पडले. यानुसार प्रत्यक्षात आवरण क्षेत्राचे कामासाठी केलेली ही बाब निविदा अंदाजपत्रकात गृहीत धरलेल्या बाबीपेक्षा भिन्न झाली व कंत्राटदारास अतिरिक्त खर्च देणे अनिवार्य ठरले.

अतिरिक्त बाब मुळ बांधकामाचाच भाग असल्यामुळे व त्यापासून वेगळे करता येत नसल्यामुळे याच करारनाम्याअंतर्गत त्यातील अटी व शर्तीनुसार करुन घेण्याचे प्रस्तावित करण्यात आले. हे वाढीव काम. कंत्राटदाराने निविदा अटी व शर्तीनुसार करण्याची सहमती दिली. करारनामा कलम १४ मधील प्रावधानानुसार अतिरिक्त बाब मंजूर करण्यात आलेली आहे. ती करारनाम्यातील प्रावधानानुसारच आहे. करारनामा कलम १४ मध्ये " जर अतिरिक्त बाबीचा दर निविदेत नमुद केलेला नसेल तर ते काम विभागाच्या दरसुची नुसार करण्यात यावे." असे प्रावधान आहे. त्यानुसारच अतिरिक्त बाब मंजूर केलेली आहे. वर विषद केलेल्या बाबींचा व त्यांचे दराचा अंर्तभाव मंजूर निविदेत नसल्यामुळे या प्रकरणात कलम ३८ लागू करुन त्याचा वापर करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. त्यामुळे कंत्राटदाराला रु. ८.२५ कोटीचा संविदात्मक अतिरिक्त लाभ देण्यात झाला असे म्हणणे संयुक्तीक होणार नाही.

त्याबाबत कोणतीही अनियिमितता झालेली नाही. त्यामुळे हा परिच्छेद निकाली काढण्यात यावा ही विनंती.

साक्ष :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने दि. २९ मे, २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

सपन नदी प्रकल्प, तालुका अचलपूर, जिल्हा अमरावती येथील बंधाऱ्याचा कामाच्या जादा परिमाणाकरिता कंत्राटाच्या खंड ३८ खाली विनियमन करण्याऐवजी अतिरिक्त बाब दर सूची मंजूर करण्याचा परिणाम कंत्राटदाराला रु. ८.२५ कोटींचा संविदात्मक अतिरिक्त लाभ होण्यात आला तसेच या प्रकल्पातून सिंचन सुरु झाले आहे का व या प्रकल्पातून नळ पाणी पुरवठा योजना दिली जात आहे का याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सदरहू योजनेचे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे व सिंचनाचा लाभ मिळायला सुरुवात झालेली आहे. या प्रकल्पातून १६३ गावांना नळ पाणी पुरवठा दिलेला आहे. परंतु, ते प्रत्यक्षात कार्यान्वित व्हायचे आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत हे काम केले जाते.

यासंदर्भात महालेखाकारांनी सांगितले की, हे काम अंदाजित रक्कमेच्या २१ टक्के कमी दराने पूर्ण करण्यास देण्यात आले होते. अतिरिक्त कामाचे प्रदान हे निविदेच्या खंड ३८ चा वापर करुन करावयास हवे होते असा ऑडिटचा आक्षेप आहे याबाबत विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, मुख्यतः हा प्रकल्प जेव्हा मंजूर झाला तेव्हा पाणी साठवण क्षमता २८ दशलक्ष घनमीटर होती. नंतर मागणी आली त्यामुळे १०.३२ दशलक्ष घनमीटर पाणी साठवण क्षमता वाढविली. त्यामुळे मूळ निविदेनुसार धरणाचे आवरण भरावाचे (casing) जे काम होते ते धरणाची उंची वाढल्याने वाढले. निविदेप्रमाणे हे काम उपलब्ध सामुग्री व बुडीत क्षेत्रातील उद्ग्रहण क्षेत्रातून प्रस्तावित होते. परंतु, ते तेथे उपलब्ध होत नसल्याने तेथे खोलवर खोदकाम करुन ते उपलब्ध करुन घ्यावे लागले. ही बाब चालू निविदा दरात समाविष्ट नसल्याने हे काम अतिरिक्त बाब म्हणून करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला व शासनाने त्यास मान्यता दिली. तसेच, मूळ निविदेतील गाभा भरावाचे कामही धरणाची उंची वाढल्याने वाढले. तसेच, निविदेनुसार गाभा भरावाकरिता ज्या अंतरातील माती वापरणे अपेक्षित होते, तेथे आवश्यक परिमाण उपलब्ध झाले नाही. त्यामुळे हे काम करण्याकरिता ८ कि.मी. अंतरावरील जुन्या तलावाच्या क्षेत्रातून माती आणणे प्रस्तावित करण्यात आले. परंतु,

आर्द्र स्थितीतील साहित्य व अतिरिक्त वहनावळीसह गाभा भरावयाचे काम करणे निविदेंतर्गत नसल्याने हे काम अतिरिक्त बाब म्हणून करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला व शासनाने त्यास मान्यता दिली. यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीमध्ये ह्या प्रकरणी निविदांमधील अटी व शर्तीनुसार सक्षम प्राधीकरणाची मान्यता घेवून कार्यवाही करण्यात आलेली असून कंत्राटदारास कोणताही अतिरिक्त लाभ प्रदान केलेला नाही असे म्हटले आहे.

काही घटक न मिळाल्याने ते जास्त अंतरावरुन आणावे लागल्यामुळे वाढीव खर्च झाला आहे परंतु, काम पूर्ण झाले आणि पाणी साठवणुकीची क्षमता १० टक्के इतकी वाढली. त्याकरिता जर ८ कोटी रुपये इतका खर्च आला असेल तर एक वेळ consider करता येईल. या संदर्भात एकंदर विचार करता, अचलपूर सारख्या ठिकाणचा पाणी साठा वाढला आहे, कालव्याचे काम झाले आहे व या प्रकल्पातून १६३ गावांना नळ पाणी पुरवठा दिलेला आहे. जे काम झाले त्याच्या तुलनेत हा खर्च क्षमापित करण्यायोग्य आहे का असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता महालेखाकारांनी याबाबत समितीस सांगितले की, कंत्राटदाराने वर्ष २००५मध्ये निविदेच्या खंड ३८ नुसार पैसे घेण्याचे मान्य केले होते. जादा परिमाणाकरिता निविदेच्या खंड ३८ नुसार विनियमन न केल्याने आलेल्या डिफरन्सची रक्कम ८ कोटी रुपये इतकी आहे.

महालेखाकारांच्या म्हणण्यानुसार पाणी साठा क्षमता १० टक्क्यांनी वाढली तरी, निविदेच्या खंड ३८ नुसार जादा परिमाणाकरिता विनियमन न केल्याने कंत्राटदाराला ८ कोटी रुपये जास्त दिले आहेत. निविदेतील खंड ३८ प्रमाणे ही रक्कम का दिली नाही अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, अंदाजित रकमेच्या २१ टक्के कमी दराने काम करण्यास दिलेले होते. तसेच, १२५ टक्क्यांहून जास्त परिमाणाचा दर सुधारणेस पात्र होता. त्याप्रमाणे १२५ टक्क्यांहून जास्त परिमाणे निविदेच्या कमी व जास्त टक्केवारीने वाढवून किंवा कमी करुन प्रचलित दरसूचीप्रमाणे प्रदान करावयाची होती. अतिरिक्त कामांबाबत महामंडळाने शासनाकडे प्रस्ताव पाठविला, शासनाने त्याला मान्यता दिली व त्याप्रमाणे ते काम करुन घेण्यात आले.

यासंदर्भातील विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीमध्ये निविदेत सदर कामाचे विनिर्दीष्टात बदल झालेला असल्याचे निविदेतील कलम ३८ वाढीव कामास लागू होत नाही.

तसेच निविदेतील कलम ३८ मध्ये केलेली तरतूद **विवरणपत्र क्र.१** वर दर्शविण्यात आलेली आहे.

यासंदर्भात "tender quantity" पेक्षा "quantity executed" मध्ये ३.३७ % एवढाच फरक असल्याचे महालेखाकारांनी समितीस सांगितले.

गाभा भरावाकरीता १५ कोटी रुपयांचा अग्रीम दिलेला आहे असे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, खदान क्षेत्रातील वरच्या पातळीवरील मुरुमाचे खोदकाम करुन यापूर्वीच आवरण भरावात वापर झालेला असल्याने, त्याखाली असणाऱ्या मृदु खडकात खोदकाम करावे लागले, ही बाब चालू निविदा दरात समाविष्ट नव्हती त्यामुळे निविदेतील कलम ३८ लागू होत नाही म्हणून सदरचे वाढीव आवरण भरावाचे परिमाणास अतिरिक्त बाब म्हणून अधिकच्या रकमेची मान्यता प्रदान करण्यात आली. या मूल्यामध्ये मटेरियलचे स्पेसिफिकेशन वेगळे असल्यामुळे निविदांची रक्कम वाढली असती तर वाढीव रक्कम द्यावी लागली असती आणि निविदा बिलो गेले असते तर रक्कम कमी द्यावी लागली असती.

ठेकेदाराने जानेवारी २००५ मध्ये दिलेल्या पत्रात नमूद केले आहे की, "In this regard, we wish to inform you that we are ready and willing to execute such additional and altered work as per terms and condition of the accepted B-1 agreement in force." असे असताना हर्टींगच्या कामासाठी ३७ टक्के वाढीव रक्कम का दिली गेली व केवळ डॅमची उंची वाढली आहे. त्यात जादा बाबी कोणत्या होत्या ? अशी विचारणा महालेखाकारांनी केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, जे काम केले त्याचे विनिर्देश (स्पेसिफिकेशन) सारखे असते तर गोष्ट वेगळी होती, परंतु विनिर्देश (स्पेसिफिकेशन) वेगळे असल्यामुळे जादा दर यादीप्रमाणे अदा केले. निविदेतील अटी आणि शर्तीनुसारच विभागाने त्यांना पेमेंट केलेले आहे. हार्टींग आणि केसिंगचे स्पेसिफिकेशन बघितले तर केसींग करता मूळ टेंडर मध्ये सॉफ्ट केसिंग वापरण्यात आले व वाढीव परिमाणाकरीता हार्ड केसिंग वापरावे लागले, हार्टींगच्या वाढीव कामाकरिता दूर अंतरावरुन आर्द्र स्थितीतील साहीत्य त्यांना आणावे लागले. त्यामुळे त्याच्या वाहतुकीसाठी त्यांना अतिरिक्त खर्च आला, तसेच ईआयआरएलची तरतूद करारामध्ये होती, त्यानुसार त्यांना प्रदान करण्यात आले.

सन १९९५ साली काम सुरु करणे आवश्यक असतांनाही काम सुरु करण्यासाठी सन २००० साल का उजाडले? याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, वन जमिनीची अडचण होती त्यामुळे लगेच काम सुरु करता आले नाही. यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, वनजमिनीच्या प्रस्तावास अंतिम मान्यता दिनांक ३/४/२००० मध्ये मिळाली आहे त्यामुळे प्रकल्पास नोव्हेंबर-१९९५ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळूनही प्रत्यक्ष काम नोव्हेंबर -२००० मध्ये सुरु करण्यात आले.

सदर प्रकल्पाच्या निविदेंच्यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, निविदा सन १९९५ साली कामाला मान्यता मिळाली असून सन २००० साली निविदा काढण्यात आली. आता शासनाने नवीन धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. जमीन ताब्यात घेतल्याशिवाय कोणत्याही प्रकल्पाचे काम हाती घ्यावयाचे नाही किंवा कोणत्याही कामाच्या निविदा काढावयाच्या नाहीत, अशा कडक सूचना महामंडळांना देण्यात आलेल्या आहेत.

रजेगाव काठी येथे डिसेंबर २००३ ते फेब्रुवारी २००४ या कालावधीत तीमाहीमध्ये भाव निर्देशांक विचारात घेऊन नियमबाह्य भाववाढ म्हणून १ कोटी १३ लाख रुपये जादा प्रदान करण्यात आले आहे या आक्षेपासंदर्भात खुलासा करता विभागीय सचिवांनी सांगितले की, रजेगाव काठी येथील उपसासिंचन योजनेचे गोंदिया जिल्ह्यातील हे काम आहे. यामध्ये प्रामुख्याने रायझिंग मेन व डिलेव्हरी चेंबरचे काम होते. सन २००४ सालातील हे काम आहे. या कालावधीमध्ये स्टीलच्या किंमती फार वाढल्या होत्या. टेंडरमध्ये प्राईज व्हेरिएशन क्लॉजची तरतूद देखील करण्यात आलेली होती. ही एक ट्रान्झीशन फेज होती. स्टीलच्या किंमती वाढल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने भाववाढीसंदर्भात एक सुधारित शासन निर्णय काढला. यासंदर्भात ईपीसी समोर देखील चर्चा झाली होती. त्या शासन निर्णयाप्रमाणे टेंडरमध्ये नवीन क्लॉज समाविष्ट केला. याप्रमाणे स्टील व सिमेंटकरिता वेगळे प्राईज इंडायसेस अंतर्भूत केले गेले. यासंबंधी बीडर्सने वेगळे प्राईज इंडायसेस कोट केले होते. याप्रकाराच्या क्लॉजनुसार सुधारीत देकार काढले. ही प्रोसेस सप्टेंबर महिन्यात झाली. जरी स्टीलचा रेट त्यावेळी ३२ हजार एवढा वाढला होता तरी आपण १८ हजार हाच मूळ रेट ठेवला, त्यामुळे या बाबतीत ठेकेदाराला कुठल्याही प्रकारे वाढीव फायदा होत नाही.

पहिल्यांदा निविदा सादर केली तेव्हा ५४ टक्के पेक्षा जास्त निविदा होते. सुधारित निविदांमध्ये ५३ टक्के पेक्षा जास्त होते. जे पहिले बीडर्स होते त्या सर्वांच्यांकडून बीडर्स

ऑफर्स मागितली. यामध्ये जो लोयेस्ट बिडर होता, तो पूर्वीचाच ठेकेदार होता. नवीन प्राईज इन्डेक्स ॲडॉप्ट केला. त्यानंतर सुधारित ऑफर्स मागविल्या,परंतु नवीन टेंडरमध्ये मूळ टेंडरच्या अगोदरचा क्वार्टर गृहित धरला, त्याऐवजी नवीन निविदांच्या अगोदरचा क्वार्टर गृहित धरावयास हवा होता. यापैकी किती काम शिल्लक आहे याची माहिती विभागाला असेलच ही वस्तुस्थिती महालेखाकारांनी निदर्शनास आणून दिली असता याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, स्टीलचे दर वाढल्यामुळे आपल्या करारामध्ये स्टिल करीता स्वतंत्र भाव वाढीच्या सुत्राची तरतूद केलेली होती. किरकोळ काम शिल्लक आहे. मूळ ज्या निविदा बोलाविल्या होत्या त्यावेळेसे स्टीलचे, सिमेंटचे जे दर होते, त्याचे प्राईज इन्डायसेस जुनेच ठेवले होते.

५३ टक्के जास्त टेंडर स्वीकारलेले आहे. निविदांच्या मागे जाऊन वाढीव रक्कम विभागाकडून का देण्यात येते अशी विचारणा महालेखाकारांनी विभागीय सचिवांनी केली असता वाढीव अशी रक्कम दिलेली नाही. जुन्या दराने निविदा बोलाविण्यात आली होती. त्यानंतर अपडेटेड कॉस्ट काढली. त्यानुसार ५३ टक्के पेक्षा जास्त दराने निविदा आल्या कारण स्टीलचे दर वाढले होते. ही बाब एक्सपेन्डीचर प्रायोरिटी कमिटीच्या निदर्शनास देखील आणली होती. समितीने त्यावर वाढीव दराने निविदा देण्याबाबत निर्णय घेतलेला होता.

महालेखाकारांनी पुढे असेही निदर्शनास आणले की, मूल्य (प्राईज) इन्डायसेस वेगळा वापरला त्यामुळे या मूळ निविदा राहिलेल्या नाहीत. सुधारित ऑफर्सनुसार टेंडर्स कॉल करण्यात आले होते. परंतु नवीन निविदांमध्ये मूळ निविदांच्या अगोदरचा क्वार्टर का गृहित धरला गेला? सुधारित ऑफर्स मागितली असता त्यामध्ये ५३ टक्के पेक्षा जास्त निविदा त्याच बिडर्सकडून आले. यासंदर्भातील ऑन गोईंग लेखा अहवाल महालेखाकारांकडे आहे. सुधारित ऑफर्समध्ये प्राईस इन्डायसेस घ्यायला हवा होता. याच्या फरकामुळे एवढी रक्कम जादा झाली. जोपर्यंत हा करार संपत नाही तोपर्यंत ही जादा रक्कम अशीच चालू राहील. याबाबत माहिती विशद करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, स्टीलचे भाव १८ हजार रुपये टनाऐवजी ३२ हजार रुपये झाला तर निश्चितपणे तेवढा खर्च झालेलाच आहे. ७ लाख ५३ हजार रुपये खर्च जास्त आला असता, ही बाब लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. ईपीसी समोर जाऊन विभागाने हा निर्णय घेतलेला आहे.

यामध्ये स्टील, सिमेंट इत्यादी मटेरियलनिहाय परिगणना (कॅलक्यूलेशन) महालेखाकारांनी केलेली आहे. त्यामध्ये स्टीलची किंमत जी सरासरी मूल्य इन्डायसेस प्रमाणे १९०.० ऐवजी २३९.१० एवढी एस्क्ट्रा गृहित धरली आहे. तरी देखील प्राईस एस्कलेशनपेक्षा जादा झालेली आहे ही बाब महालेखाकारांनी निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, प्राईस डिव्हीजनचा अंतर्भाव करुन पहिल्यांदा निविदा बोलाविली. त्यानंतर सुधारीत क्लॉजसंदर्भात ईपीसी समोर चर्चा करुन सुधारित ऑफर्स मागितल्या. निविदेतील तरतुदीच्या आधारे प्राईज डिव्हीजन परिगणना (कॅलक्यूलेशन) केलेले आहे. यासंदर्भात विभागाने शासनाची भूमिका मांडलेली आहे.

इसमें सरकार का हित ध्यान में नहीं रखा गया है. इसमें कॉंट्रेक्टर को लगातार फायदा दिया जा रहा है असे मत प्रधान महालेखाकारांनी व्यक्त केले असता कॅलक्यूलेशननुसार ७ लाख ५२ हजार रुपयांची बचत दिसते असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

संबंधित विभागाने महालेखाकार कार्यालयासमवेत चर्चा करुन आक्षेप दूर करावेत. तसेच दोषी असणाऱ्या अधिकाऱ्याविरुध्द कारवाई करण्यात यावी. सन १९९५ सालातील कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली आणि सन २००० साली काम सुरु झाले. महालेखाकार कार्यालयाचा आक्षेप आहे की, विभागाकडून सातत्याने ठेकेदारास जास्त पैसे देण्यात येत आहेत. परंतु, प्रचलित पध्दतीने काम दिलेले आहे असे विभागाकडून सांगण्यात आले की, सरकारचा कसा फायदा होईल यापेक्षा ठेकेदाराचा फायदा कसा होईल असे एकंदरीत यावरुन दिसून येते असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले.

अभिप्राय व शिफारशी

सपन नदी प्रकल्प, तालुका अचलपूर, जिल्हा अमरावती येथील बंधाऱ्याचा कामाच्या जादा परिमाणाकरिता कंत्राटाच्या खंड ३८ खाली विनियमन करण्याऐवजी अतिरिक्त बाब दर सूची मंजूर करण्याचा परिणाम कंत्राटदाराला रु. ८.२५ कोटींचा संविदात्मक अतिरिक्त लाभ झाला आहे. सदरहू योजनेचे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे व सिंचनाचा लाभ मिळायला सुरुवात झालेली आहे. ओलिताखाली किती क्षेत्र आले व किती शेतकऱ्यांना याचा फायदा झाला याचा खुलासा सचिवांनी केला नाही केवळ या प्रकल्पातून १६३ गावांना नळ पाणी पुरवठा दिलेला आहे हिच बाब समितीच्या निदर्शनास आणली.

हा प्रकल्प जेव्हा मंजूर झाला तेव्हा पाणी साठवण क्षमता २८ दशलक्ष घनमीटर होती. नंतर मागणी आली त्यामुळे १०.३२ दशलक्ष घनमीटर पाणी साठवण क्षमता वाढविली. त्यामुळे मूळ निविदेनुसार धरणाचे आवरण भरावाचे (casing) जे काम होते ते धरणाची उंची वाढल्याने वाढले. निविदेप्रमाणे हे काम उपलब्ध सामुग्री व बुडीत क्षेत्रातील उद्ग्रहण क्षेत्रातून प्रस्तावित होते. परंतु, ते तेथे उपलब्ध होत नसल्याने तेथे खोलवर खोदकाम करुन ते उपलब्ध करुन घ्यावे लागले. हे काम अतिरिक्त बाब म्हणून करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला व शासनाने त्यास मान्यता दिली.

स्टील, सिमेंट इत्यादी मटेरियलनिहाय परिगणना (कॅलक्यूलेशन) महालेखाकारांनी केलेले आहे. त्यामध्ये स्टीलची किंमत जी सरासरी मूल्य इन्डायसेस प्रमाणे १९०.० ऐवजी २३९.१० एवढी जादा गृहित धरली आहे. अशा प्रकारचे कॅलक्यूलेशन महालेखाकारांनी केलेले आहे, तरी देखील प्राईस एस्कलेशनपेक्षा जादा पेमेंट झालेले आहे

विभागाने महालेखाकार कार्यालयासमवेत चर्चा करुन आक्षेप दूर करावेत असे समितीने निदेश देवूनही अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली याबाबत समितीस कळविण्यात आले नाही. प्रकल्पात सन १९९५ साली प्रशासकीय मान्यता मिळाली आणि सन २००० साली काम सुरु झाले. महालेखाकार कार्यालयाचा आक्षेप आहे की, विभाग सातत्याने ठेकेदारास जास्त पैसे देत आहेत. प्रचलित पध्दतीने काम दिले असते तर शासनाचे नुकसान झाले नसते. शासनाचा कसा फायदा होईल यापेक्षा ठेकेदाराच्या फायद्याकडे लक्ष दिले जाते. असे समितीचे मत आहे. याप्रकरणी दोषी असणाऱ्या अधिकाऱ्याविरुध्द कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

गृहनिर्माण विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००८-२००९ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ३.३.१ "विश्वस्त मंडळास गैरवाजवी फायदा" व परिच्छेद क्र. ३.३.४ " कार्यालयीन खोल्यांच्या बांधकामावर वायफळ खर्च" यासंदर्भात महालेखापरिक्षकांनी खालील अभिप्राय दिलेले आहेत.

(अ) "विश्वस्त मंडळास गैरवाजवी फायदा"

डिसेंबर, २००७ मध्ये प्रत्यक्षपणे वाटप करण्यात आलेल्या जमिनीचे अधिमूल्य ठरविण्याकरिता अस्तित्वात असलेल्या सुधारीत किंमत धोरणाऐवजी लुप्त किंमत धोरणाचा उपयोग केल्यामुळे, विश्वस्त मंडळास फायदा व महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणास रु. ९.६६ कोटीचा तोटा झाला.

महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरण (म.गृ.क्षे.वि.प्रा.) १९९२ मध्ये ठरविलेल्या किंमत धोरणानुसार सार्वजनिक विश्वस्त मंडळास वाटप झालेल्या जमिनीचे अधिमूल्य प्रत्येक प्रकरणांच्या गुणावगुणांच्या आधारे चालू बाजारभावाप्रमाणे असलेल्या किंमतीच्या ५० टक्के ते ७५ टक्के इतके असावयास हवे होते. कालांतराने जून २००३ च्या निर्णयानुसार शैक्षणिक आणि इस्पितळे या कारणाकरीता असलेल्या जमिनीसाठी ते अधिमूल्य बाजारभावाच्या ७५ टक्के असावे अशी सुधारणा करण्यात आली. जमिनीचे वाटप आदेश हाती देताना जमिनीचे दर शासकीय सिध्द गणकानुसार जमिनीच्या बाजारभावाप्रमाणे मानणे आवश्यक होते. हा निर्णय, ज्यामध्ये जमिन वाटपाचे आदेश ह्या निर्णयाच्या तारखेनंतर (२१ जून, २००३) द्यावयाचे होते, अशा काही प्रकरणांना लागू करण्यात आला होता.

मुंबई मंडळाच्या जमिन शाखेचे अभिलेखे तपासले असता (एप्रिल, २००९) असे आढळून आले की, रुग्णालयासाठी राखून ठेवलेला १०,००० चौ.मी. चा भूखंड शासनाकडून (ऑक्टोबर, २०००). नर्गिस दत्त स्मारक विश्वस्त मंडळास म.गृ.क्षे.वि.प्रा. च्या अटी व शर्ती अंतर्गत आणि किंमत धोरणानुसार रुगणालय बांधण्यासाठी देण्यात आला होता.

शासन निर्णयास अनुसरुन, विश्वस्त मंडळास आवश्यक ती माहिती व कागदपत्रे सादर करण्याविषयी एक पत्र देण्यात आले होते. (नोव्हेंबर, २०००) परंतु विश्वस्त मंडळाने एक वर्षाच्या कालावधीनंतर म.गृ.क्षे.वि.प्राधिकरणास सदर भूखंड वार्षिक रु. १/ च्या नाममात्र

भाडेपट्टयाने ९९ वर्षाच्या भाडेपट्टयाकरीता देण्याविषयी विनंती केली.(नोव्हेंबर, २००१) ह्या विनंतीनुसार सुधारीत करण्याच्या तत्वावर म.गृ.क्षे.वि.प्राधिकरणाने सदर भूखंड वार्षिक रु. १/- या नाममात्र दराने ३० वर्षे या मुदतीकरीता म.गृ.क्षे.वि.प्रा.च्या कर्मचारी वर्गास व त्यांचेवर अवलंबून असलेल्यास, रुग्णालयाने मोफत औषधोपचार सुविधा पुरविण्याच्या अटीवर, कोणतेही अधिमूल्य न आकारता देण्याचे मान्य केले. किंमत धोरणानुसार निर्णय न झाल्यामुळे आणि म.गृ.क्षे.वि.प्रा.स नुकसान झाल्यामुळे सदर प्रकरण मान्यतेकरीता शासनाकडे पाठविण्यात आले. (जुलै, २००२) जी मान्यता कधीच आली नाही.

विश्वस्त मंडळाच्या विनंतीनुसार जुलै, २००६ मध्ये सदर भूखंड, शासनाने निश्चित केलेले दर त्यांचेवर बंधनकारक आहेत तसेच प्रत्यक्ष बांधकाम, भूखंडाचे औपचारिकपणे हस्तांतर झाल्यानंतरच हाती घेण्यात येईल असा विशिष्ट वचननामा मंडळाकडून मिळाल्यानंतर अतिक्रमणापासून जमिनीचे रक्षण करण्याच्या उद्दीष्टाने काळजीवाहू तत्वावर त्यांना हस्तांतरीत करण्यात आला होता.

असेही लक्षात आले होते की, प्रथमच (डिसेंबर, २००७) विद्यमान किंमत धोरणानुसार परिगणीत केलेले जमिनीचे अधिमूल्य रु.२१.३७ कोटी (२००७ सिध्द गणक दराच्या ७५ टक्के) ३० दिवसात मंडळाकडे भरणा करावेत असे औपचारीक वाटप पत्र मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांच्या संमतीने विश्वस्त मंडळास दिले होते. तथापि, एक वर्षाचा अवधी गेल्यानंतर (डिसेंबर, २००८) विश्वस्त मंडळाने म.गृ.क्षे.वि.प्राधिकरणास विनंती केली की जेव्हा वाटपाबाबतचा निर्णय झाला त्या वर्षी म्हणजे २००२ मध्ये अस्तित्वात असलेले रु. ११.७१ कोटी इतके अधिमूल्य घेऊन जमिन ताब्यात द्यावी, सदर विनंती म.गृ.क्षे.वि.प्राधिकरणाने त्यांच्या जानेवारी, २००९ च्या सभेमध्ये स्विकारली. त्यानुसार सुधारीत वाटप पत्र आणि रु. ११.७१ कोटीची मागणी विश्वस्त मंडळास सादर करण्यात आली. (फेब्रुवारी २००९) फेब्रुवारी, २००९ मध्ये विश्वस्त मंडळाने रु. २.९३ कोटी इतकी रक्कम अदा केली.

ह्याप्रमाणे विद्यमान सुधारीत किंमत धोरणानुसार जमिनीचे अधिमूल्य न आकारता ज्यावेळेस म्हणजे डिसेंबर, २००७ मध्ये प्रत्यक्ष जमिनीचे वाटप करताना लुप्त किंमत धोरणानुसार अधिमूल्य आकारल्यामुळे विश्वस्त मंडळास गैरवाजवी फायदा झाला आणि त्यामुळे

झालेला रु. ९.६६ कोटीचा तोटा (रु. २१.७१ कोटी- रु. ११.७१ कोटी) म.गृ.क्षे.वि.प्राधिकरणास सहन करावा लागला.

म.गृ.क्षे.वि.प्राधिकरणाच्या उपाध्यक्षांनी असे म्हटले की (मे, २००९) प्राधिकरणांस, विशिष्ट राखीव भूखंड सवलतीच्या दराने रुग्णालयासाठी प्रदान करण्याच्या असलेल्या अधिकारानुसार सदर भूखंड शासनाकडून देण्यात आला असल्यामुळे तेथे कोणत्याही प्रकारचे नुकसान किंवा विश्वस्त मंडळास गैरवाजवी फायदा झालेला नाही. दिलेले हे उत्तर स्विकारर्ह नाही कारण चालू असलेल्या किंमत धोरणानुसार (२००३) सवलतीचे दर २००७ च्या सिध्द गणक दराच्या ७५ टक्के इतके होते. जेव्हा अंतिम वाटप करण्यात आले होते.

सदर बाब मे, २००९ मध्ये शासनाच्या सचिवाकडे संदर्भित करण्यात आले होते. उत्तर अद्याप आले नाही. (ऑक्टोबर, २००९).

ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला

लेखा परिच्छेदातील निरीक्षणामध्ये नमूद केलेला भूखंड हा सुमारे १०,००० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड महानगरपालिकेच्या विकास आराखड्यानुसार रुग्णालयाच्या प्रयोजनार्थ आरक्षित आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) नियम १९८२ विनियम १६ अंतर्गत मंत्रीमंडळ उपसमितीला प्राप्त असलेल्या अधिकारात दिनांक २३.०८.२००० रोजीच्या बैठकीत हा भूखंड नर्गिस दत्त मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्ट यांना वितरीत करण्याचा निर्णय घेतला व दिनांक २३.१०.२००० रोजी शासन आदेश निर्गमित करण्यात आले.

प्रचलित धोरणाप्रमाणे मुंबई मंडळाने पत्र क्र.३३८५/दि.१८.११.२००० अन्वये आवश्यक ती कागदपत्रे सादर करण्यास संस्थेस कळविले. या पत्रान्वये संस्थेस अधिमूल्य व इतर रक्कम कळविण्यात आलेली नव्हती. ट्रस्ट सामाजिक कार्य करीत असल्यामुळे सदर भूखंडाचे अधिमूल्य नाममात्र रु. १/- वार्षिक भुईभाडे घेवून त्यांना वितरण करावे अशी दिनांक ३०.११.०१ च्या पत्रान्वये विनंती तत्कालीन उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा प्राधिकरण यांचेकडे केली होती.

ट्रस्टच्या विनंतीच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या बैठकीसमोर मुंबई मंडळातर्फे सदर बाब सादर करण्यात आली. प्राधिकरणाने ठराव क्र. ५८१८, दिनांक १२.०७.०२ अन्वये मुंबई

मंडळाच्या शिफारशीनुसार नाममात्र भुईभाडे रु. १/- आकारुन तीन वर्षाच्या भाडेपट्टयावर ट्रस्टला वितरण करण्यास मान्यता दिली व त्या अनुषंगिक होणारा तोटा रु. ११.७० कोटी निर्लेखित करण्यास मान्यता दिली. सदर ठराव शासनाच्या मंजूरीसाठी पाठविण्यात आला होता. शासनाकडून या ठरावास मंजूरी दिलेली नाही. ट्रस्टकडून हमीपत्र घेवून सदर भूखंडावर अतिक्रमण होवू नये म्हणून केवळ संरक्षण व देखभालीकरीता दिनांक २७.७.०६ रोजी भूखंडाचा ताबा ट्रस्टला देण्यात आला. संस्थेस विनियम १६ अंतर्गत वितरीत होणाऱ्या भूखंडाकरीता अधिमूल्य रक्कम रु. २१,३७,५२,०३०/- मुंबई मंडळाच्या दिनांक १०.१२.०७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले.

संस्थेने पुन: त्यांचे पत्र दिनांक ८.१२.०८ अन्वये सदरहू रक्कम कमी करण्याबाबत मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा प्राधिकरण यांच्याकडे केली होती. संस्थेच्या वरील विनंती अनुषंगाने बाब टिप्पणी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २.०१.०९ रोजीच्या बैठकीसमोर विचारार्थ व निर्णयार्थ सादर करण्यात आली. प्राधिकरणाने ठराव क्र. ६३६६ नुसार या प्रकरणी प्राधिकरण ठराव क्र. ५६५६, दि. ५.०३.०१ अन्वये विहित अधिमूल्य आकरण्याचा निर्णय घेतला तसेच उक्त रकमेवर व्याज न आकारण्याचा निर्णय घेतला. प्राधिकरण ठराव क्र. ५६५६, दि.५.०३.०१ मधील तरतुदीनुसार येणारे अधिमूल्य रु. ११,७०,६९,५२९/- इतकी रक्कम ट्रस्टला दिनांक ५.०२.०९ रोजी मुंबई मंडळाच्या पत्रान्वये कळविण्यात आली होती.

वरील रक्कमेपैकी संस्थेने दिनांक २४.०२.०९ रोजी रु. २,९३,००,०००/- चा भरणा केलेला आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) नियम, १९८२ विनियम ६ नुसार अशी तरतूद आहे की, शैक्षणिक संस्था, हॉस्पिटल, दवाखाना, व्यायामशाळा किंवा खेळाचे मैदान या करीता सवलतीच्या दराने अधिमूल्य आकारण्याकरिता प्राधिकरण सक्षम आहे. प्राधिकरणाने अधिमूल्य रक्कमेवर व्याज न आकारण्याबाबत निर्णय घेतलेला आहे. या निर्णय घेतलेल्या ठरावात अधिमूल्य रक्कम भरण्याकरिता मुदत विहित केलेली नाही.

शिल्लक रक्कम रु. ८,७७,६९,५३०/- चा भरणा न केल्याने पुन: मुंबई मंडळाने पत्र क्र. ६४७७, दि. १८.१०.१० अन्वये ट्रस्टला शिल्लक रक्कम ३० दिवसांचे आत भरणा करण्याबाबत कळविण्यात आले. तसेच या पत्रान्वये असेही कळविण्यात आले की, यापूर्वी कळविल्यानुसार

ट्रस्टने वितरणाच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे रु. २००/- मात्र च्या मुद्रांक पत्रावरील संमतीपत्र मंडळाकडे सादर केलेले नाही.

वरील दोन्ही बाबीची गंभीर दखल घेण्यात येत असून, यानुसार आपल्या ट्रस्टला भूखंडाचे वितरण का रद्द करण्यात येऊ नये, याबाबत १५ दिवसांच्या मुदतीची नोटीस देण्यात आली.

मंडळाच्या उक्त नोटिशीच्या अनुषंगाने ट्रस्टने दि. २८.१०.१० च्या पत्रान्वये भूखंडाच्या अधिमूल्य भरण्याबाबत विलंब झाल्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली व संपूर्ण रक्कम लवकरच भरण्याचा मानस प्रकट केला व त्याकरिता ९० दिवसांचा कालावधी देण्याची विनंती मुंबई मंडळाकडे केली होती.

ट्रस्टच्या खुलाश्याला जवळपास दोन वर्षाचा अवधी होऊन त्यांनी डिसेंबर, २०१२ पर्यंत उर्वरित रकमेचा भरणा केलेला नव्हता. तद्नंतर नर्गिस दत्त मेमोरियल चॅरीटेबल ट्रस्टने दि. ९.१.२०१३ च्या पत्रान्वये म्हाडास विनंती केली की, त्यांनी म्हाडास भरलेले सुमारे रु. २ कोटी ९३ लाख रुपये त्या ट्रस्टला परत करावे व सदर भूखंडाचे वितरण रद्द करावे. सदरहू प्रकरण मुंबई मंडळाने दिनांक १३.२.२०१३ च्या पत्रान्वये गृहनिर्माण विभागाकडे पाठविले. त्याप्रमाणे गृहनिर्माण विभागाने प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

(ब) "कार्यालयीन खोल्यांच्या बांधकामावर वायफळ खर्च"

पुणे गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास मंडळाकडून प्रशासकीय मान्यतेसाठी घातलेल्या अटीच्या विरोधात जाऊन कोणतीही निश्चित मागणी नसताना कार्यालयीन खोल्यांचे बांधकाम करण्यात आले ज्यामुळे रु. १.५७ कोटी खर्च करुन बांधलेल्या कार्यालयीन खोल्या सात वर्षाहून जादा अवधीकरीता विनावापर पडून आहेत.

महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरणाने (म.गृ.क्षे.वि.प्रा.) फुलेनगर, येरवडा, पुणे येथे अंदाजे रु. १.६६ कोटी किंमतीचे व्यापारी संकुलाचे बांधकामास ज्यामध्ये अनुक्रमे पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर ११ दुकाने आणि १० कार्यालयीन खोल्या बांधल्या आहेत. प्रशासकीय मान्यता दिली (जून, १९९७) कामाच्या निविदा देण्यापूर्वी अशी अट घातली होती की, दुकाने आणि कार्यालयीन खोल्यांकरिता १०० टक्के मागणी असल्याची खात्री स्थानिक चौकशी आणि सर्वेक्षणाच्या सहाय्याने करुन घेण्यात यावी.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची कार्यालयीन शाखा असलेल्या पुणे गृहनिर्माण आणि क्षेत्रीय विकास मंडळाचे अभिलेखे तपासले (फेब्रुवारी २००९) असता असे आढळून आले की, कामाच्या निविदा डिसेंबर, १९९८ मध्ये मागवल्या होत्या आणि रु. ६४.७० लाख किंमतीचे कामाचे आदेश जून १९९९ मध्ये काढण्यात आले होते. प्रशासकीय मान्यतेमध्ये घातलेल्या अटीला अनुषक्त न राहता ऑक्टोबर, १९९९ मध्ये केलेल्या पहिल्या चौकशीत फक्त १० दुकानांची मागणी नोंदली गेली. अशा पुरेशी मागणी नसताना पुणे गृहनिर्माण आणि क्षेत्रीय विकास मंडळाने तळमजल्यावरील दुकानाच्या मर्यादीत बांधकामाऐवजी सर्व कार्यालयीन खोल्या बांधण्यासाठी पुढाकार घेतला आणि सर्व काम नोव्हेंबर, २००१ मध्ये रु. २.३८ कोटी इतका खर्च करुन पूर्ण केले.

पुणे गृहनिर्माण आणि क्षेत्रीय विकास मंडळ यांनी फेब्रुवारी, २००१, जानेवारी २००२, नोव्हेंबर, २००४ आणि ऑक्टोबर २००६ मध्ये दुकाने/कार्यालयीन खोल्या विकाण्यासाठी प्रयत्न करुनसुध्दा मे, २००९ अखेर रु. १.५७ कोटी किंमतीच्या ८ कार्यालयीन खोल्या विक्रीशिवाय राहिल्या.

बांधकाम सुरु करण्यापूर्वी कार्यालयीन खोल्यासाठी निश्चित मागणीचा अंदाज न घेतल्यामुळे तसेच मागणीची वाट पाहण्याशिवाय शासकीय विभाग/संस्था/किंवा निमशासकीय संस्थांना ह्या जागांचे वाटप करण्याची शक्यता आजमावून पाहण्याची कोणतीही कार्यवाही न

केल्यामुळे रु. १.५७ कोटी किंमतीच्या आठ कार्यालयीन खोल्या सात वर्षाहून अधिक काळाकरिता विनावापर पडून होत्या.

हे प्रकरण शासनाच्या सचिवास मे, २००९ मध्ये कळण्यात आले होते. उत्तर आले नव्हते. (ऑक्टोबर, २००९).

ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात खालीलप्रमाणे खुलासा केला

सर्वे नं. १२० भाग फुलेनगर, येरवडा, पुणे येथील ११ दुकाने व १० कार्यालयीन गाळ्यांच्या बांधकामासाठी व्यापारी संकुलाच्या योजनेस जून, १९९७ मध्ये म्हाडाकडून प्रशासकीय मान्यता मिळाली. प्रशासकीय मान्यतेमधील अट क्र. १८ नुसार दुकाने व कार्यालयीन गाळे विक्रीसाठी स्थानिक चौकशी/सर्वेक्षण करुन १०० टक्के गाळे विक्री होतील याबाबतची खात्री करुन मुख्य अभियंता/प्राधिकरण यांना कळविण्याच्या सूचना होत्या. तथापि, सदर कामाची निविदा पुणे मंडळाकडून मुख्य अभियंता/प्राधिकरण यांचे सहमतीनेच स्विकृत करण्यात आलेली आहे. दिनांक १७/६/१९९९ रोजी बांधकाम सुरु करण्यात येऊन दिनांक १३/११/२००१ रोजी पूर्ण करण्यात आले. सदर व्यापारी संकुलाच्या योजनेस "१६० प्राधिकरण निधी" या लेखा शिर्षाखाली प्रशासकीय मान्यता देण्यात आली. तथापि, प्रचलित असलेल्या पध्दतीनुसार दुकाने/व्यापारी गाळयांची विक्री करण्यासाठी बांधकाम पूर्ण झाल्यानंतरच निविदा मागवून ठोस मागणी घेतली जात होती. तरीसुध्दा वस्तुस्थिती अशी आहे की, सदरहू योजनेसाठी बांधकाम सुरु असल्याच्या कालावधीतच ऑक्टोबर, १९९९ मध्ये दुकाने व कार्यालयीन गाळे विक्रीसाठी जाहिरात देण्यात आली. या पहिल्याच जाहिरातीस प्रतिसाद म्हणून १० दुकानांची विक्री झाली. त्यानंतर १ दुकान व १ कार्यालयीन गाळा यासाठी मागणी प्राप्त झाली. त्यानंतर ऑक्टोबर, २००८ मध्ये १ कार्यालयीन गाळयांची विक्री झाली. सदर योजनेच्या इमारत बांधकामावर जमिनीची किंमत, विकास कामासाठी खर्च व इमारत बांधकाम खर्च असे मिळून रुपये २.३८ कोटी इतका खर्च झालेला नसून फक्त रुपये १,०९,८१,४६०/- इतकाच खर्च झालेला आहे. सदर बांधकाम खर्चापैकी ११ दुकाने व २ कार्यालयीन गाळे विक्रीतून रुपये १,१६,३४,१३१/ इतकी रक्कम प्राप्त झाली आहे. सदर प्राप्त रकमेपैकी रुपये ६५,५८,८९५/- इतकी रक्कम योजना पूर्ण होण्याच्या पूर्वीच प्राप्त झाली व रुपये १०,७५,२३६/- इतकी रक्कम योजना पूर्ण होताच प्रत्यक्ष ताबा देण्यापूर्वी प्राप्त झाली त्यानंतर जुलै, २००९

मध्ये रुपये ४०,००,०००/- इतकी रक्कम प्राप्त झाली. त्यामुळे वर उल्लेख केल्यानुसार सदर योजनेमध्ये कोणताही प्रत्यक्ष खर्च झालेला निधी अडकून पडला नाही. उर्वरीत ८ कार्यालयीन गाळे विक्रीतून पुणे मंडळास आस्थापना, व्याजाचे भांडवलीकरण व नफा हीच रक्कम प्राप्त होणार आहे. पुणे मंडळाकडून वर्तमानपत्रामधून दिनांक ३०.३.२०१० रोजी दिलेल्या जाहिरातीस प्रतिसाद मिळाला असून शिल्लक असणाऱ्या आठही गाळ्यांची निविदा पध्दतीने विक्री झालेली आहे. सदरहू आठ गाळ्यांसाठी सद्यःस्थितीत रु. ३.३० कोटी इतकी रक्कम प्राप्त झाली आहे.

साक्ष :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक १४ मे, २०१३ रोजी प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांची साक्ष घेतली. सदर साक्षी दरम्यान महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरण,मुंबई यांचा १०,००० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड नर्गिस दत्त मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्ट यांना शासनाची मान्यता न घेता वितरित का करण्यात आला तसेच सदर जमिन कोठे आहे व त्याचे बाजारमूल्य काय आहे अशी विचारणा समितीने केली असता, यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) नियम १९८२ विनियम १६ अंतर्गत मंत्रीमंडळ उप समितीला प्राप्त असलेल्या अधिकारात दि. २३.८.२००० रोजीच्या बैठकीत हा भूखंड नर्गिस दत्त मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्ट यांना वितरित करण्याचा निर्णय घेतला. त्या संदर्भात दि. २३.१०.२००० रोजी शासन आदेश निर्गमित करण्यात आले. वर्सोवा येथे सदर जागा असून ती नर्गिस दत्त मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्टला देण्याचा निर्णय सन २००० मध्ये घेण्यात आला. प्रचलित धोरणाप्रमाणे मुंबई मंडळाने दि.१८/११/२००० रोजी नर्गिस दत्त मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्ट यांना संबंधित सर्व कागदपत्रे सादर करण्यास सांगितले. त्यावेळी जागेची रक्कम कळविण्यात आली नव्हती. संबंधित ट्रस्ट सामाजिक कार्य करीत असल्याने सदर भूखंडाचे अधिमूल्य नाममात्र रु. १ वार्षिक भुईभाडे घेऊन वितरण करावे अशी दि. ३०.११.२००१ च्या पत्रान्वये विनंती तत्कालीन उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हाडा प्राधिकरण यांच्याकडे करण्यात आली होती.

ट्रस्टच्या विनंतीच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या बैठकीसमोर मुंबई मंडळातर्फे सदर बाब सादर करण्यात आली. प्राधिकरणाने ठराव क्र. ५८१८,दि.१२.७.२००२ अन्वये मुंबई मंडळाच्या

शिफारशीनुसार नाममात्र भुईभाडे रु.१ आकारुन तीस वर्षाच्या भाडेपट्टयावर ट्रस्टला वितरण करण्यास मान्यता दिली. सदर ठराव शासनाच्या मंजुरीसाठी पाठविण्यात आला होता. शासनाकडून या ठरावास मंजुरी देण्यात आली नाही. ट्रस्टकडून हमीपत्र घेऊन सदर भूखंडावर अतिक्रमण होऊ नयेत या करिता केवळ संरक्षण व देखभालीकरिता दि २७.७.२००६ रोजी भूखंडाचा ताबा ट्रस्टला देण्यात आला. संस्थेस विनियम १६ अंतर्गत वितरित होणाऱ्या भूखंडाकरिता अधिमूल्य रक्कम रु. २१,३७,५२,०३० मुंबई मंडळाच्या दि. १०.१२.२००७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले त्यानुसार संस्थेने पत्र दि. ८.१२.२००८ अन्वये सदरहू रक्कम कमी करण्याबाबत उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,म्हाडा प्राधिकरण यांच्याकडे केली होती. संस्थेच्या विनंतीनुसार म्हाडाने दि. २.०१.२००९ च्या बैठकीसमोर टिप्पणी विचारार्थ व निर्णयार्थ सादर केली. प्राधिकरणाने ठराव क्र. ६३६६ नुसार या प्रकरणी प्राधिकरण ठराव क्र. ५६५६,दि.५.३.२००१ अन्वये विहित अधिमूल्य आकारण्याचा निर्णय घेतला. तसेच उक्त रकमेवर व्याज न आकारण्याचा निर्णय घेण्यात आला. प्राधिकरण ठराव क्र. ५६५६ मधील तरतुदीनुसार येणारे अधिमूल्य रु. ११ कोटी ७० लाख रुपये इतकी रक्कम ट्रस्टला दि. ५ /२/२००९ रोजी मुंबई मंडळाच्या पत्रान्वये कळविण्यात आली. वरील रकमेपैकी संस्थेने दि. २४.२.२००९ रोजी रु.२,९३,००,००० चा भरणा केला.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) नियम १९८२ विनियम ६ अनुसार अशी तरतूद आहे की, शैक्षणिक संस्था, हॉस्पिटल, दवाखाना, व्यायामशाळा व खेळाचे मैदान या करिता सवलतीच्या दराने अधिमूल्य आकारण्याकरिता प्राधिकरण सक्षम आहे. प्राधिकरणाने अधिमूल्य रकमेवर व्याज न आकारण्याबाबत निर्णय घेतलेला आहे.या निर्णय घेतलेल्या ठरावात अधिमूल्य रक्कम भरण्याकरिता मुदत विहित केलेली नाही. शिल्लक रक्कम ८ कोटी ७७ लाख रुपये ३० दिवसांच्या आत भरणा करण्याबाबत ट्रस्टला कळविण्यात आले. वरील दोन्ही बाबीची गंभीर दखल घेऊन ट्रस्टला भूखंडाचे वितरण का रद्द करण्यात येऊ नये, याबाबत १५ दिवसांच्या मुदतीची नोटीस देण्यात का आली.

मंडळाच्या या उक्त नोटिसीच्या अनुषंगाने ट्रस्टने दि. २८.१०.२०१० च्या पत्रान्वये भूखंडाच्या अधिमूल्य भरणाबाबत विलंब झाल्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली व संपूर्ण रक्कम लवकरच भरण्याचा मानस प्रकट केला व त्याकरिता ९० दिवसांचा कालावधी देण्याची विनंती ट्रस्टकडून विभागाला करण्यात आली.

ट्रस्टच्या खुलाशाला जवळजवळ २ वर्षाचा कालावधी होऊनही त्यांनी उर्वरित रकमेचा भरणा केला नाही. यानंतर दि. ९.१.२०१३च्या पत्रान्वये ट्रस्टने म्हाडास विनंती केली की, त्यांनी म्हाडास भरलेले सुमारे २ कोटी ९३ लाख रुपये ट्रस्टला परत करावेत व सदर भूखंडाचे वितरण रद्द करावे. सदरहू प्रकरण मुंबई मंडळाने दि. १३.२.२०१३ च्या पत्रान्वये गृहनिर्माण विभागाकडे पाठविले असून त्याप्रमाणे गृहनिर्माण विभागाने प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर केला आहे अशी सविस्तर माहिती विभागीय सचिवांनी समितीसमोर सादर केली.

सदर जमिनीचे बाजारमूल्य किती आहे ? सदर ट्रस्टला देण्यात येणारी जमीन बाजारमूल्याच्या ७५ टक्के रकमेने देण्यात यावी असा निर्णय शासनाने घेतलेला असून देखील सदर ट्रस्टला ही जमीन नाममात्र भाडेपट्टयाने का देण्यात आली अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, सदर जमीन देण्याचा निर्णय सन २००२ मध्ये घेण्यात आला होता. म्हाडा जमीन देताना संस्थेकडून प्रीमियम आकारते. ११कोटी ३७ लाख रुपये प्रिमीयमची रक्कम असून दर वर्षी रु.१ या दराने नाममात्र भाडे आकारले जाते.

बाजारभावाच्या ७५ टक्के अधिमूल्याची रक्कम आकारण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असूनही १ रु. एवढया नाममात्र भाडेपट्टयाने सदर जमीन देण्याचा निर्णय कसा काय घेण्यात आला, हा निर्णय प्राधिकरणाच्या अधिकार क्षेत्राच्या बाहेरचा आहे, असे समितीला वाटते.

यासंदर्भात अधिक खुलासा करताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, सदर ट्रस्टला जमीन देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास नियम १९८२ विनियम १६ अंतर्गत सार्वजनिक संस्था, रुग्णालये यांकरिता सवलतीच्या दराने जमीन देण्याच निर्णय घेण्यात आला.

जी संस्था धर्मादाय आहे, किंवा सार्वजनिक, लोकहितार्थ काम करते त्यांना बाजारमूल्याच्या ७५ टक्के किमतीत जमीन द्यावी असे शासनाचे धोरण आहे. सदर संस्था या जागेचा वापर कोणत्याही व्यवसायाकरिता करणार नाही हे तपासण्याची आवश्यकता आहे. प्राधिकरणाने आपल्या अधिकाराच्या बाहेर जाऊन १ रु. या नाममात्र भाडेपट्टे दराने जमीन सदर ट्रस्टला दिली असे मत समितीने व्यक्त केले. यासंदर्भात प्रिमीयम व लिजची रक्कम ठरवण्याचा अधिकार म्हाडाकडे असून त्याप्रमाणे निर्णय घेण्यात आला असे विभागीय सचिवांनी समितीला सांगितले.

म्हाडा व इतर महामंडळांना शासनाच्या निर्णयाच्या अधीन राहून निर्णय घ्यावा लागतो. धर्मादाय स्वरुपाच्या संस्थांना बाजारमूल्याच्या ७५ टक्के सवलतीच्या दराने जमीन उपलब्ध करुन देण्याचे शासनाचे धोरण आहे. या धोरणाचे पालन न करता १ रु. नाममात्र दराच्या भाडेपट्टयाच्या आधारावर जमीन ट्रस्टला देण्यात आली. सदर संस्थेचे विश्वस्त कोण आहेत अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी असे सांगितले की, खासदार श्रीमती प्रिया दत्त यांच्या सहीने एक पत्र प्राप्त झाले असून इतर ट्रस्टी कोण आहेत, याची माहिती समितीला नंतर उपलब्ध करुन दिली जाईल. (सदर माहिती अद्याप समितीला प्राप्त झालेली नाही.)

सदर ट्रस्टला जमीन दिल्यानंतर तेथे अद्यापही रुग्णालय सुरु केले गेले नाही. आता हा भूखंड परत घ्यावा, असे पत्र संस्थेने पाठवले आहे. ही जागा दुसऱ्या एखाद्या संस्थेला दिली असती तर तेथे चांगले काम झाले असते. १३ वर्षे ही जमीन पडून राहिली. आता एजींनी आक्षेप घेतल्यामुळे ही कार्यवाही केली जात आहे. शासनाने स्वत:हून या संदर्भात कोणतीही कृती केली नाही असे मत समितीने व्यक्त केले.

सदर जागेच्या सध्याच्या बाजारमूल्याविषयी समितीने विचारणा केली असता सदर समितीचे बाजारमूल्य ९० कोटी रुपये इतके असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

सुरवातीला ठरवल्याप्रमाणे शासनाला २० कोटी रुपये मिळणार होते. मात्र या १३ वर्षात २० कोटी रुपये मिळाले नाहीत. त्यापैकी केवळ २ कोटी रुपये मिळाले. गेल्या १० वर्षामध्ये उर्वरित रकमेवरील व्याजाचा विचार केल्यास म्हाडाचे आर्थिक नुकसान झाले आहे तसेच म्हाडाने शासनाच्या मंजुरीकरिता प्रस्ताव पाठवला होता. मात्र त्यास अद्याप शासनाने मंजुरी दिलेली नाही. सदर भूखंडावर अतिक्रमण होऊ नये, तो सुरक्षित राहावा या करिता तो ट्रस्टींकडे देण्यात आला. मुंबईसारख्या शहरात अनेक ठिकाणी शासनाच्या भूखंडावर ताबडतोब अतिक्रमण होऊन तेथे झोपडया तयार होतात. यामुळे मोकळया भूखंडावर अतिक्रमण होऊ नये याकरिता संरक्षण देणे हा हेतू होता असे मत समितीने व्यक्ता केले असता, अतिक्रमण होऊ नये म्हणून सदर जागेवर कंपाऊंड वॉल बांधण्यात आली होती. कंपाऊंड वॉलकरिता केलेल्या खर्चाची रक्कम मागितलेली नसून ट्रस्टने भरलेले २ कोटी ९३ लाख रुपयांची मागणी केलेली

आहे. सदर जागेचा वापर ट्रस्टने केला नाही अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

सदर प्रकरणामध्ये शासनाकडून अनियमितता झाली आहे काय तसेच शासनाने यासंदर्भात वेळेत निर्णय घेतला नाही का याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, सन २०००मध्ये सदर जागेच्या संदर्भात निर्णय झाला होता. त्यावेळी म्हाडाने शासन धोरणानुसार भूखंडाची किंमत घ्यावी, अशी स्पष्ट सूचना दिलेली होती. सन १९९२ मध्ये दर आकारण्याचे धोरण अस्तित्वात आले. त्यावेळी रेडीरेकनरच्या ५० ते ७५ टक्के रक्कम प्रीमियम म्हणून आकारावी असे धोरण निश्चित करण्यात आले होते. तसेच म्हाडाला प्रिमियमची रक्कम ठरविण्याचा अधिकार आहे.

म्हाडाने लीज रेन्ट किती घ्यावे या संदर्भात काही नियमावली आहे काय याबाबत समितीने विचारणा केली असता नर्गिस दत्त मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्टने नाममात्र दराने वार्षिक भाडे आकारावे असे म्हाडाला कळविले होते. त्यावेळी रेडीरेकनर प्रमाणे त्या भूखंडांची किंमत २७ कोटी होती. ७५ टक्के प्रमाणे ती रक्कम २१ कोटी रुपये होते आणि तेवढी रक्कम भरण्याबाबत ट्रस्टला कळविण्यात आले होते अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

नर्गिस दत्त मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्टने ही रक्कम तीन महिन्यात भरावयाची होती. मुदतीत न भरल्यास १३ टक्के व्याजाने आकारणी करण्यात येणार होती. त्या शिवाय रक्कम न भरल्यास वितरण रद्द करण्यात येऊन सदरहू भूखंडावर हक्क राहणार नाही असे देखील कळविण्यात आले होते तरी सुध्दा संस्थेकडून उर्वरित रक्कम प्राप्त न होण्याची कारणे काय आहेत असे समितीने विचारले असता, विभागीय सचिवांनी असे सांगितले की, म्हाडाने नर्गिस दत्त मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्टला २१ कोटी रुपये भरण्याचे कळविल्यानंतर सदरहू ट्रस्टने तेवढी रक्कम भरणे शक्य नसल्याचे कळविले. त्यानंतर नर्गिस दत्त मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्टकडून ११ कोटी ७० लाख रुपये घ्यावेत असा ऑथॉरिटीचा निर्णय झाला होता. सदरहू ट्रस्टला एक रुपया नाममात्र भाड्याने भूखंड देण्याचा अधिकार म्हाडाला आहे किंवा कसे हे स्पष्ट झाले नव्हते. त्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी ते प्रकरण शासनाकडे पाठविण्यात आले. परंतु सन २००९ पर्यंत शासनाकडून मंजुरी मिळाली नाही. विभागाने ट्रस्टला वेळोवळी नोटीसा दिल्या. दिनांक ३१.१२.२०१२ रोजी पत्र पाठवून कळविले की, आपल्याकडून उर्वरित रक्कम मिळालेली नसल्यामुळे भूखंडाचे वितरण रद्द करण्यात येईल." त्यानंतर दिनांक ९.१.२०१३

रोजी नर्गिस दत्त मेमोरियल ट्रस्टकडून सदरहू भूखंड सरेंडर करीत असल्याचे कळविण्यात आले. "Maharashtra Disposal of Land Rules, 1982" मध्ये जमिनीच्या लीज आणि प्रिमियम संदर्भात "The Authority may dispose off vacant land at concessional rate on premium and lease rent to Educational Institution, Hospital, Dispensary, Gymnasium..." या नियमाखाली संपूर्ण अधिकार ऑथॉरिटीला दिलेले आहेत.

सदरहू रक्कम कमी करण्याबाबत ट्रस्टने म्हाडाला कळविल्यानंतर प्राधिकरणाने ठराव करुन ११ कोटी ७० लाख इतकी रक्कम घेण्याचा निर्णय घेतला आणि त्यानुसार ट्रस्टला तसे कळविण्यात आले. सन २००० मध्ये रेडीरेकनरचा दर वेगळा होता. २००६ मध्ये दर वेगळा होता आणि आता सन २०१३ मध्ये दर वेगळा आहे, त्यामुळे या आकडेवारीमध्ये बदल होत आहे याबाबत विभागाने खुलासा सविस्तर करावा असे निर्देश दिल्यानंतर विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, म्हाडाच्या चीफ ऑफिसरने गेल्याच आठवड्यात भूखंडाचा ताबा परत घेत असल्यासंदर्भात ट्रस्टला पत्र पाठविलेले आहे. सदरहू भूखंड हा रुग्णालयासाठी आरक्षित आहे. आता तो लिलाव पध्दतीने वितरित करणार आहोत.

सदरहू भूखंड बरीच वर्षे पडून होता. या भूखंडापोटी म्हाडाला ११ कोटी ७० लाख रुपये मिळणार होते, परंतु त्यापैकी फक्त २ कोटी ९३ लाख रुपये मिळाले. उर्वरित ८-९ कोटी रक्कम ट्रस्टने भरली नाही. त्यामुळे या रकमेवरील व्याज आपणास मिळालेले नाही. तेव्हा ट्रस्टने भरलेले पैसे परत करणार की जी रक्कम भरलेली आहे ती वळती करुन ट्रस्टला आणखी रक्कम भरण्यास सांगणार आहात, म्हाडा नेमकी काय कार्यवाही करणार आहे तसेच सदरहू भूखंड हा रुग्णालयासाठी आरक्षित होता. त्या ठिकाणी रुग्णालय झाले असते तर त्याचा रुग्णांना फायदा झाला असता ज्या कारणासाठी भूखंड आरक्षित ठेवला होता त्यावर मागील १३ वर्षात रुग्णालय झाले नाही. म्हणजे तेरा वर्षे आपण या सेवेपासून वंचित राहिलो असा त्याचा अर्थ होतो. ट्रस्टने भरलेले पैसे म्हाडाने परत करायचे नाहीत असे समितीचे मत आहे. विभागाने या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे यासंदर्भात विभागाने खुलासा करताना असे सांगितले की, ट्रस्ट स्वतः भूखंड सरेंडर करीत आहे. त्या रुग्णालयाला चार एफ.एस.आय. होता. लिलाव पध्दतीने हा भूखंड दिल्यास म्हाडाला १५० ते २०० कोटी रुपये मिळू शकतील.

जोपर्यंत महालेखाकारांकडून आक्षेप घेण्यात आला नाही तोपर्यंत म्हाडाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. मे २००९ मध्ये महालेखाकारांकडून ऑब्जेक्शन काढण्यात आले, परंतु ऑक्टोबर २००९ पर्यंत शासनाकडून काही उत्तर देण्यात आले नाही असे महालेखाकारांचे म्हणणे आहे. त्यानंतर १८ ऑक्टोबर २०१० रोजी शिल्लक रक्कम ३० दिवसांत भरण्याबाबत ट्रस्टला कळविण्यात आले. त्याबाबत डिसेंबर २०१२ पर्यंत काही कार्यवाही झालेली नाही. त्यानंतर दिनांक ९ जानेवारी २०१३ रोजी ट्रस्टने भूखंडाचे वितरण रद्द करावे व त्यांनी भरलेली रक्कम परत करावी असे कळविले आहे. तेव्हा याची नोंद घेणे आवश्यक आहे. तसेच समितीचे असे म्हणणे आहे की, म्हाडा या प्रकरणी योग्य निर्णय घेऊ शकत नाही काय ? महालेखाकारांचे आक्षेप येईपर्यंत ते वाट का पाहत राहिले ? त्या भूखंडावर रुग्णालय झाले असते तर त्याचा फायदा राज्यातील तसेच देशातील जनतेला झाला असता. कारण मुंबईत कॅन्सरवरील उपचारासाठी राज्यातून आणि देशातून रुग्ण येतात. आपण स्वत:च्या अधिकारात (SUO MOTU) निर्णय का घेतला नाही ? महालेखाकारांकडून आक्षेप घेण्यात आल्यानंतर विभागाकडून कार्यवाही करण्यात आली. सदर कार्यवाहीला विलंब झालेला आहे व झालेल्या विलंबाची कारणे काय आहेत असे समितीने विचारले असता यासंदर्भात समितीच्या मताशी सहमती दर्शवून विभागीय सचिवांनी खुलासा केला की, विभागाने ज्या ज्यावेळी ऑडीट होते त्या त्यावेळी विभागकडून देखील काही बाबी निदर्शनास आणून देण्यात येतात. नर्गिस दत्त मेमोरियल ट्रस्टचा हेतू चांगला होता. कारण त्यांनी सुरुवातीला २ कोटी ९३ लाख रुपये भरले होते. महालेखाकारांनी आक्षेप काढण्यापूर्वी त्या ट्रस्टशी विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाठपुरावा केला होता. ट्रस्टने भरलेले पैसे परत द्यायचे किंवा कसे या संदर्भातील निर्णय ऑथॉरिटी घेऊ शकते. ट्रस्टने भूखंड ताब्यात घेण्यासंदर्भात पत्र दिलेले आहे. भूखंड ताब्यात आल्यानंतर नियमानुसार जाहिरात देऊन त्याचा लिलाव करण्यात येईल. अगोदर सांगितल्याप्रमाणे ट्रस्टने भरलेले पैसे परत करावेत किंवा कसे हा विषय ऑथॉरिटीपुढे आणावा लागेल.

नियम १६ अंतर्गत वितरित करण्यात आलेल्या भूखंडावर उभारण्यात आलेल्या रुग्णालयामध्ये म्हाडाच्या अधिकारी /कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तीस विनामूल्य उपचार करण्यात यावेत अशी अट टाकलेली आहे. समितीचे असे म्हणणे आहे की, फक्त म्हाडाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उल्लेख न करता सर्व सरकारी कर्मचारी केला

असता तर अधिक संयुक्तिक झाले असते. आता म्हाडा त्या भूखंडाचा लिलाव करणार आहे त्यामध्ये तसा उल्लेख करावा असे समितीने विभागाला सूचित केले.

म्हाडाच्या मोकळ्या जागा किती आहेत, त्यापैकी किती जागांवर अतिक्रमण झालेले आहे किंवा होण्याची शक्यता आहे ? तसेच गोरेगाव येथील बांगूर, प्रेमनगर येथे म्हाडाची खूप मोठी जागा आहे त्याठिकाणी अतिक्रमण होण्याची दाट शक्यता आहे. त्याबाबत काय कार्यवाही करणार आहात तसेच म्हाडाच्या मोकळ्या जागांचे ऑडीट करण्यात आले काय अशी समितीने विचारणा केली असता यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, म्हाडाच्या लॅन्ड ऑडीट कमिटीमार्फत ऑडीट करण्यात येते. म्हाडाकडे किती जागा आहे त्यापैकी किती जागांचा विकास करता येईल याची माहिती आहे. तसेच किती जागांवर अतिक्रमण झालेले आहे याची देखील माहिती विभागाकडे आहे. नियम १६ खाली १०७ भूखंडाचे वाटप करण्यात आलेले आहे तसेच नियम १६ अंतर्गत वाटप करण्यात आलेले भूखंड व मंत्रिमंडळाच्या उप समितीने केलेले वाटप या संदर्भातील सर्व माहिती मागील अधिवेशनात सभागृहात ठेवण्यात आली होती. समितीला सदर माहिती पुन्हा सादर करण्यात येईल असे समितीला आश्वासित करण्यात आले. (अद्याप विभागाकडून माहिती अप्राप्त आहे.)

पुण्यामध्ये किती भूखंड मोकळे आहेत, किती भूखंडावर अतिक्रमण झालेले आहे याची माहिती द्यावी. यासंदर्भात विभागीय सचिवांनी माहिती देताना असे सांगितले की, पुणे विभागामध्ये ५ जिल्हे आहेत. या पाच जिल्ह्यांमध्ये ९६ हेक्टर जमिनीवर ३२ भूखंड म्हाडाचे आहेत. त्यापैकी ६४.५८ हेक्टर जमीन वन विभागाच्या अंतर्गत येते. दौंड येथे ४० हेक्टर जमीन आहे. त्याच्या ७/१२ वर वन विभागाचे नाव आहे. काही जमिनीची प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत त्यामुळे म्हाडाला काही कामे करता येत नाही. पीसीएमसी, पीएमसी यांनी ब-याच जागांवर रिझर्व्हेशन टाकले आहेत. आता गृहनिर्माण विभागाच्या ताब्यात ३१.७१ हेक्टर जमीन उपलब्ध आहे. त्या जागेवर प्रत्यक्षात नियोजन करण्याची सुरुवात केलेली आहे. त्या जागेवर अतिक्रमण झालेले नाही.

पुणे गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास मंडळाच्या मालकीच्या किती जागांवर अतिक्रमण झालेले आहे असे समितीने विचारले असता अतिक्रमण झालेले नाही अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला सांगितली.

पुण्यामध्ये इ.डब्ल्यू.एस. रिझर्व्हेशनच्या जागा आहेत, परंतु प्रत्यक्षात त्यांचा ताबा मिळत नाही. इ.डब्ल्यू.एस.च्या जागा महानगरपालिकेने परस्पर आरक्षित केलेल्या आहेत. या संदर्भात गृहनिर्माण विभागाकडून नगरविकास विभागाकडे हरकत दाखल केलेली आहे. विभागाच्या वतीने हा मुद्दा माननीय मुख्यमंत्र्यासमोर मांडणार आहोत असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले.

पुण्याच्या भूखंडांचा ताबा मिळविण्यासाठी आतापर्यंत केलेल्या पत्रव्यवहाराची माहिती समितीला सादर करण्याचे निदेश समितीने दिले. (तथापि अद्याप माहिती अप्राप्त आहे.)

डी.पी.मध्ये इ.डब्ल्यू.एस.सेक्शन येतो. परंतु महानगरपालिकेने इ.डब्ल्यू.एस.साठी असलेले आरक्षण एस.आर.ए.मध्ये कन्व्हर्ट केलेले आहे. त्या भूखंडांवरील काही घरे महानगरपालिकेने घेतलेली आहेत. यामध्ये विकासकांचाही फायदा झालेला आहे. या सर्व प्रक्रियेच्या वेळी म्हाडाला कोणीही विचारात घेतलेले नाही. म्हाडा ही स्वायत्त संस्था असल्यामुळे म्हाडाने कोर्टामध्ये प्रकरण का नेले नाही ? पुणे शहरामध्ये म्हाडाच्या मालकीची साधारणपणे १० हेक्टर जागा असण्याची शक्यता आहे यासंदर्भात खुलासा करावा असे समितीने सांगितले असता पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये २७ ठिकाणी आरक्षण दाखविलेले आहे अशी माहिती समितीला देण्यात आली.

म्हाडाचे पुणे, नागपूर, कोकण विभागात किती प्लॉट आहेत, ते प्लॉट कोणत्या कारणासाठी आरक्षित ठेवले आहेत, अतिक्रमण किती प्लॉटवर झालेले आहे, महानगरपालिकेने इ.डब्ल्यू.एस.अंतर्गत काही कामे केली आहेत काय याबाबत झोननिहाय माहिती सादर करावी. परंतु यासंदर्भात फक्त कोकण म्हाडा मंडळाकडून माहिती समितीला प्राप्त झालेली आहे. **विवरणपत्र क्र. ---** (इतर मंडळाकडून अद्यापही माहिती अप्राप्त आहे) याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते.

पुणे शहरामध्ये नवीन डी.पी.मध्ये दाखविलेले आरक्षण रद्द केलेले आहे. महापालिकेने डी.पी.ला अंतिम मान्यता दिलेली नाही. परंतु कालांतराने पुण्यातील म्हाडाचे प्लॉट ताब्यात मिळविण्यासाठी पत्रव्यवहार करण्याचाही अधिकार राहणार नाही. प्रारुप डी.पी.जाहीर झाल्यानंतर तो मंजूर होण्यासाठी म्हाडाकडून पाठपुरावा केला जात नाही. तसेच गृहनिर्माण विभागाच्या प्रधान सचिवांनाही सांगण्यात आले आहे. त्याचप्रमाणे नगरविकास विभागाला देखील म्हाडाचे मत सांगितलेले आहे. म्हाडाकडे ज्या जमिनी येतात त्या जमिनींवर

सर्वसामान्य लोकांना परवडणारी घरे बांधावयाची असतात. अशा जमिनींवर आरक्षण दाखविणे योग्य नाही. विरार-बोळींज येथे म्हाडाची ४३ हेक्टर जमीन होती. त्यापैकी २३ हेक्टर जमिनीवर आरक्षण आणून ठेवलेले आहे. वास्तविक नगरपालिकेने डी.पी.मध्ये आरक्षण दाखवित असताना ते म्हाडाच्या जागांवर दाखवू नये. याबाबत म्हाडाकडून शासनाकडे रिप्रेझेंटेशन करण्यात आलेले आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

म्हाडाला दिलेल्या जागांवर आरक्षण टाकता येते काय याची समितीला माहिती द्यावी. यावर विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, अनेक प्लॉटवर गार्डन, पोलीस स्टेशन, पोस्ट ऑफिस, हॉस्पिटल अशा कारणांसाठी आरक्षण ठेवलेले आहे.

शासनाने म्हाडाच्या जागांवर आरक्षण टाकू नये. म्हाडा देखील सरकारचे प्राधिकरण आहे. त्यांच्या जागांवर आरक्षण दाखविण्याचा महानगरपालिकेला अधिकार नाही असे मत समितीने व्यक्त केले.

एमआरटीपी ॲक्टमध्ये हा दृष्टीकोन दिसून येत नाही. पुणे, नागपूर येथील म्हाडाच्या प्लॉटवर अशा प्रकारची आरक्षणे दाखविलेली आहेत. म्हाडाला गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यासाठीच जागा दिलेल्या असतात. दापोडी येथील प्लॉटवर डी.पी.मध्ये पोलीस स्टेशन, पोस्ट ऑफिस, ग्राऊंडसाठी जागा राखीव ठेवण्याचे दाखविलेले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले.

विरार-बोळींज, पुणे व नागपूरची माहिती समितीला देण्याचे निदेश समितीने दिले. (तथापि, अद्याप माहिती अप्राप्त आहे.)

मुंबईतील गोरेगाव, बांगुरनगर, प्रेमनगर येथील प्राईम लोकेशनवर म्हाडाचा प्लॉट आहे. त्याची समितीला माहिती द्यावी व त्या जागेवर अल्प उत्पन्न गटातील लोकांसाठी घरे बांधण्याची म्हाडाची योजना आहे का ? असे समितीने विचारले असता त्या जागेवर ४-५ अतिक्रमणे होती ती काढण्यात आलेली आहेत व सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

विरार येथे २५ वर्षांपूर्वी अल्प उत्पन्न गटातील २५० शासकीय कर्मचाऱ्यांना गृहनिर्माण प्रकल्पासाठी एक प्लॉट दिला होता. त्या कर्मचाऱ्यांना नगरपालिकेने पाणी पुरवढ्यासाठी, आवश्यक ती कागदपत्रे देण्यासाठी इतर कोणत्याही कामासाठी सहकार्य केलेले नाही. दरम्यानच्या काळात त्या प्लॉटच्या आजुबाजूला मोठमोठे टॉवर्स उभे राहिले आहेत. म्हाडाने

सुध्दा त्यांना कोणतीही मदत केलेली नाही. आता तो प्लॉट विकत घेण्यासाठी बिल्डर्स प्रयत्नशील आहेत याबाबतची माहिती समितीला द्यावी परंतु याबाबत समितीला कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

शासकीय जमिनींची प्रकरणे न्यायप्रविष्ट असतील ती लवकरात लवकर निकाली निघण्यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी स्वतंत्र सिटिंग घेतले पाहिजे असे समितीने विभागाला सूचित केले.

पुण्याच्या जागा म्हाडाने बाजारभावापेक्षा अधिक दराने खरेदी केल्या आहेत का अशी विचारणा समितीने केली. यावर अधिक खुलासा करताना असे सांगितले की, रेडिरेक्नरपेक्षा जास्त दराने खरेदी केलेल्या आहेत. कारण रेडिरेक्नर बाजारभावापेक्षा तूल्यबळ नाही. पुण्यामध्ये जमिनीची आवश्यकता जास्त आहे. प्रत्येक वेळी रेडिरेक्नरची तुलना बाजारभावाबरोबर केली जाते ही वस्तुस्थिती आहे.

पुण्यातील पुनर्विकास प्रकल्पांची समितीला माहिती द्यावी व रेडिरेक्नरचा दर चौरस मीटरप्रमाणे काढला जातो आणि बाजार भावाचा दर चौरस फुटाप्रमाणे काढला जातो काय असे विचारले असता मुंबईसाठी सुधारित धोरण जाहीर केलेले आहे. त्याच धर्तीवर पुण्यातील म्हाडांच्या जागांच्या संदर्भात रेडिरेक्नरमध्ये थोडासा बदल केलेला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले.

कार्यालयीन खोल्यांच्या बांधकामावर वायफळ खर्च

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने सर्व्हे नं.१२० भाग फुलेनगर, येरवडा, पुणे मधील ११ दुकाने व १० कार्यालयीन गाळे विनावापर पडून राहिले होते. त्या दुकानांची व गाळ्यांची विक्री झालेली आहे काय ? या विषयी विचारणा केली असता, यावर खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सर्व्हे नं.१२० भाग फुलेनगर, येरवडा, पुणे मधील ११ दुकाने व १० कार्यालयीन गाळ्यांच्या बांधकामासाठी व्यापारी संकुलाच्या योजनेस जून, १९९७ मध्ये म्हाडाकडून प्रशासकीय मान्यता मिळाली होती. आता सर्व दुकानांची व गाळ्यांची विक्री झालेली आहे, या विक्रीतून जवळपास ३.५० कोटी रुपये प्राप्त झालेले आहेत.

पुणे गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळाकडे असलेले भूखंड आणि त्यांची सद्यःस्थिती याविषयी माहिती देण्याचे समितीने सांगितले. (तथापि, सदरहू माहिती अद्यापही अप्राप्त आहे.)

अभिप्राय व शिफारशी :-

मुंबई, वर्सोवा येथील म्हाडाचा १०,००० चौ.मी. भूखंड मुंबई महानगरपालिकेच्या विकास आराखड्यानुसार रुग्णालयासाठी आरक्षित होता. नर्गीस दत्त मेमोरीयल ट्रस्ट यांना रुग्णालयाकरिता सदरहू भूखंड देण्याबाबत दिनांक २३ ऑगस्ट, २००० रोजी शासनाने निर्णय घेतला. डिसेंबर, २००७ मध्ये सदरहू भूखंडाचे नर्गीस दत्त मेमोरीयल ट्रस्टला वाटप करण्यात आले तेव्हा जमीनीचे अधिमूल्य सुधारित किंमत धोरणाऐवजी लुप्त किंमत धोरणानुसार निश्चित केल्याने म्हाडास ९.६६ कोटीचा तोटा झाल्याचे महालेखापालांनी अभिप्राय व्यक्त केले आहेत.

महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास (जमिनीची वाटप) नियमातील तरतूदीनुसार शैक्षणिक व इस्पितळे याकरिता भूखंडाच्या विद्यमान बाजारभावाच्या ७५ % एवढे अधिमूल्य आकारुन वितरीत करण्याची तरतूद आहे. त्यानुसार जमिनीचे अधिमूल्य रु. २१.३७ कोटी भरण्याबाबत म्हाडाने संस्थेस कळविले. संस्थेच्या विनंतीस अनुसरुन म्हाडाने सदरहू भूखंड वार्षीक भाडेपट्टा रु. १ च्या नाममात्र दराने म्हाडाच्या कर्मचारी वर्गास व त्यांचेवर अवलंबून असणाऱ्या रुग्णांना मोफत औषधोपचार पुरविण्याच्या अटीवर कोणतेही अधिमूल्य न आकारता संस्थेला देण्याचे मान्य केले व तसा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीकरिता पाठविला असता शासनाने त्यास मंजूरी दिली नाही.

म्हाडाने सादर केलेल्या सुधारीत प्रस्तावास शासनाने मंजूरी प्रदान न केल्यानंतर संस्थेने सन २००८ मध्ये म्हाडास पत्र पाठवून शासनाने सन २००० मध्ये सदरहू भूखंड देण्याचा निर्णय घेतल्याने तेव्हाच्या बाजारभावानुसार किंमत ठरवून अधिमूल्य ठरविण्याबाबत म्हाडास विनंती केली असता म्हाडाने जानेवारी, २००९ मध्ये त्यास स्विकृती प्रदान करुन सुधारित अधिमूल्य रु. ११.७१ कोटी भरण्याबाबत संस्थेकडे मागणी सादर केली. त्यानुसार फेब्रुवारी २००९ मध्ये संस्थेने रु. २.९३ कोटी इतकी रक्कम म्हाडास अदा केली.

म्हाडाने उर्वरीत रक्कम १५ दिवसात भरण्यासंदर्भात संस्थेला कळविले असता तब्बल दोन वर्षानंतर संस्थेने दिनांक १९.१.२०१३ रोजीच्या पत्रान्वये संस्थेने भरलेले २ कोटी ९३ लाख परत करावे व भूखंड परत घ्यावा असे म्हाडास कळविले. शासनाने भूखंड परत घेतला असून लिलाव पध्दतीने वितरीत करण्यात येत असल्याचे समितीपुढील साक्षीदरम्यान विभागीय सचिवांनी समितीस विदित केले.

फक्त भारतातच नाही तर जगातील सर्वच देशांमध्ये राज्याच्या (state) वतीने शासनाचे विभाग किंवा शासनाचे अभिकरण शासकिय जमिन (public land) धारण करीत असतात. शासकीय जमिनीचे वितरण व वापर या संदर्भात शासनाने किंवा शासनाच्या अभिकरणाने त्या जमिनीचा अभिरक्षक किंवा विश्वस्त या भुमिकेतून निर्णय घेणे आवश्यक आहे. शासकीय जमिनीसंदर्भातील व्यवहार पारदर्शी व्हावे याकरीता निश्चित अटी व शर्तीचे पालन होणे, भाडेपट्टयाची रक्कम योग्य बाजारभावानुसार निश्चित करणे, जमिनीचे वितरण होत असताना त्यातून लोकहीत व निश्चित लोकोपयोगी उद्दीष्ट साध्य होऊ शकेल की नाही याबाबत विचार होणे गरजेचे असल्याचे समितीचे अभिप्राय आहेत. सर्वोच्च न्यायालयाने शासकीय जमिनीचे प्रदान यासंदर्भात निर्णय देताना शासनाकडे जमिनीचे वितरण करण्यासंदर्भातील स्वेच्छाधिन अधिकार हे प्रभावशाली व राजकीय हित संबंधीत व्यक्तीच्या फायदयासाठी वापरावयाचे नसून ते अधिकार गोरगरीब जनतेच्या भल्यासाठी प्रदान केले आहे असे नमूद केले आहे.

नर्गीस दत्त मेमोरीयल ट्रस्ट यांना सन २००० मध्ये भूखंड वितरीत करत असताना तेव्हाच्या बाजारभावानुसार अधिमूल्याची निश्चिती, अधिमूल्य निश्चित कालमर्यादेत भरण्यास संस्थेची स्विकृती या बाबी निश्चित करणे गरजेचे होते. जमिनीचे अधिमूल्य निश्चित न करता, भाडेपट्टयाचे मूल्य निर्धारण न करता २७.७.२००६ मध्ये म्हाडाने सदरहू भूखंड ट्रस्टच्या ताब्यात दिला. म्हाडाने सदरहू भूखंडांचे अधिमूल्य रु. २१,३७,५६,०३० इतके निश्चित केले होते ते अधिमूल्य संस्थेच्या विनंतीनुसार, म्हाडाच्या कर्मचाऱ्यांना काही रुग्णालयीन सोयीसुविधांच्या बदल्यात अधिमूल्य माफ करण्याचा निर्णय म्हाडाने घेतला. त्यास शासनाने मंजूरी दिली नाही. संस्थेने सन २००० च्या बाजारभावानुसार अधिमूल्य निश्चित करण्यासंदर्भात केलेली विनंती म्हाडाने नियमबाह्यरितीने मान्य केली व नव्याने जमिनीचे अधिमूल्य ११.७० कोटी इतके निश्चित केले. या सर्व बाबींचे अवलोकन करता म्हाडाने, ज्या लोकोपयोगी उद्देशाकरीता भूखंडाचे आरक्षण होते ती उद्देशपूर्ती, जमिनीच्या अधिमूल्यापासून शासनास मिळणारा कोट्यवधी रु.चा महसूल, रुग्णालय सेवेतून सर्वसामान्य जनतेचे हित साधणे ही म्हाडाची जबाबदारी असताना त्याकडे डोळेझाक करुन केवळ वेळोवेळी मनमानी पध्दतीने व संस्थेच्या हिताचे निर्णय घेतले. या संदर्भात म्हाडाचे तत्कालीन उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच मुंबई मंडळाचे अधिकारी यांची जबाबदारी निश्चित करण्यात येऊन त्यांचेवर उचित कारवाई करावी अशी समितीची शिफारस आहे.

संस्थेने भूखंडासंदर्भात अधिमूल्याचे वेळेत प्रदान केले नाही. तसेच शेवटी अधिमूल्य प्रदान करण्यास असमर्थता दर्शवून भूखंड शासनास परत देण्याचा निर्णय घेण्यामध्ये जाणीवपूर्वक विलंब केला. तब्बल १३ वर्षे भूखंड विनावापर पडून राहिला. परिणामत: त्यावर कोणतेही रुग्णालय उभे राहू न शकल्याने सर्वसामान्य जनता मिळणाऱ्या रुग्णालयीन सेवेपासून वंचित राहिल्याने संस्थेने भरलेले पैसे परत करु नये असे समितीने अभिप्राय व्यक्त केले. नर्गिस दत्त मेमोरीयल ट्रस्ट यांनी जमा केलेले अधिमूल्य रु. २.९३ कोटी त्यांना परत न करता व ती रक्कम शासनजमा करुन रुग्णालयीन सेवा पुरविण्यामध्ये खर्च करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

लोकोपयोगी सेवांकरिता आरक्षीत भूखंडाचे प्रदान खाजगी व्यक्तीस किंवा संस्थेस करताना भाडेपट्टयाचा दर व जमिनीच्या चालू बाजारभावानुसार अधिमूल्याची निश्चिती करण्यात येऊन ते विहीत कालमर्यादेत वसूल करण्याबाबत, त्यासंदर्भातील व्यवहारामध्ये पारदर्शिता येण्याबाबत, ज्या उद्दिष्टाकरिता जमिनीचे वितरण केले असेल ते उद्दिष्ट्य संबंधित व्यक्ती किंवा संस्थेकडून विहित कालमर्यादेत साध्य होत नसल्यास विलंब न लावता जमिन शासनजमा करण्याबाबत इ. बाबी नियमाधीन करण्याकरीता महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) नियमामध्ये सुधारणा करण्यात याव्या तसेच अशा प्रकरणी करावयाची कार्यवाही देखिल म्हाडाने विनाविलंब करावी जेणेकरुन प्रकरणांचा त्वरेने निकाल लागेल व त्या सेवाभावी संस्थेस भूखंडाची आवश्यकता आहे त्यांना या विनावापर पडून राहिलेल्या भूखंडाचा समाजपयोगी कामासाठी वापर करता येईल अशी समितीची शिफारस आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग

शासनास नुकसान आणि विकासकास गैरवाजवी फायदा

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००८-२००९ च्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ३.३.३ "शासनास नुकसान आणि विकासकास गैरवाजवी फायदा" व परिच्छेद क्र. ३.३.४ "खाजगी विकासकास गैरवाजवी फायदा" यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय दिलेले आहेत.

अ) "शासनास नुकसान आणि विकासकास गैरवाजवी फायदा"

प्रादेशिक परिवहन अधिकारी, अंधेरी यांच्या मालकीच्या जमिनीच्या व्यापारी उपयोगितेचे काम देताना कोणत्याही निविदा न मागविल्यामुळे तसेच विकासकाचे उत्पन्न आणि फायदा निश्चित करताना मालमत्तेचे चुकीचे मूल्यांकन लक्षात घेतल्यामुळे विकासकास रु. ७३.४५ कोटीचा गैरवाजवी फायदा झाला.

सार्वजनिक बांधकाम विभागातील शासनाने दिलेल्या सूचनांनुसार (मार्च, २००२) खाजगी विकासकाकडून शासकीय जमिनीचे होणारे व्यापारी समुपयोजन (exploitation) निविदा मागवून करावयाचे असते. विकासकांस होणारा फायदा प्रकल्पातील एकूण गुंतवणुकीच्या २० टक्क्यापेक्षा जास्त असता कामा नये. व्यापारी समुपयोजनेकरिता ज्या मालमत्तेचा विकास करावयाचा असतो त्याची विक्री किंमत म्हणून पुढे दिलेल्या तीन दरांपैकी जास्त दराचा विचार करावयाचा असतो. १) सिध्द गणक दर २) चालू बाजारभाव दर जो सर्वेक्षणाने निर्धारीत करावयाचा असतो आणि ३) बांधकामाचा खर्च. तसेच प्रचलित कार्यपध्दतीनुसार विक्रीयोग बांधकाम क्षेत्र २५ टक्कयाने वाढवावयाचे असते. हा प्रस्ताव मंत्रीमंडळ मुलभूत सोयी सुविधा समितीने मान्य करावयाचा असतो.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, अंधेरी, मुंबई यांनी या प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्याच्या मालकीचा सदर भूखंड खाजगी विकासकाकडून सार्वजनिक खाजगी भागीदारी या तत्वावर विकसित करण्याचा प्रस्ताव स्विकारला. प्रस्तावानुसार विकासकाने शासनाकरीता रु.१०० कोटी किंमतीच्या मालमत्तेचे बांधकाम करावयाचे होते. त्या बदल्यात विकासकाने ४३,७६९.५१ चौ.मी. बांधकाम क्षेत्राचा व्यापारी कारणासाठी उपयोग करावयाचा होता. ही बाब मंत्रीमंडळ मूलभूत

सोयी सुविधा समितीकडून मान्य करण्यात आली होती (ऑगस्ट, २००६) आणि शासनाकडून करार करण्यात आला होता (नोव्हेंबर, २००६).

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अभिलेख्यांची तपासणी केली असता (मार्च, २००९) महालेखाकार यांना असे आढळून आले की, सदर प्रस्ताव लगतच्या झोपडपट्टीच्या अस्तित्वामुळे ह्या बांधकामास आकर्षक बाजारभाव मिळणार नाही या सबबीवर, ह्या विकासकाकडे कोणतीही निविदा न मागविता, कार्यवाहीसाठी देण्यात आला होता. तथापि, असे ही लक्षात आले की, ह्या निर्णयाप्रत येण्याकरिता विभागाने बाजाराचे आवश्यक ते सर्वेक्षण केले नव्हते. त्याचप्रमाणे विकासकाच्या फायद्याची मर्यादा रु. २.३९ कोटी इतकी, त्याने करावयाचा खर्च (रु.२०५.५१ कोटी) आणि त्याने व्यापारी समुपयोजनेकरिता विकसित केलेल्या मालमत्तेतून त्याला मिळणारी मिळकत ह्या बाबी लक्षात घेऊन ठरविण्यात आली होती. परंतु विकसित होणाऱ्या मालमत्तेचे विक्रीमूल्य ठरविताना विभागाने रु. ४७.५०० प्रति चौ.मी. ह्या २००५ च्या सिध्द गणक दराचा विचार केला. ज्यावेळेस म्हणजे २००६ ह्या वर्षी करार होतेवेळी चालू असलेला सिध्द गणक दर रु. ५८,५०० प्र. चौ.मी. असा होता. शिवाय, विक्रीयोग्य बांधकाम क्षेत्र २५ टक्के ने वाढविण्यात आले नव्हते. ह्याचा परिणाम म्हणून विकासकाच्या उत्पन्नात घट दिसून आली.

वर नमूद केलेल्या वस्तुस्थितीचा विचार करता एकूण नफा रु. ११४.४५ कोटी म्हणजे गुंतवणूकीच्या ५५.४७ टक्के इतका होतो की जो २० टक्के (रु. ४१.१० कोटी) ह्या कमाल मर्यादेत नाही. ह्यानुसार विकासकास रु. ७३.४५ कोटी इतका गैरवाजवी फायदा झाला (परिशिष्ट ३.४).

हे प्रकरण मे, २००९ मध्ये शासनाच्या सचिवाकडे पाठविण्यात आले होते. उत्तर अद्याप आले नव्हते (ऑक्टोबर, २००९).

ज्ञापन:

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला

महालेखापाल यांनी त्यांच्याअहवालात प्रस्तावित केलेल्या परिच्छेदामध्ये खालीलप्रमाणे तीन मुद्दे मांडले आहेत :-

१) निविदा न मागविता जमिनीचे वाटप करणे.

२) जुन्या रेडी रेकनरचे दर विचारात घेऊन प्रस्ताव तयार करणे.

३) २५ टक्के वाढीव चटईक्षेत्र विचारात न घेणे

वरील सर्व मुद्यांबाबत तपशिलवार खुलासा पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे.

निविदा न मागविता जमिनीचे वाटप करणे :-

सदर प्रकल्प हा अस्तित्वातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेशी संलगन आहे. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये झोपडपट्टयांच्या जागांचा पुर्नविकास करण्याचे देकार पत्र (letter of intent) देते वेळी सदर जागा ही शासनाच्या मालकीची असून ती प्रादेशिक परिवहन विभागाकडून वापरात येत आहे व मूळ विकास आराखडयानुसार सदर भूखंडावर प्रादेशिक परिवहन विभागासाठी आरक्षित आहे. यास्तव सदर देकारपत्रात प्रादेशिक परिवहन विभागाकरिता सदर जागेवर ३१७९.४९ चौ.मी. चटई क्षेत्रफळाचे बांधकाम खाजगी विकासकाने त्याचे स्वतःचे खर्चाने (विनामूल्य) बांधून देण्याबाबत कळविण्यात आले होते. पुनर्विकासाच्या देकार पत्रातील अटींच्या पुर्ततेच्या अनुषंगाने खाजगी विकासकाकडून तसा प्रस्ताव प्रादेशिक परिवहन कार्यालयास सादर करण्यात आला होता. परंतु प्रादेशिक परिवहन विभागाने त्यांचे अधिकारी आणि कर्मचारी यांचेसाठी निवासस्थाने, प्रशासकीय कार्यालयीन इमारत, गाडयांचा चाचणी मार्ग, जप्त केलेली वाहने ठेवण्यासाठी वेगळी सुधारित जागा, पार्किंग सुविधा वगैरे बांधकामे बांधून देण्याबाबत मागणी करण्यात आली होती, जी विकासकास देण्यात आलेल्या देकारपत्राप्रमाणे बांधून देणे अपेक्षित असलेल्या क्षेत्रफळापेक्षा जास्त होती.

त्यानंतर या अनुषंगाने प्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांची विकासकाशी झालेल्या बैठकीमध्ये परिवहनकडून त्यांना अपेक्षित असलेल्या वरील सर्व बांधकाम विषयक गरजांची सविस्तर माहिती विकासकास देण्यात आली. पंरतु झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत उपलब्ध करुन द्यावयाच्या बांधकाम क्षेत्रफळापेक्षा सदर मागणी करण्यात आलेले बांधकाम क्षेत्रफळ जास्त असल्याने विकासकाकडून याबाबत प्रादेशिक परिवहन विभागाकडील सर्व मागण्यांची पूर्तता होऊ शकेल, असा नव्याने काही अटी/शर्तीसह प्रस्ताव तयार करण्यात आला. तथापि, त्यानंतर परिवहन विभागाकडून सदर प्रस्ताव शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाची परवानगी घेण्याच्या दृष्टीने हा प्रस्ताव मा. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र शासन मुंबई यांना सादर करण्यात आला. या प्रस्तावाची छाननी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आली व विकासकाशी याबाबत चर्चा करण्यात आल्यानंतर सुसाध्यता अहवाल तयार करण्यात येऊन तो शासनास मंजूरीसाठी सादर करण्यात आला.

प्रकल्पाच्या सुसाध्यता अहवालामध्ये निविदा न मागविता मे.चमणकर या विकासकास सदर काम देण्याविषयीचा उहापोह करण्यात आला असून त्याबाबतची शासनाचे दृष्टीने साधक-बाधक कारणे काळजीपूर्वक नमूद करण्यात आली होती. त्याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे :-

अ) सिटी सर्व्हे नं.८२५/१ आणि ८२५/२ या प्रस्तुत स्लम भूखंडावर झोपड्यांचे अतिक्रमण झालेले आहे. तसेच या भूखडामधून एक नाला जात आहे. बृहन्मुंबई महापालिकेच्या बृहत सुधारणा आराखड्याप्रमाणे प्रस्तावित सेट बॅक मापे तसेच प्रस्तावित डी.पी.रोड यांचे सिमांकन इ.परिशिष्ट-१ मध्ये दर्शिवल्याप्रमाणे आहे.

ब) सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन यांनी वर नमूद सी.टी. सर्व्हे क्र.८२५/१ आणि ८२५/२ हे दोन्ही भूखंड एकत्रित करुन सदर एकत्रित भूखंडावर अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टी धारकांकरिता व प्रादेशिक परिवहन विभागाकरिता, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत प्रस्ताव मंजूर करुन त्याबाबतचा देकार विकासकास देण्यात आला.

परिशिष्ट-२ मध्ये एसआरए स्कीमचे भू सीमांकन तसेच आरटीओ कार्यालयाचे प्रस्तावित इमारतीचा आराखडा दर्शविला आहे. सदर नकाशामध्ये प्रस्तावित आर.टी.ओ. प्रशासकीय कार्यालयाचे भूखंड व्यापणारे ५८२१.०० चौ.मी. इतके क्षेत्रफळ दर्शविण्यात आले आहे. तसेच या प्रस्तावातील अंतर्गत रस्त्यांमुळे २२३८ चौ.मी. इतके क्षेत्र बाधीत होत आहे.

अशा तऱ्हेने एसआरए योजनेंतर्गतच्या देकारानुसार झोपड्यांमुळे बाधीत न होणारे प्लॉटचे क्षेत्रफळ हे ३३७६०.१० चौ.मी. आहे. एस.आर.ए. योजनेअंतर्गतच्या प्रस्तावित रस्त्यांमुळे हे क्षेत्र दोन भागामध्ये विभागले गेले आहे. सदर रस्त्याचे बांधकाम करणे हे एस.आर.ए. योजनेअंतर्गत विकासकास बंधनकारक आहे.

नमूद सर्व्हे नं. ८२५/१ व ८२५/२ च्या एकूण क्षेत्रफळापैकी झोपड्यांव्यतिरिक्त असलेल्या ३३७६०.१० चौ.मी. क्षेत्रफळापैकी आर.टी.ओ. प्रशासकीय इमारतीसाठी राखीव क्षेत्र अधिक प्रस्तावित रस्त्यासाठी लागणारे क्षेत्र (५८२१+२२३८) असे एकूण ८०५९.०० चौ.मी. आहे. यामुळे प्रादेशिक परिवहन विभागासाठी राहणारे निव्वळ क्षेत्रफळ २५७०१.१० चौ.मी. (३३७६०.१०-८०५९.००) असे आहे.

या उर्वरित जागेमध्ये परिवहन विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांकरिता, निवासी इमारती, चाचणी ट्रॅक, देखरेख ट्रॅक, तसेच जप्त करण्यात आलेली वाहने ठेवण्यासाठी संरक्षित जागा, पार्किंग व्यवस्था इ.बांधकामे प्रस्तावित आहेत.

क) या भूखंडाच्या झोपड्या नसलेल्या प्लॉटच्या लगतच्या उर्वरित जागांची सुधारणा करण्याचे काम एक तर प्रगतीत आहे किंवा पूर्ण झालेले आहे.

झोपडपट्टी नसलेल्या भूखंडाच्या लगतच्या भूखंडाची माहिती :

१) उत्तरेस - लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट ही पूर्ण विकसित आहे.

२) पूर्वेस - याच भूखंडावरील एसआरए स्कीम अंतर्गत बांधकामे आहेत.

३) दक्षिणेस - बृहन्मुंबई महापालिकेचे सांडपाणी प्रक्रीया केंद्र आहेत.

४) पश्चिमेस - लहानमोठ्या हौसिंग कॉलनी विकसित आहेत.

या भूखंडाच्या झोपडपट्टीरहीत क्षेत्राचा विकास करण्याचा प्रस्ताव करतेवेळी वर उल्लेखलेल्या बाबींचा सार्वजनिक बांधकाम विभागाने विचार करुनच सुसाध्यता अहवाल तयार केला व त्यामध्ये या बाबी प्रकर्षाने नमूद केल्या आहेत. या बाबतचा सविस्तर खुलासा पुढील प्रमाणे :

जर सार्वजनिक बांधकाम विभागाने झोपडपट्टीरहीत भूखंडाच्या विकासाचा स्वतंत्र प्रस्ताव तयार केला असता तर एस.आर.ए. योजनेअंतर्गत मार्गदर्शक तत्वांनुसार (१) आरटीओ कार्यालयाचे बांधकाम करणे (२) अंतर्गत रस्त्यांचे बांधकाम करणे यासाठी लागणारे क्षेत्रफळ वगळता उपलब्ध होणारे निव्वळ क्षेत्रफळ हे वरील परिच्छेदात नमूद केल्यानुसार २५७०१.१० चौ.मी. आहे व या क्षेत्रफळावर आधारित खाजगीकरणाचा नवीन प्रस्ताव तयार करावा लागला असता.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून यापूर्वी तयार करण्यात आलेल्या खाजगीकरणांचे पस्तावाप्रमाणे साधारणतः एकूण भूखंडाच्या ४० टक्के इतके क्षेत्रफळ खाजगी विकासकास त्याची स्वतःची विकास कामे करणेसाठी उपलब्ध झाल्यास सदर प्रकल्प सुसाध्य होत असतो, असा अनुभव आहे.

नमूद नवीन प्रकल्पामध्ये भूखंडाच्या एकूण क्षेत्रफळाच्या ४० टक्के क्षेत्रफळ विकासकास देण्यात आल्यावर शासनाकडे उपलब्ध होणार क्षेत्रफळ हे १५४२०.६६ चौ.मी. (२५७०१.१० चौ.मी. च्या ६० टक्के) शिल्लक राहते. व सदरहू उर्वरित क्षेत्रफळ आरटीओ विभागाच्या

मागण्यांनुसार अधिकाऱ्यांच्या तसेच कर्मचाऱ्यांच्या निवासी इमारती, चाचणी ट्रॅक, देखरेखीसाठीचे ट्रॅक, जप्त वाहनांसाठी सुरक्षित जागा, पार्किंग व्यवस्था इ. बांधणेसाठी पुरेसे नाही.

त्यामुळे सी.टी. सर्व्हे नं. ८२५/२ या आरटीओच्या भूखंडाचा स्वतंत्र खाजगीकरण प्रस्ताव हा शासनाचे दृष्टीने अव्यवहार्य होता. यास्तव ८२५/१ व ८२५/२ या दोन्ही भूखंडाचा अस्तित्वातील एस.आर.ए. योजनेमध्ये मंजूर झालेल्या प्रस्तावाशी सांगड घालून एकत्रित विकास करणे योग्य ठरले.

तसेच या भूखंडामधून जाणारा प्रस्तावित रस्ता हा जरी लिंक रोडशी जोडला जात असला तरी सार्वजनिक बांधकाम विभागाने वर नमूद केल्यानुसार नवीन प्रस्ताव तयार केला असता तर भूखंड विभाजनामुळे प्रकल्पाची किंमत कमी होऊन प्रकल्प अव्यवहार्य (Non feasible) ठरला असता.

वरील सर्व बाबींचा संक्षिप्त उहापोह प्रकल्पाच्या सुसाध्यता अहवालात करण्यात आला आहे. या सुसाध्यता अहवालातील नमूद वस्तुस्थिती/विशिष्ट परिस्थितीमुळे पायाभूत समितीने सदर भूखंड विकासकास निविदा न मागविता देण्याचे निश्चित केले, जेणेकरुन शासनाचा जास्तीत जास्त फायदा होऊ शकेल.

जूने रेडी रेकनरचे दर विचारात घेतल्याबाबत :

मूळ प्रस्ताव हा सन २००५ च्या रेडी रेकर प्रमाणे तयार करण्यात आला आहे. सदर रेडी रेकनरमध्ये सीटी सर्व्हे क्र. ८२५/१ व ८२५/२ हे वेगवेगळया झोन आणि सब झोन मध्ये अनुक्रमे ४७/२३० आणि ४७/२३३ दर्शविण्यात आले आहे. (सोबत नमूद रेडी रेकनरची नकाशासह प्रत - परिशिष्ट क्र.३ नुसार जोडण्यात आली अहे)

या दोन्ही झोन तसेच सब झोनसाठी इमारतीनिहाय वेगवेगळे दर रेडी रेकनरमध्ये दर्शविण्यात आले आहेत. प्रकल्पाचा सुसाध्यता अहवाल तयार करतेवेळी उपलब्ध होणारा चटई क्षेत्र निर्देशांक (FSI) हा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने त्यांच्या झोपडपट्टी पूनर्वसन योजनेमधील मंजूर अनिवासी इमारतीच्या पाचव्या मजल्यापलिकडे वापरण्यात येणार असल्याने रेडी रेकनर प्रमाणे कार्यालयीन इमारतीचे दर ग्राह्य धरुन वापरण्यात आले आहेत.

रेडी रेकनरमध्ये नमूद केल्याप्रमाणे दोन्ही भूखंडाचे सर्व्हे नं. वेगवेगळ्या झोन्स तसेच सब झोनमध्ये दर्शविण्यात आले असल्याने नकाशे व सविस्तर वर्णनाच्या अभ्यासाअंती

झोन/सबझोन ४७/२३३ मध्ये सदर भूखंड येत असल्याने त्या ठिकाणचा दर रु. ४७,५००/- प्रती चौ.मी. इतका दर विचारात घेण्यात आला.

तसेच सदरहू प्रकल्पाच्या प्रस्तावाची सुरुवात सन २००५ मध्ये करण्यात आल्यामुळे, २००५ सालच्या रेडी रेकनरचे दर विचारांत घेण्यात येऊन सुसाध्यता अहवाल तयार करण्यात आला आहे. परंतु सदर प्रकल्प सन २००६ मध्ये मंजूर करण्यात आला.

सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रकल्पाचा सुसाध्यता अहवाल तयार करतांना जरी रेडी रेकनर २००५ चे दर वापरले असले तरी या प्रकल्पाच्या सुरुवातीपासूनचा प्रवास पहाता असे दिसून येते की, खाजगी विकासकाकडून प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत सार्वजनिक बांधकाम विभागास सादर करण्यात आलेल्या प्रस्तावामध्ये त्याने रु. ३३.६९ कोटी इतक्या किंमतीचे बांधकाम करुन देण्याची तयारी दर्शविली होती. अर्थात सदरहू देकार झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाच्या कार्यान्वयतेमधील जोखीम आणि भविष्यातील बाजाराचा कल गृहीत धरुन स्वत:च्या जबाबदारीने दिला होता. या प्रस्तावावर शासनाच्या विविध पातळ्यांवर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून खाजगी विकासकाशी वाटाघाटी करुन शासनास जास्तीत जास्त फायदा कसा होईल याची दक्षता घेण्यात आली आहे. सदरहू बाब सार्वजनिक बांधकाम विभागाने विकासकास दिलेल्या दिनांक ४.१०.२००५, १७.४.२००६ व ८.६.२००६ च्या पत्रांवरुन दिसून येते.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सन २००५ च्या रेडी रेकनर नुसार तयार करण्यात आलेला सुसाध्यता अहवाल अनिवासी इमारतीसाठीचा बांधकाम दर हा रु. ४७,५००/- प्रती चौ.मी. इतका ग्राह्य धरण्यात येऊन शासनास रु. ८६.५४ कोटी इतक्या रकमेचे बांधकाम क्षेत्रफळ विकासकाकडून बांधून देण्याचे प्रस्तावित करण्यात आले.

सदर सुसाध्यता अहवालाची छाननी पायाभूत समितीने केल्यानंतर, समितीने विकासकाकडून रु. १००.०० कोटी इतक्या रकमेचे बांधकाम शासनास बांधून देण्याबाबत अभिप्राय दिले व त्यास विकासकाने सहमती दर्शविली. म्हणजेच शासनाच्या उच्च पातळीवरील समितीने देखील विकासकाशी वाटाघाटी करुन प्रस्तावास मान्यता दिली आहे. त्यानंतर प्रत्यक्ष करारनामा करतेवेळी देखील रेडी रेकनर २००६ च्या दरांचा विचार करण्यात आला होता. परंतु या रेडी रेकनरमध्ये दर्शविण्यात आलेला भूखंड सर्व्हे क्र.८२५ हा झोन/सबझोन ४७/२३० अंतर्गत दर्शविला असून तो चुकीचा दर्शविला आहे. प्रत्यक्षात तो भूखंड आरटीओच्या

मालकीचा आहे व तसे नकाशावर दर्शविण्यात आले आहे. अशा तऱ्हेने रेडी रेकनर २००६ नुसार दर विचारात घेताना वर स्पष्ट केल्यानुसार सन २००५ च्या रेडी रेकनरच्या दरासाठीची पध्दत विचारात घेतली असता करार करतांना अनिवासी इमारतीचा बांधकामाचा दर हा रु. ४७,५००/- प्रती चौ.मी. इतकाच येत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे रेडी रेकनर २००५ प्रमाणे करण्यात आलेल्या सांख्यिकी आकडेमोडीमध्ये बदल करण्याचा प्रश्न उद्‌भवला नाही. अशा तऱ्हेने वरील विवेचन पाहता रु. ४७,५००/- इतका दर घेण्यामागची भूमिका सुस्पष्ट होते. तसेच तद्‌नंतर या कार्यालयाकडून रेडी रेकनर तयार करणाऱ्या डेप्युटी डायरेक्टर, नगर रचना मुंबई (मूल्यांकन) मुंबई यांचे कार्यालयाशी देखील संपर्क साधून प्रस्तुत भूखंडाच्या झोन/सबझोनबाबत विचारणा करण्यात येऊन खात्री करण्यात आली. त्याबाबतचे पत्र परिशिष्ट-४ म्हणून जोडण्यात आले आहे. या अनुषंगाने डेप्युटी डायरेक्टर, नगर रचना यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आलेला प्रस्ताव योग्य असून प्रस्तुत प्रादेशिक परिवहन विभागाचा भूखंड झोन/सबझोन ४७/२३३ मध्ये असल्याबाबत कळविले व तसे पत्र परिशिष्ट-५ प्रमाणे जोडण्यात आले आहे.

वरील स्पष्टीकरणाच्या अनुषंगाने वापरण्यात आलेल्या दराबाबत (रु. ४७,५००/- प्रती चौ.मी.) सक्षम अधिकाऱ्यांकडून देखील खात्री करुन घेण्यात आली आहे.

अतिरिक्त २५ टक्के चटईक्षेत्रफळ विचारात न घेतल्याबाबत :

सदर बाब मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई सार्वजनिक बांधकाम विभाग यांना पाठविलेल्या दिनांक १०.५.२००५ च्या पत्राचे अनुषंगाने लेखापरिक्षणामध्ये उपस्थित झाली आहे. (परिशिष्ट-६) सदर पत्रातील याबाबींशी लागू पुरता परिच्छेद खालीलप्रमाणे उद्धधृत करण्यात येत आहे.

मुंबई महानगर पालिकेच्या विकास नियमावलीनुसार सुपर बिल्टअप एरिया विचारात घेतला जात नाही. मात्र खाजगी क्षेत्रात प्रचलित पध्दतीनुसार मुंबईमध्ये सुमारे ३५ टक्के अतिरिक्त चटई क्षेत्रफळ, चटईक्षेत्रफळापेक्षा विक्रीकरीता गृहीत धरण्यात येते. मात्र मुद्रांक शुल्क आकारतांना चटई क्षेत्रफळापेक्षा २५ टक्के अतिरिक्त चटई क्षेत्रफळ विचारात घेण्यात येते.

उपरोक्त परिच्छेदातील आशय लक्षात घेता, मुख्य वास्तुशास्त्रज्ञांचे उपरोक्त सूचनेनुसार या कायालयाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत :-

अ) बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या विकास नियमावली प्रमाणे "सुपर बिल्टअप एरिया" ही परिभाष अस्तित्वात नाही. म्हणजेच सुपर बिल्टअप एरिया ही परिभाषा नियम बाह्य असून त्यामुळे तो विचारात घेतला जात नाही. परंतु खाजगी व्यवहारामध्ये या संकल्पनेचा वापर होत असल्याने शासन हितार्थ मुख्य वास्तुशास्त्रज्ञांनी लिहिलेल्या विषयांकित पत्रातील कामासाठी त्यांनी सदरहू संकल्पना वापराची सूचना केली. तसेच उच्च न्यायालयाचे नवीन निकालाप्रमाणे कारपेट एरिया प्रमाणे विक्री करण्यात यावी, असे स्पष्ट निर्देश आहेत.

ब) मा.वास्तुशास्त्रज्ञ यांनी वाढीव विकण्यास योग्य क्षेत्रफळ हे चटई क्षेत्रावर (Carpet Area) आधारीत असून बिल्टअप एरिया प्रमाणे नसल्याचे नमूद केले आहे.

क) एखाद्या विक्रीयोग्य सदनिका/युनिट चे संदर्भात स्टँप ड्युटी आकारतांना २५ टक्के अतिरिक्त चटई क्षेत्र हे कारपेट एरिया (चटई क्षेत्रफळ) वर ग्राह्य धरण्यात आले आहे.

विषयांकित लेखा निरिक्षणामधील मुद्यांबाबत खालील प्रमाणे संक्षिप्त खुलासा करण्यात येत आहे.

१) स्टॅम्प ड्युटीची आकारणी बिल्टअप क्षेत्रावर केली जाते. रेडी रेकनरच्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे कारपेट एरिया वरुन बिल्टअप क्षेत्रफळ काढणेसाठी परिवर्तन गुणक हा १.२० इतका आहे. रेडी रेकनरच्या वापरासाठी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील अ.क्र.२ ची बाब पहावी. प्रत सोबत जोडली आहे. (परिशिष्ट-७)

२) रेडी रेकनर मधील दर हे प्रती बिल्टअप एरियासाठी आहेत. (रेडी रेकनरच्या वापरासाठी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील अ.क्र.७ ची बाब पहावी. प्रत सोबत जोडली आहे)

३) प्रकल्पाची गणितीय आकडेमोड करतेवेळी बिल्टअप एरिया गृहीत धरण्यात आला आहे.

४) मा.मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांनी सुचविल्याप्रमाणे बांधकामाचे मूल्य ठरवितांना मूळ चटई क्षेत्रफळाचे २५ टक्के वाढीव चटई क्षेत्रफळासाठी स्टॅप ड्युटी लक्षात घेतली जाते. तथापि रेडी रेकनरप्रमाणे २० टक्के एवढेच वाढीव चटई क्षेत्रफळ ग्राह्य धरायचे असते.

वरील सर्व मुद्यांचा सर्वांगीण विचार करता प्रकल्पाची आकडेमोड करतेवेळी विकासकास हस्तांतर करावयाचे क्षेत्रफळ हे बांधकाम क्षेत्रफळ हस्तांतरीत करायचे, असे गृहित धरण्यात येऊन त्यासाठीचा दर हा देखील रेडी रेकनरनुसार बांधकाम क्षेत्रफळाचाच गृहित धरण्यात आला आहे आणि सदरहू बांधकाम क्षेत्रफळाचा दर संबंधित जागेसाठी विचारात

घेण्यात आला आहे. याबाबतीत जुन्या दराप्रमाणे दर घेतल्याबाबत घेण्यात आलेल्या आक्षेपांचे अनुषंगाने देखील रेडी रेकनरमधील दर बांधकाम क्षेत्रफळानुसार (बिल्ट अप एरिया) असल्याबाबत मुद्दा क्र. २ मध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच मा.मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी देखील अतिरिक्त २५ टक्के वाढ चटई क्षेत्रफळामध्ये घेण्याबाबत स्पष्ट केले आहे. तथापि प्रकल्पाची आर्थिक आकडेमोड ही बांधकाम क्षेत्रफळानुसार करण्यात आली असल्याने सदरहू वाढ या प्रकल्पामध्ये गृहीत धरण्यात आलेली नाही. अशा तऱ्हेने लेखा परिक्षणामध्ये नमूद केल्याप्रमाणे बांधकाम क्षेत्रफळ वाढविणे कायद्यास धरुन संयुक्तिक होणार नाही. शिवाय अशी कुठलिही प्रचलित पध्दत सुध्दा अवलंबिण्यात नाही.

उपरोक्त सर्व विवेचन विचारात घेता, प्रकल्पाची स्टेटस, रिपोर्टमध्ये दर्शविण्यात आलेली आर्थिक आकडेमोड ही व्यवहार्य आणि नियमास धरुन असून अतिशय योग्य आहे, असेच म्हणावे लागेल.

वरील स्पष्टीकरण विचारात घेता व ते विषयांकित प्रकल्पासाठी वापरता, लेखा परिक्षणामध्ये नमूद केलेला रु. ७३.४५ कोटी रकमेचा अवाजवी फायदा विकासकास होत नाही, असे स्पष्ट होते. यास्तव सदर संपूर्ण मुद्दा कृपया वगळण्यात यावा, ही विनंती.

महालेखापाल कार्यालयाने त्यांचे पत्र दिनांक ८.६.२०११ (परिशिष्ट-८) अन्वये उपस्थित केलेला मुद्दा.

शासकीय भूखंडाच्या व्यावसायिक वापरासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने मार्च-२००२ मध्ये दिलेल्या निर्देशांमध्ये जाहिर निविदा मागविण्याच्या सूचना आहेत. सदर निर्देशांमध्ये निविदा न मागविण्याबाबत कोणत्याही अपवादाचा उल्लेख करण्यात आलेला नाही. सदर भूखंड (आर.टी.ओ. अंधेरी) झोपडपट्टी वेढलेला असल्याने व्यावसायिक विकासासाठी त्यास जाहिर निविदेद्वारे अपेक्षित दर प्राप्त झाले नसते असे सार्वजनिक बांधकाम विभागाचे म्हणणे हे उचित निविदा कार्यपध्दतीचा अवलंब न करण्यासाठी पुरेसे कारण होत नाही. याबात सुस्पष्ट उत्तर देण्यात यावे.

उपरोक्त मुद्यांचे स्पष्टीकरण

येथे पुनर्नमूद करण्यात येते की, सदरचा आर.टी.ओ. चा भूखंड झोपडपट्टीने बाधीत असल्याने लगतच्या झोपडपट्टी बाधीत भूखंडासह झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्प पूर्वीच मंजूर करण्यात आला होता व त्यामुळे आर.टी.ओ. भूखंडावरील चटई क्षेत्र निर्देशांकाच्या वापराचा

प्रस्ताव तयार करताना नव्याने निविदा प्रक्रिया न करता उपरोक्त प्रस्ताव तयार करणे भाग पडले. विकासकाने आर.टी.ओ. च्या भूखंडावरील चटई क्षेत्र निर्देशांकाच्या वापरासाठी एकत्रीकरण/विकासाचा प्रस्ताव सादर केला होता.

सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रस्ताव तयार करताना निविदा न मागविण्यामुळे कार्यपध्दतीमध्ये त्रुटी निर्माण होण्याची शक्यता वर्तविली होती. प्रस्तावावर मंत्रालयीन स्तरावरील अर्थ विभाग व नियोजन विभागाकडून अभिप्राय मागविले होते आणि अंततः पायाभूत सुविधा समितीमार्फत जनहिताच्या दृष्टीने प्रस्तावास मंजूरी देण्यात आली होती.

उपरोक्त बाबींचा विचार करुन सदर परिच्छेद निकाली काढण्यात यावी ही विनंती.

ब) परिच्छेद क्र. ३.३.४ "खाजगी विकासकास गैरवाजवी फायदा"

शक्यता अहवालात बाजार भावाचा विचार करणे ह्या शासनाच्या सूचनांची तसेच वाढीव अग्रीम रक्कम वसूल करण्याविषयींच्या सचिव समितीच्या शिफारशींची अवहेलना केल्यामुळे विकासकास रु. ८.७७ कोटीचा गैरवाजवी फायदा झाला.

सार्वजनिक बांधकाम विभागातील (सार्वजनिक बांधकाम विभाग) शासनाने दिलेल्या सूचनांनुसार (मार्च, २००२) खाजगी विकासकाडून शासकीय जमिनीचे होणारे व्यापारी समुपयोजन निविदा मागवून करावयाचे असते. विकासकास होणार फायदा प्रकल्पातील एकूण गुंतवणूकीच्या २० टक्कयापेक्षा जास्त असता कामा नये. व्यापारी समुपयोजनेकरिता ज्या मालमत्तेचा विकास करावयाचा असतो त्याची विक्री किंमत म्हणून पुढे दिलेल्या तीन दरांपैकी जास्त दराचा विचार करावयाचा असतो. १) सिध्द गणक दर [२३] २) चालू बाजारभाव दर जो सर्वेक्षणाने निर्धारीत करावयाचा असतो आणि ३) बांधकामाचा खर्च. तसेच प्रचलित कार्यपध्दतीनुसार विक्रीयोग्य बांधकाम क्षेत्र २५ टक्कयाने वाढवावयाचे असते. हा प्रस्ताव मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीने मान्य करावयाचा असतो.

मंत्रालयाच्या (सार्वजनिक बांधकाम विभाग) अभिलेख्यांची छाननी केली असता (फेब्रुवारी, २००९) असे लक्षात आले की, मुंबईतील फोर्ट आणि अंधेरी येथील शासकीय मालमत्तेच्या विकासाकरिता मंत्रीमंडळ मूलभूत सोयीसुविधा समितीने शक्यता अहवालास मान्यता दिलेली होती ज्यामध्ये शासनाकरिता १७,३६४.१९ चौ.मी. बांधकाम क्षेत्राचा ५,३४४.७० चौ.मी. बांधकाम क्षेत्राचे व्यापारी समुपयोजन करण्याची परवानगी विकासकास मिळणार होती. मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीस प्रकल्प मान्य करताना असे दिसून आले की, शक्यता

अहवाल तयार करताना ज्या दराचा विचार केला होता तो दर सिध्द गणक दर होतो. ह्यामुळे समितीने विभागास निविदा मागवितान वास्तव आणि टिकाऊ बोली आकर्षित करण्यासाठी बाजारभाव विचारात घेण्याचे मार्गदर्शन केले (नोव्हेंबर,२००५).

मे, २००६ मध्ये निविदा मागविण्यात आल्या. ज्या २८ सप्टेंबर, २००६ ला सादर करावयाच्या होत्या. ऑगस्ट, २००६ मध्ये सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी निविदमध्ये एक अतिरिक्त कलम समाविष्ट केले की, "जो विकासक जास्तीत जास्त अग्रीम (upfront payment) देण्याचे काम करेल त्यास विकासासाठी मालमत्ता ताब्यात देण्यात येईल" तथापि त्याकरीता कमीत कमी रक्कम ठरविण्यात आली नव्हती. प्रत्युत्तर म्हणून सप्टेंबर, २००६ मध्ये आठ बोली आल्या ज्यापैकी सहा बोली अधिक्षक अभियंता प्रमुख असलेल्या मूल्यमापन समितीकडून नाकारल्या गेल्या. दोन मात्र निविदाकारांपैकी मे.विलायती राम मित्तल यांचेकडून दिलेली अग्रीम रक्कम रु. १२.९६ कोटी अधिक होती. वित्त सचिव ज्यांच्याकडे सदर प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता, त्याच्या असे लक्षात आले की (एप्रिल, २००७) बाजार भाव लक्षात घेता विकासकास होणारा फायदा जवळजवळ ४० टक्के इतका होणार होता आणि त्यामुळे विकासकाशी अग्रीम रक्कम वाढवून देण्याविषयी बोलणी करण्याची किंवा त्यात अपयश आल्यास फेर निविदा काढल्या पाहिजेत अशी त्यांनी शिफारस केली. तथापि, मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या मार्गदर्शनानुसार (एप्रिल, २००७) सार्वजनिक बांधकाम, वित्त आणि नियोजन विभागातील सचिवाचा समावेश असलेल्या समितीकडून विकासकाशी बोलणी झाली (मे, २००७). विकासकाने हे स्विकारले कि त्यांचेकडून विकल्या जाणाऱ्या व्यापारी समुपयोजन बांधकाम क्षेत्राची किंमत बोलीमध्ये दाखविलेल्या रु. ९५ कोटी रकमेऐवजी रु.१३० कोटी इतकी असेल. त्याने पुढे असेही म्हटले की, वेगवेगळ्या घटकांवर रु. ४३.५० कोटी इतका खर्च करणे आवश्यक आहे आणि बाजारांमधील अनिश्चिता लक्षात घेता रु. १३.२३ कोटी अग्रीम देण्याविषयी मान्य केले. समितीने कंत्राटदाराकडून होणाऱ्या अतिरिक्त खर्चाचा अंदाज रु. ३२.३० कोटी इतका केला आणि रु. २२ कोटी ते रु.२४ कोटी इतक्या अग्रीम रकमेची शिफारस केली.

परंतु मंत्रीमंडळाने (CIC) बांधकामाचा होणार जादा खर्च ह्याविषयी विकासकाने मांडलेल्या मुद्यांशी सहमती दर्शविली (मे, २००७) आणि सचिव समितीने मांडलेले मुद्दे अव्हेरुन

विकासकाची मागणी मान्य केली. ह्या प्रमाणे शासन आणि विकासक ह्यांच्यामध्ये करार झाला. (जुलै, २००७)

अशा तऱ्हेने शक्यता अहवाल तयार करताना बाजार दर लक्षात घ्यावे ह्या शासनाच्या सूचना आणि सचिव समितीच्या शिफारशी अव्हेरल्यामुळे खाजगी विकासकास रु. ८.७७ कोटी (रु.२२ कोटी-रु. १३.२३ कोटी) इतका गैरवाजवी फायदा झाला.

मे, २००९ मध्ये सदर बाब शासनाच्या सचिवाकडे पाठविण्यात आली होती ज्याचे उत्तर अद्याप आले नव्हते (ऑक्टोबर, २००९).

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला

१. खाजगीकरणांतर्गत इमारती प्रकल्पांबाबत उपलब्ध शासन निर्णय/शासन परिपत्रकातील सूचनांनुसार सदर प्रकल्पाचा सुसाध्यता अहवाल मंजूरीसाठी सादर करण्यात आला होता. सदर प्रकल्प मंजूर करतांना सदर प्रकल्पाचा सुसाध्यता अहवाल सर्व संबंधित विभागांकडे त्यांचे याबाबतीतील मत/भाष्य जाणून घेण्यासाठी पाठविण्यात आला व त्यांचे अभिप्राय घेतल्यानंतर त्याचे अनुपालनासह व तद्नंतर तो शासनाच्या पायाभूत सुविधा समितीसमोर मंजुरीसाठी सादर करण्यात आला. सदर समितीने खाली अटींवर सदर प्रकल्पास मंजूरी दिली. :-

अ. सुसाध्यता अहवाल तयार करताना सार्वजनिक बांधकाम विभागाने शिघ्रसिध्दगणकातील दरांचा वापर केला आहे. तथापि, बाजार दर त्यापेक्षा जास्त आहेत म्हणून निविदा बोलाविण्यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बाजारदराची खात्री करुनच निविदा बोलावण्यांत याव्यात, जेणेकरुन प्राप्त होणारे देकार हे बाजारदर्शी तसेच वस्तुस्थितीवर आधारित असतील.

ब. या प्रकल्पातील भूखंड क्र. १५६ वरील 'शासकिय कार्यालये' हे आरक्षण बदलून 'निवासस्थाने' अशा बदलास सार्वजनिक बांधकाम विभागाने नगर रचना विभागाकडून मंजूरी प्राप्त करावी.

२. बाजारभाव व अपेक्षित देकाराबाबत शासन स्तरांवर विचार विनियम करण्यात येऊन बाजारभावाशी मिळत्याजुळत्या निविदा प्राप्त व्हाव्यात, या अनुषंगाने अधिमूल्य रक्कम

भरण्याबाबतचे नवीन कलम निविदेत अंतभूर्त करण्यात आले. वित्त विभागाने सदर नव्याने अंतर्भूत केलेल्या कलमास मान्यता दर्शवली.

३. पात्र निविदाकाराने शासनासाठी त्याने बांधावयाच्या कामाव्यतिरिक्त रु. १३.९६ कोटी एवढी अधिमूल्य रक्कम शासनास देण्याची परवानगी दर्शवली. ही बाब बाजार दराचा कल स्पष्टपणे दर्शविते.

४. या वरुन बाजारभाव वापरासंबंधीचा मुद्दा स्पष्ट होतो.

५. लेखा समितीकडून "एका खाजगी विकासकास गैरवाजवी फायदा" या परिच्छेदानुसार शासनाचे रु ८.७७ कोटीचे नुकसान व त्यांच्या परिणामामुळे तेवढ्याच किंमतीचा विकासकास झालेला फायदा असा घेण्यात आलेला आक्षेप हा निविदा स्विकृती दरम्यान प्रस्ताव पायाभूत सुविधा समितीसमोर स्विकृतीसाठी ठेवण्याआधी झालेल्या वाटाघाटीचेवेळी सचिव समितीने विकासकासोबत केलेल्या चर्चेनुसारच्या भाष्यावर आधारित आहे. परंतु प्रत्यक्ष वाटाघाटी दरम्यान विकासकाने नमूद केलेल्या भविष्यातील होणाऱ्या बाजारभावातील चढउतारची अनिश्चिता याबाबत सहमती दर्शवून पायाभूत सुविधा समितीने विकासकाने दिलेला वाढीव देकार स्वीकारला आहे व या स्वीकृतच्या आधारे तद्नंतर सदर प्रकल्पाचा कारारनामा करण्यात आला.

६. स्विकृत निविदा शासनास मंजूरीकरीता सादर केल्यानंतर निविदा वाटाघाटी समितीतील प्रधान सचिव, वित्त यांच्यातर्फे शेरा उपस्थित करण्यात आला की, सुसाध्यता अहवालातील दर (मे, २००५ मध्ये सादर केलेला सुसाध्यता अहवाल) हे बाजारातील प्रत्यक्षदर्शी दर नाहीत व त्यांनी केलेल्या चौकशीनुसार तत्कालिन बाजारतील दर रु ५५००/- प्रती चौ.फूट (माहे एप्रिल- २००७) असे आहेत. सदर शेऱ्यास अनुसरुन मुख्य अभियंता, सा.बां. यांनी विक्रीची किंमत ठरविण्याकरीता अपेक्षित विविध मुद्दे, बांधकामाचा दर, बाजारातील चढउतार, दरफुगवटा इ. विचार करता विकासकाने दिलेला देकार हा योग्य आहे, असा प्रस्ताव मुख्य अभियंता, प्रादेशिक विभाग, मुंबई यांनी शासनास मंजूरीकरिता सादर केला. या सादर केलेल्या अहवालानुसार अंधेरी येथील विषयांकीत भागातील तत्कालिन विक्री दाराबाबत सहाय्यक निबंधक कार्यालयाकडून प्राप्त माहितीनुसार सुमारे रु. ४४३४/- प्रती चौ.फूट इतका प्रत्यक्ष विक्रीचा दर आहे व तो उपरोलेखीत प्रधान सचिव, (वित्त) यांनी नमूद केलेल्या दरापेक्षा

खूपच कमी आहे. प्रधान सचिव (वित्त) यांनी नमूद केलेले दर हे चौकशीप्राप्त दर असून त्याला कोणताही प्रमाणभूत आधार नाही.

तसेच सदर उत्तरामध्ये असे नमूद करण्यात आलेले आहे की, प्रत्यक्षात अंधेरी येथील समुतुल्य निवासी बांधकामाचा प्रत्यक्ष विक्रीचा दर रु. ४४३४/- प्रती चौ.फूट हा प्रधान सचिव (वित्त) यांनी नमूद केलेल्या दरापेक्षा कमी आहे व वित्त विभागाकडील नमूद दरानूसार विक्री किंमत काढली असता, ती रु. १३२.४० कोटी इतकी येते.

समितीने एप्रिल- २००७ मध्ये विक्रीच्या किंमतीची तुलना मे, २००५ मध्ये तयार करण्यात आलेल्या सुसाध्यता अहवालातील विक्रीच्या किंमतीशी केली असल्यामुळे ती योग्य नसल्याचे दिसून आले. मध्यंतरीच्या काळात बांधकामाचा खर्च, भाववाढ, टी.डी.आर. ची किंमत मूळ बांधकामाच्या बाबींचे दर उदा. सिमेंट इत्यादी यांच्या दरात खूपच वाढ झाली. त्यामुळे बांधकामाचे सुध्दा २००७ चे दर घेणे आवश्यक होते. निविदेचा देकार देतेवेळी विकासकाने उपरोक्त बाबींचा सारासार विचार करून भविष्यातील बाजारातील विक्रीचा दर, बाजारातील चढउतार व त्यांची अनिश्चितता या मुख्य बाबींचा विचार करुन देकार सादर केलेला असावा. वर उहापोह केलेल्या सर्व बाबींचा विचार करुन खुल्या स्पर्धेद्वारे पात्र विकासकाची निविदा मुख्य अभियंता, मुंबई सा.बां. प्रादेशिक विभाग, मुंबई यांचेकडून शासनाच्या स्विकृतीसाठी सादर केली होती.

अशा तऱ्हेने लेखापरिक्षकांकडून "शासनाचे रु. ८.७७ कोटींचे झालेले नुकसान" असा काढलेला निष्कर्ष हा प्रस्ताव पायाभूत सुविधा समितीसमोर स्विकृतीसाठी ठेवण्याआधी सचिव समितीने विकासकाशी केलेल्या वाटाघाटीचे वेळी झालेल्या चर्चेनुसारच्या भाष्यावर आधारित आहे. ज्यामध्ये विकासकाने त्याच्या विक्रीच्या बांधकामाची किंमत रु. १३० कोटी असल्याचे मान्य केले होते. (प्रत्यक्ष किंमत रु. १३२.४० कोटी) त्यानुसार निविदा वाटाघाटी समितीने असा तर्क मांडला की, बांधकामाची किंमत रु. ९०.७६ कोटी गृहीत धरता, विकासकास रु. ३९.२४ कोटी (१३०.०० - ९०.७६) इतका फायदा होणार आहे. प्रत्यक्षात सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर बांधकामाची किंमत काढली असता, ती रु. ११५.७८ कोटी होती. तथापि, निविदा वाटाघाटी समितीने बांधकामाची किंमत रु. ९०.७६ कोटी गृहित धरली व या गृहितकावर आधारित निविदा वाटाघाटी समितीचे म्हणणे होते की, शासनास रु. २२-२४ कोटी इतके अधिमूल्य प्राप्त होणे अपेक्षित आहे व प्रत्यक्षात विकासकाने त्याच्या सुधारीत देकारानुसार रु.

१३.२३ कोटी इतके अधिमूल्य देऊ केले आहे. म्हणजेच वरील दोन्ही आकडेवारींचा फरक (रु. २२.०० - रु. १३.२३ कोटी) विचारात घेता लेखापरिक्षकांनी रु. ८.७७ कोटी इतका शासनास तोटा झाल्याची दर्शविलेली बाब पूर्णतः चुकीच्या गृहितकावर आधारीत आहे.

वरील परिच्छेदात नमूद केलेले बहुतांश आकडेवारीस कोणताही ठोस असा पाया अथवा पुरावा नाही. उदा.

(१) विक्रीचा दर ५५००/- चौ.फूट धरला आहे. प्रत्यक्षात उपनिबंधकाकडून उपलब्ध समतुल्य विक्रीचा दर रु. ४४३४/- चौ.फूट इतका आहे.

(२) मुख्य अभियंता यांनी सादर केल्यानुसार बांधकामाचा खर्च (भाववाढ व व्याजाच्या रक्कमेसह) रु ११५.८८ कोटी इतका कळविला असून देखील निविदा वाटाघाटी समितीने बांधकामाच्या खर्चाचा अंदाज रु. ९०.७६ कोटी इतका सिमित केला आहे.

(३) प्रधान सचिव, (वित्त) यांनी चौकशी करुन मिळविलेल्या दरानुसार विक्रीची किंमत रु. १३२.४० कोटी असून देखील समितीने व्यवहारीकदृष्ट्या तो १३०.०० कोटी इतका सिमित केला आहे.

मुख्य अभियंता यांनी सादर केलेल्या बांधकामाच्या किंमतीबाबतचे स्पष्टीकरण हे प्रमाणभूत दस्तऐवजावर आधारीत असल्यामुळे त्यावरुन प्रकल्पाचा कॅश फ्लो तयार करण्यात येऊन त्यानुसार फायद्याची टक्केवारी काढण्यात आली व ती शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनूसार आढळून आल्याने विकासकाच्या सुधारीत देकारांस मंजूरीसाठी शिफारस करण्यात आली.

निविदा वाटाघाटी समितीने अहवाल दिल्यानंतर देखील मंत्रीमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीने, जी राज्य शासनाची उच्चतम कार्यकारणीदेखील असते, या समितीने याबाबत पूर्ण विचाराअंती विकासकाने बाजारातील अनिश्चितेबाबत मांडलेले मुद्दे विचारात घेऊन, त्याची निविदा स्विकृत केली आहे.

उपरोक्त सविस्तर विश्लेषण लक्षात घेता, सदर परिच्छेद कृपया वगळण्याची विनंती आहे.

साक्ष :

विभागाने पुरविलेल्या उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक २२ मे २०१३ रोजी व ५ फेब्रुवारी २०१४ रोजी विधान भवन, मुंबई येथे बैठक घेतली. तसेच यासंदर्भात १९ जून २०१३ रोजी हाय माऊंट स्टेट गेस्ट हाऊस व प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंधेरी मुंबई येथील जागेची पाहणी केली व प्रादेशिक परिवहन

कार्यालय, येथे बैठक घेतली तसेच दिनांक ३ जुलै २०१३ रोजी महाराष्ट्र सदन नवी दिल्ली, येथे भेट देऊन बैठक घेतली.

समितीच्या दिनांक २२ फेब्रुवारी २०१३ रोजीच्या बैठकीत समितीने परिच्छेद क्र. ३.३.३ व ३.३.४ यासंदर्भात शासनाचे करोडो रुपयाचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आणले व याबाबत महालेखाकारांनी महत्वाचे मुद्दे समितीला अवगत करावे असे सांगितले असता प्रधान महालेखाकार यांनी सांगितले की, इस मैटर में (१) एलॉटमेंट ऑफ वर्क बिना टेंडर के हुआ है. (२) डेवलपर का प्रोफिट ठीक प्रकार से कैल्कुलेट नहीं हुआ है. जिस जगह का डेवलपमेंट करना है उसका रेट वर्ष २००५ के रेडी रेकनर के हिसाब से लगाया गया है जबकि इसका रेट वर्ष २००६ के रेडी रेकनर के हिसाब से लगाना चाहिए था. इस प्रोजेक्ट का कम्प्यूटेशन ठीक प्रकार से नहीं हुआ है. (३) इस प्रोजेक्ट में डेवलपर को अनड्यू बेनिफिट देने का काम हुआ है.

हे काम निविदा न काढता विकासकाला देण्यात आले, हे खरे आहे काय अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, नगर भूमी क्रमांक ८२५/१ आणि ८२५/२ असे दोन शासकीय भूखंड आहेत. त्यातील ८२५/१ हा भूखंड शासनाचा आणि ८२५/२ हा भूखंड आरटीओ विभागाचा आहे. या दोन भूखंडावर झोपडपट्टी असल्यामुळे हे दोन्ही भूखंड मर्ज करुन एसआरए योजने अंतर्गत प्रक्रिया सुरु करण्यात आली. मे. चमणकर हे विकासक होते. जेव्हा एसआरएची प्रक्रिया सुरु करण्यात आली त्यावेळी भूमी क्रमांक ८०२ संबंधी आरटीओ आणि विकासक यांच्यामध्ये कोऑर्डिनेशन झाले. त्यावेळी ३१७९.४९ चौ. मी. चटई क्षेत्रफळाची ग्राऊंड प्लस वन इमारत बांधून देण्यास सांगितले होते. त्यानंतर त्यांनी पुन्हा असे सांगितले की आमची रिक्वायरमेण्ट जास्त असून आम्हाला आणखी दुसरा आणि तिसरा मजला लागणार आहे. तसेच टेस्टिंग ट्रॅक आणि रेसिडेन्शियल क्वार्टर्स लागणार आहेत. हे काम वेगवेगळे टेंडर काढून करण्यात आलेले नाही. एसआरएच्या नियम ३३(१४) अंतर्गत हे काम सुरु झाले.

दोन प्लॉट एकत्रित करुन त्यावर विकासकाला एसआरअे योजना राबविण्यास सांगण्यात आले आणि त्याबदल्यात आरटीओला प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करुन देण्यास सांगण्यात आले ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली व विचारणा केली की, या ठिकाणी एसआरए योजना कशी काय होईल ? कारण एसआरए योजनेमध्ये अशा प्रकारे काम करता

येत नाही. जेवढा भूखंड असतो तेवढयाच जागेवर एसआरअे योजना राबविली जाते याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, एसआरएच्या नियम ३३(१४) अंतर्गत विकासक काम करण्यास पुढे आला. सुरुवातीला नियम ३३ (१०) अंतर्गत काम सुरु करण्यात आले होते.

म्हणजेच एसआरअे योजना दुस-या जागेशी जोडली गेली आहे. अशा प्रकारे एसआरए योजना राबविता येत नाही. या पध्दतीने एसआरए योजना राबविता येते काय असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी सांगितले की, नियम ३३(१०) अंतर्गत बांधकाम करुन देतो असे विकासकाने सांगितले होते. त्यानंतर आरटीओने त्यांची रिक्वायरमेण्ट जास्त असल्याचे सांगितल्यानंतर विकासकाने त्या बदल्यात मर्झबान रोड आणि अंधेरी येथील शासकीय जमीन देण्यास सांगितले. यासंदर्भात प्रधान महालेखाकार यांनी समितीस सांगितले की, बिना टेंडर के यह कैसे प्रिज्यूम कर सकते हैं कि इसका रेस्पोंस नहीं आयेगा. पीडब्ल्यूडी के रुल के हिसाब से इस काम का टेंडर निकलना चाहिए था.

सदरहू प्लॉट कोणाच्या मालकीचे आहेत याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, प्लॉट सरकारच्या मालकीचे आहेत. भूमी क्रमांक ८२५(२) आरटीओचा आहे. आणि भूमी क्रमांक ८२५(१) सरकारचा आहे. मग सरकारी जमिनीवर एसआरए योजना कशी काय राबविण्यात आली याबाबत विभागाकडून असलेली उत्तर प्राप्त झाले की, परिवहन विभागाच्या झोपडपट्टी विरहीत भूखंडाचा विकास मुंबई महापालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील कलम ३३ (१४) अन्वये योजना राबविली आहे.

एसआरए योजना राबविण्यापूर्वी त्या जागेवर झोपडया असतील तर ती जागा स्लम म्हणून घोषित करावी लागते. त्याप्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांनी ही जागा स्लम म्हणून घोषित केलेली आहे काय अशी विचारणा समितीने केली असता गृहनिर्माण विभागाकडून एसआरए योजना राबविण्यात आली असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जर ५ हजार चौ.फुटाच्या जागेवर २०० झोपड्या असतील तर त्या २०० झोपड्यांना शासनाने ठरविल्याप्रमाणे २२५ किंवा २७५ चौ.फुटाचे घर मोफत बांधून देऊन उर्वरित जागेवर विकासकाने बांधकाम करुन त्यामधून त्याने नफा मिळवायचा असतो ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, २२५ चौ.फुटांची ५७३ घरे बांधण्यात आलेली आहेत.

एसआरए योजना केव्हा लागू करण्यात आली, तसेच या कामाचे टेंडर का काढण्यात आले नाही याबाबत खुलासा करता विभागीय सचिवांनी सांगितले की, सुरुवातीला नियम ३३(१०) अंतर्गत एसआरए योजना कार्यान्वित झाली. जेव्हा आरटीओची ॲडिशनल रिक्वायरमेण्ट आली त्यावेळी ती रिक्वायरमेण्ट कशी पूर्ण करायची हा मुद्दा पुढे आला. त्यावेळी विकासकाने मर्झबान रोड आणि अंधेरी येथील जागा द्यावी व त्या बदल्यात प्रशासकीय इमारतीचे ॲडिशनल मजले, रेसिडेन्शियल क्वार्टर्स ही रिक्वायमेण्ट पूर्ण करतो असे सांगितले. या रिक्वायरमेण्ट बरोबरच नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदन, हायमाऊंट अतिथीगृह या दोन इमारती तसेच प्रोजेक्ट अफेक्टेड लोकांसाठी २२५ चौ.फुटाची एक हजार घरे विकासकाने बांधून द्यावीत या प्रमाणे फायनान्शियल मॉडेल तयार करण्यात आले. या बदल्यात त्याला अंधेरी येथील सेलेबल जागा देण्यात आली.

यापेक्षा कमी किंवा अधिक फायदा करुन देणारा विकासक होता की नाही हे निविदा प्रक्रियेशिवाय विभागाला कसे काय समजू शकेल कारण आरटीओची जमीन डेव्हलप करण्यासाठी निविदा मागविणे आवश्यक होते. आरटीओच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम सुरु होते. त्यानंतर आरटीओची रिक्वायमेण्ट वाढल्यामुळे प्रशासकीय इमारत तीन मजली करावी, तसेच टेस्टिंग ट्रॅक आणि रेसिडेन्शियल क्वार्टर्स बांधून द्याव्यात असे विकासकाला सांगण्यात आले असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आरटीओ ऑफीस, टेस्टिंग ट्रॅक, रेसिडेन्शियल क्वॉर्टर्स, दिल्लीचे महाराष्ट्र सदन, मुंबईतील हायमाऊंट या इमारती बांधून देण्यासाठी दोन प्लॉट मर्ज करुन विकासकाला काम देण्याचे ठरले. या कामाचे टेंडर काढले नव्हते व एसआरए योजना सार्वजनिक बांधकाम विभागाची नाही असे विभागाकडून सांगण्यात आले.

महापालिका क्षेत्रामध्ये झोपडपट्टीवासियांना घरे देण्यासाठी एसआरअे योजना सुरु करण्यात आली. पूर्वी एसआरडी योजना होती. ती योजना रद्द करुन १९९५मध्ये एसआरअे योजना सुरु करण्यात आली. त्यानंतर शिवशाही प्रकल्प राबविण्यात आला. जेवढा प्लॉट असेल तेवढया जागेवरच एसआरए योजना राबविली जाते. मुंबईतील या भूखंडाच्या बदल्यात विकासकाने मुंबईतील आर.टी.ओ.कार्यालय, हायमाऊंण्ट अतिथीगृह व दिल्ली येथील महाराष्ट्र सदनच्या कामाचे कंत्राट दिले आहे. या संदर्भातील जे जे निर्णय झाले त्याला ॲथोरिटींची मंजुरी घेतली होती काय, शासनाची मान्यता घेण्यात आली होती काय अशी विचारणा समितीने

केली असता एस.आर.ए.च्या नियम ३३ (१४) अंतर्गत करण्यात येणाऱ्या वाढीव कामाला मंत्रिमंडळाच्या उपसमितीची (इन्फ्रास्ट्रक्चर) मान्यता मिळाली होती. ३३ (१४) अंतर्गत २.५ एफएसआय मिळाला होता. त्यापैकी घरे बांधण्यासाठी १.४ एफएसआय उपलब्ध झाला होता.

मंत्रिमंडळ उप समितीसमोर नोट जाण्यापूर्वी या प्रस्तावाला वित्त, नियोजन, नगरविकास, गृहनिर्माण, गृह, परिवहन व सार्वजनिक बांधकाम या विभागाच्या सचिवांनी मान्यता दिली होती यासंदर्भात विभागाकडून लेखी उत्तर प्राप्त झाले आहे. **(विवरणपत्र क्र.---)**

शासनामार्फत कोणताही डेव्हलपमेंटचा प्रोजेक्ट तयार केला जातो त्यावेळी बिल्डरचा अधिक फायदा होत असतो. त्याची मर्यादा २० टक्के ठरविली होती. परंतु या सर्व कामामध्ये बिल्डरला ५५ टक्के फायदा झाल्याचा महालेखाकारांचा आक्षेप आहे. या भूखंडांच्या बदल्यात बिल्डरने हायमाऊण्ट अतिथीगृह व दिल्ली येथील महाराष्ट्र सदनाचे बांधकाम करण्याचा निर्णय झाला होता. त्यानंतर एस.आर.ए.ची योजना समाविष्ट करण्यात आली. याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, या कामांमध्ये एस.आर.ए.योजना अगोदरच समाविष्ट होती.

सार्वजनिक बांधकाम विभागाने एस.आर.ए.योजना तयार केल्यानंतर कोणकोणत्या खात्याने त्या योजनेला मंजुरी दिली होती यासंदर्भात माहिती देताना वित्त व नियोजन विभागाने या कामासंबंधी अभिप्राय दिलेले होते तसेच संबंधित सर्व विभागांना ही नस्ती पाठविली होती व विधी व न्याय विभागाकडे नस्ती पाठविली होती. परंतु त्यांच्याकडून अभिप्राय आले नव्हते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कोणत्याही ठिकाणी एस.आर.ए.योजना राबवावयाची असेल तर तेथील ७० टक्के लोकांची संमती आवश्यक असते. तेथील ७० टक्के लोकांनी संमती दिली होती काय अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ७० टक्के लोकांची संमती घेतली असावी. त्यामुळे एस.आर.ए.ने ही योजना मंजूर केली होती. त्या ठिकाणी ५७३ गाळे बांधलेले आहेत.

महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली, हायमाऊण्ट, आर.टी.ओ.कार्यालय यांच्या कामाच्या सद्य:स्थितीबाबत विभागीय सचिवांनी समितीस माहिती दिली की, या जागेला भेट देणे आवश्यक आहे. आर.टी.ओ.कार्यालयाची प्रशासकीय इमारत बांधून पूर्ण झालेली आहे. ती इमारत तळ मजला अधिक पहिला मजला असे प्रस्तावित होते. त्यानंतर दोन मजल्यांची वाढ झाली आणि आता तळ मजला अधिक ३ मजले अशी इमारत तयार झालेली आहे. या

इमारतीचे उद्घाटन झाल्यानंतर ताब्यात द्यावयाची आहे. तेथील फर्निचरचेही काम पूर्ण झालेले आहे. सदरहू इमारतीचे बांधकाम चांगले झालेले आहे. महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली या वास्तुचे काम पूर्ण झालेले आहे, इंटेरियअरचे काम सुध्दा पूर्ण झालेले आहे व महाराष्ट्र सदनातील एकूण नवी दिल्ली येथील नवीन महाराष्ट्र सदनात एकूण १३८ सूटस् आहेत. त्यापैकी राज्यपालांकरता १ सूट, मुख्यमंत्र्यांसाठी १ सूट, कॅबिनेट मंत्री यांच्यासाठी ८, राज्यमंत्री यांच्यासाठी १६ मुख्य सचिव व अतिरिक्त मुख्य सचिव यांच्याकरिता ६, आमदारांसाठी २० आणि वरिष्ठ अधिकारी यांच्याकरिता ६ आणि सर्वसाधारण सूटस् ८० आहेत. आमदारांसाठी राखीव असलेले सूट ४०० चौ.फुटाचे आहेत आणि जनरल सूट २८८ चौ.फुटांचे आहेत.

महाराष्ट्र सदनामध्ये अधिकाऱ्यांना सूट मिळतात, परंतु आमदारांना सूट मिळत नाही. राजशिष्टाचाराप्रमाणे अधिकाऱ्यांचा दर्जा मोठा आहे की, आमदारांचा दर्जा मोठा आहे कारण नवीन महाराष्ट्र सदनात वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी काही सूट राखीव ठेवले आहेत. त्यामुळे अधिकाऱ्यांना सूटस् मिळतात पण आमदारांना मिळत नाहीत अनेकदा दिल्ली येथे एकाच वेळी २५ आमदार महाराष्ट्र सदनात येतात. परंतु नवीन महाराष्ट्र सदनात केवळ २० सूटस् राखीव ठेवलेले आहेत. त्यामुळे आमदारांसाठी सूट कमी पडतील, अनेक खासदारही तेथे येत असतात अशी खंत समितीने व्यक्त केली असता यासंदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, आमदारांचा दर्जा मोठा आहे. नवीन महाराष्ट्र सदनात आमदारांसाठी २० सूट राखीव ठेवलेले आहेत. जनरल ८० सूटस् आहेत. हायमाऊण्टच्या इमारतीचे स्ट्रक्चरल काम पूर्ण झालेले आहे. तळ मजला अधिक ९ मजल्याचे हे काम आहे. या राज्य अतिथीगृहात ५८ कक्ष आहेत. तेथील इंटेरियरचे व फर्निशिंगचे काम बाकी आहे. तसेच डी.पी.रोडचे बांधकाम व नाला ड्रेनेजचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. त्याच्यावर कव्हर टाकण्याचे काम पूर्ण झालेले आहे. तसेच जुने महाराष्ट्र सदन सुध्दा राहणार आहे.

हायमाऊण्ट स्टेट गेस्ट हाऊसचे ८० टक्के काम पूर्ण झालेले नाही याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, हे काम मुख्य न्यायमूर्तींच्या बंगल्यासमोरच सुरु आहे. त्यामुळे त्या ठिकाणी काम करण्यावर वेळेचे बंधन आहे. हायमाऊण्टचे ६० टक्के काम पूर्ण झालेले आहे.

या बिल्डरला किती क्षेत्रफळ मिळणार होते, त्याने किती बांधकाम केले, किती क्षेत्रफळ जागा विकली आहे व त्या बिल्डरने शासनाला किती फूट जागा बांधून दिली आणि त्याने किती

सेलेबल जागा विकली आहे तसेच बिल्डरने झोपडीधारकांना घरे दिली आहेत काय असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्याच्याकडून आर.टी.ओ.कार्यालयाचे वाढीव काम करुन घेतलेले आहे. बिल्डरने सेलेबल जागेवर बांधकाम केलेले नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाने त्याला एरिया रिलीज केलेला नाही. एस.आर.ए.नेही जागा रिलीज केलेली नाही व १३५ लोकांना घरे दिलेली आहेत.

जर १३५ लोकांना घरे दिली असतील तर उर्वरित झोपडीधारकांनी स्वतःच राहण्याची सोय केली आहे की संक्रमण शिबिरात राहत आहेत काय याबाबत मुख्य अभियंता प्रादेशिक विभाग, मुंबई यांनी सांगितले की, एक इमारत बांधून तयार झालेली आहे. सदरहू इमारतीचे बांधकाम जुने आहे. या इमारतीमधील खोल्यांचे अलॉटमेंट दिले गेलेले आहे. सदरहू बांधकाम १२५ फुटाचे आहे. यानंतर हा नियम लागू झालेला आहे. सदरहू नियम लागू होण्यापूर्वी या इमारतीचे बांधकाम व अलॉटमेंट झालेले आहे.

यामध्ये ५५ टक्के फायदा बांधकाम ठेकेदाराला होऊ शकतो असे महालेखाकारांचे मत आहे याबाबत वित्त विभागाने खुलासा करताना वित्त सचिवांनी समितीस सांगितले की, याकडे वित्त विभागाचे लक्ष यापूर्वी गेलेले नाही का ? सन २००६ ची वित्त विभागाची नोटींग आता माझ्यासमोर आहे. यामध्ये असे नमूद केलेले आहे की, यामध्ये विकासकाला २६.४० इतका फायदा अपेक्षित आहे. परंतु सध्याचे विकासकाचे प्रोफिट प्रमाणापेक्षा जास्त दिसून येत आहे. असे एजी यांना त्यावेळीही वाटत होते. या संदर्भात वित्त विभाग व संबंधित विभागाने योग्य वेळी योग्य कारवाई करणे आवश्यक आहे. "There has to be competitive bidding in transparent manner" अशा प्रकारचा शेरा वित्त विभागाचा होता.

विकासकाला केवळ ७३ कोटी रुपयांचा फायदा नसून सुपरबिल्टअप बांधकामानंतर त्याचे प्रमाण ४० टक्के इतके होते. त्यानंतर बिल्डर सदनिकेची विक्री करतो. सुपरबिल्टअप ४० टक्के बांधकामानंतरच्या विक्रीची किंमत व पूर्वीची किंमत यामध्ये जमीन अस्मानाचे अंतर असते. ७३ कोटी रुपयांच्या बिल्डर्सच्या फायद्यामध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता नाकारता येणार नाही त्यामुळे महालेखाकारांनी आपल्या अभिप्रायांमध्ये बांधकामामध्ये विकासकाला ७३.४५ कोटी रुपयांचा फायदा आहे तसेच सदरहू प्रकरण सन २००६ मध्ये शासनाकडे पाठविण्यात आले होते असे म्हटले आहे. याबाबत विभागीय सचिवांनी या सर्व प्रकरणातील घटनाक्रम व इतर संकलित माहिती, नियम, कायद्यातील तरतुदी, फाईल्स टिप्पणी, शेरे यांचे

एक स्वतंत्र सादरीकरण समितीला दाखविण्याचे आश्वासन दिले परंतु समितीला सादरीकरण दाखविण्यात आले नाही. घटना क्रमाची लेखी माहिती समितीला प्राप्त झाली. **(विवरणपत्र क्र.---)**

सदरहू प्रकरणे जर सहा सहा वर्षे शासनाच्या नजरेस येत असतील तर काळाच्या ओघामध्ये या प्रकरणामध्ये झालेली अनियमितता व जबाबदार अधिकारी यामधून सुटून जातील. या प्रकरणामध्ये शासनाचा कमीत कमी शंभर ते दीडशे रुपयांचा तोटा झालेला आहे ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली व या प्रकरणाशी संबंधित म्हाडा, एसआरए, कलेक्टर, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या स्तरावरील फाईल्सवरील टिप्पणी व शेरे यांची माहिती संकलित करुन समितीला येत्या २-३ दिवसात सादर करावे तसेच या संदर्भातील महालेखाकार यांचे आक्षेप व त्यावरील केलेली कारवाई याबाबतची नविन टिप्पणी व यासंदर्भात वित्त विभागाने ज्या काही टिपण्या केल्या असतील त्या टिपण्या तसेच तत्कालीन अधिकारी, उप ठेकेदार तसेच, मिनिस्ट्री कम्प्लायन्ससंदार्भतील फाईल्स व त्यावरील टिप्पणी शेरे याबाबतची माहिती व तत्कालीन सचिवांनी दिलेली माहिती तत्कालीन मंत्र्यांनी ओव्हररुल केली का, यासंदर्भातील माहिती सुध्दा समितीला देण्यात यावी. असे निदेश दिले कारण या प्रकरणासंदर्भात लिगल सेलचे मत, कॅबिनेट सब कमिटीचे लिगल ओपिनियन व वित्त विभागांच्या सुचना काय होत्या हे समितीला जाणून घ्यावयाचे आहे जेणेकरुन समितीला या प्रकरणाचा सखोल अभ्यास करता येईल व योग्य तो निर्णय घेता येईल.

या प्रकरणासंदर्भात वित्त विभागांच्या सचिवांच्या सूचनांचाही आढावा घेणे आवश्यक आहे. या संदर्भातील वेळोवेळी वित्त विभागाच्या सूचना व विधी विभागाचे मत याचे पालन संबंधित विभागाकडून करण्यात आले नसल्यामुळे खाते व विकासक यांचा या सर्व सावळया गोंधळामध्ये फायदा होतो. खाते - विकासक यांचे या प्रकरणातील कारवाईच्या विलंबामुळे फावते, त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करुन संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करणे अतिशय महत्वाचे आहे अशी सूचना समितीने केली व हायमाऊंट स्टेट गेस्ट हाऊस मलबार हिल, म्हाडा एसआरऐ प्लॉट, आरटीओ प्रशासकीय इमारत अंधेरी व महाराष्ट्र सदन नवीन दिल्ली येथे भेट देण्याचे निश्चित केले. त्याप्रमाणे समितीने हायमाऊंट स्टेट गेस्टहाऊस व आर.टी.ओ. प्रशासकीय इमारत अंधेरी येथे दिनांक १९ जून, २०१३ रोजी नवीन महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथे दिनांक ३ जुलै, २०१३ रोजी भेट दिली आहे.

या संदर्भात कोर्टात जनहित याचिका दाखल करण्यात आलेली आहे काय अशी विचारणा समितीने केली असता कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम यांनी सांगितले की, या संदर्भात कोर्टात जनहित याचिका दाखल करण्यात आलेली आहे. श्री.किरीट सोमय्या आणि इतर अशी जनहित याचिका दाखल करणाऱ्यांची नावे आहेत. ही याचिका ३-४ महिन्यांपूर्वी दाखल करण्यात आलेली आहे तसेच ॲफिडेव्हीट सादर करण्याची प्रक्रिया विभागाकडून सुरु आहे. जनहित याचिका दाखल केल्याची तारीख व शासनाने ॲफिडेव्हीट कसे सादर केलेले आहे याबाबतची माहिती समितीला उपलब्ध करुन देण्यात यावी असे निदेश समितीने विभागास दिले. परंतु अद्याप समितीला माहिती प्राप्त झाली नाही.

विकासकास गैरवाजवी फायदा

"विकासकास गैरवाजवी फायदा" यासंदर्भात समितीला माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, मर्झबान रोड येथे सार्वजनिक बांधकाम विभागाची जागा आहे. त्या जागेवर बांधकाम भवन बांधायचे होते. तसेच, अंधेरी येथे सार्वजनिक बांधकाम विभागाची जागा आहे. अंधेरी येथील जागेवर प्रशासकीय इमारत आणि स्टाफकरिता रेसिडेंसिअल क्वॉर्टर बांधायचे होते. त्याच्या बदल्यात विकासकाला अंधेरी येथे सेलेबल लँड द्यायची होती. विकासकाने बांधकाम भवन, रेसिडेंसिअल क्वॉर्टर आणि प्रशासकीय इमारत बांधून द्यायची आहे. बांधकाम भवनाचे आणि अंधेरी येथील निवासी इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. परंतु प्रशासकीय इमारतीचे बांधकाम अद्याप पूर्ण झालेले नाही व विकासकाला या कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक १२.०७.२००७ रोजी देण्यात आला होता. बांधकाम पूर्ण करण्यासाठी ३० महिन्यांची मुदत देण्यात आली होती.

बांधकाम भवन, निवासी इमारत आणि प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाच्या बदल्यात शासन विकासकाला जागा देणार आहे. विकासकाने शासनाला बांधकाम करुन दिल्यानंतर तो विकासक त्याला मिळालेल्या जागेची विक्री करेल. बांधकाम भवनाच्या इमारतीचे काम पूर्ण झालेले आहे. विकासक अंधेरी येथे स्टाफकरिता निवासी इमारत बांधून देणार आहे. त्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे काय यासंदर्भात खुलासा करताना कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सांगितले की, अंधेरी येथे २,४२१ चौरस मीटर जागेवर ३६ निवासस्थाने असलेल्या २ इमारतींचे बांधकाम करण्यात आलेले आहे. निवासी इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले असून ती निवासस्थाने सध्या वापरात आहेत.

विकासकाला जो प्लॉट डेव्हलप करण्यासाठी द्यायचा होता त्याची सद्यःस्थिती सांगताना कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी समितीस अवगत केले की, अंधेरी येथे शासकीय निवासस्थानाच्या २ इमारतींचे आणि प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करायचे होते. शासकीय निवासस्थानाच्या इमारतींचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. परंतु अद्याप प्रशासकीय इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले नाही. या बांधकामाच्या बदल्यात विकासकाला ८ हजार चौरस मीटर जागा द्यायची होती. विकासकाला बांधकाम भवनाच्या बांधकामाच्या बदल्यात ४ हजार चौरस फुट जागेचे लिज ॲग्रीमेंट करुन दिलेले आहे. विकासकाने त्या जागेवर स्वतःचे कोणतेही बांधकाम केलेले नाही. हे बांधकाम पूर्ण करण्यासाठी विकासकाला ३० महिन्यांची मुदत देण्यात आली होती. दिनांक १२.०७.२००७ रोजी वर्क ऑर्डर दिलेली आहे. त्यानंतर बांधकाम पूर्ण करण्यासाठी ३० महिन्यांची मुदत देण्यात आली होती. ती मुदत दिनांक ११ जानेवारी, २०१० रोजी संपलेली आहे.

विकासकाला पुन्हा मदत वाढवून दिलेली आहे काय अशी विचारणा समितीने केली असता विकासकाला मुदत वाढवून दिली नाही. परंतु विकासकाने मुदत वाढवून देण्याबाबत अर्ज सादर केलेला आहे. तो अंडर कन्सिडरेशन आहे.

विकासकाला बांधकाम पूर्ण करण्यासाठी जी मुदत देण्यात आली होती ती मुदत संपलेली आहे. विकासकाने मुदत वाढवून देण्याबाबत जो अर्ज सादर केलेला आहे तो अद्याप मंजूर झालेला नाही. अटी व शर्तींचा भंग झालेला असल्यामुळे विकासकाकडून दंड वसूल करण्यात आलेला आहे काय ? अटी व शर्तींच्या अधीन राहून विकासकाबरोबर जो करार करण्यात आलेला आहे तो करार संपुष्टात आलेला आहे. शासनाने विकासकाबरोबर करार केलेला आहे. उद्या जर त्या कराराचा भंग झाला तर दंड आकारण्याबाबत काय तरतूद आहे ? आरबीट्रेटर नियुक्त करण्यात आलेला आहे काय ? याबाबत विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नसल्यामुळे समितीने नाराजी व्यक्त केली.

विकासकाच्या मुदतवाढीच्या अर्जावर विचार विनिमय सुरु आहे असे समितीस सांगण्यात आले. मग आता जे बांधकाम सुरु आहे ते बांधकाम आम्ही अधिकृत समजायचे की अनधिकृत समजायचे ? विकासकाला जर मुदत वाढवून मिळणार नसेल तर त्याला तसे का कळविण्यात आले नाही. विकासकाला मुदत वाढवून दिली जात नाही किंवा मुदत वाढवून देण्याबाबत विकासकाने सादर केलेला अर्ज रिफ्युज सुध्दा केला जात नाही. संबंधित अधिकारी

विकासकाला मदत करीत आहेत. यासाठी कोणते अधिकारी जबाबदार आहेत ? जे अधिकारी यासाठी जबाबदार आहेत त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे अशी सूचना समितीने केली.

समितीच्या बैठकीत झालेल्या चर्चेवरुन असे लक्षात येते की, संबंधित विकासकाने शासनाला बांधकाम करुन दिलेले आहे. त्या बांधकामाच्या बदल्यात विकासकाला जी सेलेबल लँड मिळणार होती त्या जागेवर त्या विकासकाने कोणतेही बांधकाम सुरु केलेले नाही. या दोन्ही प्रकरणातील विकासकाचे नाव काय आहे अशी विचारणा केली असता, सदरहू विकासकाचे नाव श्री.विलायती राम मित्तल आहे असे विभागाकडुन सांगण्यात आले.

सदरहू बांधकामाची एकूण किंमत ३३ कोटी रुपये आहे म्हणजेच ३३ कोटी रुपयांचे बांधकाम करुन दिल्यानंतर त्या विकासकाला मिळालेल्या जागेवर त्याने कोणतेही बांधकाम सुरु केलेले नाही याबाबत शासनाने सखोल विचार करणे आवश्यक आहे.

मुदत वाढवून द्यावी किंवा देऊ नये या संदर्भात शासनाच्या काही गाईड लाईन्स काय आहेत याची माहिती समितीस अवगत करण्यास सांगितले असता ॲग्रीमेंटमधील तरतूद बघून समितीला माहिती देण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले. परंतु मुदत वाढवून द्यावी किंवा कसे याबाबत गाईड लाईन बाबतची माहिती समितीला जाणून घ्यावयाची असल्यामुळे ही माहिती विभागीय सचिवांव्यतिरिक्त इतर अधिकाऱ्यांना माहित असेल तर त्यांनी समितीस अवगत करावी असे सांगितले असता मुख्य अभियंता प्रादेशिक विभाग, मुंबई यांनी सांगितले की कामाची स्थिती बघुन मुदत वाढवून देता येते. पण विकासकाला दिलेली मुदत सन २०१० मध्ये संपलेली असताना विभागाने तेव्हापासून काय प्रयत्न केले. मागील ३ वर्ष विभाग कामाची कोणती स्थिती पहात होती आणि ही कामाची स्थिती आणखी किती वर्ष बघायची या समितीच्या प्रश्नांना उत्तर देताना मर्झबान रोड येथील जागेवर बांधकाम भवन बांधायचे होते आणि अंधेरी येथील जागेवर शासकीय निवास्थानांच्या इमारतीचे व प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करायचे होते. विकासकाला जागा उपलब्ध करुन देऊन हे बांधकाम करुन घ्यायचे होते. शासनाकडून जागा उपलब्ध करुन देण्यास विलंब झाला किंवा इतर काही कारणांमुळे विलंब झाला तर मुदतवाढ दिली जाते.

ॲग्रीमेंट करताना जे लिज ॲग्रीमेंट केले ते ९९ वर्षाचे होते असे विभागीय सचिवांनी सांगितले असता समितीने असे मत व्यक्त केले की, ३० वर्षाचे लिज ॲग्रीमेंट असते तर

विकासकाने त्या जागेवर आता पर्यंत बांधकाम केले असते. परंतु ९९ वर्षाचे लिज ॲग्रीमेंट असल्यामुळे विकासकाने त्या जागेवर बांधकाम केलेले नाही.

हे बीओटी तत्वावरील काम आहे. त्यामुळे ९९ वर्षाचे लिज ॲग्रीमेंट करण्यात आलेले आहे, ते परमिसेबल आहे काय ? बीओटी तत्वावरील काम असेल तर ३० वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी लिज ॲग्रीमेंट करु नये, असा सुप्रीम कोर्टाने निर्णय दिलेला आहे.

सचिव समितीचा अहवाल कॅबिनेटने अव्हेरल्यामुळे विकासकाला गैरवाजवी फायदा झालेला आहे. सचिव समितीच्या शिफारशी काय आहेत याची माहिती समितीला द्यावी असे निदेश समितीने दिले व यासंदर्भात प्रधान महालेखाकार यांनी समितीस सांगितले की, सचिव समिती का यह क्लीयर नोट था कि डेवलपर को ज्यादा प्रोफिट मिल रहा है परन्तु सीआईसी ने इस बात को न मानते हुए डेवलपर के प्रपोजल को पास कर दिया. हमने यह पोईन्ट अपनी रिपोर्ट में लिखा है. हम चाहते हैं कि इस पोईन्ट पर भी यहां पर चर्चा हो.

सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या उत्तराने समितीचे समाधान झालेले नसल्यामुळे समितीने प्रत्यक्ष जागा पाहण्यासाठी तेथे भेट देण्याचे निश्चित केले. यानुसार समितीने दिनांक १९ जून २०१३ रोजी हाय माऊंट गेस्ट हाऊस मलबार हिल व प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंधेरी, मुंबई येथे भेट दिली व यासंदर्भात प्रादेशिक परिवहन कार्यालय अंधेरी येथे समितीने संबंधित विभागाचे सचिव व इतर विभागीय प्रतिनिधी यांच्यासोबत बैठक घेतली.

हाय माऊंट स्टेट गेस्ट हाऊस येथील पाहणीचे इतिवृत्त :-

सदर इमारत तळमजला अधिक ८ मजल्याची असून श्री.चमणकर यांना इमारतीच्या बांधकामाचे कंत्राट देण्यात आलेले आहे. सदर इमारतीची पाहणी करुन मुख्य सचिवांनी एक महिन्यापूर्वीच आढावा घेतला व संपूर्ण इमारतीचे काम तीन महिन्यामध्ये पूर्ण करावे अशा प्रकारच्या सूचना दिल्या असल्याची बाब भेटीच्या वेळी समितीच्या निदर्शनास आणण्यात आली. तथापि, इमारतीच्या अंतर्गत सजावटीसह सर्व काम पूर्ण करण्यास साधारणत: किमान एक वर्षाचा कालावधी लागेल, असे मत समितीने व्यक्त केले. तसेच सदर इमारतीत आगप्रतिबंधक सिस्टीम बसविण्यात येणार असल्याची माहिती भेटीच्या वेळी देण्यात आली.

सदरहू इमारतीच्या बांधकामास विलंब का झाला, अशी विचारणा समितीने केली असता, श्री.चमणकर, विकासक यांनी असे सांगितले की, नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदन तसेच अंधेरी येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे.

त्यामुळे येथील गेस्ट हाऊसचे बांधकाम करण्यास उशीर झाला. सदरहू इमारतीमध्ये किती कक्षबंध आहेत अशी विचारणा केली असता, अधीक्षक अभियंता यांनी एकूण ५७ कक्षबंध असून ५२ कक्षबंध ३२५ चौ.फूटाचे तर ५ कक्षबंध ६५० चौ.फूटाचे असल्याचे सांगितले. या इमारतीमध्ये किचन हाऊस व डायनिंग हॉलची सुविधा देखील आहे.

सदर इमारतीचे बांधकाम सन २००८ पर्यंत पूर्ण व्हावयास पाहिजे होते. तथापि हार्ड रॉक असल्यामुळे, बेसमेंट पार्कींग करता येत नसल्याची बाब विभागाने समितीच्या निदर्शनास आणली. वाहतनतळासाठी अपुरी जागा असल्यामुळे हायमाऊंट स्टेट गेस्ट हाऊसच्या बाजूला असलेल्या शासकीय बंगल्यामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्याची जागा घेण्याचे प्रस्तावित करण्यात आल्याची माहिती समितीला सादर करण्यात आली. या इमारतीतील लिफ्टची क्षमता १५ व्यक्तींची असल्याचे देखील भेटीच्या वेळी सांगण्यात आले.

समितीने सदर विकासकाशी करारनामा करतांना पेनल्टीचा क्लॉजचा समावेश का करण्यात आला नाही अशी विचारणा अधिक्षक अभियंता यांच्याकडे केली असता यापुढे पेनल्टी क्लॉजचा समावेश करण्यात येईल असे सांगितले.

प्रादेशिक परिवहन कार्यालय अंधेरी येथील इतिवृत्त :-

सदरहू जागेचे विकासक श्री.चमणकर, यांनी प्रादेशिक परिवहन कार्यालयाची इमारत एक वर्षापूर्वीच बांधून तयार असल्याचे समितीच्या निदर्शनास आणले. बृहन्मुंबई महानगरपालिकेने रस्त्याच्या कामासाठी मंजुरी दिली नव्हती त्यामुळे त्याचा वापर करता आला नाही. आता महानगरपालिकेने रस्त्याच्या कामाला मंजुरी दिली असल्यामुळे रस्त्याचे काम हाती घेण्यात आले असून ते काम युध्दपातळीवर पूर्ण करण्यात येत आहे असे सांगितले. इमारतीच्या बाहेर लॅण्ड स्केपिंग विकासक स्वत: करीत आहेत. सर्वसामान्य जनतेला इमारतीच्या बाहेरुनच एक्सेस देण्यात आलेला आहे त्यामुळे सर्वसामान्य जनतेला इमारतीमध्ये प्रवेश करावा लागणार नाही. या इमारतीच्या मूळ प्लॅनमध्ये कोणत्याही प्रकारे सुधारणा करण्यात आलेली नाही. आमच्याकडून १०० टक्के काम पूर्ण झालेले आहे. सदर कामाला मुख्य सचिवांनी भेट दिली असता जून २०१३ मध्ये काम पूर्ण करावे असे निदेश दिलेले आहेत. या जागेवरील १२ मिटरचा नाला कव्हर करुन दिला असल्यामुळे आता पावसाळ्यात पाणी साचत नाही, तसेच आरटीओ कार्यालयासाठी पाच एकरचा टेस्ट ट्रॅक तयार करण्यात येणार आहे.

यानंतर समितीने संपूर्ण इमारतीची पाहणी केली व समितीने प्रादेशिक परिवहन कार्यालय अंधेरी येथे प्रधान सचिव, परिवहन व सचिव सार्वजनिक बांधकाम व इतर विभागीय प्रतिनिधी यांच्यासोबत बैठक घेतली त्यावेळी महालेखाकारांनी सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय अंधेरी यांच्यासंदर्भात कोणते आक्षेप घेतले आहे याबाबतची माहिती विषद करताना प्रधान महालेखाकारांनी समितीस सांगितले की, We have raised the objection pertaining to the Public Works Department in Report of the Comptroller and Auditor General of India, for the year ended 31st March, 2009 (Civil) in Para 3.3.3 " Loss to the Government and undue benefit to a developer." In this we have mentioned, "Allotment of work of commercial exploitation of land owned by Regional Transport Officer, Andheri without tendering and incorrect valuation of the property in calculating the developer's income and profit, resulted in undue benefit of Rs. 73.45 crore to the developer."

We have raised three points namely 1. Allotment of land without tendering. 2. Consideration of old Ready Recknor Rates. 3. Non increasing the saleable BUA by 25%.

We have raised the objection that "As per the instructions of the Government in Public Works Department commercial exploitation of Government land through private developer should be done by call of tenders. The profit to the developer should not be more than 20% of the total investment on the project. The sale price of the property to be developed for commercial exploitation should be considered as the highest of three rates, viz. ready reckoner rate, prevailing market rate to be assessed by survey and cost of construction. Further, the saleable built up area (BUA) was to be increased by 25% as per practice. Regional Transport Officer, Andheri, Mumbai accepted the proposal of a private developer to develop a plot of land owned by RTO on public private partnership and forwarded the proposal to the designated PWD. As per the proposal the developer was to construct property valued Rs. 100 crores for Government. In return, BUA of 43769.51 sq.mts was allowed to be commercially exploited by the developer. Scrutiny of the related records in the PWD revealed that the project was allotted to the developer without tendering on the plea that it would not fetch attractive market value due to the existence of adjacent slums. Market survey was not conducted by the department to come to this conclusion. Further, the profit margin to the developer was worked out to Rs. 2.39 crore considering the expenditure required to be incurred by the developer Rs. 205.51 crore and

income that would accrue from property to be developed by him for commercial exploitation. However, while calculating the sale value of property to be developed, the department considered the ready reckoner rate of Rs. 47,500 per sq mt for 2005 instead of the ready reckoner rate of Rs. 58,500 per sq mt prevailing in 2006. Besides, the saleable BUA was not increased by 25 %. As a result the income of the developer was understated. Considering this, the profit works out to Rs. 114.45 crores i.e. 55.75% of the investment as against the ceiling of 20% (Rs. 41.10 crore). Thus, there was undue benefit of Rs. 73.45 crore to the developer."

Therefore, the objection is that there was no tendering for RTO plot. There was loss to the Government as the interest of the Government was not protected.

Further more, the slum and non slum plot was merged under provisions of clause 7.7 of Appendix IV appended to DCR 33(10). The provisions of merger as appearing in clause states that "Wherever slum and municipal/MHADA property are found together or adjoining, it would be eligible for redevelopment using provisions of both DCR 33(7) and of DCR 33(10)." In the current context, since the non-slum area is not a municipal/MHADA property but a Government plot the merger of slum area with non-slum area was not permissible under DCR 33(7) and DCR 33(10). The provision further stipulates that in respect of merger of slum and non slum area under any other provision i.e. other than DCR 33(7) and of DCR 33(10), FSI for the non-slum area would be restricted to that permissible in the surrounding zone. This means that the non-slum plot is eligible for FSI of one instead of FSI of 2.5 allowed.

The SRA issued a revised letter of intent in favour of the Developer on 27-04-2012. As per condition No.56 of LOI : "Developer shall not ask for plinth CC for the proposed (Permanent Transit Camp) buildings on the non-slum plot. Also the Developer shall get the revised LOI approved, when another plot/slum plot is identified, within K ward, for the purpose of actual construction on the PTC component." The time period for construction of PTC is not fixed and is dependent on identification of slum plot by developer thereby delaying the rehabilitation of Project affected persons. The LOI also did not specify the specific ward i.e. K (east) or K (west) wherein the plot was to be identified for construction of PTC.

As per condition no. (i) of the GR dated 18-11-2006 and agreement dated 27-11-2006, 4000 sq mt was to be handed over to the developer from non-slum plot for joint use

of RTO and the developer. The developer was to use it as a marginal open space and underground parking to be constructed by the developer in this plot and 2000 sq mt of the parking area to be made available for the use of RTO/Government. However, LOI did not have any such provision.

Therefore, in short, the merger of slum area and non-slum plot under DCR 33 (7) and of DCR 33(10) though not applicable as the non-slum plot is a Government plot, grant of FSI of 2.5 to non-slum plot without restricting FSI to that permissible in surrounding area, incorrect adoption of rate for office use instead of rate for commercial use for working out the saleable component, non-increase of saleable BUA by 25% resulted in undue benefit to the developer. Besides by not ensuring a definite time limit for identifying plot area for construction of PTC would affect the rehabilitation of project affected persons in time bound manner.

प्रादेशिक परिवहन कार्यालयाची एकंदर किती जागा होती ? त्यावर किती नवीन बांधकाम झाले, या जागेवर बांधकाम करण्यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाला कोणी ॲथॉरिटी दिली? The land was belonging to RTO. त्यामुळे फायनल ॲग्रीमेंट करताना आर.टी.ओ. शी ॲग्रीमेंट करावयास पाहिजे होते असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता परिवहन सचिवांनी समितीस सांगितले की, अंतिम करारनामा प्रादेशिक परिवहन कार्यालयासोबत व्हायला हवा होता.

प्रादेशिक परिवहन कार्यालयाची जमीन सार्वजनिक बांधकाम विभागाने विकसित करावी यासंदर्भात कोणाचे पत्र आलेले आहे काय? आरटीओ कार्यालयाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हा प्रस्ताव कोणी हस्तांतर केला? ही इमारत पूर्ण बांधून झाल्यावर ७/१२ वर कोणाचे नाव राहणार आहे? प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे राहणार आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाचे राहणार आहे? There is a procedure for doing this in the Government, has that procedure been followed? अशी विचारणा समितीने केली असता परिवहन सचिवांनी सांगितले की, आरटीओ कार्यालयाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्रस्ताव गेला आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने कार्यवाही सरु केली यावर प्रधान महालेखाकार यांनी असे मत व्यक्त केले की, If the PWD wanted to commercially exploit the land, they should have called tenders.

आरटीओ कार्यालयाची जमीन विकसित करण्यासंदर्भात पत्र कोणी दिले. आरटीओ कार्यालयाचे मूळ पत्र समितीसमोर कृपया वाचून दाखविण्यात समितीस सांगितले असता अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम यांनी दिनांक ४ एप्रिल, २००५ चे पत्र समितीला वाचून दाखविलेले पत्र खालीलप्रमाणे आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालय मुंबई (पश्चिम) यांचे मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम विभाग, मर्झबान आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१ यांना लिहिलेले पत्र क्रमांक प्रापका/मु.(प) साप्रवि/इमारत /२००५/जा.क्र.१०२८६ दिनांक ४ एप्रिल, २००५ रोजी पाठविण्यात आले.

प्रति,

मुख्य वास्तुशास्त्रज्ञ,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
मर्झबान आवार,फोर्ट,
मुंबई ४०० ००१.

विषय : मे.के.एस. चमनकर एंटरप्रायझेस यांनी प्रादेशिक परिवहन कार्यालय अंधेरी, मुंबई (पश्चिम) व कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठी विनामुल्य निवासस्थाने बांधण्याबाबत दिलेला प्रस्ताव.

संदर्भ : मे.के.एस. चमणकर एंटरप्रायझेस यांचे पत्र क्र.आरटीओ/एसआरए/ केएसएलई/०५/०१, दिनांक २९/३/२००५.

उपरोक्त विषयाच्या संदर्भास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, मे.के.एस. चमणकर एंटरप्रायझेस यांना या कार्यालयाच्या आवारात असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे काम हे झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने लेटर ऑफ इंटेन्ट क्रमांक एसआरए/ईएनजी/३११/केडब्ल्यू /एसटीजीसी/एलओआय, दिनांक २७/१०/२००४ अन्वये मंजूर करण्यात आले आहे. झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाच्या नियमानुसार या कार्यालयाच्या इमारतीचे क्षेत्र एकूण ३५००० चौ.फूट विनामूल्य बांधकाम करण्याची विकासकास अट घालण्यात आली आहे.

मे.के.एस.चमणकर एंटरप्रायझेस यांनी सदर प्रस्तावाद्वारे या कार्यालयात कार्यालयीन इमारत बांधकामासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी मंजूर केलेल्या ३५००० चौ.फूटा

व्यतिरिक्त ३४१८१ चौ.फूटाचे वाढीव विनामुल्य बांधकाम करुन देण्याचे प्रस्तावित केले आहे. तसेच कार्यालयाच्या जागेवर कर्मचारी व अधिकारी यांच्या निवासस्थानाकरिता ४१३१० चौ.फूट विनामुल्य बांधकाम करुन देण्याचे प्रस्तावित केले आहे. कर्मचारी व अधिकारी यांच्याकरिता ४१३१० चौ.फूटामध्ये एकूण ४८ गाळे बांधण्याचा प्रस्ताव दिला आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे कामकाजाकरिता मोकळ्या जागेची अतिशय आवश्यकता आहे. या मोकळ्या जागेत अनुज्ञप्तीसाठी येणा-या उमेदवारांची चाचणी घेणे व त्यासाठी लागणारे टेस्ट, ट्रॅक, जड व हलक्या वाहनांसाठी पार्किंग करण्यासाठी जागेची उपलब्धता ठेवणे, वाहनांची तपासणी करण्यासाठी मैदान तयार करणे, जप्त केलेली वाहने उभी करण्यासाठी वेगळी सुरक्षित जागा ठेवणे आवश्यक आहे.

झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने मे.के.एस. चमणकर एंटरप्रायझेस यांना देण्यात आलेल्या लेटर ऑफ इंटेन्टनुसार अतिरिक्त ३३७६०.१० चौ.फूट इतके क्षेत्रफळ उपलब्ध आहे म्हणून मे.के.एस. चमनकर एंटरप्रायझेस यांनी कार्यालयीन इमारतीकरिता अतिरिक्त ३४१८१ चौ.फूटाचे विनामुल्य बांधकाम तसेच कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठी निवासस्थाने बांधण्याकरिता ४१३१० चौ.फूट विनामुल्य बांधकामाचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केला आहे. सदर प्रस्ताव शिफारशींसह आपल्या छाननीसाठी सादर करण्यात येत आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने लेटर ऑफ इंटेन्ट नुसार सध्या ३५००० चौ.फूटाचे कार्यालयीन इमारतीचे बांधकाम करण्यास विकासकास मंजूरी दिली व त्यास या कार्यालयाकडून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे. सदर इमारतीच्या नकाशास प्रथमत: मंजूरी देण्यात यावी, जेणेकरुन कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम त्वरित सुरु करणे सुलभ होईल व उर्वरित प्रस्तावाची छाननी करुन योग्य तो निर्णय घेण्यात यावा ही विनंती.

स्वाक्षरित/-

प्रादेशिक परिवहन अधिकारी,

मुंबई (पश्चिम)

तसेच पत्रासोबत : मे.के.एस. चमणकर एंटर प्रायझेस यांनी प्रादेशिक परिवहन कार्यालय व कर्मचारी/ अधिकारी निवासस्थानाचे नकाशे व प्रस्ताव मंजुरीकरिता सोबत जोडले होते. म्हणजेच आरटीओ कार्यालयाने प्रस्ताव छाननीसाठी पाठविला होता. आरटीओ कार्यालयाने

पॉवर ऑफ ॲटर्नी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिलेली नाही किंवा कोणत्याही प्रकारचे अधिकार दिलेले नाहीत ही वस्तुस्थिती समितीने लक्षात आणून दिली व सर्वात प्रथम अर्ज कोणत्या यंत्रणेने केलेला आहे ? सदरहू जागेवर इमारत बांधण्यासंदर्भात प्रस्ताव छाननीसाठी पाठवा असे कोणी सांगितले? कोणाच्या आदेशानुसार या प्रकरणास सुरुवात झाली अशी विचारणा समितीने केली असता प्रधान सचिव, परिवहन विभाग यांनी सांगितले की,

आता जे पत्र वाचून दाखविण्यात आले आहे त्या पत्रावर श्री.लोंढे या प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्याची सही असावी असे वाटते. परंतु सदर पत्र कोणत्या प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्याने लिहिले आहे त्या बाबतची माहिती समितीला नंतर सादर करतो असे आश्वासन समितीस दिले. सदरहू माहिती समितीस प्राप्त झाली आहे. **(विवरणपत्र क्र. ---)**

जागा विकसित करून देण्यासंबंधी आर.टी.ओ.कार्यालयाने जाहिरात दिली होती काय ? आर.टी.ओ.कार्यालयाने जाहिरात दिली असती तर १० विकासक पुढे आले असते. जागा विकसित करण्यासाठी विभागाने निविदा का काढली नाही याबात खुलासा विभागाकडून करण्यात आला नाही.

"या सर्व प्रकरणातील घटनाक्रम व इतर संकलित माहिती, नियम, कायद्यातील तरतुदी, फाईल्स, टिप्पणी, शेरे समितीला सादर करू." असे आश्वासन दिनांक २२ मे २०१३ रोजीच्या बैठकीत विभागीय सचिवांनी समितीला दिले होते. ही सर्व माहिती समितीला पडताळून पहायची आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून फक्त घटनाक्रमासंबंधी माहिती प्राप्त झाली आहे. **(विवरणपत्र क्र.---)** अन्य माहिती अद्याप प्राप्त झाली नाही. एवढेच नव्हे तर सर्वात पहिला पत्रव्यवहार कोणी केला हे देखील परिवहन सचिव, परिवहन आयुक्त, सचिव, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना सांगता येत नसल्यामुळे समितीने नाराजी व्यक्त केली.

मुख्य वास्तूशास्त्रज्ञ यांच्याकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पत्र आल्यानंतर छाननीसाठी प्रस्ताव विभागाकडे पाठविण्यात आला असे अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम यांनी समितीस सांगितले असता समितीने सदर भूखंड विकसित करावयाचा आहे अशा आशयाचे आर.टी.ओ.यांचे पत्र मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांना आले होते काय ? भूखंड विकसित करावयाचा असेल तर त्यासाठी देखील कार्यपद्धती आहे ती अनुसरण्यात आली आहे काय अशी विचारणा केली असता अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, यांनी सांगितले

की, सदर कामाचा प्रस्ताव संबंधित विभागाकडे छाननीसाठी गेल्यानंतर विभागाच्या सचिवांनी त्यास मान्यता दिलेली आहे यासंदर्भात या प्रकल्पाचे मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांनी समितीस सांगितले की, त्यांना फक्त ड्रॉईंग करून देण्याचा अधिकार आहे. त्यामुळे ड्रॉईंग करून दिल्यानंतर प्रस्ताव अधीक्षक अभियंता यांच्याकडे पाठविला आहे.

विभागाने दिलेल्या उक्त माहितीवरुन सदरहू मूळ प्रस्ताव कोणी दिलेला आहे यासंदर्भातील अचूक माहिती अद्यापही समितीस विभागाने दिलेली नाही तसेच्आर.टी.ओ.ची जमीन असताना प्रस्तावास सुरूवात कशी झाली याचीही माहिती समितीला मिळत नाही. जर जमीन आर.टी.ओ.ची असेल तर सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेली कार्यवाही बेकायदेशीर व चुकीचे आहे. त्यामुळे हा सर्व व्यवहार रद्द होऊ शकतो. यासंबंधी दोन्ही विभागाच्या सचिवांनी जबाबदारी स्वीकारली पाहिजे. शासनातील वाईट गोष्टी बाहेर आणणे हे अधिकाऱ्यांचे काम असते. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कोणत्या अधिकाऱ्याने विकासकाशी करार केला आहे ? त्यास मंत्रिमंडळाची मान्यता घेतली आहे काय, यासंदर्भातही समाधानकारक उत्तरे विभागीय अधिकारी देऊ शकत नाहीत. सदर भूखंडाच्या विकासासाटी विभागाकडून निविदा देखील मागविलेल्या नाहीत ही बाब गंभीर स्वरुपाची आहे असे मत समितीने व्यक्त केले.

या भूखंडाची मालकी आर.टी.ओ.विभागाकडे व महसूल विभागाकडे आहे. तेव्हा शासनाच्या जमिनीचा विकास करण्याची परवानगी कोणी घेतली आहे, महसूल विभागाच्या जमिनीचा विकास करण्यासाठी कोणचाही परवानगी घेतली आहे यावर अंधेरी येथील प्रादेशिक परिवहन कार्यालय भूखंड ८२५ (१) व ८२५(२) चा विकास करावयाचा होता. हे भूखंड झोपडपट्टीने बाधित होते. यातील भूखंड क्र.८२५ (१) शासनाचा मालकीचा आहे, तर भूखंड क्र.८२५ (२) परिवहन विभागाकडे आहे. या भूखंडावर डीसीआर ३३ (१०) अंतर्गत सर्व कार्यवाही केली आहे असे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी सांगितले.

ज्याची जमीन नाही त्याने दुसऱ्याच गोष्टी परस्पर कशा काय केल्या आहेत ? यात शासनाच्या मालकीची जमीन आहे. ती विकसित करण्यासंबंधी विभागाने शासनाची परवानगी घेतली आहे काय याबाबत खुलासा करताना परिवहन सचिवांनी सांगितले की, अंधेरी येथे शासनाच्या मालकीचे दोन भूखंड आहेत. यापैकी प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या नावे न.भू.क्र.८२५/२ भूखंड असून त्याचे क्षेत्रफळ ४०७१६.७० चौ.मी. आहे. यातील बाधित क्षेत्रफळ

८१५३.७० चौ.मी.असून अबाधित क्षेत्रफळ ३२५६३.१० चौ.मी. आहे. न.भू.क्र.८२५/१ भूखंड शासनाच्या मालकीचा असून त्याचे क्षेत्रफळ २०५७०.७० चौ.मी.असून यात बाधित १३०४३.७० चौ.मी. क्षेत्रफळ असून अबाधित क्षेत्रफळ ७५२७.०० चौ.मी.आहे. एकूण ८२५/१ व ८२५/२ चे क्षेत्रफळ ६१२८७.४० चौ.मी.असून बाधित क्षेत्रफळ २११९७.३० चौ.मी.व अबाधित क्षेत्रफळ ४००९०.१० चौ.मी.आहे. यात ६३३० चौ.मी.रस्त्याचा देखील समावेश आहे. शासनाच्या मालकीची ५ एकर जमीन आहे. सदर जमीन १०० टक्के बाधित होती. सन २००४ मध्ये एलओआय दिलेले आहे. भूखंड क्र.८२५ (१) व ८२५ (२) वर स्लम घोषित केल्यामुळे त्यानुसार योजना राबविली आहे.

विभागाने दिलेल्या उपरोक्त माहिती वरुन समितीला अद्यापपर्यंत शासकीय जमिनीची परवानगी नक्की कोणत्या विभागाकडून घेतली आहे हे अवगत होत नाही. जो जमिनीचा मालक असतो त्याची परवानगी घेतल्याशिवाय कुठलीही योजना सुरू करता येत नाही. त्यामुळे समितीने पुन्हा ही योजना शासनाच्या मालकीच्या जमिनीवर राबविणार असल्यामुळे शासनाची परवानगी घेतली होती काय अशी विचारणा केली असता अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सांगितले की, त्यामुळे शासकीय जमिनीची परवानगी कोणाकडून घेतली आहे ? एसआरएने एलओआय देण्यापूर्वी परवानगी घेतली आहे यावर प्रधान महालेखाकार यांनी असे मत नोंदवले की, The provision for merger is "wherever slum and municipal/MHADA property are found together or adjoining, it would be eligible for redevelopment using provisions of both DCR 33(7) and of DCR 33(10)." In this case the non-slum area is not a municipal or MHADA property but it is a Government plot. The merger of slum area with non-slum area was not permissible under DCR 33(7) and of DCR 33(10). Further more, FSI for the non-slum area would be restricted to that permissible in surrounding zone. The non-slum plot is eligible for FSI of one. Despite of this FSI of 2.5 was allowed.

अंधेरी येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा भूखंड क्र.८२५/१ व ८२५/२ चा विकास करणे व शासकीय इमारती विनामूल्य बांधण्याबाबतचा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रस्तावावर दिनांक १६.५.२००६ रोजी प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांच्या दालनात बैठक झाली होती. त्याचे इतिवृत्त अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी समितीस वाचून दाखविले ते खालीलप्रमाणे आहे :-

"विषयांकित जागेवर मंजूर विकास योजनेनुसार आर.टी.ओ.ऑफिससावी आरक्षित असलेल्या शासकीय जमिनीच विकास करण्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या प्रस्तावावर यापूर्वी दिनांक ५.५.२००६ रोजी मंत्रिमंडळ पायाभूत समितीसमोर चर्चा करण्यात आली होती. चर्चेच्या वेळी या प्रस्तावामधील काही भागांवर असलेल्या विद्यमान झोपडपट्टयांच्या जागेवर एस.आर.ए.कडून झोपडपट्टी पुनर्वसन योजना मंजूर झालेली आहे. या मंजूर क्षेत्रावर विकास नियंत्रण नियमावली नुसार टी.डी.आर.अनुज्ञेय होणार नाही. तसेच, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमुळे मूळ भूखंड काल्पनिकरित्या विभागाला जात असल्याने नॉन स्लम भूखंडाचे TDR Potertial स्लम भूखंडावर वापरता येणार नाही. त्यामुळे अशा एकत्रित भूखंडावर विकास प्रस्ताव विचारात घेता येणार नाही अशी भूमिका नगर विकास विभागाकडून मांडण्यात आली होती.

दरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रस्तावावर विकास नियंत्रण नियमावली तरतूद तसेच एस.आर.ए.ने दिलेली मंजुरी याबाबत सविस्तर चर्चा व्हावी या उद्देशाने प्रधान सचिव, नगर विकास यांच्या दालनात दिनांक १६.५.२००६ रोजी एक बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीस सचिव (बांधकामे) व मुख्य कार्यकारी अधिकारी, एस.आर.ए.यांना निमंत्रित करण्यात आले होते.

चर्चेमध्ये सर्वप्रथम सदर जमिनीवरील स्लम असलेला भूखंड व स्लम नसलेला भूखंड यांचे एकत्रिकरण करता येणार नाही. या विभागाने दिनांक ५.५.२००६ रोजीच्या बैठकीत मांडलेल्या भूमिकेवर चर्चा झाली. चर्चेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी (SRA) यांनी विकास नियंत्रण नियमावली मधील नियम ३३ (१०) मधील ॲपेंडिक्स चार मधील उप नियम ७.७ मध्ये "Development of slum & contiguous non-slum area under any other provisions may be allowed together in order to promote flexibility of design as well as to raise more resources, provided the FSI of non-slum quantum of area shall be restricted to that permissible in the surrounding zone." अशी तरतूद असल्याने असे एकत्रिकरण नियमानुसार करता येते हे स्पष्ट केले आहे."

प्रस्तावाला कोणी सुरुवात केली याबाबत माहिती देताना अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी माहिती देताना सांगितले की, एसआरए योजनेचे अधिकार मंत्रिमंडळास

दिलेले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने करारनामा केलेला आहे. त्या करारनाम्यानुसार १०० कोटी रुपयांचे बांधकाम करुन द्यावयाचे आहे.

महसूल विभागाची तसेच आरटीओची कार्यालयाची काही जागा मिळून सार्वजनिक बांधकाम विभागाने हाय माऊंट स्टेट गेस्ट हाऊस आणि आरटीओ कार्यालयासाठी जागा बांधण्याचा घाट घातला. या जागेवर आरटीओ कार्यालयाने किंवा मुंबई महानगरपालिकेने एसआरए योजना राबविली असती तर अडचण नव्हती असे मत समितीने व्यक्त केले असता अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सांगितले की, यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग ही एजन्सी आहे. यासबंधी जेव्हा प्रस्ताव आला तेव्हा शासन स्तरावर बैठक होऊन मंत्रिमंडळासमोर सदरहू प्रस्तावाला मान्यता दिली गेली. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे ४५ कोटी रुपयाचा प्रस्ताव आला होता. आरटीओ कार्यालयाची मूळ दहा एकर जागा होती, त्यापैकी २ एकर जागा झोपड्यांनी बाधित होती.

BUA of 43,769.51 sq.mts. was allowed to be commercially exploited by the developer but as per audit calculations 54,711.89 sq.mts. was the total BUA available for sale असे प्रधान महालेखाकार यांनी समितीस सांगितले.

परिवहन विभागाच्या जागेवर आरटीओ कार्यालयासाठी जागा आणि निवासस्थान बांधण्याची सुरुवात कोठून झाली? एसआरएच्या योजनेच्या प्रस्तावावर जिल्हाधिकाऱ्यांनी परवानगी दिली. या प्रस्तावासंबंधी नगर विकास विभाग, विधी व न्याय विभागाचे अभिप्राय मागितले असणार. जिल्हाधिकारी, एसआरए सी.ओ. (लॅण्ड) यांच्याकडील प्रती समितीला सादर करण्यात यावेत असे निदेश समितीने दिले तसेच वित्त विभागाने टेंडर काढयाबाबतची सूचना का केली नाही? खरे पाहिले तर या योजनेत मिळणारा काही नफा शासनाला तसेच खाजगी विकासकाला मिळणे आवश्यक होते. या नफ्याचे शेअरिंग कसे झालेले आहे? मार्च २००२ मध्ये शासनाचा निर्णय झालेला आहे की, नफ्याची विभागणी कशी करावी. शासनाच्य निर्णयानुसार २० टक्के (ज्यांनी गुंतवणूक केली आहे) च्या वर विकासकाला नफा होता कामा नये असे समितीने निदर्शनास आणून दिले असता यासंदर्भात प्रधान महालेखाकार यांनी समितीस सांगितले की, "As per the instructions (March 2002) of the Government in Public Works Department (PWD), commercial exploitation of Government land through private

developer should be done by call of tenders. The profit to the developer should not be more than 20% of the total investment of the Project." इस प्रकारकी सूचना है.

नफ्याच्या विभागणीबाबत अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी खाजगीकरणाच्या प्रस्तावात आयआरआर २० टक्क्यापेक्षा जास्त नसावा. आता तर १५ टक्केपेक्षा जास्त नसावा असे शासनाचे परिपत्रक आहे अशी माहिती समितीस दिली.

या योजनेतून विकासकाला किती नफा मिळणार आहे अशी विचारणा केली असता ट्रॅन्झिट क्वाटर्सच्या अगेन्स्ट इनसेटिव्ह विकासकाला मिळाला असल्यामुळे विकासकाचा नफा जास्त झाला असल्याचे दिसून येते कारण ट्रन्झिट कॅम्प शासनाच्या जागेत आहे.

या प्रस्तावास ट्रॅन्झिट कॅम्प विकासकाला स्वत:ची जागा घेऊन तयार करावयाचा होता असे असताना ट्रॅन्झिट कॅम्पसाठी वेगळी जागा का घेतली नाही याबाबत विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही. प्रधान महालेखाकार यांनी विभागास विचारले की, As per condition of LOI, "the developer shall not ask for plinth CC for the proposed (permanent Transit Camp) buildings on the non-slum plot. Also the developer shall get revised LOI approved, when another plot/slum plot is identified within K ward..." So, has the plot/land been identified यावर विभागाकडून नकारार्थी उत्तर प्राप्त झाले.

दुस-या पार्टनरला ट्रॉन्सफर करतांना शासनाची परवानगी घेणे आवश्यक आहे. परस्पर ट्रॉन्सफर कसे काय होऊ शकते कारण ही बाब सरकारशी निगडित आहे. यात मुख्य वास्तुशास्त्रज्ञांचे आक्षेप नाही का यावर मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांनी नकारार्थी उत्तर दिले.

आरटीओ कार्यालयाची जी इमारत बांधून झाली तिला मूळ प्लॅनमध्ये बेसमेंट अधिक एक अशी पार्कींगची व्यवस्था होती असे समितीने सांगितले असता तेथे बेसमेंट अधिक तळमजला अशी होती. ग्राऊंडवर तीन लेअर पार्कींग आहे व मर्झबान येथे दोन तळघर होती. त्यातील एक तळघर झाले आणि एक कमी केले आहे का असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

बांधकाम भवन येथे दोन पार्कींग होती, त्यातील एक कमी झाले आहे. करारनामा झाल्यानंतर हा बदल झालेला आहे. टेंडरमध्ये तशी तरतूद होती व याप्रस्तावास सब कमिटीची मान्यता आहे का तसेच एक पार्किंग कमी करण्यासाठी शासनाची परवानगी घेतली आहे काय

यावर अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सांगितले की, पार्किंग जागा कमी करण्याची तरतूद टेंडरमध्ये होती व या प्रस्तावाला सब कमिटीची मान्यता आहे.

हायमाऊंट स्टेट गेस्ट हाऊस इमारतीचे काम ॲग्रीमेंट नुसार झाले आहे काय ?

हाय माऊंट गेस्ट हाऊस संदर्भात समितीने असे नमूद केले की, सदरहू काम मोठे असल्याने विकासकाला अडचणी येतात याची समितीला कल्पना आहे. सदर काम किती कालमर्यादेत पूर्ण करायचा याचा क्लॉज ॲग्रीमेंटमध्ये समाविष्ट केलेला नाही. एवढेच नव्हे तर पेनल्टी चार्जेस देखील नाहीत. हार्ड रॉक लागल्यामुळे वर्ष-दोन वर्ष ट्रायलपिट फेल होऊ शकते. त्यावेळी ॲग्रीमेंट कोणी केली होते ? शासन नेहमी स्वत:ची सेफ बाजू बघून ॲग्रीमेंट करते. डीएसआरन नुसार सिमेंट, स्टीलची किंमत नमूद केलेली असते. या बांधकामाच्या ॲग्रीमेंटमध्ये कालमर्यादाच नमूद करण्यात आलेली नाही याबाबत माहिती देताना अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सांगितले की, हायमाऊंट स्टेट गेस्ट होऊस इमारतीच्या कामाची कालमर्यादा दोन वर्षाची होती. सदर कामाची कालमर्यादाचा सन २००८ मध्ये संपलेली आहे. त्यानंतरसदर कामासाठी एक्स्टेंशन देण्यात येत आहे.

अगदी सहानुभूतीपूर्वक विचार केला तरी देखील ७-८ वर्षामध्ये काम पूर्ण करण्यात आलेले नाही. खाजगी कार्यालयात असे होते काय ? शासकीय काम आहे म्हणून काही बोलायचे नाही ? एक वर्षभरापासून हायमाऊंट स्टेट गेस्ट हाऊस इमारतीचे बंद आहे. सगळे फिनिशिंग राहिले आहे असे मत समितीने खेदाने व्यक्त केले.

या प्रस्तावाला कुठून सुरूवात झाली, पहिला पत्र व्यवहार कोणत्या विभागाने केला, यात एस.आर.ए.चा देखील सहभाग असल्यामुळे एस.आर.ए., आर.टी.ओ., सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हाधिकारी, विधी व न्याय विभागाचे मत मुंबई महानगरपालिकेचे अभिप्राय याबाबतची माहिती समितीला सादर करण्यात आली. **(विवरणपत्र क्र.----)**

मूळ ॲग्रीमेंटमध्ये महाराष्ट्र सदन, दिल्ली व हायमाऊंट स्टेट गेस्ट हाऊस येथील बांधकामाचा समावेश आहे. पण टीडीआर हा त्या भागातच वापरला पाहिजे. असे असताना विभागाकडून बांधकामाचे व्हॅल्यूएशन कसे करणार आहे अशी विचारणा समितीने केली असता बांधकामाचे व्हॅल्युएशन २००६-२००७ नुसार होणार आहे. सदर करार विधी व न्याय विभागाच्या मार्फत मान्य झालेले आहे.

यानंतर समितीने बुधवार दिनांक ३.७.२०१३ रोजी येथील नवीन महाराष्ट्र सदन,नवी दिल्ली येथे भेट दिली.

नवी दिल्ली येथील नवीन महाराष्ट्र सदनाची पाहणी इतिवृत्तांत

सदरहू पाहणीच्या वेळी श्री.बिपीन मल्लिक, प्रधान सचिव व निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली, श्री. श्यामल कुमार मुखर्जी, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग श्री.बिपीन संख्ये, मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, श्री.जोशी, मुख्य अभियंता, श्री.ए.बी.गायकवाड, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग श्री.सतीश श्रावगे, कार्यकारी अभियंता, श्री.गिरीश रानडे, प्रोजेक्ट मॅनेजमेण्ट कन्सल्टण्ट व अन्य अधिकारी उपस्थित होते.

या पाहणीच्या वेळी समितीने विचारलेल्या विविध प्रश्नांना उत्तरे देताना अधिका-यांनी अशी माहिती दिली की, ही इमारत ल्युटन झोनमध्ये असल्यामुळे तळमजला अधिक पहिला मजला एवढेच बांधकाम करण्याची परवानगी आहे. त्यामुळे या इमारतीचे पहिल्या मजल्यापर्यन्तच बांधकाम केलेले आहे. या ल्युटन झोनमध्ये बेसमेण्टचे बांधकाम करण्यासही परवानगी नसल्यामुळे तेही बांधकाम केलेले नाही.सदर इमारतीचे बांधकाम आर.सी.सी.पध्दतीचे असून बाहेरील बाजूस धोलपूर दगडांचे आवरण आहे. तसेच सिलिकॉन कोटिंग केलेले आहे. इमारतीच्या बाहेरील काही भागामध्ये लॅण्डस्केपिंग केलेले आहे. तसेच अंडरग्राऊंड ड्रेनेज सिस्टिम केल्यामुळे इमारतीच्या परिसरामध्ये पाणी साचत नाही.

यावेळी समितीने बाथरुम मधील पाणी रुममध्ये येत असल्याचे, निदर्शनास आणले. व विचारणा केली की, इमारतीचे काम प्लॅनप्रमाणे होत आहे की नाही याची तपासणी प्रोजेक्ट मॅनेजमेण्ट कन्सल्टंटने केली होती की नाही याबाबत प्लॅनप्रमाणे काम करण्यात आलेले आहे असे प्रोजेक्ट मॅनेजमेण्ट कन्सल्टंण्ट यांनी सांगितले.

या इमारतीच्या खिडक्या आतील बाजूस उघणा-या आहेत. खिडक्यांच्या बाहेरील बाजूस कठडे लावल्यामुळे खिडक्या बाहेरील बाजूस उघडू शकत नाहीत. आपत्कालीन परिस्थितीमध्ये लोकांना बाहेर काढण्याच्या दृष्टीने खिडक्या बाहेरील बाजूस उघडणाऱ्या असल्या पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले. तसेच इमारतीच्या मागील भागात जिन्याच्या ठिकाणी भिंतींच्या कडांचे प्लॅस्टर निघालेले आढळून आले. व मागील बाजूच्या पहिल्या मजल्यावरील काही भागाचे बांधकाम अपूर्णावस्थेत असल्याचे दिसून आले. इमारतीच्या परिसरामध्ये ज्या ज्या ठिकाणी लॅण्डस्केपिंग केलेले आहे तेथील कठडे बाहेरील बाजूने कोरीव

आहेत. हे कठडे दोन्ही बाजूने कोरीव का केले नाहीत अशी समितीने विचारणा केली असता आतील बाजूस झाडे, गवत लावण्यासाठी माती टाकलेली असल्यामुळे कठडयाचा आतील भाग कोरीव केलेला नाही असे सांगण्यात आले.

नवीन महाराष्ट्र सदन व बडोदा हाऊस यांच्यामध्ये असलेल्या भितींवर भोके पाडून बदोडा हाऊस मधील इमारतीत एक्झॉस्ट फॅन बसविण्यात आले असून त्यांची गरम हवा नवीन महाराष्ट्र सदनाच्या आवारात फेकली जात असल्याचे निदर्शनास आले. हे एक्सॉस्ट फॅन काढण्याच्या संदर्भात संबंधितांशी चर्चा करावी अशी समितीने सूचना केली.

या पाहणीच्या वेळी समितीला अशी माहिती देण्यात आली की, इमारतीच्या मागील बाजूस जवळपास अर्ध्या एकरावर अतिक्रमण असून त्या संदर्भातील प्रकरण न्यायालयामध्ये प्रलंबित आहे. ही जागा ताब्यात मिळाल्यास पार्किंगसाठी त्या जागेचा उपयोग करता येईल.

समितीने नवीन महाराष्ट्र सदनातील एकूण कक्षबंधाबाबत विचारणा केली असता, समितीला अशी माहिती देण्यात आली की, नवीन महाराष्ट्र सदनामध्ये माननीय राज्यपाल यांच्यासाठी १, माननीय मुख्यमंत्री यांच्यासाठी १, माननीय मंत्री यांच्यासाठी ८, माननीय राज्यमंत्री यांच्यासाठी १६, माननीय आमदार यांच्यासाठी २०, मुख्य सचिव व अपर मुख्य सचिव यांच्यासाठी ६, इतर गेस्टसाठी ८०, अपंगाकरिता २, तसेच कर्मचाऱ्यांसाठी ४, या प्रमाणे एकूण १३८ कक्षबंधांची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच ५२७८ चौ.फुटाचे सभागृह, १८८८ चौ.फुटाचे व्हिडिओ कॉन्फरन्स कक्ष, ५ मिटींग रुम, १८८८ चौ.फुटाचा पत्रकार परिषद कक्ष, १४४९ चौ. फुटाचे व्ही.आय.पी. भोजन कक्ष, २८६८ फुटाचे भोजन कक्ष, १३३१ चौ.फुटाचे सांस्कृतिक केन्द्र, १८८२ चौ.फुटाचे संग्रहालय, १७५९ चौ.फुटाचे वाचनालय आणि १७०० चौ.फुटाचे जिम्नॅशियम या प्रमाणे बांधकाम करण्यात आलेले आहे.

यानंतर समितीने माननीय राज्यपालांसाठी तसेच माननीय मुख्यमंत्र्यांसाठी असलेल्या कक्षबंधातील डायनिंग रुम, वेटिंग रुम, मास्टर बेड रुम, ऑफिस रुम, प्रसाधन गृह इत्यादीची पाहणी केली. या कक्षबंधातील फ्लोरिंगचे, फर्निचरचे फिनिशिंग बरोबर केले नसल्याचे दिसून आले. याबाबत विचारणा केली असता अजून फिनिशिंगचे काम पूर्ण झाले नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

यानंतर समितीने मंत्री, राज्यमंत्री, आमदार तसेच मुख्य सचिव व अपर मुख्य सचिवांसाठी असलेल्या कक्षबंधांची पाहणी केली. सदरहू पाहणीच्या वेळी काही कक्षबंधातील लाद्यांना तडे गेल्याचे व फ्लोरिंगचे काम बरोबर झाले नसल्याचे दिसून आले.

सचिवांसाठी असलेल्या कक्षबंधाचे क्षेत्रफळ ५४८ चौ.फूट असून त्यामध्ये ३ रुम, दोन टायलेट, दोन दूरदर्शन संच अशी व्यवस्था करण्यात आलेली आहे तर आमदारांसाठी असलेल्या कक्षबंधाचे क्षेत्रफळ ४०० चौ.फुटाचे आहे. अशा प्रकारे कक्षबंधाच्या केलेल्या अलॉटमेण्ट संबंधी समितीने तीव्र नापसंती व्यक्त करुन प्रोटोकॉल प्रमाणे आमदारांसाठी असलेला कक्षबंध सचिवांपेक्षा चांगला असणे आवश्यक आहे असे मत व्यक्त केले. सचिवांसाठी असलेले कक्षबंध आमदारांसाठी द्यावेत व आमदारांसाठी असलेले कक्षबंध सचिवांसाठी द्यावेत अशी सूचना समितीने केली. या इमारतीमध्ये आमदारांसाठी केवळ २० कक्षबंध ठेवण्यात आलेले आहेत. आमदारांची एकूण संख्या विचारात घेता २० कक्षबंध अपुरे असून त्यामध्ये वाढ करण्याची सूचना समितीने केली.

या इमारतीमध्ये सेण्ट्रलाईज्ड अे.सी. सिस्टिम बसविण्यात आलेली असली तरी काही कक्षबंधातील वातानुकुलित सिस्टिम योग्य प्रकारे कार्यान्वित होत नसल्यामुळे कक्षबंध वातानुकुलित होत नसल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले. वातानुकुलित यंत्रणेतील दोष दूर करण्यात येतील असे अधिकाऱ्यांनी सांगितले. या संपूर्ण इमारतीच्या कामाचे थर्डपार्टी ऑडिट करण्याची आवश्यकता आहे असे मत समितीने व्यक्त केले.

यासंदर्भात समितीने निवासी आयुक्त महाराष्ट्र सदन, विभागीय सचिव व इतर विभागीय प्रतिनिधी यांच्यासमवेत बैठक घेतली. सदर बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने समितीने निवासी आयुक्त, यांना नवीन महाराष्ट्र सदनाबाबतची माहिती व त्यासंदर्भातील त्यांचे मत विचारले असता निवासी आयुक्त, यांनी समितीस माहिती देताना सांगितले की, नवीन महाराष्ट्र सदनासाठी आमच्याकडून आतापर्यन्त दीड कोटी रुपये खर्च झालेला आहे. तसेच प्रत्येक महिन्याला ३० लाख रुपये खर्च करावा लागणार आहे. पाणी पुरवठा, वीज, टेलिफोन कनेक्शन, सेक्युरिटी, इत्यादीवर दीड कोटी रुपये खर्च झालेला आहे. टेलिफोनच्या २५ लाईन्स घेतलेल्या आहेत. सर्व इन्स्पेक्शन करुन ज्या ज्या कमतरता आमच्या लक्षात आल्या त्याची यादी केलेली आहे. ही कामे विकासकाकडून करुन घेण्यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करीत आहोत. सर्व कामे १ जून पर्यंत करावयाची होती. परंतु अनेक कामे प्रलंबित

राहिलेली आहेत. नवीन महाराष्ट्र सदनाचे उद्घाटन झाल्यानंतर रुम अलॉट करण्याच्या मागण्या येऊ लागल्या. परंतु कामे अपूर्ण असल्यामुळे रुम अलॉट करता येत नाहीत. या वास्तूच्या उद्घाटनाची तारीख ठरल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने विकासक श्री.चमनकर यांच्याकडून नवीन महाराष्ट्र सदन हस्तांतरित करुन घेतले. येथील वॉटर सप्लाय, ड्रेनेज सिस्टिम, आर.ओ.सिस्टिम, वीज, इत्यादी व्यवस्था समजून घेण्याची आवश्यकता आहे.

नवीन महाराष्ट्र सदनातील समितीच्या व्यवस्थेमध्ये काही त्रुटी आढळून आल्या कारण अत्यंत अल्प काळामध्ये महाराष्ट्र सदनातील आयुक्त कार्यालयास सर्व नियोजन करावे लागले. दरम्यानच्या काळात उत्तराखंडातील आपत्तीमध्ये सापडलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांसाठी एक रिलिफ कॅम्प दिल्लीमध्ये आणि एक रिलिफ कॅम्प उत्तराखंडमध्ये सुरु केलेला आहे. तेथीलही व्यवस्था त्यांनाच पहावी लागते. त्यामुळे महाराष्ट्र सदनातील व्यवस्थेमध्ये काही त्रुटी आढळून आल्या आहेत.

नवीन महाराष्ट्र सदनाच्या व्यवस्थापनाचे काम अतिशय महत्वाचे आहे. वास्तूचे बांधकाम पूर्ण करुन ते आमच्याकडे हस्तांतरित केल्यानंतर त्याचे व्यवस्थापन आम्ही करतो. परंतु नवीन महाराष्ट्र सदन येथील व्यवस्थापनाचे काम वेगळया पध्दतीने सुरु झालेले आहे. नवीन महाराष्ट्र सदनाचे बांधकाम अपूर्ण असताना ते आम्हाला हस्तांतरित करुन घ्यावे लागले. टेलिफान, अे.सी. या व्यवस्थेमध्ये त्रुटी राहिलेल्या आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रोजेक्ट मॅनेजमेण्ट कन्सल्टण्ट यांच्याशी चर्चा करुन त्रुटी पूर्ण करण्याच्या बाबतीत आम्ही पाठपुरावा करीत आहोत. यासाठी प्रामुख्याने या ठिकाणी जी व्यवस्था करण्यात आलेली आहे त्याची पार्श्वभूमी सांगण्यात आली. या ठिकाणी स्टेट गेस्ट हाऊस म्हणून १९६३ मध्ये महाराष्ट्र सदन सुरु केले. फार लहान स्वरुपात ती सुरुवात झाली. सुरुवातीपासून आपल्या राज्याच्या नेते वर्गाचे असे स्वप्न होते की, दिल्लीमध्ये मोठे सदन निर्माण करावे. सिरमूर प्लॉट १९९९ साली आपल्या ताब्यात आल्यानंतर त्या प्लॉटवर चांगली वास्तू उभारण्याची संकल्पना मांडण्यात आली. या ठिकाणी कमीतकमी फोर स्टार सुविधा असल्या पाहिजेत या दृष्टीने योजना करण्यात आली. फोर स्टार सुविधांमध्ये एक तर या ठिकाणी मेकॅनाईज्ड लॉंड्री असली पाहिजे. मेकॅनाईज्ड इलेक्ट्रॉनिक सर्व्हेलन्स असले पाहिजे. सेंट्रलाईज्ड ए.सी.सिस्टिम असली पाहिजे. इंटरनेटची सुविधा असली पाहिजे. टेलिफोनची सुविधा असली पाहिजे. पीपीपी

मॉडेलव्दारे हा प्रकल्प करण्यात आल्यामुळे जे वापर करणारे आहेत त्यांचे म्हणजे निवासी आयुक्तांचे या प्रकल्पावर कोणतेही संनियंत्रण राहिले नाही. परिणामी सार्वजनिक बांधकाम विभागाने जी व्यवस्था तयार करुन दिलेली आहे ती निवासी आयुक्तांना स्वीकारावी लागत आहे.

नविन महाराष्ट्र सदनामध्ये ज्या उणिवा राहिल्या आहेत त्यासंबंधी विकासकाला कल्पना दिलेली आहे काय ? प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट, आय.टी. तज्ज्ञ यांचा सल्ला घेतला होता काय अशी विचारणा समितीने केली असता निवासी आयुक्त, यांनी सांगितले की, ज्या ज्या कमतरता राहिलेल्या आहेत त्याची यादी श्री. चमनकर यांना देऊन त्यावर त्यांची सही घेतलेली आहे. या कमतरता विकासकाने पूर्ण करुन देण्याचे कबूल केलेले आहे.

म्हणजेच नविन महाराष्ट्र सदनमध्ये अद्यापही कमतरता, उणिवा आहेत. असे असताना देशाच्या सर्वोच्च पदी असलेल्या व जे तिन्ही संरक्षण दलाचे प्रमुख आहेत अशा महामहिम राष्ट्रपतींच्या हस्ते अपूर्णावस्थेत असलेल्या वास्तूचे उद्घाटन करणे ही बाब त्यांच्या प्रतिष्ठेचा अवमान करणारी आहे. कोणत्याही वास्तूचे उद्घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते करावयाचे असेल तर त्याआधी ती वास्तू परिपूर्ण झालेली आहे की नाही, सर्व कागदपत्रांची पूर्तता झालेली आहे की नाही इत्यादी बाबी तपासल्या नंतरच उद्घाटनाची तारीख निश्चित केली जाते. कमतरता असलेल्या वास्तूचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते केले जात नाही. कारण एक प्रकारे तो त्यांचा अवमान ठरतो. याबाबतीत संबंधितावर कारवाई होणे आवश्यक आहे. The FIR should be registered against the said officials and contractors अशी सूचना समितीने केली.

समितीने परिच्छेद क्र. ३.३.३ "शासनास नुकसान आणि विकासकास गैरवाजवी फायदा" यासंदर्भात महालेखाकारांनी घेतलेले आक्षेप समितीला सादर करावयास सांगितले असता महालेखाकार यांनी समितीस सांगितले की, समितीच्या दिनांक १९ जून, २०१३ रोजीच्या बैठकीत महालेखाकारांनी असे मत नोंदविले होते की, Our first Audit objection is regarding "Allotment of land without tendering". The Public Works Department contention that tendering for commercial exploitation of the land would not fetch competitive rates as the land was infested by slums was not convincing as the same was not backed by evidence by way of response to tenders."

The Second Audit objection is about "Consideration of old ready reckoner rates". ॲग्रिमेंटमध्ये २००६ चे रेटस् कंसिडर केलेले आहेत. परंतु २००५ च्या पध्दतीने हे रेट गृहीत धरण्यात आलेले आहेत. ते दर नगर रचना विभागाकडून कन्फर्म करुन घेतलेले आहेत असे विभागाने उत्तर दिलेले आहे. या प्रकरणी असे आढळून आलेले आहे की, विभागाने "कमर्शियल युज"चे दर लावण्या ऐवजी "ऑफिस युज" चे दर लावलेले आहे. कमर्शियल युजचे रेडिरेकनरचे दर प्रति चौ.मी. रु. ६८०००/- आणि "ऑफिस युज"चे दर प्रति चौ.मी.रु.४७५००/- या प्रमाणे आहेत.

The Third Audit objection is about "Non-increasing the saleable Built-up Area by 25%". The Government has considered Built up Area proposed to be handed over to developer for financial calculations. It will not be appropriate to increase the built up area as pointed out by audit.

"ऑफीस युज"चा दर वेगळा आणि "कमर्शियल युज"चा दर वेगळा आहे. दोन्ही दरामध्ये रु. २२५०० चा फरक आहे व करारनामा २००६मध्ये झाला आणि रेडीरेकनरचे दर २००५मधील आहेत ही बाब समितीने निदर्शनास आणूली दिली असता महालेखाकार यांनी समितीस सांगितले की, जी गोष्ट ॲग्रीमेण्टच्या आधी व्हायला पाहिजे होती ती ४ वर्षानंतर झाली. विकासकाला ३५ टक्के सेलेबर एरिया मिळणार होता, तो २५ टक्के वाढवून दाखविणे आवश्यक होते.

२५ टक्क्याच्या मुद्याबाबत समितीला समजाऊन सांगताना महालेखाकारांनी असे सांगितले की, २५ टक्के वाढीव दिसायला पाहिजे ते दिसत नाहीत. They have added 25% loading on built- up area and carried out calculation on that basis. Pertinently this methodology was also adopted in other cases during that period, for e.g. at Development of Chember Beggar's Home, Development of Government property at Marzban and Andheri by private participation, Development of land at Kurla (W) CTS No. 125 survey No 5B. दुसरे असे की, दोन प्लॉट मर्ज करताना शासकीय जमीन असा उल्लेख नाही. म्हाडा-म्युनिसिपल कार्पोरेशन लॅण्ड असा उल्लेख आहे. डीसीआर रुल्समध्ये दोन प्लॉट मर्ज करण्याची तरतूद नसताना प्लॉट मर्ज केलेले आहेत. तसेच टेनामेण्ट बनविण्याच्या बाबतीत एसआरएमध्ये ॲडीशनल एफएसआय देण्याची तरतूद आहे. तसेच नविन महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथील कामाच्या क्वॉलिटी बाबतचा उल्लेख परिच्छेदामध्ये आलेला नाही. त्याबाबतचे

ऑडिट अलीकडेच झालेले आहे. त्यासंदर्भात विभागाकडून अभिप्राय घेण्याचे काम चालू आहे. हा इण्टरनल प्रोससचा भाग आहे. प्रोसेस पूर्ण झाल्यानंतर ऑडिट रिझल्टस समिती समोर सादर करण्यात येतील.

या ठिकाणी काम पूर्ण होईपर्यंत निवासी आयुक्त, यांचा सहभाग नाही असे निवासी आयुक्तांनी सदर बैठकीत सांगितले. त्याबाबत समितीने विचारणा केली जर तुमचा समन्वय नाही तर आपण कोणत्या आधारावर फोर स्टार सुविधा देणार आहे अशी समितीने विचारणा केली असता, याबाबत खुलासा करताना निवासी आयुक्त यांनी सांगितले की, तशा सुविधा देण्याची कल्पना होती. आज काही कामे अपूर्ण आहेत. माननीय राष्ट्रपती महोदयांच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाच्या अगोदर सीआयडी मार्फत इलेक्ट्रॉनिक सर्व्हेलन्सची पाहणी करण्यात आली. आय.टी. खात्यामार्फत इंटरनेट तसेच वायफाय सिस्टिमचे इन्स्पेक्शन करण्यात आले. डीआयटीने जे प्राईसवॉटरहाऊस कूपर कन्सल्टन्ट नेमलेले आहेत त्यांचे प्रतिनिधी या ठिकाणी उपस्थित आहेत. या ठिकाणी काय काय उणिवा आहेत ते मी सांगू इच्छितो. या ठिकाणी ए.सी.सिस्टिममध्ये अडचण जाणवते. काही रुम्स चांगल्या थंड होतात तर काही रुम्स थंड होत नाहीत. ए.सी.सिस्टिममध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करीत आहोत. या ठिकाणी मेकॅनाईज्ड लॉंड्री कार्यान्वित झालेली नाही. उद्घाटनाच्या अगोदर २२ मे, २००५ रोजी अपर मुख्य सचिव श्री. अजित जैन यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली होती त्यावेळी विकासकाने मेकॅनाईज्ड लॉंड्री स्थापन करण्याचे आश्वासन दिले होते परंतु त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. गेस्टसाठी क्रॉकरीज म्हणजे प्लेट, ग्लासेस इत्यादी देण्याचे मान्य केले होते त्याप्रमाणे झालेले नाही. इलेक्ट्रॉनिक सर्व्हायलन्स सिस्टिममध्ये कॅमेरांचा सेट-अप अपूर्ण आहे. ३ ॲडिशनल कॅमेरे इन्स्ट्रॉल करावयाचे आहेत. हार्डवेअर अँड सर्व्हर सिस्टिम अपग्रेड करावयाची आहे. इंटरनेट व वाय-फाय वापरासाठी लॅन सेटअप झालेले नाही. इपीबीएक्स अँड टेलिफोन सिस्टिम सुरु व्हावयाची आहे. बिल्डींग मेन्टेनन्स सॉफ्टवेअर सिस्टिम सेटअप झालेली नाही. बऱ्याच ठिकाणी फ्लोरींग खराब झालेले आहे, बांधकाम चालू असताना काही ठिकाणी फ्लोअरींग डॅमेजेस झालेले आहेत ते दुरुस्त करावयाचे आहे. गरम पाण्यासाठी बॉयलर ॲक्टिव्हेट झालेला नाही. आम्ही कनेक्शन दिलेले आहे. या ठिकाणी शॉपिंग आर्केड स्थापन करण्याची कल्पना होती. ते तयार झालेले नाही. माननीय खासदारांसाठी लाऊंज केलेले आहे त्याचे फर्निशिंग झालेले नाही. एमपी कोऑर्डिनेशन सेल स्थापन करावयाचा आहे.

ते काम झालेले नाही. सर्व्हर आणि कॉम्प्युटरसह बिझनेस सेंटर सेटअप करावयाचे आहे, ते झालेले नाही. रुम आहे, जागा आहे पण हार्डवेअर लागलेले नाही. कॉम्प्युटर सिस्टिम विथ गेस्ट हाऊस सॉफ्टवेअर मिळालेले नाही. सर्व रुम्समध्ये रेफ्रिजरेटर दिलेले नाहीत. आता फक्त सन्माननीय सदस्यांसाठी काही फ्रीज दिलेले आहेत. १ जून पर्यंत सर्व रुम्ससाठी फ्रीज देण्याचे २२ मे, २००५ तारखेच्या बैठकीमध्ये मान्य करण्यात आले होते. सदर बैठक अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २२.०५.२०१३ रोजी झाली असून बैठकीचे इतिवृत्त **(विवरणपत्र क्र.----)** दर्शविण्यात आले आहे. सदर बैठकीमध्ये अपूर्ण कामाचा सविस्तर तपशिल, काम करणारी एजन्सी व कालमर्यादा सर्व संमतीने ठरविण्यात आली होती.

मूळ करारनामा प्रमाणे काम कधीपर्यंत पूर्ण करावयाचे होते अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, जे फायनान्शिअल मॉडेल बनविले होते त्यामध्ये २ वर्षाचा कालावधी दिलेला होता. १०० कोटी रुपयांचे बांधकाम त्यांनी करावयाचे होते.

सन २००६ मध्ये करार झाला त्यानुसार सन २००८ मध्ये काम पूर्ण करुन द्यावयास पाहिजे होते परंतु सदरहू काम पूर्ण झालेले नसल्यामुळे सदर करारनाम्याला मुदतवाढ दिली आहे काय याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, हे काम एक्स्टेंशनमध्येच आहे.

विकासकाने जर करार पाळला नाही तर तो करार रद्द करण्याचा अधिकार विभागाकडे आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले असता सदरहू करार रद्द करुन आपण नवीन निविदा मागवावयास पाहिजे होते. तशा पध्दतीची काही कारवाई विभागाकडून करण्यात आली का याबाबत विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही.

नविन महाराष्ट्र सदनासंबंधात निवासी आयुक्तांनी समितीस असे सांगितले की, मागच्या भागात २० गुंठे जागेवर अतिक्रमण आहे. त्या संदर्भात कोर्टात केस चालू आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग त्याबाबत पाठपुरावा करीत आहेत. ती जागा मोकळी करुन मिळाली तर पार्किन्गसाठी जास्त जागा उपलब्ध होईल. सध्या या ठिकाणी ४० गाड्यांच्या पार्किन्गची व्यवस्था आहे. या ठिकाणी इंजिनिअर युनिट मजबूत करण्याची आवश्यकता आहे. सध्या एक सेक्शन इंजिनिअर बांधकाम आणि एक असिस्टंट इंजिनिअर इलेक्ट्रीक असे दोनच कर्मचारी आहे आणि ते कमी पडणार आहेत.

महाराष्ट्र सदनामध्ये इंजिनिअर कर्मचारी कमी आहेत असे निवासी आयुक्तांनी समितीस सांगितले त्याबाबत महाराष्ट्र सदनामध्ये कशा पध्दतीचा कर्मचारी वृंद पाहिजे याची माहिती समितीस देण्यात यावी असे निदेश समितीने दिले असता निवासी आयुक्त, कार्यालयाकडून दिल्ली येथे कार्यरत महाराष्ट्र शासनाच्या अधिकाऱ्यांची यादी व निवासी आयुक्त, कार्यालयातील आस्थापनातील रिक्त पदांची सद्यःस्थिती **(विवरणपत्र क्र.---)** दर्शविण्यात आली आहे.

आतापर्यंत महाराष्ट्र सदनावर दीड कोटी रुपये खर्च केलेला आहे असे निवासी आयुक्त, यांनी समितीस सांगितले. परंतु इमारत आपल्या ताब्यात नसताना हा खर्च कसा केला अशी विचारणा समितीने केली असता निवासी आयुक्त, यांनी सांगितले की, त्यांच्याकडून (सार्वजनिक बांधकाम विभागाकडून) मिळालेल्या कमिटमेंटच्या आधारावर निवासी आयुक्त, कार्यालयाने हा खर्च केलेला आहे. उद्घाटन झाल्यापासून काही कामे निवासी आयुक्त, कार्यालयाला करावी लागली. काहीही करावयाचे नसले तरी दरमहा ३० लाख रुपये खर्च निवासी आयुक्त, कार्यालयाला करावा लागणार आहे. हा खर्च सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहकार्याने करण्यात येतो. सदरहू इमारत दिनांक १ जून, २०१३ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाने ताब्यात घेतलेली आहे.

कोणतीही इमारत किंवा कोणतेही काम पूर्ण झाल्याशिवाय ताब्यात घेत नाही. इमारत अपूर्ण असताना ताब्यात घेतली आणि इमारत ताब्यात घेतल्याचे प्रत्र राष्ट्रपती भवनकडे पाठविले. २० ते ३० टक्के काम अपूर्ण असताना सार्वजनिक बांधकाम विभागाने इमारत ताब्यात कशी दिली आणि विकासकाने सुध्दा काम अपूर्ण असताना सदरहू इमारत ताब्यात कशी दिली ? त्यांना दंड करावयास पाहिजे होता ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली व समितीने विचारणा केली की, या ठिकाणी शासनाकडून भव्यदिव्य काम होणार होते ही चांगली गोष्ट आहे पण तसे या ठिकाणी आय.टी.इन्फ्रास्ट्रक्चर वगैरे पाहिजे. जेव्हा नवी दिल्ली येथील नवीन महाराष्ट्र सदनाचे मूळ एस्टिमेट केले त्यामध्ये आय.टी.इन्फ्रास्ट्रक्चरची बाब धरली होती काय याबाबत खुलासा करताना अधिक्षक अभियंता मुंबई मंडळ यांनी सांगितले की, या ठिकाणी आय.टी.साठी लागणारे इन्फ्रास्ट्रक्चर आपण तयार केलेले आहे. विकासकाने इन्फ्रास्ट्रक्चर बसवावयाचे होते. त्यामध्ये हार्डवेअरची प्रोव्हीजन नव्हती. आय.टी.ऑफीसर बरोबर बैठक झाली तेव्हा विकासकाने हार्डवेअर देतो असे सांगितले. हार्डवेअर, सॉफ्टवेअरची त्यांची

जबाबदारी नव्हती तसेच लॅन कनेक्शन, वायफाय कनेक्शन हे सर्व आहे. त्यामध्ये हार्डवेअर होते. परंतु वायरिंगमध्ये अडचण आहे ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता ही जबाबदारी विकासकाची आहे असे सांगण्यात आले.

आयटीसाठी लागणारे इन्फ्रास्ट्रक्चर हे सर्व प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टन्टने बघावयास पाहिजे. शासनाकडून त्यांना पैसे दिलेले आहेत. या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम खात्याचे इंजिनिअर्स आहेत तसेच प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टन्ट नेमलेले आहेत. त्यांनी इन्स्पेक्शन करुन सर्व गोष्टी व्यवस्थितपणे झालेल्या आहेत की नाही हे बघावयास पाहिजे होते असे मत समितीने व्यक्त केले.

रुममध्ये ज्या सुविधा लागतात त्याचे दोन भाग आहेत. एक म्हणजे आय.टी.सुविधा म्हणजे संगणक, वायफाय सिस्टिम वगैरे ज्या सुविधा लागतात त्याचे इन्फ्रास्ट्रक्चर उभे करणे. इन्फ्रास्ट्रक्चर उभे केल्यानंतर आता सर्व हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर बसवावयाचे आहे. ते बसविले आहे की नाही आणि ते बसवावयाचे असेल तर त्याची जबाबदारी कोणावर आहे अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, हार्डवेअर विकासकाने बसवून द्यावयाचे होते. डाटा केबल वगैरे व्यवस्था केली आहे परंतु अजून कनेक्शन मोबिलाईज झालेले नाही परंतु अधिक्षक अभियंता मुंबई मंडळ यांनी समितीस माहिती दिली होती की, त्यांनी वायरींग करुन द्यावयाचे होते. हार्डवेअर आणि सॉफ्टवेअरची त्यांची जबाबदारी नव्हती यावर या प्रकल्पाचे आयटी कन्सलटंट माहिती व तंत्रज्ञान विभाग यांनी समितीस सांगितले की, On 28th of May Hon'ble Secretary, Information Technology Department, Government of Maharashtra have done a detail inspection of New Maharashtra Sadan. We have a list of items which were found missing in New Maharashtra Sadan. In next meeting of 13th June, 2013 with Hon'ble Chief Secretary, Government of Maharashtra, we have submitted a list of items which were found missing in New Maharashtra Sadan. I have got the copy of report and list of missing items with me, I will give it to the Hon'ble Committee. There are wires at the points but no presence of PoE and Core switches. How do we connect the PCs without these switches? There are no Routers. There are no computers in Business Centre. There are no racks in Server Room to install the Servers. Apart from these hardware items, there are some Software Applications like Guest House Management Application is not available in New

Maharashtra Sadan. There is a list of 20 items which were found missing in Maharashtra Sadan.

विकासकाने २० बाबी पूर्ण केलेल्या नाहीत. या बाबी अपूर्ण असताना इमारत ताब्यात घेतलेली आहे. याबाबतीत विभागाकडून काय कारवाई करण्यात येणार आहे व आय.टी.च्या संदर्भात काय काय करावयाचे ठरविले होते आणि ते कोणी करावयाचे होते, ठरल्याप्रमाणे ते काम झाले की नाही, झाले नसेल तर केव्हा पूर्ण होणार ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, अपूर्ण बाबी त्यांच्याकडून पूर्ण करुन घेण्यात येतील. व ज्या २० बाबी सांगण्यात आल्या त्याबाबत या प्रकल्पाचे प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टन्ट यांनी समितीस सांगितले की, दिनांक २८ जून, २०१३ रोजी तारखेला सचिवांबरोबर बैठक झाली त्यामध्ये ठरल्याप्रमाणे कोटेशन मागवून काम करावयाचे होते आणि यासाठी १५-२० दिवसांचा अवधी मागितला आहे. हे सर्व काम आयटीने करावयाचे होते पूर्ण केबल टाकलेल्या आहेत. ऑप्टीकल फायबर टाकलेली आहे. सर्व काम झाल्यानंतर इक्विपमेंट्स लागणार कारण ते नाजूक असतात. अपूर्ण कामाबाबत २८ मे, २०१३ रोजी बैठक झाली होती व सदर बैठकीत अपूर्ण कामे १५-२० दिवसात पूर्ण करणार असे सांगण्यात आले. परंतु समितीच्या आजच्या म्हणजेचे दिनांक ३ जुलै, २०१३ रोजीच्या बैठकीपर्यंत कामे पूर्ण झालेली नाहीत. असे समितीने निदर्शनास आणून दिले असता तीन कोटेशन्स काढलेली आहेत त्यामधील एक फायनल करावयाचे आहे असे सांगण्यात आले.

कोटेशन्सचा संबंध विकासकाशी आहे. शासनातर्फे प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटंट म्हणून नेमण्यात आलेले आहे. काम वेळेत पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटंटची आहे त्यामुळे हे काम विकासकाचे आहे की प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटंटचे आहे अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, काम प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटंटचे आणि विकासकाचेही आहे.

प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटंटची फी टोटल कॉन्ट्रक्ट कॉस्टच्या १ टक्का आहे असे समितीस सांगण्यात आले. What is the contract cost? Whether you get your fees on escalated cost or basic cost of contract? अशी विचारणा समितीने केली असता प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटंट यांनी समितीस सांगितले की, It is near about Rs. 54 Crore. We will get our fees on basic cost of contract

पीएमसीला शासनाचा फायदा करुन देण्यासाठी नेमलेले आहे की नुकसान करण्यासाठी नेमलेले आहे ? या पीएमसीचे कॉण्ट्रॅक्ट रद्द करुन त्यांना दंड ठोठावला पाहिजे. कोणालाही दंड न करण्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे धोरण आहे असे समितीने नमूद केले असता आय.टी.चे काम पूर्ण आहे ते मी एक्स्पिडाईट करुन घेण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

कोटेशनबाबतची सद्य:स्थिती काय आहे. कारण कामाची गती संथ आहे. तसेच या वास्तूचे उद्घाटन माननीय राष्ट्रपतींच्या हस्ते झालेले आहे. उद्घाटनापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाने सर्व प्रमाणपत्रांची पूर्तता केलेली होती काय ? सार्वजनिक बांधकाम विभागाने या वास्तूचा कम्प्लायन्स घेतलेला आहे काय अशी विचारणा समितीने केली असता नवीन महाराष्ट्र सदनाचा ताबा १ जूनला घेतलेला आहे व ऑक्युपन्सी सर्टिफिकेट दिल्ली कार्पोरेशनकडून प्राप्त झालेले आहे. असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

नविन महाराष्ट्र सदन येथे गरम पाण्याची व्यवस्था नाही, अे.सी.यंत्रणा चालू नाही, दूरध्वनी चालू नाही. अनेक ठिकाणी खिडक्यांची कामे अपूर्ण आहेत. मागील बाजूस बांधकाम अपूर्ण आहे. अशा अपूर्ण असलेल्या इमारतीचे उद्घाटन माननीय राष्ट्रपतींच्या हस्ते कसे करण्यात आले ? या इमारतीतील कामे पूर्ण झालेली नाहीत या बाबींसंदर्भात निवासी आयुक्त यांनी अहवाल सादर केला आहे असे समितीच्या बैठकीत सांगण्यात आले.

महाराष्ट्र सदनाचे काम काम निकृष्ट दर्जाचे आहे. त्यामध्ये अनेक त्रुटी आढळून आलेल्या आहे. आर्किटेक्ट कुणाला नेमलेले आहे व त्यांची फी किती आहे अशी विचारणा समितीने केली असता श्री. पत्की हे आर्किटेक्ट आहेत व सीव्हील वर्कसाठी ४ टक्के आणि इण्टेरियरसाठी ८ टक्के फी आहे. we have appointed Spectral E-com for this purpose. तसेच कामाच्या कॉलीटीची तपासणी अद्यापपर्यंत केलेली नाही.

आर्किटेक्ट सिव्हिल वर्कची ४ टक्के आणि इंण्टेरियरची ८ टक्के फी घेतात. साईट इन्स्पेक्शन कामे बरोबर केली जातात की नाही हे पहाण्यासाठी त्यांचा एक माणूस असतो. असे असताना कामाचे इन्स्पेक्शन करुन त्यांनी रिपोर्ट दिलेला नाही का अशी विचारणा समितीने केली असता अधिक्षक अभियंता, मुंबई मंडळ यांनी सांगितले की, त्यांच्या व्हिजिटस् झालेल्या असून आब्झर्व्हेशन रेकॉर्ड झालेले आहे.

कामाच्या दर्जाची तपासणी न होताच इमारतीचे हस्तांतरण कसे करण्यात आले ?असा प्रश्न समितीने पुन्हा उपस्थित केला असता विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही.

सदर प्रकल्पाच्या आर्किटेक्ट च्या प्रतिनीधीनी व्हिजिट केल्या, परंतू कामाचा दर्जा तपासला आहे काय ? अधीक्षक अभियंता हे तर आर्किटेक्टची बाजू घेऊन "त्यांनी व्हिजिटस् केलेल्या आहेत" असे सांगत आहेत. त्यांनी शासनाची बाजू घेऊन बोलावयास पाहिजे. कामे चांगल्या दर्जाची आणि वेळेत न झाल्याबद्दल अधीक्षक अभियत्यांनी आर्किटेक्टच्या प्रतिनिधींना जाब विचारवयास पाहिजे होता.एखाद्या एजन्सीला काम दिल्यानंतर त्या एजन्सीने केलेल्या कामाचा दर्जा चांगला आहे की नाही हे तपासण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने सर्व कामे पूर्ण झालेली आहेत की नाहीत याची खात्री करुन मग इमारत ताब्यात घ्यावयास पाहिजे होती. या इमारतीमध्ये टेलिफोन, आय.टी.ची कामे अपूर्ण आहेत. कामे पूर्ण करण्याच्या बाबतीत कालबद्ध कार्यक्रम नाही, कॉण्ट्रॅक्टरने कामे वेळेत पूर्ण केली नाहीत म्हणून त्याला दंड केला जात नाही, त्याला काळया यादीत टाकले जात नाही.अशी सुचना समितीने केली व विचारणा केली की, प्रोजेक्ट मॅनेजमेण्ट कन्सल्टण्टची नेमणूक करुन देखील कामे वेळेवर होत नाहीत. ही कामाची कोणती पध्दत आहे ? या कामावर कोण देखरेख करीत होते ?यावर हे काम सुरु असताना दर दोन महिन्यानी येथे ८-८ दिवस थांबून पीएमसीच्या प्रतिनिधी बरोबर सुपरव्हिजन करित असत्याचे कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी समितीस सांगितले परंतु महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथील काम चालू असताना सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रतिनिधी कायम स्वरुपी तेथे नव्हते. त्यामुळे या कामाकडे अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे. अशा परिस्थितीमध्ये कामाचा दर्जा कसा चांगला राहील ?

हा एवढा मोठा प्रकल्प असताना मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता या स्तरावरील अधिकारी या ठिकाणी मुक्कामाला राहिले असते तर या सर्व कामावर नियंत्रण राहिले असते. शासनाच्या या महत्वाकांक्षी प्रकल्पामध्ये योग्य दर्जाचे काम न होणे, कामासाठी कालमर्यादा न घालणे हे हास्यास्पद आहे. खाजगी कंत्राटदाराच्या कामाच्या ठिकाणी ते जागेवर कॅम्प लावून रात्रंदिवस उभे राहतात आणि दर्जेदार काम करुन घेतात असे मत समितीने नोंदविले.

अपर मुख्य सचिव आणि निवासी आयुक्त यांच्या बरोबर २२ मे, २०१३ रोजी बैठक झाली त्यावेळी विकासकाकडून नवीन महाराष्ट्र सदनाच्या उदघाटनाच्या अगोदर या ठिकाणी

जी जी कामे अपूर्ण राहिलेली आहेत ती पूर्ण करुन घेण्याची कमिटमेंट घेतली होती असे विभागाकडून समितीस सागण्यात आले.

मुळात हे काम २००८ मध्ये पूर्ण व्हावयास पाहिजे होते. हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी २ वर्षाचा कालावधी होता. त्यांना एक्स्टेंशन दिले आहे का अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, अजूनही ॲग्रिमेंट लाईव्ह आहे त्यामुळे सु-मोटो एक्स्टेंशन झालेले आहे.

हा प्रकल्प २ वर्षात पूर्ण करावयाचा होता. सन २००८ मध्ये काम पूर्ण व्हावयास पाहिजे होते. आता सन २०१३ साल सुरु आहे. ७-८ वर्षे एक्स्टेंशन न देताच काम सुरु आहे का अशी विचारणा समितीने केली असता अधिक्षक अभियंता मुंबई मंडळ, यांनी समितीस सांगितले की, वेळोवेळी बार-चार्ट ॲप्रूव्ह केलेला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर बैठक झाली होती त्यावेळी सुध्दा बार-चार्ट मंजूर केलेला आहे आणि विकासकाला एक्सटेंशन दिल्याचे पत्र हे तपासून समितीस सांगण्यात येईल तसेच जर त्यांना एक्स्टेंशन दिल्याचे पत्र दिले आहे की नाही हे मी तपासून घेतो. जर तसे पत्र दिले नसेल तर त्यांना एक्स्टेंशन देणे भाग आहे व ज्या जागेच्या मोबदल्यात त्यांनी हा प्रकल्प पूर्ण करुन द्यावयाचा आहे त्यातील कोणतीही जागा त्यांना रिलीज केलेली नाही. एसआरएमध्ये २२५ चौरस फुटाची घरे द्यावयाची होती. त्यानंतर हायकोर्टाच्या आदेशाप्रमाणे तो एरिया २६९ चौरस फूट झाला. याबाबतचे आदेश अजून त्यांच्या हातामध्ये यावयाचे आहेत असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. तसेच ही बाब विकासक व झोपडपट्टीधारक यांची अंतर्गत असून विकासक स्वत:चे पैसे लावून काम करीत आहेत.

विभागाने बार-चार्टला मंजुरी दिली हा अंतर्गत भाग आहे. दोन वर्षे झाल्यानंतर विकासकाने एक्स्टेंशन द्यावे असे पत्र देऊन विनंती केली होती का आणि त्याला विभागाच्या सचिवांनी मंजुरी दिली आहे का असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता वेळोवेळी बार-चार्ट मंजूर केलेले आहे. याबाबत त्यांना पत्राव्दारे कम्युनिकेट केलेले नाही परंतु त्यांना तसे पत्र द्यावे लागेल असे समितीस सांगण्यात आले.

यावरुन समितीच्या असे निदर्शनास येते की, तांत्रिकदृष्ट्या विकासक सुटलेला आहे. रेकॉर्डवर त्यांनी असे नमूद केलेले आहे की, त्यांना मुदतवाढ दिलेली आहे. तशा प्रकारचा कागद त्यांच्याकडे असेल. त्यांना दंड करण्याचा विषय आला तर यांना बोलण्यास जागा नाही.

त्यांच्यावर काहीही बंधनकारक ठेवलेले नाही. सन २००८ मध्ये त्यांना जागा द्यावयाची होती. त्या जागेचा भाव सुध्दा आता वाढलेला आहे. या प्रकल्पाच्या मोबदल्यात त्यांना जो फायदा होणार आहे तो अनेक पटींनी वाढणार आहे विभागाकडून शासनाची बाजू मांडण्यापेक्षा विकासकाची बाजू मांडत आहात. You have to represent the Government मुदतवाढ न देता सदरहू प्रकल्पाचे कामकाज चालु आहे ही बाब अतिशय चुकीची आहे. यामध्ये शासनाचे कोट्यावधी रुपयाचे नुकसान झालेले आहे. शासनाने जे आर्किटेक्ट आणि कंसल्टन्ट नेमलेले आहेत त्यांनी शासनाची बाजू घेण्याऐवजी ते कंत्राटदाराची बाजू घेऊन आपल्याशी बोलत आहेत. जे कंसल्टन्ट आणि आर्किटेक्ट नेमलेले आहेत, ज्यांनी आपली जबाबदारी पूर्ण केलेली नाही त्यांच्यावर कारवाई करुन समितीला त्याचा अहवाल सादर केला पाहिजे. सदर अहवाल अद्याप समितीला प्राप्त नाही.

सदरहू प्रकल्पाबाबत आपण वित्त विभागाचे मत घेतले होते का आणि वित्त विभागाने काय अभिप्राय दिले होते ? कारण कोणत्याही प्रकल्पाला वित्त व नियोजन खात्याची घेतल्यानंतरच पुढे कार्यवाही करण्यात येते याबाबत खुलासा करताना वित्त विभागाच्या प्रतिनिधींनी समितीस सांगितले की, जानेवारी, २००६ मध्ये वित्त विभागाकडे प्रस्ताव आला होता. त्याबाबत वित्त विभागाने जे मुद्दे उपस्थित केले होते त्यामध्ये पहिला मुद्दा असा होता की, "विभागाने नेहमीच्या कार्यपध्दती प्रमाणे मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीसमोर सादर करावयाचा हा प्रस्ताव एकसमयावच्छेदेकरुन इतर सर्व संबंधित विभागांना सादर केला आहे. त्यामुळे इतर विभागांचे अभिप्राय वित्त विभागाला कळू शकलेले नाहीत." म्हणजे त्यांनी प्रत्येक विभागाकडे वेगवेगळी फाईल पाठविली होती. परंतु जे प्रपोजल असते त्याची फाईल सार्वजनिक बांधकाम विभागाने तयार केल्यानंतर तीच फाईल वित्त व नियोजन विभागाकडे पाठविली जाते आणि एकाच फाईलवर सर्व विभागांचे अभिप्राय येतात. त्यानंतर त्याची कॅबिनेट नोट तयार केली जाते असे समितीने निदर्शनास आणून दिले असता या प्रकल्पाच्या बाबतीत प्रत्येक विभागाला स्वतंत्र फाईल सादर केलेली आहे असे वित्त विभागाच्या प्रतिनिधींनी समितीस सांगितले व यासंदर्भात विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, ज्यावेळी कॅबिनेट नोट केली जाते त्या आधी सर्व विभागांकडे वेगवेगळी फाईल पाठवून सर्व विभागांचे अभिप्राय एकत्र करुन कॅबिनेट नोट पाठविली जाते.

वित्त विभागाने पुढे काय अभिप्राय व्यक्त केला आहे याबाबत माहिती देताना वित्त विभागाच्या प्रतिनिधींनी सांगितले की, वित्त विभागाच्या अभिप्रायामध्ये असे म्हटले आहे की, "(२) या प्रस्तावामध्ये प्रामुख्याने प्रादेशिक परिवहन विभागाचा भूखंड विचाराधीन आहे व त्या विभागास करुन मिळणारे बांधकाम याचा प्रामुख्याने अंतर्भाव असल्याने त्या विभागाचे अभिप्राय जाणून घेणे आवश्यक ठरते. त्यामुळे त्या विभागाचे अभिप्राय जाणून घेतल्याशिवाय वित्त विभागाचे अभिप्राय देणे योग्य होणार नाही. (३) या दोन्ही भूखंडांवर एकत्रितपणे एसआरएकडून एसआरए अंतर्गत विकासकाचे काम चालू आहे. हे काम मंजूर करताना उर्वरित भूखंडाबाबत कोणता विचार करण्यात आला होता याचा उल्लेख येथे करण्यात आलेला नाही. (४) विभागाने सादर केलेल्या प्रस्तावामध्ये विकासक प्रामुख्याने प्रादेशिक परिवहन विभागाची कार्यालये व निवासस्थाने बांधून देणार आहे. असे असले तरी या बांधकामा व्यतिरिक्त नवी दिल्ली येथे अत्याधुनिक सुखसोयींनी सज्ज अशी महाराष्ट्र सदनाची इमारत (१५,८६५ चौरस मीटरचे मूल्य रु. ४५.०० कोटी प्रस्ताविले आहे) बांधून देण्याची तयारी विकासकाने दाखविली आहे. या संदर्भात नमूद करण्यात आले आहे की, सदर काम यापूर्वी खाजगीकरणांतर्गत मेसर्स नोबेल इंडिया कंस्ट्रक्शन, मुंबई या विकासकाकडे सोपविण्यात आले होते. परंतु विहित कालावधीत या भूखंडावरील निर्बंध शिथिल करुन घेण्यास तो विकासक अयशस्वी झाला आहे. त्यामुळे या पर्यायी विकासकास विभागाने विचारात घेतले आहे असे दिसून येते. तथापि, मूळ विकासकाबरोबर या संदर्भात काही करार झाला असत्यास त्या करारातील अटी या प्रस्तावासाठी बाधक ठरणार नाहीत का, याची स्पष्टता केलेली नाही. त्याचप्रमाणे जे निर्बंध शिथिल करण्यास मूळ विकासक अयशस्वी ठरला आहे ते निर्बंध नवीन विकासकास विहित कालावधीत शिथिल करणे शक्य होईल का, या बाबतही विभागाने खात्रीपूर्वक अभिप्राय देणे आवश्यक वाटते."

मेसर्स नोबेल इंडिया कंस्ट्रक्शन, मुंबई यांचे प्रपोजल किती रुपयाचे होते याबाबत माहिती देताना समितीस सांगण्यात आले की, इमारत बांधून द्यावी असे प्रस्तावित केले होते. त्यामध्ये याच भूखंडाचा काही भाग त्यांना देण्याचे प्रस्तावित होते. ६ एकरचा भूखंड आहे. जवळपास ६० टक्के जागा विकासकाला देणे आणि राहिलेल्या जागेवर हा पूर्ण एफएसआय वापरणे असा प्रस्ताव होता. त्यांनी चार महिन्याच्या आत परवानगी प्राप्त करुन घेणे आवश्यक होते. अन्यथा त्यांनी जे डिपॉझीट भरले होते ते जप्त केले जाईल अशी अट होती. त्यांना

परवानगी न मिळाल्यामुळे त्यांचे २५ लाख रुपये जप्त केले व त्यांना कॉर्पोरेशनकडून जी मंजुरी घ्यावयाची होती ती ते घेऊ शकले नसल्यामुळे त्यांना मुदतवाढ देण्यात आली नाही.

वित्त विभागाच्या अभिप्रायामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "(५) टिप्पणीचे अवलोकन केल्यास त्यामध्ये आर्थिक परिगणना सादर केलेली आहे. त्यानुसार विकासकास २६.४० टक्के इतका फायदा अपेक्षित आहे असे प्रस्ताविले आहे. हे प्रमाण फार जास्त आहे. त्यामुळे त्याबाबत योग्य विचार होणे आवश्यक आहे." म्हणजेच विकासकाने जे प्रपोजल दिले होते त्यामध्ये २६ टक्के फायदा दाखविला होता असे समितीने नमूद केले असता वित्त विभागाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, तो फायदा जास्त आहे त्यामुळे त्याबाबत विचार होणे आवश्यक आहे असे अभिप्रायात म्हटले आहे. पुढे असे म्हटले आहे की, "प्राप्त परिस्थितीत सदरहू प्रस्ताव परिपूर्ण स्वरुपात सादर झाला नसल्याने त्या विभागास त्यावर आपले अंतिम अभिप्राय देणे शक्य होणार नाही, असे कळविण्यात यावे." यानंतर असे नमूद केले आहे की, "We cannot get an isolated developer & allot works to him. There has to be competitive bid in a transparent manner to picking up such a developer. PWD is requested to take adequate precaution while sending such proposal in future."

नवीन महाराष्ट्र सदन, हायमाऊण्ट अतिथी गृह आणि आरटीओ कार्यालय या कामाची किंमत किती होती अशी विचारणा समितीने केली असता पायाभूत किंमत १०० कोटी रु. होती. निविदेमध्ये ५२ कोटी रु. तरतूद होती. हायमाऊण्टसाठी १२.५ कोटी रु. आणि आरटीओसाठी १५.०० कोटी रु. तरतूद होती. २००६च्या दरसूचीप्रमाणे ही तरतूद होती. आरटीओ मधील फर्निचरसाठी ६ कोटी रु. तरतूद होती. तिन्ही प्रोजेक्टची किंमत रु. १०० कोटीच्या आत राहील असे ठरले होते. ती रु. १०० कोटी पेक्षा जास्त होणार नाही याची काळजी घ्यावी असे मंत्री महोदयांनी सांगितलेले होते. आजच्या तारखेपर्यंत १२७ कोटी रु. खर्च झालेला आहे व यामध्ये आरटीओ क्वार्टर्सचा समावेश नाही.

या प्रकल्पाची फाईल जेव्हा मंत्री महोदयांपुढे गेली त्यावेळी एस्टिमेट कमी होते. त्यांनी एस्टिमेट वाढवून दिले आणि १०० कोटी रु.पर्यंत हे प्रकल्प करण्यास सांगितले. नवीन महाराष्ट्र सदनाचे काम १२७ कोटी रु.चे झालेले आहे. अद्याप आरटीओ क्वार्टर्सचे काम करावयाचे आहे. आरटीओ ऑफिस, टेस्ट ट्रॅक, लॅण्ड स्केपिंग, रेसिडेन्शियल क्वार्टर्स या

कामांची किंमत किती होईल अशी विचारणा समितीने केली असता सदरहू किंमत ४५ कोटी रु. होईल असे सांगण्यात आले.

जे प्रोजेक्ट १०० कोटी रु.पर्यंत करावयाचे होते त्यांची किंमत २०० कोटी रु.पर्यंत गेलेली आहे. यामध्ये विकासकाचा तोटा झालेला आहे कारण विकासकाला १०० कोटी रुपयांची मर्यादा घातली होती असे समितीस सांगण्यात आले म्हणजेच विकासकाला १०० कोटी रु.खर्च करण्याची मर्यादा घातल्यानंतर देखील तो जर २०० कोटी रु. खर्च करीत असेल तर त्याचा अर्थ त्याला दुसरीकडे भरमसाठ नफा होत असणार असे मत समितीने व्यक्त केले असता अधिक्षक अभियंता, मुंबई मंडळ यांनी सांगितले की, विकासकाकडून १०० कोटी रु.चे २,३६,७८० चौ.फुटाचे बांधकाम करुन घ्यावयाचे आहे. तसेच ३३(१४) अंतर्गत मिळणारे इन्सेण्टिव्हज् वेगळे आहेत.

शासनाचा भूखंड आणि झोपडपट्टीचा भूखंड एकत्रित केलेला आहे. ८ लाख चौ.फुटामध्ये जवळ जवळ ४० ते ६० टक्के लोडिंग जाईल. एकूण सेलेबल एरिया ८.४० लाख चौ.फू. आहे. जागेची किंमत १५ हजार रु. प्रति चौ. फू. आहे. रु. १५००० चौ.फू. प्रमाणे ८.४० लाख चौ.फुटाचे १२६० कोटी रु. होतात. विकासक जागा कमर्शियल युजच्या दराप्रमाणे विकणार आहे अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, ५ मजल्यापर्यन्त कमर्शियल युजचा विचार केलेला आहे. ५ मजल्याच्या वर ऑफिस युजचे दर आहेत.

एसआरए प्रोजेक्टमधून विकासकास मिळणारा एफएसआय, टीडीआर, आरटीओ इमारतीची कन्स्ट्रक्शन कॉस्ट, हायमाऊण्ट अतिथीगृहाची कन्स्ट्रक्शन कॉस्ट, नवीन महाराष्ट्र सदनाची कन्स्ट्रक्शन कॉस्ट आधी किती होती आणि आता किती झालेली आहे या सर्व गोष्टीचे गणित करुन विकासकास निव्वळ किती नफा झालेला आहे याची आकडेवारी व रेसिडेन्शियल दर, कमर्शियल दर, ऑफिस दर यामध्ये खूप वाढ झालेली आहे. विकासकाला मिळणा-या भूखंडावर इमारत बांधल्यानंतर त्यामधून त्याला किती फायदा होईल याची माहिती तसेच रेडी रेकनर बरोबरच सध्या जो मार्केट रेट आहे त्या अनुषंगाने सर्व हिशेब करुन त्याबाबतची माहिती महालेखाकार कार्यालयाने समितीस महिनाभरात द्यावी असे समितीने महालेखाकारांना सांगितले. त्यानुसार लोकलेखा समितीने महालेखाकार कार्यालय व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याशी पत्रव्यवहार केला परंतु समितीस अद्याप माहिती प्राप्त झाली नाही. सार्वजनिक

बांधकाम विभागाकडून सन २००६ व सन २०१३ चा रेडिरेकनरचा तत्का व प्रकल्पाच्या आर्थिक स्थितीबाबतचा तक्ता समितीस प्राप्त झालेला आहे. **(विवरणपत्र क्र. --)**

सद्य:स्थितीत १ लाख ७८ हजार चौ.फू. बांधकाम झालेले आहे. विकासकाने ६.१ लाख चौ.फुटाचे बांधकाम करावयाचे आहे. त्यामध्ये एसआरए योजना मर्ज आहे. १०० कोटी रु.च्या बांधकामाच्या बदल्यात त्याला २ लाख २० हजार चौ.फूट देण्यात येत आहेत अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली असता याबाबत समितीने विचारणा केली की,

सार्वजनिक बांधकाम विभागाने जी ६.१ लाख चौरस फूट जागा दिली ती विकासकाला मिळणार नाही. या ठिकाणी त्यांनी फक्त विकास करावयाचा आहे. या ठिकाणी त्यांनी बांधकाम करुन दिले. बाकी एसआरए असो किंवा इतर बांधकाम असो, त्या ठिकाणी दाखविताना असे दाखविले की, कॉस्ट वाढल्यामुळे तोटा सहन करीत आहोत. हा विलंब मुद्दाम तोटा झाला असे दाखविण्याकरिता झालेला आहे. या संदर्भात समितीने निष्कर्षाप्रत येण्यापूर्वी महालेखाकार यांनी या सर्व बाबतीतील जे आर्थिक गणित आहे त्याचा हिशेब करुन समितीला स्पेशल रिपोर्ट द्यावा. दाखविताना उशीर झाल्यामुळे तोटा झाला असे दाखविले जाते. यामध्ये तोटा नसून विकासकाचा फायदा झालेला आहे असे मत समितीने नोंदविले.

या प्रकरणामध्ये महालेखाकार कार्यालयाने सुरुवातीला रेडी रेकनरचा बेस घेतलेला आहे असे महालेखाकारांनी समितीस सांगितले.

यामध्ये शासनाने विकासकाला एकूण ४३,७६९ चौरस मीटर जागा देत आहोत असे महालेखाकारांनी हिशेबामध्ये धरलेले आहे. प्रत्यक्षात आपण त्यांना २२ हजार चौरस मीटर जागा देत आहोत. बाकीचे २१ हजार चौरस मीटर क्षेत्र त्यांना इन्सेन्टीव्ह म्हणून मिळणार आहे. ३३(१४) अंतर्गत ०.७५ एवढा इन्सेन्टीव्ह त्यांना मिळणार आहे. इन्सेन्टीव्हसह त्यांना ४३ हजार चौरस मीटर क्षेत्र मिळणार आहे. १०० कोटीच्या अगेंस्ट त्याला फक्त २२ हजार चौरस मीटर क्षेत्र दिलेले आहे. आपण आरटीओच्या जागेमध्ये त्यांना सेक्शन ३३(१४) लागू केल्यानंतर त्यांना एकूण २.५ एफएसआय लागू होता. २.५ एफएसआय पैकी १ एफएसआर ओनरला मिळणार. पीएपीसाठी ०.७५ एफएसआय द्यावयाचा आहे आणि ०.७५ एफएसआय विकासकाला इन्सेन्टीव्ह म्हणून देणार आहोत. After application of Section 33(14) on RTO land, the total permissible FSI is 2.5. Out of this 2.5 FSI, 0.75 FSI goes to the PAP, 1 FSI goes to the RTO building and Developer gets the incentive of 0.75 FSI. We have calculated rates

according to Office spaces. असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले असता समितीने असे मत व्यक्त केले की, त्यांना ५ मजल्यापर्यंत कमर्शियलसाठी देणार आहात मात्र त्यांना ऑफीस स्पेसचा रेट लावणार आहात. You are going to give incentive to the developer according to Office Spaces. The difference between the rates of commercial and office spaces is very big. You have to calculate the rates according to commercial spaces. I can understand the rates of office spaces and retail spaces are totally different. Even the Hon'ble A.G. also objected on this calculation.

एसआरए योजना ही नियम ३३ (१०) अंतर्गत चालू आहे. जी झोपडपट्टी आहे त्यामध्ये त्याचे ५ मजले होतात. त्यामुळे आपले क्षेत्र ५ मजल्याच्या वर जाते. ३३(१०), ३३(१४) यामध्ये त्यांचा मोठा फायदा होत असेल तर आपण याबाबत एसआरएला विचारावे. हा धोरणात्मक निर्णय आहे. हा निर्णय एका प्रकल्पापुरता लागू होणार नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जागा दिली हा वेगळा विषय आहे. एसएसआरएने प्रस्ताव मंजूर केलेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नंतर आलेले आहे असे विभागाकडून सांगण्यात आले असता विकासकाचा २०० कोटी रुपयांचा फायदा होत असेल आणि आमच्या म्हणण्याप्रमाणे त्यांचा ३०० कोटी रुपयांचा फायदा होत असेल तर त्यांना कमी फायदा होतो असे विभागाला सुचवायचे आहे काय अशी विचारणा समितीने केली असता मुख्य वास्तुशास्त्रज्ञ सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी समितीस सांगितले की, एसआरएच्या बाबतीत एसआरए विभागाकडून समितीस प्राप्त होईल. परंतु ज्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचा संबंध आहे त्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित आहे. यामध्ये डिफरन्स येत असेल तर सर्व मुंबईसाठी ते लागू होईल तसेच मर्ज करण्याचा निर्णय वरच्या पातळीवर झालेला आहे. आधी तसा प्रस्ताव नव्हता. यावर महालेखाकारांनी समितीस सांगितले की, ३३(१४) खाली प्रकल्प घेण्याबाबत शासनाकडून सुचविले गेले. यासंदर्भात मुख्य वास्तुशास्त्रज्ञ सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी खुलासा केला की, एसआरएचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांच्याकडे बैठक झाली. त्यावेळी तोच मुद्दा त्यांनी सांगितला की, शासकीय जागा यामध्ये मर्ज होऊ शकत नाही, तुम्ही ३३(१४) खाली योजना घेतली तर मर्ज करता येईल. त्यानंतर ते झालेले आहे.

वित्त विभागाने सांगितले की, हा प्रकल्प नोबेल कंपनीला देण्यात आला होता परंतु त्यांचा करार रद्द करुन दुसऱ्या विकासकाला काम दिले. त्यासाठी निविदा काढलेली नाही. त्यांना २००६ मध्ये काम दिले. २००८ पर्यंत काम पूर्ण करावयाचे होते. आता २०१३ मध्ये सुध्दा काम पूर्ण केलेले नाही. काम पूर्ण होण्यासाठी आणखी दोन-तीन वर्षे लागतील. नोबेल कंपनीला अशी अट घातली होती की, आपण चार महिन्यात परवानगी आणली नाही तर तुमचे २५ लाख रुपये परत देणार नाही. त्यांनी चार महिन्यात परवानगी आणली नाही म्हणून त्यांचे डिपॉझीट जप्त केले. नवीन विकासकास काम देताना तशी अट घातलेली नाही. त्यांना एक्स्टेंशन देण्यात आलेले आहे असे विकासकाचे म्हणणे आहे पण त्यांना एक्स्टेंशन दिल्याचे पेपर्स शासनाकडे नाहीत. तरीही आपण त्यांची बाजू घेत आहात. त्यांनी जो बार-चार्ट दिला त्याला आपण मंजुरी दिली कारण बार-चार्टला मंजुरी दिली याचा अर्थ त्यांना परवानगी दिली असा होतो. त्यामुळे Who is involved in this entire episode? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यामध्ये ४३ हजार चौरस मीटर हिशेबात धरले आहे त्याबाबत आमचे असे म्हणणे आहे की, २२ हजार चौरस मीटर प्रमाणे हिशेब करावयास पाहिजे. म्हणजे १०० कोटीच्या अगेंस्ट २२ हजार चौरस मीटर असे धरावयास पाहिजे. बाकीचे इन्सेन्टीव्ह आहे. महालेखाकारांनी ज्या एरियावर २५ टक्के प्रमाणे हिशेब केलेला आहे त्यामध्ये कार्पेट एरियावर २५ टक्के असते. परंतु महालेखाकार यांनी समितीच्या निदर्शनास आणले की, सार्वजनिक बांधकाम विभागाचे जे काम होते त्यातून ही आकडेवारी घेतलेली आहे. त्यामध्ये २५ टक्के वाढ असे म्हटले आहे.

जरी शासनाने आर्किटेक्ट नेमले असले, सल्लागार नेमले असले तरी त्यांनी शासनाचे पैसे घेऊन व्यवस्थित काम केलेले नाही. त्यामुळे या प्रकल्पाच्या बाबतीत थर्ड पार्टी इन्स्पेक्शन होणे गरजेचे आहे व क्वालिटेटिव्ह इन्स्पेक्शन थर्ड पार्टीने करणे आवश्यक आहे. थर्ड पार्टी इन्स्पेक्शन करावे आणि यांना जे पैसे देतो त्यातून तो खर्च करावा अशी सूचना समितीने केली.

यावर विभागाने असा खुलासा केला की, आर्किटेक्टची नेमणूक शासनाने केलेली आहे. शासनाच्या उपलब्ध निधीतून पेमेंट दिले जाते. आर्किटेक्टची फी ४ टक्के आहे आणि इंटेरिअरसाठी ८ टक्के आहे. मूळ करारनाम्यानुसार एकूण किंमत ५२ कोटी रुपये होती. त्याप्रमाणे आर्किटेक्टच्या फीचा हिशेब केलेला आहे.

आर्किटेक्टला पेमेंट केलेले आहे काय ? आणि पीएमसीला किती पेमेंट करायचे आहे अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले की, आतापर्यंत ५० लाख रु.चे पेमेंट झालेले आहे. आणखी पेमेंट देय आहे. पीएमसी नेमण्यासाठी शासनाने पत्र द्यावे आणि खर्च मात्र विकासकाने करावा असा करारनामा झाला होता. हा प्रोजेक्ट-रिलेटेड खर्च असल्यामुळे तो विकासकाने करावयाचा आहे. तसेच करारनाम्यानुसार पीएमसीला पेमेंट करावयाचे आहे.

एनडीएमसीकडून ऑक्युपेशन सर्टिफिकेट मिळालेले आहे. त्या सर्टिफिकेटवर कम्प्लिशन झाले असे दाखविलेले आहे. ही गोष्ट खरी आहे की, आयटी रिलेटेड वर्क अद्याप पूर्ण झालेले नाही. एण्ड पॉईण्टला ते मोबिलाइझ झालेले नाही. सिव्हिल वर्क पूर्ण झालेले आहे. आयटीच्या कामाच्या संदर्भात १७ मुद्दे प्राप्त झालेले आहेत. पीएमसी आणि विकासक यांच्या मागे लागून ही कामे लवकरात लवकर पूर्ण करुन घेण्यात येतील असे समितीस सांगण्यात आले.

दिल्लीमध्ये महाराष्ट्रातील राजकीय नेते, माजी खासदार, आमदार आपापल्या कामासाठी येत असतात. महाराष्ट्रातील आमदारांची संख्या ३५० पेक्षा अधिक आहे. एवढी संख्या असताना नवीन महाराष्ट्र सदनामध्ये एकूण १३८ कक्षबंधांपैकी केवळ २० कक्षबंध आमदारांसाठी ठेवलेले आहेत. ही संख्या अतिशय अपुरी असून आमदारांसाठी कमीत कमी ५० कक्षबंध असणे आवश्यक आहे. सचिवापेक्षा लोकप्रतिनिधीचे पद उच्च आहे. असे असताना सचिवांसाठी ५४८ चौ.फुटाचे कक्षबंध आहेत तर आमदारांसाठी ४०० चौ.फुटाचे कक्षबंध आहेत. मुख्य सचिव व अपर मुख्य सचिव यांच्यासाठी ६ कक्षबंध आहेत. हे ॲलॉटमेण्ट कोणी केले अशी विचारणा समितीने केली असता अधिक्षक अभियंता यांनी समितीस सांगितले की, प्लॅन आर्किटेक्टने केला होता. मुख्य सचिव, अपर मुख्य सचिव यांच्यासाठी ६ कक्षबंध आहेत. हा विषय कॅबिनेट सबकमिटीपुढे मांडलेला होता.

सचिवांना आमदारांपेक्षा नविन महाराष्ट्र सदन मध्ये चांगले कक्षबंध दिलेले आहेत. जुन्या महाराष्ट्र सदनामध्ये आमदारांसाठी १७ रुम्स आहेत आणि सचिवांसाठी ६ रुम्स आहेत. त्यामुळे सर्व अधिका-यांना जुन्या महाराष्ट्र सदनामध्ये रुम्स द्याव्यात अशी सूचना समितीने केली.

जी कामे नविन महाराष्ट्र सदन मध्ये अपूर्ण राहिलेली आहेत ती तातडीने पूर्ण करणे आवश्यक आहेत. कारण या ठिकाणी कोणीही गेस्ट आल्यानंतर त्यांच्यासाठी गरम पाणी, कॅन्टीनची सोय, व्यवस्थित बाथरुम, ए.सी.ची व्यवस्था, टेलिफोन, टी.व्ही., आय.टी. इत्यादी सर्व सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे. ही सर्व कामे किती दिवसात पूर्ण होतील ? नवीन महाराष्ट्र सदनमध्ये एकूण १३८ कक्षबंध आहेत. समिती येण्यापूर्वी २५-३० कक्षबंध व्यवस्थित तयार केले असते तर समजू शकलो असतो. आपण १३८ कक्षबंध तसेच ठेवले. २५-३० कक्षबंध परिपूर्ण केले असते तर सदस्यांची गैरसोय झाली नसती. आता आपण कालबध्द कार्यक्रम आखून ही कामे पूर्ण केली पाहिजेत. कारण विधानसभेमध्ये हा प्रश्न येणार आहे आणि त्यावर चर्चा होणार आहे. दोषी व्यक्तींना शिक्षा करावी लागणार आहे. ही सर्व कामे बघण्यासाठी समिती परत या ठिकाणी भेट देणार आहे. त्यामुळे आय.टी.सह सर्व सोयी सुविधा टॉप प्रायोरिटीने पूर्ण करणे आवश्यक आहे. सर्व कामे पूर्ण करुन आपण नवीन महाराष्ट्र सदन आयुक्तांकडे हस्तांतरित करावे. त्यानंतर मेन्टेनन्समध्ये त्रुटी राहिल्या तर त्यांना त्याबाबत विचारता येईल असे मत समितीने नोंदविले व विभागास विचारणा केली की, कॅन्टीनमधील पदार्थांचे दर कसे असणार आहेत ? महाराष्ट्रातून लोक या ठिकाणी येणार त्यांना खाण्यासाठी काय लागते हे पाहणे आवश्यक आहे. लोकप्रतिनिधी राज्यात कोणत्याही गेस्ट हाऊसमध्ये गेलो तर वेगळा रेट असतो आणि इतर लोकांसाठी वेगळा रेट असतो. या ठिकाणी १०० टक्के ऑक्युपन्सी असणार नाही. नवीन महाराष्ट्र सदन इकॉनॉमिकली व्हायबल होण्यासाठी काय गणित केलेले आहे ? आमदारांसाठी काय रेट असणार आहे ? आमदारांसाठी महाराष्ट्र सदन बांधले परंतु आमदारांना जर हजार-दोन हजार रुपये द्यावे लागले तर कोणीही आमदार या सदनात येणार नाहीत. दिल्लीत सर्व खासदार राहतात त्यांच्याकडे ते जातील. त्यामुळे याठिकाणी दर काय लावले आहेत याबाबत खुलासा करताना समितीस सांगण्यात आले की, नवीन दर निश्चित झालेले नाहीत. जुन्या महाराष्ट्र सदनचे दर जोपर्यंत रिव्हाईज होत नाहीत तोपर्यंत तेच दर या ठिकाणी लागू राहतील. कॅन्टीनच्या बाबतीत आयआरसीटीसी बरोबर करार झालेला आहे. महाराष्ट्रीयन जेवणासाठी त्यांना रेट ठरवून दिलेले आहेत. तसेच कॉन्टीनेंटल, चायनीज पदार्थांसाठी शासनाने त्यांना परवानगी दिलेली आहे. तसेच जुन्या दरापेक्षा थोडे जास्त दर ठेवलेले आहेत.

समितीने कँटीनच्या दराबाबत विभागाच्या निदर्शनास आणले की, चहाचा दर २० रुपये आहे आणि त्यावर साडेबारा टक्के टॅक्स आहे. ए.सी.मध्ये बसलो तर १८ टक्के टॅक्स आहे. म्हणजे टॅक्स धरुन २३ रुपये ८० पैशाला चहा मिळेल याबाबत खुलासा करताना विभागीय आयुक्तांनी समितीस सांगितले की, आयआरसीटीसीला ऑफर दिलेली आहे त्यामध्ये जे दर मान्य केले आहेत त्यात २ अंडी २० रुपये, बटर/जाम टोस्ट (२ ब्रेड) १० रुपये, कॉर्न फ्लेक्स अँड मिल्क १५ रुपये, पुरी भाजी २० रुपये, साबुदाना खिचडी २० रुपये, उपमा १५ रुपये, पोहे १५ रुपये, बटाटा वडा १० रुपये, चहा ६ रुपये, कॉफी १० रुपये, १ कप दूध १० रुपये, महाराष्ट्रीयन थाली ६० रुपये असे दर आहेत. कॉन्टीनेन्टल फूडच्या दरामध्ये १० टक्के डिस्काऊंट आहे. खाद्य पदार्थांची क्वालिटी चांगली ठेवावी अशी समितीने सुचना केली आहे.

जुन्या महाराष्ट्र सदनमध्ये बाहेरुन ९० टक्के लोक जेवणासाठी येतात. त्यामुळे लोकप्रतिनधींना वेळेवर जेवण मिळत नाही. दुसरी बाब अशी की, जुन्या महाराष्ट्र सदनात बाहेरच्या लोकांना कक्षबंध देत नाही त्याच धर्तीवर या ठिकाणी सुध्दा व्यवस्था करावी. लोकप्रतिनिधींनी शिफारस केली तर जुन्या महाराष्ट्र सदनमध्ये कक्षबंध देतो तसे या ठिकाणी सुध्दा करावे. याबाबत सामान्य प्रशासन विभागाकडून यांना पत्र येते. आमदारांनी पत्र दिले तर ते डायरेक्ट कन्सीडर करावे व जेवढ्या मोबाईल कंपन्या आहेत त्यांना आपण पत्र लिहिले तर ते या ठिकाणी बुस्टर लावतील. ते करणे फार आवश्यक आहे अशी सूचना समितीने केली.

महाराष्ट्र सदनामध्ये अपूर्ण राहिलेली कामे किती दिवसात पूर्ण करणार याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, विकासक, प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टन्ट आणि आर्किटेक्ट यांच्याबरोबर तात्काळ चर्चा करुन या बाबतीत कालबध्द कार्यक्रम तयार करुन देऊ.

यासंदर्भात समितीने विभागास सूचित केले की, विभागाचे चार-पाच वरिष्ठ अधिकाऱ्यांना काम पूर्ण होईपर्यंत या ठिकाणी राहण्यास सांगावे. तसे केले तर वेगाने काम होईल. ॲग्रिमेंटमध्ये अट नसल्यामुळे विकासाकाला काही करु शकणार नाही. ठरलेल्या कालावधीत काम पूर्ण केले नाही तरी दंड नाही अशा प्रकारचे ॲग्रिमेंट जगामध्ये कोठेही नसेल. त्यांना आपण उदार हस्ते सवलत दिलेली आहे आणि त्याचा गैरफायदा ते घेत आहेत. आता आपण कडक धोरण स्वीकारले पाहिजे. त्यांना ब्लॅक लिस्ट करण्याचा आपल्याला अधिकार आहे तसेच अपूर्ण राहिलेली कामे १ महिन्यात पूर्ण करावीत.

प्रेक्षागृहामध्ये किती लोकांच्या बसण्याची व्यवस्था आहे ? तसेच पत्रकार कक्षाची कॅपॅसिटी किती आहे ? याबाबत माहिती देताना अधिक्षक अभियंता यांनी सांगितले की, प्रेक्षागृहामध्ये जास्तीत जास्त ३५० लोक बसू शकतात. पत्रकार कक्षामध्ये ७० ची कॅपॅसिटी आहे. परंतु विभागाकडून जी नवीन महाराष्ट्र सदनाची माहिती छापलेली आहे त्यामध्ये प्रेक्षागृहाची क्षमता ५०० आणि पत्रकार कक्षाची क्षमता १०० छापलेली आहे. चुकीचे न छापता जेवढी क्षमता असेल तेच छापावे अशीही सूचना समितीने केली.

शासकीय प्रदर्शनी व विक्री दालन आहे का ? याबाबत या ठिकाणी शॉपिंग आर्केडसाठी एरिया ठेवलेला आहे. यासंदर्भात प्रदर्शनी म्हणजे एक्झीबीशन. त्याप्रमाणे ते दालन करावे. महाराष्ट्र टुरिझम हा महत्वाचा विषय आहे. त्या बाबतीत लक्ष द्यावे अशी सूचना समितीने केली.

समितीने महाराष्ट्र सदनाचे निवासी आयुक्त यांच्या स्तरावरुन होणा-या कामकाजाच्या संदर्भात काही मुद्याबाबत पुढीलप्रमाणे माहिती घेतली.

(१) नवी दिल्ली येथील आयुक्त कार्यालयासाठी एकूण मंजूर पदे ११३ आहेत, ७५ पदे भरलेली आहेत व ३८ पदे रिक्त आहे.

(२) निवासी आयुक्त कार्यालयाकडून केल्या जाणा-या कामकाजाचे स्वरुप काय आहे ? याबाबतची माहिती तसेच यासंदर्भात काही माहिती-पुस्तिका तयार केलेली असेल तर समितीला देण्यात यावी. **(विवरणपत्र क्र. ---)**

ज्या प्रमाणे राज्याच्या विविध महामंडळामार्फत विधिमंडळाला त्यांचे वार्षिक अहवाल सादर केले जातात त्याप्रमाणे महाराष्ट्र सदनाच्या आयुक्त कार्यालयाच्या कामकाजाच्या संदर्भात वार्षिक अहवाल सादर केला जातो काय ? या मुद्यांसदर्भात समितीला माहिती सादर करण्यास सांगितले व समितीस सूचित केले की, जर महाराष्ट्र सदरनाच्या आयुक्त कार्यालय कामकाजाच्या संदर्भात वार्षिक अहवाल सादर केला जात नसेल तर तसा अहवाल सादर करणे आवश्यक आहे जेणेकरुन केन्द्र शासनाकडे कोणकोणत्या प्रस्तावाच्या बाबतीत पाठपुरावा केला गेला, कोणते प्रस्ताव मार्गी लागले, कोणते प्रस्ताव प्रलंबित आहेत याची माहिती या अहवालाद्वारे सन्माननीय सदस्यांना उपलब्ध होऊ शकेल. सिस्टिममध्ये सुधारणा होणाच्या दृष्टीने असा वार्षिक अहवाल सादर करण्याची प्रथा सुरु करण्यात यावी. तसेच (३) महाराष्ट्र सदनासाठी राज्य शासनाचे बजेट किती आहे व केन्द्र शासनाकडून राज्य शासनाला

कोणकोणत्या योजनांसाठी कशा पध्दतीचे अनुदान देण्यात येते याची माहिती समितीला देण्यात यावी जेणेकरुन अशा योजनांची माहिती सन्माननीय सदस्यांना मिळू शकेल असे निदेश दिले व विचारणा केली की, राज्य शासनाचे प्रस्ताव केन्द्र शासनाकडे आपल्या कार्यालया मार्फत पाठविले जातात काय यावर आयुक्त We have regular system of monitoring Central Government's funds releases. We have detailed list about Central Plan(C.P.) and Centrally Sponscerd State Plan (C.S.S.P.). There are total 421 schemes under which our State is receiving funds in this five year plan. This year we will receive near about 14000 Crore from Central Government. The concerned Department of State Government directly send their proposals to Central Government. We have Liaison Officer of various Departments and Representatives of Public Sector Undertakings like Krishna Khore Development Corporation, MIDC etc. in Resident Commissioner Office at Delhi to do the follow-up of such proposals.

राज्य शासनाच्या प्रलंबित असलेल्या प्रस्तावांचा पाठपुरावा करण्यासाठी त्या त्या विभागाच्या अधिका-यांना वारंवार दिल्लीला चकरा माराव्या लागतात. हे टाळण्यासाठी आयुक्त कार्यालयातील कर्मचारी वाढवून आयुक्त कार्यालया मार्फत पाठपुरावा केला तर ते योग्य होईल. राज्य शासनाकडून कोणकोणते प्रस्ताव केन्द्र शासनाकडे जातात याची माहिती आयुक्तांना मिळाली पाहिजे अशी सूचना समितीस केली असता आयुक्त यांनी सांगितले की, आता प्रत्येक खात्याकडून थेट प्रस्ताव पाठविले जातात. त्या खात्याला काही अडचण आली तर ते आयुक्त पत्र लिहितात व त्याबाबतीत आयुक्त कार्यालय पाठपुरावा करतो.

(४) केन्द्र शासनाच्या व केन्द्र पुरस्कृत अशा ४२१ योजना आहेत. केन्द्र शासनाच्या योजना व केन्द्र पुरस्कृत योजनांची माहिती सन्माननीय सदस्यांना उपलब्ध झाली तर त्या योजना राज्यामध्ये प्रभावीपणे राबविता येतील. काही योजना सन्माननीय सदस्यांना माहीत नसतात. याबाबत समितीने उदाहरणादाखल सांगितले की, उदा. राजापूर येथील तहसील न्यायालय बांधण्यासाठी केन्द्र शासनामार्फत ३ कोटी रुपये अनुदान मिळाले असे मला राजापूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या एका अभियंत्याने सांगितले. न्यायालयाच्या जुन्या झालेल्या इमारती नव्याने बांधण्यासाठी ३ कोटी रु. अनुदान देण्याची केन्द्राची योजना आहे. अशा योजनांची माहिती सन्माननीय सदस्यांना मिळाली तर त्या योजना राज्यात चांगल्या प्रकारे

राबविता येतील. त्या दृष्टीने या ४२१ योजनांची माहिती समितीला देण्यात यावी असे निदेश दिले. **(विवरणपत्र क्र. ----)**

Various States of our country are also getting special funds from the Central Government. We should try to get such type of funds for our State असे समितीने सूचविले असता आयुक्त यांनी First, we had calculated State entitlement in National Budget. We contribute near about 9.6 % of the total National Budget.

We have created a system for getting more Central Government funds for our State. This system is based on our State's percentage of urbanisation, Geograpical area i.e. 9 %, Forest Area i.e. 8.6%, Population etc. According to these percentage, we have informed Secretaries of various departments of Maharashtra Government to demand funds from Central Government. We are strongly representing our State with Government of India to avail more funds from Central Budget for our State. There are total 421 schemes under which our State is receiving Central Government funds. Out of these 421 schemes 16 schemes are flagship schemes of Government of India. This year we are receiving near about Rs. 14000 Crore under these various schemes of Government of India. However, we are receiving near about Rs. 11000 crore only from flagship schemes of Government of India. We are regularly informing Hon'ble Chief Minister, Chief Secretary of Government of Maharashtra regarding releases of funds from Central Government to State Government every month in a specified format. We have a set format for this purpose. We will provide you details of funds release available with us in the said format.

Apart from this, we also do the follow-up of Government Bills, Ordinance pending with the Hon'ble President of India and various departments of Government of India. We have a list of Government Bills, Ordinance pending before these authorities with us अशी माहिती दिली.

विधिमंडळाने पारित केलेली विधयके माननीय राज्यपालांच्या मान्यते नंतर माननीय राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी केंद्राकडे पाठविली जातात. परंतु माननीय राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी विधेयके अनेक वर्षे प्रलंबित राहातात. उदा. सावकारी विधेयक माननीय राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी ५ वर्षापासून प्रलंबित आहे. तसेच गोहत्या बंदीचे विधेयकही अनेक वर्षापासून

प्रलंबित आहे. माननीय राष्ट्रपतींची मान्यता प्रलंबित असलेल्या विधेयकांची यादी आपणाकडे उपलब्ध असेल तर ती समितीला द्यावी असेही निदेश समितीने दिले. **(विवरणपत्र क्र. --)**

महाराष्ट्रातील पर्यटनाच्या दृष्टीने दिल्लीमध्ये काही व्यवस्था करण्यात आलेली आहे काय याबाबत आयुक्त यांनी असे सांगितले की, एमटीडीसीसाठी एक रुम या ठिकाणी आम्ही देणार आहोत. सध्या एमटीडीसीचे कार्यालय वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे आहे.

महाराष्ट्रातील आमदार व खासदार यांना उपयोग होईल अशा प्रकारचे कोणकोणते साहित्य उपलब्ध आहे अशी विचारणा केली असता यावर महाराष्ट्र सदनामध्ये खासदार समन्वय कक्ष आहे. खासदारांना रल्वेच्या संदर्भात, राष्ट्रीय महामार्गाच्या संदर्भात किंवा इतर कोणत्याही बाबतीत माहिती हवी असेल तर ती संबंधित मंत्रालयाकडून उपलब्ध करुन देतो असे सांगण्यात आले.

नवीन महाराष्ट्र सदनाचे जे काम झालेले आहेत त्यामध्ये खूप उणिवा राहिलेल्या आहेत. त्याबाबतीत राज्यभर टीका होत आहे. नवीन महाराष्ट्र सदन यापुढे निवासी आयुक्त कार्यालयामार्फत चालविले जाणार आहे. त्यासाठी सेक्युरिटी सिस्टिम, आयटी सिस्टिम, वाहने, स्टाफ, स्टाफ क्वार्टर्स व इतर सोयीसुविधा कशा प्रकारे करण्यात येणार आहे, नवीन महाराष्ट्र सदन आर्थिकदृष्टया सुसाध्य होण्याच्या दृष्टीने कोणत्या गोष्टी करणे आवश्यक आहे यासंबंधीचा अहवाल **(विवरण क्र. ---)** दर्शविण्यात आला आहे.

दिनांक ५ फेब्रुवारी, २०१४ रोजीची लोकलेखा समितीची आजची बैठक ही महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली, हायमाऊंट इमारत, आरटीओ प्रशासकीय इमारत, अंधेरी येथे समितीने दिलेल्या भेटीबाबत आयोजित केलेली आहे. या भेटीमध्ये समितीला विभागीय प्रतिनिधींनी जी आश्वासित माहिती समितीला सादर करावयाची आहे, ती थोडक्यात सादर करावी. याबाबत सचिवांनी खुलासा केला की, आरटीओ प्रशासकीय इमारतीचे संपूर्ण बांधकाम आता पूर्णपणे कार्यान्वित झालेली आहे. सदरहू बांधकाम प्रशासकीय इमारत व निवासी गाळयांचे बांधकामही टॉवर इमारतीच्या संरचनेमध्ये करण्यात येत आहे. परंतु आरटीओ प्रशासकीय इमारतीमध्ये आरटीओ फंक्शन करीत आहे. ४० टक्के निवासी गाळयांकरिता एसआरएकडून मंजूरी प्राप्त झालेली आहे. या संदर्भातील कामांकरिता एसआरएकडून काही निकष मंजूर होऊन मिळालेले आहेत. जून, २०१५ पर्यंत निवासी गाळे टॉवर संरचनेमध्ये बांधून पूर्ण होतील. या निवासी गाळयांकरिता व टेस्ट ट्रॅक करिता मालवणी,अंधेरे येथे जमिनीचे लेव्हलिंग करण्याचे काम

चालू आहे. मालवणी येथील टेस्ट ट्रॅक हा संबंधित उद्योजक स्वखर्चाने तयार करुन देणार आहेत. बांधकामामध्ये टेस्ट ट्रॅकचे लेव्हलींग समाविष्ट करता येत नाही. आरटीओ बांधकामाच्या एकूण योजनेमध्ये टेस्ट ट्रॅकच्या बांधकामासंबंधी तांत्रिक अडचणीप्रमाणे थोडे बदल करण्यात आलेले आहेत. टेस्ट ट्रॅकचा काही भाग हा मालवणी येथे तसेच, काही भाग निवासी गाळे असलेल्या जागेवर करावयाचा आहे. टेस्ट ट्रॅक करिता मालवणी येथे जमीन हस्तांतरित करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे एकूण १३८ कक्षबंधांचे बांधकाम केलेले आहे. व्हीआयपी सूटमध्ये सॉफ्टस्विचेसचे काम बाकी आहे. सॉफ्ट स्विचेस हे कर्टन, ए.सी., लाईट, फॅन, बेल आदि बाबींशी एकत्रितपणे संबंधित असून हे आधुनिक तंत्रज्ञान आहे. सॉफ्ट स्विचेसचे मॉनिटरींग सेंट्रली मॅनेज होऊ शकते. उद्योजक, वेंडर यांचा या संदर्भात फायनान्सचे काही इश्यू होते. या कामाकरिता उद्योजकांना एकूण ३५ लाख रुपयांचा वित्तपुरवठा प्राप्त झालेला असून लवकरच हे काम पूर्ण करण्यात येईल. व्हीआयपी सूटमध्ये सॉफ्टस्विचेस बसविण्यापूर्वी ऑर्डिनरी स्विचेस बसविलेले होते. परंतु आधुनिक तंत्रज्ञान व अधिक सोयीकरिता उपरोल्लिखित सोय पुरविण्यात आलेली आहे.

समितीने ज्यावेळी आरटीओ, अंधेरी, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे भेट दिली होती. त्यावेळी जे काम राहिले होते, ते सर्व लवकरच उद्घाटनापूर्वी पूर्ण करण्यात येईल, असे सांगण्यात आले होते. दोन्ही इमारतींचे उद्घाटन झालेले असतांनाही इमारतींची काही कामे अपूर्ण आहेत, ही बाब अयोग्य आहे. समितीने भेट दिल्यानंतर सात ते आठ महिने उलटून गेल्यानंतरही या कामांमध्ये प्रगती झालेली नाही. आरटीओ इमारतीशेजारील रोड लोकांकरिता खुला करण्याबाबत सांगितले होते, तो रोड अद्यापहि लोकांकरिता खुला केलेला नाही. आरटीओ इमारतीसंदर्भातील सर्व त्रूटींविषयक आम्ही नोटींग विभागीय प्रतिनिधींसमोर सादर केले होते. त्या नोटींगमधील त्रूटींबाबतच्या माहितीचे पुढे काय झाले तसेच महाराष्ट्र सदन,नवी दिल्ली येथील कक्षबंध व उपहारगृह येथील सोयीबाबत आम्ही त्रूटी अहवाल सादर केला. यासंदर्भात आपण एकामागून एक असे याप्रमाणे सर्व मुद्दे व त्यावरील कार्यवाही वाचून दाखवावी. या विषयावर आता व यापूर्वी भरपूर चर्चा झालेली आहे. समितीने सांगितल्याप्रमाणे कालबध्द कार्यवाही झालेली आहे का ? याबाबत आपण माहिती सांगावी. हायमाऊंट, अंधेरी येथेही समितीने भेट दिली असता काही त्रूटींचा उल्लेख केला होता, या त्रूटींच्या

दृष्टीकोनातून विभागाने कोणकोणती कार्यवाही केली आहे का अशी समितीने विचारणा केली असता, सचिवांनी खुलासा केला की, आटीओ प्रशासकीय इमारत, अंधेरी पूर्णपणे बांधून झाली असून त्यामध्ये आरटीओ प्रशासन चालू झालेले आहे. यावर समितीन पुन्हा विचारणा केली की, वर्तमानपत्रामध्ये एक फोटो छापून आला होता. सदरहू फोटोमध्ये आरटीओ प्रशासकीय इमारत, अंधेरी या इमारतीमध्ये लिकेज होत असल्याकारणाने टेरेसवर निळी ताडपत्री टाकलेली असल्याचे दिसून येत होते. याबाबत विभागाने खुलासा केला की, आरटीओ प्रशासकीय इमारत, अंधेरी येथे माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांच्या हस्ते उद्घाटनाचा कार्यक्रम होणार होता. या उद्घाटन कार्यक्रमाची तयारी म्हणून तळमजला व टेरेस येथे स्टेज व चहापान व्यवस्था करण्याचे काम चालू होते. तळमजला येथे भंगाराचे सर्व सामान होते. कार्यक्रमाची तयारी करण्याकरिता वेळ कमी होता. तळमजल्यावर कार्यक्रम घेणे शक्य झाले नसते तर टेरेसवर कार्यक्रम घेण्याचा मानस होता. पावसाळयाचे दिवस असल्यामुळे पूर्वतयारी म्हणून टेरेसवर निळया रंगाची ताडपत्री टाकण्यात आली होती यावर समितीने आक्षेप घेतला की, समितीला अधिकारी वाट्टेल ती माहिती देत आहेत. आजपर्यंत राज्यामध्ये माननीय मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली असलेला उद्घाटन सोहळा टेरेसवर घेण्यात आलेला नाही. पावसाळयांच्या दिवसांमध्ये इमारत लिकेज होत असेल, ऐनवेळी उद्घाटनप्रसंगी पितळ उघडे पडू नये याकरिता निळी ताडपत्री टाकण्यात आली असेल, असे समितीचे मत आहे. समितीला अशा प्रकारे दिशाभूल करणारी उत्तरे देण्यात आली तर संबंधित बाबीची चौकशी करण्यात यावी.

याबाबत विभागाच्या अध्ाकिाऱ्यांनी खुलासा केला की, उद्घाटनाचा सोहळा तळमजल्यावरील भंगार सामान हटवून तेथेच घेण्यात येणार होता. परंतु जेवणाची व्यवस्था टेरेसवर करण्यात आली होती.

सदरहू प्रकल्प विहित मुदतीत पूर्ण करण्यात आले की, मुदतवाढ घेतली होती ? मुदतवाढ घेतली असेल तर मुदतवाढीची कारणे कोणकोणती आहेत तसेच महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली या इमारतीचे उद्घाटन महामही राष्ट्रपती यांच्या हस्ते झाले होते. ज्यावेळी देशाच्या सर्वोच्च पदी असलेल्या व्यक्तीकडून एखाद्या इमारतीचे उद्घाटन होते, त्यावेळी संबंधित वास्तूचे पूर्णत्व प्रमाणपत्र राष्ट्रपती भवनाकडे पाठविण्याची एक प्रथा आहे. सदरहू इमारतीचे काही काम अपूर्ण असतांनाही राज्याचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम

विभागाच्या प्रमुखांनी खोटे पूर्णत्व प्रमाणपत्र सादर केले होते का अशी विचारणा समितीने केली असता सचिवांनी खुलासा केला की, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली या इमारतीमधील सर्व कक्षबंधांचे काम पूर्ण झाले होते. केवळ व्हीआयपी सूटमधील ऑर्डिनरी स्विच बदलून आधुनिक तंत्रज्ञान असलेले सॉफ्ट स्विचेस लावण्याचा निर्णय प्रलंबित असल्यामुळे ते काम बाकी होते. उर्वरित कोणतेही काम त्या इमारतीमध्ये प्रलंबित नव्हते आणि नाही.

यावर समितीने अशी विचारणा केली की, सॉफ्ट स्विच किंवा इतर स्विच ही तर अतिशय मायनर बाब आहे. इलेक्ट्रीकचे कोणतेही काम दहा माणसांमध्ये मटेरियल आणल्यानंतर जास्तीत जास्त आठ दिवसांमध्ये पूर्ण होण्याकरिता अडचण नाही. परंतु महाराष्ट्र सदन येथील एका कक्षबंधाचे एका दिवसाचे भाडे ६,००० रुपये इतके आहे. खाजगी हॉटेल्समध्ये एका दिवसाचे भाडे दोन ते तीन हजार रुपये इतके आहे. यामुळे महाराष्ट्र सदनामध्ये एका कक्षबंधाचे एवढे वाढीव भाडयामुळे हे कक्षबंध रिकामेच राहणार आहेत, असे समितीचे मत आहे.

तसेच सदरहू महाराष्ट्र सदन इमारतीच्या बांधकामाच्या पूर्णत्वाचे खोटे प्रमाणपत्र राष्ट्रपती भवन येथे पाठविण्यात आले होते का ? बांधकामामध्ये त्रूटी होत्या तर आपल्यला कंम्पलिशन प्रमाणपत्र कोणी सादर केले यावर सचिवांनी खुलासा केला की, सदरहू पूर्णत्व प्रमाणपत्र शासनाला दिल्ली महानगरपालिकेने सादर केलेले आहे. महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे एकूण १३८ कक्षबंधांचे बांधकाम केलेले आहे. व्हीआयपी सूटमध्ये सॉफ्टस्विचेसचे काम बाकी आहे. सॉफ्ट स्विचेस हे कर्टन, ए.सी., लाईट, फॅन, बेल आदि बाबींशी एकत्रितपणे संबंधित असून हे आधुनिक तंत्रज्ञान आहे. सॉफ्ट स्विचेसचे मॉनिटरींग सेंट्रली मॅनेज होऊ शकते. उद्योजक, वेंडर यांचा या संदर्भात फायनान्सचे काही इश्यू होते. या कामाकरिता उद्योजकांना एकूण ३५ लाख रुपयांचा वित्तपुरवठा प्राप्त झालेला असून लवकरच हे काम पूर्ण करण्यात येईल. व्हीआयपी सूटमध्ये सॉफ्टस्विचेस बसविण्यापूर्वी ऑर्डिनरी स्विचेस बसविलेले होते. परंतु आधुनिक तंत्रज्ञान व अधिक सोयीकरिता उपरोल्लिखित सोय पुरविण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथील इमारतीचे कोणते काम अपूर्ण किंवा प्रलंबित आहे अशी समितीने विचारणा केली असता विभागीय अधिकाऱ्यांनी असा खुलासा केला की, महाराष्ट्र सदन येथील व्हीआयपी सूटमध्ये ऑर्डिनरी स्विचेसची व्यवस्था केलेली होती. परंतु उद्योजक

आणि वेंडर यांच्यामधील इश्यूज डिझोल्व्ह झाल्यानंतर सॉफ्ट स्विच या आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सुविधेचा पुरवठा करण्याचे काम करण्यात आलेले आहे. यामध्ये कर्टन, लाईट, फॅन, ए.सी. यांना सेंट्रली कनेक्ट केलेले आहे.

अंधेरीचा प्लॉट शासनाने विकासकाला दिलेला आहे त्यांनी एसआरए अंतर्गत बांधकाम सुरु केले आहे काय ? की अद्याप प्रलंबित आहे. विहित मुदतीत काम पूर्ण न केल्यामुळे आपण विकासकाकडून पेनल्टी घेतली आहे काय, सदर प्रकल्प २००६ मध्ये पूर्ण होणार होता परंतु त्या कामाला ८ वर्ष उशीर झालेला आहे.

त्यांना अंधेरीच्या प्लॉटवर एसआए अंतर्गत इमारत बांधण्यासाठी एफएसआय देत आहोत. यांना जमिन देण्यात येत नाही. आता अंधेरी येथे पुनर्वसनाचे काम सुरू आहे. सेलच्या इमारतीच्या प्लॅनला अद्याप मान्यता देण्यात आलेली नाही.

विकासकाकडे कॅश फ्लो मेंटेन व्हायला पाहिजे होता. तो जनरेट झालेला नाही. समितीने अशी विचारणा केली की, विकासकाने नियमाने काम करायला पाहिजे होते. त्याने नियमात नमूद केल्याप्रमाणे काम केले नसल्यामुळे त्याला पेनल्टी लावण्यात आली आहे काय याबाबत समितीला माहिती देण्यात आली नाही.

समितीने हायमाऊंट रेस्ट हाऊसला देखील भेट दिली होती. त्यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे हायमाऊंट रेस्ट हाऊस लगत असलेल्या माननीय सभापती, विधान परिषद यांच्या बंगल्याची जागा पार्किंगसाठी घेण्यात येईल असे सांगण्यात आले होते. त्याप्रमाणे आपणास पार्किंगसाठी जागा मिळाली आहे काय ? हायमाऊंट रेस्ट हाऊस इमारत ७ ते ८ मजल्यांची आहे. त्यासाठी किती पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. याबाबत सचिवांनी सांगितले की, हायमाऊंट रेस्ट हाऊस मध्ये एकूण ५४ फ्लॅट असून २२ वाहने उभी राहू शकतात. यावर समितीने अशी विचारणा केली की, हायमाऊंट रेस्ट हाऊस हे व्हीआयपींसाठी आहे. व्हीआयपी म्हटला की, पोलीस गाड्या येतात. दहा व्हिआयपी आले की, त्यांच्या बरोबर दहा जण येणार अधिक दहा पोलीस गाड्या देखील येणार म्हणजे एकूण ३० वाहने एका वेळी येणार. आपण येथे २२ पार्किंगची व्यवस्था केली आहे. दुसरे असे की, माननीय सभापतींच्या बंगल्याची भिंत पाडायची हे कोणी ठरविले होते व सभापतींच्या बंगल्याची भिंत पाडण्यास परवानगी आहे काय ? बीएमसीच्या कोणत्या अधिकाऱ्याने हा प्लॅन मंजूर केला आहे, हायमाऊंट रेस्ट हाऊस मधील पार्किंगचे कॅलक्युलेशन कोणी करून दिलेले आहे, यात

परिवहन विभाग देखील कल्प्रीट आहे. समितीने उपस्थित केलेले सगळे प्रश्न अनुपस्थित रहात आहेत.

अंधेरी येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा विकास करण्यासाठी आपण सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्र दिले आहे काय ? सार्वजनिक बांधकाम विभाग आणि विकासक यांच्यामध्ये काय करारनामा झाला आहे, करारनाम्या मधील अटी व शर्ती काय आहेत, कराराचा भंग होत असल्यास, आपण कोणती कारवाई करणार आहात यावर सचिवांनी खुलासा केला की, परिवहन विभागाला दिनांक ३० जानेवारी २००३ रोजीचे पत्र समितीस सादर केले. **(विवरणपत्र क्र. ---)** तत्कालीन अपर मुख्य सचिव (गृह) यांनी दिनांक १६.११.२००२ रोजी बैठक घेतली होती. त्यावेळी सीईओ, एसआरए हे उपस्थित होते. त्यामध्ये निर्णय घेण्यात आले होते यावर समितीने विचारणा केली की, त्या बैठकीमध्ये कोणते मत मांडले, कोणताही करारनामा व संमतीशिवाय विकास करायचा असा शासनाचा निर्णय झाला आहे काय, येथे शासनाला बाजूला ठेवून सार्वजनिक बांधकाम विभागाने सगळा विकास केला आहे. त्यामुळे परिवहन विभागाने शासनाचे म्हणणे मान्य केले आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाचे म्हणणे मान्य केले आहे ? आम्हाला अमूक एवढ्या जागेची गरज आहे हे आपण कोणाला सांगितले आहे याबाबत सचिवांनी खुलासा केला की, स्लम एकत्रित करण्यासाठी आरटीओने परवानगी द्यावी असे पत्र आहे.

शासनाच्या सूचनेप्रमाणे आर.टी.ओ.ने दिनांक २६ मे, २००३ रोजी एनओसी दिलेली आहे. त्याची झेरॉक्स प्रत समितीला उपलब्ध करून देण्यात आली. **(विवरणपत्र क्र----)**

यासंबंधातील करारनामा परिवहन विभागाने केलेला नाही. त्यांनी पत्रव्यवहार केलेला आहे. विकासक आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा करारनामा झालेला आहे.

परिवहन विभाग जागेचे मालक असताना पिक्चरमध्ये नाहीत असा अर्थ होतो. जेव्हा विभागाकडे कोणतीही फाईल येते तेव्हा त्यात अनेक क्वेरीज काढतात. येथे तर अख्खी प्रॉपर्टी सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतलेली यासंबंधातातील काही डॉक्युमेंट असेल तर ते द्यावे. परिवहन विभागाकडून कोणतेही कागदपत्र समितीला सादर करण्यात आलेले नाही. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, कोणत्याही विभागाच्या इमारतीचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येते ही वस्तुस्थिती असली तरी the Transport Department is willing to handle this plot to Public Works Department with the

permission of the Government. Therefore, we are ready and accept this proposal forwarded by the PWD. This is the Agreement withsigned by both the Departments. असा काही करार झाला होता काय ? पोलिसांच्या वसाहती-कार्यालय, विधान भवनासह सर्व शासकीय कार्यालयांचे काम किंवा दुरूस्ती सार्वजनिक बांधकाम विभागामार्फतच होते. विधान भवनातील कोणतेही काम करायचे असेल तर त्यास पीठासीन अधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागते की नाही ? पोलिसांसाठी ज्या इमारती किंवा कार्यालये बांधतात त्यासाठी संबंधित विभाग प्रमुखाची मान्यता असते की नाही ? प्राथमिक आरोग्य केंद्र बांधतो, दवाखाने बांधतो त्यासाठी आरोग्य विभागाची परवानगी असते की नाही ? अंधेरी, आर.टी.ओ.ची जागा घ्यावी असे शासनाने सांगितले आहे काय, Whether the Public Works Department is the owner of the said land? या जमिनीची मालकी परिवहन विभागाचीच असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी मान्य केले.

सार्वजनिक बांधकाम विभागाने जर प्रपोजल करायचे होते तर रूल्स रेग्युलेशनचे पालन करणे आवश्यक होते. त्याचे पालन का केलेले नाही याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी फाईल मुव्हेमेंट समितीला सादर करण्याचे मान्य केले. सदर नस्तीची मुव्हमेंट समितीला सादर करण्यात आली. **(विवरणपत्र क्र. ---)**

७/१२ परिवहन विभागाच्या नावावर असताना सार्वजनिक बांधकाम विभागाला कसे काय काम दिलेले आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, परिवहन विभागाच्या प्रधान सचिवांनी माननीय मंत्री महोदयांना टिपणी सादर केली असून त्यावर "भविष्यात या भूखंडावर चटई निर्देशांकात शासनाने वाढ केल्यास तो परिवहन विभागाच्या मालकीचा राहील" असा शेरा लिहिलेला आहे. त्यावर त्यावेळचा एफएसआय आणि आताचा एफएसआय याचे गणित जुळते नसल्याचे समितीने निदर्शनास आणले.

परिवहन विभागाची जागा असतांना परिवहन विभागाला काहीही माहिती नसून फाईल पीडब्ल्यूडीकडे आहे. परंतु परिवहन विभागाची जागा असतांना त्याच्याकडे काहीच पेपर असू नये याबाबत समितीने आश्चर्य व्यक्त केले.

जागा परिवहन विभागाची आहे. पीडब्ल्यूडी आणि परिवहन विभागाच्या सचिवांची यासंदर्भात सही आहे. परंतु दोन विभागामध्ये काही जरी व्यवहार झाला असला तरी त्याची फाईल परिवहन विभागाकडे असणे गरजेचे आहे. पीडब्ल्यूडी आणि विकासक यांच्यामध्ये

कोणत्या प्रकारचा करारनामा झाला होता ? In this case, the SRA, Housing and PWD departments are coming in picture. But, the Trasnport Department is nowhere in picture. या मध्ये पीडब्ल्यूडी मेन एजन्सी आहे. परंतु एसआरएने जे काही केले त्यामध्ये परिवहन विभाग कोठेही पिक्चरमध्ये दिसत नाही. पीडब्ल्यूडीचे काम डेव्हलप करावयाचे असून डेव्हलपींगचे काम तुम्ही कोणाकडूनही करुन घेऊ शकता. पीडब्ल्यूडी आणि हौसिंग विभागामध्ये या प्रकल्पाच्या बाबतीत काही डॉक्यूमेंटेशन झालेले आहे काय याबाबत सचिवांनी खुलासा केला की, उद्योजक आणि पीडब्ल्यूडीमध्ये करार झालेला आहे. यामध्ये ३३(१०) अंतर्गत अगोदरच योजना मंजूर होती. त्याच उद्योजकाकडून ३३(१४) अंतर्गत पीडब्ल्यूडीने नवीन करारनाना करुन घेतला होता. परिवहनच्या जागेला एक एफएसआय मिळावा यासाठी हे करण्यात आले आहे. ३३(१०) मध्ये १ एफएसआय परिवहनला उपलब्ध असून ३३(१४) मध्ये अधिकचा १.५ एफएसआय प्राप्त होतो. १.५ एफएसआयपैकी ०.७५ एफएसआय पीएपी करुन द्यावयाचा आहे. पीएपी करुन दिले तर १००० पीएपी करुन देता येते. यामध्ये उद्योजकाला अधिकचे ०.७५ एफएसआय मिळतो. थोडक्यात १.५ एफएसआय अधिकचा मिळतो. १ एफएसआय परिवहनला दिल्यानंतर १.५ एफएसआय अजून मिळतो. २.५ मध्ये आपण ३३/१४ मध्ये जाऊ शकतो. पीडब्ल्यूडीचा १.५ एफएसआयच्या संदर्भात विकासक आणि पीडब्ल्यूडी यांच्यामध्ये करारनामा झालेला आहे. महाराष्ट्र सदन, हायमाऊंट आणि अंधेरी, परिवहनचा विकास करण्याचा करार झाला होता. या कामाबद्दल विकासकाला २२ हजार चौ.मीटर क्षेत्र दिले जाणार होते. (२.३७ लक्ष चौ.फूट). यामध्ये पीडब्ल्यूडीने एसआरएला बांधकाम जस जसे होईल तस तशी एनओसी द्यावयाची आहे. अद्यापि विकासकाला सर्व एनओसी देण्यात आलेल्या नाहीत. या संपूर्ण प्रोजेक्टसाठी प्लॅनिंग ॲथोरिटी एसआरए असणार आहे. पीडब्ल्यूडीने यामध्ये ३ बांधकामे १०० कोटी रुपयांमध्ये करुन घ्यावयाची असून कामाच्या प्रगतीप्रमाणे प्रमाणपत्र द्यावयाची आहेत.

त्यावेळेस टीडीआरचे रेट काय होते अशी समितीने विचारणा केली असता विभागाने खुलासा केला की, त्यावेळेस १८०० रुपये टीडीआरचे रेट होते. सन २०१४ मध्ये टीडीआरचे रेट साधारणत: ३००० च्या आसपास आहेत. हे रेट एरियावाईज कमी जास्त होत असतात. अंधेरी विभागामध्ये आजचा टीडीआरचे रेट ५००० च्या वर गेलेला आहे. दिल्लीचे महाराष्ट्र सदन, हायमाऊंट आणि आरटीओचे बांधकाम ३ लक्ष चौरस फुटाचे आहे. दिल्लीचे बांधकाम

१.७० लक्ष चौ.फूट, हायमाऊंट ४७ हजार चौ.फूट व अंधेरी आरटीओ बांधकाम ७० हजार चौ.फूटाचे आहे. हे सर्व बांधकाम बिल्टअप आहे म्हणजेच विकासकाने १०० कोटी रुपयांमध्ये जवळपास ३ लक्ष चौ. फूटाचे बांधकाम करुन द्यावयाचे होते. आतापर्यंत २ लक्ष चौ. फूटाचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. या बांधकामामध्ये निवासी इमारत ४० हजार चौ.फूटाची आहे. अजून ८७ हजार चौ.फूटाचे काम शिल्लक आहे. परंतु आता हायमाऊंटचे फिनिशिंगचे काम सुरु आहे.

काम पूर्ण न झाल्यामुळे विकासकाला काही पेनल्टी लावण्यात आलेली नाही. जुनी ३३(१०) ची योजना होती त्याचे काम अद्यापि सुरु झालेले नाही. यामध्ये २६९ चौ.फूटाचे गाळे एसआरएसाठी आहेत. २००९ मध्ये विकासकाने हौसिंगसाठी जे प्रपोजल सादर केले होते त्याचे ॲप्रूव्हल एप्रिल, २०१३ मध्ये मिळाले आहे.

आरटीओचा टोटल भूखंड ४ लक्ष चौ.फूटापर्यंतचा आहे या ४ लाख चौ.फूटाच्या अगेन्स्ट विकासक केवळ ७३ हजार चौ.फूटाचे बांधकाम करुन देणार आहे खरे पहाता आरटीओचा भूखंड ४ लक्ष चौ.फूटाचा असून त्यामध्ये १ एफएसआय जरी धरला तरी ते अधिकचे ४ लाख चौ.फूट होते. एकंदर हे क्षेत्र ८ लक्ष चौरस फूट होते, त्यामुळे विकासकाने अधिकचे बांधकाम परिवहन विभागाला करुन द्यावयास पाहिजे होते. याबाबत विभागाने खुलासा केला की, यामध्ये सर्व बाबीचे डिडक्शन धरता २९ हजार चौ.मीटर एवढा एफएसआय उपलब्ध होऊ शकतो. यामध्ये आरटीओच्या ७० हजार चौरस फूटाच्या गरजा पूर्ण करीत आहोत.

शासनाला एकंदर ४ लक्ष चौ.फूटाचे बांधकाम करुन द्यावयास पाहिजे होते. आजपर्यंत आरटीओला टेस्ट ट्रॅकसह एकंदर किती चौ.फूटाचे बांधकाम करुन मिळाले आहे तसेच या ४ लक्ष चौ.फूटाच्या जागेवर १ एफएसआय घेतला तर ८ लक्ष चौ.फुटाचे बांधकाम होऊ शकते. रस्ते वगैरे धरले तरी सुध्दा आपल्याला ८ लक्ष चौ.फूटाचे बांधकाम करता आले असते. या ठिकाणी आपल्याला १.१० लक्ष चौ.फूट बिल्टअप क्षेत्र मिळाले आहे. परिवहन विभागाचा ८ लक्ष एरिया हा कार्पेट एरिया आहे. विकासक केवळ १.१० चौ.फूटाचे बिल्टअप बांधकाम करुन देणार आहे. परिवहन विभागाने स्वत: हे काम केले असते तर अंधेरीमध्ये त्यांना ९.६० लक्ष चौरस फूटाचे बांधकाम मिळाले असते. अंधेरीचा रेट १० हजार प्रती चौ.फूट जरी धरला तरी त्यांना ९६०० कोटी रुपयाचा प्रोजेक्ट उभा करता आला असता परिवहनने रोड साईडला बांधकाम केले असते तर आरटीओ कार्यालयाची वापराची जागा वजा जाऊन अतिरिक्त २ ते ४

लक्ष चौ.फूटाची जागा भाडयाने देता आली असती. भाड्यापोटी महाराष्ट्रातील सर्व स्टाफचा दर महिन्याच्या पगाराचा प्रश्न सुटला असता.

अद्यापि १.१० चौ.फूटाचे बांधकाम अपूर्ण आहे. यामध्ये ऑफिस बिल्डिंग ७० चौ.फूटाची असून रेसिडेशिंअल बिल्डिंग ४० हजार चौ.फूटाची आहे. आरटीओला एकंदर १.१० लक्ष चौ.फुटच जागा मिळणार आहे. महाराष्ट्र सदनाचे काम १.७० लाख चौ.फूटाचे असून ते काम सुध्दा अपूर्ण आहे.

अंधेरी आरटीओचा ४० हजार चौ.मीटरचा भूखंड असला तरी त्यांना ३० हजार चौ.मीटरच्या जागेची आवश्यकता होती. परंतु मुंबई उपनगरात सीव्हील एव्हीएशनचे रेस्ट्रीक्शन असल्यामुळे आपणाला २२ मजली इमारतीचे बांधकाम करता आले असते. सध्या अंधेरी आरटीओचे बांधकाम केवळ ५ मजली आहे. परंतु परिवहनने बांधकाम करावयाचे ठरवले असते तर त्यांना २२ मजल्यापर्यंत बांधकाम करता आले असते. २२ वा मजला देखील भाडयाने जात असतो. यामध्ये आरटीओने स्वत:चे नुकसान करुन घेतलेले आहे.

प्रशासकीय इमारतीचे बांधकाम ७०,००० स्क्वे.फु., निवासी गाळयांच्या इमारतीचे बांधकाम ४०,००० स्क्वे.फु.इतके करावयाचे ठरलेले होते. निवासी गाळयांची इमारत २२ मजली टॉवर संरचनेमध्ये करणे आवश्यक होते. या निवासी गाळयांच्या इमारतीच्या बाजूला एक मॉलही आहे. यामुळे आरटीओचा लॉस झालेला आहे. याबाबत समितीने महालेखाकारांना अभिप्राय देण्यास सांगितले असता त्यांनी पुढील प्रमाणे अभिप्राय दिले.

इसमें आरटीओ का लॉस हुआ है. यह जमीन आरटीओ की थी. मुंबई में जमीन के दर बहुत ज्यादा है. केवल जमीन का ही विचार किया जाए तो आरटीओ का लॉस काफी ज्यादा है और इसको कॅलक्युलेट नहीं किया जा सकता. दूसरी बात एफएसआई संबंधी है. यहाँ पर २.५ एफएसआई दिया गया है. इतना एफएसआई इलिजिबल नहीं है. Further more, the slum and non-slum plot was merged under provisions of clause 7.7 of Appendix IV appended to DCR 33(10). Since the non-slum area is not a Municipal/MHADA property but a Government plot the merger of slum area with non-slum area was not permissible under DCR 33(7) and DCR 33(10). The provision further stipulates that in respect of merger of slum and non-slum area under any other provision i.e. other than DCR 33(7) and of DCR 33(10), FSI for the non-slum area would be

restricted to that permissible in the surrounding zone. This means that the non-slum plot is eligible for FSI of One instead of 2.5 FSI.

समितीने असे मत व्यक्त केले की, या प्रकरणामध्ये विकासकांच्या संदर्भात टीडीआर, आरटीओ, बांधकाम रेट, परमिसीबल बांधकाम, लॉस इत्यादी सर्व बाबी अहवालामध्ये नमूद करुन शासनाकडे कार्यवाहीसाठी शिफारस करण्यात यावी.

अंधेरी (पश्चिम) येथील झोपडपट्टीने बाधित असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या भूखंड क्र. ८२५/१ (महाराष्ट्र शासन) व ८२५/२ (महाराष्ट्र शासन परिवहन विभागाच्या ताब्यात) यावरील झोपडपट्टीवासियांनी पुनर्वसन योजनेच्या नियमानुसार सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करुन या संस्थेच्या माध्यमातून मे.के.एस. चमनकर यांची झोपडपट्टीचा विकास करण्यासाठी विकासक म्हणून नेमणूक केली व याबाबत त्यांचेबरोबर दिनांक २२/१२/१९९८ व दिनांक २८/१०/१९९९ रोजी करारपत्र केले.

भूखंड क्र.	क्षेत्रफळ	मालकी हक्क	प्रत्यक्ष वापर ताबा	झोपडपट्टी बाधित क्षेत्रफळ	झोपडपट्टी विरहित क्षेत्रफळ	जोड रस्त्यावरील क्षेत्रफळ
८२५/१	२०५७०.७० चौ.मी.	महाराष्ट्र शासन	महसूल विभाग	१३०४३.७० चौ.मी.	११९७.०० चौ.मी.	६३३०.०० चौ.मी.
८२५/२	४०७१६.७० चौ.मी.	महाराष्ट्र शासन	परिवहन विभाग	८१५३.६० चौ.मी.	३२५६३.०० चौ.मी.	

या करारपत्राला अनुसरुन या विकासकांनी सादर केलेल्या पुनर्विकासाच्या प्रस्तावास परिवहन विभागाने त्यांचे दिनांक २६/५/२००३ चे पत्रानुसार दिलेल्या "ना हरकत प्रमाणपत्राला" ग्राह्य धरुन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक २७/१०/२००० रोजीच्या पत्रान्वये मान्यता दिली. या मान्यतेमध्ये भूखंडाचे मूळ कब्जेदार शासनाचा परिवहन व महसूल विभाग असल्याचे विभागाच्या लेखी खुलाशावरुन दिसून येते. यामध्ये परिवहन विभागाला ३२५१.५८ चौ.मी. (३४९८७ चौ.फु.) बांधकाम क्षेत्रफळाच्या तळ+१ मजल्याच्या कार्यालयीन इमारतीचे बांधकाम याच भूखंडामधील झोपडपट्टी विरहीत भागावर करुन द्यावयाचे निश्चित झाले होते.

परिच्छेद क्र. ३.३.३ "शासनास नुकसान व विकासकास गैरवाजवी फायदा" परिच्छेद क्र. ३.३.४ मध्ये "खाजगी विकासकास गैरवाजवी फायदा" या दोन्ही परिच्छेदाबाबत महालेखाकार यांनी पुढीलप्रमाणे तीन मुद्दे समितीसमोर उपस्थित केले आहेत.

(१) कामाची निविदा न मागविता विकासकास काम देण्यात आले.

(२) विकासकास मिळणाऱ्या नफ्याची परिगणना व्यवस्थित झालेली नाही.

(३) या प्रकल्पामध्ये विकासकास प्रचलित नियमापेक्षा जास्त फायदा देण्यात आलेला आहे.

नगर भूमी क्रमांक ८२५/१ आणि ८२५/२ असे दोन शासकीय भूखंड आहेत. त्यातील ८२५/१ हा भूखंड शासनाचा आणि ८२५/२ हा भूखंड राज्य परिवहन कार्यालयाचा आहे. या दोन भूखंडावर झोपडपट्टी असल्यामुळे हे दोन्ही भूखंड एकत्र करुन एसआरए योजनेअंतर्गत पुनर्विकासाची प्रक्रिया सुरु करण्यात आली व यासाठी मे. चमणकर हे विकासक होते. ज्यावेळी एसआरएची प्रक्रिया सुरु करण्यात आली त्यावेळी भूमी क्रमांक ८०२ संबंधी आरटीओ आणि विकासक यांच्यामध्ये अटी व शर्ती निश्चित करण्यात आल्या. त्यावेळी ३१७९.४९ चौ. मी. चटई क्षेत्रफळाची तळ मजला+१ इमारत बांधून देण्यास सांगितले होते. त्यानंतर परिवहन विभागाने पुन्हा असे सांगितले की त्यांची आवश्यकता जास्त असून त्यांना आणखीन दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्याची आवश्यकता आहे. तसेच टेस्टिंग ट्रॅक आणि निवासी वसाहत लागणार आहे. हे काम वेगवेगळे टेंडर काढून करण्यात आलेले नाही. एसआरएच्या नियम ३३(१४) अंतर्गतच हे काम सुरु झाले. डीसी रुल्स मध्ये दोन भूखंड एकत्र करण्याची तरतूद नसताना भूखंड एकत्र करून काम करण्यात आलेले आहे.

एस.आर.ए. योजना राबविण्याचे निकष असे आहेत की, जेवढा भूखंड असतो तेवढ्याच जागेवर एस.आर.ए. योजना राबविली जाते. एस.आर.ए योजना राबविण्यापूर्वी त्या जागेवर झोपड्या असतील तर ती जागा झोपडपट्टी म्हणून घोषित करावी लागते. तथापि जिल्हाधिकाऱ्यांनी ही जागा झोपडपट्टी म्हणून घोषित केल्याचे समितीला दिसून आले नाही. भूखंड क्रमांक ८२५/१ याबाबत असे नमूद करावयाचे आहे की, हा भूखंड महसूल विभागाचा असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने आपल्या लेखी खुलाशात नमूद केले आहे. यावर अतिक्रमण मोठ्या प्रमाणात झाले असून या भूखंडावर एस.आर.ए. योजना राबविताना (१) महसूल विभाग (२) गृहनिर्माण विभाग व (३) नगरविकास विभाग या तीन विभागाचा संबंध येतो. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून लेखी प्राप्त झालेला खुलाशावरुन यांच्याशी केवळ गृहनिर्माण व नगरविकास विभागाचा संबंध असल्याचे दिसून येते. महसूल विभागाचा यात सहभाग असल्याचे समितीला साक्षीच्या वेळी सांगण्यात आले नाही. या भूखंडावर १३०४३.७० चौ.मी. एवढे क्षेत्रफळ झोपडपट्टीबाधित आहे. झोपडपट्टी विरहीत व जोडरस्त्याखालील क्षेत्रफळ ७५२७.०० एवढे आहे. महसूल विभागाच्या निम्म्यापेक्षा जास्त क्षेत्रफळ जागेवर इ

ोपडपट्टीवासियांनी अतिक्रमण केलेले आहे. शासनाच्या जागेवर अतिक्रमण करताना संबंधित जिल्हाधिकारी यांनी झोपडपट्टी वासियांना विरोध केला नाही किंवा झोपडपट्टी विरहीत जागेवर शासनासाठी इमारत किंवा अन्य बाबींसाठी विकासकाकडे साधी मागणी देखील केलेली नाही असे समितीला दिसून आले. महसूल विभागाच्या अखत्यारित असलेल्या जागेवर अतिक्रमण होत असल्याचे निदर्शनास येऊन देखील संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी अतिक्रमण रोखण्यासाठी वा झालेले अतिक्रमण हटविण्यासाठी कोणतीही कार्यवाही केल्याचे समितीच्या निदर्शनास आले नाही. यावरुन मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल विभागाचे अधिकारी यांची निष्क्रियताच दिसून येते. यावरुन **महसूल विभागातील मुंबई उपनगर जिल्हाधिकारी व तत्संबंधीचे अधिकारी यांनी कर्तव्यात कसूर केलेली असल्याचे समितीचे स्पष्ट मत असल्यामुळे समिती शासनाच्या अधिकाऱ्यांच्या उदासीन व निष्क्रिय भूमिकेबद्दल नाराजी व्यक्त करते व या प्रकरणी दोषी असलेल्या संबंधित तत्कालिन अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

भूखंड क्रमांक ८२५/२ हा परिवहन विभागाच्या ताब्यात असून यावर ८१५३.६० चौ. मी. झोपडपट्टी वासियांनी अतिक्रमण केलेले आहे. या प्रकरणी देखील परिवहन विभागाचा प्रत्यक्ष ताबा असताना त्यावर झोपडपट्टीवासियांच्या अतिक्रमणास परिवहन विभागाचे अधिकारी जबाबदार आहेत असे समितीच्या निदर्शनास आले. त्यांनी शासनाची मालमत्ता म्हणून त्याकडे दुर्लक्ष केलेले असल्याचेही समितीचे मत आहे. याप्रकरणी जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

सुरुवातीला नियम ३३(१०) अंतर्गत एसआरए योजना कार्यान्वित झाली. जेव्हा आरटीओची आलेली अधिक मागणी पूर्ण कशी करायची हा मुद्दा पुढे आला त्यावेळी विकासकाने मर्झबान रोड आणि अंधेरी येथील जागा द्यावी व त्या बदल्यात प्रशासकीय इमारतीचे अतिरिक्त मजले, कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठी निवासस्थाने बांधण्याची अट पूर्ण करण्याचे ठरविण्यात आले. याबरोबरच नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदन, हायमाऊंट अतिथीगृह, मुंबई या दोन इमारती तसेच प्रकल्पबाधित लोकांसाठी २२५ चौ.फुटाची एक हजार घरे विकासकाने बांधून द्यावीत या प्रमाणे आर्थिक आराखडा तयार करण्यात आला व या

बदल्यात विकासकाला अंधेरी येथील सेलेबल जागा देण्यात आली. यासंपुर्ण कामाची शासकीय निविदा मागविणे आवश्यक असतांना तसे करण्यात आले नाही. त्यामुळे या विकासकापेक्षा अधिक लाभ देण्याचा दुसऱ्या कोणात्याही विकासकाचा सदरहू प्रकरणी विचारही झाला नाही. तशा प्रकारचा शेराही वित्त विभागाने नस्तीवर दिलेला होता. सार्वजनिक बांधकाम विभागाने निविदा प्रक्रियेशिवाय विकासकास शासनाच्या महत्वाच्या जागा विकसित करण्यास परवानगी दिली असून त्यांनी यामाध्यमातून विकासकास होणाऱ्या नफ्याकडे व शासनास होणाऱ्या आर्थिक नुकसानीकडे पूर्णतः दुर्लक्ष केल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. शासनाच्या एखाद्या जागेचा पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर करताना यात शासनास अधिक फायदा कसा मिळेल यादृष्टीने विभागाच्या अधिकाऱ्यांनी विचार करणे आवश्यक आहे. परंतु खेदाने असे नमूद करावेसे वाटते की, या संपूर्ण प्रकरणी केवळ खाजगी विकासकाचा फायदाच विचारात घेण्यात आला व तशा प्रकारचाच प्रस्ताव बांधकाम विभागाकडून शासनास सादर करण्यात आला. **या सर्व कामामध्ये विकासकाला ५५ टक्के फायदा होणार असल्याचा महालेखाकारांचा आक्षेप आहे. याप्रकरणी विकासकास अवाजवी व नियमबाह्यरित्या सहाय्य केल्याचे समितीचे मत आहे. तसेच महालेखाकारांनी घेतलेल्या आक्षेपासही समिती पुर्ण सहमत आहे. अतः भविष्यात अशा स्वरुपाचे प्रकल्प राबविताना सार्वजनिक बांधकाम विभागाने केवळ शासनाचा नफा याच दृष्टिने नियोजन करणे आवश्यक आहे. यात विकासकाला झुकते माप देण्याची कुठलीही भूमिका सार्वजनिक बांधकाम विभागाकडून घेणे अपेक्षित नाही. शासनाचे नुकसान होणार नाही याबाबीचा विचार करुन सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत शासनास प्रस्ताव सादर करण्याची दक्षता घ्यावी अशी समितीची शिफारस आहे.**

अंधेरी येथील भूखंड क्र. ८२५/१ व ८२५/२ मध्ये विकासकास ५५ टक्के फायदा होणार असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. प्रचलित नियमानुसार विकासकास केवळ २० टक्क्यापर्यंत फायदा मिळेल यादृष्टीने शासनाने विचार करणे आवश्यक आहे. विकासकाला यात एकूण २६.४० टक्के इतका फायदा होणार असल्याबाबत वित्त विभागाने देखील साक्षी दरम्यान अभिप्राय नोंदविलेले आहेत. परंतु या विकासकास प्रमाणापेक्षा जास्त नफा होणार असल्याचे दिसून येत आहे असे महालेखाकार यांना त्यावेळीही आणि आताही वाटते. या संदर्भात वित्त विभाग व संबंधित विभागाने योग्य वेळी योग्य कारवाई करणे अपेक्षित व

आवश्यक होते असे समितीचे मत आहे. "There has to be competitive bidding in transparent manner" अशा प्रकारचा शेरा वित्त विभागाने देखील त्यावेळी नस्तीवर दिला होता.

विकासकाला यात केवळ ७३ कोटी रुपयांचा फायदा नसून तो त्यांपेक्षा कित्येक पटीने जास्त होणार आहे. सध्या बाजारातील विक्री करण्यात येणाऱ्या बांधकामाचा विचार केल्यास मूळ बांधकामावर ४० टक्के अधिक भार टाकून त्याची विक्री केली जाते व बाजार भावाचा विचार केल्यास शासनाच्या बांधकामाच्या विक्रीची किंमत व खुल्या बाजारातील बांधकामाच्या विक्रीची किंमत यामध्ये कमालीची तफावत आहे. महालेखाकारांच्या मते ७३.४५ कोटी रुपयांच्या फायद्याशी याचा कोणताही ताळमेळ बसू शकत नाही. या प्रकरणाच्या घटनाक्रमात महसूल विभागाचे अभिप्राय घेतल्याचे दिसून येत नाही. परिवहन विभागाने जास्तीत जास्त फायदा करुन घेण्याचा विचार केला असला तरी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली जागा व त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाने खाजगी विकासकामार्फत करुन दिलेले बांधकाम यामध्ये तफावत असल्याचे दिसून येते. सदर जागा ९९ वर्षे करारावर विकासकास दिलेली असल्याने परिवहन विभागाची मूळ मालकीच या वर्षापर्यंत संपुष्टात आली आहे. विकासकाने शासनाचा भूखंड आणि झोपडपट्टीचा भूखंड एकत्रित केलेला आहे. ८ लाख चौ.फुटामध्ये जवळ जवळ ४० ते ६० टक्के लोडिंग जाईल. एकूण सेलेबल एरिया ८.४० लाख चौ.फू. आहे. त्या भागात सद्य:स्थितीत जागेची किंमत १५ हजार रुपये प्रति चौ. फू. आहे. रुपये १५००० चौ.फू. प्रमाणे ८.४० लाख चौ.फुटाचे १२६० कोटी रुपये होतात हे शासनाचे नुकसानच झाले असल्याचे समितीने मत व्यक्त केले. परिवहन विभाग हा शासनास महसूल मिळवून देणारा विभाग आहे व या विभागाने स्वतंत्रपणे हा भूखंड स्वत: विकसित केला असता तर त्यावर शासनास आजच्या बाजारभावाने जवळजवळ १२६० कोटी रुपये फायदा झाला असता. परिवहन विभागाच्या मालकीचा हा भूखंड असतानाही या विभागाने या संपूर्ण प्रकरणात आपली कुठलीही ठोस व ठाम भूमिका बजावली नाही परिणामी या संपुर्ण प्रकरणामध्ये अनियमितता झालेली असल्याचे समितीचे मत आहे. **या प्रकरणांशी संबंधित म्हाडा, एसआरए, जिल्हाधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग व तत्कालीन अधिकारी, उपठेकेदार यांच्या संदर्भातील नस्त्या मधिल टिप्पणी, शेरे अभिप्राय याबाबतची माहिती व तत्कालीन सचिवांनी सादर केलेल्या टिप्पणीवर तत्कालीन मंत्र्यांनी घेतलेला निर्णय व लिहिलेला शेरा याची माहिती समितीस देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

सध्या अंधेरी आरटीओच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम केवळ ५ मजली आहे. परंतु परिवहन विभागाने हे बांधकाम स्वत: करावयाचे ठरविले असते तर त्यांना २२ मजल्यापर्यंत बांधकाम करता आले असते. तथापि, हा भूखंड विकासकास देण्यास नाहरकत दिल्यामुळे आरटीओने स्वत:चे नुकसान करुन घेतलेले आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. आरटीओचा एकूण भूखंड ४ लक्ष चौ.फूटापर्यंतचा आहे या ४ लाख चौ.फूटाच्या बदल्यात विकासक केवळ ७३ हजार चौ.फूटाचे बांधकाम करुन देणार आहे खरे पहाता, आरटीओचा भूखंड ४ लक्ष चौ.फूटाचा असून त्यामध्ये १ एफएसआय जरी ग्राह्य धरला तरी ते अधिकचे ४ लाख चौ.फूट असे एकूण क्षेत्र ८ लक्ष चौरस फूट होईल. **त्यामुळे विकासकाने अधिकचे बांधकाम परिवहन विभागाला करुन द्यावयास पाहिजे होते. परंतु परिवहन विभागाने देखिल ही बाब गांभीर्याने घेतली नाही. त्यामुळे परिवहन विभागाला मोठ्या महसूलाला मुकावे लागले असून तत्कालीन अधिकाऱ्यांनी यादृष्टीने कोणताही दूरदृष्टीकोन ठेवला नसल्याने परिवहन विभागाचे नुकसानच झाले असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. अत: यामध्ये जबाबदार असलेल्या तत्कालीन अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात यावी व चौकशीत दोषी आढळून आल्यास त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

बांधकाम भवन, फोर्ट व अंधेरी येथील निवासी इमारत आणि प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाच्या बदल्यात शासन विकासकाला जागा देणार आहे. विकासकाने शासनाला बांधकाम करुन दिल्यानंतर विकासक त्याला मिळालेल्या जागेची विक्री करेल. बांधकाम भवन, फोर्ट येथील इमारतीचे व अंधेरी येथील प्रशासकीय इमारतीचे बांधकाम आता पुर्ण झाले आहे व अंधेरी येथील आर.टी.ओ.च्या जागेवर टेस्टींग ट्रॅक व कर्मचाऱ्यांकरीता निवासी इमारत बांधण्याचे काम अद्यापही सुरु झाले नाही. या बांधकामाच्या बदल्यात विकासकाला ८ हजार चौरस मीटर जागा द्यायची होती. विकासकाला बांधकाम भवनाच्या बांधकामाच्या बदल्यात ४ हजार चौरस फुट जागेचे लिज ॲग्रीमेंट करुन दिलेले आहे. विकासकाने त्या जागेवर स्वत:चे कोणतेही बांधकाम केलेले नाही. बांधकामासाठी विकासकाला दिनांक १२.०७.२००७ रोजी वर्क ऑर्डर दिलेली आहे. त्यानंतर बांधकाम पूर्ण करण्यासाठी ३० महिन्यांची मुदत देण्यात आली होती. ती मुदत दिनांक ११ जानेवारी, २०१० रोजी संपलेली आहे. विकासकाला बांधकाम पूर्ण करण्यासाठी जी मुदत देण्यात आली होती ती मुदत संपलेली आहे. विकासकाने मुदत वाढवून देण्याबाबत जो अर्ज सादर केलेला आहे तो समितीने ज्या

दिवशी विभागीय सचिवांची साक्ष घेतली त्या दिवसापर्यंत मंजूर झालेला नाही असे समितीच्या निदर्शनास आले. **या संपूर्ण प्रकरणात अटी व शर्तींचा भंग झालेला असल्यामुळे विकासकाकडून कुठलाही दंड वसूल करण्यात आल्याचे दिसून येत नाही. कराराचा भंग झाल्यास विकासकास दंड आकारण्याची, लवाद (आरबीट्रेटर) नेमण्याची व करार रद्द करण्याची तरतूद करारनाम्यात नाही याची माहिती समितीस देण्यात आली. विकासकास मुदत वाढवून न देता काम करण्यास देणे, करारातील अटी व शर्तींचा भंग केल्यानंतरही कोणत्याही प्रकारची कारवाई न करणे यावरुन असे दिसून येते की, संबंधित अधिकारी विकासकाला मदतच करीत असल्याची समितीला शंका वाटते.**

मुंबई येथिल हायमाऊंट गेस्ट हाऊस संदर्भात समितीने असे नमूद केले की, सदरहू काम मोठे असल्याने विकासकाला अडचणी येतात. असे असले तरी, सदर काम ७ ते ८ वर्ष झ ाले तरी अद्याप पूर्ण करण्यात आले नाही. एवढेच नव्हे तर दंडाची रक्कम देखील आकारण्यात आली नाही. हार्ड रॉक लागल्यामुळे वर्ष-दोन वर्ष ट्रायलपिट फेल होऊ शकते. परंतु, त्यामुळे करारात शासनाच्या बाजूने तसेच नियमानुसार योग्य ते परिच्छेद व अटी समाविष्ट न करणे ही खेदाची बाब आहे. शासन नेहमी स्वत:ची बाजू सुरक्षित ठेवूनच करार करते. डीएसआर नुसार सिमेंट, स्टीलची किंमत नमूद केलेली असते. सदर कामाची कालमर्यादा सन २००८ मध्ये संपलेली आहे. आता हायमाऊंट स्टेट गेस्ट हाऊसच्या बांधकामास ७ ते ८ वर्षाचा कालावधी पूर्ण होवूनही बांधकाम अद्याप पूर्ण करण्यात आले नसल्याने सदर व अन्य ठिकाणच्या बांधकामाबाबत विकासकाबरोबर २ वर्षाचा करार असतानाही वेळोवेळी मुदतवाढ घेणेबाबत कुठलीही कार्यवाही केल्याचे समितीला दिसून आले नाही. तसेच विकासकावर कोणतीही कारवाई केल्याचेही समितीला दिसून आले नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी ही बाब शासनाच्या निदर्शनास न आणल्यामुळे विकासकाकडून नियमबाह्यरित्या काम सुरु होते व करारनाम्यात तशी अट नमूद नसल्यामुळे शासन विकासकाविरुद्ध भविष्यात कोणतीही कारवाई करु शकत नसल्याने या प्रकरणी शासनास प्रचंड नुकसान व हानी झाली असल्याचे व भविष्यातही अधिक हानी होणार असल्याचे समितीचे मत आहे. त्यामुळे याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात यावी व चौकशीत दोषी आढळल्यासच फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यात यावी तसेच विकासकाविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

समितीने नवी दिल्ली येथिल नविन महाराष्ट्र सदनामधील इमारतीच्या कामाची पाहणी केली असता सदर कामामध्ये समितीला दोष आढळून आले. शासनाने जे सल्लागार व वास्तुरचनाकार नेमले आहेत त्यांनी व्यवस्थित काम केलेले नाही. तसेच अद्यापही काम अपूर्ण आहे. यामुळे नवी दिल्ली येथील नविन महाराष्ट्र सदनाच्या कामाचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरीक्षण (थर्डपार्टी ऑडिट) करण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.

नविन महाराष्ट्र सदनाच्या मागिल भागात २० गुंठे जागेवर अतिक्रमण आहे. त्या संदर्भात न्यायालयात केस सुरु आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग त्याबाबत पाठपुरावा करीत आहे. ती जागा मोकळी करुन मिळाली तर पार्किंगसाठी जास्त जागा उपलब्ध होईल. सध्या या ठिकाणी ४० गाड्यांच्या पार्किंगची व्यवस्था आहे. **या ठिकाणी इंजिनियरिंग युनिटची आवश्यकता आहे. सध्या एक सेक्शन अभियंता, बांधकाम आणि एक सहायक अभियंता, विद्युत असे दोनच कर्मचारी कार्यरत आहेत आणि ही संख्या अपूरी असून नविन महाराष्ट्र सदनामध्ये अभियंता व निवासी आयुक्त कार्यालयास सदर इमारतींच्या देखभालीसाठी पुरेसे कर्मचारी व अधिकारी तातडीने वाढवून देण्यात यावेत तसेच या भव्य इमारतीच्या देखभाल दुरुस्तीसाठी शासनाकडून वाढीव निधी देण्यात यावा तसेच खाजगी स्त्रोताच्या माध्यमातूनही सदर इमारतीच्या देखभाल दुरुस्तीसाठी निधी जमा करता येईल किंवा कसे ते पहावे अशीही समितीची शिफारस आहे.**

कोणतीही इमारत किंवा कोणतेही काम पूर्ण झाल्याशिवाय ताब्यात घेतले जात नाही. इमारत अपूर्ण असताना सार्वजनिक बांधकाम विभागाने ती ताब्यात घेतली आणि इमारत ताब्यात घेतल्याचे पत्र राष्ट्रपती भवनकडे पाठविले. देशाच्या सर्वोच्च पदी असलेल्या व जे तिन्ही संरक्षण दलाचे प्रमुख आहेत अशा महामहिम राष्ट्रपतींच्या हस्ते अपूर्णावस्थेत असलेल्या वास्तूचे उद्घाटन करणे ही बाब त्यांच्या प्रतिष्ठेचा अवमान करणारी आहे. वास्तविक पहाता कोणत्याही वास्तूचे उद्घाटन महामहिम राष्ट्रपतींच्या हस्ते करावयाचे असेल तर त्याआधी ती वास्तू परिपूर्ण झालेली आहे किंवा सर्व कागदपत्रांची पूर्तता झालेली आहे किंवा नाही इत्यादी बाबी तपासल्यानंतरच उद्घाटनाची तारीख निश्चित केली जाते. काम अपूर्ण असलेल्या वास्तूचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करणे ही बाब अवमानकारक असल्याचे समितीचे मत आहे. हार्डवेअर, सॉफ्टवेअर, लॅन कनेक्शन, वायफाय कनेक्शन इत्यादी आय.टी. इन्फ्रास्ट्रक्चरची कामे बऱ्याच प्रमाणात अपूर्ण होती. हे काम वेळेत पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी प्रोजेक्ट

मॅनेजमेंट कन्सलटंट आणि विकासक अशी दोघांचीही होती. प्रोजेक्ट मॅनेजमेंटला फी शासनाकडून दिली जाते त्यामुळे कामे पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी शासनाच्या वतीने पीएमसीची होती. पीएमसीला शासनाचा फायदा करुन देण्यासाठी नेमलेले असते. शिवाय दर्जेदार काम करून घेण्याची जबाबदारी त्यांची असते. यामध्ये शासनाचे नुकसान झालेले आहे. उपरोक्त संपुर्ण प्रकरणावरुन समितीला असे दिसून येते की, **शासनाने जे वास्तुरचनाकार व सल्लागार नेमलेले आहेत त्यांनी शासनाची बाजू घेण्याऐवजी ते कंत्राटदाराची बाजू घेत आहेत. त्यांच्याकडून वेळेत काम पूर्ण करून घेत नाही तसेच त्यांच्यावर अपूर्ण कामाबाबत कोणतीही कारवाई करण्याची शिफारस देखील शासनाकडे करत नाहीत. त्यामुळे शासनाने या कामासाठी जे सल्लागार व वास्तुरचनाकार नेमलेले आहेत व ज्यांनी आपली जबाबदारी पूर्ण केलेली नाही त्यांच्यावर कारवाई करून समितीला ३ महिन्यात अहवाल सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

समितीने ज्यावेळी आरटीओ, अंधेरी, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे भेट दिली होती, त्यावेळी जी कामे अपूर्ण होती, ती सर्व कामे लवकरच उद्घाटनापूर्वी पूर्ण करण्यात येतील असे समितीला भेटीदरम्यान सांगण्यात आले होते. दोन्ही इमारतींचे उद्घाटन झालेले असतांनाही इमारतींची काही कामे अपूर्ण आहेत, ही बाब अयोग्य आहे. समितीने भेट दिल्यानंतर सात ते आठ महिने उलटून गेल्यानंतरही या कामांमध्ये प्रगती झालेली नव्हती. **आरटीओ इमारतीशेजारील रस्ता लोकांकरिता खुला करण्याबाबत समितीने सांगितले असतानाही तो रस्ता अद्यापही लोकांकरिता खुला केलेला नाही. या व अशा अनेक त्रुटी या संपूर्ण प्रकरणात समितीला आढळून आल्या आहेत. नवीन महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली, आरटीओ इमारत, अंधेरी येथील कामासंदर्भात सद्य:स्थितीत ज्या त्रुटी आहेत त्याविषयक व अपूर्ण कामाबाबतची माहिती समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

एसआरए प्रोजेक्टमधून विकासकास मिळणारा एफएसआय, टीडीआर, आरटीओ इमारतीची कन्स्ट्रक्शन कॉस्ट, हायमाऊण्ट अतिथीगृहाची कन्स्ट्रक्शन कॉस्ट, नवीन महाराष्ट्र सदनाची कन्स्ट्रक्शन कॉस्ट आधी किती होती आणि आता किती झालेली आहे या सर्व गोष्टीचे मुल्यमापन करुन तसेच निवासी दर, कमर्शियल दर, ऑफिस दर यामध्येझालेली वाढ लक्षात घेता **विकासकाला मिळणाऱ्या भूखंडावर इमारत बांधल्यानंतर त्यामधून त्याला होणारा नफा**

याची आकडेवारी तसेच रेडी रेकनर बरोबरच सध्या जो मार्केट रेट आहे त्या अनुषंगाने सर्व ताळमेळ करुन त्याबाबतची माहिती तातडीने सार्वजनिक बांधकाम विभागाने महालेखाकार कार्यालयाकडे सादर करावी व महालेखाकार कार्यालयाकडून याची तपासणी करुन सदर माहिती समितीस ३ महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने हा जो प्रस्ताव तयार केला आहे त्यात नियमांचे काटेकोर पालन होणे आवश्यक होते. या संपूर्ण प्रकरणाची एक नस्ती परिवहन विभागाकडे असणे आवश्यक होते परंतु यामध्ये कुठलीही मान्यतेबाबतची कागदपत्रे वा नस्ती परिवहन विभागाकडे नसल्याचे साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास विभागीय सचिवांमार्फत आणण्यात आले ही बाब अत्यंत गंभीर आहे.

अंधेरी येथिल आरटीओ कार्यालय, नवी दिल्ली येथिल नवीन महाराष्ट्र सदन व मुंबईतील हायमाऊंट स्टेट गेस्ट हाऊस या सर्व कामामध्ये अनियमितता झाल्याचे महालेखाकारांनी आपल्या अहवालात नमूद केले आहे. याबाबत समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली, लेखी माहिती मागविली व प्रत्यक्ष कामाची पहाणी केली. यामध्ये समितीला असे आढळून आले की, सदर प्रकल्प विकासकास देताना व त्यांच्याकडून काम करून घेताना नियमाचे पालन केले नाही. काही अधिकाऱ्यांनी या कामामध्ये हयगय केलेली आहे. योग्य करारनामा न करताच मुदतवाढ दिली गेली आहे. परिणामी शासनाचे प्रचंड नुकसान झालेले आहे. या संपूर्ण प्रकरणात आरटीओचा काही हजार कोटी रुपयांचा फायदा होऊ शकला असता मात्र काही चुकीच्या निर्णयामुळे तो होऊ शकलेला नाही. आरटीओचे निवासी व टेस्टींग ट्रॅकचे काम पूर्ण झाले नाही. ही कामे अर्धवट स्थितीत आहेत. **कामाचा दर्जा देखील चांगला नाही. टेंडर काढले गेले नाही, गृहनिर्माण, एसआरए, कॉर्पोरेशन विभागांशी लिंक अप करूनही शासनाच्या या विभागांना कोणताही फायदा झालेला नाही. तसेच या माध्यमातून शासनाला अपेक्षित आर्थिक लाभ मिळाला नाही. या प्रकरणी केवळ विकासकाला जास्त आर्थिक लाभ झाल्याचे निदर्शनास आले आहे. विकासकाला या प्रकरणात होणाऱ्या निव्वळ नफ्याची रक्कम ही ५ ते ६ हजार कोटी रूपये असेल असे समितीचे मत आहे. ही रक्कम यापेक्षाही अधिक असण्याची शक्यता आहे. या सर्व बाबींमुळे संपूर्ण प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करून सहा महिन्याच्या आत या संदर्भातील अहवाल सादर करावा तसेच हे प्रकरण आंतरराज्य**

असल्याने व संबंधित कामाची व्याप्ती राज्याबाहेर असल्याने एसआयटीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर लगेचच हा तपास सीबीआयकडे द्यावा अशी समितीची शिफारस आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००८-०९ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ३.४.१ "निधीची अडवणूक" यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिलेले आहेत.

निधीची अडवणूक

शासनाने शिवाजी विद्यापीठास त्यांच्या उपयोगाकरिता सिंथेटिक ट्रॅक तयार करण्याकरिता कोणतेही वेळेचे बंधन न घालता अनुदान मंजूर करुन उपलब्ध करुन दिल्यामुळे तसेच जागेचे अयोग्य सर्वेक्षण आणि जागा निश्चित करण्यासाठी विद्यापीठाने वाया घालावलेला वेळ ह्यामुळे रु. १.१७ कोटीचा निधी पाच वर्षाहून जादा काळाकरिता पडून होता.

उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन ह्यांनी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना त्यांच्या क्षेत्रामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्याकरिता एक आंतरराष्ट्रीय दर्जाची ४०० मीटर लांबीची सिंथेटिक धाव पट्टी बांधण्याकरिता रु. १.८० कोटीचा निधी मंजूर केला होता (मार्च, २००४). त्याचप्रमाणे संचालक उच्च आणि तंत्र शिक्षण, पुणे यांनी रु. १.१७ कोटी इतक्या रकमेचा पहिला हप्ता (रु. १.८० कोटीच्या ६५ टक्के) विद्यापीठास अदा केला (मे, २००४). तथापि, मंजूरी आदेशात मुंबई वित्त नियम, १९५९ प्रमाणे सदर निधी वापरात आणण्यासाठी आवश्यक असलेली वेळेची मर्यादा नमूद केलेली नव्हती.

विद्यापीठाच्या अभिलेख्यांची छाननी केली असता असे आढळून आले की विद्यापीठाने तपशीलवार अंदाज मिळाल्यानंतर सदर काम फक्त ठेव काम (Deposit work) म्हणून करण्याकरिता का. अ. राष्ट्रीय मार्ग विभाग, VII कोल्हापूर यांचेकडे रु. ४७.९६ लाख इतकी रक्कम ठेव म्हणून ठेवले (ऑगस्ट, २००६). ही कारवाई विद्यापीठाने त्यांच्या ऑक्टोबर, २००४ च्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार केली होती. विद्यापीठाने ह्या कामाकरिता निवडलेली जागा पाणी तुंबून राहण्याची शक्यता आलेली होती. त्यामुळे विद्यापीठ प्राधिकाऱ्यांनी वेगवेगळ्या खेळाडू तज्ञांशी आणि जनतेशी विचारविनिमय करुन विद्यापीठीय क्षेत्रामध्ये जेथे पाणी साठण्याची शक्यता नाही आणि जनतेला सोयीचे होईल अशा ठिकाणी नवीन क्रिडा समूह बांधण्याचे ठरविले (जानेवारी, २००८). त्यानुसार ह्या कामाकरिता रु. ५.५१ कोटी इतक्या रकमेचे अंदाजपत्रक का. अभियंत्याकडून एप्रिल, २००८ मध्ये सादर करण्यात आले.परंतु अंदाजपत्रकीय खर्च हा मंजूर निधीपेक्षा खूप अधिक असल्यामुळे विद्यापीठीय इमारत आणि बांधकाम समितीने एप्रिल, २००८ मध्ये सुधारित प्रस्ताव सादर करण्याचे ठरविले. तदनंतर

का.अभियंत्याकडून सादर केले गेलेले रु. २.५५ कोटीचे सुधारीत अंदाजपत्रक समितच्या ऑगस्ट, २००८ मध्ये झालेल्या बैठकीत प्रशासकीय दृष्ट्या संमत करण्यात आले. मे, २००९ पर्यंत निविदा कार्यपध्दती प्रगतीपथावर होती.

ह्याप्रमाणे शासनाकडून विद्यापीठास वापरासाठी कोणतेही वेळेचे बंधन न घालता जे मंजूर अनुदान दिले गले तसेच जागा निवडीसाठी अपुरे सर्वेक्षण आणि जागा निश्चित करण्यासाठी विद्यापीठाकडून झालेला विलंब ह्या सर्व बाबींमुळे शासनाचा रु. १.१७ कोटीचा निधी पाच वर्षाहून जादा काळाकरिता विनावापर अडकून पडला होता. शिवाय, खेळांसाठी दृष्टीक्षेपात असलेल्या आणि होऊ घातलेल्या ह्या अद्ययावत सोयी सुविधेतून अंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण करण्याचे स्वप्न दुरावले गेले.

ही बाब शासनाच्या सचिवाकडे एप्रिल, २००९ ला पाठविली होती. अद्याप उत्तर आले नव्हते (ऑक्टोबर, २००९).

ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात उच्च व तंत्रशिक्षण विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये असे नमूद करण्यात आले की,

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००८-२००९ च्या लेखा अहवालातील परिच्छेद क्र. ३.४.१ मध्ये उपस्थित केलेले लेखा आक्षेप वस्तुस्थितीवर आधारित आहेत. त्यामुळे सदर लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने शासनाकडून खालीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे.

सदर प्रकरणी शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा संकुलामध्ये सिंथेटिक ट्रॅक तयार करण्याच्या दृष्टीने प्राप्त झालेल्या अहवालानुसार सर्व बाबींचा विचार करून शासनाच्या क्र. एसयुके-२००३/(१५४/०३)/विशि-५ दि.३१ मार्च, २००४ च्या निर्णयानुसार रु.१८०.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित झाला व त्यापैकी विद्यापीठाला पहिला हप्ता रु. ११७.०० लक्ष एवढा निधी संचालक, उच्च शिक्षण यांच्या माध्यमातून दि.२८.५.२००४ रोजी वितरीत करण्यात आला.

या अनुषंगाने असेही नमूद करण्यात येते की, शिवाजी विद्यापीठाने सदर सिंथेटिक ट्रॅकच्या बांधकामासाठी नेमलेल्या तज्ञ समिती, नामवंत खेळाडू, पालक व लोकप्रतिनिधी यांचेशी विचारविनिमय करून नवीन जागा निश्चित करण्यात आली. कारण विद्यापीठ परिसरातील सध्या अस्तित्वातील मैदान सकल भागामध्ये असून ते नैसर्गिक पाण्याच्या

प्रवाहामध्ये असल्याने, तेथे पाणी तूंबून राहून मातीच्या थरावरती पाण्याच्या ओलाव्याचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे सिंथेटिक ट्रॅकला हानी होण्याची शक्यता वर्तवली होती. म्हणून वर नमूद केल्याप्रमाणे प्रारंभी निवड केलेल्या जागेऐवजी अन्य ठिकाणी क्रीडा संकुल बांधून त्यामध्ये सिंथेटिक ट्रॅक बांधण्याचा खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

(१) सध्याच्या अस्तित्वात असलेल्या माती ट्रॅक वरती पाण्याच्या ओलाव्याचा प्रश्न निर्माण झाल्याने सदरची जागा बदलण्यात यावी.

(२) विद्यापीठ परिसरामध्ये आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुल बांधण्यात यावे. विद्यापीठाच्या पूर्वेकडील रिकाम्या जागेमध्ये अभियांत्रिकी संस्था बांधणार असल्यामुळे व त्या विद्यार्थ्यांसाठी क्रीडागणांची आवश्यकता असल्याने नवीन सिंथेटिक ट्रॅक विद्यार्थ्यांना उपयोगी ठरेल. तसेच सदरचे क्रीडा संकुल सार्वजनिक वापरास सुध्दा उपलब्ध व्हावे असे ठरले.

(३) अस्तित्वातील मातीच्या ट्रॅक चांगल्या स्थितीत असल्यामुळे तो आहे तसाच वापरण्यात यावा.

त्यानुसार दि. ३ ऑगस्ट, २००६ रोजी कार्यकारी अभियंता राज्य महामार्ग वि.क्र.७ कोल्हापूर यांना शासनाकडून मंजूर करण्यात आलेल्या रू.११७ लक्ष पैकी रू.४७.९६ लक्ष एवढी रक्कम तसलमातपोटी वर्ग करून "ठेव बांधकामे" या लेखाशिर्षाखाली सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी कळविण्यात आले. त्यानुसार विद्यापीठाच्या बांधकाम समितीने उक्त कामास मान्यता दिल्यानंतर जुलै, २००९ रोजी जमिन सपाटीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. आतापर्यंत सिंथेटिक ट्रॅकच्या पायाच्या कामासाठी आवश्यक असणारी कामे पूर्ण झाली असून सदर जागेचे सपाटीकरण करणे, ४०० मीटर लांबीचे ८ लाईन्ससाठी पायाची खोदाई करून त्यातून निघालेले साहित्य भरावासाठी वापरून जमिन सपाटीकरणाचे काम पूर्ण झालेले आहे. त्यावर रू. ४४.४५ एवढा खर्च करण्यात आला आहे.

सदर बांधकामासाठी आवश्यक असलेल्या अतिरिक्त निधीचा रू. २५५.०० लक्ष एवढ्या रक्कमेचे सुधारीत अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाने दि. १८.७.२००८ रोजी विद्यापीठास सादर केले. सदर सुधारीत अंदाजपत्रकाच्या रू. २५५. लक्ष एवढ्या रक्कमेच्या कामास विद्यापीठाच्या बांधकाम समितीने दि.६.८.२००८ रोजी मान्यता प्रदान केली. त्यानंतर उक्त कामाची सुरुवात जुलै, २००९ पासून करण्यात आली आहे. सदर अतिरिक्त निधीची

मागणी केंद्र शासनाकडून करण्यात आली असून सदर निधी/ अनुदान केंद्र शासनाकडून प्राप्त झाले नाही तर उर्वरित सिंथेटिक ट्रॅक व सिलीकॉन लेअरचे काम सन २०१०-२०११ या वित्तीय वर्षातील विद्यापीठ निधीमधून पूर्ण करण्यात येईल. सदर सिंथेटिक ट्रॅकचे काम हे विशिष्ट प्रकारचे असल्याने (Specialised Job) त्यासाठी लागणारे साहित्य हे मुंबई - दिल्ली सारख्या ठिकाणी उपलब्ध होते. व त्याचे काम कारणारे कंत्राटदार मोठ्या शहरामध्येच उपलब्ध असतात. त्यामुळे सदर कामातील तज्ञ लोकांची / कारागीरांची कोल्हापूर सारख्या ठिकाणी उपलब्धता नसल्यामुळे सदर काम पूर्ण करण्यास विलंब झाला आहे. शिवाय सध्याचा अस्तित्वातील ट्रॅक सुस्थितीत असल्यामुळे तो खेळाडूंना वापरता येत आहे. त्यामुळे खेळाडू या सुविधेपासून वंचित झालेले नाहीत.

महालेखापाल -१ मुंबई यांनी त्यांच्या दिनांक २२.१०.२०१० च्या अनौपचारीक संदर्भान्वये उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर यांनी क्रंमांक एसयु/Engg/२९१९/२११६, दिनांक ६ ऑगस्ट, २०११ च्या पत्रान्वये केलेल्या खुलाशानुसार खालीलप्रमाणे वस्तुस्थिती नमूद करण्यात येत आहे.

शासनाकडून प्राप्त झालेल्या रुपये १.१७ कोटी एवढ्या रकमेतून जून, २०११ अखेरपर्यंत रुपये ४५.२८ लक्ष इतका खर्च खुदाई, जमीन सपाटीकरण, भराव व पिचींग इत्यादी कामावर झालेला आहे. उर्वरीत रक्कम रुपये ७१.७२ लक्ष इतक्या किंमतीचे काम सत्वर पूर्ण करुन रक्कम खर्च होईल, याकडे वैयक्तीक लक्ष पुरविण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी केंद्र शासनाकडून सिंथेटीक ट्रॅक्सच्या कामासाठी अद्यापपर्यंत विद्यापीठास कोणताही निधी प्राप्त झालेला नाही. तथापि, सदरचे काम विद्यापीठाच्या ठेव अंशदान योजनेंतर्गत पूर्ण करण्यात येईल व त्याबाबतचा अहवाल शासनास वेळोवेळी स्वतंत्रपणे सादर करण्यात येईल.

सदर स्पष्टीकरणात्मक ज्ञापनास प्रधान सचिव (उच्च व तंत्रशिक्षण) यांची मान्यता घेण्यात आली आहे.

साक्ष :

उपरोक्त लेखी माहितीच्या संदर्भात समितीने दिनांक २१ मे, २०१३ रोजी प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सचिवांना परिच्छेदासंदर्भात थोडक्यात माहिती समितीला देण्यास सांगितले असता, विभागीय सचिवांनी अधिक खुलासा करताना असे सांगितले की, शासनाने शिवाजी विद्यापीठाला त्यांच्या

उपयोगिताकरिता सिंथेटिक ट्रॅक बांधण्यासाठी निधी दिला होता. शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा संकुलामध्ये सिंथेटिक ट्रॅक तयार करण्यासाठी शासनाने दिनांक ३१ मार्च २००४ रोजी रूपये १ कोटी ८० लाख इतक्या निधीस मान्यता दिलेली आहे. त्यापैकी विद्यापीठाला रूपये ११७.०० लक्ष इतक्या रकमेचा पहिला हप्ता दिनांक २८ मे २००४ रोजी वितरित करण्यात आला. विद्यापीठाने प्रत्यक्ष कामाला सन २०१० मध्ये सुरूवात केलेली आहे. सदर निधी हा विद्यापीठाच्या खात्यामध्ये पडून होता. हे काम पूर्ण झालेले नाही. त्यासंबंधी हरकत आहे. सदर सिंथेटिक ट्रॅकच्या बांधकामासाठी शिवाजी विद्यापीठाने तज्ज्ञ समिती नेमली होती. या समितीमध्ये श्री.ए.बी.परवते-पाटील, इंजिनिअर व बांधकाम समिती सदस्य शिवाजी विद्यापीठ, श्री.मोहन वायचळ, आर्किटेक्ट व बांधकाम समिती सदस्य, शिवाजी विद्यापीठ, विद्यापीठ अभियंता, शिवाजी विद्यापीठ, श्री.प्रकाश तुकाराम गायकवाड, ॲथलेटिक्स प्रशिक्षक, शिवाजी विद्यापीठ, डॉ.शरद हुंसवाडकर, शारिरीक शिक्षक संचालक, राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर, डॉ.बॅप्टीस्ट डिसोझा, कॉमन वेल्थ स्पर्धा टेक्निकल एक्सपर्ट, पुणे हे सदस्य होते. दिल्लीमधील 'साई' मध्ये जाऊन त्यांनी सिंथेटीक ट्रॅकची पाहणी केली होती.

सदर कामास विलंब होण्याचे कारण आणि सदर निधी हा कोणत्या खात्यामध्ये पडून आहे याबाबत अधिक माहिती देण्यास सांगितले असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, यासंदर्भात उत्तर अजून शिवाजी विद्यापीठाने उच्च व तंत्रशिक्षण विभागाला देखील दिलेले नाही. सन २००४ ते २०१० पर्यंत शिवाजी विद्यापीठाकडे निधी पडून होता. या निधीवर त्यांना इंटरेस्ट मिळालेला नाही. याचा अर्थ विद्यापीठाने सदर निधी त्यांच्या करंट अकौंटमध्ये ठेवला असेल. शिवाजी विद्यापीठाने सदर निधी एफ.डी.मध्ये ठेवला असता तर प्रती वर्षी ७ ते ८ टक्के व्याज मिळाले असते.

शासनाने निधी देऊन देखील विद्यापीठाने काम केलेले नाही. जवळ जवळ ६ ते ७ वर्षे हा निधी विद्यापीठाकडे पडून आहे. या कामाला उशीर झाल्यामुळे त्याची किंमत देखील वाढणार आहे. शासकीय निधी असल्यामुळे तो कसाही वापरला तरी चालेल अशी भूमिका घेता कामा नये यासंदर्भात विद्यापीठाने सर्व संबंधितांविरूद्ध ॲक्शन घ्यावी व त्यांच्या मासिक वेतनातून रकमेची कपात करण्यात यावी.

विद्यापीठाच्या प्रतिनिधींना या परिच्छेदासंबंधी काही सांगावयाचे असल्यास ते सादर करावे असे समितीने निर्देशित केले असता विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, आठ लेन

मातीचा ट्रॅक सिंथेटीक करण्याचा प्रस्ताव होता. शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा संकुलामध्ये सिंथेटिक ट्रॅक तयार करण्यासाठी शासनाने अंदाजपत्रक मंजूर केले होते. त्यानुसार शासनाकडून अनुदान देखील मिळाले. त्यानुसार तज्ज्ञ समितीने भेटी देखील दिल्या. त्यावेळी असे आढळून आले की, अस्तित्वात असलेले मैदान सखल भागात असून ते नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहामध्ये आहे. अशाने मातीच्या ट्रॅकवर पाण्याच्या ओलाव्याचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे सिंथेटिक ट्रॅकला हानी होण्याची शक्यता वर्तविण्यात आली होती. सिंथेटिक ट्रॅक खराब होण्याची शक्यता आहे अशी सूचना आली होती. त्यामुळे निवड केलेल्या जागे ऐवजी अन्य ठिकाणी सिंथेटिक ट्रॅक बांधण्याचा निर्णय घेण्यात आला.

शासनाच्या परवानगीशिवाय सिंथेटिक ट्रॅकच्या ठिकाणाच्या जागेमध्ये (location) बद्दल करता येतो काय ? तथापि सिंथेटिक ट्रॅकच्या कामाच्या सद्य:स्थितीविषयी समितीने विचारले असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, शिवाजी विद्यापीठाने युजीसीचा देखील पैसा वापरला आहे. शिवाजी विद्यापीठाकडे रूपये ११७.०० लक्ष एवढा निधी सहा वर्षे पडून होता. त्यावर एक रूपयाचे देखील व्याज मिळालेले नाही. आतापर्यंत रूपये ३.३६ कोटीचे काम पूर्ण झालेले आहे.

सदर प्रकरणी महालेखाकारांनी अभिप्राय व्यक्त करताना समितीला सांगितले की, हर फेज में डिले बहुत हुआ है. मार्च, २००४ में फंड रिलिज हुआ था. लेकिन अगस्त, २००६ में रकम डिपॉजिट हुई. सन २००८ में यह निश्चित हुआ कि एस्टीमेट खर्च मंजूर निधि से ज्यादा है. ऐसा दिखायी देता है कि सभी जगह पर गॅप है. काम में इतना डिले हुआ कि उसके कारण रिवाईज एस्टीमेट बढ़ गया. रकम डिपॉजिट करने संबंधी का एक मुद्दा है. जिस काम के लिए जो पैसा लिया उस पैसे का युज नहीं हुआ. पैसा प्रिमॅच्युअरली रिलिज किया गया. उसकी कोई प्लॅनिंग नहीं हुई. ५.५१ करोड़ रुपये रिवाईज एस्टिमेट है. मेरा सवाल यह है कि इसमें से कितना पैसा खर्च हुआ. यासंदर्भात विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, पीडब्ल्यूडी को डिपॉजिट दिया यह एक अलग विषय है और पैसा बैंक में डिपॉजिट करने का अलग विषय है. पीडब्ल्यूडी को इसलिए नहीं दिया गया क्योंकि टेक्निकल मंजूरी नहीं मिल पा रही थी. Original Estimate was approved as per rough plan Initial estimate was of Rs.1.80 crores. It was not a detailed estimate. However, after detailed estimate was prepared, it was increased to Rs.3.30 crores.

सदर कामाचे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) ७ दिवसात पाठविण्याचे समितीला आश्वासित करुनही सदर प्रमाणपत्र महालेखाकार यांना पाठविण्यात आले किंवा नाही याबाबतची माहिती अद्याप समितीला प्राप्त झालेली नाही.

The question is why the concerned officers have not deposited the said amount in the bank itself. तसेच शासनाने कोणकोणत्या विद्यापीठांना अनुदान दिलेले आहे त्याची यादी समितीला सादर करावी. अद्यापही सदर माहिती समितीला प्राप्त झालेली नसल्याने समितीने तीव्र नापसंती व्यक्त करते.

निधी अखर्चित असताना त्यांना पुढचा निधी देता येतो काय असे समितीने विचारले असता वेगळ्या कामासाठी निधी देता येतो असे विभागीय सचिवांनी समितीला सांगितले.

मागिल वर्षी सर्व विद्यापीठांच्या कुलसचिवांना विद्यापीठातील रिक्त पदे न भरल्याबद्दल समितीने बोलाविले होते. समितीसमोर आल्यानंतर सर्व विद्यापीठांनी ८० टक्के रिक्त पदे भरली आहेत. त्या धर्तीवरच शासनाचा निधी अखर्चित ठेवण्याचे कारणमिमांसा संबंधित विद्यापीठांनी समितीला सादर करण्याचे निदेश समितीने विभागीय सचिवांना दिले.

विद्यापीठ परिसरामध्ये आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुल बांधण्यात यावे असा निर्णय घेण्यामागे उद्देश काय होता या बाबतीत विभागीय सचिवांनी असे सांगितले की, विद्यापीठ स्तरावर विद्यार्थ्यांना व खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सोयी व सुविधा मिळण्यासाठी क्रीडा संकुल बांधण्यात यावे असा अशा प्रकारचा निर्णय घेण्यामागचा उद्देश होता. त्याचप्रमाणे सिंथेटीक ट्रॅकच्या बांधकामासाठी आवश्यक असणारा अतिरिक्त रुपये २५५ लक्ष एवढा निधी विद्यापीठ कोणत्या माध्यमातून उभारणार आहे असाही समितीने प्रश्न विचारलेला आहे, त्या बाबतीत सांगू इच्छितो की, सिथेटीक टॅकच्या बाधकामासाठी आवश्यक असणारा अतिरिक्त निधी विद्यापीठ अनुदान मंडळ, दिल्ली यांचे रुपये १२० लक्ष प्राप्त अनंदान व विद्यापीठ स्वनिधी यातून उभारण्यात येणार आहे. यातील काही प्रमाणात निधी त्यांनी खर्च केलेला आहे.

सदर सिंथेटीक ट्रॅकचा वापर होतो आहे काय तसेच सिंथेटीक ट्रॅकच्या बांधकामास सुरुवात कधीपासून झाली आहे ? अशी पृच्छा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, सिंथेटीक ट्रॅकच्या बांधकामास २००८ या वर्षापासून सुरुवात झाली आहे. सदर काम जवळपास पूर्ण झालेले आहे. एका महिन्यात आत सिंथेटीक ट्रॅक वापरता येईल.

सिंथेटीक ट्रॅकचे काम पूर्ण झाल्यानंतर त्याची देखभाल दुरुस्ती कशा पध्दतीने केली जाणार आहे यासंबंधीचा काही आराखडा विद्यापीठाने तयार केला आहे काय याबाबत समितीला माहिती सादर करावी असे सांगण्यात आले असता विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, या ठिकाणच्या देखभाल दुरुस्तीची कामे, तसेच विकासात्मक कामे करण्यासंदर्भात विद्यापीठाने टेंडर काढलेले आहे. यासाठी स्प्रिंकलर सिस्टीम बसवण्यात आली आहे. तसेच यासाठी क्रिडा विभागातून कर्मचारी नेमण्याची व्यवस्था देखील केलेली आहे.

पुढे समितीने असे विचारले की, विद्यापीठास शासनाकडून क्रीडा विकासावर दरवर्षी प्राप्त होणाऱ्या निधीच्या संदर्भातील माहिती समितीने विचारली असता, विभागीय सचिवांनी समितीला विदित केले की, विद्यापीठास शासनाकडून क्रीडा विकासावर दरवर्षी कोणत्याही स्वरुपाचा निधी प्राप्त होत नाही. शासनाकडून विद्यापीठास नियमित असा निधी दिला जात नाही. विद्यापीठाकडून क्रीडा विकासासंबंधी प्रोजेक्ट सादर केले जातात, त्यानुसार शासनाकडून बजेटमधून निधी प्राप्त करुन दिला जातो. दरवर्षी विद्यापीठास क्रीडा विकासासाठी नियमित निधी उपलब्ध करुन दिला जात नाही.

सदर काम करण्याकरिता तसेच साधनसामुग्रीसाठी निविदा केव्हा प्रसिध्द केल्या होत्या, या निविदांना किती निविदाकारांनी प्रतिसाद दिला याविषयी समितीने विचारणा केली असता, सदर काम करण्याकरिता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत दिनांक २ मार्च, २०१० रोजी विषयांकित कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करण्याकरिता संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई कार्यालयास दिनांक २३ मार्च, २०१० पूर्वी जाहिरात प्रसिध्द करण्याबाबत कळविण्यात आले. प्रथम जाहिरातीमध्ये पुरेशा निविदाकारांनी भाग घेतला नसल्याने दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली. दुसरी मुदतवाढ दिनांक ३० जुलै, २०१० पर्यंत देण्यात आली होती. दुसऱ्या मुदतवाढीनंतर विक्री झालेल्या ५ निविदांपैकी २ निविदाकारांनी भाग घेतला होता. त्यापैकी मे.पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड, औरंगाबाद यांची निविदा स्वीकृत करण्यात आली होती अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

एकुण ५ निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या, त्यापैकी २ निविदाकारांनी भाग घेतला. सदरच्या दोन निविदा कोणत्या निकषावर पात्र ठरविण्यात आल्या, त्या निविदाकारांनी कोणत्या दराने निविदा भरल्या होत्या इत्यादीची माहिती तसेच सिंथेटिक ट्रॅकचे काम देताना

त्या क्षेत्रातील तज्ञ व अनुभवी लोकांना प्राधान्य देण्यात आले होते काय ? प्रत्येक निविदाकारांनी कोणत्या दराने निविदा भरल्या होत्या, कोणत्या निकषावर निविदा स्वीकृत करण्यात आल्या या बाबतची माहिती तसेच या बाबतचे जे इतिवृत्त तयार झाले असेल, त्या इतिवृत्ताची प्रत समितीला सादर करावी अशी सूचना समितीने केली.

विद्यापीठाची स्वत:ची ठेव अंशदान योजना आहे काय, असल्यास या योजनेला निधी कसा प्राप्त होतो अशी समितीने विचारणा केली असता विद्यापीठाची स्वत:ची ठेव अंशदान योजना नसल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

राज्यातील किती विद्यापीठांची स्वतंत्र क्रीडा संकुले आहेत, त्यांचा वापर व देखभाल दुरुस्ती करण्यासाठी निधीची उपलब्धता कशी करण्यात येते तसेच क्रीडा धोरणानुसार राज्यात क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्याचे प्रस्तावित होते त्याची सद्य:स्थिती काय आहे यासंदर्भातील संपूर्ण माहिती विभागाकडून साक्षीचे वेळी सुध्दा देण्यात आली नाही तसेच अहवाल सादर करेपर्यंत सुध्दा सादर करण्यात आलेली नाही.

अभिप्राय व शिफारशी :

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा संकुलामध्ये सिंथेटिक ट्रॅक तयार करण्यासाठी शासनाने दिनांक ३१ मार्च २००४ रोजी रूपये १ कोटी ८० लाख इतक्या निधीस मान्यता दिलेली आहे. त्यापैकी विद्यापीठाला रूपये ११७.०० लक्ष इतक्या रकमेचा पहिला हप्ता दिनांक २८ मे २००४ रोजी वितरित करण्यात आला. विद्यापीठाने प्रत्यक्ष कामाला सन २०१० मध्ये सुरूवात केलेली आहे. सदर निधी हा विद्यापीठाच्या खात्यामध्ये पडून होता. हे काम पूर्ण झालेले नाही. त्यासंबंधी हरकत आहे. सदर सिंथेटिक ट्रॅकच्या बांधकामासाठी शिवाजी विद्यापीठाने तज्ज्ञ समिती नेमली होती. या समितीमध्ये श्री.ए.बी.परवते-पाटील, इंजिनिअर व बांधकाम समिती सदस्य शिवाजी विद्यापीठ, श्री.मोहन वायचळ, आर्किटेक व बांधकाम समिती सदस्य, शिवाजी विद्यापीठ, श्री.प्रकाश तुकाराम गायकवाड, ॲथलेटिक्स प्रशिक्षक, शिवाजी विद्यापीठ, डॉ.शरद हुंसवाडकर, शारिरीक शिक्षक संचालक, राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर, डॉ.बॅप्टीस्ट डिसोझा, कॉमन वेल्थ स्पर्धा टेक्निकल एक्सपर्ट, पुणे हे सदस्य होते. दिल्लीमधील 'साई' मध्ये जाऊन त्यांनी सिंथेटीक ट्रॅकची पाहणी केली होती.

सन २००४ ते २०१० पर्यंत म्हणजे जवळ जवळ ६ ते ७ वर्षे शिवाजी विद्यापीठाकडे निधी पडून होता. सदर निधी फिक्स्ड डिपॉझिटमध्ये ठेवला असता तर व्याज मिळाले असते.

शासनाने निधी देऊन देखील विद्यापीठाने काम केलेले नाही. या कामाला उशीर झाल्यामुळे त्याची किंमत देखील वाढणार आहे. त्यामुळे याप्रकरणी ज्यांनी कोणी हा विलंब केला आहे त्यांचेवर वैयक्तिक जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

शासनाने कोणकोणत्या विद्यापीठांना अनुदान दिलेले आहे त्याची यादी समितीला सादर करण्याचे निदेश समितीने दिले होते. तथापि, अद्यापही सदर माहिती समितीला प्राप्त झालेली नसल्याने समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. शासकीय निधी अखर्चित ठेवल्यामुळे शासनाचे नुकसान झाले आहे त्यामुळे ज्यांनी शासनाचा निधी अखर्चित ठेवला त्यांच्या वेतनातून वसूल करण्यात यावा असे मत समितीने नोंदविले. **राज्यातील सर्व विद्यापीठाच्या कुलसचिवांना विद्यापीठातील रिक्त पदे न भरल्याबद्दल समितीने बोलाविले होते. समितीसमोर साक्ष दिल्यानंतर सर्व विद्यापीठांनी ८० टक्के रिक्त पदे भरली असल्याचे पुर्वोदाहरण नमूद करुन त्या धर्तीवरच शासनाकडून ज्या विद्यापीठांना निधी दिला जातो परंतु सदर निधी विद्यापीठाकडून विहीत मुदतीत खर्च करण्यात येत नाही अशा प्रकारे शासनाचा निधी अखर्चित ठेवण्याचे कारण काय हे संबंधित विद्यापीठांनी समितीला सादर करावे. याबाबत केलेल्या कार्यवाहिची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी.**

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील सिंथेटिक ट्रॅकच्या कामासाठी ५ निविदाकांराच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या, त्यापैकी २ निविदाकारांनी भाग घेतला. सदरच्या दोन निविदा पात्र ठरविण्यात आल्या, त्या निविदाकारांनी दिलेला दर योग्य होता असे असले तरी सिंथेटिक ट्रॅकचे काम करावयाचे असल्याने व विद्यापीठातील अधिकाऱ्यांना याबाबत माहिती नसल्याने क्रीडा क्षेत्रातील नामवंत तज्ञांच्या सहाय्याने तसेच या प्रकाराची कामे करण्याचा अनुभव असलेल्या कंत्राटदारास काम देण्यास प्राधान्य देण्यात आले होते काय याची माहिती प्राप्त झाली नाही सदर माहिती समितीस देण्यात यावी व **निविदाकारांनी निविदेत दर्शविलेले दर, निविदा स्वीकृत करण्याचा निकष या बाबतची माहिती तसेच इतिवृत्त तयार झाले त्या इतिवृत्ताची प्रत तसेच सदर सिंथेटिक ट्रॅकचे काम कधी पूर्णत्वास येवून वापर कधी पासून करण्यात येत आहे याची माहिती समितीला सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

राज्यातील किती विद्यापीठांची स्वतंत्र क्रीडा संकुले आहेत, त्यांचा वापर व देखभाल दुरुस्ती करण्यासाठी निधीची उपलब्धता कशी करण्यात येते तसेच क्रीडा धोरणानुसार राज्यात

क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्याचे प्रस्तावित होते त्याची सद्य:स्थिती काय आहे यासंदर्भातील संपूर्ण माहिती विभागाकडून साक्षीचे वेळी सुध्दा देण्यात आली नाही तसेच अहवाल सादर करेपर्यंत सुध्दा सादर करण्यात आलेली नाही. याबाबत समिती तीव्र नापसंती करते समितीस माहिती देण्यास विलंब कोणत्या कारणामुळे झाला व त्या जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण तसेच क्रीडा धोरणही महत्वाचे आहे. विद्यापीइ स्तरावर खेळास प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. क्रीडा विकास धोरणासंदर्भात आपले शासन उदासिन असल्याचे दिसून येते. विद्यापीठांना क्रीडा विकासासाठी प्रतिवर्षी नियमित उपलब्ध करून दिला जात नाही वा जो निधी देण्यात येतो तो अत्यल्प तुटपूंजा असतो. अत: युवक व क्रीडा विकासाशी शासनाने विद्यापीठांना आवश्यक तो निधी दरवर्षी देण्याची कार्यवाही करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

मत्स्यव्यवसाय विकास विभाग

मत्स्यव्यवसाय विभागातील अंतर्गत नियंत्रण यंत्रणा

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००८-२००९ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ४.१ "मत्स्यव्यवसाय विभागातील अंतर्गत नियंत्रण यंत्रणा" यासंदर्भात महालेखापरिक्षकांनी खालील अभिप्राय दिलेले आहेत.

तपशीलवार आकस्मिक देयकांची सादरीकरण :-

महाराष्ट्र कोषागार नियमावलीच्या नियम ३०३ प्रमाणे आणि वेळोवेळी शासनाने जारी केलेल्या सूचनाप्रमाणे, संक्षिप्त आकस्मिक देयकांवर आहरण केल्यापासून एका महिन्याच्या आत तपशीलवार आकस्मिक देयके सादर करावयाची असतात. तथापि, महालेखापाल (लेखा आणि अनुज्ञेयता) यांच्या लेखे आणि अभिलेखावरुन निदर्शनास येते की, तरतुदीच्या विरुध्द/उल्लंघन करुन १९९३-९४ ते २००८-०९ कालावधीत ५२ संक्षिप्त आकस्मिक देयकांवर आहरण केलेल्या रु. ५३.१२ कोटीची तपशीलवार आकस्मिक देयके मार्च, २००९ अखेर सादर केली नव्हती. म्हणून प्रत्यक्ष वापर झालेल्या रकमांची खातरजमा करता आली नाही. यापैकी एक देयक २००८-०९ मधील रु. २० कोटी, २००५-०६ संबंधित उच्च गतीच्या डिझेलवरील (HSD) मूल्य आधारीत कराच्या (VAT)परताव्याची तीन देयके रु. ३३ कोटीची होती. १९९३-९४ ते २०००-०१ कालावधीतील रु. १२ लाखांची शिल्लक ४८ देयकांची होती. आयुक्तांनी म्हटले की तपशीलवार आकस्मिक देयकांच्या निपटाऱ्यांत प्रचंड प्रमाणात प्रलंबित असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले नाही आणि याबाबत संबंधित आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यांना संबोधण्यात येईल. संक्षिप्त आकस्मिक देयकांच्या जलद निपटाऱ्यांवर विभागाच्या नियंत्रणाचा अभाव उत्तरावरुन निदर्शित होतो. तपशीलवार आकस्मिक देयके सादर न करण्यात लबाडी आणि शासकीय रकमेच्या दुर्विनियोगाचे धोके संभवतात.

एप्रिल, २००५ पासून सुरु केलेल्या मूल्याधारी कराच्या (VAT) उच्च जलद गती डिझेलवरील (HSD) विक्री कराचे ओझे सौम्य करण्यासाठी विक्रीकर न लावता मत्स्य व्यवसायिक संस्थांना(Society) HSD चा पुरवठा करण्यासाठी आणि दर आठवडयाला VAT चा दावा आयुक्तांना सादर करण्याची शासनाने तेल कंपन्यांना विनंती केली. या दाव्याच्या प्रदानासाठी शासनाने रु. १३ कोटी मंजूर केले आणि एप्रिल आणि जून, २००५ मध्ये

आयुक्तांनी दोन संक्षिप्त आकस्मिक देयकांवर रकमेचे आहरण केले. याकरिता आयुक्तांनी स्वतंत्र्य वैयक्तिक खाते लेखे (PLA)उघडायचे होते. असे निदर्शनास आले की वैयक्तिक खाते लेख्यात (PLA) रक्कम न ठेवता ICICI बँकेच्या चालू खात्यात ठेवले होते. जुलै, २००८ मध्ये सादर केलेल्या तपशीलवार आकस्मिक देयकांत पुढील अनियमितता उघडकीस आल्या.

- जरी जून, २००५ नंतर प्रतिपूर्ती प्राधिकृत नव्हती आणि चालू खात्यांतील विनावापर शिल्लक शासकीय लेख्यात जमा करण्यात आली तरी दिनांक १७ नोव्हेंबर, २००५ ची रु.१,०१,७५३/- रकमेची दोन बीजके(invoice)आणि दिनांक २६ नोव्हेंबर, २००५ चे रु. ४६,०९५/- चे इतर बीजक तपशीलवार आकस्मिक देयकांत अंतर्भूत करण्यात आली होती. दिनांक १७ नोव्हेंबर, २००५ च्या दोन बीजकांपैकी एक सारखीच रक्कम आणि दिनांक असलेले दुसऱ्याची सत्य प्रतिलिपी होती. त्यामुळे रु. १,०१,७५३/- ची संशयास्पद लबाडी असल्याचे दिसते. (परिशिष्ट ४.२).
- तसेच, दोन संस्थांच्या संदर्भात रु.५.५७ लाखाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय असताना रु.५.७६/- लाखाचे अधिक प्रदान निदर्शित करीत प्रतिपूर्तीची रक्कम रु. ११.३३ लाख तपशीलवार आकस्मीक देयकात दर्शविण्यात आली होती. (परिशिष्ट ४.२).
- तपशीलवार आकस्मिक देयकाप्रमाणे तीन संस्थांना पुरवठा केलेल्या HSD वरील VAT ची रु.१८,०९,३१३/- ची प्रतिपूर्ती तेल कंपन्यांना करण्यात आली होती. संबंधित बीजकावर केलेल्या मूख्यांकन (enfacement) प्रमाणे VAT च्या रकमेची बेरीज रु.१७,०८,०४६/- होत होती. शिल्लक रु. १७,०८,०४६/- च्या पुष्टयर्थ अभिलेख्यांवर बीजके नव्हती. रु.१,०१,२६७/- ची अधिक प्रतिपूर्ती झाल्याचे निदर्शित करते (परिशिष्ट ४.२) आणखीन, एका संस्थेला १२ किलो लिटर HSD पुरवठा केल्याबद्दल, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशनला प्रदान केलेल्या रु. ८६,५२४/- च्या पुष्टयर्थ बीजक अभिलेख्ययावर उपलब्ध नव्हते. अधिक प्रदानाची शक्यता नाकारता येत नाही. आयुक्तानी म्हटले (फेब्रुवारी, २००९) लेखपरिक्षणात निदर्शनास आणून दिलेल्या अनियमितता दुरुस्त करण्यात येतील.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात मत्स्यव्यवसाय विकास विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद केले आहे की,सन १९९३ ते २००९ या कालावधीतील एकुण ५२ संक्षिप्त

देयकाव्दारे काढलेल्या रु.५३.१२ कोटीची तपशिलवार देयके सादर करावयाची आहेत, असे नागरी अहवालात नमुद केले आहे. त्यापैकी रु.५३.०० कोटीची ४ देयके आयुक्त मत्स्य.मुंबई कार्यालयाकडुन काढण्यात आलेली आहेत. ही ४ तपशिलवार आकस्मिक देयके सुधारित करुन अधिदान व लेखा कार्यालयामार्फत महालेखाकार कार्यालयास सादर करण्यात आली होती. सर्व शासन आदेश आणि शासन निर्णय निवासी लेखा अधिकारी यांना दाखविण्यात आले व या ४ तपशिलवार देयकांचे निपटारा प्रमाणपत्र प्राप्त झाले आहेत. उर्वरीत ४८ पैकी २१ देयके संक्षिप्त देयके असून उर्वरीतपैकी काही सहाय्यक अनुदान, आकस्मिक खर्चाची तपशीलवार देयके, तर काही देयके या विभागाशी संबंधीत नाहीत. उपरोक्त २१ संक्षिप्त देयकांपैकी (रु.१,१९,५००/-) २० संक्षिप्त देयकांचा निपटारा झालेला आहे. उर्वरीत एका देयकाचा निपटारा करण्यासाठी संबंधीतांना कळविण्यात आले आहे.

शासनाने मंजूर केलेले रु.१३ कोटी ही रक्कम योजनेची अंमलबजावणी तातडीने करुन निधी खर्च करणे अत्यावश्यक असल्यामुळे सदरची रक्कम विभागाच्या चालू खात्यात (ICICIबँकेत) जमा करण्यात आली. तपशिलवार देयकाचे निपटारा प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

महालेखाकार कार्यालयाच्या तपासणी पथकाने लेखपरिक्षणाच्या कालावधीत प्राथमिक तपासणीत तपशिलवार देयक निवासी लेखा अधिकारी यांचेकडे सादर केले नव्हते. तपशिलवार देयकासोबतची सर्व बिजके आणि मंजुर आदेश misplace झाले् होते. ऑफिसमधील अभिलेखे शोधून सर्व संस्थाची देयके आणि मंजूर आदेश वेगवेगळे करण्यात आले आणि आदेश व बिजके देयकासोबत जोडून सुधारित तपशिलवार देयके सादर करण्यात आली. सर्व आदेश बीजके आणि धनादेश यांचे छायाप्रती आणि कॅशबुक इ.अभिलेखे निवासी लेखा अधिकारी यांना दाखविण्यात आल्यानंतर कोणत्याही रकमेची लबाडी झालेली नसल्याचे आढळून आले. अभिलेखे बीजके आणि व्हाउचर आणि शासन आदेश यांचे तपासणी नंतर निवासी लेखा अधिकारी यांचे समाधान झाले असून त्यांनी लेखा व अधिदान कार्यालयामार्फत निपटारा प्रमाणपत्र दिले आहे.

महालेखाकार कार्यालयाच्या तपासणी पथकाने लेखापरिक्षणाच्या कालावधीत प्राथमिक तपासणीत तपशिलावर देयक निवासी लेखा अधिकारी यांचेकडे सादर केले नव्हते. तपशिलवार देयकासोबतची सर्व बिजके आणि मंजुर आदेश गहाळ झाले होते. ऑफिसमधील अभिलेखे शोधून सर्व संस्थाची देयके आणि मंजुर आदेश वेगवेगळे करण्यात आले आणि आदेश व

बिजके देयकासोबत जोडून सुधारित तपशिलवार देयके सादर करण्यात आली. सर्व आदेश बीजके आणि धनादेश यांचे छायाप्रती आणि कॅशबुक इ.अभिलेखे निवासी लेखा अधिकारी यांना दाखविण्यात आल्यानंतर कोणत्याही रकमेची लबाडी झालेली नसल्याचे आढळून आले. अभिलेखे् बीजके आणि व्हाउचर आणि शासन आदेश यांचे तपासणी नंतर निवासी लेखा अधिकारी यांचे समाधान झाले असून त्यांनी लेखा व अधिदान कार्यालयामार्फत निपटारा प्रमाणपत्र दिले आहे.

महालेखाकार कार्यालयाच्या तपासणी पथकाने लेखापरिक्षणाच्या कालावधीत प्राथमिक तपासणीत तपशिलवार देयक निवासी लेखा अधिकारी यांचेकडे सादर केले नव्हते. तपशिलवार देयकासोबतची सर्व बिजके आणि मंजुर आदेश गहाळ झाले होते. ऑफिसमधील अभिलेखे शोधून सर्व संस्थाची देयके आणि मंजुर आदेश वेगवेगळे करण्यात आले आणि आदेश व बिजके देयकासोबत जोडून सुधारित तपशिलवार देयके सादर करण्यात आली. सर्व आदेश बीजके आणि धनादेश यांचे छायाप्रती आणि कॅशबुक इ.अभिलेखे निवासी लेखा अधिकारी यांना दाखविण्यात आल्यानंतर कोणत्याही रकमेची लबाडी झालेली नसल्याचे आढळून आले. अभिलेखे् बीजके आणि व्हाउचर आणि शासन आदेश यांचे तपासणी नंतर निवासी लेखा अधिकरी यांचे समाधान झाले असून त्यांनी लेखा व अधिदान कार्यालयामार्फत निपटारा प्रमाणपत्र दिले आहे.

शासकीय जमेची/महसुलाची वसूली आणि लेखांकनाच्या तरतुदीशी अनुषक्त राहणे

तलाव/सरोवरांच्या भाडेपट्टा कराराचे भाडे, मच्छीमारासाठी अनुज्ञप्ती फी आणि मत्स्यबीजाच्या विक्रीची जमा यांचा विभागाच्या करेतर जमेत समावेश असतो. २००४-०५ ते २००७-०८ कालावधीतील वसूल केलेल्या करेतर जमेचा तपशील तक्ता ३ प्रमाणे आहे.

तक्ता ३ : करेतर महसुली जमेचा तपशील **(रुपये कोटीत)**

वर्ष	तलावाचे भाडे		अनुज्ञप्ती फी		मत्स्य बीजाच्या विक्रीची जमा		एकूण	
	अ.तरतूद	प्रत्यक्ष	अ.तरतूद	प्रत्यक्ष	अ.तरतूद	प्रत्यक्ष	अ.तरतूद	प्रत्यक्ष
२००४-०५	३.२०	३.५१	०.१६	०.१२	०.७९	०.७६	४.१५	४.३९
२००५-०६	२.९७	२.७९	०.१६	०.१४	१.१४	१.०६	४.२७	३.९९

२००६-०७	२.९७	३.३३	०.१६	०.१४	१.१३	१.०६	४.२६	४.५३
२००७-०८	३.९४	३.८०	०.०२	०.१४	१.२५	०.९९	५.२१	४.९३
एकूण	**१३.०८**	**१३.४३**	**०.५०**	**०.५४**	**४.३१**	**३.८७**	**१७.८९**	**१७.८४**

निदर्शनास आले की, या संदर्भातील महसुलाच्या वसुलीतील प्रवाहिताच्या संहितेतील तरतूदीच्या नियंत्रण उपायांचे अनुसरण करण्यात आले नाही.

शासनाला आदेय रक्कम, नियमितपणे आणि योग्य तऱ्हेने निर्धारण करुन आणि वसुली करुन शासकीय लेख्यात भरणा करणे यावर महाराष्ट्र अंदाजपत्रकीय नियमावलीच्या परिच्छेद क्र. १४८ प्रमाणे नियंत्रक अधिकाऱ्याने लक्ष ठेवले पाहिजे. आणखीन, नियंत्रक अधिकाऱ्यांने प्रादेशिक उप-आयुक्त आणि मत्स्य व्यवसाय सहाय्यक आयुक्तांकडून जमेच्या दाव्यांचे मासिक लेखे प्राप्त करुन घेऊन आणि महालेखापाल (लेखे आणि अनुज्ञेयता) कार्यालयाने पाठविलेल्या कोषागारांच्या विवरणपत्राबरोबर त्यांचा ताळमेळ कोषागारांच्या जमेच्या विवरणपत्राबरोबर त्यांचा ताळमेळ करावयाचा असतो. रकमेचा भरणा करण्यातील कोणतीही विसंगती आढळल्यास, संबंधित अधिकाऱ्यांनी ताळमेळ करावा. तथापि, असे निदर्शनास आले की, २००४-०५ ते २००८-०९ कालावधीत आवश्यक असल्याप्रमाणे आपल्या अधिकारितेखालील प्रादेशिक उप-आयुक्तांकडून जमेची विवरणपत्रे आयुक्तांनी मागविली नव्हती आणि तपासणी केली नव्हती. आयुक्तांनी म्हटले (जानेवारी, २००९) की नियमांशी अनुषक्त राहण्याची आवश्यक कारवाई करण्यात येईल.

चाचणी तपासणी केलेल्या पाच (प्रादेशिक उपआयुक्त औरंगाबाद, अमरावती, नागपूर, पुणे आणि नाशिक) आणि दोन (मत्स्य व्यवसाय सहायक आयुक्त रायगड आणि ठाणे मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्त) कार्यालयात सन १९७२-७३ ते २००८-०९ कालावधीतील मत्स्यबीज विक्रीचे रु. ३२.१३ लाख आणि रु. ९०.६६ लाखाच्या भाडेपट्टा कराराच्या भाडयाची वसुली प्रलंबित होती.

शासनाकडून निर्लेखन करुन घेण्यासाठी बुडीत आणि संशयास्पद बुडीत आदेयांची (dues) वर्गवारी करण्याच्या प्रत्यनांची शिकस्त (endeavour) विभागाने केली नाही. महाराष्ट्र अंदाजपत्रक नियमावलीच्या परिच्छेद १५७ आणि परिशिष्ट ३ (३) सह वाचून, कार्यालय प्रमुखांनी महसुली जमेच्या अभिलेख्यांशी कोषागारांतील अभिलेख्यांशी ताळमेळ करुन ताळमेळ

झालेली विवरणपत्रके नियंत्रक अधिकाऱ्यांना सादर करणे आवश्यक असते. तथापि, निदर्शनास आले की, विभागीय उप आयुक्त औरंगाबाद आणि मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्त, नागपूर यांनी अनुक्रमे एप्रिल, २००४ ते मार्च, २००९ पर्यंतचे आणि जुलै, २००८ ते मार्च, २००९ पर्यंतची ताळमेळाची विवरणपत्र तयार केले नव्हते. अशाप्रकारे कोषागार अधिकाऱ्यांबरोबर ताळमेळ करण्यात आला नव्हता. आणखीन, एप्रिल २००४ ते मे, २००६ कालावधीतील अशी विवरणपत्रे तयार केल्याबद्दलची लेखापरीक्षणात खातरजमा करुन घेण्यासाठीचे अभिलेख प्रादेशिक उप आयुक्त, नाशिक कार्यालयात उपलब्ध नव्हते. जरी ताळमेळ करण्यासाठी विवरणपत्रे तयार करुन कोषागार अधिकाऱ्यांना पाठविण्यात आली होती तरी कोषागार अधिकाऱ्यांकडून विवरणपत्रे अचूक आणि बरोबर असल्याचे प्रमाणित करुन प्राप्त करुन घेण्याची खातरजमा दोन विभागीय उप आयुक्त्,. चार मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्त तीन अनुज्ञप्ती अधिकारी, दोन मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी आणि मत्स्यव्यवसाय सहाय्यक विकास अधिकारी, दापचारी यांनी एक ते ५१ महिने सुनिश्चित केले नव्हते. कोषागार अधिकाऱ्यांकडून प्रमाणित विवरणपत्राअभावी संबंधित कार्यालयांनी शासकीय लेख्यात भरणा केल्याची अचूकता सुनिश्चित करता आली नाही.

महाराष्ट्र कोषागार नियमावलीच्या नियम १०६ अन्वये, मागणी अधिकाऱ्यांनी पैसे संकलन करण्याच्या पावती पुस्तकांची साठा नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. निदर्शनास आले की, येरवडा केंद्रिय कारागृह छापखान्यातून (नोव्हेंबर, २००८) प्राप्त केलेल्या पावती पुस्तकांचे आणि विभागीय उप आयुक्त, मुंबई यांजकडून जानेवारी, २००९ मध्ये प्राप्त केलेल्या आठ अनुज्ञप्ती पुस्तके प्राप्त केल्याबद्दल आणि त्यानंतर त्यांचा विनियोग केल्याबद्दलचे अभिलेख, मत्स्य व्यवसाय सहाय्यक आयुक्त, मुंबईने ठेवले नव्हते. तसेच मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्त, रायगडच्या अधिकारी ते खालील अनुज्ञप्ती अधिकारी, मुरुडने कोऱ्या पावती पुस्तकांचे आणि अनुज्ञप्ती पुस्तकांची साठा लेखे ठेवले नव्हते. आवश्यक साठा लेख्याअभावी रोकड वहीत पावत्यांच्या गैरवापरांची शक्यता नाकारता येत नाही.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात मत्स्यव्यवसाय विकास विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद केले आहे की सदर परिच्छेदात नमूद केल्यानुसार क्षेत्रिय कार्यालयांना दाव्यांचे मासिक लेखे प्राप्त करुन घेऊन आणि महालेखापाल (लेखा आणि अनुज्ञेयता)

कार्यालयाने पाठविलेल्या कोषागाराच्या जमेच्या विवरणपत्राबरोबर त्यांचा ताळमेळ नियमित करण्याबाबत सूचना देण्यात येत आहे. तसेच ह्या प्रकरणी क्षेत्रिय कार्यालयाकडून जमेच्या विवरणपत्राचा नियमित अहवाल (करविरहित महसूल वसूलिचा अहवाल) नियमितपणे क्षेत्रिय कार्यालयाकडून घेण्यात येत आहे.

चाचणी तपासणी केलेल्या पाच प्रादेशिक उपआयुक्त आणि संबंधित दोन सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयाचे मत्स्यबीज विक्री रु.३२.१३ लाख आणि भाडेपट्टी रु.९०.६६ लाख वसूली प्रलंबितबाबत स्वतंत्रपणे स्पष्ट करण्यात येत आहे. सदर प्रकरणी क्षेत्रीय कार्यालयाकडून प्राप्त माहितीनुसार तलाव ठेका प्रकरणी थकबाकी व त्याअनुषंगाने वसूली कार्यवाही खालील प्रमाणे

अ.क्र.	विभागाचे नाव	तलाव ठेका थकबाकी	वसूलीची सद्य:स्थिती	निव्वळ थकबाकी (रु.)
१	मुंबई	१,७५,६६२/-	--	१,७५,६६२/-
२	नाशिक	१९,४१,२२१/-	४,२५०/-	१९,३६,९७१/-
३	पुणे	२१,५४,१११/-	८९,८४०/-	२०,६४,२७१/-
४	औरंगाबाद	१९,९८,०८४/-	--	१९,९८,०८४/-
५	नागपूर	७,९६,३८९/-	--	७,९६,३८९/-
६	अमरावती	१३,५०,४४६/-	४१६८७७/-	९,३३,५६९/-
	एकूण	**८४,१५,९१३/-**	**५,१०,९६७/-**	**७९,०४,९४६/-**

उपरोक्त माहिती प्राप्त झाल्यानुसार तलाव ठेका थकबाकीची रक्कम रु.९०.६६ लाख च्या ऐवजी रु.८४,१५,९१३/- इतकी असल्याचे क्षेत्रिय कार्यालयांच्या अभिलेख्यावरुन दिसून येते.

तलाव ठेक्याबाबत संबंधितांकडून महसुल वसुलीची कार्यवाही क्षेत्रिय कार्यालयाकडून करण्यात येते. तसेच मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांच्या बाबतीत सहकार विभागास कळवून वसुलीबाबत कार्यवाही करण्यात येते आणि थकबाकीदार संस्थाना तलाव ठेके व इतर अनुषंगिक जाब न देण्याचे धोरण अवलंबण्यात येते.

सदर परिच्छेदात नमूद केल्यानुसार क्षेत्रिय कार्यालयांना दाव्यांचे मासिक लेखे प्राप्त करुन घेऊन आणि महालेखापाल (लेखा आणि अनुज्ञेयता) कार्यालयाने पाठविलेल्या कोषागाराच्या जमेच्या विवरणपत्राबरोबर त्यांचा ताळमेळ नियमित करण्याबाबत सूचना देण्यात

येत आहे. तसेच ह्या प्रकरणी क्षेत्रिय कार्यालयाकडून जमेच्या विवरणपत्राचा नियमित अहवाल (करविरहित महसूल वसूलिचा अहवाल) नियमितपणे क्षेत्रिय कार्यालयाकडून घेण्यात येत आहे.

चाचणी तपासणी केलेल्या पाच प्रादेशिक उपआयुक्त आणि संबंधित दोन सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयाचे मत्स्यबीज विक्री रु.३२.१३ लाख वसूली प्रलंबित आहे. सदर प्रकरणी क्षेत्रिय कार्यालयाकडून प्राप्त माहितीनुसार मत्स्यबीज विक्री प्रकरणी थकबाकी व त्याअनुषंगाने वसूली कार्यवाही खालील प्रमाणे -

अ.क्र.	विभागाचे नाव	तलाव ठेका थकबाकी	वसूलीची सद्यस्थिती	निव्वळ थकबाकी (रु.)
१	मुंबई	१३,६४,०००/-	--	१३,६४,०००/-
२	पुणे	१,२९,२९५/-	५०,९८५/-	७८,३१०/-
३	नाशिक	Nil	Nil	Nil
४	औरंगाबाद	५,३४,१६१/-	१९,०१०/-	५,१५,१५१/-
५	अमरावती	३,१७,५२४/-	१,६६,६३१/-	१,५०,८९३/-
६	नागपूर	३,५५,४६०/-	४७,८००/-	३,०७,६६०/-
	एकूण	**२७,००,४४०/-**	**२,८४,४२६/-**	**२४,१६,०१४/-**

उपरोक्त प्राप्त माहितीनुसार मत्स्यबीज विक्री थकबाकीची रक्कम रु.३२.१३ च्या ऐवजी रु.२७,००,४४०/- इतकी असल्याचे क्षेत्रिय कार्यालयांच्या अभिलेख्यावरुन दिसून येते. यापैकी रु.२,८४,४२६/- इतकी रक्कम वसूली झाली असून रु.२४,१६,०१४/- थकीत रक्कम आहे.

मत्स्यबीज विक्रीबाबत संबंधितांकडून महसूल वसूलिची कार्यवाही क्षेत्रिय कार्याकडून करण्यात येते. तसेच मत्स्यव्यवसाय सहकारी थकबाकीबाबत अभिलेख्यांची पडताळणी करुन थकबाकी प्राधान्याने कार्यवाही करणेस्तव क्षेत्रिय कार्यालयांना सूचना देण्यात येत आहे.

साक्ष :

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००८-२००९ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.१"मत्स्यव्यवसाय विभागातील अंतर्गत नियंत्रण यंत्रणा" संदर्भात समितीने दिनांक ११ जून २०१३ रोजी सचिव, मत्स्यव्यवसाय विकास विभाग यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी अंदाजपत्रकीय प्रस्ताव तयार करताना जिल्हा कार्यालय स्तरावर योजनानिहाय व कार्यालयातील पदनिहाय वेतन व भत्त्यांची माहिती तयार करुन उद्दिष्टनिहाय आवश्यक मागणीचे अंदाजपत्रक तयार करुन प्रादेशिक कार्यालयाकडे प्रस्ताव

सादर करण्यात येतात. ही प्रक्रिया पूर्ण करताना कोणत्या प्रादेशिक कार्यालयाने प्रस्ताव वेळेत सादर केले नाही व त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली ? अशी विचारणा केली असता प्रस्ताव विलंबाने सादर करण्याची चूक २/३ वर्ष झाली असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी मान्य केले,तसेच आयुक्तालयाने सर्व माहिती गोळा करुन ती ऑक्टोबर अखेरपर्यंत शासन स्तरावर सादर करणे आवश्यक असूनही सन २००५-२००६ मध्ये २५ दिवसांचा विलंब झाला आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

अंदाजपत्रक तयार करण्याबाबत आयुक्तालयाने पुढाकार घेणे गरजेचे असते. परंतु, मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना याबाबतची जाणीव नाही. या संदर्भात शासनाने कालबध्द कार्यक्रम निश्चित केलेला आहे. अर्थसंकल्प मंजूर झाल्यानंतर प्रस्ताव पाठविणे योग्य नाही. जिल्हानिहाय खर्चाची व आवश्यक अंदाजपत्रकीय तरतुदीची आकडेवारी संकलित करुन सर्वंकष प्रस्ताव आयुक्तालयाने शासनाकडे विहित मुदतीत पाठविणे गरजेचे असते. विभागाकडे असा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर वित्त व नियोजन विभागाकडे प्रस्ताव पाठवावा लागतो व त्यानंतर अर्थसंकल्पात त्याबाबतची तरतूद केली जाते. ही सर्व प्रक्रिया विशिष्ट मुदतीत पूर्ण होणे आवश्यक असते. परंतु, मत्स्यव्यवसाय विभागातील अधिकाऱ्यांना या कार्यपध्दतीबाबत गांभीर्य नाही, असे दिसते. जिल्हानिहाय माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्यामुळे अंदाज चुकतो व त्यामुळे प्राप्त झालेली तरतूद एकतर कमी पडते किंवा शिल्लक राहते. यासंदर्भात मत्स्यव्यवसाय विकास विभागात अंतर्गत कार्यपध्दती निश्चित केली आहे का? अर्थसंकल्प पूर्व आढावा बैठक घेतली जाते का ? विभागात वित्तीय सल्लागार यांची नियुक्ती केली आहे का अशी विचारणा समितीने केली असता सहायक संचालक (वित्त) हे या संदर्भातील कामकाज पाहतात अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

या अनुषंगाने समितीने पुढे अशी विचारणा केली की, ज्या अर्थी, सहायक संचालकांकडे हा विषय सुपूर्द करण्यात आला आहे, त्या अर्थी, वित्तीय शिस्त आणण्याची जबाबदारी त्यांची आहे. अंदाजपत्रकीय तरतुदीसंदर्भातील कार्यवाहीच्या वेळी आपले मत घेतले जाते का? जिल्ह्यांकडून प्रस्ताव प्राप्त होण्यास विलंब झाला तर आपल्याकडून स्मरणपत्र पाठविले जाते का ?

समितीच्या उपरोक्त प्रश्नावर माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की सहायक संचालक (वित्त) यांच्याकडून जिल्हा स्तरावर स्मरणपत्रे पाठविली जातात. तसेच मुख्य

कार्यालयाकडून सर्व जिल्ह्यांना आणि प्रादेशिक उपसंचालकांनाही पत्र पाठविले जाते. त्यांना ठराविक मुदत निश्चित करुन देण्यात येते. या मुदतीत त्यांच्याकडून त्यांच्या कार्यक्षेत्रासाठी आवश्यक असणाऱ्या तरतुदीबाबतचा सर्वंकष प्रस्ताव पाठविणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे मुख्य कार्यालयात जिल्हानिहाय बैठकही आयोजित केली जाते. सर्व जिल्ह्यांकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्याचे संकलन करुन एकत्रित प्रस्ताव तयार केला जातो. मुख्य कार्यालयात ३ अधिकाऱ्यांकडे हे काम दिलेले आहे त्यांनी प्रस्ताव तयार केल्यानंतर व त्याची छाननी झाल्यानंतर प्रस्ताव आयुक्तांना सादर केला जातो. आयुक्तांच्या स्तरावर देखील एक बैठक घेतली जाते व त्यानंतर अंतिम प्रस्ताव शासनाला सादर केला जातो प्रत्येक वर्षी जून महिन्यात या प्रक्रियेला सुरुवात होते.

यावेळी समितीने अशी विचारणा केली की, समिती समोर जी माहिती प्राप्त झाली आहे, त्यानुसार जून महिन्यात प्रक्रियेला सुरुवात झाली असताना ऑक्टोबर अखेरपर्यंत कार्यवाही झालेली नाही.विहित मुदतीत ही कार्यवाही झाली पाहिजे, असे अपेक्षित आहे. जून महिन्यात प्रक्रियेला सुरुवात झाल्यानंतर मार्च महिन्यापर्यंत जर ती प्रक्रिया पूर्ण होत नसेल तर विभाग या संदर्भात गंभीर नाही, असे समितीचे मत झाले आहे. तसेच मंजूर तरतुदीमधील २२ कोटी रुपये अखर्चित राहिले आहेत. विभागाने मागणी केली असताना वर्षभरात खर्च केला नाही, ही बाब गंभीर असल्याचे नमूद करत विभागाच्या कामकाजाबाबत समितीने असमाधान व्यक्त केले.

मागील काळात हे घडले आहे परंतु, पुढील काळात दक्षता घेतली आहे. सन २००८-२००९ मध्ये ही चूक झाली आहे. सन २०१२-२०१३ ची परिस्थिती बघितली तर १९ ऑक्टोबर पर्यंत सर्व माहिती गोळा करण्यात आली व प्रस्ताव शासन स्तरावर पाठविण्यात आला. समितीने यापूर्वी विभागाला ज्या सूचना दिल्या होत्या, त्यानुसार दक्षता घेण्यात आली आहे व प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

विभागातील जिल्हा स्तरावरील अधिकारी कशा प्रकारचे काम करतात, याची सर्वांना कल्पना आहे. त्यामुळे आपण कितीही दक्षता घेतली तरी खालच्या यंत्रणेला जोपर्यंत शिस्त लागणार नाही, तोपर्यंत यामध्ये बदल घडणार नाही. याबाबत आपण कोणती कार्यवाही केली आहे? अशी विचारणा समितीने केली असता सर्व अधिकाऱ्यांना वेळापत्रक निश्चित करुन देण्यात आले असून विहित मुदतीत प्रस्ताव सादर होतील, याबाबतची दक्षता घेण्यात आली असल्याचे समितीस अवगत केले.

खर्चाचे मासिक अहवाल शासनास विहित मुदतीत का सादर करण्यात आले नाहीत, याबाबत कोणत्या कारणामुळे विलंब होतो ? आता नवनवीन तंत्रज्ञान उपलब्ध झाले आहे कोणतीही माहिती फोन, फॅक्स, ई-मेल किंवा अन्य आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने प्राप्त करुन घेऊ शकते किंवा पाठविण्यात येते तरी देखील विलंब का होतो? मुख्य कार्यालयाकडे दर महिन्याचे मासिक अहवाल प्राप्त होतात का ? विभागाकडून योजना व योजनेतर एकूण खर्चाच्या प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्यात केवळ ३८ ते ७८ टक्के खर्च केला जातो याचा अर्थ, कमकुवत नियंत्रण आहे. अर्थसंकल्पात तरतूद केलेला निधी १०० टक्के खर्च झाला पाहिजे ही सर्व कार्यपध्दती बघितली मत्स्यव्यवसाय विकास विभागात समन्वयाचा अभाव आहे असे समितचे स्पष्ट मत आहे.

सन १९९३ ते सन २००९ या कालावधी दरम्यान आहरण केलेल्या ५२ संक्षिप्त आकस्मिक देयकांचे रु.५३.१२ कोटीची तपशिलवार आकस्मिक देयके का सादर केली नाहीत? तसेच, देयकासोबतची सर्व बिजके आणि मंजूर आदेश गहाळ करण्यास कोण जबाबदार आहेत व त्यांच्यावर विभागाने कोणती कारवाई केली आहे ?अशी विचारणा समितीने केली असता एकूण ५२ संक्षिप्त आकस्मिक देयकांपैकी ५१ देयकांचा निपटारा झाला आहे. त्यामुळे आता रु.५३.१२ कोटीच्या देयकांपैकी केवळ रु.५०००/- ची देयके प्रलंबित आहेत अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

परिच्छेद क्रमांक ४.१.६.२ मधील बचतीच्या तक्त्यामध्ये एकूण अनुदान रुपये ७९२.७९ असून खर्च रुपये ५४९.०६ एवढा आहे व बचत २४३.७३ दाखविण्यात आली आहे. शासनाला समर्पित केलेली रक्कम रुपये १०३.०० एवढी आहे.

याविषयी खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सदरची आकडेवारी ही पुनर्विनियोजनापूर्वीची आहे. वर्षनिहाय आकडेवारी बघितली तर सन २००४-२००५ मध्ये मूळ तरतूद रुपये ५६.२८ व पूरक मागणी रुपये ४.९१ अशी एकूण रुपये ६१.१९ होती. प्राप्त तरतूद रुपये ५५.१२ लक्ष रुपये होती. एकूण सुधारित अंदाजानुसार रुपये ५०.५१ व पुनर्विनियोजनमध्ये -३.२६ होती. अंतिम सुधारित रुपये ५५.१७ होऊन खर्च रुपये ५४.१७ झालेला आहे यानुसार ०.४८ एवढा कमी खर्च झाला आहे. कर्मचाऱ्यांच्या वेतन फरकाची व भत्त्याची देयके कोषागाराने पारीत न केल्यामुळे ही बचत झाली आहे.

सन २००५-२००६ मध्ये शासनाने "डिझेल तेलावरील विक्रीकराची प्रतिपूर्ती" ही नवीन योजना सुरु केली. ही योजना पूर्वी विक्रीकर विभागाकडून राबविण्यात येत होती. सन २००५-२००६ मध्ये ही योजना मत्स्यव्यवसाय विकास विभागाकडे हस्तांतरित करण्यात आली. त्यावेळी योजनेचे स्वरुप आणि विभागही बदलला होता. नव्याने योजना आल्यामुळे सुरुवातीला डिझेल प्रतिपूर्तीसाठी मोठ्या प्रमाणावर म्हणजेच रु.१२९.०० कोटीची तरतूद करण्यात आली होती. परंतु, योजना नवीन असल्यामुळे व तातडीने अंमलबजावणी झाल्याने तरतुदीएवढा खर्च झाला नाही. मत्स्यव्यवसाय विकास विभागाकडून जेवढे लायसन्स दिलेले आहेत, ते सर्व गृहीत धरुन मागणी करण्यात आली होती. परंतु, रु.१२९ कोटी पैकी केवळ ५३ कोटी रुपये खर्च झाले आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर बचत दिसून येत आहे.

हायस्पीड डिझेलवर अनुदान देणे, ही केंद्र शासनाची एक योजना होती. यासाठी २० कोटी रुपयांची तरतूद केली होती. त्यापैकी फक्त ३.२ कोटी रुपयांची मागणी केंद्र शासनाने मंजूर केली. त्यामुळे २० कोटी रुपयांपैकी केवळ ३.२ कोटी रुपये खर्च झाले व १७ कोटी रुपयांची बचत झाली.

सन २००७-२००८ मध्ये नव्याने बीडीएस यंत्रणा कार्यान्वीत झाली होती. पहिल्या वर्षी ज्या स्लीप्स काढल्या त्या कोषागाराने स्वीकारल्या नाहीत बीडीएस यंत्रणेचे ते पहिलेच वर्ष होते. त्यावर्षी इंटरनेट कनेक्शन आम्हाला मिळू शकले नाही. या विभागात एकूण ५० डीडीओ आहेत. यापैकी बरेचसे तालुका स्तरावर व एसडीओ स्तरावर आहेत. इलेक्ट्रिसिटी, इंटरनेट, मोडेम या संदर्भातील अडचणी होत्या. ३/४ योजनांची देयके कोषागार विभागाने मंजूर केली नाहीत. महानगरपालिकेने भाडेपट्टीचे देयक विभागाकडे सादर केले नाही. या देयकासाठी विभागाने तरतूद ठेवली होती. परंतु, महानगरपालिकेने देयक सादर न केल्यामुळे खर्च होऊ शकला नाही व बचत झाली.

विभागीय प्रतिनिधींनी उपरोक्त केलेल्या खुलाशानुषंगाने वित्त विभागाच्या प्रतिनिधींनी विभागाकडे अशी विचारणा केली की, कोषागाराने ज्या वेळी देयके नाकारली त्या वेळी वित्त विभागाशी संपर्क का साधला नाही ? त्यावर खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, त्या वर्षी या संदर्भातील अडचण केवळ मत्स्यव्यवसाय विकास विभागाची नव्हती तर इतरही अनेक विभागांची होती. ट्रेनिंग, इंटरनेट कनेक्शन, मोडेम इ. कामे करावयाची असल्यामुळे अडचण निर्माण झाली होती. शिवाय महानगरपालिकेच्या भाडेपट्टीसाठी तरतूद

करण्यात आली होती. परंतु त्याबाबतची देयके प्राप्त झाली नव्हती. तसेच केंद्र सरकारकडे योजनेचे प्रस्ताव पाठविले होते. केंद्र सरकारकडून ३१ मार्च रोजी प्रस्तावांना मंजुरी मिळेल असे गृहीत धरुन रक्कम राखून ठेवली होती. परंतु त्या मुदतीत केंद्र सरकारकडून प्रस्तावांना मंजुरी न मिळाल्यामुळे सदरहू रक्कम शिल्लक राहिली.

विभागीय प्रतिनिधींने केलेल्या खुलाशास अनुसरुन महालेखाकार यांनी त्यांचे मत प्रदर्शित करतांना विभागीय सचिवांना असे विदित केले की, एचएसडी ऑईल के वॅट कंपोनेंट के पेमेंट पर गव्हर्नमेंट ने डिसाईड किया की मच्छीमार को-ऑपरेटीव सोसायटी जो एचएसडी ऑईल खरीदेगा, उसमें जो वॅट कंपोनेंट रहेगा यह महाराष्ट्र सरकार पे करेगा और इसके लिए अनुदान का कपोनेंट फिशरी विभाग को दिया गया, १३ करोड रुपये का अनुदान फिशरी विभाग को मिला जो कि ए.सी. बील के व्दारा निकाला, जब इसका ऑडिट हुआ और जब डिटेल कंटीजेंन्सी बिल जाँच किए गए तो उसमें वेरियस ऑब्जे्क्शन नोट किए गए जो कि महालेखापरीक्षक के ऑडिट रिपोर्ट में प्रिंट हुए, इस बारेमें विभाग ने अभी डिटेल उत्तर दिया है और उसकी जांच करने पर ऑडिट के नजर में आए मुद्दे इस प्रकार है. ओरिजनल पॅरा में एक इन्वाईस नंबर पर दो बार पेमेंट हुआ. विभागके डिटेल रिप्लाय में इस पर्टीक्युलर इन्वाईस नंबर को हटा दिया गया है. इसके अगेन्स्ट दो लाख रुपये का जो ओवर पेमेंट हुआ उसको तीन डिफरंट इन्वाईसेस में डिस्ट्रीब्युट किया ॲट दी रेट ऑफ रुपये ८७,१९५ पर इन्वाईस, ओरिजनली इन इन्वाईस के अगेन्स्ट ४०६६ पर बिल पेमेंट हुआ था जो कि ओरिजनल बीपीसीएल का बिल है. उसमें वॅट अमाऊंट मेन्शन नही है, इसलिए प्रश्न यह उपस्थित होता है की, ४०६६ के अगेन्स्ट रुपये ८७,१९५ पर बिल कैसे पास हुआ? दूसरा प्रश्न यह है की ४०६६ पर बिल पेड हा चुका है तो रुपये ८७,१९५ फिर से पेमेंट कैसे हुआ? सभी इन्वाईस नंबर की जांच करने पर ऑडिट का ऑब्जेक्शन था की, there is difference between the amount to be paid as per the invoice and HSD supply as against the amount posted for payment as per DC Bill, ओरिजनल पॅरा में रुपये ८७१०४५ पेड हुए जब कि रुपये ३८२१३६ ही अदा करने थे, उत्तर में डी.सी.बील के अगेन्स्ट एक्च्युअल पेमेंट को चेंज कर के ३.८२ लाख रुपये ही बताया गया है. इसलिए प्रश्न ये उठता है कि एक्च्युअल पेमेंट यदी ८.७१ लाख का था तो उसको रिडयुस कैसे किया गया ?क्या ऑईल कंपनी से रिफंड मिला है? तिसरा इश्यू यह है कि डी.सी.बिल और एक्च्युअल इन्वाईस में डिफरन्स है, इसको

रिकन्साईल करने पर भी रुपये ४५०६९ एक्सेस अमाऊंट पेड हुए. इस पर भी पेड अमाऊंट इन्वाईसेस पर चेंज शो किया गया है. महालेखापरीक्षक की विभाग से बिनती है की टोटल अमाऊंट आऊट ऑफ १३ करोड अनुदान के लिए जो विथड्रॉ हुए है, ए.सी.बिल के व्दारा उसका वॉव्हचर-वाईज रिकंसिलिएशन ऑईल कंपनी के साथ किया जाना चाहिए और लोकलेखा समिती को उसकी जानकारी दी जानी चाहिए. क्योंकि यह इश्यु बहुत ही गंभीर है.

महालेखाकार यांच्या उपरोक्त खुलाशास अनुसरुन विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, महालेखापरीक्षक का जो कहना है, उसके बारे में विभाग का यह कहना है कि तीन अलग अलग इन्वाईस पर रकम प्रदान की गई. हरेक में रुपये ८७,१९५ वॅट की प्रतिपूर्ती की गई. उसका इन्वाईस नंबर १४२२०७०९२८ दि.३०.५.२००५ वॅट की रकम ८७,१९५/-, इन्वाईस नंबर १४२२०७१०३९ दि.१.६.२००५ वॅट की रकम ८७,१९५/- और इन्वाईस नंबर १४२२०७११५२ दि.३.६.२००५ वॅट की रकम ८७,१९५/- है. इन सब की टोटल रकम २,६१,५८५ है.

यासंदर्भात महालेखाकारांनी पुनः त्यांचे मत व्यक्त करतांना सांगितले की, ओरिजनल पॅरा में एक इन्वाईस नंबर था जिस पर दो बार पेमेंट हुआ. आपके डिटेल रिप्लाय में इस पर्टीक्युलर इन्वाईस नंबर को हटा दिया गया है. ४०६६ पर बिल पेड हो चुका है तो रुपये ८७,१९५ का पेमेंट फिर से कैसे हुआ ? आपने ८७,१९५ रुपये कॅलक्युलेट किए है. वॅट कम्पोनेंट अलग से शो किया है. हर बिल पर प्रॉब्लम है. ज्यादा रकम पेड हुई है इसलिए विभाग को इस मुद्दे के बारे में ऑईल कंपनी के साथ बैठकर रिकन्सीलिएशन करना चाहिए. मच्छीमार को-ऑपरेटीव्ह सोसायटी जो एचएसडी ऑईल खरीदेगा, उसमें जो वॅट कम्पोनेंट रहेगा वह महाराष्ट्र सरकार पे करेगा और इसके लिए अनुदान का कम्पोनेंट फिशरीज विभाग को दिया गया.

यासंदर्भात वेगवेगळी बिले आहेत. यामध्ये एकूण रकमेच्या ३१ टक्के रक्कम रुपये ८७ हजार येते. बीपीसीएलने जी देयके दिली आहेत त्यामध्ये व्हॅट न दाखविता ती रक्कम बिलाच्या एकूण रकमेमध्ये समाविष्ट केली आहे. योजनेचे पहिलेच वर्ष असल्यामुळे आकस्मिकता निधीतून १३ कोटी रुपये घेतले होते. समितीने सुचविल्यानुसार १३ कोटी रुपयांच्या बाबतीत बीपीसीएल कंपनीकडून रिकन्सीलेशन करुन महालेखाकार यांना अहवाल सादर करण्यात येईल असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

यावर १३ कोटी रुपयांशी संबंधित ज्या ज्या कंपन्या आहेत त्या सर्वांचे रिकन्सीलेशन करुन घ्यावे व त्यानंतर समितीला पत्र द्यावे असे निदेश समितीने दिले.

तलाव ठेका देण्याची पध्दत काय आहे, राज्यात किती मत्स्यबीज केंद्रे आहेत ? अमरावती येथील मत्स्यबीज केंद्र बंद असल्याचे आढळून आले आहे. मत्स्यबीज तलावांचा ठेका भोई समाजाच्या संस्थेला दिला जातो की अन्य लोकांना दिला जातो ?याबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सन २००१ च्या शासन निर्णयानुसार तलावांचा ठेका दिला जातो. २०० हेक्टरच्या खाली एरिया असेल आणि एकाच संस्थेची मागणी असेल तर त्या संस्थेला ठेका दिला जातो. २०० हेक्टरच्या वर एरिया असेल तर आपापसात लिलाव करुन ठेका दिला जातो. जलसंपदा विभागाने २००१ नंतर जे तलाव मत्स्यव्यवसाय विकास विभागाकडे हस्तांतरित केले आहेत त्या तलावांचा ठेका देताना वर्तमानपत्रात जाहिरात देऊन ठेका दिला जातो. सध्या २००१ च्या जी.आर.नुसार ठेका दिला जातो. २००१ च्या शासन निर्णयाच्या कार्यवाहीमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे या बाबत सूचित करण्यात आले आहे. त्यानुसार तामिळनाडू, केरळ, आंध्र प्रदेश, कर्नाटक, गोवा या सारख्या कोस्टल राज्यांमध्ये ठेका देण्याची पध्दत तसेच याबाबत केंद्र सरकारच्या सूचना समाविष्ट करुन ठेका देण्याबाबतचे नवीन धोरण तयार करण्यात येत आहे. विभागाचा अनुभव असा आहे की, ज्या संस्थांना तलावाचा ठेका दिला जातो त्या संस्था कसल्याही प्रकारची भांडवली गुंतवणूक करीत नाहीत.

पाच प्रादेशिक उपायुक्त आणि संबंधित दोन सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयाचे मत्स्यबीज विक्री रु.३२.१३ लाख आणि भाडेपट्टी रु.९०.६६ लाख वसुली प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता ती थकबाकी नसून बुक ॲडजस्टमेंट आहे. एका कार्यक्षेत्रातून मत्स्यबीज घेऊन दुसऱ्या कार्यक्षेत्रात टाकल्याबाबतची ही थकबाकी आहे असे स्पष्टीकरण विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर केले.

ही थकबाकी केव्हापासून आहे ते नमूद केलेले नाही. शिवाय बुक ॲडजस्टमेंट असेल तर ते सुध्दा नमूद केल्याचे दिसून येत नाही याबाबत समितीने विचारले असता, या संदर्भातील बुक ॲडजस्टमेंट करुन घेण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. फार थोड्या संस्थांना मत्स्यबीज उपलब्ध करुन दिले आहे. ज्या संस्थांची थकबाकी असेल त्या संस्था जोपर्यंत थकबाकी जमा करणार नाहीत तोपर्यंत त्यांना पुढील अनुदान देऊ नये अशा सूचना संबंधितांना

देण्यात आलेल्या आहेत व या बुक ॲडजस्टमेंट संदर्भातील कार्यवाही सहा महिन्यात पुर्ण करण्यात येईल असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

सन २००१ च्या शासन निर्णयाच्या कार्यवाहीत बदल करुन आंध्र प्रदेश, गोवा अशी जी कोस्टल राज्ये आहेत त्या ठिकाणी असलेले धोरण महाराष्ट्रामध्ये लागू करणार असल्याचे विभागाने सूचित केले आहे. आज महाराष्ट्रामध्ये सर्वात जास्त मत्स्यबीज आंध्र प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यातून आणले जाते. आपली मत्स्यबीज निर्माण करणारी जी केंद्रे आहेत त्या ठिकाणी गोड्या पाण्यातील मत्स्यबीज निर्माण करण्याच्या दृष्टीने आज आपल्या महाराष्ट्रामध्ये असलेले धोरण चुकीचे ठरलेले आहे. त्यामुळे आपण कोस्टल एरियामध्ये जसे धोरण आहे त्याची अंमलबजावणी करणार की ठेका वाढविण्याची पध्दत चालू ठेवणार याबाबत समितीने विचारणा केली असता, या अनुषंगाने खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, महाराष्ट्रामध्ये ज्या हॅचरीज आहेत त्यांचा जास्तीत जास्त वापर करीत नाही हे खरे आहे. एका हेक्टरमध्ये एका हॅचरीजमधून किती उत्पादन झाले पाहिजे या बाबत केंद्र शासनाने निकष घालून दिलेले आहेत त्याप्रमाणात आपल्याकडील उत्पादन कमी आहे. त्याची काही कारणे आहेत. एक तर कालानुरुप जी टेक्नॉलॉजी बदलली पाहिजे ती बदललेली नाही. जुनी टेक्नॉलॉजी खराब झालेली आहे नवीन टेक्नॉलॉजी बदललेली नाही.

२०-२० वर्षापूर्वीची टेक्नॉलॉजी वापरुन काम केल्यामुळे आपले उत्पादन जास्त वाढणार नाही या बाबतीत खाजगी संस्था खूप पुढे गेलेल्या आहेत. विभागाला दरवर्षी बजेट मिळते, विभागाकडे इन्फ्रास्ट्रक्चर व कर्मचारीवर्ग आहे त्यामुळे आपण राज्यातील प्रमुख पुरवठादार असावयास पाहिजे परंतु खाजगी संस्था मुख्य पुरवठादार झालेल्या आहेत. या संदर्भात आयुक्तांनी विचार केला पाहिजे. खाजगी कंपनी अशा पध्दतीने चालेल का ? आपली मत्स्यबीज निर्मिती केंद्रे शासनाच्या निकषाप्रमाणे सुध्दा उत्पादन करीत नाहीत असे मत समितीने व्यक्त करुन विभागाच्या कामकाजाबाबत नाराजी व्यक्त केली.

एखादा माणूस ठेका घेतो, तलावात मत्स्यबीज टाकल्यानंतर मासे विक्री करुन पैसे घेऊन निघून जातो आणि विभागाच्या अधिकाऱ्यांना त्याचा पत्ता नसतो. ते निघून गेल्यानंतर थकबाकी दाखविली जाते. शिरगाव (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथे असे झाले आहे. कोकणामध्ये प्रत्येक ठिकाणी अशीच परिस्थिती आहे त्या ठिकाणचे ठेकेदार मुंबईतील असतात. मुंबईतील लोक त्या ठिकाणी जाऊन ठेका घेतात स्थानिक लोक ठेका घेत नाहीत. विभागाने सांगितले

की, भोई समाजाचे लोक ठेका घेतात, ते शहराच्या ठिकाणी ठेका घेत असतील परंतु खेडेगावामध्ये जे तलाव किंवा धरणे बांधलेली आहेत तेथील ठेका बाहेरचे लोक घेतात ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता, विभागाच्या धोरणाप्रमाणे २०० हेक्टरच्या खाली असेल तर स्थानिक संस्थेला ठेका देतो. ठेका दिल्यानंतर काही ठिकाणी उपठेका दिल्याचे निदर्शनास येते. अशा ठिकाणी कारवाई करुन ठेका रद्द केलेला आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

मत्स्यबीज निर्माण करणाऱ्या हॅचरीजमध्ये जुनीच टेक्नॉलॉजी असल्यामुळे त्या अपयशी ठरल्या आहेत. जे परंपरागत मत्स्यव्यवसाय करणारे लोक आहेत त्यांना नैसर्गिक पध्दतीने मत्स्यबीज तयार करण्याची कला अवगत आहे. त्या कलेला वाव देण्यासाठी शासनाच्या पातळीवर काही उपाययोजना चालू आहे का ? महाराष्ट्रामध्ये जे मत्स्यबीज लागते ते बाहेरच्या राज्यातून आणावे लागते. महाराष्ट्र राज्य हे मत्स्यबीज निर्यात करणारे राज्य व्हावे यादृष्टीने काही धोरण ठरविले आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, महाराष्ट्रात अंन्तर्देशिय (INLAND) क्षेत्राच्या बाबतीत साधारणत: मागणी ६० कोटी मत्स्यबीज एवढी आहे. त्यापैकी महाराष्ट्रामध्ये ३० कोटी मस्यबीज उत्पादित करतो. बाकीचे ५० टक्के म्हणजे ३० कोटी मत्स्यबीज गुजरात, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश या तीन राज्यातून आयात करतो. आपली टेक्नॉलॉजी जुनी झालेली आहे. विभागाकडे पुरेसे मनुष्यबळ नाही. २००७-२००८ ला आकृतिबंध मंजूर केला त्यामध्ये बरीच पदे काढली गेली. एका हॅचरीमधून १ कोटी मत्स्यबीज उत्पादित होते. पण १३ हॅचरीज चालवू शकत नाही. त्या ठिकाणी कॅपिटल इन्व्हेस्टमेंट तसेच नवीन टेक्नॉलॉजी लागते. त्यामुळे या १३ हॅचरीज आऊटसोर्सींग करुन भाडे तत्वावर चांगल्या संस्थेला देण्याचे विचाराधीन आहे. जे ठेकेदार त्यांच्या टेक्नॉलॉजीमध्ये ही केंद्रे चालवतील त्यांना भाडे तत्वावर देऊ अशी माहिती विभागीय प्रतिनिधीनी समितीस दिली.

मासे नैसर्गिकरीत्या अंडी घालतात आणि त्यातून मत्स्यबीज उत्पादन होते. ग्रामीण भागामध्ये अशा पध्दतीने मत्स्यबीज निर्माण करणारे जे लोक आहेत त्यांच्या दृष्टीकोनातून बाकीच्या राज्यांमध्ये व्यवस्था केलेली आहे व ते इतर राज्यांमध्ये मत्स्यबीज पुरवठा करतात. महाराष्ट्रामध्ये तसे का करीत नाही ? जे मत्स्यव्यवसाय करणारे लोक आहेत त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारावी म्हणून त्यांना तलावाचा ठेका देतो. ते तलावात मत्स्यबीज सोडून मासे मोठे करुन विकतात. त्यांनी मस्त्यबीज निर्मिती केली तर जास्त फायदा होऊ शकतो.

धोरणामध्ये बदल करण्याचे आपल्या विचाराधीन असल्याचे आपण सांगितले. जे मत्स्यव्यवसाय करणारे लोक आहेत त्यांचा आर्थिक विकास होण्याच्या दृष्टीने त्यांनी नैसगिक पध्दतीने मत्स्यबीज निर्मिती करण्याच्या दृष्टीने आणि ते मत्स्यबीज बाहेर विकण्याच्या दृष्टीने नवीन धोरणामध्ये या बाबीचा समावेश करावा अशी सूचना समितीने विभागीय प्रतिनिधींना केली.

तलाव ठेक्याच्या थकबाकीच्या वसुलीबाबत सूचना देण्यात आलेल्या असून सक्तीने वसुली करण्याची कार्यवाही सुरु आहे या विभागीय प्रतिनिधींनी दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने कोणत्या संस्थेकडे किती थकबाकी आहे अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, ज्या संस्थेची थकबाकी आहे त्यांना काळ्या यादी टाकून त्यांच्या बाबतीत आरआरसीची कारवाई करण्यात येते. ही सन २००४ पासूनची थकबाकी आहे. २००४-२००५ ते २००७-२००८ पर्यंत साधारणत: ८४ लाख रुपयांची थकबाकी आहे. ८४ लाख रुपयांपैकी ५ लाख रुपये वसूल झालेले आहेत. ८० लाख रुपयांची थकबाकी आहे. मुंबईमधील एकूण थकबाकी १ लाख ७५ हजार रुपये आहे. नाशिक मधील थकबाकी १९ लाख रुपये आहे. पुण्याची थकबाकी २० लाख रुपये आहे.

ज्यांना तलावाचे ठेके दिले त्यांनी उत्पादन मिळविलेले आहे. तरीही विभागाकडून वसुली होत नाही याविषयी समितीने नाराजी व्यक्त केली असता, ५ वर्षासाठी ठेका दिला जातो. त्यांनी पहिल्या वर्षाची रक्कम भरल्यानंतर दुसऱ्या वर्षाची रक्कम भरली नाही तर आरआरसी किंवा नोटीस पाठविण्याव्यतिरिक्त दुसरी कारवाई नाही तसेच जप्तीचा अधिकारही नसून त्यांचा ठेका रद्द केला जातो. परंतु थकबाकी राहू शकते. तसेच त्यांचे डिपॉझीट ५ ते ७ हजार रुपये असते. या लहान सोसायट्या असतात. त्यांची एवढी कुवत नसते असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

एखाद्या तलावाचा ठेका दिल्यानंतर ते काम सुरु करतात. त्या तलावातून मासे काढून त्यांची विक्री करतात. तलावातील मासे संपल्यानंतर आपले अधिकारी वसुलीसाठी जातात त्यावेळी त्यांच्या हातामध्ये पैसे नसतात. ८४ लाख रुपये जी जास्त रक्कम नसली तरी विभागाच्या कार्यपध्दतीमधील ही चूक आहे असे मत समितीने प्रदर्शित केले. यावर महालेखाकार यांनी यह अमाउंट सन १९७२ से लेना बाकी है. जो तालाब उनको दिए गए हैं, वे तालाब अब वहां पर हैं भी या नहीं, यह देखना आवश्यक है. इसके अलावा यह अमाउंट

यदि राइट ऑफ करना जरुरी है तो उस बारे में निर्णय लेकर इसको जल्द से जल्द रिकन्साइल करना चाहिए.असे मत व्यक्त केले.

विभागाचा आकृतीबंधाबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, सन २००८-२००९ मध्ये आकृतिबंध मंजूर केलेला आहे त्यामध्ये १०५० कर्मचारी मिळाले. जिल्हा पातळीवर जिल्हा मत्स्य विकास अधिकारी, २ सहाय्यक मत्स्य विकास अधिकारी, २ शिपाई आणि १ वॉचमन तसेच गाडी असेल तर १ वाहन चालक असा आकृतीबंध असतो.तसेच विभागाची एकूण ५२ केंद्रे आहेत. त्यापैकी ३९ हॅचरीज आणि १३ रिअरींग सेंटर्स आहेत. खोपोली, हडपसर, भूम (जि.सातारा), मुळानगर (जि.अहमदनगर), मोर्शी (जि.अमरावती), सिध्देश्वर (जि.हिंगोली) इत्यादी ठिकाणी हॅचरीज आहेत व विभागाकडे कर्मचारीवृंद कमी प्रमाणात आहे.

राज्यामध्ये मत्स्यउत्पादनाच्या वाढीकडे कोणीही फारसे गांभीर्याने पाहत नाही. धरणामध्ये कॅनॉल आणि गेट यामध्ये लिकेजेस असते. तलावामध्ये व धरणामध्ये अनेक वर्षापूर्वीचा गाळ साचलेला असतो. कमी खोली असलेल्या तलावामध्ये मत्स्याचे उत्पादन जास्त प्रमाणात होऊ शकत नाही. तलावांचे खोलीकरण व कॅनॉलगेट दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तलावामधील जास्तीत जास्त हेक्टर क्षेत्रामध्ये पाणी अडवून त्यामध्ये चांगल्या प्रतीचे मत्स्यबीज सोडणे आवश्यक आहे. बीज धरलेल्या माशांना उच्च प्रतीचे खाद्य पुरवून त्यांचे संगोपन चांगले केले तर मत्स्यव्यवसाय वृध्दिंगत होईल असे मत समितीने व्यक्त केले.

तसेच यापूर्वी जो २५० एकराच्या तलावाचा उल्लेख झाला होता. हा तलाव जर शंभर वर्षापूर्वीचा असेल तर त्यामध्ये मोठया प्रमाणात गाळ साचलेला असेल. हा गाळ उपसून तलावाचे खोलीकरण करुन त्यामधील केवळ शंभर किंवा पन्नास हेक्टरमध्ये मत्स्यव्यवसाय करता उपयोगी नाही. संपूर्ण २५० हेक्टर तलावक्षेत्रामध्ये प्रभावीपणे गाळ उपासणी करणे आवश्यक असल्याची सूचनाही समितीने विभागास केली.

संपूर्ण देशामध्ये महाराष्ट्र राज्य हे मत्स्यव्यवसायासंदर्भात तिसऱ्या चौथ्या क्रमांकावर आहे. आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल, कर्नाटक ही राज्ये अनुक्रमे पहिली, दुसरी व तिसरी आहेत तसेच सागरातील माशांचे उत्पादन दरवर्षी साडे चार लाख टन एवढे असते. असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

पावसाळयामध्ये पहिल्या दोन महिन्यांमध्ये मत्स्यबीज बीज धरलेले मासे, गाभोळलेल्या माशा मोठया प्रमाणात समुद्रामध्ये, तळे, तलाव, धरणे यामध्ये आढळून येतात. पावसाळयामध्ये पाण्याची पातळी वाढल्यानंतर या माशा व मोठमोठे मासे आपोआप वाहून जातात. कोकणामध्ये बीज धरलेले मासे व गाभोळलेल्या मासेच खाण्याची पध्दत प्रचलित आहे. गोडया पाण्यातील माशांच्या संदर्भातही तसेच होते. मत्स्यांनी बीज धरले न धरले तोच, मत्स्यप्रेमी बीज धरलेल्या माशांची चव चाखण्याकरिता त्यांना पकडून खातात. या परिस्थितीत गाभोळलेल्या माशांचे प्रमाण कमी होऊन एकूण प्रजनन व परिणामी उत्पादन कमी होते असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी समितीच्या मताशी सहमती दर्शविली व यासंदर्भात खुलासा करताना सांगितले की, या बाबीकरिता एक समिती स्थापन केली होती. तसेच, या बाबीचा अभ्यास करण्याकरिता केंद्र सरकारची एक एजन्सीही राज्यात आली होती. या एजन्सीच्या व समितीच्या अभ्यासानुसार केंद्र शासनाने या संदर्भात राज्याला २५ प्रकारच्या सूचना केलेल्या आहेत. पर्सिन २९४ असून त्यामध्ये ओव्हरएक्स्प्लॉयटेशन होत आहे, अशी माहिती आढळून आली आहे. राज्यामध्ये होणारे अतिशोषण हे सस्टेनेबल ओव्हरएक्स्प्लॉयटेशन नाही.

विभागाला मंजूर आकृतिबंधाप्रमाणे सद्यस्थितीमध्ये ३० टक्के कर्मचारी वर्ग कमी आहे. आता महाराष्ट्र लोकसेवा आयोग विभागाला वर्ग-१, वर्ग- २ अशा प्रकारे असिस्टंट कमिशनरच्या जागा देणार आहे. याची प्रक्रिया येत्या तीन ते चार महिन्यांमध्ये पूर्ण होणार आहे. वर्ग-३,वर्ग-४ च्या पदांची भरतीची प्रक्रिया महाराष्ट्र राज्य, परिषद,पुणे यांच्यामार्फत पूर्ण करण्यात येणार आहे अशी महिती विभागीय प्रतिनिधींनी यावेळी समितीस दिली.

विभागामध्ये अंतर्गत लेखापरीक्षण करण्याकरिता प्रशासकीय अधिकारी, एफडीओ, सिनिअर क्लार्क, ज्युनिअर क्लार्क या चार पदाधिकाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. विविध जिल्हयांतील ऑडिट करण्याकरिता एकूण ५४ प्रशासकीय अधिकारी, ५० डीडीओ उपलब्ध आहेत. एकूण ५४ कार्यालये आयुक्तंकडे असून. दर तीन वर्षांनी एकदा अंतर्गत लेखापरीक्षण झाले पाहिजे अशी सूचना आहे. मागच्या वर्षी सन २००९-२०१० या वर्षांचे एकूण तेरा कार्यालयांचे ऑडिट करण्यात आले होते. सन २०११-२०१२ मध्ये एकूण १५ कार्यालयांचे अंतर्गत लेखापरीक्षण करण्यात आले होते. सन २०१३ मध्ये एकूण २२ कार्यालयांचे लेखापरीक्षण करण्यात आलेले आहे.असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

तलाव, धरणे यामध्ये ठराविक अंतरावर बांध घालून पाणी अडविले जाते. या तलावांचे वा धरणातील कालव्यांचे खोलीकरण करण्यासंदर्भात मत्स्यव्यवसाय विकास विभागाने संबंधित विभागाकडे प्रस्ताव पाठवावा, असे समितीचे मत असल्याचे सांगितले असता तलावाचे पाणी अडवून मत्स्यव्यवसायाकरिता देण्यात यावे, अशा प्रकारचा अर्ज विभागाकडे येत नाही. तसेच, तलाव व कालवे यांच्या खोलीकरणासंदर्भातील एकही अर्ज येत नाही असे स्पष्टीकरण विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिले.

मत्स्यव्यवसायाला प्रोत्साहन देत असतांना राज्यातील ३५ जिल्हयातील प्रत्येकी दहा ते बारा तालुक्यांमध्ये एकूण २०० ते ३०० मत्स्यबीज केंद्रे उभारणे आवश्यक आहे. राज्यामध्ये मत्स्यव्यवसाय वृध्दिंगत होऊन लोकांना माशांचा पुरवठा भरघोस झाला तर काही प्रमाणात शेती व्यवसायावरील ताण कमी होईल. देशामध्ये मत्स्यव्यवसायासंदर्भात राज्याचा क्रमांक प्रथम येण्यास सहकार्य होईल. मत्स्यव्यवसाय करु इच्छिणाऱ्या लोकांना संकरित मत्स्यबीज तालुक्याच्याच ठिकाणी मिळाल्यानंतर त्याचा उत्साह द्विगुणित होईल. तसेच, त्याचे श्रम,वेळ व पैसा वाचेल असेही मत समितीने व्यक्त केले.

अभिप्राय व शिफारशी :-

मत्स्यव्यवसाय विभागातील पाच प्रादेशिक उपआयुक्त (औरंगाबाद, अमरावती, नागपूर, पुणे आणि नाशिक) आणि दोन मत्स्यव्यवसाय सहायक आयुक्त (रायगड आणि ठाणे) सन १९७२-७३ ते सन २००८-०९ या कालावधीत मत्स्यबीज विक्रीचे रु. ३२.१३ लाख आणि ९०.६६ लाखाच्या भाडेपट्टा कराराच्या भाड्याची वसूली प्रलंबित असल्याचे महालेखापालांनी अभिप्राय व्यक्त केले आहेत.

समितीसमोरील साक्षीदरम्यान विभागीय प्रतिनिधींनी सन २००४-०५ ते सन २००७-०८ पर्यंत तलाव ठेक्यासंदर्भात असलेली ८४ लाख रु. थकबाकी पैकी ५ लाख रु. वसूल केले असून ८० लाख रु.वसूली प्रलंबित असून त्यामध्ये मुंबईमधील थकबाकी १ लाख ७५ हजार रु., नाशिकमधील थकबाकी १९ लाख रुपये व पुण्याची थकबाकी २० लाख रु. असल्याचे समितीच्या निदर्शनास आणले. तसेच ती थकबाकी नसून बुक ॲडजस्टमेंट असल्याने एका क्षेत्रातून मत्स्यबीज घेऊन दुसऱ्या कार्यक्षेत्रात टाकल्याबाबतची थकबाकी असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी स्पष्टीकरण दिले. बुक ॲडजेस्टमेंट करणे ही विभागाची अंतर्गत बाब असून त्यासंदर्भात वेळीच कार्यवाही करणे आवश्यक होते. यातून विभागात अंतर्गत लेखापरीक्षणाचा अभाव असल्याचे

समितीचे अभिप्राय असून विभागामध्ये अंतर्गत लेखापरीक्षण याकरीता विभागाची समर्पित शाखा (Dedicated cell) स्थापन करण्यासंदर्भात त्वरीत उपाययोजना करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

समितीसमोरील साक्षीदरम्यान महाराष्ट्रामध्ये ६० कोटी इतक्या मत्स्यबीजाची मागणी असताना केवळ ३० कोटी मत्स्यबिजांची निर्मीती होत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. उर्वरीत ३० कोटी मत्स्यबीज गुजरात, पश्चिम बंगाल, आंध्रप्रदेश या राज्यातून आयात करावे लागते असेही समितीच्या निदर्शनास आले. मत्स्यव्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी राज्यातील विविध जिल्ह्यांतील तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात मत्स्यबीज केंद्रे उभारणे आवश्यक आहे. राज्यामध्ये मत्स्यव्यवसाय वृध्दिंगत झाल्यास काही प्रमाणात शेती व्यवयायमधील ताण कमी होण्यास मदत होईल. राज्यातील मागणीनुसार मत्स्यबीजांची निर्मीती व्हावी याकरिता व ते करताना मत्स्यव्यवसाय करणाऱ्या स्थानिक व्यक्तीचे आर्थिक हित सुध्दा जोपासले जावे याकरीता ठोस उपाययोजना करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिशिष्ट - अ

परिशिष्ट - ब

मंगळवार, दिनांक १४ मे, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १४ मे, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.२५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(४) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(५) श्री. गिरीष महाजन, वि.स.स.
(६) श्री. नाना पटोले, वि.स.स.
(७) श्री. विवेक पंडित, वि.स.स.
(८) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

(९) श्री.मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :
श्री.जहांगीर इमानदार, वरिष्ठ महालेखाकार

वित्त विभाग :
श्री.राजेश अग्रवाल, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

गृहनिर्माण विभाग
श्री. देवाशिष चक्रवर्ती, प्रधान सचिव

महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरण,मुंबई
(१) श्री. सतीश गवई, व्हाइस प्रेसीडेंट
(२) श्री.सुधांशु, सी.ओ.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००८-२००९ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.३.३.१ व ३.४.४ संदर्भात प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक १५ मे, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १५ मे, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.१० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

समिती सदस्य

(२) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(५) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(६) श्री. गिरीष महाजन, वि.स.स.
(७) श्री. नाना पटोले, वि.स.स.
(८) श्री. नितीन सरदेसाई, वि.स.स.
(९) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(१०) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

(११) श्री.मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. भाऊसाहेब कांबळे, अतिरिक्त सचिव
(२) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :
श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार

वित्त विभाग :
श्री.राजेश अग्रवाल, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

गृह विभाग

(१) श्री.अमिताभ राजन, अपर मुख्य सचिव
(२) श्री.के.एल.प्रसाद, अपर पोलीस महासंचालक (राज्य गुप्त वार्ता)
(३) श्री.के.एल.बिष्णोई, अपर पोलीस महासंचालक (नियोजन व समन्वय)

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००८-२००९ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.३.४.३ संदर्भात अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २१ मे, २०१३

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २१ मे, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.२० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. मधुकर चव्हाण, वि.स.स.
(३) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(४) श्री. विवेक पंडित, वि.स.स.
(५) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(६) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :
श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार

वित्त विभाग :
श्री.वि.द.आठवले, उप सचिव, (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

उच्च व तंत्रशिक्षण विभाग
श्री.संजय कुमार, प्रधान सचिव,

कृषी, व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभाग
श्री.अनिल डिग्गीकर, सचिव,

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००८-२००९ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.३.४.१ संदर्भात प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांची साक्ष पुर्ण तसेच परिच्छेद क्र.४.१ संदर्भात सचिव, कृषी, व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभाग यांची साक्ष अपूर्ण राहिली.

बुधवार, दिनांक २२ मे, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २२ मे, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन सायंकाळी १.०० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. मधुकर चव्हाण, वि.स.स.
(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) श्री. सुनिल केदार, वि.स.स.
(५) श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
(६) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(७) ॲड. दिलीप सोपल, वि.स.स.
(८) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(९) श्री. नाना पटोले, वि.स.स.
(१०) श्री. विवेक पंडित, वि.स.स.
(११) श्री.जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(१२) श्री. विनायक मेटे, वि.प.स.
(१३) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री. भाऊसाहेब कांबळे, अतिरिक्त सचिव

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :
श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार, मुंबई

वित्त विभाग :
श्री.राजेश अग्रवाल, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय

श्री.एस.के.मुखर्जी, सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००८-२००९ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.३.३.३ व ३.३.४ संदर्भात सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची साक्ष अपूर्ण राहिली.

बुधवार, दिनांक २९ मे, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २९ मे, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी २.०५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(३) श्री. सुनिल केदार, वि.स.स.
(४) श्री. बदामराव पंडित, वि.स.स.
(५) श्री. विवेक पंडित, वि.स.स.
(६) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. भाऊसाहेब कांबळे, अतिरिक्त सचिव
(३) श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
(४) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
(५) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय

(१) श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार
(२) श्रीमती शिला जोग, महालेखाकार

वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई

श्रीकांत देशपांडे,सचिव, वित्त (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

जलसंपदा विभाग

(१) श्री.ए.बा.पाटील, प्रधान सचिव
(२) श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव (लाभक्षेत्र विकास)

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००८-२००९ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.३.२.४ व ३.२.५ संदर्भात सचिव, जलसंपदा विभाग यांची साक्ष पूर्ण झाली.

मंगळवार, दिनांक ११ जून, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ११ जून, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.४५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री.मधूकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) श्री. सुनिल केदार, वि.स.स.
(५) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(६) श्री. नाना पटोले, वि.स.स.
(७) श्री. आर.एम.वाणी, वि.स.स.
(८) श्री. विवेक पंडित, वि.स.स.
(९) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(१०) श्री. विनायक मेटे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
(२) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय

(१) श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार
(२) श्रीमती शिला जोग, महालेखाकार

वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई

श्री.विलास आठवले, उप सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

कृषी व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभाग

श्री.पराग जैन, आयुक्त

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००८-२००९ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.४.१ संदर्भात विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक १२ जून, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १२ जून, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.५५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री.मधूकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(५) श्री. नाना पटोले, वि.स.स.
(६) श्री. आर.एम.वाणी, वि.स.स.
(७) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(८) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

(९) श्री.विनायक राऊत, वि.प.स.
(१०) श्री.मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
(२) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय

श्रीमती शिला जोग, महालेखाकार

साक्षीदार :

गृह विभाग
डॉ.अमिताभ राजन, अप्पर मुख्य सचिव

ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभाग
श्री.व्ही.गिरीराज, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००८-२००९ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. २.५ संदर्भात अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग तसेच प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक १८ जून, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १८ जून, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी २.०५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीष बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) श्री. सुनील केदार, वि.स.स.
(५) श्री. लक्ष्मण जगताप, वि.स.स.
(६) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(७) श्री. गिरीष महाजन, वि.स.स.
(८) श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स.
(९) श्री. आर.एम.वाणी, वि.स.स.
(१०) श्री. चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.
(११) श्री. विवेकभाऊ पंडित, वि.स.स.
(१२) श्री. नितीन सरदेसाई, वि.स.स.
(१३) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(१४) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

(१५) श्री. विनायक राऊत, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. यु.के.चव्हाण, अतिरिक्त सचिव
(२) श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
(३) श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय
श्रीमती शिला जोग, महालेखाकार

वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
श्री.वि.द.आठवले, उप सचिव, (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

सार्वजनिक आरोग्य विभाग
श्री.टी.सी.बेंजामिन, अप्पर मुख्य सचिव.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००८-२००९ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.२.१ व ३.१.१ संदर्भात अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक १९ जून, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १९ जून, २०१३ रोजी हाय माऊंट स्टेट गेस्ट हाऊस व प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंधेरी मुंबई येथे भेट व बैठक.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीष बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) श्री. सुनील केदार, वि.स.स.
(५) श्री. बदामराव पंडित, वि.स.स.
(६) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(७) श्री. गिरीष महाजन, वि.स.स.
(८) श्री. आर.एम.वाणी, वि.स.स.
(९) श्री. विवेकभाऊ पंडित, वि.स.स.
(१०) श्री. नितीन सरदेसाई, वि.स.स.
(११) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(१२) श्री. विनायक मेटे, वि.प.स.
(१३) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. यु.के.चव्हाण, अतिरिक्त सचिव
(२) श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
(३) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
(४) श्री. सोमनाथ न. सानप, कक्ष अधिकारी

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय
श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार

वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
श्री.वि.द.आठवले, उप सचिव, (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

गृह (परिवहन) विभाग

(१) डॉ.शैलेश कुमार शर्मा, प्रधान सचिव
(२) श्री.वि.ना.मोरे, परिवहन आयुक्त

सार्वजनिक बांधकाम विभाग

(१) श्री.श्यामल कुमार मुखर्जी, सचिव
(२) श्री.अ.ब. गायकवाड, अधीक्षक अभियंता

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००८-२००९ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ३.३.३ व ३.३.४ संदर्भात प्रधान सचिव, गृह (परिवहन) विभाग तसेच सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची साक्ष अपूर्ण राहिली.

बुधवार, दिनांक ३ जुलै, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ३ जुलै, २०१३ नवी दिल्ली येथील नवीन महाराष्ट्र सदन येथे सकाळी १०.१५ वाजता सुरु होऊन दुपारी २.३० वा. स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीष बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(३) श्री. सुनील केदार, वि.स.स.
(४) श्री. विजय वडेट्टिवार, वि.स.स.
(५) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(६) श्री. आर.एम.वाणी, वि.स.स.
(७) श्री. विनायक मेटे, वि.प.स.

निमंत्रित

(८) श्री.मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
(२) श्री. सोमनाथ न. सानप, कक्ष अधिकारी

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय

श्री.जहांगिर इनामदार, वरिष्ठ महालेखाकार

वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई

श्री.वि.द.आठवले, उप सचिव, (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली

(१) श्री. बिपीन मल्लिक, प्रधान सचिव, निवासी आयुक्त
(२) श्री. नितीन गायकवाड, सहायक निवासी आयुक्त (राजशिष्टाचार व व्यवस्थापन)

सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई

(१) श्री. श्यामल कुमार मुखर्जी, सचिव
(२) श्री. बिपीन संखे, मुख्य वास्तुशास्त्रज्ञ
(३) श्री. चं.प्र.जोशी, मुख्य अभियंता
(४) श्री. अे.बी.गायकवाड, अधीक्षक अभियंता, मुंबई मंडळ

महाराष्ट्र परिचय केंद्र, निवासी आयुक्त कार्यालय, नवी दिल्ली

श्री. प्रवीण टाके, जनसंपर्क अधिकारी

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००८-२००९ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ३.३.३ व ३.३.४ संदर्भात सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची साक्ष अपूर्ण राहिली.

बुधवार, दिनांक १४ ऑगस्ट, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १४ ऑगस्ट, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.४० वाजता स्थगित झाली.

कार्यकारी समिती प्रमुख

(१) श्री. आर.एम.वाणी, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) श्री. विनायक निम्हण, वि.स.स.
(५) श्री.राहुल बोंद्रे, वि.स.स.
(६) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(७) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय
श्री.जहांगिर इनामदार, वरिष्ठ महालेखाकार

वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
श्री.राजेश अग्रवाल, सचिव, (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभाग
श्री. एस.एस.संधू, प्रधान सचिव

ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभाग
श्री. व्ही.गिरीराज, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००८-२००९ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. २.३ संदर्भात प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग तसेच परिच्छेद क्र. २.४ संदर्भात प्रधान सचिव, जलसंधारण विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक ५ फेब्रुवारी, २०१४
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ५ फेब्रुवारी, २०१४ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.०५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री.गिरीष बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) श्री. सुनिल केदार, वि.स.स.
(५) श्री. विजय वडेट्टिवार, वि.स.स.
(६) श्री. लक्ष्मण जगताप, वि.स.स.
(७) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.

निमंत्रित

(८) श्री. मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. यु.के.चव्हाण, अतिरिक्त सचिव
(२) श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय

श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार

वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई

श्रीमती राधिका रस्तोगी, सचिव, (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

गृह (परिवहन) विभाग

(१) डॉ.शैलेश कुमार शर्मा, प्रधान सचिव
(२) श्री.वि.ना.मोरे,आयुक्त

सार्वजनिक बांधकाम विभाग

श्री.श्यामलकुमार मुखर्जी सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००८-२००९ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ३.३.३. व ३.३.४ संदर्भात प्रधान सचिव, गृह विभाग तसेच सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची साक्ष पूर्ण झाली.

मंगळवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०१४
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०१४ रोजी विधान भवन, मुंबइ येथे दुपारी ३.०० वाजता सुरु होऊन दुपारी ४.०० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(२) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(७) श्री.मधुकर ऊर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(८) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(९) श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स.
(१०) श्री.लक्ष्मण जगताप, वि.स.स.
(११) श्री.विक्रमसिंह पाटमकर, वि.स.स.
(१२) श्री.बदामराव पंडित, वि.स.स.
(१३) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.
(१४) श्री.विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.
(१५) श्री.नितीन सरदेसाई, वि.स.स.
(१६) श्री.विनायक मेटे, वि.प.स.
(१७) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

(१८) श्री.मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री.यु.के.चव्हाण, अतिरिक्त सचिव
(२) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(४) श्री.ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
(५) श्री.दिलीप येवला, अवर सचिव (समिती)

समितीने सतरावा प्रारुप अहवाल विचारात घेतला व काही सुधारणांसह तो संमत केला.